# ''ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीकरिता सादर केलेला प्रबंध.


संशोधक

श्री. विठ्ठल नारायण मोरे

रजि.नं.०२११२००६०९८

मार्गदर्शक

प्रा. डॉ. कै. जालिंदर भोसले

इतिहास विभाग प्रमुख व असो. प्रोफेसर

आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे – ४.


ऑक्टोबर २०१८

# अर्पणपत्रिका

शिक्षणामुळेच आपल्या कुटुंबाचा उद्धार होईल अशी आस मनी बाळगून प्रतिकूल परिस्थितीत आम्हा भावंडांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देणारे माझे वडील कालकथीत नारायण सावळाराम मोरे (गुरूजी) व सतत मायेची पाखरं घालणारी माझी निरक्षर आई सुलोचना नारायण मोरे यांनी घालून दिलेल्या कृतीशील विचारांच्या चरणी अर्पण.

## प्रतिज्ञा प्रमाणपत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, 'ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य' हा पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो संपूर्णपणे स्वतंत्र आहे. तो कोणत्याही विद्यापीठाकडे वा अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक :

**श्री. विठ्ठल नारायण मोरे**

एम.ए. (इतिहास)

कायम नोंदणी क्र.०२११२००६०९८

## पात्रता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, विठ्ठल नारायण मोरे या विद्यार्थ्यांचा इतिहास विषयातील पीएच.डी. पदवी अभ्यासक्रमासाठीचा 'ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य' या विषयावरील शोध प्रबंध पीएच. डी. पदवीसाठी विद्यापीठाकडे पाठविण्यास योग्य आहे. करिता तो स्विकारला जात आहे.

करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**अंतर्गत परिक्षक** **बर्हिगत परिक्षक**

सही सही

**नाव : डॉ. जालिंदर भोसले**

इतिहास विभाग प्रमुख व असोशिएट्स प्रोफेसर

आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

दिनांक : दिनांक :

# प्रमाणपत्र

श्री. विठ्ठल नारायण मोरे यांनी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विभागाच्या पीएच. डी. पदवी करीता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून २०१३–१४ मध्ये सादर केलेला आहे.

श्री. विठ्ठल नारायण मोरे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनातून 'ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य' हा शोध प्रबंध साकार झाला आहे. हा शोध प्रबंध स्वतंत्ररित्या लिहिलेला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक :

**डॉ. जालिंदर भोसले**

इतिहास विभाग प्रमुख व असोशिएट्स प्रोफेसर,

आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

# ऋणनिर्देश

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य या विषयावरील शोध प्रबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. हा शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहे. म्हणून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे माझे प्रथम कर्तव्य आहे.

प्रस्तुत विषयावरील शोध प्रबंधाला मार्गदर्शक म्हणून लाभले ते माझे आदरणीय गुरूवर्य डॉ. जालिंदर भोसले सर, असोशिएटस् प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे. त्यांनी वेळोवेळी आपुलकीने केलेले मार्गदर्शन अमूल्य आहे. त्यांचे आभार मानताना शब्द कमी पडतात, त्याबद्दल मी त्यांचा अखंड ऋणी राहील.

मला पीएच. डी. पदवीसाठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या ऋणात राहणे पसंत करीन. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालयाने विविध पुस्तके उपलब्ध करून देऊन अनमोल मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सदर संशोधन कार्यासाठी आवश्यक साधन सामग्री, भेटीसाठी, मुलाखती या कामी स्वतः बाबा आढाव, भाई वैद्य (माजी गृहराज्यमंत्री, महाराष्ट्र शासन), मधुकर निरफराके (राष्ट्रसेवादल), रामचंद्र जाधव (समाजवादी अध्यापक सभा), बाबा आढाव यांचे कार्यालयीन कर्मचारी माधव घोटमुकले, बापू विरोळे यांनी आपला बहुमोल वेळ खर्च करून मुलाखती देऊन सहकार्य केले त्याबाबत त्यांचे ऋण व्यक्त करतो.

माझे परम प्रिय मित्र सुहास नाईक, हनुमंत हुचगोळ, मंगेश भोंडवे, राजेंद्र गेजगे, पंकज यंदे यांनी अडचणींच्या प्रसंगी वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

माझ्या या संशोधन कार्यासाठी माझी परम प्रिय पत्नी वैशाली हिने खंबीर पाठिंबा व सतत प्रोत्साहन दिले. त्याबद्दल तिचेही ऋण व्यक्त करतो. निरक्षर आई सुलोचना व माझ्या शिक्षिका असलेल्या तीनही बहिणी अनुक्रमे मायादेवी जनार्दन लोंढे, संगीता संजय कांबळे, आम्रपाली अशोक गडवे व वडील बंधू अजित मोरे, वहिनी वंदना मोरे यांचे अनमोल असे सहकार्य लाभले म्हणून त्यांचेही आभार मानणे माझे परम कर्तव्य आहे.

माझ्या सासुबाई व सासरे शशिकला विठ्ठल कांबळे, मेहुण्या विक्षाला विवेक सावळे, सुक्षाला निलेश शेलार यांना धन्यवाद देतो, सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझी मुलगी श्रावणी, मुलगा जीवक यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

माझ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, पुणे येथील मुख्याध्यापिका कल्पना वाघ, नवीन मराठी शाळा, सातारा येथील मुख्याध्यापिका कल्पना आगवणे, हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्स शाळा, पिंपरी येथील मुख्याध्यापिका सुलभा भुजबळ, तीनही शाळातील माझे सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, माजी मुख्याध्यापिका सुप्रिया माजगांवकर, अंजली डोंगरे, संस्थेचे पदाधिकारी डॉ. सुनिल भंडगे, डॉ. सविता केळकर यांचे ऋण न फेडता येण्यासारखे आहेत.

माझे ज्येष्ठ सहकारी मधुकर पवार, दादासाहेब गायकवाड, सतीश घमरे, बाबुलाल वाघमारे, माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, राजेंद्र सोनवणे, लतीफ सय्यद, शुभम दाखले यांनी प्रबंध पूर्ण करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले, त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

या प्रबंधाच्या अक्षर जुळणीचे काम आकर्षक, सुबक, नीटनेटके करून दिल्याबद्दल साईनाथ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, पुणे यांचेही मी आभार व्यक्त करतो.

शेवटी या प्रस्तुत शोध प्रबंधाच्या संशोधन कार्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत देऊन सहकार्य केले त्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

**श्री.विठ्ठल नारायण मोरे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | विषय प्रवेश | १ ते ७ |
| २ | जीवनचरित्र | ८ ते २५ |
| ३ | सामाजिक कार्य | २६ ते ४६ |
| ४ | संस्था व संघटनात्मक कार्य | ४७ ते ११२ |
| ५ | समकालीन सामाजिक चळवळींचा अभ्यास | ११३ ते १६६ |
| ६ | वैचारिक अभ्यास | १६७ ते २६४ |
| ७ | मूल्यमापन व निष्कर्ष | २६५ ते ३०५ |
| ८ | परिशिष्टे | ३०६ ते ३३७ |
| ९ | संदर्भ साधने | ३३८ ते ३४१ |

प्रकरण पहिले

# विषय प्रवेश

| | |
|---|---|
| १.१ | प्रस्तावना |
| १.२ | प्रबंधाचे शीर्षक |
| १.३ | संशोधन विषयाचे महत्त्व |
| १.४ | उद्दिष्टे |
| १.५ | गृहितके |
| १.६ | व्याप्ती व मर्यादा |
| १.७ | पद्धती |
| १.८ | संदर्भ साधने |
| १.९ | आराखडा |

# प्रकरण पहिले

# विषय प्रवेश

## १.१ प्रस्तावना

पुणे जिल्हा हा ऐतिहासिक, सहकार, स्वातंत्र्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळीत एक अग्रगण्य जिल्हा आहे. पुणे शहराला विद्येचे व संस्कृतीचे माहेरघर म्हणून मान्यता मिळालेली आहे. या जिल्हयाच्या विविध क्षेत्रातील जडणघडणीत अनेक थोर नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे मोठे योगदान लाभलेले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात पुणे शहरातून पुरोगामी विचारांची नवी लाट उदयास आली. अनेक चळवळींनी जनसामान्यांच्या पाठीशी उभे राहून परकीय ब्रिटिश सत्तेला जबरदस्त हादरा दिला. भारतीय मातीतील भूमिपुत्रांच्या न्याय, हक्क व आर्थिक समानतेच्या जाणिवेसाठी या चळवळींनी जागृत करुन एक परिवर्तनीय इतिहास निर्माण केलेला आहे. शेतकरी, कामगार, हमाल, स्त्रिया, दलित, बालमजुरी, अस्पृश्यता, अत्याचार, विधवा, बालविवाह, पाणवठे, रस्ते, वीज, समाजमंदिरे या ज्वलंत विषयाच्या संदर्भाने पुरोगामी विचारांच्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या.

बाबा आढाव त्यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात १ जून १९३० रोजी ऐतिहासिक अशा पुणे शहरात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे म्युनिसिपालटीच्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण श्री. शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये झाले. त्यांनी बी.एस्सी. केल्यानंतर आयुर्वेदातील वैद्यक शास्त्राची पदविका प्राप्त केली. आजोबा हे सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळीतील आघाडीचे नेते होते. आजोबांच्या प्रेरणेने बालपणीच महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते सत्यशोधक चळवळींकडे आकर्षित झाले.

विद्यार्थीदशेतच त्यांनी राष्ट्रसेवादलात शाखानायक व संघटक पदाची जबाबदारी स्विकारली होती. सत्यशोधक समाजाचा वारसा असलेल्या या युवकाने सर्वसामान्य व गरिबांसाठी घरातच दवाखाना सुरु केला. लोकांचे प्रबोधन व्हावे म्हणून विकास व्याख्यानमाला सुरु केली. देशाच्या फाळणीनंतर निर्वासितांसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांची ख्याती राज्यभर पसरली.

डॉ. बाबा आढाव यांनी हमाल पंचायत उभारुन कामगार चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविली. कामगार क्षेत्रातील त्यांचे योगदान मोठे आहे. कामगारांसाठी लढा देताना त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्न, देवदासी परिषद, हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, टेम्पो पंचायत, पतसंस्था, कष्टाची भाकर येथे त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण कार्याचा ठसा उमटवला.

### १.२ प्रबंधाचे शीर्षक

स्वातंत्र्यानंतरही महाराष्ट्रामध्ये अनेक चळवळी निर्माण झाल्या. कष्टकरी, कामगारांची चळवळ देखील महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात झाली. या चळवळीमध्ये डॉ. बाबा आढाव यांचे योगदान महत्त्वाचे आहे. डॉ. बाबा आढाव यांच्या सामाजिक कार्याचे विविध स्तर, त्यांचा वैचारिक अधिष्ठानाविषयी व त्यांच्या संपूर्ण जीवनपटाचा अभ्यास करण्यासाठी विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीकरिता ''डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य'' या संशोधन विषयाची निवड केली आहे.

महाराष्ट्रामध्ये आजवर अनेक समाजसुधारकांनी, समाजसेवकांनी परिवर्तनासाठी व प्रबोधनासाठी सामाजिक चळवळी केलेल्या आहेत. डॉ. बाबा आढाव यांचे स्थान यामध्ये निश्चितच महत्त्वाचे आहे. डॉ. बाबा आढाव यांच्या जीवनकार्याचा यथासांग अभ्यास व डॉ. बाबा आढाव यांच्यामुळे समाजात झालेने परिवर्तन, डॉ. बाबा आढाव याच्या चळवळीचे यशापयश इत्यादी घटकांच्या सखोल अभ्यासाचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे.

### १.३ संशोधन विषयाचे महत्त्व

'डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य' हा संशोधन विषय नाविन्यपूर्ण आहे. इतिहास विषयामध्ये डॉ. बाबा आढाव यांच्यावर अभ्यास झालेला नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधनामुळे डॉ. बाबा आढाव यांच्या जीवन व कार्यासोबत कष्टकरी व कामगार यांच्या बहुआयामी चळवळींचा अभ्यास करता आला.

वाढते यांत्रीकिकरण, औद्योगिकरण, जागतिकीकरण यामुळे समकालीन काळात भरडले जाणारे कामगार व कष्टकरी यांना प्रस्तुत संशोधन विषयामधून प्रेरणा मिळाली. तसेच

डॉ. बाबा आढाव यांच्या चळवळीचे स्वरूप व दिशा समजण्यास मदत झाली. डॉ. बाबा आढाव यांच्या चळवळींमुळे समाजात झालेल्या परिवर्तनाचे आकलन झाले.

महाराष्ट्र राज्याच्या कामगार चळवळीत डॉ. बाबा आढाव यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या कार्याची माहिती जुन्या पिढीतील लोकांना असली तरी, आजच्या काळातील तरूण पिढीला या बहुमोल कार्याची प्रचिती नाही. त्यांचे कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारे आहे.

या अभ्यासामुळे डॉ. बाबा आढाव व अभ्यास क्षेत्राच्या परिघाबाहेर राहणारे कष्टकरी व कामगार यांच्यावर नव्याने प्रकाशझोत पडलेला आहे. त्यामुळे वंचितांच्या इतिहासात भर पडलेली आहे. कष्टकरी कामगार यांचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. बाबा आढाव यांच्यावरील लिखीत साहित्याचा अभाव आहे. अशा वेळी हा अभ्यास चळवळ व त्यांचे नेतृत्व याविषयीचे ज्ञान समृद्ध करणारा ठरणार आहे.

या अभ्यासामुळे नवी मांडणी, नवे कार्यक्रम चळवळींना उपलब्ध होतीलच, परंतु गतकालीन चुकाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी हा अभ्यास एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल. हेच या संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

इतिहास विषयामधून आता जगभर चळवळी व त्यांचे नेतृत्व यांचा अभ्यास केला जात आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक व्यक्तीच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला गेला असला तरी डॉ. बाबा आढाव यांना मध्यवर्ती ठेवून विद्यापीठीय पातळीवर असा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे डॉ. बाबा आढाव यांच्या जीवन व कार्याचा सखोल व सलगपणे अभ्यास करण्याकरिता डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य या विषयावर संशोधन केलेले आहे.

### १.४ संशोधनाची उद्दिष्टे

१. डॉ. बाबा आढाव यांचे जीवन व कार्य अभ्यासणे तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील त्यांचे योगदान अभ्यासणे.

२. राष्ट्रसेवादलातील योगदानासह शेतकरी, महिला, हमाल, कागदकाचपत्रा यांच्या चळवळीतील डॉ. बाबा आढाव यांचे कार्य अभ्यासणे.

३. डॉ. बाबा आढावांच्या चळवळीमुळे समाजावर झालेल्या परिणामांचा मागोवा घेणे.

४. डॉ. बाबा आढावांच्या संस्थात्मक कार्याचा आढावा घेणे.

५. डॉ. बाबा आढावांच्या लेखन, चिंतन व संशोधनाचा अभ्यास करणे.

६. डॉ. बाबा आढावांच्या समकालीन चळवळींचा तौलनिक अभ्यास करणे.

## १.५ संशोधनाची गृहितके

१. डॉ. बाबा आढाव यांचे जीवन प्रतिकूल परिस्थितीत घडले.

२. डॉ. बाबा आढाव यांनी वंचिताच्या हिताचे व विषमता विरोधी चळवळीमध्ये कार्य केलेले आहे.

३. डॉ. बाबा आढाव यांनी चळवळीत अविरत संघर्ष केलेला आहे.

४. डॉ. बाबा आढाव यांच्या चळवळीची दखल घेऊन कष्टकरी कामगारांसाठी सरकारने अनेक कायदे केलेले आहेत.

५. डॉ. बाबा आढाव यांच्या संघर्षामुळे असंघटित, अंगमेहनती, हमाल, कष्टकरी, अपंग व स्त्रियांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे.

६. डॉ. बाबा आढाव यांचे संस्थात्मक कार्य समाजोपयोगी आहे.

७. डॉ. बाबा आढाव यांचे कार्य समाजाला मार्गदर्शक असे आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

'डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य' या संशोधन विषयासाठी इ.स. १९३० ते इ.स.२०१२ ही कालमर्यादा निर्धारीत केलेली आहे.

इ.स.१९३० ते इ.स.१९८० पर्यंत प्रसार माध्यमांच्या अपुऱ्या सुविधांमुळे डॉ. बाबा आढाव यांच्या जीवन व कार्याचे अनेक पैलू अप्रकाशित आहेत. तसेच या कालावधीतील डॉ. बाबा आढाव यांच्या चळवळीतील घटनांचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हयात नाहीत ही या संशोधनाची मर्यादा आहे.

## १.७ संशोधन पद्धती

'डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य' या विषयाच्या संशोधनाकरिता

१. वर्णनात्मक संशोधन पद्धती.

२. ऐतिहासिक संशोधन पद्धती.

३. मुलाखत व प्रश्नावली पद्धती.

४. परिचयात्मक पद्धती.

५. संदर्भ पद्धती.

इत्यादी संशोधन पद्धतीचा उपयोग प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये करण्यात येणार आहे.

**१.८ संशोधनाची संदर्भ साधने**

'डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य' या संशोधन विषयासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला. यामध्ये समकालीन व्यक्तींच्या मुलाखती, वृत्तपत्रे व नियतकालिकामधील बातम्या, डॉ. बाबा आढावांनी केलेले वेगवेगळे प्रकारचे लेखन, डॉ. बाबा आढाव यांनी स्थापन केलेल्या संस्थाचे अहवाल, माहितीपत्रके, छायाचित्रे इत्यादी माहितीचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे.

**१.९ संशोधनाचा आराखडा**

'डॉ. बाबा आढाव : जीवन व कार्य' या संशोधन विषयाची विभागणी एकूण सात प्रकरणामध्ये करण्यात आली आहे.

**अ. प्रकरण पहिले : विषय प्रवेश**

या प्रकरणामध्ये संशोधनाचा आराखडा देण्यात आलेला आहे. प्रबंधाचे शिर्षक, विषयांचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती, मर्यादा, संशोधन पद्धती, संदर्भ साधने यांचा संभाव्य आराखडा मांडण्यात आलेला आहे.

**ब. प्रकरण दुसरे : जीवनचरित्र**

या प्रकरणामध्ये डॉ. बाबा आढाव यांचे घराणे, पूर्व चरित्र, शिक्षण व व्यवसाय, कुटुंब, प्रेरणा व बाबा आढाव यांना मिळालेला वैचारिक वारसा इत्यादी घटकांचा ऐतिहासिक मागोवा घेण्यात आला.

**क. प्रकरण तिसरे : सामाजिक कार्य**

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबा आढाव यांच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेण्याच्या दृष्टीकोनातून डॉ. बाबा आढाव यांनी सुरू केलेली विकास व्याख्यानमाला, नागरिक सहकारी भांडार, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन परिषद, जमीन बळकाव परिषद, अस्पृश्यतेविरूद्ध लढा, एक गाव एक पाणवठा, देवदासी पुर्नवसन परिषद, नामांतर लढा हे विषय घेण्यात आले.

**ड. प्रकरण चौथे : संस्था व संघटनात्मक कार्य**

या प्रकरणामध्ये डॉ. बाबा आढावांनी स्थापन केलेल्या संस्था व संघटना म्हणजे हमाल पंचायत, राष्ट्रीय एकात्मता समिती, हमाल मापाडी महामंडळ, रिक्षा पंचायत, टेम्पो पंचायत, सामाजिक कृतज्ञता निधी, जागृत अपंग संघटना, अंधश्रद्धा निर्मुलन व व्यसनमुक्ती संघटना, रिक्षा पंचायत, कागद–काच–पत्रा कामगार संघटना, शेतकरी शेतमजूर पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, मोलकरीण पंचायत, विषमता निर्मुलन समिती, निवृत्ती वेतनासाठी लढा इत्यादी घटकांचा संशोधनात्मक आढावा घेतलेला आहे.

**इ. प्रकरण पाचवे : समकालीन सामाजिक चळवळींचा अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणामध्ये समाजवादी विचारांची चळवळ, लोहियांची सप्तक्रांती, समाजवादी चळवळीचे मूल्यमापन, संपूर्ण क्रांती, राष्ट्रसेवा दल, छात्रभारती, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्ष, कम्युनिस्ट चळवळ, भूमिहिन सत्याग्रह, मुस्लिम सत्यशोधक चळवळ, दलित स्वयंसेवक संघ, आळंदीप्रकरण, नामांतर लढा या संकल्पना स्पष्ट करून यामध्ये डॉ. बाबा आढाव यांच्या समकालीन चळवळींचा अभ्यास केला आहे.

**ई. प्रकरण सहावे : वैचारिक अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबा आढाव यांची वैचारिक जडणघडण कोणत्या प्रकारची होती, त्यावर कोणत्या विचारधारेचा प्रभाव होता, तसेच डॉ. बाबा आढाव यांनी कोणत्या प्रकारचे वैचारिक लेखन केले या मुद्यांचा परामर्श यामध्ये घेण्यात आला.

**उ. प्रकरण सातवे : उपसंहार**

या प्रकरणामध्ये संशोधन विषयांच्या संबंधीत तथ्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आला आहे.

**ऊ. संदर्भ ग्रंथसूची**

या घटकामध्ये संशोधन प्रबंधासाठी उपयोग केलेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांची सूची देण्यात आली आहे.

**ए. परिशिष्ट**

यामध्ये डॉ. बाबा आढाव यांची छायाचित्रे, व इतर बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

प्रकरण दुसरे

# जीवनचरित्र


| | |
|---|---|
| २.१ | प्रस्तावना |
| २.२ | डॉ. बाबा आढाव यांचे घराणे |
| २.३ | पूर्वचरित्र |
| २.४.१ | प्राथमिक शिक्षण |
| २.४.२ | माध्यमिक शिक्षण |
| २.४.३ | वैद्यकीय व्यवसाय |
| २.५ | कौटुंबिक जीवन |
| २.६ | विवाहबद्ध |
| २.७ | प्रेरणास्थान |
| २.८ | वारसा |
| २.९ | शिवाजी मराठा हायस्कूल आणि डॉ. बाबा आढाव |
| २.१० | १९४२ च्या चले जाव चळवळीतील सहभाग |
| २.११ | राष्ट्रसेवा दलातील कार्य |
| २.१२ | म. गांधीजीच्या सहवासात बाबा आढाव |
| २.१३ | साने गुरूजींच्या उपोषणात सहभाग |
| २.१४ | अन्नधान्य भाववाढ विरोधी लढा |
| २.१५ | गांधीजीच्या वधानंतर शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न |
| २.१६ | गोवामुक्ती आंदोलनात सहभाग |
| २.१७ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान |
| २.१८ | संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील कार्यकर्त्यांचा सन्मान |
| २.१९ | समारोप |
| २.२० | संदर्भसूची |

# प्रकरण दुसरे

# जीवनचरित्र

## २.१ प्रस्तावना

'महाराष्ट्र' हे राज्य म्हणून अस्तित्वात येण्यापूर्वी तत्कालीन मुंबई प्रांतात समाजसुधारणेसाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. ब्रिटिशांच्या राजवटीमधून भारत देश मुक्त व्हावा, भारत देश स्वतंत्र व्हावा यासाठी असंख्य स्वातंत्र्ययोद्यांनी आपले बहुमोल योगदान बहाल केलेले आहे.


डॉ. बाबा आढाव अशाच स्वातंत्र्यप्रेमाने भारावलेल्या कुटुंबात जन्मास आले, त्यामुळे कालांतराने त्यांनी पुरोगामी चळवळीमध्ये योगदान दिलेले आहे. राष्ट्रसेवादल आणि साने गुरूजींच्या संस्कारातून भारतीय सामाजिक सुधारणा व भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धात अनेक युवकांनी उड्या घेतल्या त्यामधील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे डॉ. बाबा आढाव होय. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यास स्वातंत्र्यानंतर बहर आला असला तरी त्या कार्याची सुरूवात मात्र स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विद्यार्थीदशेत झालेली आहे.

समाजवादी विचारांची जडणघडण त्यांच्यावर झाली. त्यामुळे पुढील आयुष्यात सामाजिक चळवळ करताना समाजवादी विचारांचे प्रतिध्वनी त्यांच्या कार्यामधून स्पष्टपणे जाणवतात.

## २.२ घराणे

डॉ. बाबा आढाव यांचा जन्म वारकरी संप्रदायातील कुटुंबात झाला. ते सर्वसामान्य कुटुंबात जन्मास आले असले तरी, त्यांचे कुटुंब त्याकाळातले प्रतिष्ठित कुटुंब होते. त्यांच्या कुटुंबाची वंशवेल खालीलप्रमाणे दाखवता येईल.

# आढाव घराणे


पांडुरंग अनंत आढाव
(वडील)
बबुबाई विठ्ठल झेंडे
(आई)
रामचंद्र
(भाऊ)
कौसल्या
(बहीण)
यमुना
(बहीण)
इंदिरा
(बहीण)
बाबा (विष्णू)
(स्वत:)
शीला
(पत्नी)
असीम x उमा
(मुलगा) (सून)
अंबर x अजिता
(मुलगा) (सून)
अस्मानी
(नात)
अंतरा
(नात)
अमन
(नातू)

## २.३ पूर्वचरित्र

बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. त्यांचे मूळ गांव अहमदनगर जिल्ह्यातील सूर्याची सांगवी. त्यांचे वडील पांडुरंग अनंत आढाव हे डाळींचे व्यापारी होते. पुण्यातील कस्तुरे चौकांत त्यांची पेढी होती. आढाव घराणे वारकरी सांप्रदायीक होते. त्यांच्या घराण्यात पीर साहेबाची भक्ती होती. पुणे मुन्सिपालटीचे मेंबर विठ्ठल झेंडे यांची मुलगी बबुबाई यांच्याशी पांडुरंग आढाव यांचे लग्न झाले होते. पांडुरंग आढाव व बबूबाई यांना ३ मुली व २ मुले अशी ५ अपत्ये झाली. कौसल्या, यमुना व इंदिरा या मुली तर रामचंद्र व विष्णू हे मुलगे. बाबा आढाव यांचे पाळण्यातील नाव विष्णू असे ठेवण्यात आले. 'परंतु पुढे घरातील सर्वजन विष्णूला प्रेमाने 'बाबा' असे म्हणू लागले. बाबा हेच नाव सर्वार्थाने रुढ झाले.'[१]

१९३० साली संपूर्ण जगात मंदीची लाट होती त्यामुळे पांडुरंग आढाव यांचा व्यापार बुडाला. व्यापार बुडाल्यामुळे वडिलांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ बिघडले. पांडुरंग आढाव यांना पंडुरोग हा आजार झाला. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी पांडुरंग आढाव यांचे आयुष्य संपले. वडिलांचे निधन झाले त्यावेळी बाबा आढाव केवळ ३ महिन्यांचे होते. घरातील कर्त्या माणसाचे निधन झाल्यामुळे व व्यापारात कधीही न भरुन येणारी तूट आलेली अशा कठीण प्रसंगी बबुबाई आढाव यांच्यावर 'आभाळ' कोसळलेलं होतं. अशा प्रसंगी बबुबाई आढाव यांना भक्कम आधार हवा होता, मानसिक व आर्थिक पाठबळ हवे होतं. ते त्यांच्या माहेरकडून मिळालं. बबुबाई आढाव सर्व मुलांना घेऊन नाना पेठेतील त्यांच्या वडिलांच्या म्हणजे सत्यशोधक विठ्ठल सखाराम झेंडे यांच्या घरी आल्या. सर्व भावंडांचे बालपण व शिक्षण नाना पेठेत झाले. भविष्यात नाना पेठ, भवानी पेठ आणि गंजपेठ हीच बाबा आढावांची कर्मभूमी झाली.

### २.४.१ प्राथमिक शिक्षण

डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या शालेय जीवनाची माहिती याप्रमाणे दिली आहे, 'माझ्या तीनही बहिणी कौसल्या, यमुना व इंदिरा या मुन्सिपल शाळा क्र. १७ मुलींची तर भाऊ रामचंद्र व मी मुन्सिपल शाळा क्र. ९ मुलांची येथील शाळेत शिकलो.'[२] शाळेत वेळेवर

येणे, दररोज व्यायाम करणे, बाराखडी, दीडकी, औटकी आणि सायंकाळी परवचा म्हणणे, हा नित्यक्रम सुरू झाला. घरात वारकरी सांप्रदायिकता होती. घराजवळच निवडुंग विठोबा मंदिर व पालखी विठोबा मंदिर होते. दररोज अभ्यास केला पाहिजे हा त्याकाळी नियमच होता. अभ्यास केला नाही तर त्यांना शिक्षा होत असत. शाळेत कडक शिस्त होती. बहुसंख्य मुलांना शिक्षा केल्या जायच्या परंतु त्यापैकी एकाही मुलाचा पालक शाळेत येऊन तक्रार करत नसायचा. मुलांचे भविष्य हे शाळेतील शिक्षकांच्याच हातात असते हे त्यावेळी पालकांना माहित होते. शाळेतील कडक शिस्तीमुळे बाबा आढावांचे आयुष्य घडत गेले.

### २.४.२ माध्यमिक शिक्षण

इ. १ ली ते ४ थी पर्यंत मुन्सिपालटीच्या शाळेत शिक्षण घेतल्यानंतर इ.५ वी साठी मराठा शिक्षण परिषदेच्या शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्यात आला. आढाव यांनी इ.५ वी ते १० मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये पूर्ण केले. 'सन १९४७ साली मी मुंबई विद्यापीठाची मॅट्रीक्युलेशन परीक्षा पास झालो.'[3] असे बाबा आढाव यांनी सांगितले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला होता. परंतु त्यावेळी कॉलेजला जाण्या-येण्यास कोणतेच साधन नसल्याने जवळ असलेल्या वाडीया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी १९५० साली वाडीया कॉलेजमधून इंटर परीक्षा दिली. बाबांना वैद्यकशास्त्रात नाव कमावण्याची इच्छा होती. त्यावेळी राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शेठ ताराचंद आयुर्वेदिक महाविद्यालयात प्रवेश मिळाला. वैद्यकीय शिक्षण चालू असतानाच पुणे विद्यापीठाच्या विज्ञान शाखेत ऑर्ग्यानिक केमिस्ट्री च्या पदवी परीक्षेसाठी नाव नोंदवले. १९५२ साली बी.एस्सी. ही पुणे विद्यापीठाची पदवी मिळाली. त्यानंतर शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयाची वैद्यक शास्त्राची डी.ए.एस.एफ. (डॉक्टर ऑफ स्टेट फॅकल्टी) ही पदविका मिळाली.

### २.४.३ वैद्यकीय व्यवसाय

आयुर्वेद महाविद्यालयाची पदविका मिळाल्यानंतर बाबा आढाव डॉक्टर झाले. वयाच्या चोवीसाव्या वर्षी नाना पेठेतील घरात वैद्यकीय व्यवसायाला सुरुवात केली. नाना पेठ, भवानी

पेठ, गंजपेठ या कष्टकऱ्यांच्या पेठांमधील गरीब व गरजू रूग्णांवर मोफत उपचार व मध्यमवर्गीय रूग्णांना नाममात्र शुल्क आकारून रूग्णांवर उपचाराला सुरूवात केली. १९५५ साली पुण्याजवळ हडपसर येथे दुसरा दवाखाना सुरु केला. राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झाल्यामुळे केवळ वैद्यकीय व्यवसाय करणे व पैसे मिळवणे हे त्यांच्या स्वभावात नव्हते. त्यामुळे त्यांच्या डॉक्टरी पेशाचा बोलबाला झाला. त्यांच्या सामाजिक कार्याला यशाची चढती किनार मिळत गेली. दूरदूरच्या गावाहून रूग्ण उपचारासाठी डॉ. बाबा आढाव यांच्या दवाखान्यात येत होते.

## २.५ कौटुंबिक जीवन

आजोबांच्या घरात सत्यशोधकी पद्धतीचे वातावरण होते. 'त्याकाळी आईने सेवासदन संस्थेतील प्रौढ शिक्षणातील शिवणकामात नाव नोंदवून शिक्षणक्रम पूर्ण केला. सिंगर मशीन खरेदी करून शिवणकाम चालू केले. बाबा आढावांच्या आई करारी होत्या.'[४] तरूणपणीच वैधव्य आल्यावर ज्या करारीपणाने त्यांनी आपले सारे जीवन व्यतित केले ती गोष्ट खरोखर महान होती. त्यांच्या करारीपणाला कष्टाची जोड होती. आईने केलेल्या कष्टामुळे बाबा आढावांना आयुष्यात उभे राहता आले. धाडसी आणि करारी बाण्यात संघर्षरत असणारी आई हेच आढावांच्या संस्काराचे मोठे प्रेरणास्थान ठरले. स्वाभिमानाचा, संघर्षाचा हा वारसा आढावांना आईकडून प्राप्त झाला. आई व बहीण इंदू या सेवादलाच्या स्त्री शाखेतही जात होत्या.

नाना पेठेत असलेल्या हमाल तालीममध्ये व्यायाम करण्यासाठी बाबा आढाव हे त्यांचे भाऊ रामचंद्र यांच्यासोबत जात होते. त्याकाळी वाचनालयाची सोय नसल्यामुळे बाबा व रामचंद्र दोघेही चौकातील बोर्डावर रोजच्या ठळक बातम्या लिहित असत. लोकांचे प्रबोधन करण्यासाठी दोघांनी विकास व्याख्यानमाला नावाची रात्रीची व्याख्यानमाला सुरू केली होती. व्याख्यानमालेमुळे लोकांच्या मनावर सकारात्मक परिणाम दिसला. भाऊ रामचंद्रने नाना पेठेत रहात असलेल्या परिसरात प्रौढ वर्ग चालवले. नागरिक सहकारी भांडाराची स्थापनाही दोघांनी केली. देशाच्या फाळणीनंतर १९४७ साली निर्वासितांची सेवा करण्यात बाबा आढावांचे भाऊ रामचंद्र आढाव कुरूक्षेत्रावर गेले होते.

माहेरी आईच्या पाठीवर एक भाऊ व तीन बहिणी होत्या त्यातील दोघी अविवाहित होत्या. बाबांचे मामा तरूण व पहिलवानी पेशाचे होते. पुढे ते जंगल कॉन्ट्रॅक्टर व्यवसायात गेले. १९३२ साली आजोबांचे निधन झाले. १९३० ते १९४२ हा काळ फार कठीण गेला. बाबाचे थोरले बंधू रामचंद्र १९४१ ला मॅट्रिक झाले व सरकारी नोकरीला लागले. आई, मामा व आजी तिघांनी कुटुंब सांभाळले. आजी झेंडेवाडीला शेती पाही, मामा, आण्णा, आजी, आई या लोकांनी घरासाठी खूप कष्ट केले. आण्णा म्हणजे राम सर्वात थोरले बंधू तर बाबा सर्वात धाकटे, मामांची एकूण सात अपत्ये त्यामुळे २७ माणसांचे मिश्र कुटुंब तयार झाले. १९४२ ला बाबांच्या थोरल्या भगिनी कौसल्याचे तर १९४५ साली यमुनेचे लग्न झाले. शेवटच्या इंदिरेचे लग्न शामकांत मोरे यांचेशी १९५१ साली झाले. १९६६ साली बाबांचे लग्न झाल्यामुळे आढाव कुटुंबीय झेंडे कुटुंबातून विभक्त झाले. ६१, नाना पेठेतून ७९, नाना पेठेत राहायला लागले. ती जागा भाड्याने घेतली होती. बाबा आढाव यांना सामाजिक कार्याचा वारसा कुटुंबातून मिळाला होता. बाबांनी भाऊ रामचंद्र आढाव यांची आठवण पुढील वाक्यातून व्यक्त केली आहे. 'पुण्यातील एक तुकडी घेऊन रामचंद्र आढाव कुरूक्षेत्रांवरील निर्वासितांची सेवा करण्यासाठी गेले होते.'[५]

एकंदरीतच आढावांची जडण घडण सामाजिक बांधीलकी जोपासत वाढत होती. कुटुंबातून व परिसरातून चांगला प्रतिसाद आढावांना मिळत होता या सर्व घटना आढावांना उत्साहित करण्यासाठी कारणीभूत होत्या असा निर्देष यामधून होत असल्याचे दिसते.

### २.६ विवाहबद्ध

एका प्रकारची स्थिरता प्राप्त झाल्यानंतर बाबा आढाव यांनी विवाह करावा असे त्यांच्या कुटुंबियांना वाटू लागले. विवाहामुळे आढावांच्या प्रगतीला अर्थ प्राप्त होईल, त्या प्रगतीला गती देण्याचे कार्य विवाह करेल. अर्थातच कोणत्याही प्रकारचा डामडौल न करता अत्यंत साधेपणाने हा विवाह संपन्न झाला.

कोणत्याही यशस्वी पुरुषाच्या मागे त्या व्यक्तीची पत्नी असते असे म्हणतात. त्याच प्रमाणे बाबा आढावांच्या यशस्वी सामाजिक जीवनात त्यांच्या पत्नीचा शीलाताईंचा महत्वाचा

वाटा आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्ववान नवऱ्याला आयुष्यभर खंबीर साथ देऊन एक नवा इतिहास निर्माण केला आहे.

शीलाताईंचा जन्म १९३७ सालचा आहे. शीलाताईंवर राष्ट्र सेवादलाचा आणि त्यांच्या वडिलांच्या शिकवणुकीचा प्रभाव आहे. लहानपणी त्या राष्ट्रसेवादलात जात. एस.एम. जोशी यांच्याबरोबर शीला आढाव यांनी जुन्नर भागात एक रस्ता बांधला आहे. नारायण गावातील रा. प. सबनीस यांच्या आश्रम शाळेत त्यांचे शिक्षण झाले आहे. 'शीलाताईंचे वडील हेडमास्तर होते. त्यांची सतत बदली व्हायची त्यात पुण्यात राहून शिकण्याची सोय नव्हती. त्यामुळे नोकरी करता करता शिकता येईल म्हणून त्यांनी नर्सिंगला प्रवेश घेतला. वडील पुरोगामी विचारांचे होते. ते शीलाताईंना नेहमीच चांगल्या गोष्टी शिकवत. 'माणूस हाच आपला देव' आहे, या शिकवणुकीचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आहे.' [६]

बाबा आढाव व शीलाताईंचा स्वजातीय विवाह १९६६ मध्ये नोंदणी पद्धतीने संपन्न झाला तोही फक्त दहा रुपयांत. आढावांच्या एका मित्राने हे स्थळ सुचवलं होत. तेंव्हा शीलाताई भुसावळला रेल्वेच्या दवाखान्यात नर्स म्हणून काम करीत होत्या. लग्नानंतर मात्र पुण्यात संसार सुरु झाला. सुरुवातीला दोन वर्षे नोकरी केली नाही. रेल्वेचा पास असल्यामुळे रेल्वेने बाबा आढाव व शीलाताईंनी सबंध भारत पाहिला. रेल्वेचा पास असल्यामुळे ते शक्य झाले. पुढे पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्यात नोकरीसाठी अर्ज केला. त्यांचा आधीचा नऊ–दहा वर्षाचा नर्सिंगचा अनुभव होता. त्यामुळे त्यांना लगेच नोकरी मिळाली, पण ती खूप लांब मुंढव्याला, त्यानंतरची सगळी नोकरी शुक्रवार पेठेतील गाडीखान्यात झाली. शीलाताई नास्तिक आहेत, बुद्धिवादीही आहेत. कार्यमग्न रहाणे यामध्ये शिलाताईंना आनंद मिळतो तसेच मोठे समाधान देखील मिळते. असेल ते काम मनापासून करण्याची त्यांची धडपड असते. शीलाताईंना स्वच्छतेची व टापटीपणाची खूप आवड आहे. सुरकुतलेला कपडा अजिबात आवडत नाही. महानगरपालिकेच्या सेवेत काम करीत असताना गाडीखान्याच्या महानगरपालिकेच्या दवाखान्यात आठ तास नोकरी आणि नंतर आढावांच्या दवाखान्यात संध्याकाळी सात ते दहा असं तीन तास काम करावं लागत होते. घरचा स्वयंपाक, मुलांचा अभ्यास, मुलांच आजारपण या सर्व गोष्टी शीलाताईंनी मनापासून केल्या.

बाबा आढावांचे कार्यक्षेत्र पुणे असल्यामुळे सर्वजन नाना पेठेत रहावयास होते. घरात आई, बाबा, मुलगा असीम, भाची, मावसभाऊ, शिवाय पुण्यातील कष्टकरी हमाल बांधव कुटुंबातीलच. घर सदा गजबजलेलं. मामेभावंड, भाचे, भावाची मुले, स्वतःची दोन अशी पंधरा मुले घरात होती. त्यावेळी ऑफीस घरातच होत. घरात पुढच्या मोठ्या हॉलमध्ये बाह्य रुग्णांसाठी दवाखाना होता. हमाल पंचायतीने हमालांसाठी चालवायला घेतलेला. तो संध्याकाळी सात ते दहा या वेळात असायचा, घरचा मुख्य दरवाजा रात्री सहा तास बंद इतर वेळात सर्वांसाठी खुला.

'सामाजिक सेवेत स्वतःला वाहून घेतलेल्या बाबांना कुटुंबाकडे, मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला कमी वेळ मिळत असे. परंतु त्यांची सामाजिक सेवा पाहून शीलाताईंनी देखील कुटुंबाच्या जबाबदारीचा भार कधी त्यांच्यावर सोपवला नाही. उलट अतिशय सक्षमपणे व सामर्थ्याने शीलाताईंनी मुले असिमं व अंबर यांची जबाबदारी स्विकारली व त्यामुळे बाबा आढावांना मोठी उंसत मिळाली व त्याचा उपयोग सामाजिक कार्यासाठी करता आला.'[७]

सततचे दौरे, सामाजिक कार्याचा वाढता व्याप, आणिबाणी सारख्या प्रसंगात झालेला दीड वर्षांचा तुरूंगवास, हमाल पंचायतीचे अध्यक्ष असून देखील मानधन न घेणारे बाबा. या सर्वांचा कोणताही परिणाम शीलाताईंनी आपल्या कुटुंबावर उमटू दिला नाही. अत्यंत चिकाटीने, बचतीने शीलाताईंनी कुटुंब चालवले. कुटुंबाची जबाबदारी नसल्याने बाबांना सामाजिक चळवळ उभी करता आली. त्यामुळे शीलाताई केवळ पत्नी न ठरता आदर्श सहकारीणी ठरल्या.

### २.७ प्रेरणास्थान

'राष्ट्रसेवादल हीच बाबा आढावांची प्रेरणा आहे. संस्कारक्षम वयात ते सेवादलात दाखल झाले होते. १९४३ साली मामा लक्ष्मण गायकवाड हे त्यांना घेऊन जानाईचा मळा येथे भरणाऱ्या राष्ट्रसेवा दलातील शाखेत गेले.'[८] तेंव्हापासून ते ७ वर्षे रोज नियमितपणे शाखेत गेले. शाखेशी संबंध आल्यामुळे स्वयंशिस्त निर्माण झाली. वाचनाची आवड निर्माण झाली. शाखेशी संबंधित सर्व कामे प्रामाणिकपणे केली. भाऊसाहेब रानडे, एस. एम. जोशी, ग. प्र. प्रधान, नानासाहेब गोरे यांचे विचार जवळून ऐकले. रात्रीच्या कामगार शाखांचे संघटक

म्हणून काम पाहिले. सेवादलात असताना त्यांनी 'लोहिया' वाचले. लोहियांमुळे ते प्रभावित झाले. माणूस भाषणात कसा बोलतो त्यापेक्षा समाजात कसा वागतो हे अनुभव घेतले. डॉ. लोहियांच्या तुरूंग, फावडा व मतपेटी या त्रिसुत्रीमुळे बाबा आढाव लोकशाही समाजवादाचे कट्टर पुरस्कर्ते झाले. राष्ट्रसेवादलाच्या वतीने मांजरीला सुभाष सामुदायिक शेती प्रकल्पावर त्यांनी श्रमदान केले.

ग. प्र. प्रधान यांच्या 'माझी वाटचाल' या पुस्तकातील पान नं.१७५ वर बाबा आढावाचा नामोल्लेख आढळतो. ग. प्र. प्रधान लिहितात, '१९४४ पासून मी राष्ट्र सेवा दलात काम करू लागलो. त्यावेळी भाई वैद्य, बाबा आढाव, शिवाजी जवळकर, कृष्णा कापसे आदी शिवाजी मराठा हायस्कूलमधील विद्यार्थी सेवादलात येत. बौद्धिके ऐकताना चर्चाही करीत. विद्यार्थीदशा संपल्यावर भाई वैद्य, बाबा आढाव, बापू काळदाते आणि पन्नालाल सुराणा हे सर्व वेळ प्रथम राष्ट्र सेवादलाचे आणि नंतर राजकीय वा सामाजिक कार्य करू लागले. भाई, बापू, बाबा, पन्नालाल यांनी समाजवादी चळवळीत धडाडीने काम केले. अनेक राजकीय व सामाजिक संघर्षामध्ये ते आघाडीवर राहिले.'

साने गुरूजींच्या उपोषणाला पाठिंबा मिळावा व हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा यासाठी १९४७ साली बाबा आढावांनी राष्ट्रसेवादलाच्या वतीने सह्यांचे कागद पंढरपूरला पाठविले होते. राष्ट्र सेवादलाच्या प्रत्येक कामात त्यांनी भाग घेतला. त्यांच्या सोबतीला भाई वैद्य, मधुकर निरफराके, ज्ञानेश्वर खैरे, दादा बोरकर, शिवाजी खैरे ही दोस्त मंडळी होती. शिवाजी मराठा शाळेतील ७५% मुलं ही राष्ट्र सेवा दलाचे सैनिक होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला पाठिंबा द्यायचा, जातीयवादी संघटनांना विरोध करायचा व सामाजिक कार्यात सहभाग घ्यावयाचा असा उद्देश राष्ट्र सेवादलाचा होता.

प्रभात फेऱ्या काढणे, पत्रके वाटणे, भूमिगत नेत्यांची व्यवस्था करणे, सेवादलातील मोठ्या लोकांना मदत करणे अशा प्रकारची स्वातंत्र्य चळवळीला पूरक अशी कामे त्यांनी केली. हातात तिरंगा घेऊन 'लेंगे स्वराज्य लेंगे', 'ब्रिटिश चालते व्हा' अशा घोषणा तेंव्हा दिल्या. १९४३ ते १९५० या काळात ते नियमितपणे राष्ट्रसेवादलाच्या शाखेत जात होते. त्यामुळे स्वातंत्र चळवळीच्या अनेक घटनांचे बाबा साक्षीदार आहेत. अशीच एक घटना १९४५

सालात घडली. 'दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचा विजय झाल्यामुळे पुण्याच्या कलेक्टरने शाळेत पेढे वाटले. स्वातंत्र्याच्या विचारांनी भारलेल्या मुलांनी ते पेढे शाळेच्या मैदानावर फेकून दिले.'[९] शाळेतील बहुसंख्य मुलांनी पेढे मैदानावर फेकून दिले. शाळेच्या मैदानामध्ये पेढ्यांचा सडा पडला होता. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीयांच्या मनात प्रज्वलित झालेल्या इच्छा शक्तीचे ते मूर्तीमंत प्रतीक होते.

डॉ. मु. ब. शहा यांचे 'राष्ट्र सेवा दल इतिहास और कार्य' हे पुस्तक २००२ साली राष्ट्र सेवादल वाङ:मय विभागांतर्गत प्रकाशित करण्यात आले आहे. या पुस्तकात राष्ट्र सेवादलाचे कार्य कसे चालू आहे याची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर ज्यांनी ज्यांनी आपले आयुष्य राष्ट्रसेवा दलाला अर्पण केलेले आहे. त्यांचा उल्लेख पुस्तकात आलेला आहे. पान नं.१११ वर बौद्धिक आदानप्रदानासाठी श्री. यदुनाथ थत्ते, डॉ. ना. य. डोळे, श्री. हमीद दलवाई, डॉ. बाबा आढाव और प्रा. नरहर कुरूंदकर यांची भूमिका अतिशय महत्त्वाची होती असा उल्लेख आलेला आहे.

'आढावांच्या आयुष्यात राष्ट्र सेवादल, महात्मा फुलेंची शुद्राति-शुद्र ही संकल्पना व महात्मा गांधीचा अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग यांचा महत्वाचा वाटा आहे.'[१०] सेवादलात झालेल्या बौद्धिकांमुळे त्यांच्या विचाराला तर्काचे वळण लागले. महात्मा गांधी पुण्यात आले असताना राष्ट्रसेवादलातील काही कार्यकर्त्यांना त्यांची सेवा करण्याची संधी मिळाली होती. राजा बहादूर मिलजवळील डॉ. दिनशॉ मेहता नेचर केअर सेंटर येथे महात्मा गांधीजीच्या देखभालीसाठी असणाऱ्या राष्ट्रसेवा दलाच्या स्वयंसेवकात बाबा आढाव होते. गांधी हत्यनेंतर पुण्यात झालेल्या जाळपोळीच्या वेळी राष्ट्रसेवादलाच्या कार्यकर्त्यांनी आपले जीवित धोक्यात घालून ब्राह्मणांची घरे जाळू दिली नाहीत. सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात शांतता प्रस्थापनेचे काम केले. हे राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य होते. त्यांच्या प्रत्येक कार्यात राष्ट्रसेवादलाचे संस्कार आहेत. एस. एम. जोशी सुद्धा हे मान्य करताना म्हणतात, 'स्त्रीमुक्ती आंदोलनच काय, पण महाराष्ट्रात अभूतपूर्व ठरलेले डॉ. बाबा आढावांचे 'एक गाव! एक पाणवठा' हे आंदोलन किंवा हमीद दलवाईंचे मुस्लिम

सत्यशोधक आंदोलन यांची प्रेरणा तरी आढावांना किंवा दलवाईंना प्रथम कोठे मिळाली? राष्ट्रसेवादलाची शाखा हीच अशा विधायक प्रेरणांची गंगोत्री असते.'[११]

स्त्री, दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, अल्पसंख्यांक, हमाल, कष्टकरी, अपंग, धरणग्रस्त इत्यादी उपेक्षित व शोषित जनसमूह हे त्यांचे कार्यक्षेत्र. लोकशाही समाजवाद, इहवाद, विज्ञाननिष्ठा समाजाची प्रस्थापना करण्यासाठी अहर्निश कृतीप्रवण राहणे हा त्यांचा ध्येयवाद. सत्यशोधनाच्या या वाटचालीमध्ये राष्ट्रसेवादलाबरोबरच महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राम मनोहर लोहिया, पेरियार रामस्वामी नायकर हे बाबा आढावांचे प्रेरणास्थान आहेत.

**२.८ वारसा**

'१९२५ साली आजोबा विठ्ठल सखाराम झेंडे पुणे महानगरपालिकेचे सदस्य होते.'[१२] ते सत्यशोधकी विचारांचे असल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांची त्यांच्या घरी सतत वर्दळ असायची. आजोबांचा अबकारीचा व्यवसाय होता. मराठा शिक्षण परिषदेचे ते पहिले देणगीदार होते. केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, विठ्ठल झेंडे हे सत्यशोधक चळवळीचे बिनीचे शिलेदार होते. आजोबांनी महानगरपालिकेचे सदस्य असताना अनेक समाजोपयोगी व लोकोपयोगी कामे केली. सार्वजनिक नळ, पाण्याचे हौद, रस्ते, रस्त्यावरचे दिवे, भाजी मंडई या कामातून विठ्ठल झेंडे यांनी पुढाकार घेतला. 'महात्मा फुले यांचा पुतळा मंडईत बसवावा या केशवराव जेधे यांनी मांडलेल्या ठरावाला विठ्ठल झेंडे यांनी अनुमोदन दिले होते.'[१३] छत्रपती मेळ्यातून त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले होते. पर्वती मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून झालेल्या चळवळीत विठ्ठल झेंडे सहभागी झाले होते. राजर्षी शाहू महाराजांसोबतही त्यांनी सत्यशोधक कार्याबद्दल चर्चा केली होती. त्याकाळातील सामाजिक चळवळीतील आघाडीच्या नेत्यांच्या म्हणजेच आजोबांच्या घरातच बाबा आढावांचा बालपणाचा काळ निघून गेल्यामुळे सामाजिक कार्याचा वारसा रूढार्थाने आजोबांकडून लाभला. मामेभाऊ लक्ष्मण शिवराम गायकवाड (बारामतीकर) हे व्यापारी पेढीवर दिवाणजी होते. ते खादीचा पोशाख घालीत. ते सेवादलाच्या शाखेत जात असत. १९४२ च्या आंदोलनाच्या वेळी इंग्रज अधिकाऱ्यांनी मामाला शाखेवरच अटक केले व येरवडा तुरुंगात टाकले. आजोबा विठ्ठल झेंडे,

भाऊ रामचंद्र व मामा लक्ष्मण गायकवाड हे स्वातंत्र्य चळवळीत अग्रभागी होते. यांच्या कृतीचा प्रभाव सतत बाबांवर पडत होता. त्यामुळे ते लोकशाही समाजवादाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. समाजवादाशिवाय या देशाला पर्याय नाही, असे त्यांचे ठाम मत आहे. महात्मा ज्योतीराव फुले, तामिळनाडूतील क्रांतिकारक समाजसुधारक इ. व्ही. रामस्वामी नायकर यांच्या चळवळींच्या अभ्यासाचा बाबा आढाव यांच्यावर गाढ प्रभाव आहे. त्यांच्या विचारांच्या मुळाशी जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महात्मा गांधींच्या अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग महत्त्वाचा वाटतो. त्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

दुसरे महायुद्ध, १९४२ चा स्वातंत्र्य लढा, सविनय कायदेभंग चळवळ, स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, आझाद हिंद सेना, नौसेनेचा उठाव, महात्मा गांधीची हत्या, हिंदू–मुस्लीम तणाव या घटनांचे बाबा आढाव साक्षीदार आहेत. त्यांना स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्तिसंग्रामामध्ये प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी मिळाली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये प्रताप गडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावर करण्यासाठी आलेल्या तत्कालिन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरूंना बाबा आढाव व त्यांच्या साथीदारांनी अडवले होते. गोवा मुक्तिसंग्रामामध्ये ७०० सत्याग्रही बेळगाव ते कणकुंभी येथे चालत गेले होते. '१५ ऑगस्ट १९५५ रोजी गोवामुक्ती आंदोलन कणकुंभी येथे झाले. त्यात ३० जणांचे डॉक्टरी पथक होते. त्याचे नेतृत्व डॉ. बाबा आढाव यांचेकडे होते.'[१४] रामभाऊ तुपे म्हणतात, '१५ ऑगस्ट १९५५ चा दिवस उजाडला, प्रातःविधी आटोपून आम्ही सकाळी ७ वाजता झेंडावंदनासाठी तेथील मैदानावर जमलो. रांगा करून उभे राहिलो. आमचे तुकडीत एकूण ५७० लोक होते. आंदोलनासाठी अनेक तुकड्यातून सत्याग्रही येत होते. गोवा पोलिसांनी सत्याग्रहींचा अतोनात छळ केला. गोवा पोलिसांनी केलेल्या मारामुळे ज्या सत्याग्रहींची परिस्थिती गंभीर झाली होती. त्यांच्यावर डॉ. बाबा आढाव व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रथमोपचार केले.'[१५]

### २.९ शिवाजी मराठा हायस्कूल आणि बाबा आढाव

'स्वातंत्र्याच्या चळवळीचे केंद्र म्हणजे शिवाजी मराठा हायस्कूल. हायस्कूलमधील सर्व मुले राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेत होती. याच शाळेत भाई

वैद्य हे माझ्या १ इयत्ता पुढे शिकत होते.'[१६] इंग्रजाच्या विरोधात घोषणा द्यायच्या, छोट्या–छोट्या मिरवणुका काढायच्या, वर्गावर्गात जाऊन स्वातंत्र्याची गाणी गायची असे स्वातंत्र्याचे बाळकडू आढावांना मिळाले. शाळेमध्ये शिकत असताना भाई वैद्य, मधुकर निरफराके, ज्ञानेश्वर खैरे, दादा बोरकर, शिवाजी खैरे ही दोस्त मंडळी होती.

### २.१० १९४२ च्या चलेजाव चळवळीतील सहभाग

आढावांचे आजोबा, भाऊ आणि मामा स्वातंत्र्य चळवळीत अग्रभागी असल्याने घरातील सर्व वातावरण राष्ट्रभक्तीच्या विचाराने भारलेले होते. 'मी त्यावेळी पत्रके वाटणे, भूमिगत नेत्यांची व्यवस्था करणे, सेवादलातील लोकांना मदत करणे अशा प्रकारची स्वातंत्र्य चळवळीला पूरक अशी कामे केली.'[१७] नारायण दाभाडे व मथुरा माटे या दोघांवर झालेल्या गोळीबारामुळे आढावांचा इंग्रज सरकार विरूद्धचा द्वेष अधिक तीव्र झाला.

### २.११ राष्ट्र सेवादलातील कार्य

राष्ट्र सेवादलामुळे आढावांवर संस्कार झाले. राष्ट्रसेवादलातील बौद्धिकांमुळे आढाव समाजवादी बनत गेले. राममनोहर लोहिया यांच्या विचारांचा आढावांवर प्रभाव आहे. बोलण्यापेक्षा कृतीवर आढाव भर देतात. 'राम मनोहर लोहियांच्या तुरूंग, फावडा व मतपेटी या त्रिसुत्रीमुळे मी लोकशाही समाजवादाचा कट्टर पुरस्कर्ता झालो.'[१८] आढावांच्या आयुष्यात राष्ट्रसेवा दल, महात्मा फुलेंची शुद्रातिशुद्र संकल्पना व महात्मा गांधीचा अहिंसात्मक सत्याग्रह यांचा प्रभाव आहे.

### २.१२ म. गांधीजीच्या सहवासात

१९४५ साली म. गांधीजी पुण्यातील दिनशॉ मेहता नेचर केअर सेंटर येथे उपचार घेत होते. 'त्यांच्या देखभालीसाठी राष्ट्रसेवा दलाच्या स्वयंसेवकात माझाही समावेश होता.'[१९] २१ दिवस या स्वयंसेवकांनी म. गांधीजींची सेवा केली. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीला पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार पटेल, आचार्य कृपलानी उपस्थित होते. या नेत्यांना जवळून पाहण्याची संधी आढावांना मिळाली होती.

### २.१३ साने गुरूजींच्या उपोषणात सहभाग

श्री क्षेत्र पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांना खुले व्हावे यासाठी साने गुरूजींनी १९४७ साली उपोषण सुरू केले. 'राष्ट्र सेवादलाच्या वतीने साने गुरूजींच्या उपोषणाला पाठिंबा मिळावा यासाठी १९४७ साली मी स्वतः पुणे परिसरातील खेड्यापाड्यात फिरून सह्यांचे कागद जमवले आणि ते पंढरपूरला पाठविले होते.[२०]

## २.१४ अन्नधान्य भाववाढ विरोधी लढा

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. सरकारने अन्न धान्याची भाववाढ केल्यामुळे सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. डॉ. बाबा आढाव सांगतात, '१९५२ मध्ये श्री. एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात मला स्वतःला तीन आठवड्यांची शिक्षा झाली.'[२१]

## २.१५ गांधीजीच्या वधानंतर शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न

३० जानेवारी १९४८ ला म. गांधीजीचा वध झाला. पुण्यात दंगल चालू झाली. हिंदू-मुस्लीम दंगा सुरू झाला. पुण्यात शांतता निर्माण करणे महत्त्वाचे होते. त्यावेळी राष्ट्रसेवादलाने पुढाकार घेतला. त्यावेळी 'मी जीव धोक्यात घालून पुण्यामध्ये शांतता निर्माण करण्याचे काम केले.'[२२]

## २.१६ गोवामुक्ती आंदोलनात सहभाग

गोवा मुक्ती आंदोलनात ३० जणांचे डॉक्टरी पथक होते. 'डॉक्टरी पथकाचे नेतृत्व माझ्याकडे होते.'[२३] लढ्यात जखमी झालेल्या सत्याग्रहींवर त्यांनी उपचार केले. भूमिगत क्रांतिकारकांना सांभाळण्याची जबाबदारी अनुताई लिमये यांनी त्यांच्यावर सोपवली. गोवा मुक्ती आंदोलनासाठी त्यांनी लोकांचे संघटन केले.

## २.१७ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होती. अनेक ठिकाणी सत्याग्रह, बंद, मोर्चे चालू होते. पुण्यातल्या डोके तालीम समोरून मशाल मिरवणूक निघाली. 'मिरवणुकीत सहभाग घेतल्यामुळे मला अटक करण्यात आली.'[२४]

## २.१८ संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील कार्यकर्त्यांचा सन्मान

६ ऑगट २००९ ला मुंबईत सोशालिस्ट फ्रंट आणि गिरणी कामगार संघर्ष समितीच्या वतीने एक कार्यक्रम झाला. प्रा. एन. डी. पाटील आणि डॉ. बाबा आढाव यांच्या उपस्थितीत १०५ हुतात्म्यांच्या नामफलकाचे उद्‌घाटन झाले. 'यावेळी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या पण आजवर अंधारात राहिलेल्या कार्यकर्त्यांचा डॉ. बाबा आढावांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.'[२५]

## २.१९ समारोप

डॉ. बाबा आढाव गेली पाचतपे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यात अविरत कार्यरत आहेत. या कालावधीमध्ये त्यांनी अनेक आंदोलने, उपक्रम, चळवळी केल्या. विधायक व रचनात्मक कार्याचा मानदंड उभा केला. विविध संस्थांची उभारणी केली. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचा वारसा जपण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

एकूणच त्यांना महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या सत्यशोधक विचारपंरपरेचा वारसा लाभला आहे. महात्मा गांधी व लोहिया यांचा वैचारिक वारसदार असल्याचे डॉ. बाबा आढाव यांचे कार्य आहे. त्यामुळे परिवर्तनाचा, संघर्षाचा वारसा हा जसा त्यांना घरातून मिळाला तसाच तो त्यांना चळवळीमधून प्राप्त झाल्याचे स्पष्ट होते.

## २.२० संदर्भ सूची


१) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.

२) कित्ता.

३) कित्ता.

४) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २०१४, पृष्ठ क्र.१४०.

५) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.

६) दैनिक सकाळ, (अंतरंग–कोलाज), ही आणि मी, मुलाखत, आढाव बाबा, दि.३ जुलै, २०११, पृष्ठ.३.

७) झाली फुले कळ्यांची! दैनिक लोकसत्ता (चतुरंग), पृष्ठ ३ व ६.

८) दैनिक लोकमत (वर्धापन दिन विशेषांक) आठवणीतले पुणे, मुलाखत, आढाव बाबा, दि.२८ डिसेंबर, २०१३, पृष्ठ.९.

९) कित्ता.

१०) लेख, वाडेकर शारदा, दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि. १ जून २००९, पृष्ठ ६.

११) जोशी अेस्. अेम., मी– अेस. अेम. तृतीयावृत्ती, कॉन्टिन्टेल प्रकाशन, विजयानगर, पुणे–३०, २००३, पृष्ठ क्रमांक १६३.

१२) दैनिक लोकमत (वर्धापन दिन विशेषांक) आठवणीतले पुणे, मुलाखत, आढाव बाबा, दि.२८ डिसेंबर, २०१३, पृष्ठ.९.

१३) कित्ता.

१४) तुपे रामभाऊ, राहिले ते आपुले, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.७८.

१५) कित्ता.

१६) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३

१७) कित्ता.

१८) कित्ता.

१९) कित्ता.

२०) कित्ता.

२१) कित्ता.

२२) कित्ता.

२३) कित्ता.

२४) कित्ता.

२५) वारे सुभाष, समाजवादी अध्यापक, अंक १ ला, वर्ष २ रे, मे. २०१०, पृष्ठ. ११.

प्रकरण तिसरे

# सामाजिक कार्य

| | |
|---|---|
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | फुले आंबेडकर व्याख्यानमाला |
| ३.३ | नागरिक सहकारी भांडार |
| ३.४ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ |
| ३.५ | झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन |
| ३.६ | आधी पुनर्वसन मग धरण |
| ३.७ | नगरसेवक |
| ३.८ | जमीन बळकाव आंदोलन |
| ३.९ | अस्पृश्यते विरोधातील कार्य |
| ३.१० | मुस्लिम सत्यशोधक मंडळ |
| ३.११ | एक गाव एक पाणवठा |
| ३.१२ | देवदासी पुनर्वसन परिषद |
| ३.१३ | देवदासी परिषदेतील ठराव |
| ३.१४ | मराठवाडा विद्यापीठ नामांतर |
| ३.१५ | तुरूंगातील दिवस |
| ३.१६ | समारोप |
| ३.१७ | संदर्भ सूची |

# प्रकरण तिसरे

# सामाजिक कार्य

## ३.१ प्रस्तावना

श्रमकरी, कष्टकरी जनतेच्या हिताचे व सुखाचे स्वप्न पाहिलेल्या डॉ. बाबा आढाव यांनी परिवर्तनाच्या चळवळीमध्ये राहून कष्टकऱ्यांच्या न्याय व हक्कासाठी अनेक लढे उभे केले. परंतु हे सर्व लढे सुरू असताना प्रतिक्रियात्मक चळवळीला बहुस्तर बांधणीच्या परिघामध्ये स्थापन्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबा आढाव यांनी केले. म्हणजेच भविष्याचा वेध घेवून नागरिक सहकारी भांडार, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, विकास व्याख्यानमाला, देवदासी पुर्नवसन अशा वेगवेगळ्या प्रश्नावर डॉ. बाबा आढाव यांनी सामाजिक कार्य केले.

डॉ. बाबा आढाव यांनी दीर्घकाळ ज्वलंत प्रश्नावर चळवळी चालवल्या यामध्ये 'एक गाव एक पाणवठा' या चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. तसेच पंढरपूरच्या वारीतील दलितांना मिळणारी सापत्नतेची वागणूक, कचरा वेचकाचे प्रश्न, मराठवाडा नामांतर प्रश्न यासह अनेक विषयांचा गंभीरपणे अभ्यास करून समाजाला दिशा देणारे अनेक महत्त्वपूर्ण लढे त्यांनी दिले. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ३.२ फुले आंबेडकर व्याख्यानमाला

लोकांचे प्रबोधन करण्यासाठी बाबा आढावांनी विकास व्याख्यानमाला नावाची रात्रीची व्याख्यानमाला सुरू केली. नानापेठ, गंजपेठ, लोहियानगर, भवानीपेठ येथील कष्टकरी, कामगार तसेच परिसरातील लोकांना सामाजिक भान निर्माण होणे ही त्या मागची धारणा होती. या व्याख्यानमालेत बाबा आढावांनी देशभक्त केशवराव जेधे, खासदार शंकरराव मोरे, नामदार काकासाहेब गाडगीळ, खासदार शकुंतलाबाई परांजपे, गुरूवर्य बाबुरावजी जगताप इ.ची भाषणे घडवून आणली. पुढे त्या विकास व्याख्यानमालेला फुले–आंबेडकर व्याख्यानमाला असे नाव देण्यात आले. समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर नामवंत तज्ज्ञांना निमंत्रित करून व्याख्यान माला घेत आहेत. गेल्या ३५ वर्षांपासून दरवर्षी महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठानतर्फे २८ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर म्हणजेच महात्मा फुले स्मृतिदिन ते डॉ.

बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनाच्या दरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. व्याख्यानमालेतील तज्ज्ञांचे विचार पुन्हा पुरोगामी सत्यशोधकाच्या त्रैमासिकाच्या अंकात प्रसिद्धीस दिले जातात. बाबा आढावांच्या अध्यक्षतेखाली अनेक वर्षापासून फुले–आंबेडकर व्याख्यानमालेचे कार्य सुरू आहे. या व्याख्यान मालेमध्ये वैविध्य होते. व्याख्यानमालेत कोणत्या विषयावर विचारमंथन होत असे ते खालील कार्यक्रम पत्रिकेवरून निदर्शनास येते.

**१९९३ ची फुले आंबेडकर व्याख्यानमाला कार्यक्रम पत्रिका**

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| २८/११/१९९३ | फुले स्मृतिदिन | डॉ. बाबा आढाव |
| २९/११/१९९३ | जाती विरोध आणि बसवेश्वर | श्री. विनायकराव कुलकर्णी |
| ३०/११/१९९३ | ब्रिटिशपूर्वकालीन पाखंड | श्री. विनायकराव कुलकर्णी |
| ०१/१२/१९९३ | नव वसाहतवाद व राष्ट्राची जडणघडण | अजित सरदार |
| ०२/१२/१९९३ | चार राज्यांतील निवडणुकांचा अन्वयार्थ | श्री. पिंटो |
| ०३/१२/१९९३ | हिंदू धर्मातील स्त्री | डॉ. आ. ह. साळुंखे |
| ०४/१२/१९९३ | सांस्कृतिक कोलांट्या उड्या | डॉ. आ. ह. साळुंखे |
| ०५/१२/१९९३ | बागाईतकर स्मृतिदिन | डॉ. बाबा आढाव |
| ०६/१२/१९९३ | डॉ. आंबेडकर महानिर्वाण दिन | डॉ. बाबा आढाव |

नारायण सुर्वे हे तत्कालीन मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष होते. आपल्या साहित्यामधून कष्टकरी कामगार यांचं चित्रण मांडले होते. त्यामुळे त्यांची या व्याख्यानमालेतील उपस्थिती विशेष अशा स्वरूपाची होती. डॉ. आ. ह. साळुंखे, अजित सरदार या विचारवंत मंडळीमुळे १९९३ ची व्याख्यानमाला विचारमंथनाद्वारे गाजली होती.

दि. २९/११/१९९४ नंतरची व्याख्यानमाला महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठानच्या कार्यालयात रोज सायं. ७ ते रात्री ८।। या वेळात झाली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| मंगळवार २९/११/१९९४ | परिवर्तनाची चळवळ मजल व मर्यादा | मोहन ननावरे (कागद, काच, पत्रा पंचायत) |
| बुधवार ३०/११/१९९४ | व्यसनी नवऱ्यांच्या बायकांचे प्रश्न | संजय तिडके व अजिनाथ कदम (कॉन्सिलर कौटुंबिक न्यायालय) |
| गुरूवार ०१/१२/१९९४ | वृत्तपत्रे–प्रसार माध्यमांची बांधिलकी | अन्वर राजन, यमाजी मालकर |
| शुक्रवार ०२/१२/१९९४ | मतपेटीचे राजकारण | डॉ. सत्यरंजन साठे |
| शनिवार ०३/१२/१९९४ | नव्या मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम | प्रा. अशोक जोशी |
| रविवार ०४/१२/१९९४ | फुल्यांची शिक्षणनीती | श्री. हरी नरके |
| मंगळवार ०६/१२/१९९४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन | डॉ. बाबा आढाव |

१९९४ च्या या व्याख्यानमालेत व्यसनी नवऱ्याच्या बायकांचे प्रश्न पुण्याची शिक्षणनिती, मतपेटीचे राजकारण यासारखे विषय चर्चेला घेवून सामाजिक बांधिलकी जोपासली होती.

तर १९९५ च्या व्याख्यानमालेत प्रौढ कुमारिकांचे प्रश्न हाती घेऊन महात्मा फुलेंशी नातं सांगण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते. या व्याख्यानमालेत खालील विषयांवर व्याख्याने झाली.

**२८/११/१९९५ ते ०६/१२/१९९५ या काळातील ही व्याख्यानमाला**

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| २८/११/१९९५ | सत्यशोधक चळवळीची भावी दिशा | अरूण खोरे, |
| २९/११/१९९५ | प्रौढ कुमारिकांचे प्रश्न – मेळावा | –– |
| ३०/११/१९९५ | २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर | प्रा. ग. प्र. प्रधान |
| ०१/१२/१९९५ | भाकीत तत्वज्ञान | डॉ. आ. ह. साळुंखे |
| ०२/१२/१९९५ | सार्वजनिक विश्वस्त निधीचा कारभार | श्री. रायरीकर |
| ०३/१२/१९९५ | नवी कुस्ती व जुन्या तालमी | नारायण पवार |
| ०४/१२/१९९५ | विदर्भातील सामाजिक चळवळी | नागेश चौधरी |
| ०५/१२/१९९५ | बागायतदार स्मृतिदिन | डॉ. बाबा आढाव |

| | | |
|---|---|---|
| ०६/१२/१९९५ | आंबेडकर परिनिर्वाण दिन | डॉ. बाबा आढाव |

### डिसेंबर २००२ मधील फुले आंबेडकर व्याख्यानमाला, कार्यक्रम पत्रिका

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| २८/११/२००२ | धर्मनिरपेक्षता आशय आणि व्यवहार | श्री. रा.प.नेने |
| २९/११/२००२ | भटक्या विमुक्त चळवळीची वाटचाल | श्री. लक्ष्मण माने |
| ३०/११/२००२ | शरीर विक्री करणाऱ्या स्त्रियांच्या चळवळीची वाटचाल | श्रीमती. विजयाताई लवाटे |
| ०१/१२/२००२ | बहुजन समाज आणि संगणक | डॉ. राम ताकवले |
| ०२/१२/२००२ | संघटित कामगार चळवळीची दुर्दशा | श्री. हनुमंत ताठे |
| ०३/१२/२००२ | उच्च शिक्षणाचे बाजारीकरण | डॉ. सत्यरंजन साठे |
| ०४/१२/२००२ | व्यसनमुक्ती चळवळीची वाटचाल | प्रसाद ढवळे |
| ०५/१२/२००२ | अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीची वाटचाल | डॉ. नरेंद्र दाभोळकर |
| ०६/१२/२००२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | डॉ. बाबा आढाव |

### फुले–आंबेडकर व्याख्यानमाला २०१२

महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान (ग्रंथालय व वाचनालय) आयोजित फुले–आंबेडकर व्याख्यानमाला दि. २८ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०१२ या काळात झाली.

### डिसेंबर २०१२ मधील फुले–आंबेडकर व्याख्यानमाला कार्यक्रम पत्रिका

| वार–दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| बुधवार २८ नोव्हेंबर २०१२ | भ्रष्टाचार आणि राजकारण | प्र.वक्ते – प्रा. अजित अभ्यंकर |
| गुरूवार २९ नोव्हेंबर २०१२ | भ्रष्टाचार आणि अर्थकारण | प्र.वक्ते – कॉ. गोविंद पानसरे |
| शुक्रवार ३० नोव्हेंबर २०१२ | भ्रष्टाचार मुक्तीसाठी पर्याय | प्र.वक्ते – प्रा. प्रकाश पवार |

| | | |
|---|---|---|
| शनिवार<br>१ डिसेंबर २०१२ | भ्रष्टाचार विरोधी आंदोलन | प्र.वक्ते – अनंत दिक्षीत |
| रविवार<br>२ डिसेंबर २०१२ | कायदा आणि भ्रष्टाचार | प्र.वक्ते – ॲड. असिम सरोदे |
| सोमवार<br>३ डिसेंबर २०१२ | धर्मसंस्थांमधील संपत्ती | प्र.वक्ते – यमाजी मालकर |
| मंगळवार<br>४ डिसेंबर २०१२<br>मनोहर कदम<br>स्मृती व्याख्यान | धर्मविचार तत्वज्ञान आणि भ्रष्टाचार | प्र.वक्ते – डॉ. आ.ह.साळुंखे |
| बुधवार<br>५ डिसेंबर २०१२ | भ्रष्टाचार आणि प्रशासन | प्र.वक्ते – सुरेश खोपडे |
| गुरूवार<br>६ डिसेंबर २०१२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन अभिवादन सभा | प्र.वक्ते – नागनाथ कोतापल्ले<br>अध्यक्ष–डॉ. बाबा आढाव |

## डिसेंबर २०१३ मधील फुले–आंबेडकर व्याख्यानमाला कार्यक्रम पत्रिका

| **वार–दिनांक** | **विषय** | **वक्ते / अध्यक्ष** |
|---|---|---|
| गुरूवार<br>२८ नोव्हेंबर २०१३ | सांस्कृतिक दहशतवाद आणि हिंसा | प्र. वक्ते – मार्टीन मकवान, गुजराथ |
| शुक्रवार<br>२९ नोव्हेंबर २०१३ | प्रश्न सोडविण्याचे मार्ग आणि हिंसा | प्र. वक्ते – ॲड. मुक्ता दाभोळकर |
| शनिवार<br>३० नोव्हेंबर २०१३ | धर्मवाद, जातीवाद व स्त्रियांवरील हिंसा | प्र. वक्ते – डॉ. मनिषा गुप्ते |
| रविवार<br>१ डिसेंबर २०१३ | धर्मनिरपेक्षता, घटना आणि राजकारण | प्र. वक्ते – न्या. पी. बी. सावंत |
| सोमवार<br>२ डिसेंबर २०१३ | धर्मनिरपेक्षता, जातीय दंगली व प्रशासन | प्र. वक्ते – उद्धव कांबळे, |
| मंगळवार<br>३ डिसेंबर २०१३ | धर्मनिरपेक्षतेचे राजकारण व मुस्लिम प्रश्न | प्र. वक्ते – हुमायून मुरसल, कोल्हापूर |
| बुधवार<br>४ डिसेंबर २०१३ | सोन्या मधील गुंतवणूक व देशासमोरील प्रश्न | प्र. वक्ते – यमाजी मालकर, |
| गुरूवार<br>५ डिसेंबर २०१३ | घसरता रूपया, समस्या आणि उपाय | प्र. वक्ते – प्रा. कॉ. अजित अभ्यंकर |
| शुक्रवार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन | प्र. वक्ते – डॉ. बाबा आढाव |

| | | |
|---|---|---|
| ६ डिसेंबर २०१२ | अभिवादन सभा | |

व्याख्यानमालेतील विचारांचा फायदा हा सर्व समाजातील लोकांना होत असतो. बाबा आढावांचे हे कार्य नव्या व्यवस्थेला विचार करायला लावणारे आहे. २००० सालापर्यंतची व्याख्यानमाला ही महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या टिंबर मार्केटच्या ऑफिसच्या आवारात होत होती. २००० सालानंतर व्याख्यानमाला ही गंजपेठ येथील महात्मा फुले वाड्यात होत आहे. महात्मा फुलेंचा विचार जागवण्याचे महत्त्वाचे कार्य बाबा आढाव हे समता प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली ६० वर्षाहून अधिक काळापासून करीत आहेत. हेच या व्याख्यानमालेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे

### ३.३ नागरिक सहकारी भांडार

१९५१–५२ मध्ये महाराष्ट्रात खूप मोठा दुष्काळ पडला होता. अशा परिस्थितीत हजारो लोकांचे जीवन वाचवण्यासाठी त्यांना जीवनावश्क वस्तूंची गरज होती. अशावेळी ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणारे अशा प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणारे भांडार डॉ. बाबा आढाव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केले होते. बाबा सांगतात, ‘दुष्काळामुळे होरपळलेल्या जनतेला मी सुरू केलेल्या नागरिक सहकारी भांडाराचा खूप फायदा झाला’[१] त्यांच्या या कामाची नाना पेठ, भवानी पेठ, गंजपेठ, या भागात खूप चर्चा झाली.

### ३.४ महाराष्ट्र आरोग्य मंडळ

सन १९५२च्या काळात शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयात बाबा आढाव, बापू काळदाते, गोपाळ शहा, मार्तंड पाटील, सिंधू केतकर, वीणा सुराणा हे सर्वजण आयुर्वेदाचे शिक्षण घेत होते. सर्वजण राष्ट्रसेवादलाचे असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांची घट्ट मैत्री जमली होती. त्यावेळी बाबा आढाव नाना पेठेत राहत होते.

त्या काळच्या कौटुंबिक परिस्थितीला सामोरे जात बाबा आढाव यांनी ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयाचा अभ्यासक्रम अतिशय मेहनतीने पूर्ण केला व बाबा आढाव डॉक्टर झाले. ते नाना पेठेतच प्रॅक्टीस करू लागले. डॉ. दादा गुजर व डॉ. गोपाळ शहा ऑईल कामगार सहकारी संस्थेचा दवाखाना मंगळवार पेठेत चालवत होते. डॉ. दादा गुजर,

डॉ. बाबा आढाव, डॉ. सिंधू केतकर, डॉ. गोपाळ शहा व डॉ. मार्तंड पाटील यांची वैयक्तिक प्रॅक्टिस जोरदार चालली होती. 'त्या काळात महिना १० हजार रूपयांपर्यंत डॉ. बाबा आढावांचे उत्पन्न होते.'[२]. 'माझ्या पुरता माझा व्यवसाय' अशी भूमिका त्यावेळी मित्रांची नव्हती. बाबा आढाव स्वतः नाना पेठेत कष्टकरी वर्गासाठी देवदूत म्हणून काम करत होते. नाना पेठ, भवानीपेठ, गंजपेठेतील कामगार रूग्ण बाबा आढावांकडे उपचारासाठी जात होते. बाबांच्या औषधोपचाराने रूग्णांना गुण येत होता. आपल्या ज्ञानाचा फायदा सामान्य कामगारांना दिला पाहिजे अशीच भावना डॉ. बाबा आढाव यांची होती.

एस. एम. जोशी, साने गुरूजी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी डॉ. बाबा आढाव, डॉ. दादा गुजर, डॉ. सिंधू केतकर, डॉ. मार्तंड पाटील व डॉ. गोपाळ शहा ही डॉक्टर मंडळी एकत्र आली. या डॉक्टर मित्रांनी ठरविले की, आपली वैयक्तिक प्रॅक्टिस बंद करायची व 'महाराष्ट्र आरोग्य मंडळ' स्थापन करायचे आणि त्यामार्फत साने गुरूजी रूग्णालय ग्रामीण भागासाठी शक्य तेवढ्या माफक दरात चालवायचे. निर्णय होताच सर्वांनी आपापले वैयक्तिक व्यवसाय बंद केले आणि महाराष्ट्र आरोग्य मंडळ स्थापन केले. डॉ. बाबा आढाव व डॉ. दादा गुजर यांनी एकत्रित येऊन 'महाराष्ट्र आरोग्य मंडळ स्थापन करणे ही काही सामान्य घटना नव्हती 'महाराष्ट्र आरोग्य मंडळ' ही देशातील समाजवाद्यांची एक अभिमानाची जागा आहे.' असे वर्णन त्यामुळेच केले जात आहे.

महाराष्ट्राचे त्यावेळेचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व विरोधी पक्षनेते एस. एम. जोशी यांच्या हस्ते महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे उद्‌घाटन झाले. हडपसरच्या गांधी चौकात हा कार्यक्रम झाला. याकाळी पुणे परिसरातून प्रचंड जन समुदाय कार्यक्रमासाठी आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते गुरूवर्य एस. एम. जोशी आणि यशवंतराव चव्हाण. या दोघांनीही विधायक कर्तृत्व करण्यास निघालेल्या डॉक्टरांच्या संचाला मनापासून शुभेच्छा दिल्या होत्या. महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या वतीने समाजसेवकांचा एक संच उभा केला गेला.

२०१० साली महाराष्ट्र आरोग्य मंडळाने ५० वर्षे पूर्ण केलीत. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त काढलेल्या स्मरणिकेत महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे संस्थापक सदस्य म्हणून डॉ. बाबा आढाव, डॉ. दादा गुजर, डॉ. सिंधू केतकर, डॉ. मार्तंड पाटील, डॉ. गोपाळ शहा यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. श्रद्धेय ग. प्र. प्रधान यांनी लिहिलेल्या 'दादा समाजसेवक सहकारी मित्र' या लेखात पान नं.१३ वर बाबा आढाव यांच्या कार्याचा उल्लेख आहे. याच स्मरणिकेत पान नं. २४ च्या शेजारी महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या संस्थापक सदस्यांचे फोटो देण्यात आले आहेत.

## ३.५ झोपडपट्टी निर्मूलन व पुर्नवसन

गरीबी ही आपली सामाजिक समस्या आहे. गरीबी, दरिद्री झोपडवासियांत अधिक सापडतो. पुणे शहरामध्ये तीनशेपेक्षा अधिक झोपडपट्ट्यांमधून लाखो नागरिक झोपडपट्टीत राहत आहेत. १९५९ सालात डॉ. बाबा आढावांनी पुण्यातील झोपडपट्टीची पाहणी करून डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन परिषद घेतली. या परिषदेतून अनेक प्रश्न समोर आले. 'झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनासाठी डॉ. बाबा आढावांनी अनेक लढे दिले. डॉ. धनंजयराव गाडगीळ, प्रो. वि. म. दांडेकर व डॉ. राममनोहर लोहिया यांच्या उपस्थितीत तीन भव्य परिषदा आयोजित केल्या होत्या.'[३]

महाराष्ट्राच्या विविध भागातून रोजगारासाठी पुण्यात येऊन वास्तव्य केलेली सर्व धर्मांची मंडळी झोपडपट्ट्यांतून राहत आहेत. या झोपडपट्ट्यात लाईट, पाणी, रस्ते, शौचालये यांची पुरेशी व्यवस्था नव्हती. पावसाळ्यात संपूर्ण झोपडपट्टीमध्ये चिखलाचे साम्राज्य पसरलेले असते. परिषदेचा परिणाम असा झाला की झोपडपट्टी निर्मूलनाचा धुमधडाका पोलिसांच्या मदतीने महापालिका अधिकाऱ्यांनी लावलेला होता.

सन १९९६ साली आंबेडकरनगर झोपडपट्टी, मार्केटयार्ड, पुणे येथे झोपड्यांना आग लागली. साधारण १००–१२५ झोपड्या त्यामध्ये जळून खाक झाल्या. त्या घरातील सर्वांचे प्रापंचिक जीवन उद्ध्वस्त झाले. घरातील सर्व वस्तू जळून खाक झाल्या. अशा वेळेस बाबा आढाव यांच्या हमाल पंचायत व म.न.पा.ने जळिग्रस्तांना प्रापंचिक जीवनावश्यक वस्तूंची तसेच आर्थिक मदत केली.

झोपडपट्टीत राहणाऱ्या सर्वांनाच पक्की घरे मिळावीत, त्यांचे सामाजिक आरोग्य सुधारावे व त्यांना मुलभूत गरजा मिळाव्यात यासाठी बाबा आढाव गेली ५० वर्षांपासून आग्रही भूमिका मांडत आहेत.

### ३.६ आधी पुनर्वसन मग धरण

१९६३ साली डॉ. बाबा आढावांनी कॉम्रेड. जयसिंग माळी यांचे सहकार्याने महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसन परिषदेची स्थापना केली. या परिषदेने विकसनशील पुनर्वसनाची मागणी केली. स्वातंत्र्यानंतर सतत दुष्काळी असणाऱ्या तालुक्यांच्या विकासासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या सुपीक कसत असलेल्या शेतजमीनी, घरेदारे कवडीमोल किंमतीत धरण प्रकल्पांसाठी शासनास दिल्या. शासनाने काही ठिकाणी शेतकऱ्यांचा विरोध असूनही जमिनी बळजबरीने घेतल्या. या विस्थापितांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'आधी पुनर्वसन मग धरण' अशी मागणी बाबा आढावांनी केली होती. या मागणीचा पाठपुरावा म्हणून धरणाच्या पाण्याखाली नव्याने जाणाऱ्या जमीनीवर आक्रमण सत्याग्रह डॉ. बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली झाला. तेव्हाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांनी दौंडजवळील धरणालगत लाभक्षेत्रात घेतलेल्या मोठमोठ्या जमीनींवरही बाबांनी सत्याग्रह केला. त्यात बाबांना व सत्याग्रहींना अटक झाली. पाण्याखाली ज्यांचे संसार बुडतात त्यांना भिजणाऱ्या क्षेत्रात जमीन मिळावी ही मागणी घेऊन कुकडी या ठिकाणी सत्याग्रह केला. कुकडी प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभ उधळण्याच्या अभूतपूर्व सत्याग्रहात पोलिसांकडून जबरदस्त लाठीमार झाला. 'पोलिसांनी केलेल्या लाठीमारात बाबा आढावांच्या डोळ्याला मार लागला. या सत्याग्रहात बाबा आढावांना आपला एक डोळा गमवावा लागला.'[४] देशभर या सत्याग्रहाचे प्रतिसाद उमटले होते. त्यातूनच 'आधी पुनवर्सन मग धरण' या मागणीने पुन्हा जोर धरला.

धरणग्रस्तांची चळवळ जिल्ह्याजिल्ह्यात नियोजनबद्ध राबविली गेली. पानशेत जवळ दिंडली या गावी एक पुनर्वसन परिषद घेतली. निरादेवधर, वीर, सातारा, धुळे, जळगाव, कुकडी, डिंभे, उरमोडी, पवना, दौंड इत्यादी ठिकाणी बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली पुनर्वसनासाठी परिषदा झाल्या. शासन–दरबारी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. धरण

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रखर लढा उभारला गेला. बाबा आढाव राज्यभर फिरले. विस्थापितांच्या चळवळीला कायद्याचा आधार मिळावा यासाठी प्रयत्न केला. धरणग्रस्तांच्या चळवळीच्या परिणामस्वरूप देशात प्रथमच महाराष्ट्रात पुनर्वसनाचा कायदा झाला. धरण व प्रकल्पग्रस्तांच्या चळवळीत बाबा आढावांनी महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्या पायाखाली घातल्या आहेत.

### ३.७ नगरसेवक

१९६२ साली पुणे शहरात खड्ड्यामय परिस्थिती झालेली होती. महानगरपालिकेचा कारभार भ्रष्टाचाराने पोखरला होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी डॉ. नानासाहेब परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली नागरी संघटनेने शहराची निवडणूक लढवायचे ठरविले. या निवडणुकीत गुरूवर्य बाबुराव जगताप, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, भाई वैद्य, बाबा आढाव, रामभाऊ तुपे ही मंडळी होती. बाबा आढाव नागरी संघटनेचे सचिव होते.

पुणे महानगरपालिकेची १९६३ साली बाबा आढाव यांनी नागरी संघटनेच्या वतीने नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली. बाबा सांगतात , 'मी, भवानी पेठ मतदारसंघातून विजयी झालो'[५]. नागरी संघटनेचे अनेक नगरसेवक विजयी झाले. नागरी संघटनेचे पहिले महापौर गुरूवर्य बाबुराव जगताप झाले. बाबा आढावांच्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात समाजाची अनेक कामे पूर्ण झाली. नानासाहेब गोरे महापौर असताना बालगंधर्व नाट्यगृहाचे उद्‌घाटन झाले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना पुणेकरांतर्फे मानपत्र देण्यात आले. बाबा आढावांनी त्यांच्या नगरसेवकपदाच्या काळात झोपडीसंघाच्या वतीने झोपडपट्टीवासीयांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार व मुलभूत सुविधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यासाठी योजना आखल्या. वीज, रस्ते, शौचालये,पक्की घरे, झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन यांसारख्या कार्यक्रमातून आपली नगरसेवकपदाची छाप बाबांनी उमटवली. 'झोपडपट्टीतल्या प्रश्नांची जाण असल्यामुळे बाबा आढाव पुन्हा दुसऱ्यांदा १९६८ साली नगरसेवक म्हणून निवडून आले. या दुसऱ्या टर्ममध्ये बाबा आढावांनी महापौरपदाची निवडणूकही लढवली.'[६] तसेच '१९६७ व १९७१ या दोन सार्वत्रिक निवडणुकीत खेड मतदार संघातून लोकसभेची निवडणूक संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे उमेदवार म्हणून बाबा आढावांनी लढवली होती.'[७]

म्हणजेच संसदीय निवडणुकीद्वारे जनतेच्या हिताची कामे करता येतील यावर बाबांचा विश्वास होता. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महागाईचा मुद्दा महत्त्वाचा ठरला होता. पुणे लोकसभा मतदार संघातून एस. एम. जोशी हे निवडणूक लढवत होते. रोटी, कपडा देना सके, वो सरकार निकम्मी है । अशी घोषणा हिट ठरली होती. बाबा आंढाव १९६७ साली खेड मतदार संघातून काँग्रेसचे र.के. खाडिलकर यांच्या विरोधात उभे राहिले होते. त्यांनी संयुक्त सोशालिस्ट पार्टीच्या वतीने खेड मतदार संघ पिंजून काढला. '१५ फेब्रुवारी १९६७ साली ही निवडणूक झाली. खेड मतदार संघात ४,७५,२६८ इतके मतदार होते. त्यापैकी २,८३,०५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. काँग्रेसचे रघुनाथ के. खाडिलकर यांना १,५७,२२५ मते मिळाली. बाबा आढाव यांना दुसऱ्या क्रमांकांची ८०,९०२ मते मिळाली'[८]. १९६७ साली खेड मतदार संघातून काँग्रेसचे रघुनाथ खाडिलकर विजयी झाले. पुण्यात मात्र संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे एस. एम. जोशी विजयी झाले. त्यांनी काँग्रेसचे नरहर विष्णू गाडगीळ यांचा पराभव केला होता.

१९७१ साली बाबा आढाव हे काँग्रेसचे अनंतराव पोटभरे यांच्या विरोधात लोकसभा निवडणुकीसाठी उभे राहिले. यावेळी सुद्धा बाबा आढावांचा पराभव झाला. बाबा आढावांनी शिरूर विधानसभेसाठी निवडणूक लढविली. प्रचार जोमाने केला. परंतु शेतकरी आणि पाणी या दोन प्रश्नांवर रान उठवूनही त्यांचे रूपांतर मतपेटीतून झाले नाही. तेथेच बाबांनी राजकारणाकडे पाठ फिरवली. वास्तविक, विधान परिषदेवर जाण्याची संधी येऊनही तडजोडीचा स्वभाव नसल्यामुळे ती संधी नाकारली.

### ३.८ जमीन बळकाव आंदोलन

डॉ. बाबा आढाव यांनी सोशालिस्ट पार्टीच्या सहकार्याने 'भूमी बळकाव' आंदोलन केले. त्यावेळच्या सत्ताधारी काँग्रेसी व अन्य नेत्यांच्या विरोधात हे आंदोलन केले होते. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांनीही या आंदोलनात उडी घेतली होती. पडिक जमीन भूमीहीनांना मिळाली पाहिजे. कसणाऱ्या शेतकऱ्यांना, गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरून बाबा आढावांनी सत्याग्रह केला. सर्व जातीधर्माचे लोक यावेळी रस्त्यावर उतरले होते. शेतकऱ्यांमध्ये स्वाभिमान निर्माण करण्याचे मोठे काम बाबांनी केले.

### ३.९ अस्पृश्यते विरोधातील कार्य

प्रसिद्ध देवदेवतांची शासकीय खर्चाने होणाऱ्या पुजेसंदर्भात बाबा आढावांनी आंदोलन छेडले होते, त्याची आठवण करून देताना ते सांगतात, '१९७१ साली इंडीयन सेक्यूलर सोसायटीच्या सहकार्याने मी महाराष्ट्र शासनाला पंढरपूरच्या विठोबाची शासकीय खर्चाने होणारी पूजा बंद करण्यास भाग पाडले'[९]. पुढे वैदिक पंडितांचा शासकीय सत्कारही बंद पाडला, सरकारी तिजोरीतील पैसा हा समाजाच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी व देशाच्या प्रगतीसाठी उपयोगात आणावा व सरकारकडून लोकोपयोगी कार्य व्हावे हा त्यामागचा बाबा आढावांचा उद्देश होता.

१९७२–७३ सालात महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी पंढरपूरला तनपुरे महाराजांनी विश्वशांती यज्ञ आयोजित केला होता. अन्नधान्याच्या या नासाडीविरूद्ध बाबा आढावांनी प्रखर आंदोलन केले. पंढरपूरला सत्याग्रह केला. बाबा आढाव व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक झाली. सोलापूरच्या तुरूंगातसुद्धा त्यांनी सहा दिवस उपोषण केले.

'१९७७ साली बाबा आढावांनी प्रा. गं. बा. सरदार, डॉ. व्ही. डी. देशपांडे, प्रा. अ. भि. शहा, श्री. यदुनाथ थत्ते यांना बरोबर घेऊन विषमता निर्मूलन समितीची रचना केली.'[१०] विषमता निर्मूलन समितीच्या सहकार्याने बाबा आढावांनी जातीयतेची अनेक प्रकरणे उघडकीस आणली. आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचा कारभार हा महाराष्ट्र शासनामार्फत देवस्थान कमिटी पाहते. देवस्थान कमिटी जिल्हा न्यायालयाच्या नियंत्रणाखाली काम करते. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या सोहळ्याची व्यवस्था जिल्हा न्यायाधिशांनी १९३५ साली ठरवून दिलेली आहे. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांच्या पालखीपुढे २६ दिंड्या चालतात. पालखीपासून क्रमांक १ सुरू होतो. १ ते २३ या सवर्णांच्या दिंड्या आहेत. त्यानंतर मानाची घोडी नंतर २४,२५,२६ या रोहिदास, चोखामेळा या दलित संताच्या दिंड्या चालतात. यात अनुक्रमे चांभार, महार, मातंग मंडळी असतात. १९३५ साली तयार केलेल्या व्यवस्थेत बदल केला जावा, सवर्ण व दलित दिंड्यामधील भेदभाव नष्ट व्हावा अशी मागणी हराळे वैष्णव समाजाने केली. यात बहुसंख्य चर्मकार होते. हराळे वैष्णवांनी आपले गाऱ्हाणे रितसर सर्वत्र पाठवले. 'बाबा आढावांच्या विषमता निर्मूलन समितीच्या मार्गदर्शनाखाली व आगवणे यांच्या

नेतृत्वाखाली २७ जून १९७८ रोजी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या प्रस्थानाच्या दिवशी तीनही दलित दिंड्यांनी सत्याग्रह केला,'[११] परिणामी शासनास मानाची घोडी पुढे काढण्याचा निर्णय घ्यावा लागला या सत्याग्रहाला भरपूर प्रसिद्धी मिळाली. त्याचवेळी आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेतील अस्पृश्यतेची प्रकरणे विषमता निर्मूलन समितीने चव्हाट्यावर आणली.

**जयपूर उच्च न्यायालयातील मनूपुतळा हटावमोहीम**

लोकांचे प्रबोधन व्हावे यासाठी बाबा आढाव यांनी अहोरात्र कष्ट घेतले. पुण्यातच नव्हे तर पुण्याबाहेरही कार्यक्रम आखले गेले. 'डॉ. बाबा आढाव यांची पदयात्रा जयपूर उच्च न्यायालयातील मनू पुतळा हटाव' या मोहिमेसाठी झाली.'[१२] २६ जानेवारी २००० रोजी महाडच्या चवदार तळ्यापासून बाबा आढाव व त्यांच्या कार्यकर्त्यांनी पदयात्रेला सुरूवात केली. महू ते जयपूर असा प्रवास झाला. दि. २५ फेब्रुवारी २००० व दि. २६ फेब्रुवारी २००० या दिवशी जयपूरच्या न्यायालयासमोर धरणे-आंदोलन झाले. भारताला विषमतेच्या डोहात लोटणारा मनूचा पुतळा हटवावा यासाठी डॉ. बाबा आढावांनी केलेले आंदोलन महत्त्वाचे ठरले, त्यांनी केलेले हे आंदोलन हे केवळ विरोधासाठी नव्हते तर ते समतेच्या आग्रहासाठी होते.

**३.१० मुस्लिम सत्यशोधक मंडळ**

भारतात राहणाऱ्या मुस्लिम प्रश्नांवर अनेकांनी चांगले काम केले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात १९१६ साली लोकमान्य टिळकांनी लखनौ करार करून मुस्लिमांना सवलती देण्यास सुरूवात केली होती. मुस्लिमांच्या सनातनी प्रथा व अंधश्रद्धा यावर कोणीच बोलत नव्हते. मुसलमानांमध्ये सुधारणा घडून यावी यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याचे ठरले. यावेळी हमीद दलवाई, अमीर शेख, सय्यद भाई, मकबूल तांबोळी, रफीउद्दीन सय्यद, सय्यद मुनीर, बाबूमियाँ बँडवाले आदी मित्रांना बाबा आढाव व भाई वैद्य यांनी मार्गदर्शन केले. नियमित बैठका होऊ लागल्या. 'मुस्लिम समाजात सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही. मंडळामध्ये मुस्लिम शब्द हवाच असा आग्रह धरला. 'सत्यशोधक शब्द डॉ. बाबा आढावांनी सुचवला आणि तो तात्काळ स्विकारण्यात आला.'[१३] त्यामुळे महाराष्ट्रातील समाजक्रांतीच्या उज्ज्वल परंपरेशी डॉ.

आढावांचा धागा जोडला जातो. मंडळाचे कर्ते समाजसुधारक महात्मा फुलेंशी नाते जोडल्याने करावयाच्या कामाची स्पष्ट जाणीव झाली. महात्मा फुलेंनी हजारो वर्षांच्या दुष्ट रूढींविरूद्ध व ग्रंथनिष्ठेविरूद्ध बंड पुकारले. तसेच कार्य मुस्लिम सत्यशोधक मंडळाने केले आहे.

मुस्लिम स्त्रियांना न्याय मिळावा यासाठी मुस्लिम मंडळाने काढलेल्या पहिल्या मोर्चाने अनेक मुस्लिम महिलांनी एकत्रित येऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे धाडस दाखवले. २२ मार्च १९७० मध्ये मंडळाच्या स्थापनेनंतर पुण्याला मोमीनपुरा येथे जो मोर्चा काढला , त्यावर तर हल्लाच झाला. १९७३ साली मुस्लिम रिफॉर्म कॉन्फरन्स झाली. १९८५ मध्ये मुक्तीमोर्चा काढला यामध्ये हुसेन जमादार, सय्यदभाई, बाबूमियाँ बँडवाले, अ. भि. शहा या सर्वांच्या मदतीने बाबा आढावांनी प्रबोधनाचे कार्य उभे केले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक बाबूमियाँ बँडवाले हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष होते. मंडळाचे कार्य जोरात चालू होते. २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी मुस्लिम महिला परिषद घेतली गेली. त्यात महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील सुमारे १७६ महिला या परिषदेला उपस्थित होत्या. या परिषदेच्या माध्यमातून मुस्लिम स्त्रियांचे अनेक प्रश्न जनतेसमोर आले. या काळात अनेकदा बाबा आढाव, बाबूमियाँ बँडवाले, हमीद दलवाई यांच्यावर व त्यांच्या कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले झाले.

हमीद दलवाई व मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या आठवणीतून बाबा सांगतात, '१९७४ ते १९७७ या काळात पुरोगामी विचारांच्या मुस्लिमांसोबत विचार विनिमय करून मी 'जिहाद एक तलाक' च्या परिषदा घेतल्या.'[१४] 'जुबानी तलाक बंद करा', द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करा, इत्यादी मागण्या घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळानं ३ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर १९८५ या काळात महाराष्ट्रभर तलाक मुक्ती मोर्चा काढला. मोर्चाला ठिकठिकाणी सनातनी मुस्लिमांकडून प्रखर विरोध झाला.

तलाकमुक्तीच्या यशस्वी मोर्चानंतर काही तलाकपिडीत महिलांना घेऊन बाबा आढाव, बाबूमियाँ बँडवाले, मेहरूनिस्सा दलवाई हे पंतप्रधान राजीव गांधींना भेटण्यासाठी दिल्लीला गेले होते. राजीव गांधींनी आवर्जून या महिलांना भेटण्याचे मान्य केले. पंतप्रधानांना एक निवेदन सादर केले. या निवेदनात द्विभार्या प्रतिबंधक कायदा, पोटगी हक्क, तोंडी तलाक नसावा इत्यादी मागण्या होत्या. काही तलाक पिडीत महिलांनी आपले अनुभव राजीवजींना सांगितले.

राजीव गांधींनी खरोखरच हे विधेयक सभागृहात मांडले पण ते विधेयक सभागृहात पास झाले नाही. हे विधेयक जर पास झाले असते तर भारतातील मुस्लिम स्त्रियांना नक्कीच न्याय मिळाला असता आणि तो एक ऐतिहासिक निर्णय ठरला असता. पण भारताच्या दुर्दैवाने हे विधेयक पास होऊ शकले नाही. त्याचे शल्य आजही बाबा आढावांना टोचत आहे.

'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' या प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी संपादित केलेल्या पुस्तकात पान चौदावर हमीद दलवाई आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांच्या मुस्लिम समाज प्रबोधनाच्या कार्यात मा. भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, प्रा. ग. प्र. प्रधान यासारख्या समाजवादी विचारवंत व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे, असा उल्लेख आहे.

### ३.११ एक गाव एक पाणवठा

बाबा आढावांनी 'एक गाव एक पाणवठा' ही मोहीम सत्यशोधक समाज शताब्दीनिमित्त सुरू केली. त्यापूर्वी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व शाहू छत्रपती जन्मशताब्दी कार्यक्रम पुण्यात आयोजित केले होते. १८७३ साली महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला २४ सप्टेंबर १९७३ रोजी शंभर वर्षे पूर्ण होणार हे लक्षात घेऊन महात्मा जोतीराव फुले यांचे नजरेआड झालेले सत्यशोधक समाजाचे कार्य पुन्हा उजेडात आणण्यासाठी मी महाराष्ट्रात 'एक गाव एक पाणवठा' ही व्यापक चळवळ हाती घेतली होती.'[१५]

या देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी लोकांच्या प्रबोधनाची गरज आहे ही गरज लक्षात घेऊन बाबा आढाव महाराष्ट्रात सर्व फिरले. सत्यशोधक चळवळीचा इतिहास सांगणारी कागदपत्रे, आठवणी गोळा करण्यासाठी अथक प्रयत्न केला. त्यांचे अनुभव एक गाव एक पाणवठा या पुस्तकात नमूद केले आहेत, सत्यशोधक चळवळीच्या बाबांनी महाराष्ट्रभर फिरून जमा केलेल्या कागदपत्राच्या आधारे महात्मा फुले समग्र वाङमयात खूपच भर पडली आहे. बाबा आढावांच्या एक गाव एक पाणवठा चळवळीमुळे महात्मा फुले यांचे सहकारी दिनकरराव जवळकर व कृष्णराव भालेकर यांचे समग्र साहित्य प्रकाशित झाले आहे.

बाबा आढाव यांचे म्हणणे होते की, सत्यशोधक चळवळीच्या शंभर वर्षाच्या इतिहासाकडे पूर्व ग्रह दुषित नजरेने न पाहता काहीशा नि:पक्ष भूमिकेतून पाहिले जावे. बाबा

आढावांनी १९७२–१९७३ या वर्षात जवळपास सत्तर ते पंचाहत्तर मोठ्या गावातील तरूणांपुढे व्याख्याने दिली. तीस तालुक्यातील चारशेच्या वर खेड्यातील सामाजिक जीवन जवळून पाहिले. फिरत असताना महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासाचा अभ्यास केला. एक गाव एक पाणवठा चळवळीमुळे अप्रसिद्ध असे ग्रामीण साहित्य, लोककला प्रकाशात आल्या. माणसामाणसांतील समानता आपण कायद्यानं मान्य केलेली असली तरी मनान मान्य केलेली नाही. त्यासाठीच एक गाव एक पाणवठा चळवळ बाबा आढावांनी यशस्वी करून दाखविली.

## ३.१२ देवदासी पुनर्वसन परिषद

'२० सप्टेंबर १९७८ रोजी डॉ. बाबा आढाव यांच्या प्रेरणेने कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे देवदासी परिषद सर्वात प्रथम पार पडली.'[१६] देवदासी समस्येचे गांभीर्य आणि देवदासींची अपार उपेक्षा याची जाणीव उभ्या महाराष्ट्राला प्रथमच झाली. इंग्रजांच्या राजवटीतील देवदासी प्रथेविरूद्धच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे व बेळगावच्या आयुक्तांकडे कायद्याची प्रत देऊन सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरला. देवदासींचे प्रबोधन, जटानिर्मूलन या गोष्टी गडहिंग्लज येथील परिषदेमुळे होऊ लागल्या. बाबा आढावांच्या चळवळीमुळे देवदासींच्या सुधारणासाठी अर्थसंकल्पात प्रथमच २५ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्रव्यापी निराधार मुक्तीकेंद्राची स्थापना करण्यात आली. बाबा आढाव व त्यांच्या सहकाऱ्यांनी देवदासींचा प्रश्न प्रबोधन, संघर्ष आणि कृती या त्रिसूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून सतत जागता ठेवण्याचे काम केले. गडहिंग्लज येथे देवदासी मुलामुलींसाठी वसतीगृह सुरू केले. देवदासींना हाताला काम देण्यासाठी लोकर विणकामाचा प्रकल्प शासनातर्फे गडहिंग्लजमध्ये सुरू करण्यात आला. शासनपातळीवर देवदासींच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगट, निराधार योजनेतंर्गत अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी परिषदेचे कार्य हा मैलाचा दगड ठरला होता.

## ३.१३ देवदासी परिषदेतील ठराव

१) महाराष्ट्र व कर्नाटक सीमाभागात मुलींना देवीला सोडण्याची अनिष्ट प्रथा चालू आहे. मुलींना सौंदत्ती येथील जत्रेत आणि अनेक खेड्यांमधून देवीला सोडून त्यांचे जीवन

बरबाद केले जाते. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप नको या सबबीखाली आजची लोकनियुक्त सरकारे या प्रथेबाबत काहीच पावले उचलीत नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळात दोन्ही सरकारांनी या कायद्याखाली एकही खटला भरला नाही. ही अतिशय निषेधार्ह बाब आहे. तरी ही प्रथा मोडण्यासाठी १९३४ च्या कायद्याची कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी ही परिषद करीत आहे.

२) देवदासींचा प्रश्न हा स्त्री–मुक्तीचा प्रश्न आहे. हा आपल्या सांस्कृतिक जीवनास लागलेला कलंक आहे असे समजून दोन्ही प्रांतातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन कार्य करावे. महाराष्ट्र व कर्नाटक सरकारनी या कामी सुसूत्रपणे प्रयत्न करावेत. त्यासाठी त्यांनी कायदेशीर अधिकार असलेले देवदासी पुनर्वसन बोर्ड निर्माण करावे.

३) मागासपणा, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य यांचा फायदा घेऊन मुंबई, दिल्ली, मद्रास यासारख्या मोठ्या शहरांतील दलाल या भागात येऊन पालकांना प्रलोभने दाखवून मुली देवाला सोडायला भाग पाडतात. या दलालांच्या कारवायांवर शासनाने बारी लक्ष ठेवून त्यांना पुराव्यासह पकडून जरब बसेल अशी कायदेशीर कारवाई करावी. या व्यवसायासाठी विक्री झालेल्या स्त्रियांची जागोजागी तपासणी करून मुक्तता करण्यात यावी.

४) देवदासींची जातिनिहाय शिरगणती शासनाने करावी. याचा उपयोग या प्रश्नांची व्याप्ती कळावी, उपाययोजना करणे सुकर व्हावे या दृष्टीने होईल.

५) देवदासींचे पुनर्वसन (अ) देवदासींच्या मुलींना बऱ्याचवेळा आईचे नांव लावावे लागते. त्यामुळे मागासवर्गीय असूनही त्यांना शासनाच्या सवलती मिळत नाहीत. तर ही तांत्रिक अडचण दूर करून त्यांना या सवलती मिळाव्यात. त्याचप्रमाणे सर्वच जातींच्या देवदासींच्या मुला–मुलींना मागासवर्गीयांसाठी असलेल्या शैक्षणिक व व्यावसायीक सवलती मिळाव्यात. (ब) या अनिष्ट प्रथेत अडकलेल्या देवदासींना अंधश्रद्धेवर आधारित असलेल्या व्यवसायावर उपजिविका करावी लागते. तरी त्यांना या व्यवसायापासून बाहेर काढण्यासाठी व सन्मान्य व्यवसायांत त्यांचे पुनर्वसन होण्यासाठी सरकारने पावले उचलावीत.

६) निपाणी, बेळगांव, कोल्हापूर या शहरांतून देवदासींच्या मुला–मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे शासनाने उभारावीत.

७) जोगतिणीच्या प्रथेप्रमाणे खंडोबाला वाहिल्या जाणाऱ्या मुरळ्या, गोव्यातील माविणी या प्रथाही सरकारने बंद पाडाव्यात, अशी मागणी ही परिषद करीत आहे.

८) आपल्या आईने 'झुलवा' लावून घेतलेल्या इसमाकडून वारसा हक्क मिळाला पाहिजे.

९) सर्व वयोवृद्ध देवदासींना म्हातारपणी पेन्शन मिळावी, अशी ही परिषद मागणी करीत आहेत.

### ३.१४ मराठवाडा विद्यापीठ नामांतर

डॉ. बाबासाहेबांनी मिलिंद महाविद्यालयाच्या स्थापनेच्या वेळीच 'विद्यापीठाची' कल्पना बोलून दाखवली होती. मराठवाड्यातील शिक्षण प्रसारात बाबासाहेबांच्या प्रेरणांचा सिंहाचा वाटा आहे म्हणून महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला पन्नास वर्षे पूर्ण होत असताना मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी पुढे आली. नामांतराची मागणी पुढे आल्यापासून सभा, मोर्चे, मागणीपत्रके, सत्याग्रह, पाठिंब्याची पत्रके इत्यादी मार्गांनी आंदोलन सुरू राहिले.

डॉ. बाबा आढाव यांच्या विषमता निर्मूलन समितीने पुढाकार घेऊन मराठवाडा नामांतर वादी कृती समितीची स्थापना केली. तसेच दोन्ही सभागृहात एकमताने नामांतराचा ठराव मंजूर झाला असल्याने कायदा करून नामान्तर घडवून आणणे ही सरकारची ही नैतिक जबाबदारी होती. बाबा आढाव यांनी २० मार्च १९७९ रोजी लातूर येथे विषमता निर्मूलन समितीचे शिबिर घेतल्यानंतर ६ डिसेंबर १९७९ रोजी 'लाँग मार्च' काढण्याचे निश्चित केले. त्यावेळी लाँगमार्च काढण्याबाबात एस. एम. जोशी म्हणतात, 'डॉ. बाबा आढाव यांच्याशी या लाँगमार्चबाबत माझा थोडा मतभेद होता.'[१७]. महाराष्ट्रात 'पुलोद'चे राज्य होते. भाई वैद्य त्यावेळी गृहराज्यमंत्री होते. भाई वैद्य नामान्तरवादी होते. 'पुलोद' मध्ये मंत्री होण्या आधिच त्यांनी नामांतराचे प्रश्नावर बिनसरकारी विधेयक मांडण्यात पुढाकार घेतला होता. २ ऑगस्ट १९७८ रोजी शपथविधी होताच ते मराठवाड्यातील दंगलग्रस्त दलितांना साह्य देण्यासाठी फिरले होते. अशा आपल्याच मंत्र्याला लाँग मार्च काढून अडचणीत टाकू नये असे

एस.एम.जोशी यांना वाटत होते. त्यांना तीन–चार महिन्यांची मुदत द्यावी, दरम्यान मराठवाड्यातील नामान्तर विरोधकांना अनुकूल करून घेण्याचे आणखी प्रयत्न करावेत, इतके होऊनही नामान्तराच्या संदर्भात विधेयक आले नाही तर जनता पक्षाच्या मंत्र्यांनी राजीनामे देऊन बाहेर पडावे, असे एस. एम. जोशी हे बाबा आढावांना सांगत होते. पण जनतेचे पुरेसे उद्बोधन झाले आहे, त्यासाठी आता थांबायला नको, असे डॉ. बाबा आढाव यांचे म्हणणे होते. लाँगमार्च झाला आणि आढावांना अटक झाली.

### ३.१५ तुरूंगातील दिवस

डॉ. बाबा आढाव १९५२ पासून तब्बल ५३ वेळेस येरवडा तुरूंगात गेले आहेत. आणीबाणीच्या कालखंडात सुमारे १९ महिने ते तुरूंगात होते. महागाईसारख्या सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर अनेक आंदोलने केली, रिक्षा पंचायत, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, झोपडपट्टी संघ, मराठवाडा नामांतर, मनूपुतळा हटाव मोहीम, मोलकरणीचे प्रश्न, कागद, काच, पत्रा संघटनांचे आंदोलन, कष्टकरी पंचायत, हमाल पंचायत, तसेच समाजात घडणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या घटनेसंदर्भात आवाज उठवणारे प्रश्न घेऊन डॉ. बाबा आढावांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. मोर्चे, संप, बंद, घेराव अशा शांततेच्या मार्गाने आंदोलने केली. अटक होऊन तुरूंगात गेल्यानंतर बाबा आढावांनी कधीही जामीन घेतला नाही. अटक झाल्यानंतर जामीन घ्यायचा नाही, हा नियमच स्वत:साठी बाबा आढावांनी घालून दिलेला आहे.

आढावांनी तुरूंगातील काळात भरपूर वाचन केले. सामाजिक प्रश्नावर चर्चा, कलह, वादविवाद केले. सर्व राजबंद्यावर छाप पाडली. 'बाबांची बाग' हाही जेलमधील कौतुकाचा विषय झाला होता. तुरूंगात असताना पपयांच्या ५५–६० झाडांचा एक विभाग बाबा आढावांनी खूप कष्ट करून तयार केला होता. तुरूंगवासात बाबा आढावांना हवी ती पुस्तके सन्मित्रांमुळे मिळत होती. त्यामुळे पाश्चिमात्य व भारतीय तत्वज्ञानाची तोंड ओळख झाली. त्याशिवाय मानसशास्त्र, सौंदर्यशास्त्र, नीतीशास्त्र यावरील ग्रंथ वाचून झाले. लोकशाही समाजवाद आणि चिनी क्रांती या विषयावरील व्याख्यानमाला तुरूंगात बाबा आढाव यांच्या प्रयत्नाने आयोजित करण्यात आली होती.

### ३.१६ समारोप

डॉ. बाबा आढाव यांनी विचारांना कृतीशीलतेची जोड देवून अनेक प्रश्नांवर चळवळ निर्माण केली. कोणताही सामाजिक प्रश्न होती घेण्यापूर्वी डॉ. बाबा आढाव आधी त्याचा सविस्तर अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासुवृत्तीमुळे महाराष्ट्रातील नामांतर लढा किंवा एक गाव एक पाणवठा यांसारख्या अनेक प्रश्नांवर डॉ. बाबा आढाव यांनी निर्माण केलेल्या चळवळींना यश आल्याचे दिसते.

असंघटित असणाऱ्या कष्टकरी श्रमकरी जनतेचे नेतृत्व स्विकारून, त्यांच्यामध्ये संघर्षाची लढाऊ वृत्ती पेरण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबा आढाव यांनी केलेले आहे. परिवर्तन व बदल हे चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट असते, डॉ. बाबा आढाव यांनी सामाजिक क्षेत्रात परिवर्तनाची मागणी करत असताना सर्वसामान्यांना नवीन पर्याय दिले. या कृतीशील वृत्तीमधून डॉ. बाबा आढाव यांचा चळवळीकडे पहाण्याचा सकारात्मक भाव स्पष्ट होतो.

### ३.१७ संदर्भ सूची


१) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३

२) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २०१४, पृष्ठ, १३२.

३) कित्ता.

४) दैनिक बहुजन महाराष्ट्र, दिनांक, १ जून २०११, पृष्ठ – ४.

५) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.

६) दैनिक पुढारी, दिनांक, १६ मार्च २०१४, पृष्ठ, ४.

७) कित्ता.

८) कित्ता.

९) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.

१०) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, जाने ते मार्च १९७७ अंक १, वर्ष ३, पृष्ठ – ३.

११) आढाव बाबा, एक गाव एक पाणवठा, तृतीयावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, मे २००५, पृष्ठ, २४९.

१२) कित्ता.

१३) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २०१४, पृष्ठ, १९१.

१४) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.

१५) कित्ता.

१६) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, जाने ते मार्च १९८० अंक १, वर्ष ६, पृष्ठ – १.

१७) जोशी एस. एम., मी. अेस. अेम (आत्मकथा) तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३, पृष्ठ, ४०२.

प्रकरण चौथे

## संस्था व संघटनात्मक कार्य

| | |
|---|---|
| ४.१ | हमाल पंचायत |
| ४.१.१ | हमाल आणि पुना मर्चंटस यांच्यातील करार |
| ४.१.२ | कष्टाची भाकर |
| ४.१.३ | हमाल पंचायतीचे फायदे |
| ४.१.४ | हमाल नगर |
| ४.१.५ | हमाल भवन |
| ४.१.६ | हमाल मजुर सहकारी संस्था |
| ४.१.७ | भाऊभेट |
| ४.१.८ | हमाल पंचायतीचा स्वस्त दवाखाना |
| ४.१.९ | पुस्तक पेढी |
| ४.१.१० | कष्टकरी विद्यालय |
| ४.१.११ | स्त्री कामगार कल्याण योजना |
| ४.२ | राष्ट्रीय एकात्मता समिती |
| ४.२.१ | राष्ट्रीय एकात्मता परिषद |
| ४.२.२ | भारत–चीन युद्धात जवानांना मदत |
| ४.२.३ | श्री. संत लोंगोवाल यांना श्रद्धांजली |
| ४.२.४ | संवाद घडवण्याचे कार्य |
| ४.२.५ | भिवंडी दंगल |
| ४.२.६ | पूरग्रस्तांना मदत |
| ४.२.७ | हमालांकडून पोलीसांचा निषेध |
| ४.३ | हमाल माथाडी महामंडळ |
| ४.४ | रिक्षा पंचायत |

| | |
|---|---|
| ४.५ | टेम्पो पंचायत |
| ४.६ | सामाजिक कृतज्ञता निधी |
| ४.६.१ | कार्यकर्त्यांचे मानधन |
| ४.६.२ | सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे दिले जाणारे पुरस्कार |
| ४.७ | जागृत अपंग संघटना व बाबा आढाव |
| ४.८ | अंधश्रद्धा निर्मुलन समिती |
| ४.९ | रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्था |
| ४.१० | कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत |
| ४.११ | शेतकरी शेतमजुर पंचायत |
| ४.१२ | पथारी व्यावसायिक पंचायत |
| ४.१३ | बांधकाम कामगार पंचायत |
| ४.१४ | सामाजिक सुरक्षा कायदा |
| ४.१५ | मोलकरीण पंचायत |
| ४.१६ | विषमता निर्मूलन समिती |
| ४.१७ | निवृत्ती वेतनासाठी लढा |
| ४.१८ | समारोप |
| ४.१९ | संदर्भ सूची |

# प्रकरण चौथे

# संस्था व संघटनात्मक कार्य

## प्रस्तावना

बाबा आढावांनी स्थापन केलेल्या हमाल पंचायतीला साठ वर्षे झाली. त्यामुळे कष्टकऱ्यांच्या लढाऊ राजकारणाचा इतिहास प्राप्त झाला आहे. ही गोष्ट अतिशय महत्त्वपूर्ण आहे, परंतु समकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक–राजकीय इतिहासात या बाबीकडे निरनिराळ्या कारणांमुळे दुर्लक्ष झाले आहे.

पुण्यासारखा शहरात अंगमेहनतीचे काम करणाऱ्या, ठिकठिकाणांच्या बाजारपेठांमध्ये विखुरलेल्या हमालांचे संघटन पंचायतीने घडवले. गेल्या साठ वर्षांमध्ये हमाल पंचायतीच्या बरोबरच बाबा आढावांनी रिक्षा चालक, पथारीवाले, घरकामगार, बांधकाम मजुर, कचरा वेचक अशा असंघटित क्षेत्रांतील कोणत्याही कामगार वा सामाजिक सुरक्षा कायद्यांचे संरक्षण नसणाऱ्या वेगवेगळ्या गटातील कामगारांना एकत्रित करून शहरी गरिबांच्या एका नवीन राजकारणाचा प्रयोग सुरू केला. तसेच कष्टकऱ्यांच्या चळवळीला संस्थात्मक रूप देऊन चळवळ एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवली. संस्थापक दर्जा प्राप्त झाल्याने कष्टकऱ्यांना त्याचा फायदा झाला. त्यांना आपल्या समस्या सोडविण्यासाठी हक्काचे स्थान प्राप्त झाले. संस्थात्मक कार्य कामगार कष्टकऱ्यांना स्वाभिमानाने उभे करण्याचे माध्यम ठरवले. डॉ. बाबा आढावांनी निर्माण केलेल्या या संस्था खालीलप्रमाणे.

## ४.१ हमाल पंचायत

हमाल पंचायतीची स्थापना १९५५ मध्ये झाली. पंचायतीची स्थापना होण्यापूर्वी हमाल संघटित नव्हते. व्यापारी त्यांना काम देत परंतु त्यात सातत्य आणि शाश्वती नव्हती. कामाचे तास, कामाच्या वेळा, कामाच्या ठिकाणी किमान सोयी, मजुरीचे दर इत्यादी बाबत कोणतेच नियम नव्हते. शासनाचेही व्यापाऱ्यावर कोणतेच बंधन नव्हते. त्यामुळे व्यापारी हमालांस मुक्तपणे राबवून घेत. हमालांची संख्या मोठी होती. त्यामुळे अल्प मोबदल्यात त्यांना राबवून घेणं शक्य होते. मालकांची मर्जी राखण्यासाठी आणि मालकाने आपणालाच काम द्यावे यासाठी हमाल बरीच कामे फुकट करीत.

आपली संघटना व्हावी असे हमालांना पूर्वीपासून वाटत होते. त्याशिवाय आपले शोषण थांबणार नाही. याची त्यांना जाणीव होती. विविध क्षेत्रातील आणि शहरातील कष्टकऱ्यांना संघटना उपयुक्त ठरतात हा अनुभव दिसत होता. १९४८ मध्ये धुळे शहरातील बाजारपेठेत हमालांनी संप पुकारून आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडली. आणि महाराष्ट्रात हमालांची पहिली संघटना अस्तित्वात आली. खुद्द पुणे शहरात विडी कामगार आणि महापालिकेतील सफाईकामगारांनी आपापल्या संघटना स्थापन करून आपली परिस्थिती सुधारण्यात यश मिळविले होते. १९५४ चे सुमारास सफाई कामगार महिलांनी नऊ दिवसांचा संप पुकारून वेतनवाढ, बोनस आणि इतर काही फायदे पदरात पाडून घेतले. ''बाया कामगार आपली संघटित शक्ती दाखवून देतात; पण आपण का नाही?'' हा विचार हमालांच्या मनात येऊन गेला. परंतु संघटना कशी स्थापन करावयाची याची कल्पना नव्हती म्हणून काही प्रमुख हमाल कॉंग्रेसपक्षाच्या कार्यकर्त्यांकडे मार्गदर्शनासाठी गेले. त्यांना पक्षाच्या कचेरीत बोलविले परंतु तिथे बराच काळ त्यांच्याकडे कोणी पाहिना. ''आमचे घाणेरडे कपडे पाहून बहुदा आमची कोणी विचारपूस केली नसावी'' असे हमालांना वाटले सरेतेशेवटी 'हमालांची युनिअन होणार नाही : शॉप ॲक्टमध्ये तुम्ही बसत नाही'' इत्यादी बोलून त्यांची बोळवण झाली. हमालनेते नाराज होऊन परत आले. राष्ट्र सेवा दलाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी विचारून पाहिले. त्यांनी एस. एम. जोशी यांच्याकडे बोट दाखविले आणि एस. एम. जोशी यांनी डॉ. बाबा आढावाकडे जाण्यास सांगितले'[१].

एक तरूण डॉक्टर. कामगारांमध्ये काम करणारे, म्हणून नानापेठेत बाबा आढावांविषयी आदर होता. ते कामगारांसाठी वर्ग चालवित, वार्ताफलक लिहित, विकास व्याख्यानमाला चालवीत. त्यामुळे त्यांची कामगारांशी आणि हमालांशी बातचीत होत असे. हमालांचे काही पुढारी त्यांच्या बैठकांना उपस्थित राहत असत. हमालांनी संघटना स्थापन करण्याचे आपले मनोगत बाबा आढावांना सांगितल्यावर त्यांनी प्रथमतः हमालांच्या वारंवार बैठका घ्या असा सल्ला दिला. त्यातून त्यांची मानसिक तयारी होईल, आणि त्यांच्या समस्याही सविस्तरपणे पुढे येतील. यासाठी त्यांना एकत्रित येण्याचा सल्ला दिला.

१९५५ चे सुमारास हमालांच्या बैठकांना सुरूवात झाली. प्रथम प्रथम आठ–दहा हमालच येत होते. रात्री दवाखाना आटोपल्यानंतर तिथेच बैठका होत. पण हळूहळू उपस्थिती वाढत चालली तेव्हा दवाखान्याची जागा अपुरी पडू लागली. म्हणून डोके तालमीत बैठका भरू लागल्या. सुमारे ३०० हमाल हजर राहू लागले. हमालपंचायतीची रीतसर स्थापना झाली. तेव्हा जेमतेम १००–१२५ सभासद होते. मासिक वर्गणी दोन आणे होती. डॉ. बाबा आढाव अध्यक्ष झाले. त्यांना तीन हमाल मदतनीस म्हणून काम करू लागले. सहा महिन्यात सभासदांची संख्या सातशेपर्यंत गेली. नानापेठ, भवानीपेठ, गणेशपेठ आणि गुळआळी येथील हमाल सभासद झाले.

हमाल पंचायतीची स्थापना झाली तरी शासनाने आणि व्यापाऱ्यांनी त्याची दखल घेऊन हमालांच्या अडीअडचणी सोडविण्याची सुरूवात होण्यास बराच कालावधी लागला. अनेक प्रकारच्या संघर्षांना तोंड देत देत पंचायतीची मान्यता मिळवावी लागली. हमालपंचायत प्रथमतः धान्य बाजारात रूजली. नानापेठ, भवानीपेठ, गूळ आळी, तेल बाजार अशा पेठात धान्य, गूळ, तेल इत्यादी वस्तूंची बाजारपेठ आहे. १९६३ चे सुमारास शिवाजीनगर येथील गोदामात हमाल पंचायतीचे लोण पसरले आणि तेथील हमाल संघटितरित्या हमालपंचायतीत सामील झाले. १९६५ चे सुमारास टिंबरमार्केट आणि १९७० चे सुमारास मालधक्का येथील हमाल पंचायतीत आले. याप्रमाणे विविध वस्तूंच्या बाजारातील हमाल, हमाल पंचायतीच्या झेंड्याखाली एकत्रित आले. प्रथमच्या काळात हमालांत परस्परांत विश्वास निर्माण करून एकजुटीने काही किमान मागण्यांवर भर होता. ''फुकटचे काम करून घेऊ नका'' असा सर्वांना आग्रह होता. ''दामाशिवाय काम नाही'', ''आमच्या पाठीचे आम्ही मालक'', ''रात्री राबायचे नाही'' अशा घोषणांनी हमालांची मानसिक तयारी होत होती. परंतु केवळ घोषणा आणि उपदेश यांनी प्रगती होण्यासारखी नव्हती. संघटनेचे अस्तित्व प्रत्यक्ष कृतीने दिसणे आवश्यक होते.

'१९५६ च्या सुमारास सुमारे १२०० हमालांनी बाजारपेठ बंद ठेवून मिरवणूक काढली'[२] आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घातला. आपल्या मागण्या प्रगटपणे मांडण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. शेकडो बैलगाड्या, छकडे सजवून ही मिरवणूक काढली

होती. याच सुमारास पहिला मोठा सत्याग्रह झाला, त्याकाळात मालवाहतुकीसाठी छकड्यांचा (टांगे) वापर मोठ्या प्रमाणात होत असे. मालधक्क्यावर त्याकाळी सुमारे १३०० छकडे होते. टिंबरमार्केटमध्ये यापेक्षा अधिक छकडे होते. छकडे विकत घेण्यासाठी व्यापारी हमालांना कर्ज देत. कर्ज फेडण्याची कुवत नसल्यामुळे छकड्याची मालकी अप्रत्यक्षरित्या व्यापाऱ्यांकडेच होती. काही दुकानात मालकांचे छकडे होते. दिवसभर दुकानांत काम करून घ्यावयाचे त्यानंतर गिऱ्हाईकाचा माल पोचता करण्यासाठी खेपा करायच्या असा हमालांचा क्रम होता. छकड्यांची देखभाल, बैलांची वैरणचंदी यासाठी जो खर्च येई तो हमालास स्वत:च्या खिशातून करावा लागे. मालवाहतुकीसाठी निराळा मोबदला मिळत नव्हता. त्यामुळे हा खर्च हमालास पेलवणारा नव्हता. तसेच माल भरणे, उतरविणे इत्यादी कामाचाही निराळा मोबदला मिळत नसे. परंतु व्यापारी मात्र छकड्यातून केलेल्या वाहतुकीसाठी ग्राहकाकडून हमाली वसूल करीत. ती हमालांपर्यंत पोहचत नसे. ग्राहकाकडील हमाली वसूलीच्या रक्कमेतून दुकानाच्या व्यवस्थापनेचा सर्व खर्च मालक करीत व उरलेल्या रक्कमेतून हमालांना मजुरी मिळत तीही नाममात्र. हमाल वर्षाच्या पगारावर नेमलेले होते. आणि वर्षाचा पगार रूपये १,०००/- ते रूपये २,०००/- होता. ते ''कोरे'' हमाल होते. म्हणजेच त्यांना या रोख मजुरी व्यतिरीक्त जेवण, चहापाणी मिळत नसे. या उदाहरणावरून व्यापारी ग्राहकांकडून हमाली वसूल करीत. परंतु प्रत्येक हमालाच्या पदरात फारच थोडी रक्कम पडत होती आणि दुकानाचा खर्च भागून व्यापारी हमाली पोटी जमा झालेल्या रकमेतील मोठा वाटा घेत होते. ही प्रथा सर्वत्रच अस्तित्वात होती. आपले शोषण होत आहे याची जाणीव हमालांना होती. तरीही त्या विरूद्ध आवाज उठवणे हमालांना शक्य झाले नाही. पंचायतीच्या स्थापनेनंतर अशा प्रथांचा विचारविनिमय होऊ लागला. ''आम्ही मालकांचे टांगे चालवणार नाही.'' ही वरील सत्याग्रहाची सूचना होती. भरलेल्या गाड्यांपुढे आडवे पडून हमालांनी सत्याग्रह केला. ज्या व्यापाऱ्याविरूद्ध हा सत्याग्रह झाला, त्याच्याकडे सहा छकडे आणि बावीस पगारी हमाल होते. छकड्यापुढे बाबा आढावांच्या मार्गदर्शनानुसार हमाल गटागटाने आडवे पडून सत्याग्रह करीत होते. प्रत्येक वेळेस पोलीस त्यांना पकडून रस्ता मोकळा करीत होते. छकडा चालवण्यास पगारी हमालांनी नकार दिला. तेव्हा खुद्द व्यापारीच छकडा चालवू पहात होता. सहावेळा असे

झाले तेव्हा मालकांनी नाद सोडला. शेवटच्या तुकडीतील सुमारे ७० हमालांना सहा दिवस पोलीसकस्टडीत रहावे लागले. त्या आधीच्या हमालांना दूर नेऊन त्याच दिवशी सोडले होते. व्यापाऱ्यांनी सत्याग्रहात सामील झालेल्या हमालांना रूपये दोन प्रमाणे मजुरी देऊ केली. हमालांनी पैसे घेण्यास नकार दिला.

मुकादमामार्फत हमालांना कामे देण्याची प्रथा होती. हे मुकादम मालकाची बाजू घेत. त्यांना पगार मात्र रोजच्या हमालीवाटणीतून द्यावा लागे. ही प्रथा मोडण्यासाठीही हमालपंचायतीने मोहीम हाती घेतली. ही प्रथा मोडून काढण्याचे प्रयत्न झाले. तरी पंचायतीची व्यापारीवर्गाला दखल घेणे भाग होते, कारण हमालांशिवाय बाजारपेठ चालणे शक्य नव्हते. त्यामुळे अशा लहान मोठ्या झगड्यातून पंचायतीला मान्यता प्राप्त होत गेली. १९७० चे सुमारास ४० व्यापाऱ्यांची नाकेबंदी करून पंचायतीने हमालांची नेमणूक आणि कामावरून काढून टाकण्याच्या व्यापाऱ्यांच्या सत्तेवर बाबा आढावांनी नियंत्रण आणले. आणि मजुरीचे दर ठरविण्याबाबत पंचायतीशी वाटाघाटी करण्यात व्यापाऱ्यांना बाबा आढावांनी भाग पाडले.

या दीर्घकालीन झगड्याचे दोन प्रमुख फायदे झाले. व्यापाऱ्यांना हमाल पंचायतीच्या संमतीशिवाय हमाल नेमणे, अगर काढून टाकणे अशक्य झाले. हा सर्वांत महत्त्वाचा फायदा मानावयास हवा. पंचायतीचा प्रभाव प्रस्थापित होण्यास त्यामुळे मोठी मदत झाली. कोणत्याही व्यापाऱ्यास किती हमाल हवेत हे ठरविण्यातही पंचायतीने पुढाकार घेतला. काही कारणांसाठी अधिक हमाल हवे असल्यास, किंवा ठरलेला हमाल गैरहजर असल्यामुळे त्यांचे जागी बदली हमाल हवा असल्यास, व्यापाऱ्यांना आज पंचायतीच्या कार्यकर्त्यांशी बोलून तरतूद करावी लागते. हा नियम आज संपूर्ण बाजार पेठेत लागू आहे. नानापेठ, भवानीपेठ, गणेश पेठ, गूळ आळी, रविवार पेठेतील काही भाग हे बाजारपेठ म्हणून ओळखले जातात. पुण्यातील व्यापारी वर्ग प्रामुख्याने या विभागात होता आणि आजही मोठ्या प्रमाणात आहे. या बाजारपेठेत पंचायतीचा प्रभाव स्पष्ट दिसतो. 'पंचायतीच्या नियंत्रणासंदर्भात बाबा आढाव यांनी सांगितले, 'बाजार पेठेत हमाली काम पंचायतीच्या अनुमतीनेच मिळू शकते. मुकादमाचे पूर्णपणे उच्चाटन झाले आहे. हमाल नेमणे अगर काढणे पंचायतीच्या संमती शिवाय व्यापाऱ्यांना

शक्य होत नाही. हमाल पुरवठ्यावर पंचायतीचे नियंत्रण आज दीर्घकाळ म्हणजे सुमारे किमान ५० ते ५२ वर्षे आहे'[३].

दुसरा महत्त्वाचा फायदा मजुरी दरातील वाढ आणि त्याबाबतीत व्यापारी संघटना आणि हमाल पंचायत यांच्यात दर तीन वर्षांनी करार करण्याची पद्धत रूढ झाली. मजुरीच्या दराबाबत व्यापाऱ्यांनी पंचायतींशी चर्चा करावी ही कल्पना १९५६ पासून बाबा आढाव मांडत होते. प्रत्यक्ष वाटाघाटी आणि समझोता होण्यास १९६८ साल उजाडले. दरम्यानच्या काळात अस्तित्वात असलेले मजुरीचे दर थोड्याफार फरकाने पक्के होत गेले. मजुरीचे दर काय असावेत हे ठरविण्यास बाबा आढावांच्या अध्यक्षतेखाली हमालांच्या बैठकातून होणाऱ्या चर्चेचा उपयोग झाल्याचे दिसते. या बैठकांतून व्यापाऱ्यांकडे कराव्या लागणाऱ्या कामांचे तपशीलवार वर्णन करणे याला महत्त्वाचे स्थान होते. त्यास ''रिवाज'' म्हणत हमालांनीच आपल्या मालकाच्या दुकानावरील रिवाज सविस्तर सांगायचा. रिवाज कथनाचे दोन प्रमुख फायदे झाले. हमालीकामाचे तपशीलवार प्रकार स्पष्ट झाले. प्रत्येक तऱ्हेच्या कामात काय कष्ट पडतात, काय कौशल्ये लागते, किती वेळ लागतो इत्यादी तपशील उपलब्ध झाल्याने, कामाचे वर्गीकरण करून त्याप्रमाणे कष्टाचा मोबदला ठरविणे सोपे झाले. दुसरा फायदा असा की, अनेक प्रकारची मोफत करावी लागणारी कामे उजेडात आली. आणि हमाल आपल्या शोषणाची चिकित्सा करण्यास प्रवृत्त झाले. मालाची गाडी आली की, माल उतरून दुकानात नेणे, थप्प्या लावणे, पाला करणे, गट लावणे, एका ठिकाणी फार दिवस पोती ठेवणे इष्ट नसल्याने ती दुसरीकडे हलविणे, ग्राहकांना नमुना दाखविण्यासाठी कोठीतून दुकानात पोती आणणे, कवटा धरणे, भराई, वाहतूक अशी अनेक प्रकारची कामे कोणत्याही मोबदल्यावाचून करावी लागत. ''नमूना दाखविणे'' यातील १०० पोत्यांमागे ६ पोती उचलावी लागत. कोठ्या कोठ्यापासून दुकानापर्यंत ५०० ते १००० फूट पोती पाठीवर न्यावी लागत. ही सर्व अंग मेहनतीची कामे फुकट करावी लागत. याशिवाय बैलांची देखभाल करणे, गोठा साफ करणे, दुकानात राखण करण्यासाठी राहणे, वसुलीसाठी तगादा लावणे आणि मालकाच्या घरी पडेल ते सर्व काम करणे. ही कामेही विना मोबदला करावी लागत.

''रिवाज'' कथनाच्या बैठकात हमाल प्रथम प्रथम बोलण्यास राजी नव्हते. त्यांच्या मनात भीती होती की मालकांच्या कानावर गोष्टी जातील आणि आपले हातचे काम आणि मिळकत संपुष्टात येईल. परस्परांविषयी विश्वासाचा अभाव हे भीतीचे प्रमुख कारण होते. मजुर पुरवठा मागणीच्या मानाने अनेक पटीने अधिक असल्याने दुसऱ्याचे काम ओढून घेण्याकडे साहजिक प्रवृत्ती होती. ''थोडे घरचे काम केले तर काय बिघडले? घरच्या प्रत्येक कामाचे कसे मोजमाप करता येईल?'' अशीही भावना हमालामध्ये असायची. या परिस्थितीत कामावर ठेवणे काढणे या मालकाच्या हक्कावर नियंत्रण आल्यानंतरच ''दामाशिवाय काम नाही'' या तत्वाची अंमलबजावणी करणे आणि मजुरीच्या दराबाबत विचारविनिमय वाटाघाटी करण्यास व्यापारीवर्गास भाग पाडणे शक्य झाले.

१९६२ पासून पंचायतीच्या कामाला गती आली. हमालांच्या मनातील भीती जाण्यास सुरूवात झाली. १९६८ चे सुमारास हमालपंचायत खंबीर पायावर उभी राहिली. असे म्हणावयास हरकत नाही. ''शेवटचा टांगा चालवायचा नाही'', या तत्वाची अंमलबजावणी यशस्वीरित्या झाली. त्याचा परिणाम शेटजींनी टांगे काढून टाकण्यात झाला. आज व्यापाऱ्यांजवळ टांगे नाहीत. हमालांच्या मालकीचे सुमारे ४०० छकडे आणि ४०० हातगाड्या आहेत. बाबा आढावांमुळे हमालाच्या हाती एक उत्पन्नाचे साधन आले.

'१९६८ चे सुमारास ३००० हमालांनी ४० दिवसांचा संप केला'[४]. बाजारपेठेतील हमाल यांत सामील झाले. त्यामुळे बाजारपेठेतील व्यवहार थंड झाले. संप फोडण्यासाठी व्यापाऱ्यांनी मुंबईहून हमाल आणले. ''पुण्यात हमाल कमी आहेत. म्हणून तुम्हास कायम स्वरूपाचे काम मिळेल'' असे सांगून सुमारे ४० हमाल मुंबईहून आणले. त्यांना एका धर्मशाळेत ठेवले होते. पंचायतीच्या सभासदांनी त्यांना खरी परिस्थिती समजावून सांगितली. तेव्हा एका दिवसातच मुक्काम आटपून हे लोक व्यापाऱ्यांकडून प्रवासखर्च घेऊन परत गेले.

### ४.१.१ हमाल आणि पुना मर्चंट्स यांच्यातील करार

हमालांच्या मजुरीचे दर पक्के होत गेले तरी पहिला अधिकृत करार १९६८ मध्ये झाला. हा पहिला करार हमाल पंचायत आणि व्यापाऱ्यांची ''पूना मर्चंट्स चेंबर'' या दोहोंत झाला. हमाल आणि व्यापारी या दोघांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन एकूण १५ नियम आणि ४६

प्रकारच्या हमालीचे दर मान्य करण्यात आले. हमाल आणि व्यापारी या दोघांच्याही सोयींचा विचार यामध्ये झाला आहे. एखाद्या व्यापाऱ्याकडे किती हमाल असावेत हे ठरविणे आणि ते पुरविणे हा अधिकार पंचायतीकडे आला.

दुकानातील उलाढाल आणि हमालांना मिळणारे अंदाजे उत्पन्न यांचा विचार करून हमालांची संख्या ठरविण्याचे तत्व मान्य झाले. आणि त्यासंबंधी व्यापारी आणि पंचायत या दोघांत मतभेद झाल्यास समन्वय समितीने निर्णय घेण्याचे उभयतांनी मान्य केले. एखाद्या वेळेस काम अचानक जास्त आले, किंवा ठरविलेला हमाल गैरहजर असला तर व्यापारी फिरत्या हमालांकडून काम करून घेऊ शकतो. परंतु असा हमाल पंचायतीचा सभासद असलाच पाहिजे. हमाल वेळेवर हजर नाही म्हणून कामाची खोटी होणार नाही याची जबाबदारी पंचायतीने स्वीकारली. हमालाने कामचुकारपणा करू नये, कामात खंड पडू देता कामा नये, गैरवर्तन करू नये इत्यादी बंधने हमालांनी मान्य केली. हमालांच्या मागण्यांसाठी किंवा इतर राजकीय कारणांसाठी हमालांना संपावर जायचे झाल्यास हमालांनी व्यापाऱ्यांना ४८ तासाची नोटीस देण्याचे कबूल केले. हमालांना सामाजिक, राजकीय चळवळीत भाग घेता यावा या दृष्टीने ही तरतूद आहे. हमाली कामात लहान मुलांचा वापर व्यापाऱ्यांनी करता कामा नये. असेही बंधन या कराराने व्यापाऱ्यांवर घातले आहे.

हमाली कामातील काही अडचणींचा उल्लेख करून त्यावर निर्णय या करारात घेतले गेले. उदाहरणार्थ, हमालाने वाहून नेलेला माल, हमालाचा कोणताही दोष नसताना ग्राहकाकडून तसाच परत आणावा लागला, तर हमालाला परतीचे भाडे मिळाले पाहिजे. जीना चढून माल न्यावयाचा असल्यास, तसेच खराब रस्ते, अपुरा प्रकाश अशा परिस्थितीत माल वाहून न्यायचा असल्यास, किंवा रस्त्यापासून २०० फुटापेक्षा जास्त आत माल न्यायचा असल्यास, १५–१६ फुटांपेक्षा जास्त उंच असलेल्या गोदामात काम असल्यास मजुरीचे दर समन्वय समितीने ठरवायचे आहेत. बाजाराच्या वेळा सामान्यपणे सकाळी ८.३० ते रात्री ८.३० अशा ठरल्या. एकूण ४६ प्रकारच्या हमालीचे स्वतंत्रपणे दर ठरले. या करारातच दलाल पद्धतीबाबतचे नियम निश्चित करण्यात आले. आणि दलालांच्या संघटनेने ते मान्य केले.

दि पुना मर्चंट्स चेंबर (भवानी पेठ) यांच्याशी वरील करार झाल्यानंतर दोन महिन्याचे आत इतर व्यापारी संघटनांशी अशा शर्तीवर करार झाले. त्यासाठी फारसे झगडावे लागले नाही. बाबा आढावांनी एकूण बारा व्यापाऱ्यांच्या संघटनांशी करार केले. हमालीचे दर ठरविताना खालील तीन प्रमुख गोष्टी लक्षात घेतलेल्या दिसतात.

१) वस्तूचा प्रकार, वजन, त्यापासून आरोग्यास होणारे अपाय.

२) कामाचा प्रकार उदा. उतराई, भराई, गोलाई, गट लावणे, थप्पी लावणे, पलटाई, पाला करणे इ.

३) वजन घेऊन चालावे, चढावे व उतरावे लागणारे अंतर सप्टेंबर १९८४ मध्ये पाच धर्तीवर करार झाले. दि. पुना मर्चंट्स चेंबरशी झालेल्या करारात सुमारे १० प्रकारच्या नवीन हमाली कामांची भर पडली. नियमही अधिक तपशीलवार ठरले. प्रत्येक हमालाला दरपत्रकाची छापील पुस्तिका दिली आहे त्याप्रमाणे तो हमाली घेऊ शकतो. हमाली दराबाबत आता तंटेबखेडे, घासाघासी होताना दिसून येत नाही. दोनही पक्षांनी ही पद्धत मान्य केली आहे.

या पद्धतीनुसार तीन वर्षांनंतर कराराचा फेर आढावा घेणे. तत्कालीन वेळेची महागाई लक्षात घेवून दरवाढ करणे असा विचार या करारामध्ये करण्यात आला.

डिसेंबर १९८५ पासून वर्कसन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट चे फायदे हमालांना मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. डिसेंबर १९८५ मध्ये एक हमाल काम करताना मृत्यू पावला व दुसरा जखमी झाला. दोघांना अनुक्रमे ८,०००/- व रूपये २,०००/- नुकसान भरपाई मिळाली. ड्रायव्हर, क्लिनर आणि पाच हमाल यांचा विमा उतरविण्याची ट्रक मालकांवर जबाबदारी आहे. पण या नियमांची अंमलबजावणी होत नाही. बाबा आढाव अनेक वर्षे या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करीत आहेत.

या हालचालींमुळे हमालांना केवळ दरवाढच मिळवून देण्याचे काम बाबा आढाव करीत नसून त्यापेक्षा अधिक गुणात्मक बदलही घडवून आणलेला आहे असे दिसते.

हमाल पंचायतींच्या चळवळीला आलेल्या यशामुळे बऱ्याच हमालांना पगारी नोकरीपेक्षा कामानुसार वेतनपद्धती अधिक आवडू लागली आहे. पगारी नोकरीत अमर्याद कष्ट आणि

मालकाची मर्जी राखण्यासाठी लाचारी, याउलट रोजची हमाली करून त्याची मजुरी घेण्याचे स्वत:चे स्वातंत्र्य राखता येते. लाचारीचे जीवन सोडता येते. अधिक कमाईची शक्यता वाढते. हमाल या नोकरीपेक्षा रोजची मजुरी पसंत करतो. याचा महत्त्वाचा फायदा असा आहे की हमालांना कोणत्याही चळवळीत भाग घेणे शक्य होते. मालकाचे दडपण राहत नाही. हमाल पंचायतीचे प्रमुख उद्दिष्ट्ये लक्षात घेता हमालांना मिळालेला हा फायदा महत्त्वाचा आहे.

१९८४ साली हमाल पंचायतीच्या एकूण सभासदांची संख्या ३,१०० होती. १९८० मध्ये २,३९३ होती. नोंदणी झालेले ३५०० हमाल आहेत. दरवर्षी सभासदांची संख्या वाढत आहे. आज पंचायतीच्या कारभार पाहण्यासाठी १९ पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत. यातच डॉ. बाबा आढाव यांचा समावेश होतो. या १९ मधील १० कार्यकर्ते सोडल्यास उरलेले सर्व हमाली काम करणारे असल्याचे क्षेत्रभेटीत निदर्शनास आले.

जास्तीत जास्त मानधन रूपये १२०००/- आहे. आणि कमीत कमी रूपये ५०००/- आहे. परंतु सर्वसाधारणपणे रूपये ५०००/- दरमहा मानधन कार्यकर्त्यांना मिळते. सभासद वार्षिक फी रूपये ३३०/- आहे. १९८५ सालपर्यंत फी ३० रूपये होती. त्यात १९८६ मध्ये ६ ने वाढ करण्यात आली. सभासद फी रूपये १८ वरून रूपये २४/- करण्यात आली. भाऊभेट रूपये २ वरून १/- करण्यात आली. तर दवाखाना फी रू.१ ने वाढविली. आज हमाल पंचायत अध्यक्ष निधी रू. १०/-, कष्टकरी विद्यालय निधी रू. ५०/-, वाहन निधी रू. १००/-, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी मंडळ वर्गणी रू. १०/- असे एकूण प्रत्येक हमालाकडून प्रत्येक वर्षी रू. ५००/- घेतले जातात.

हमाल पंचायतीच्या दैनंदिन कामासाठी १४ समित्या नेमल्या आहेत. त्यातील ८ पेठवार - गणेशपेठ, गुळ आळी, नानापेठ, भवानी पेठ, सोन्यामारूती चौक, मालधक्का, चिंचवड मालधक्का, रविवार पेठ आणि ६ विषयवार - वाहतूक विभाग, कष्टाची भाकर, बारदान विभाग, भंगार विभाग, लोखंड विभाग खरेदी विभाग आहेत. सर्व समित्या मिळून सभासदांची संख्या ६४ असून त्यातील १० स्त्रिया आहेत. हे सर्व सभासद रोजचे रोज हमाली काम करून आपला उदरनिर्वाह करतात. ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. या समित्यांच्या स्वतंत्रपणे बैठका होतात आणि त्यांचे कामकाज अनौपचारिकरित्या होते. तातडीचे प्रश्न जेव्हा

उपस्थित होतात तेव्हा समित्यांचे सचिव बैठक बोलवतात किंवा सभासदांशी चर्चा करतात. अनौपचारिक आणि नियमितपणे तीन समित्यांचे कामकाज चालते. पहिली सचिव मंडळाची समिती या मंडळात पंचायतीचे अध्यक्ष, तीन उपाध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, चार जॉईंट सेक्रेटरी, खजिनदार, दोन संघटक आणि सर्व सभापती (समित्यांचे सचिव) यांचा समावेश आहे. महिन्यातून एकदा या समितीची बैठक होते आणि हमालांच्या सर्व प्रश्नांवर विचार विनिमय होतो. विशिष्ट समितीच्या कक्षेतील प्रश्नांवर निर्णय घ्यायचा असल्यास त्या समितीच्या सल्ल्यानुसार निर्णय घेतला जातो.

तक्रार अर्ज समिती ही दुसरी समिती. हमालांच्या दैनंदिन प्रश्नांच्या संदर्भात ही समिती महत्त्वाची आहे. सर्व सचिव आणि इतर पदाधिकारी या समितीचे सभासद असतात. सर्वसाधारण हमाल सभासदांनाही या समितीच्या बैठकीस उपस्थित राहता येते. आठवड्यातून एक दिवस बैठक भरते. त्यात व्यापारी आणि हमाल यांच्याकडून आलेल्या तक्रारींचा ऊहापोह होतो. बैठकीला सुमारे ५० ते ७० हमाल उपस्थित असतात. आणि महिन्याकाठी सुमारे ५० तक्रारी अर्ज येतात. व्यापाऱ्यांकडून प्रामुख्याने हमालांचा कामात कामचुकारपणा, दिरंगाई, गैरहजेरी, न विचारता निघून जाणे. इ. प्रकारच्या तक्रारी असतात. या उलट हमालांमार्फत मालकाने शिवीगाळ करणे, काम देण्याचे नाकारणे, हमाला हमालात भांडण लावून देणे, कराराप्रमाणे मजुरी न देणे, मजुरी देताना हमालांत भेदभाव करणे अशा तक्रारी असतात.

हमाल पंचायतीच्या सहकार्याखेरीज हमालांना कामावरून काढणे अगर नवीन हमाल नेमणे शक्य नसल्याने व्यापाऱ्यांना तक्रारी अर्ज समितीकडे म्हणजे पर्यायाने हमाल पंचायतीकडे धाव घ्यावी लागते. आणि आपले गाऱ्हाणे मांडावे लागते. हा हमालांच्या एकजुटीचा विजय मानावयास हवा. अर्थात यामुळे तक्रार समितीची जबाबदारी वाढते. एकतर्फी निर्णय होऊन पंचायतीची प्रतिष्ठा वाढणार नाही. पंचायतीचे नेते या बाबतीत समितीला बुद्धीचे, जाणकार आहेत असे दिसून आले. दोनही बाजू ऐकून घेऊन योग्य निवाडा दिला जातो, व्यापारी आपली बाजू मांडतात, पुरावा सादर करतात, हमालांची चूक दिसून आल्यास हमालास दिलगीरी व्यक्त करावी लागते, त्यास समज दिली जाते, काही प्रकरणात हमालांना शिक्षाही दिली आहे. एकदोन दिवस हमाल पंचायतीच्या कचेरीत बसून राहणे, दंड भरणे

इत्यादी प्रकारची शिक्षा दिली जाते. मालकाची चूक आहे असे दिसून आल्यास मालकास दिलगीरी व्यक्त करावी लागते. तसे न केल्यास त्याच्या दुकानावर हमालांचा बहिष्कार पडतो. दिलगीरी व्यक्त करेपर्यंत दुकान बंद राहिल्याची उदाहरणेही ऐकायला मिळतात. तक्रार करून सुनावणीच्या वेळेस हजर न राहिल्यास पुढच्या बैठकीत पुन्हा विचार होऊ शकतो. तीनवार कारणे न देता गैरहजर राहिल्यास एकतर्फी निवाडा दिला जातो.

गेल्या काही वर्षाच्या अनुभवावरून असे दिसते की, तक्रार येण्याचे प्रमाण कमी होत आहे. करार तपशीलवार होत असल्याने आणि उभयपक्षांनी तो स्विकारल्याने भांडणतंट्याचे कारण उरत नाही. पंचायतीने न्याय बुद्धीने निर्णय ऐकण्याची तयारी दाखविली हे सुद्धा या यशाचे एक महत्त्वाचे कारण आहे.

मध्यवर्ती समिती ही तिसरी समिती. हमाल पंचायतीमध्ये सर्वोच्च अधिकार या समितीला आहेत. सचिव, कष्टाची भाकर, केंद्राचे पदाधिकारी, विभागीय समितीचे सभासद असे सर्व मिळून निवडून आलेले हमाल सभासद या समितीचे सभासद आहेत. पंचायतीचे धोरण ठरविणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. इतर समित्यांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणे हेही एक काम आहे.

समन्वय समिती हमाल आणि व्यापारी यांच्यातील संबंध सुधारणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे.

हमालांच्या संघटनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य येथे नमूद करावयास हवे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी होऊन परिवर्तनाची प्रक्रिया योग्य दिशेने आणि जलद गतीने पुढे रेटणे हे हमाल पंचायतीचे एक प्रमुख उद्दिष्ट असल्याने, अनेक हमाल अशा चळवळीत भाग घेतात. अशा चळवळीत सहभागी होणाऱ्या हमालांच्या कुटुंबियांना आर्थिक झळ सोसावी लागते. कारण बऱ्याच वेळा हमालांना कारावास भोगावा लागतो. किमान एक–दोन दिवसांची कमाई गमवावी लागते. अशाप्रसंगी चळवळीत सहभागी होणाऱ्या हमालाच्या घरी त्याच्या कमाईचा वाटा अगर धान्याने काही मदत पोहचती करण्याची प्रथा हमाल पंचायतीने रूजविली. ज्या टोळीमध्ये हमाल काम करतो त्या टोळीतील हमाल अशा हमालांच्या वाटेला

येणारी मजुरी घरपोच करतात. या प्रथेमुळे हमालांची एकजूट बळकट होण्यास मदत झाली. त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत हमालांना भाग घेणं शक्य झालं.

वर्षाकाठी १०० ते १५० नवीन हमालांची भरती होते. जुने निवृत्त होतात, किंवा इतर कारणांमुळे नवीन हमालांची गरज निर्माण होते. हमाल पंचायतीकडे हमाली काम करू इच्छिणाऱ्यांकडून अर्ज येतात. त्यात बहुधा जुन्या सभासदांचे नातेवाईक, गाववाले इत्यादींचा भरणा असतो. अर्ज आल्याच्या तारखेप्रमाणे क्रम लावतात आणि त्याप्रमाणे भरती होते. हमाल पंचायतीचे सदस्यत्व त्यांना स्विकारावे लागते.

### ४.१.२ कष्टाची भाकर

हमालांच्या गरजेतून आकारास आलेला हा एक उपक्रम आहे. हमालांचे कामाचे तास काटेकोरपणे निश्चित करता येत नाहीत. काम असेल तेव्हा भरपूर असते. आणि ते संपेपर्यंत घरी जाणे शक्य नसते. काम नसेल तेव्हा कामाची अपेक्षा करीत ताटकळत बसावे लागते. घर कामाच्या ठिकाणाहून बरेच दूर असते. या परिस्थितीत कामाच्या ठिकाणी अगर जवळपास पोट भरण्याची सोय आवश्यक आहे. खाजगी हॉटेल जागोजाग आहेत. परंतु तिथे मिळणारे पदार्थ केवळ जिभेचे चोचले पुरवणारे आणि बहुतांशी प्रकृतीस अपायकारक असतात. शिवाय त्यासाठी पैसेही फार लागतात. केवळ सकाळची न्याहरी करावयाची म्हटले तरी त्यासाठी त्याकाळी सहजपणे पाचसहा रूपये लागत होते. जेवण घेतले तर जास्तच खर्च होतो. हमालांना हे परवडणारे नव्हते.

हमालांची गरज स्वस्त आणि पौष्टिक आहार मिळणे ही आहे. ही गरज भागवण्यासाठी ''कष्टाची भाकर'' हा उपक्रम हमाल पंचायतीने हाती घेण्याचे ठरविले. सकस, स्वच्छ आणि भरपूर आहार हमाल आणि इतर गरीब कष्टकऱ्यांना मिळावा आणि तोही त्यांच्या खिशास परवडेल अशा किंमतीत, ही त्या पाठीमागची भूमिका आहे. समान पातळीवरील कष्टकरी एकमेकांना एका महत्त्वाच्या क्षेत्रात मदत करू शकतात, हे सिद्ध करणे आणि या मार्गे कष्टकऱ्यांच्या एकजूटीला चालना देणे. हेही या उपक्रमात अभिप्रेत आहे. शहरातील आणि परगावच्या वंचित गरीबवर्गात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मेळावे हमाल भवनात भरतात, तेही माफक दरात जेवण पुरवण्याची जबाबदारी या केंद्राने सातत्याने पार पाडली आहे. हमाल

पंचायतीला नफा मिळवून देण्याचे साधन म्हणून त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करावयाचा नाही असे प्रथमपासूनच ठरले. ''कष्टाची भाकर'' संस्थेची लोकप्रियता पाहिली तर असे दिसून येते की पैसा मिळवण्याचे साधन म्हणून तिचा उपयोग सहजपणे होऊ शकेल. परंतु आपल्या मूळ भूमिकेशी कार्यकर्त्यांची निष्ठा कायम आहे आणि म्हणून नफ्याचे प्रमाण किमान ठेवून व्यवहार चालू आहेत.

'१९७५ च्या नोव्हेंबर महिन्यात 'कष्टाची भाकर' उपक्रमाला सुरूवात झाली. महानगरपालिकेकडून सध्या हमाल पंचायतीची कचेरी असलेली जागा ९९ वर्षाच्या कराराने मिळाली'[५]. सुरूवातीच्या काही दिवसात लापशी आणि गूळ देण्यात येत असे. थोड्याच दिवसात पाच स्त्रियांच्या मदतीने भाकरी करून विकण्यास आरंभ झाला. जानेवारी १९७६ मध्ये रोजचे रोज चार पाच किलो धान्य दळून आणून भाकरी आणि बेसन विकत होते. त्यावेळी भाकरी (सुमारे १५० ग्रॅम) रूपये ०.३० आणि बेसन (एक मोठा द्रोण भरून, सुमारे २०० ग्रॅम) रूपये ०.२५ ला आणि या काही महिन्यात एकूण खर्च सुमारे रूपये १००/- चा व्हावयाचा. भाकरी अगर पोळी (सुमारे ९५ ग्रॅम) रूपये ०.५० आणि भाजी रूपये ०.५० अशा किंमती होत्या. याशिवाय शिरा, जिलेबी व भजी हे पदार्थ अनुक्रमे रूपये ७.५०, १०.००, १५.०० किलो याप्रमाणे विकत दिले जात असत. भाजीमध्ये प्रामुख्याने उसळी असत. 'हमाल सर्वसाधारणपणे एका वेळेस दोन किंवा तीन भाकरी खातो. म्हणजेच त्याचे पूर्ण जेवण फक्त दीड ते दोन रूपयात होत असते. एवढ्या पैशात हॉटेलमध्ये हमालांची ही भूक निम्म्याने देखील भागणार नाही'[६].

हमालाला स्वस्तात आणि सकस अन्न पुरवणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. कष्टाची भाकर केंद्रात मिळणारे पदार्थ यांची व हॉटेलमध्ये मिळणाऱ्या पदार्थांच्या किंमतीशी तुलनाच करता येणार नाही. कारण हे पदार्थ सामान्यपणे हॉटेलमध्ये मिळत नाही. हॉटेलमध्ये इडली, डोसा, थालीपीठ असे पदार्थ मिळतात ते महाग असतात. आणि हमालांचे पोट भरण्यास अपुरे पडतात. खाणावळीतील मर्यादीत थाळींची किंमतही या केंद्रावर मिळणाऱ्या जेवणाच्या किंमतीच्या तिप्पट पडते. शिवाय मर्यादीत थाळी हमालांचे पोट भरू शकत नाही. अमर्यादीत थाळीही अपुरी पडते. खाणावळीत हमालांना जेवण देण्यास मालक राजी नसतात. कारण

हमालांचा आहार सामान्यपणे सामान्य ग्राहकाच्या आहाराच्या दुप्पट असतो. खाणावळ चालवणाऱ्यांना ठराविक रकमेत हमालांना जेवण देणे परवडत नाही.

'दि.२५/०१/२०१४ रोजी दिलेल्या क्षेत्र भेटीत हमाल पंचायतीच्या कष्टाच्या भाकरीमध्ये खालीलप्रमाणे दर पहायला मिळाले'[७].

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाकरी | – | १ नगास | – | ६ रूपये |
| चपाती | – | १ नगास | – | ४ रूपये |
| बेसन | – | १५० ग्रॅम | – | ४ रूपये |
| सुकी भाजी | – | १५० ग्रॅम | – | ६ रूपये |
| भजी | – | १०० ग्रॅम | – | १० रूपये |
| जिलेबी | – | १०० ग्रॅम | – | ८ रूपये |
| पोहे | – | २०० ग्रॅम | – | १० रूपये |
| साधा भात | – | २०० ग्रॅम | – | ६ रूपये |
| लाडू | – | १०० ग्रॅम | – | १० रूपये |

हे दर सामान्य माणसाला परवडणारे असे आहेत. बाहेरील हॉटेलमधील दर हे या दरांपेक्षा तिप्पट आहेत. बाहेरील हॉटेलमधील जेवण सामान्य माणसाला परवडणारे नाही.

कष्टाची भाकरी केंद्रास एकूण ११८ फूट लांब आणि ४२ फूट रूंद जागा उपलब्ध झाली. सुरूवातीला ११० स्त्रिया ४४ पुरूष कामावर होते. कामाचे तास सकाळी ६.३० ते दुपारी ४.३० होते. दुपारी २ तास विश्रांती होती. केंद्रात कोळशावर चालणाऱ्या सहा आणि रॉकेलवर चालणाऱ्या साठ शेगड्या आहेत. गॅसचा वापर होत नाही. साधारणपणे एक कामगार दिवसाकाठी २५० चपात्या करू शकतो रोजचा खप सुमारे ११,०००/– रूपये होता. आज २०१४ साली दिवसाला ७ ते ८ हजार चपाती बनते. ३ ते ३.५ हजार ज्वारीची भाकरी बनते. साधारणपणे एका किलोमध्ये १४ चपात्या बनतात व एका किलोमध्ये सात भाकरी बनतात.

'गरजू हमालांच्या बायका, विधवा यांना प्रामुख्याने केंद्रात काम दिले जाते. सुमारे २५ टक्के स्त्रिया दलित समाजातील आहेत. काही मुसलमान स्त्रियाही कामावर आहेत. यांचे रोजचे सरासरी वेतन २०० रूपये आहे. याशिवाय वर्षाकाठी १२.५० टक्के बोनस मिळतो. दिवाळीची

भेट म्हणून वस्तू मिळते. ८.२५ टक्के प्रॉव्हिडंट फंड जमा होतो. आठवड्याला एक दिवस व वर्षाला २४ दिवस पगारी सुट्टी मिळते. याशिवाय सकाळची न्याहरी, चहा आणि दुपारचे जेवण मिळते. हमाल पंचायतीच्या दवाखान्यात औषधपाणी मोफत मिळते''[८]. अल्पबचत योजना सुरू केली असून त्याचा उपयोग कामगारांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी होतो. कामगारांची अधूनमधून सहल काढण्यात येते. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर केंद्रातील कामगारांना योग्य वेतन आणि चांगली वागणूक मिळते असे दिसून येते.

हमालांना न्याय मिळाला. एखादा हमाल गेला तर त्याच्या बायकोला काम मिळते. बाबा आढावांनी हमालांना योग्य दिशा दाखवली आहे.

''कष्टाची भाकरी'' मधील स्त्री कामगारांमुळे हमाल पंचायतीचे कार्यक्षेत्र व्यापक होण्यास मदत झाली असे दिसते. हमालांच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढला, परंतु त्याशिवाय देवदासी, तलाक पिडीत स्त्रिया, परित्यक्ता इत्यादी स्त्री वर्गांच्या प्रश्नांत हमाल पंचायत ओढली गेली. हमालांची स्त्रियांच्या प्रश्नांबाबतची जाण वाढल्याचे दिसते. ''आता पुष्कळ हमाल घरी लक्ष देतात. बाबा आढाव हमालांना नेहमी सांगतात. रात्री ८ चे नंतर लगेच घरी जा. बायकापोरांशी गप्पा करा, दिवसभरात काय काम केले, आज शाळेत काय शिकविले? कोणत्या तासांना गेलात? अशा गप्पा गोष्टी घरात करा.''

चळवळी पाठीमागील पार्श्वभूमी आणि भूमिका स्त्री कामगारांना प्रत्येकवेळी पूर्णपणे समजलेली असतेच असे नव्हे. परंतु महागाई, स्त्रियांचे प्रश्न या क्षेत्रातील सभा, आंदोलने, मोर्चे यातील सहभाग उत्स्फुर्त आणि जाणतेपणापोटी असतो. इतर चळवळीत या सर्व कामगार स्त्रिया सामील असतात.

धान्य, कडधान्ये, भाजीपाला, रॉकेल, कोळसा, भुसार माल इत्यादी वस्तू खरेदीसाठी पाच सभासदांची समिती नेमण्यात आली आहे. हे सभासद खरेदी करतात. या सभासदांना बाजारपेठांची माहिती असल्याने योग्य वेळी फायदेशीररित्या माल खरेदी करणे शक्य होते. साधारणपणे पंधरवड्यातून एकदा धान्य खरेदी होते. अधिक प्रमाणात धान्य खरेदी होत नाही. याचे कारण धान्य साठवण्यासाठी पुरेशी जागा नाही. २५ वर्षापूर्वी महिन्याकाठी सुमारे १०० पोती गहू, १०० पोती ज्वारी, ५०० डबे रॉकेल, १८० पोती कोळसा अशा प्रमाणात खरेदी

होत होती. आता साठा करण्यासाठी मोठी जागा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अधिक माल, कमी भाव असताना घेणेस शक्य होतो त्यामुळे फायदा वाढू लागला. पूर्वी गुजरातवरून गहू मागवत होते. आज २०१४ साली कष्टाच्या भाकर केंद्राला रेशनिंग दुकानातून गहू, तांदूळ, साखर, रॉकेल, गोडेतेल स्वस्त दराने मिळते.

'मार्केटमधील खरेदी रोखीने होते आणि बाजारभावाने होते. सुमारे २ टक्के खरेदीवर सूट मिळू शकते. उधारी केलीच तर आठ दिवसापेक्षा जास्त नाही. पैसे चेकने दिले जातात.'[९]

भवानी पेठेतील मुख्य कचेरीच्या आवारातील स्वयंपाकघरात अन्न शिजवले जाते. तेथून ते ठिकठिकाणच्या केंद्रावर वाटपासाठी नेले जाते. एकूण दहा केंद्र होती. त्यातील भोसरी आणि कासारवाडी येथील दोन केंद्र बंद करण्यात आली. तिथे मालाला खप नव्हता. सुरूवातीच्या काळात अन्न हातगाडीवरून केंद्रावर नेत असत. १९७८ साली टेंम्पो घेतला त्यामुळे वाहतूक सुकर झाली. आज गाड्यांची संख्या वाढली आहे. आठातील पाच केंद्रावर सकाळ–संध्याकाळ अन्न पोहचविले जाते.

पुणे शहरात रोज सुमारे १०००० लोक या उपक्रमाचा फायदा घेतात. हे सर्व हमालच असतात असे नाही. शहरात विविध क्षेत्रात आणि विविध ठिकाणी काम करणाऱ्या मजुर लोकांचा भरणा अधिक आहे. नियमितपणे केंद्रावर अन्न घेणारे किती याचा अंदाज घेता येत नाही. परंतू अशी नियमित केंद्र आहे तेथील परिस्थितीनुसार नियमितपणे जेवण घेणाऱ्यांची संख्या ठरते. उदाहरणार्थ. रेल्वे स्टेशन जवळील केंद्रावर जेवण घेणाऱ्यांमध्ये शहरात थोड्या दिवसासाठी आलेले अगर शहरात अजून स्थायिक न झालेले लोक अधिक दिसून येतात.

'सुरूवातीला रोजची विक्री रू.११,०००/– चे आसपास होती. यापेक्षाही जास्त मागणी पुढील काळात वाढली. शहरात अनेक ठिकाणी अन्न वाटपाची केंद्र आवश्यक आहेत परंतु अशा वाटप केंद्रासाठी जागा मिळत नाही, ही मोठी अडचण आहे.'[१०]

गेल्या काही वर्षाचा जमाखर्च तपासून पाहिला तर नफ्याचे प्रमाणे फार पडत नाही असे दिसून आले. विक्रीचे प्रमाण दरवर्षी वाढते आहे. या आधीच्या वर्षाच्या आकडेवारीवरून हे दिसून येते. १९८१ मध्ये विक्री २२,२५,७८५/– रूपये होती, १९८४ मध्ये ४०,५५,७६६/– रूपये झाली. खर्चाचे प्रमाणही वाढते आहे. पदार्थाची किंमत तीच ठेवल्याने

अधिक प्रमाणात खर्च वाढतो आहे. त्यामुळे नफ्याचे प्रमाण घटते आहे. खर्चात बचत करण्यास वाव कमी जो काही नफा मिळतो त्याचा विनियोग प्रामुख्याने उत्पादन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी होतो.

कष्टाची भाकरीला सुरूवात झाली त्यावेळी २५ बायका काम करत होत्या. रोज सकाळी ७.०० वा. पासून कामास सुरूवात केली की, सायं. ५.३० वा. पर्यंत काम चालत होते. सुरूवातीच्या काही वर्षामध्ये हमालांच्याच बायकांना कामावर घेत होतो, नंतर गरजू महिलांनासुद्धा कामांवर घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे अनेकींचे संसार सावरले. पती हमाल होते संसाराला हातभार लागावा म्हणून या हमाल पंचायतीच्या कष्टाच्या भाकरी मध्ये स्त्रियांनी काम करण्यास सुरूवात केली. त्यावेळी धान्याची निवडणी सर्व महिला स्वत: करत होत्या. वीस वर्षापूर्वी या कामासाठी स्वतंत्र गोडावून तयार करण्यात आले. स्वत:ची गिरणी घेतली. मोठे – मोठे पीठाचे गोळे मळावे लागत, परंतु सध्या हे काम यंत्राद्वारे केले जाते. एकाच वेळी वीस किलोचे पीठ मळले जाते. बाबा आढावांनी अनेकींना रोजगार उपलब्ध करून दिला. मुख्य केंद्रातून इतर उपकेंद्रांना मालाचा पुरवठा केला जातो. तसेच गुलटेकडीच्या केंद्रामध्ये काही प्रमाणात स्वयंपाक केला जातो. यंत्रामध्ये पीठ मळण्यासाठी दोन महिला, चपाती लाटायला बारा महिला, भाकरी तयार करण्यासाठी सात महिला भांडी घासण्यासाठी दोन महिला, तर सफाई करण्यासाठी एक महिला अशा चोवीस महिला काम करत आहेत. एक महिला एक दिवसामध्ये पाचशेपर्यंत चपात्या तयार करते, एकूण नऊ हजार चपात्या व तीन हजार भाकरी तयार केल्या जातात. भाजी, शिरा, जिलेबी इतर पदार्थ आचारी करतो. ‘सरकारी निम सरकारी प्रमाणे दुसरे काम करण्यासाठी वयाची अट नसल्याने प्रत्येक महिला तिच्या इच्छेप्रमाणे काम करते. महिलांना गणवेशाच्या दोन साड्या दिल्या जातात. महिन्याला चार व वर्षाला एकवीस सुट्ट्या देतात. तसेच १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा सार्वत्रिक सुट्ट्यावेळी काम केले तर दिडपट ओव्हरटाईम दिला जातो’[११]. यावरून संस्थेचा कामगारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात येतो.

कष्टाची भाकर या उपक्रमाचे सर्व सामान्य कष्टकऱ्यांच्या जीवनातील नेमके स्थान लक्षात येण्यासाठी मान्यवरांच्या प्रतिक्रिया अधिक समर्पक शब्दांत समोर येतात. 'पुणे सुवर्ण महोत्सवी वर्ष २००७' या वार्षिक अंकात दिसून आल्या त्या खालीलप्रमाणे.

१) साथी बाबा आढाव बरोबर तीन आसनी रिक्षांबाबत चर्चा करण्याकरिता हमाल पंचायतीच्या कार्यालयास भेट दिली. त्यावेळी कष्टाची भाकरीचे जेवण घेतले. सदस्य कष्टकऱ्यांना परवडणारे आणि कोणाच्याही अनुदानावर विसंबून न राहता फार मोठे कार्य चालू असून ही परिवर्तनाची प्रक्रिया चालू आहे. आपल्या कार्यास शुभेच्छा. अशी प्रतिक्रिया सोलापूरचे आमदार नरसय्या आडम यांनी दिलेली आहे.

२) डॉ. बाबा आढाव यांनी सुमारे २५ वर्षापूर्वी स्थापन केलेल्या हमाल पंचायत कष्टाची भाकर संस्थेस भेट देवून अत्यंत आनंद वाटला. गरीब, कष्टकरी लोकांसाठी स्वस्त दरात स्वादिष्ठ व पौष्टिक भोजन उपलब्ध करू देण्याचे अत्यंत सूक्ष्म कार्य संस्था करीत आहे. संस्थेच्या कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीनेही चांगल्या योजना कार्यान्वित आहेत. संस्थेला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! अशी प्रतिक्रिया पुण्याचे मनपा आयुक्त १९९९ साली रत्नाकर गायकवाड यांनी दिलेली आहे. याबरोबर गो. ल. दिक्षित, जिल्हाधिकारी विजयकुमार गौतम, मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनीही प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत.

वरील प्रतिक्रियांवरून पुणे शहरातील कामगारांच्या कष्टकऱ्यांच्या सकस आहाराची गरज कष्टाची भाकर केंद्र कशी पूर्ण करते हे दिसून येते.

### ४.१.३ हमाल पंचायतीचे फायदे

हमालांचे प्रबोधन व्याख्याने, आंदोलने, इतर क्षेत्रातील चळवळीतील सहभाग अशा अनेक मार्गांनी होत असते. हमाल पंचायतीची उभारणी हाही प्रबोधनाचा एक मार्ग आहे. संघटनेचे फायदे हमाल कसे पाहतात यावरूनही त्यांच्यात झालेल्या जागृतीचे स्वास्थ्य कळून येते. १) हमाल पंचायतीमुळे मजुरीच्या दरात भरघोस वाढ झाली. २) हमालांना काम नियमित मिळू लागले. ३) व्यापारी वर्गाकडून चांगली, मानाची वागणूक मिळू लागली हा महत्त्वाचा फायदा झाला. त्यांचेच निवडक उद्गार हे अधिक चांगल्या प्रकारे सांगू शकतील.

''आता इज्जतीने जगता येऊ लागले.''

''पूर्वी मालक येता-जाता शिवीगाळ करत, ते आता बंद झाले''

''पूर्वी उठसूट आयमाय काढीत, ते थांबले''

''हुंडेकरी आता माणुसकीने आणि व्यवहाराने वागू लागले''

''मालकाची दादागिरी बंद झाली.''

''आमची पिळवणुक थांबली.''

''पूर्वी मालक रोज गडी बदलायचा, आता ते बंद झाले.''

''आमच्या विषयी त्याची तक्रार असेल, तर त्याला हमाल पंचायतीकडे जावं लागतं. आम्हालापण आपण कोणीतरी आहोत हे समजून आलं.''

''पूर्वी मालक आणि त्याच्या घरची माणसं सांगतील ती कामे करावी लागत. फुकट झाडलोट, गाद्या घालणं, निरोप सांगणे, सर्व काही आता बंद झालं. आता फक्त हमालीचे काम आणि ते सुद्धा कराराप्रमाणे मजुरी देऊन.''

''पूर्वी केलेल्या कामाची हमालीही लगेच मिळायची नाही. मिळे तेव्हा शिवीगाळ ऐकावी लागे. आता कामाचे रोख पैसे लगेच मिळतात.''

पूर्वी हमालांना वाईट वागणूक मिळत होती. बरीच कामे विनामोबदला करावी लागत. घरातील सर्व झाडलोट, गाद्या घालणे, काढणे, पाणी भरणे, मुलांना शाळेत पोहचविणे आणि परत आणणे, घरी गाय-म्हशी असल्यास तिची देखभाल करणे इत्यादी कामे हमालांना आपले घर मानून मोबदल्याची अपेक्षा न करता करावी लागत. कोठी पासून दुकानापर्यंत सुमारे ५०० ते १५०० फूट माल वाहतूकही फुकट करावी लागायची. उतराईही मिळत नसे. मालक आपल्याला कायम ठेऊन घेईल या अपेक्षेने हमाल ही कामे मुकाटपणे करी.

हमाल जर हुशार (स्वाभिमानी) दिसला तर व्यापारी त्याला काढून टाकत. एवढेच नव्हे तर त्याला इतरत्र काम मिळणार नाही अशीही व्यवस्था करत. किरकोळ मारहाणही होत असे. आज हे पूर्णपणे गेले आहे.

संघटनेचे फायदे हमाल केवळ पैशाचे रूपात मोजत नाहीत. त्यांना मिळणाऱ्या वागणुकीत बदल झाला आणि व्यापारी - हुंडेकरी यांच्याशी असलेले त्यांचे नाते बदलले हे

त्यांना मजुरी दरातील वाढीपेक्षा महत्त्वाचे वाटते. पूर्वी मिळणारी वागणूक किती मानहानीकारक होती आणि त्याबाबत हमालांच्या भावना किती तीव्र होत्या हे वरील उद्‌गारावरून दिसून येते.

हमालांची संघटना बांधण्याच्या प्राथमिक काळात, संघटना स्थापन होऊ नये यासाठी व्यापारी लोकांनी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले. हमालांच्यात फूट पाडणे हा एक मार्ग होता. पंचायतीचे सभासद झालात तर काम मिळणार नाही अशी धमकी दिली. अंगावर उसने अगर अगाऊ पैसे देऊन सभासद होण्यापासून परावृत्त करणे हा आणखी एक मार्ग. काही हमालांना दारू पाजून अगर इतर मार्गांनी वश करून सभासदांवर हल्ले करण्यास प्रवृत्त करणे, असे प्रकार झाले.

दुसरा महत्त्वाचा फायदा तो हा की, हमालांचे आपापसातील संबंध बदलले. पूर्वी एकमेकांच्यात जीवघेणी स्पर्धा होती. एकमेकांचे काम ओढून घेणे. हेच एकमेव उद्दिष्ट होते. त्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब होत असे. पंचायत आल्यापासून हमालांतील मातृभाव वाढीस लागला. ''हमाल विचाराने एकत्र आले'', ''हमालांचे हेवेदावे कमी झाले'', ''आपण एक आहेत ही भावना रूजू लागली.''

काम करताना हमाल मृत्यू पावल्यास त्याच्या बायकापोरांना किमान मदत देणे, हा दुसरा महत्त्वाचा फायदा होय. याला ते भाऊ भेट म्हणतात. ही मदत फार मोठी नसते. परंतु आवश्यक असल्यात हमालाच्या विधवेसही पंचायतीच्या कोणत्या ना कोणत्या उपक्रमात रोजगार दिला जातो. ''कष्टाची भाकरी'' या उपक्रमात काम दिले जाते. मयताच्या घरात प्रौढ पुरूष असल्यास त्यास हमाली कामात सामील करून घेतले जाते.

थोडक्यात, हमाल पंचायतीमुळे समाजाचा हमालांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला. हमालांमध्ये आत्मभान निर्माण होवून हमाल स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष करू लागला, हमालांना आपल्या अधिकाराची जाणीव झाली. हमाल पंचायतीमुळे हमालांचे वैचारिक प्रबोधन झाले. तसेच हमाल पंचायतीच्या माध्यमातून संघटित झाल्याने हमाल आपल्या प्रलंबीत प्रश्नांची सोडवणूक करू शकले, व्यापारी व हमाल यांच्यामध्ये समन्वय साधल्याने व्यापारी व हमाल यांच्यामध्ये बंधुत्वाचे नाते प्रस्थापित झाले. खऱ्या अर्थाने हमाल पंचायतीचे हेच सर्वात मोठे फायदे आहेत.

### ४.१.४ हमाल नगर

बहुसंख्य हमाल झोपडवस्तीत मालकांच्या दुकानात किंवा गोदामात राहत होते. हमालांसाठी, किमान सुविधा उपलब्ध असलेली घरे असावीत असा विचार पुढे आला. १९७९ मध्ये हमाल नावासाठी प्रारंभ झाला. यावर्षी शासनाने मार्केटयार्डाचे शेजारी २१,८०० चौरस मीटर जागा हमालांच्या घरांसाठी दिली. हमाल पंचायतीने याची किंमत म्हणून १९ ऑक्टोंबर १९७९ मध्ये ७६,३००/- रूपये भरले. चौरस मीटर मागे ३.५० रूपये हा दर पडला. ही जमीन शासनाने कमाल धारण कायद्यान्वये ताब्यात घेतलेली होती. १९७९ च्या सरकारमध्ये भाई वैद्य हे सर्व साधारण प्रशासन खात्याचे मंत्री होते. त्यांच्याकडे नागरी कमाल जमीन धारणा खाते होते. त्यावेळचे गृहराज्य मंत्री भाई वैद्य यांच्या मते, 'माझ्या दृष्टीने सर्वात आंनदाची बाब म्हणजे कमाल जमीन धारणेतील काही जमीन स्वस्त दरात मी हमाल नगरासाठी देऊ शकलो.'[१२]

या जमीनीचा वापर हमालांसाठी कोणत्या धाटणीच्या घरांसाठी करावयाचा हे हमालांनीच ठरवायचे होते. दोन मार्ग उपलब्ध होते. एक वाडीच्या इमारती बांधून गाळे पुरवणे अगर प्रत्येकास स्वतंत्र छोटी इमारत बांधून देणे. यापैकी पहिला मार्ग हमालांनी स्वीकारला नाही. प्रत्येकास संडास व मोरी असणारे स्वतंत्र घर असावे असे काही हमालांचे मत होते. त्यानुसार या जागेचा विचार झाला. या पद्धतीने २४२ कुटुंबांची सोय केली. प्रत्येक कुटुंबात २२.७५ चौ.मीटर जागा मिळाली. त्यात बैठकीची खोली, स्वयंपाकघर, संडास मोरी आणि काही मोकळी जागा या घरामध्ये मिळाली. अश तऱ्हेने प्लॅन १९८१ मध्ये मंजूर झाले. याची किंमत १९८१ मध्ये २२,०००/- रूपये ठरली. वेळेत अशी घरे न झाल्याने किंमत ३०,०००/- चे पुढे गेली. दर चौरस मीटरला रूपये २.५० याप्रमाणे एका प्लॉटला १८२/- रूपये पडत होते. चाळीचे घर सोडून स्वतंत्र घर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. याचे कारण जे काही हमाल या कामात पुढाकार घेत होते त्यांना परवडण्यासारखे होते. एकूण ३४ लोकांनी प्रत्येकी २०,०००/- रूपये भरून आपली तयारी दाखवली. त्यांनी बँकेकडे उरलेल्या रकमेसाठी, म्हणजे सुमारे १६,०००/- रूपये रकमेसाठी कर्ज मागणीही केली. बँकेने कर्ज मंजूर केले. परंतु सर्वसामान्य हमालांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता. हा

निर्णय कितपत योग्य आहे. याबद्दल वाद होऊ शकतो. अनेक हमालांना ही योजना आपल्यासाठी आहे असे वाटत नव्हते. बहुसंख्य हमाल झोपडवस्तीत राहत. त्यांची मासिक प्राप्ती ५००/– रूपयाचे आसपास होती. त्यांना ही घराची योजना आटोक्याबाहेर वाटत होती.

१६,०००/– रूपयाचे कर्ज ९ वर्षातील मुदतीसाठी, दरसाल १३.५०% व्याजाने मंजूर केले. उरलेली रक्कम ज्याचे त्यानेच उभी केली. या वस्तीला ''हमाल नगर'' असे नाव दिले आहे. 'आज मार्केटयार्डात बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली जे हमालनगर उभे आहे, ती देशातील एक वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. हमालनगरामुळे हमाल बांधवांची जगण्याची स्थिती बदलली. सुरूवातीला त्यांची जी दयनीय स्थिती होती, त्यात खूप बदल झालेला आहे. त्याचे संपूर्ण श्रेय बाबा आढावांच्या कष्टाला, धोरणीपणाला आणि संघर्षशील व्यक्तिमत्वालाच आहे यात शंका नाही.'[१३] हमाल एकत्रित राहू लागल्याने त्यांचा एकमेकाशी संपर्क वाढला आणि एकजूट वाढली. हमालनगरमध्ये उद्यान, समाज भवन, बालवाडी, दवाखाना, ग्रंथालय इत्यादी सर्व योजनांचा समावेश आहे. त्यामुळे हमालाचे जीवन अधिक सुखकारक झाले.

### ४.१.५ हमाल भवन

गुलटेकडी येथील बाजाराच्या आवारातील हमाल भवन ही इमारत हमालांच्या एकजुटीचे प्रतिक आहे. या आवारात ही इमारत सहजपणे नजरेस भरते. या भव्य इमारतीसाठी लागणारा पैसा हमालांनीच वर्गणी काढून उभा केलेला आहे.

आपली एक मोठी इमारत असावी, अशी कल्पना १९६८ च्या सुमारास हमाल पंचायतीच्या कार्यकर्त्यांच्या मनात, मुंबई येथील गोदी कामगारांची मोठी इमारत पाहून झाली. त्याचवेळेस पुण्यास हमाल भवन बांधण्याचा त्यांनी निश्चय केला. अशा तऱ्हेची आपली इमारत पूर्णपणे हमालांनी स्वतःच्या आर्थिक बळावर बांधण्याची घोषणा याच सुमारास केली. गुलटेकडी येथील बाजारपेठेत शासनाकडून ६०९५.५० चौरस फूट जागा ९९ वर्षाच्या कराराने, नाममात्र वार्षिक भाड्यामध्ये पंचायतीने मिळवली आहे. भाडे नाममात्र म्हणजे एक रूपये असे जरी होते, तरी त्यासाठी मोठा झगडा करावा लागला. एक दीड लाख रूपयांचे नुकसान सोसावे लागले. असे कार्यकर्त्यांनी सांगितले, कारण या नवीन बाजारपेठेत जाण्यास

व्यापारी राजी नव्हते. नाना, भवानी इ. ठिकाणी अनेक वर्ष चालू असलेली बाजारपेठ, पेढी आणि घर एकत्रित असल्याने, त्यांना सोयीची होती. या बाजारपेठेत दुकानांची गर्दी झालेली होती व गर्दी वाढत होती. रस्ते पूर्वीप्रमाणेच अरूंद, गैरसोयीचे होते. कोठारे जुन्या पद्धतीची व अंधारी होती. त्यामुळे हमालांना किमान सोयी उपलब्ध करून देणे शक्य नव्हते. हमालांना गुलटेकडी येथे नव्याने बांधलेली बाजारपेठ हालचालीच्या दृष्टीने, आरोग्य आणि सेवासोयी या दृष्टीने उपयुक्त होती. अशा परिस्थितीत व्यापार या नवीन जागेत हलवला जावा असा त्यांचा हट्ट होता. व्यापाऱ्यांवर दडपण आणणे आवश्यक होते. व्यापारी आपखुशीने स्थानांतरास तयार होत नाहीत. असे दिसताच हमालांनी संप पुकारला. एकूण २२ दिवस संप चालू राहिला. सर्व हमाल या संपात सामील होते. या काळात हमालांना आपली मजुरी गमवावी लागली. या संदर्भात जमिनीची किंमत दीड लाख पडली.

जमीन मिळाल्यानंतर इमारतीचा आराखडा तयार करून मंजूर करून घेतला आणि १९७७ अखेर म्हणजे सुमारे दोन वर्षात इमारत बांधून तयार झाली.

हमालांनी वर्गणी करून इमारतीसाठी लागणारा खर्च उभा केला. प्रत्येक हमालाने २०१/– रू. वर्गणी दिली. इतर कोणाकडूनही मदत, अनुदान, पंचायतीने घेतले नाही व मागितलेही नाही.

एवढी मोठी इमारत हमाल स्वतःच्या कर्तुत्वावर बांधू शकले ही गोष्ट अशा अनेक कष्टकऱ्यांस निश्चितच प्रेरणा देणारी आहे.

या इमारतीने हमालांना स्वत:चे असे एक कार्यालय निर्माण झाले. इमारत तीन मजली असून काही मोकळी जागा आहे. कष्टाच्या भाकरीचे एक केंद्रही या आवारात आहे. ही इमारत, प्रामुख्याने हमालांच्या बैठकींसाठी आणि हमाल पंचायतीसारख्या संघटनांच्या बैठकीसाठी दिली जाते. महाराष्ट्रात ठिकठिकाणी गरीब, वंचित वर्गातील लोकांचे प्रबोधन करणाऱ्या संघटनांना आणि कार्यकर्त्यांना या इमारतीमुळे पुण्यासारख्या शहरात एक सोयीचे, स्वस्तातले स्थान उपलब्ध झाले. अशा कामासाठी जेव्हा जागा दिली जाते तेव्हा वीस वर्षापूर्वी ३३५/– रूपये दाखल फी आकारली जात होती. या शिवाय राहण्यासाठी जेवणासाठी जी सोय उपलब्ध आहे, त्याचे भाडे म्हणून २००/– रूपये फी आकारली जात

होती. आज रू.१०००/– भाडे आकारले जाते. आवश्यक असल्यास या फीमध्ये सवलत दिली जाते. कष्टाची  भाकरी मार्फत माफक दरात जेवण, न्याहरी पुरविली जाते. याशिवाय इतर कारणासाठी, लग्न समारंभासाठी हमालांनाही जागा दिली जाते.

'इमारतीचा तिसरा मजला माथाडी बोर्डाच्या कचेरीसाठी दरमहा १०००/– रूपये या भाड्याने दिलेला आहे.'[१४] असे बापू विरूळे यांनी सांगितले. या इमारतींपासून उत्पन्न फारसे नाही हे यावरून लक्षात येईल. उत्पन्नाचा एक मार्ग म्हणून इमारत वापरण्याकडे पंचायतीचा कल दिसत नाही. इमारतीच्या देखरेखीचा खर्च सुमारे दरमहा रूपये २०००/– आहे. (पाणीपट्टी, वीज इ.) रंगसफेदी अगर दुरूस्ती करावी लागल्यास हमालांकडून वर्गणी घेतली जाते.

### ४.१.६ हमाल मजुर सहकारी संस्था मर्यादित

१९६६ मध्ये हमाल पंचायतीच्या सभासदांनी पुढाकार घेऊन हमाल मजुर सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा सन १९६० नुसार, स्थापन केली. हमाल पंचायतीचा एक उपक्रम म्हणून ही संस्था मानली जाते. अशी स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचे कारण शासनाकडून हमालीचे कॉन्ट्रॅक्ट मिळविणे हे होते. हमाल पंचायत ही ट्रेड युनियन आहे. हमाल मजुर संस्था ही सहकारी संस्था आहे. हमाल पंचायत खाजगी व्यापारी यांचेकडे कामावर असलेल्या हमालांची संघटना आहे. व्यापाऱ्यांशी कामाच्या संदर्भात असलेले वातावरण सुधारणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. म्हणून हमाल पंचायत कामाचे कंत्राट घेऊ शकत नाही. शासनामार्फत (अन्न महामंडळ) शहरात मालाची मोठ्या प्रमाणावर आवक जावक होते. सरकारी गोदामात माल लावून ठेवावयाचा असतो. हे काम अन्न महामंडळ मजुर सहकारी संस्थांना देऊ शकते. हे काम आपणास मिळावे म्हणून हमालांनी सदरहू संस्था स्थापन केली.

स्थापनेपासून ते १९७९ सालापर्यंत, म्हणजे १३ वर्षे, या संस्थेला अन्न महामंडळाकडून मजुरीचे कंत्राट मिळत गेले. १९७९ मध्ये शासनाने या संस्थेस कंत्राट देणे बंद केले. बंद होण्याचे प्रमुख कारण मजुर सभासदांनी आपल्या मागण्या वाढवल्या असे सांगण्यात आले. आजपर्यंतच्या प्रथेप्रमाणे टेंडर रक्कमेतील ५% रक्कम संस्थेसाठी ठेऊन घेऊन, बाकीची रक्कम मजुरात वाटप केली जात होती. मजुर सभासदांनी या खेरीज आरोग्य

सेवा. साप्ताहिक सुट्टी, आठ तासाच्या कामाची मर्यादा, दरवाढ इत्यादी मागण्या केल्या. त्या सगळ्या मागण्या मान्य करण्यासाठी टेंडर रक्कम वाढवून घेणे आवश्यक होते. संस्थेने ५० % टेंडर वाढवून मागितले. परंतु अन्न महामंडळाने ते नाकारले. एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही. या संस्थेतील हमालांना फोडून सुमारे १५०० हमालांना स्वतंत्र सहकारी संस्था स्थापन करण्याचे उत्तेजन देण्यात आले. या नवीन संस्थेला १००% वाढ होऊन कामाचे टेंडर मिळू लागले. त्यामुळे हमालांची सदरहू संस्था जवळपास बदं पडली. दरमहा पाच लाख रू.चे उत्पन्न बुडाले.

अन्न महामंडळाकडून काम मिळणे बंद झाल्याने या संस्थेला इतर उपक्रमांचा विचार करावा लागला. हा विचार करताना हमाल पंचायतीच्या सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन उपक्रम हाती घ्यावे असे ठरले. त्यात जनावरांना लागणारी वैरण स्वस्त भावात पुरवणे ही मागणी पुढे झाली. हमालांच्या मालकीचे सुमारे ४०० छकडे आहेत. त्यांच्या बैलांना कडबा, सरकी, भुस्सा पेंड इत्यादी वैरण लागते. हमालांना स्वस्त दरात अन्नधान्याची ही गरज होती. या दोन प्रकारच्या वस्तुंचा पुरवठा करण्याची व्यवस्था हमाल मजुर सहकारी संस्थेने करण्याचे ठरविले.

१९८१–८२ मध्ये कडबा विक्री विभाग सुरू केला, १९८२–८३ साली धान्य विक्री विभाग सुरू झाला.

एकदम बरेच धान्य घेऊन जायचे तर दोन अडचणी होत्या. पैसा अपुरा आणि साठवण्यासाठी आवश्यक तेवढी जागा नव्हती.

या विक्री उपक्रमासाठी कडबाकुट्टीचे यंत्र (९७००/–रू.) शेड (४७९००/–रू.) काटा इत्यादी (३०००/– रूपये) अशी एकूण ५७,७००/– रू. ची गुंतवणूक केली होती. सहा कर्मचारी कामासाठी होता. त्याचा दरमहा पगार रूपये २९००/– होता.

हमालांसाठी हमाल नागरी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. हमाल कामगार नागरी सहकार पतसंस्थेचे कार्यालय स.न.५८०/२अ, हमालनगर, मार्केटयार्ड, पुणे–३७ येथे असून त्याचा क्रमांक : पी एन ए / पी एन ए / आर एस आर (सी आर)/५९९/९०–९१/८/१०/१९९० चे रजिस्ट्रेशन आहे. हमाल कामगार नागरी पतसंस्थेचे ३२६७ इतके

सभासद आहेत. पतसंस्थेची आर्थिक स्थिती चांगली आहे. पतसंस्थेचा वसूल भाग भांडवल रूपये १,०२,३२,८२०/- गुंतवणूक रूपये ९३,३३,१२७/-, गंगाजळी व इतर निधी रूपये ७७,६८,१५४/- ठेवी रूपये १,११,७०,४००/- रूपये, कर्जवाटप रूपये १,८३,०९,५४६/- पतसंस्थेची मालमत्ता रूपये १६,४३,४४६/- इतकी आहे. डॉ. बाबा आढाव हे प्रमुख सल्लागार असून चंद्रकांत किसन मानकर चेअरमन, जनाबाई साधू सुर्वे - व्हाईस चेअरमन, हुसेन मेहबुब पठाण - व्यवस्थापक तर संचालक मंडळात अंकुश अवताडे, गोरख मारूती मेंगडे, बापू धर्मा केकाण, शिवाजी कोंडिबा बाबर, संतोष लक्ष्मण जंगम, हरीभाऊ तु. खाडे, सोमनाथ वा. कराड, वसंत दा. चोरगे, विनोद मा. केकाण, महादेव ल. साबळे हे सदस्य कार्यरत आहेत.

### ४.१.७ भाऊभेट

'१९७४ साली भाऊ भेट हा उपक्रम चालू झाला'[१५]. दरवर्षी काही हमाल मृत्यू पावतात. त्यांच्या कुटुंबियांना मदत देणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. परंतु अडचणीच्या काळी ही अल्प मदत उपयुक्त ठरते. रूपये २५०/- आणि साडी चोळी इत्यादी मदत तात्काळ दिली जाते. रोख मदतीचा उपयोग प्रामुख्याने अंत्यविधी पार पाडण्यास येतो. याशिवाय गरज असेल त्याप्रमाणे घरातील व्यक्तीला काम देण्याचा प्रयत्न होतो. कष्टाची भाकर केंद्रात स्त्रियांना सामावून घेतले जाते. कर्ता पुरूष असेल तर त्यास हमाली काम दिले जाते. हमाल पंचायतीच्या सभासदत्वाच्या फीमध्ये २/- रूपये प्रत्येकाकडून भाऊभेट निधीसाठी घेतले जातात. त्या निधीतून ही मदत दिली जाते. हा निधी अपूरा पडल्यास जादा वर्गणी गोळा केली जाते.

१९७४ पासून १५० कुटुंबाना मदत केली, गेल्या काही वर्षापासून ही योजना बंद करण्यात आली आहे. परंतु या योजनेचा उपयोग हमालातील एकजूट बळकट करण्यासाठी झाला.

### ४.१.८ हमाल पंचायतीचा स्वस्त दवाखाना

'१ एप्रिल १९७५ रोजी हमाल पंचायतीचा, कष्टकऱ्यांसाठी, स्वस्तातला दवाखाना सुरू झाला'[१६]. डॉ. बाबा आढाव यांचा स्वतःचा खाजगी दवाखाना याच जागेत होता. तोही

प्रामुख्याने गोरगरिबांसाठी चालवला जात होता. त्यामुळे फी कमी आणि उधारी मोठ्या प्रमाणावर होती. दवाखाना १९६० ते १९६९ च्या काळात बंद होता. १ जानेवारी १९७० रोजी हा दवाखाना पुन्हा सुरू झाला. बाबांच्या विचारसरणीच्या डॉ. अनिल अवचट यांनी स्वतःचे ३०००/– रूपये गुंतवून माफक दरात हा दवाखाना सुरू केला.

औषधांसाठी रोज रूपये १.०० आणि इंजेक्शन (औषधांसह) रूपये ४.०० याप्रमाणे आकारणी होती. तपासणीची फी नव्हती. उपचारासाठी रोज ४० ते ५० लोक येत. प्रामुख्याने यात हमाल आणि इतर कष्टकऱ्यांचा भरणा असे. क्वचित व्यापारीही येत. मध्यमवर्गीय रूग्ण या दवाखान्यात येत असत, तर श्रीमंत व्यापारी रूग्ण शहरातील इतर दवाखान्यात औषधोपचार घेत.

काही व्यक्तिगत कारणांसाठी १९७४ मध्ये दवाखाना पूर्णपणे बंद राहिला. पण दवाखान्याची मागणी होती. हमालांना इतर खाजगी दवाखाने परवडणारे नव्हते. ताज्या जखमांवर ड्रेसींग करण्यासाठी १०/– रूपये द्यावे लागत. सरकारी हॉस्पिटल दूरवर होते. तिथे उपचार मोफत होते. तिथे जाणे येणे यासाठी प्रवासखर्च करावा लागत असे. पूर्ण दिवस मोडावा लागत होता.

हमालांची गरज भागवण्यासाठी दवाखाना चालू करण्याचा विचार सुरू झाला. काही विशिष्ट गोष्टींवर भर द्यायचे ठरले. उपचाराबरोबरच आरोग्यविषयक शिक्षण देणारे उपक्रम हाती घ्यायचे निश्चित झाले. दर पूर्वीचेचे ठेवावेत असेही ठरले. विशिष्ट क्षेत्रातील तज्ञांचा आवश्यक त्या प्रमाणात माफक दरात सल्ला घेण्याची व्यवस्था करण्यात आली. यानुसार १ एप्रिल १९७५ रोजी हमाल पंचायतीचा एक उपक्रम म्हणून नव्याने दवाखाना सुरू झाला. तो लोकप्रिय झाला. आजतागायत तो भरभराटीत आहे.

हमाल पंचायतीने चालविलेला दवाखाना हे याचे पहिले वैशिष्ट्य आहे. याच्या व्यवस्थापनेसाठी हमाल पंचायतीची एक विषय समिती आहे. दवाखान्याच्या जमा खर्चाचा मेळ घालणे, सर्वसाधारण व्यवस्थापन पाहणे हे या समितीचे काम आहे. डॉक्टर आणि कंपाऊंडर हमाल पंचायतीचे सेवक मानले जातात. त्यांना दरमहा मानधन दिले जाते.

आज एकच दवाखाना आहे. शहराच्या निरनिराळ्या विभागात हमाल विखुरलेले आहेत. त्यांच्या कामाची व राहण्याची ठिकाणे दवाखान्यापासून दूरवर आहेत. सर्वांना त्यामुळे दवाखान्याचा फायदा घेता येत नाही. त्यांना नाईलाजाने खाजगी दवाखान्याचा आश्रय घ्यावा लागतो. त्यापायी मोठा खर्च करावा लागतो. आजारपण अंगावर काढावे लागते. दवाखान्याच्या शाखा काढाव्यात असे सर्वानाच वाटते. त्यादृष्टीने हमाल पंचायतीने एकदा प्रयत्न केला. एका मोठ्या गरीब वस्तीत आठवड्यातून दोन वेळा, असे एक वर्ष दवाखाना चालवला. उपचारासाठी गर्दी व्हायची पण स्थानिक पातळीवरील भांडण, कलह यामुळे दवाखाना बंद करावा लागला. दवाखाने चालवण्यास सेवाभावी काम करणारे डॉक्टर्स मिळत नाहीत.

दवाखान्यातील उपचारांव्यतिरिक्त इतर आरोग्य विषयक उपक्रम हाती घ्यावेत असे सुरवातीस ठरले होते. त्यासाठी १९७५ चे सुमारास एक ढोबळ पाहणी करण्यात आली. त्यात खालील महत्त्वाच्या गोष्टी आढळल्या होत्या.

१) धनुर्वाताने दरसाल आठदहा हमाल मृत्यू पावतात.

२) काम करताना जे अपघात होतात, त्यांचे एक प्रमुख कारण दारूचे व्यसन हे आहे.

३) क्षयरोगाचा प्रार्दुभाव आहे.

४) लहान मुलांत खरूज व जंत हे दोन मोठे आजार आहेत.

या निष्कर्षानुसार उपाय योजना करण्यात आली.

१९७६ मध्ये सरकारी व महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांच्या मदतीने धर्नुवाताची प्रतिबंधक लस दोन हजारांचे वर हमालांना टोचण्यात आली. ते काम आजतागायत चालू आहे. १९८२ मध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर या धर्तीवर कार्यक्रम आयोजित करून शेकडो व्यक्तींना लस टोचण्यात आली. आज कोणी लस न टोचलेला हमाल शिल्लक नाही. हमालांना याचे महत्त्व कळावे म्हणून हमाल काम करतात त्या त्या ठिकाणी हा विषय समजावून देण्याचा प्रयत्न झाला. या उपक्रमास सुरूवात केल्यापासून धर्नुवाताने कोणी हमाल मृत्यू पावलेला नाही. कोणास जखम झाल्यास दवाखान्यात लस घेऊनच हमाल येतात. यावरून याचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहचले असल्याचे दिसते.

क्षयरोगाचा प्रादुर्भाव किती आहे हे पाहण्यासाठी १९८० मध्ये ५०० हमालांनी स्कॅनिंग करून घेतले. त्यातून १५ लोकांना क्षयाची बाधा असल्याचे दिसून आले. हे सर्व हमाल मालधक्यावर धान्य, सिमेंट, कोळसा अशा वस्तुंची ने–आण करतात. त्यांना या वस्तुंच्या धुराळ्यात तास न तास काम करावे लागते.क्षयाची बाधा झालेल्या हमालांची संख्या त्यामानाने कमी आहे. परंतु अशा वातावरणात प्रकृतीवर काही ना काही परिणाम होतो. क्षयरोग आणि इतर आजाराने पछाडलेल्यांना महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये मोफत उपचारासाठी पाठविण्याची व्यवस्था हमाल पंचायतीने केली आहे. उपलब्ध असलेल्या सरकारी, निमसरकारी योजनेचा फायदा घेण्यासाठी हमालांना प्रवृत्त करणे, त्यांचे याबाबत शिक्षण करणे, संबंधित आरोग्याधिकाऱ्यांशी संपर्क साधणे इत्यादी महत्त्वाची कामे हमाल पंचायत करते. गरिबांसाठी योजना करून भागत नाही. गरिबांना यासाठी संघटित करून योजनांचे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. हे पुन्हा एकदा सिद्ध होते.

खरूज, जंत अशा रोगांचे निर्मूलन करण्यासाठी जे उपक्रम हाती घेतले. प्रामुख्याने शरीराची निगा राखणे, नखे कापणे, औषध लावणे या गोष्टी स्पष्ट करून समजावून घेण्यासाठी खास बैठका आयोजित केल्या होत्या. दारूच्या व्यसनावर औषधे आणि इतर उपाय योजले गेले. कुटुंबनियोजनाचा सल्ला व्यक्तिगत पातळीवर दिला जातो. आजारपणात देवाकडे धाव घेणे, नवस, उपासतापास यावर भिस्त ठेवणे याचे प्रमाण हमालांत खूप कमी दिसते. हमालाचे अनौपचारिक शिक्षण आणि प्रबोधन याचा हा परिणाम मानावयास हरकत नाही. हमाल पंचायतीचे नेते यातून मुक्त असल्यामुळे, अंधश्रद्धा आजारपणापुरत्या तरी मोठ्या प्रमाणावर संपुष्टात आल्या असे दिसते. अंधश्रद्धा पूर्णपणे गेल्या असे मात्र म्हणता येणार नाही.

### ४.१.९ पुस्तक पेढी

'हमालांच्या मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी हमाल पंचायतीने ''पुस्तक पेढी'' नावाचा उपक्रम १९७६ मध्ये सुरू केला.'[१७] यांचे उद्दिष्ट हमालांच्या मुलांना शिक्षणासाठी आवश्यक असणारे साहित्य मोफत उपलब्ध करून द्यावे हे होते. १९७६ ते १९८० या कालावधीत प्रत्येक सभासदाला त्याच्या मुलांसाठी सहा वह्या मोफत देण्यात

आल्या. हा सर्व खर्च हमाल पंचायतीने आपल्या उत्पन्नातून केला. १९८१ मध्ये यात बदल करून वह्या ऐवजी पुस्तके देण्याचे ठरविले. हमाल पंचायत शिक्षणनिधी म्हणून प्रत्येक सभासदाकडून वर्षाकाठी रूपये ३/– वर्गणी घेते. पाचवी पासूनच्या विद्यार्थ्यांनी आपली गतवर्षीची पुस्तके पुस्तकपेढीत आणून द्यायची आणि ती व त्यात भर घालून हमाल पंचायतीने गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके वाटण्याचे ठरविले. जुनी पुस्तके गोळा करण्याचा अनुभव फारसा उत्साहजनक ठरला नाही. फाटकी पुस्तके गोळा होतात आणि दहावीची मुले पुस्तके परत करत नाहीत. म्हणून नवीन पुस्तके विकत घेण्यात आली होती. १९८५ मध्ये पुस्तक खरेदी करण्यासाठी रूपये ८०००/– खर्च झाले होते. एकूण पुस्तके वाटली त्यात सुमारे १० टक्केच पुस्तके जुनी, विद्यार्थ्यांनी परत केलेल्यापैकी होती. एक वर्षभर मुलांनी पुस्तक वापरून, चांगल्या अवस्थेत पुढील वर्षाच्या मुलांसाठी हमाल पंचायतीमध्ये आणून द्यावीत ही अपेक्षा अवाजवी ठरली.

हमाल पंचायतीने चालवलेल्या पुस्तपेढीचा हा उपक्रम निश्चितच स्तूत्य होता. हमालांची मुले अभ्यासात मागे पडतात. त्याचे प्रमुख कारण घरातील वातावरण अभ्यास करण्यास चांगले नाही हे आहे. घरातील वडिलमाणसे आपल्या पाल्यांना अभ्यासात मार्गदर्शन करण्यात अपात्र आहेत. तसेच थकून भागून घरी आल्यानंतर त्यांना मुलाबाळांशी बातचीत करणेस उत्साहही नसतो. या परिस्थितीत आणि मुलांना शाळे व्यतिरिक्त क्लासला घालणे परवडत नसल्याने, मुलांची परीक्षेसाठी तयारी होत नाही.

### ३.१.१० कष्टकरी विद्यालय

कष्टकरी वर्गातील लोकांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे, यासाठी हमाल पंचायतीनी ‘हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाची स्थापना जून २००० साली केली. विद्यालयाला १५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या विद्यालयात इ.५वी ते १०वी. चे वर्ग असून ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षणाचा आनंद घेत आहेत. सुरेश गिरमे हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहत आहेत. गेली अनेक वर्षे विद्यालय हे हमाल भवन येथे सुरू होते. २०११ साली हमाल नगर येथे २ कोटी १५ लाख रूपये खर्चून विद्यालयाची प्रशस्त व भव्य इमारत उभी केली. या इमारतीत सर्व भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. संगणक

कक्ष, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, सभागृह या सुविधा आहेत. बाबा आढावांनी पंचायतीच्या माध्यमातून विद्यालयात ४७ संगणक उपलब्ध करून दिले आहेत. विद्यालयाची गुणवत्ता दिवसेंदिवस उंचावत आहे. सन २०१०–११ या शैक्षणिक वर्षापासून इ. १० वी चा निकाल ९०% च्या वर लागत आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यालयाची सुरूवातच महात्मा ज्योतीबा फुले यांच्या 'सत्य सर्वांचे आदि घर' या अखंडाने होते. विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण ४०%, मागासवर्गीय विद्यार्थी ७०%, कष्टकरी विद्यार्थी १००% आहेत. विद्यालयाची सर्व आर्थिक जबाबदारी 'हमाल पंचायत' समर्थपणे पेलत आहे.

विद्यालयास अनेक मान्यवरांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी, राजकीय नेते, शरद पवार, विलासराव देशमुख, अजित पवार, ऊल्हास पवार इत्यादी विद्यार्थ्यांना एस.एस.सी.नंतर संगणकाचे व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी हमाल पंचायतीने 'नेट इन्स्टिटयूट' ही मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्था सुरू केली आहे. यामध्ये एम.एस.सी.आय.टी. पासून सर्व प्रकारचे संगणक कोर्सेसचे प्रशिक्षण माफक फी च्या दरात दिले जाते. इ.१० वी नंतर व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचे बाबा आढावांचे व हमाल पंचायतीचे स्वप्न आहे.

### ४.१.११ स्त्री– कामगार कल्याण योजना

हमाल पंचायत व पुणे मर्चंट्स चेंबरमध्ये दुकानातून सफाईचे काम करणाऱ्या महिला कामगारांसाठी १९८८ पासून स्त्री कामगार कल्याण योजना कार्यरत आहे. या योजनेअंतर्गत १५० महिला कामगारांना माथाडी मंडळाच्या धर्तीवर मालकांकडून किंवा योजनेतून पगारासोबत मिळणाऱ्या ३०% लेव्हीतून भविष्य निर्वाह निधी, पगारी सुट्टी, पगारी रजा, अनुदान उपदान, औषधोपचार, विमा योजना देण्यात आले. त्यांना गृहोपयोगी साहित्य ना नफा ना तोटा या तत्वावर दिले जाते. महिला कामगारांना बाजार समितीकडून रीतसर परवाना मिळवून देण्यात येतो. आपत्तीचे काळात कर्ज साहाय्यही उपलब्ध करून दिले जाते.

## ४.२ राष्ट्रीय एकात्मता समिती

डॉ. बाबा आढाव यांनी राष्ट्रीय एकात्मता परिषदेसह राष्ट्र उभारणीच्या अनेक कार्यामध्ये सहभागी होवून आपले योगदान दिलेले आहे. डॉ. बाबा आढावांच्या या सामाजिक कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### ४.२.१ राष्ट्रीय एकात्मता परिषद

'१९८२ साली राष्ट्रीय एकात्मता परिषद स्थापून बाबा आढावांनी सामाजिक सौहार्दासाठी प्रयत्न केले.'[१८] पुणे, मुंबई, गुजरात येथील जातीय दंग्यानंतर राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या वतीने भव्य मेळावे भरवून आणि अनेक सभा आयोजित करून जातीय विद्वेष शमविण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय एकात्मता परिषदेतर्फे दि.२६/०१/१९९३ प्रजासत्ताक दिनाचे दिवशी पुण्यात घटना अभिवादन मिरवणूक काढण्यात आली होती. ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे यांनी सर्वांना घटनेतील शपथ दिली. पुणेकर नागरिकांनी या मिरवणुकीस प्रचंड प्रतिसाद दिला. दि.१८/०१/१९९३ ते दि.२५/०१/१९९३ या काळात धर्मनिरपेक्षता या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली. धर्मनिरपेक्षता, न्यायालयीन निवाडे व धर्मनिरपेक्षता, भारतीय परंपरा व धर्मनिरपेक्षता, राजकीय पक्ष व धर्मनिरपेक्षता या विषयावर विनायक कुलकर्णी, डॉ. सत्यरंजन साठे, डॉ. आ. ह. साळुंखे, भाई वैद्य, सुहास पळशीकर, डॉ. सदानंद मोरे, श्री. नानासाहेब गोरे यांची व्याख्याने झाली.

सय्यदभाई यांनी लिहिलेल्या व अक्षर मानव प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'दगडावरची पेरणी' या पुस्तकात पान नं.३६ वर बाबा आढावांच्या राष्ट्रीय एकात्मता समितीच्या कार्याचा उल्लेख आला आहे. पुण्यात १९६५ साली हल्या नावाच्या मंडईतल्या मुस्लिम हमालानं दारू पिऊन मंडईच्या गणपतीसमोर घाण केली. ही बातमी शहरात वणव्यासारखी पसरली. पाहता पाहता शहराम मुस्लिम मोहल्ले पेटले. काही कळायच्या आत अनेक मुस्लिम गोरगरिबांच्या संसाराची राखरांगोळी झाली. काही काळानंतर समजलं की हा हल्या दंगलखोर समाजकंटकांचा बळी ठरला. पुणे शहरात शांतता राहावी यासाठी शहरातल्या काही जाणकार मंडळींनी सर्व धर्माचे सण–उत्सव, त्यात महावीर जयंती, पैगंबर जयंती, आंबेडकर जयंती, दिवाळी, ईद इत्यादी एकत्र येऊन साजरे करावेत असं ठरलं. हया

कार्यक्रमांत भाई वैद्य, डॉ. रमेशचंद्र शहा, ॲड. एस. ए. रहमना, डॉ. बाबा आढाव ही मंडळी अग्रभागी होती.

### ४.२.२ भारत–चीन युद्धात जवानांना मदत

१९६३ च्या सुमारास भारत–चीन युद्धामध्ये जवानांना मदत करण्यासाठी पुणे शहरातून निधी गोळा केला जात होता. या महत्त्वाच्या कार्यात आपला वाटा म्हणून बाबा आढावांच्या हमालांनी एक दिवसांचे वेतन दिले. याप्रमाणे रूपये ७०००/– ची रक्कम हमालांनी महापौरांच्या स्वाधीन केली.

### ४.२.३ श्री.संत लोंगोवाल यांना श्रद्धांजली

श्री.संत लोंगोवाल यांची पंजाबात हत्या झाली. त्यादिवशी बातमी हाती येताच गंजपेठ, नाना पेठ, भवानी पेठेतील बाजाराचे कामकाज तीन तास बंद ठेऊन सुमारे २००० हमालांनी गुरूद्वारात जाऊन श्रद्धांजली वाहिली. पुणे शहरातील लोकांना राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव करून दिली.

### ४.२.४ संवाद घडवण्याचे कार्य

महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान व राष्ट्रीय एकात्मता समितीच्या वतीने संवाद घडवण्याचे सतत प्रयत्न होत आहेत. यासाठी सर्व घरातील पुरूष व स्त्रिया एकत्र येतात. महापालिका शाळेतील उर्दू–मराठी शिक्षकांची सभा संघटित केली होती. 'शैक्षणिक गळती' या विषयावर मराठी उर्दू शिक्षिकांनी मते मांडली. मुस्लीम विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादर केली.

### ४.२.५ भिवंडी दंगल

भिवंडी येथील हिंदू–मुस्लीम दंगलीतील आपदग्रस्तांना हमाल पंचायतीने रूपये २००००/– ची मदत पाठविली.

### ४.२.६ पुरग्रस्तांना मदत

पुणे आणि आसपासच्या परिसरात वेळोवेळी पुरग्रस्तांना अगर अशाच आपद्काळात हमालांनी बाबा आढावांच्या मार्गदर्शनाखाली भाकरी–भाजीचे जेवण व संसारोपयोगी साहित्य पुरवले.

### ४.२.७ हमालांकडून पोलीसांचा निषेध

मुंढव्यात २२ फासेपारधी स्त्रियांना चोरीच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली. त्यांच्या अंगावरच्या साड्या काढून घेतल्या. या घटनेचा निषेध करून हमाल पंचायतीने तात्काळ मदत भेट म्हणून त्या फासेपारधी स्त्रियांना साड्या पाठवून दिल्या.

## ४.३ हमाल माथाडी महामंडळ

हमाल माथाडी कायद्यासंदर्भात बाबा आढावांनी सांगितले, 'माथाडी कायदा १९६९ मध्ये झाला' [१९]. तोपर्यंत हमालांना संरक्षण देणारा किंवा त्यांचे हित जपणारा कायदा अस्तित्वात नव्हता. सर्वसाधारण कामगारांविषयी जे कायदे होते. ते हमालांना लागू होत नव्हते. त्याचे कारण या कायद्यान्वये, नोकर या शब्दाची जी व्याख्या केली होती. त्या व्याख्येत हमाल बसत नव्हते. कायद्याप्रमाणे नोकर या सदरात गणना होण्यासाठी मालकाने नोकराची अधिकृतरित्या नेमणूक केलेली असली पाहिजे. तसेच नोकरीमध्ये किमान सातत्य असावयास हवे. हमालांची नेमणूक अधिकृत नसते. त्यास दिलेले काम फार मर्यादित काळापुरते असते. एक तासभरही हे काम असण्याची शक्यता नाही. त्यामुळे एक काम संपले की लगेच दुसऱ्या कोणाकडे किंवा दुसऱ्या ठिकाणी हमाल कामासाठी जाऊ शकतो. एकाच दिवशी तो अनेक मालकांकडे काम करू शकतो. त्यामुळे मालक आणि हमाल यांचे नाते हंगामी स्वरूपाचे राहते. या वास्तव परिस्थितीमुळे वरील कायद्यांचा लाभ हमालांना देता येत नव्हता.

शासनाने १९६५ मध्ये दोन तज्ञ समित्या नेमून हमालांना या कायद्याचा लाभ कसा करून देता येईल आणि तसे शक्य नसल्यास इतर कोणत्या उपयोगाचा अवलंब करावा. याबाबत सल्ला आणि शिफारशी मागवल्या. या समित्यांच्या अध्यक्षपदी अनुक्रमे श्री. के. आर. पवार आणि श्री. बी. एस. कालेलकर होते.

पवार समितीपुढे कामगारांच्या पुढील मागण्या विचारासाठी होत्या.

१) कामाचे तास नियमित करावेत.

२) आठवड्यातून एक दिवस पगारी सुट्टी मिळावी.

३) इतर कामगारांप्रमाणे पगारी रजा आणि सुट्या मिळाव्यात.

४) मोफत आरोग्य सेवा, निवृत्ती वेतन, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी इ. मिळावे.

समितीने सर्व मागण्या फेटाळून लावल्या. समितीच्या मते हमाल 'नोकर' या सदरात बसत नसल्याने एकही मागणी स्वीकारणे किंवा मालकाला स्वीकारायला भाग पाडणे शक्य नाही. मजुरीचे दर वाढवण्याबाबतही समितीने विचार केला. परंतु समितीचे असे मत पडले की, मजुरीचे दर वाढवून देण्याची गरज नाही. हमालांची आर्थिक परिस्थिती बिकट असून त्यांची कमाई कमी पडते. हे समितीने मान्य केले. परंतु या परिस्थितीचे कारण हमालीचे दर कमी आहेत हे नसून त्यांना सातत्याने काम मिळू शकत नाही, हे आहे असे समितीने स्पष्ट केले. कामाच्या वेळा ठरविणे देखील शक्य नाही, असे समितीचे मत पडले. जेंव्हा मालाच्या गाड्या येतात तेंव्हाच हमालांना काम मिळते आणि गाड्या केंव्हा येतील हे सांगता येत नाही. त्यामुळे कामाच्या वेळा ठरविणे शक्य नाही. इतर मासिक पगारावर नेमलेल्या कामगारांचे काम आणि हमालीचे काम यात या परिस्थितीमुळे फरक पडतो. तो दूर करणे शक्य नाही. त्यामुळे हमालांच्या वरील मागण्या समितीने फेटाळून लावल्या.

नोकर या शब्दाची व्याख्या बदलून त्यात हमालांचा समावेश करणे शक्य आहे. व्याख्या बदलून हमालांना अस्तित्वात असलेल्या कायद्याचा फायदा देण्याचे ठरविले तर त्यामुळे निर्माण होणारा आर्थिक बोजा व्यापारी वर्गावर पडेल आणि त्यांना तो पेलवणार नाही असे समितीने मत व्यक्त केले आहे त्याच कायद्याच्या कक्षेत बसवण्या ऐवजी निराळ्या कायद्याचा आणि उपायांचा विचार करावा असे समितीने सुचविले. अशा नवीन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी, अशी पुस्ती समितीने जोडली.

कायद्याव्यतिरिक्त दुसरा पर्याय समितीने सुचविला तो असा की हमालांनी सहकारी मजुर संघटना स्थापन कराव्यात आणि शासनाने त्यांना प्रोत्साहन आणि मदत करावी. व्यापाऱ्यांना जेव्हा हमाल लागतील तेंव्हा त्यांनी अशा संघटनांना काम द्यावे आणि कामाचा मोबदलाही संघटनांनी घ्यावा. संघटनांनी हा मोबदला संघटनेच्या हमाल सभासदास वाटून द्यावा. मोबदल्यातील काही भाग बाजूला काढून ठेवावा आणि त्यातून माथाडी कल्याण निधी निर्माण करावा. अशा निधीमध्ये व्यापाऱ्यांनीही भर टाकावी. या निधीचा विनियोग हमालांच्या कल्याणासाठी व्हावा. शासनाने अशा संघटनांना आर्थिक मदत द्यावी. त्याचबरोबर अशा संस्थांचे व्यवस्थापन सुरळीतपणे पार पाडावे यासाठी योग्य ते आर्थिक, शैक्षणिक आणि इतर

स्वरूपाचे सहाय्य द्यावे. अशा संघटना स्थापन झाल्यावर आपोआपच मध्यस्थ कंत्राटदार दूर होईल आणि त्यांच्यामार्फत होणारे हमालांचे शोषण संपुष्टात येईल. हमालांनी आपल्या संघटनांमार्फत व्यापाऱ्यांशी वाटाघाटी करून मजुरीचे दर ठरवावेत. संघटित झाल्यामुळे दर वाढवून घेणे शक्य होईल आणि संघटनांमार्फत हमालांच्या उन्नतीसाठी विविध उपक्रमही हाती घेणे शक्य होईल.

माथाडी लेबर चौकशी समितीप्रमाणेच याही समितीने हमालांसाठी स्वतंत्र कायद्याचा विचार करावा अशी शिफारस केली. अशा कायद्याची रूपरेषाही त्यांनी जोडली. हमाल आणि व्यापारी यांचे संयुक्त मंडळ असावे आणि या दोन्ही वर्गाच्या सहकार्याने सर्व गोष्टी ठरवाव्यात. केवळ हमालांच्या एकमेकातील सहकार्यापेक्षा अशी यंत्रणा अधिक फलदायी ठरेल.

जुलै १९६५ मध्ये श्री. शिवाजीराव पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक समिती नेमून याविषयावर तिचे मत मागवले. या समितीने स्वतंत्र कायद्याची आणि संयुक्त मंडळाची शिफारस केली. अशा तरतुदीची अंमलबजावणी सावकाशीने, टप्याटप्याने करावी असेही सुचविले. प्रथमतः महानगरपालिका असलेल्या शहरात जिथे हमालांची संख्या आणि हमाली काम मोठ्या प्रमाणावर आहे तिथे अंमलबजावणी करून अनुभव घ्यावा आणि नंतर इतर शहरात अशी योजना लागू करावी असे समितीचे मत होते.

वरील शिफारशीचा विचार करून शासनाने १९६८ मध्ये विधेयक सादर केले. मार्च १९६९ मध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन व कल्याण या नावाचा कायदा संमत झाला. माथाडी हमाल यासारख्या अरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करून व अशा नोकऱ्यांमध्ये त्यांचा पुरेसा पुरवठा व्हावा व त्यांचा यथोचित व पूर्ण उपयोग व्हावा यासाठी हा कायदा तयार करण्यात आला. अशा नियमात कामाच्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आणि कामगारांचे कल्याण, आरोग्य यासाठी उपाय योजणे, नोकरीच्या अटी व शर्ती यासाठी अधिक चांगली तरतूद करणे, टाळता येण्यासारख्या बेकारीस प्रतिबंधक उपाय योजणे इत्यादी उद्दिष्टांचा समावेश आहे. या सर्व कामासाठी मंडळे स्थापने हे ही कायद्याचे उद्दिष्ट आहे. अशा नोकऱ्या कोणत्या हे अनुसूची जोडून स्पष्ट केले आहे. विविध प्रकारचा माल भरणे, उतरविणे, रचणे, ने–आण

करणे, वजन मापन करणे इत्यादी सर्व कामे आणि त्यांची पूर्वतयारी करणे अशा सर्व कामांचा त्यात समावेश होतो. बाबा आढाव म्हणतात, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एक योजना तयार करून योजनेच्या राजपत्रात प्रसिद्ध करावयास हवी. अंमलबजावणीसाठी एक मंडळ स्थापन केले जावे. या मंडळात मालक, असंरक्षित कामगार व राज्यशासन यांचे प्रतिनिधी असावेत. मालक व असंरक्षित कामगार यांचे प्रतिनिधी समसमान असावेत आणि राज्य शासनाचे प्रतिनिधी, मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा अधिक असू नयेत. मंडळाचे अध्यक्षपद राज्यशासनाच्या प्रतिनिधीकडे असावे.

शासनाने ३० मार्च १९७४ रोजी आदेश काढून हा कायदा पुण्यात लागू केला. त्या आधी सल्लागार समितीचा सल्ला शासनाने घेतला होता. सल्लागार समितीने या कायद्यान्वये होणारी योजना आखली. महानगरपालिकेच्या हद्दीतील १) किराणा भुसार बाजारपेठ २) मालधक्का ३) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यानुसार बाजारपेठा व उपबाजारपेठा ४) सार्वजनिक मोटार वाहतूक ५) लाकूड बाजारपेठ या सर्व ठिकाणी लागू करावी. असा सल्ला दिला होता. परंतु शासनाने काही भागांनाच ही योजना लागू करण्याचे ठरविले. त्याची कारणे देता असे सांगितले की ज्या भागात कामगार केंद्रित झाले आहेत. तिथे योजना राबवण्याचा अनुभव घेऊन नंतर इतरत्र ठिकाणी राबविणे अधिक सोयीचे होईल.

परंतु ही मर्यादित अंमलबजावणी देखील स्थगित करावी लागली. व्यापाऱ्यांनी कोर्टात रिट अर्ज दाखल केला आणि कोर्टाने स्थगितीचा आदेश दिला. या अर्जाची शहानिशा होऊन. सर्व अडथळे दूर होण्यास सप्टेंबर १९८० साल उजाडले. दिनांक १५ सप्टेंबर १९८० रोजी अखेरीस या योजनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला.

डिसेंबर १९८५ अखेर हा कायदा महानगरपालिकेच्या हद्दीतील ठोक व्यापारी व ज्या व्यापाऱ्यांकडे नियमित हमाल नोंदवलेले आहेत अशांना लागू होता. लोखंड, पोलाद, वाहतूक, भाजीपाला, मालधक्का या क्षेत्रात कायदा लागू नव्हता. परंतु लवकरच या सर्व क्षेत्रांना योजना लागू होईल असा सर्वांना विश्वास वाटत होता. ही क्षेत्रे वगळली गेली याचे कारण तांत्रिक स्वरूपाचे आहे असे सांगण्यात आले. योजना लागू करताना फक्त किराणा भुसार बाजारपेठेच डोळ्यासमोर होती. इतर वरील बाजारपेठा नजरचुकीने राहून गेल्या. ही चूक लक्षात घेताच ती

दुरूस्त करण्याचे शासनाने मान्य केले आणि त्याप्रमाणे कारवाईस सुरूवात केली. काही महिन्यांच्या आत ही चूक दुरूस्त होऊन योजना महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व बाजारपेठांना लागू झाली. पुण्याबाहेरही सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, जालना, औरंगाबाद, नाशिक अशा महाराष्ट्रातील सर्व मोठ्या शहरांना हा कायदा लागू करण्यात आला.

योजनेप्रमाणे व्यापारी आणि हमाल यांची नोंदणी करणे आवश्यक असते. अशा नोंदणी झालेल्या हमालानांच योजनेचे फायदे मिळतात. डिसेंबर १९८५ मध्ये अशा नोंदणी झालेल्या व्यापाऱ्यांची संख्या ४२५ होती व हमालांची संख्या १२०० होती. वर्षाकाठी जेवढी मजुरी हमालाला मिळते. त्याच्या ३० टक्के रक्कम मालक मंडळाकडे देतो त्याला लेव्ही म्हणतात. रोजचे रोज प्रत्येक हमालाने केलेले काम आणि त्याची झालेली हमाली याची नोंद व्यापाऱ्याने ठेवावयाची असते. त्याची एक प्रत मंडळाकडे जाते. एकूण हमालांच्या मजुरीच्या ३०% रक्कम मंडळाकडे जमा होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.४.१ : हमालाच्या लेव्ही वितरण**

| अ.क्र. | प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | प्रॉव्हिडंट फंड | ८.०० |
| २ | ग्रॅच्युईटी | २.०० |
| ३ | नुकसान भरपाई | १.०० |
| ४ | पगारी सुट्टी | १.५० |
| ५ | दिवाळी बोनस | ८.३३ |
| ६ | पगारी रजा | २.०० |
| ७ | शासन व्यवस्था खर्च | ५.०० |
| ८ | किरकोळ | ०.१७ |
| ९ | राखीव निधी | २.०० |
| | **एकूण** | **३०.००** |

(स्त्रोत – हमाल पंचायत – माहिती पत्रक – १९८५)

लेव्हीचे प्रमाण एकूण हमालीच्या ३० % असावे अशी मर्यादा माथाडी मंडळाने ठरविली आहे. हे प्रमाण मंडळ ५० टक्क्यांपर्यंत वाढवू शकते.

वरीलपैकी क्रमांक ७ व ८ मधील रक्कम मंडळाकडे त्यांच्या शासनखर्चासाठी जमा होते. क्रमांक १, २, ४, ५ व ६ मधील हमालांना मिळते. क्रमांक ३ व ९ मधील रक्कम गरजेप्रमाणे हमालांना मिळते.

मंडळाचे १४ सभासद आहेत. पैकी हमालांचे प्रतिनिधी ५, व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी ५ आणि उरलेले चार शासनाचे प्रतिनिधी. दर तीन वर्षांनी प्रतिनिधींची निवड केली जाते. सभा महिन्यातून किमान एकदा घेतली जाते.

मंडळाच्या शासन व्यवस्थेत आठ कर्मचारी आहेत. सेक्रेटरी  या व्यवस्थेचे प्रमुख असून, त्यांचा पगार व इतर खर्च शासन देते. सहा लेखनिक आणि एक शिपाई यांचा पगार, भत्ते व इतर खर्च जागा भाडे दरमहा रूपये १०००/- फर्निचर, स्टेशनरी इ. खर्च बोर्डाला स्वतःच्या उत्पन्नातून करावा लागतो. क्रमांक ७ व ८ मधील रक्कम हेच उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. या व्यतिरिक्त शासनाकडून मदत अगर अनुदान मिळत नाही. सुरूवातीच्या काळात शासनाने ७५०००/- रूपयांचे कर्ज दिले होते. ते मंडळाने सव्याज फेडले. आजपर्यंतच्या अनुभवावरून असे दिसते की मंडळ या उत्पन्नातून आपला व्यवस्थापनाचा खर्च भागवू शकते. 'प्रथमच सांगितल्याप्रमाणे याजेनेचे एक प्रमुख उद्दिष्ट कामगारांसाठी कल्याणकारी योजना तयार करणे आणि राबवणे हे आहे. औषधपाणी, राहण्याची सोय, शिक्षण इत्यादी बाबतीत मी काही योजना आखल्या आहेत.'[२०]

हमालांसारख्या कष्टकऱ्यांना आर्थिक स्थैर्य, संरक्षण आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर झगडा करावा लागला. आज शासन व्यवस्थेतील हमालांना न्याय मिळवण्यासाठी झगडा करावा लागतो. या संदर्भात सर्वोच्च न्यायायालयाने २८ फेब्रुवारी, १९८५ रोजी दिलेल्या एका महत्त्वाच्या निवाड्याकडे लक्ष वेधून घेणे उपयुक्त ठरेल. अन्न महामंडळ आणि मंडळाच्या गोदामात काम करणाऱ्या हमालांच्या संघटनेमध्ये हा झगडा झाला. अन्न महामंडळाने एकतर्फी निर्णय घेऊन हमालांना प्रत्यक्ष काम न देता, कंत्राटदाराना हमाली कामाचा ठेका दिला. याविरूद्ध संघटनेने दावा केला. सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेण्यापर्यंत संघटनेला खटपट करावी लागली. सर्वोच्च न्यायालयाने मात्र अन्नमहामंडळाचा हा निर्णय चुकीचा आणि कायद्याच्या धोरणाविरूद्ध असल्याचे मत स्पष्टपणे नोंदविले. या निकालामुळे

हमालांनी झगडयाचा एक टप्पा यशस्वीरित्या पार पाडला. असे म्हणावयास हरकत नाही. निदान शासन यंत्रणेतील गोदामात तरी हमाल हे शासनाचे नोकर मानले गेले आणि सुप्रिम कोर्टामध्ये त्याचे उच्चाटन होऊन हमालाचे शोषण संपुष्टात आले.

पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचेकडून कामगारांना आजारपणातील खर्चासाठी आर्थिक मदत दिली गेली आहे. मालधक्का, ट्रान्सपोर्ट विभाग, फळ विभाग, तोलणार विभाग, कांदा बटाटा विभाग, तरकारी विभाग, भुसार विभाग, मंडई विभाग, ग्रोसरी विभाग, इतर विभागातून ८९ कामगारांना आर्थिक मदत केली आहे.

पॅरालिसेसचा अ‍ॅटॅक, पोटातील गाठीचे ऑपरेशन, पाठीतून पाणी काढणे, पोट दुखीचा त्रास, हाताचे ऑपरेशन, हृदयविकाराचा त्रास, डोळ्याचे ऑपरेशन, ब्लडप्रेशरचा त्रास, छातीचा त्रास, डोक्याचा त्रास, मलेरिया, अपेंडीक्सचा त्रास, शरीरातील पेशीचे प्रमाण कमी झाल्यामुळे किडणीचे ऑपरेशन, रक्तवाहिनी चोकअप झाल्यामुळे, शारिरीक त्रास, मणक्याचे त्रास, मानेच्या गाठीचे ऑपरेशन, टाईफाइड, हर्नियाचे ऑपरेशन, मूतखडा, साप चालवल्यामुळे, डायबेटीसचा त्रास, अशक्तपणा आल्यामुळे, पित्ताशयाचा त्रास, स्पेन्डालिसेस, अर्धांगवायू, कानाचे ऑपरेशन, आतड्याचा त्रास या कारणांसाठी कामगारांना अ‍ॅडमिट केलेले होते.

पुना हॉस्पिटल, कृष्णा हॉस्पिटल, साने गुरूजी हॉस्पीटल, कोकरे हॉस्पीटल, सह्याद्री हॉस्पीटल, काळे हॉस्पीटल, शांती क्लिनीक, शुश्रुषा क्लिनिक, द्वारका हॉस्पीटल, सेवा हॉस्पीटल, देवकाते हॉस्पीटल, पंचशील हॉस्पीटल, साई क्लिनिक, भारती हॉस्पीटल, जहांगीर हॉस्पीटल, बुधवनी हॉस्पीटल, नवजीवन नर्सिंग होम, ओंकार हॉस्पीटल, सुयोग हॉस्पीटल, नोबेल हॉस्पीटल, आनंद हॉस्पीटल, आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पीटल, श्री हॉस्पीटल, धन्वंतरी हॉस्पीटल, निळकंठ हॉस्पीटल, वैष्णवी नर्सिंग होम, रूबी हॉल, नाईक हॉस्पीटल, बोरा हॉस्पीटल, सह्याद्री हॉस्पीटल, दिवाण हॉस्पीटल, लुणावत हॉस्पीटल, साधू वासवानी मेडिकल फौंडेशन, मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पीटल, स्पंदन हॉस्पीटल, यश हॉस्पीटल या पुण्यातल्या महत्त्वाच्या हॉस्पीटलमधून कामगारानी उपचार घेतलेले आहेत.

मंडळाच्या सर्वसाधारण धोरणानुसार अनुकंपा मदत दिली जात आहे. सदर रक्कम मजुरीवरील एक टक्का नुकसान भरपाई पोटी जमा होणाऱ्या शिल्लक रकमेतून देण्यात येते. नुकसान भरपाई खात्यामधून कामगारांचा सामुदायिक अपघात विमा योजनेचा वार्षिक हप्ता देण्यात येतो. त्यानंतर मंडळाकडे उपलब्ध असलेल्या रकमेतूनच अनुकंपा मदत देण्यात येते. अपघात दावा वगळून कामगारांच्या आजारपणासाठी मंडळामार्फत नोंदीत कामगारांना अनुकंपा मदत दिली जाते. सन २००८–२००९ या वर्षामध्ये १२४ कामगारांना रू.९,७६,३७१/– तसेच सन २००९–२०१० या कालावधीमध्ये १०४ कामगारांना रूपये ७,८९,६४७/– इतकी अनुकंपा मदत मंडळाकडून देण्यात आली आहे. सन २०१०–२०११ या वर्षात ८९ कामगारांना रू.७,७७,९७४/– अनुकंपा मदत दिली आहे. यासाठी कामगार विहीत नमुन्यामध्ये फॉर्म भरून सादर करतात. सदरच्या अर्जासोबत हॉस्पीटल बिल, औषधाची बिले, तपासणीची कागदपत्रे जोडली जातात. मंडळाकडून सदरची कागदपत्रे पूना ॲडव्हेंरिस्ट हॉस्पीटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करून शिफारस दिली जाते. खालील यादीतील कामगारांना अनुकंपा मदत मिळालेली आहे.

मिलिंद गोपाळ कोंढरे, लक्ष्मण गणपत चरवड, सुखदेव गोविंद भोसले, भागीरथी विश्वनाथ माने, सुरेश शिवाजीराव तुपे, चांगदेव नामदेव गायकवाड, संजय सोमनाथ दामोदरे, देविदास दत्तात्रय मदने, विकास नामदेव मारणे, कुंडलिक लक्ष्मण मानकर, विठ्ठल पिलोबा दारवटकर, सुनिल वामनराव गायकवाड, गणेश भागुजी हिवरकर, उत्तम गोपाळ कोपले, केशव मारूती भिसे, आस्लम महमद मुलाणी, सुरेश शिवाजीराव तुपे, गोवर्धन तुकाराम बिनवडे, बाबु फत्तेखान पठाण, शेख इसाक नुरमहमंद, गणेश बाबुराव सातव, वासुदेव रावबा बिनवडे, दयानंद राजाराम गायकवाड, विजय तुकाराम घुले, सुहास दत्तात्रय हनमघर, दिलीप ज्ञानोबा टकले, गणपत मारूती मानकर, किरण भागुजी काळभोर, पोपट भागुजी गुजर, मारूती कोंडिबा शिरसट, जालिंदर उत्तम वाघ, अशोक गणपत मानकर, बाबा कोंडिबा लोंढे, मारूती पांडुरंग पवार, दादासाहेब सुरेश कदम, सिताबाई दगडू काळे, कृष्णाबाई अर्जुन पोळ, प्रतिभा मनोहर पांगारे, फुलाबाई कांतीलाल गोरे, मंगल शंकर गावडे, वैजयंताबाई बाबू कचरे या

कामगारांना पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळाने रूपये ५७२ पासून ते रूपये २०००० पर्यंतची रक्कम आजारपणात आलेल्या खर्चासाठी दिलेले आहे.

### वैधानिक लेखापरिक्षण

पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळाच्या सन २००१–०२ ते २००३–०४ आणि २००४–०५ ते २००६–०७ या सहा आर्थिक वर्षांकरीता मे. पी. बी. पुजारी आणि कंपनी आणि मे. पी. एस. बाफना आणि कंपनीने लेखापरिक्षण केले.

२००७–०८ व २००९–१० या कालावधीकरीता वैधानिक लेखापरिक्षणासाठी शरद शहा आणि कंपनी एम. एस. गोडबोले आणि असोसिएशन, एस. बी. चव्हाण आणि कंपनी सनदी लेखापरिक्षकांपैकी मे. शरद शहा आणि कंपनी, सनदी लेखापरिक्षक, गोकुळनगर, बी ११८४/४ फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००५ यांची निविदा तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने मे.शरद शहा आणि कंपनी यांची नियुक्ती करण्यात आली.

२०१०–११ या आर्थिक वर्षाकरीता विनायक बी. जोशी आणि कंपनी यांनी लेखापरिक्षण केले आहे.

माथाडी हमाल मंडळाच्या मुदत ठेवी हया राष्ट्रीयकृत बँकेत आहेत. माहे २०१० अखेर एकूण ९२.३० कोटीच्या मुदत ठेवी जमा आहेत.

### ४.४ रिक्षा पंचायत

‘डॉ. बाबा आढाव यांनी २२ एप्रिल १९९४ साली रिक्षा पंचायतची स्थापना केली. सुमारे पंधरा हजार रिक्षाचालक पंचायतीचे सभासद झाले.’[२१] सदस्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांचे सर्वसाधारण जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करायचे उद्दिष्ट ठेवले होते. आज सुमारे पन्नास हजारच्या वर रिक्षा शहरात धावत आहेत. रिक्षांच्या वाढत्या संख्येबरोबरच रिक्षावाल्यांचा प्रश्नही गुंतागुंतीचा बनत होता. पेट्रोलचे वाढते दर, भाडेवाढीला ग्राहक, आरटीओ व शासनाचा विरोध, पोलिसांकडून होणारा त्रास ही सगळी कारणे रिक्षा पंचायत उभी करण्यात होती. वाढती महागाई व पेट्रोल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर दरवाढ

मिळावी ही सुरवातीपासूनची मागणी होती. या मागणीसाठी रिक्षा बदं आंदोलन, सत्याग्रह निदर्शन करण्यात आली. मीटर प्रमाणीकरणाच्या प्रश्नांवरही आंदोलन केली गेली. मुक्त परवाना वाटपाला बंदी घालावी या मागणीबरोबरच सहा आसनी रिक्षांना पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत बंदी घालावी अशी मागणी पंचायतीतर्फे जोरदार लावून धरली गेली. या मागणीसाठी १९९४ ते डिसेंबर १९९८ या काळात आंदोलने, बंद, निदर्शन, मोर्चा, सत्याग्रह केला गेला. या आंदोलनामुळे तीन आसनी विरूद्ध सहा आसनी असा संघर्ष पेटला शेवटी सहा आसनी संदर्भात हद्द मर्यादेचा निर्णय शासनास घ्यावा लागला.

रिक्षा पंचायतीची स्थापना करण्यात हेमंत जरांडे, हाफिज खान, केशव झेंडे, विठ्ठल जाधव, बापू जाधव यांचा प्रामुख्याने सहभाग होता. रिक्षा पंचायतीच्या पहिल्या कार्यक्रमाला पुण्यातून साधारणतः २०–२५ हजार रिक्षा चालक हजर होते. पंचायतीच्या स्थापनेनंतर पुण्यात एक ते दोन हजार ठिकाणी रिक्षा पंचायतीचे फलक लावण्यात आले आहेत आणि त्याच ताकदीने रिक्षा पंचायतीचे काम सुरू आहे. पुण्यामध्ये ५५ हजार अधिकृत रिक्षा आहेत तर १५ हजार अनाधिकृत रिक्षा आहेत. या सर्वांना बाबा आढावांचा आधार आहे.

पुण्यात रिक्षा चालक–मालकांची संघटना आहे. रिक्षा पंचायत २२ एप्रिल २०१४ रोजी २० वर्षांची झाली. 'रिक्षा पंचायतीचा २० वा वर्धापनदिन साजरा होताना बाबा आढावांनी सकाळ पेपरकडे रिक्षा चालकांचे प्रश्न मांडले'[२२]. रिक्षा व्यवसायाचा चेहरा बदलण्याच्या हेतूने ही संघटना स्थापन झाली. या वाटचालीत अनेक प्रश्न मार्गी लागले, काही प्रश्न प्रलंबित राहिले. एकीकडे व्यवसायातील प्रश्न सोडवीत असतानाच रिक्षाचालकांची बाजू, अडचणी तेवढ्या प्रकर्षाने समोर आल्या नाहीत. सरकारकडून ही दुर्लक्ष होत आहे. पुणे शहरात सत्तर हजार रिक्षा व्यावसायिकांना त्यांच्याशी निगडीत विषयावर निर्णय घेताना विश्वासात घेतले जात नाही. रिक्षावाल्यांना सार्वजनिक सेवेचा दर्जा दिला जात नाही. रिक्षा चालकांकरीता कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला, पण अंमलबजावणी अद्याप झाली नाही. एकीकडे 'सी.एन.जी.' इंधन वापरण्याची सक्ती केली जाते, त्याच वेळी किती पंप उपलबध करून दिले जातात? रिक्षाचालकांना तासनतास रांगेत उभे रहावे लागत आहे. हे प्रश्न

सोडविण्यासाठी सरकार आणि समाज यांच्याकडून आत्म–सन्मानाची वागणूक मिळणे गरजेचे आहे.

सर्वप्रथम १९९५ साली बाबा आढावांनी रिक्षा पंचायतीसाठी पहिले आंदोलन केले ते दीड किलोमीटर साठी पैसे आकारले जात असे या अंतरासाठी, मीटर पासिंग करून आल्यानंतर काही रिक्षावाले मीटर फास्ट करून प्रवाशांची फसवणूक करायचे. बऱ्याच वेळा पैशावरून प्रवाशांबरोबर वादावादी व्हायची, पोलीस कारवाई करायचे. अशा काही रिक्षावाल्यांमुळे सर्व रिक्षावाल्यांचे नाव खराब होत होते. त्यासाठी बाबा आढावांनी आंदोलन केल्यानंतर ते एक किलोमीटर करण्यात आले. बाबा आढावांनी एकशे सहा कार्यकर्त्यांसह येरवडा कारागृहामध्ये पाच दिवस कारावास भोगला. सहा आसनी रिक्षा बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात १९९८ मध्ये केलेल्या आंदोलनामध्ये तीन हजार रिक्षाचालकांबरोबर डॉ. बाबा आढाव यांना अटक झाली. त्यावेळी १९ दिवसाचा संप झाला होता. देशातील सर्वांत जास्त कालावधीचा संप म्हणून रिक्षा पंचायतचा संप ओळखला जातो.

रिक्षा पंचायतीच्या स्थापनेनंतर रिक्षाच्या मागे ज्या जाहिराती लावल्या जात, त्या मिळणाऱ्या पैशातून सर्व रिक्षा चालकांसाठी विमा संरक्षण, दवाखाना खर्च, रिक्षाचा विमा व कर यातून भरला जात असल्यामुळे सर्व रिक्षा चालकांना खूप मोठा आधार मिळाला. तसेच जे रिक्षा चालक मृत्यू झाले, त्यांच्या कुटुंबियांना यातून आर्थिक मदत म्हणून एक लाख रूपये देण्यात येतात. परंतु काही अडचणींमुळे ही योजना बंद करण्यात आली. बाबा आढावांच्या प्रयत्नांमुळे जीवनश्री विमा ही नवीन योजना सुरू करण्यात आली. यामध्ये केंद्र सरकारचे १०० रू. राज्य सरकारचे १०० स्वतः रिक्षा चालकांचे ५० रू. असे १० वर्षापासून रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित मध्ये भरले जात आहेत. याचा पंधरा ते वीस रिक्षाचालकांना लाभ मिळाला आहे.

रिक्षा चालकांसाठी शासनाने घरे बांधण्यासाठी जागा द्यावी म्हणून बाबा आढावांनी १९९५ पासून मागणी लावून धरली त्याचाच परिणाम म्हणजे बिबवेवाडीत सर्व रिक्षा चालकांसाठी अठ्ठावीस गुंठे जागा मिळाली. सरकारकडून गरीब रिक्षाचालकांना विमा, ग्रॅज्युइटी, प्रॉव्हिडंड फंड, एसटी, रेल्वेमध्ये सवलत असे विविध लाभ सरकारी

कर्मचाऱ्यांप्रमाणे मिळावेत म्हणून बाबा आढाव प्रयत्न करत आहेत. पूर्वी रिक्षा व्यवसाय करताना पोलिसांचा बराच त्रास होत असे पण आता बाबा आढावांच्या रिक्षा पंचायतीचे नाव सांगताच पोलीस काही प्रमाणात नरमतात त्यातूनच बाबा आढावांच्या कामाची प्रचिती येते.

रिक्षा पंचायत आणि बाबा आढाव हे कधीही वेगळे न करता येण्यासारखे सूत्र आहे. बाबा आढावांनी रिक्षापंचायतीच्या माध्यमातून रिक्षाचालकांना शिस्त, प्रामाणिकपणा व सचोटी हे गुण शिकवले.

## ४.५ टेम्पो पंचायत

शहरामध्ये मालाची वाहतूक करणाऱ्या तीन चाकी टेम्पो चालकांच्या समस्या सुटाव्यात यासाठी बाबा आढावांनी 'टेम्पो पंचायत'ची स्थापना केली. रिक्षा चालकांप्रमाणे टेम्पो चालकांना सुद्धा सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न चालू आहेत. टेम्पो पंचायतीचा रजिस्टर नं. पी.एन.२९३४ असा आहे. अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, उपाध्यक्ष शंकर कटके, सेक्रेटरी ॲड. राम शरमाळे, सचिव भरत गेडेवाड व सदस्य टेम्पो पंचायतीचे काम पाहत आहेत. पुणे बोर्डाच्या हद्दीतील प्रवेश शुल्क रद्द करावे या मागणीसाठी पुणे जिल्हा टेम्पो पंचायतीतर्फे मे २००७ साली मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चाचे नेतृत्व बाबा आढाव यांनी केले. पाचशेपेक्षा जास्त टेम्पो चालक-मालक मोर्चात सहभागी होते. शहरात १७ हजार तीनचाकी टेम्पो चालक आहेत.

## ४.६ सामाजिक कृतज्ञता निधी

सामाजिक कृतज्ञता निधीची स्थापना १९८६ साली झाली. कार्यकर्त्यांना दरमहा नियमितपणे मानधन देता यावे हा उद्देश या निधीमागे आहे. संपूर्णपणे लोकांच्या पाठिंब्यावर उभ्या राहिलेल्या, छोट्या देणग्यातून जमा झालेला आणि कार्यकर्त्यांना आपल्या सामाजिक कृतज्ञतेचा अविष्कार म्हणून मदत करणारा असा उपक्रम भारतात अन्यत्र कोठेही पाहायला मिळत नाही. परिवर्तनाच्या चळवळीत ध्येयधुंदपणे कार्य करणारे अनेक कार्यकर्ते महाराष्ट्रभर आहेत. त्यांची जीवन निर्वाहाची अडचण अस्वस्थ करणारी असते. हा प्रश्न डॉ. बाबा आढाव

यांना जाणवला. या कार्यकर्त्यांना व्यक्तिगत मदत करण्यासाठी डॉ. बाबा आढाव, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, डॉ. राम आपटे यांनी पुढाकार घेतला. समाजात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामाप्रती कृतज्ञता म्हणून निधी गोळा करण्यात आला. '१९८६ साली ६१ लाख रूपये जमा झाले होते'[२३]. आज हा निधी कोटीच्या घरात गेला आहे. १९८६ साली नामवंत कलावंताच्या संचातून सादर झालेल्या 'लग्नाची बेडी' 'कमला' या नाटकांमधून निधी गोळा झाला, त्यानंतर 'एक उपवास कृतज्ञतेचा' हा अभिनव उपक्रम निधी संकलनासाठी महत्वाचा ठरला. शालेय विद्यार्थ्यांनी १ दिवस उपवास केला व वाचलेले रूपये फक्त ५ या कार्यकर्त्यांच्या कामाप्रती आपली कृतज्ञता म्हणून शाळेमार्फत निधीकडे सुपूर्त केले या उपक्रमाला महाराष्ट्रातून चांगला प्रतिसाद मिळाला. सातारा जिल्ह्यात २ ऑक्टोबर १९९६ ला या उपक्रमाची सुरूवात झाली २ लाख हँडबिले छापली. ८० हजार विद्यार्थ्यांनी उपवास केला. त्यावेळी ४ लाख रूपयांचा निधी गोळा झाला.

३० जानेवारी १९९७ ला नाशिक, धुळे, जळगांव, कोल्हापूर, रत्नागिरी, नगर, सांगली, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील मुलांसाठी 'एक उपवास कृतज्ञतेचा' हा उपक्रम घेतला त्यावेळी आठ लाखापेक्षाही अधिक रक्कम जमा झाली.

२ ऑक्टोबर १९९७ ला पुणे जिल्ह्यासाठी 'एक उपवास कृतज्ञतेचा' हा उपक्रम घेण्यात आला. सुमारे ३ महिने ही मोहीम चालली. डॉ. बाबा आढाव, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, डॉ. नरेंद्र दाभोळकर, श्री. शिवाजीराव खैरे यांनी प्रत्यक्ष मोहिमेत सहभाग घेतला. पुणे जिल्ह्यातून जवळपास सहा लाख पन्नास हजार रूपये जमा झाले.

डॉ. श्रीराम लागू यांनी लिहिलेल्या आणि पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या रूपवेध या पुस्तकात पान ३५०, ३५१, ३५२ वर 'सामाजिक कृतज्ञता निधी' या विषयीचे सविस्तर लेखन वाचायला मिळते. डॉ. श्रीराम लागू लिहितात, 'सामाजिक कृतज्ञता निधी' ही कल्पना मुळात डॉ. राम आपटे यांची त्यांच्याबरोबर बाबा आढाव, नरेंद्र दाभोळकर ही मंडळी होती. अंतःप्रेरणेने समाजकार्य करणाऱ्या मुलांच्या उपजीवीकेची सोय पाहण्यासाठी काही निधी उभारावा, अशी त्यांची कल्पना होती.

### ४.६.१ कार्यकर्त्यांचे मानधन

मानधन योजनेस १९८६ साली सुरूवात झाली तेव्हा प्रत्येक कार्यकर्त्याला दरमहा रूपये ४०० देण्यात येत होते. ही रक्कम वाढून पुढे ६०० करण्यात आली 'एक उपवास कृतज्ञतेचा' यामधून संकलित झालेल्या निधीमुळे प्रत्येक कार्यकर्त्याला दरमहा १००० रूपये दिले गेले. २०१४ सालापासुन महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना दरमहा रू, १५००/– सामाजिक कृतज्ञता निधीच्या वतीने मानधन दिले जाते. हे मानधन प्रत्येक कार्यकर्त्याच्या बँक खात्यात दरमहा जमा होते.

### ४.६.२ सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे दिले जाणारे पुरस्कार

सामाजिक संघर्षाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यास प्रतिवर्षी साथी एस. एम. जोशी यांच्या नावाने एक पुरस्कार दिला जातो. तो पाच हजार रूपयांचा आहे. डॉ. राम आपटे यांनी निधीला दिलेल्या देणगीच्या व्याजातून हा पुरस्कार दिला जातो. निधीचे विश्वस्त दिवंगत डॉ. राम आपटे यांच्या स्मृतिसाठी पु. ल. देशपांडे यांनी दिलेल्या देणगी रकमेच्या व्याजातून याची सुरूवात केली. तिसरा पुरस्कार निधीने स्वत: चालू केला आहे. ७५ वर्षे ओलांडलेल्या आणि आयुष्यभर कोणतीही अपेक्षा न बाळगता परिवर्तनाच्या कामास वाहून घेतलेल्या ज्येष्ठ व्यक्तिस हा अकरा हजार रूपयांचा पुरस्कार दिला जातो.

'१९९७ सालच्या विश्वस्त मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. बाबा आढाव होते.'[२४]. अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू कार्यवाहक डॉ. नरेंद्र दाभोळकर, कोषाध्यक्ष ताहेर पुनावाला. सदस्य निळू फुले, विजय तेंडूलकर, सदाशिव अमरापूरकर, कृ. रा. लंके, ॲ. आ. द. काळे. प्रा. रूपा कुलकर्णी, प्रा. पुष्पा भावे. गजानन खातू, डॉ. अनिल अवचट, श्री. शेखर सोनाळकर, श्री. डॅडी देशमुख, डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. प्रताप बोरडे ही सर्व मान्यवर मंडळी होती.

सामाजिक कृतज्ञता निधी तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे मानकरी पुढीलप्रमाणे :

**साथी एस.एम. जोशी पुरस्कार**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९२ – | विष्णू ढोबळे | – | औरंगाबाद |
| १९९३ – | दत्ता इस्वलकर | – | मुंबई |
| १९९४ – | काळूराम दोधडे | – | ठाणे |
| १९९५ – | नागेश हटकर | – | मुंबई |

१९९६ – मोहन हिराबाई हिरालाल – गडचिरोली

१९९७ – ज्ञानोबा घोणे – भोर, जि. पुणे

१९९८ – डॉ. भारत पाटणकर – कासे गाव, जि. सांगली

**डॉ. राम आपटे पुरस्कार**

१९९२ – महमंद खडस, अरूण ठाकूर

१९९३ – डॉ. आ. ह. साळुखे

१९९४ – मनोहर कदम

१९९५ – शांताराम कदम

१९९६ – किशोर बेडकिहाळ

१९९७ – अतुल देऊळगावकर

१९९८ – संजय संगवई

**कृतज्ञता पुरस्कार**

१९९४ – श्री. बाबूमियाँ बँडवाले – श्रीगोंदा

१९९५ – आचार्य केळकर – पुणे

१९९६ – गंधे गुरूजी – जळगाव

१९९७ – बापूसाहेब पाटील – कोल्हापूर

१९९८ – दशरथ तात्या पाटील – धुळे

आदिवासी, भटके–विमुक्त, दलित, हमाल वेठबिगार, शेतमजुर सर्व प्रकारचे असंघटित कष्टकरी, देवदासी, वेश्या, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्त, पर्यावरण, धरण व प्रकल्पग्रस्त अशा विविध क्षेत्रात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून त्यात्या वेळी कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना निधीतर्फे मानधन देण्यात आले. मानधन प्राप्त कार्यकर्त्यांची नावे जिल्हासह पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | लाभार्थीचे नांव | जिल्हा | अ. क्र. | लाभार्थीचे नांव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. रजनीकांत | अकोला | ६६) | नारायण अतिवाडकर | बेळगांव |
| २) | श्री. शंकर हरी बागडे | बुलढाणा | ६७) | श्री. शिवाजीराव नवघरे | बुलढाणा |
| ३) | श्री. जनक कडू | अमरावती | ६८) | श्री. रविंद्र सुखटणकर | ठाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४) | श्री. शाम मानव | नागपूर | ६९) | श्री. उत्तम रत्नू पवार | सिंधुदूर्ग |
| ५) | श्री. नागेश चौधरी | नागपूर | ७०) | मोहन गुंजाळ | नाशिक |
| ६) | शुभदा देशमुख | गडचिरोली | ७१) | मारूती तात्याराव बनसोडे | उस्मानाबाद, |
| ७) | मेधा पाटकर | धुळे | ७२) | राजाराम म्हस्के | सांगली |
| ८) | श्री.भिमराव म्हस्के | धुळे | ७३) | सिताराम पवार | नांदेड |
| ९) | रझिया पटेल | औरंगाबाद | ७४) | बाळकृष्ण जगताप | कोल्हापूर |
| १०) | श्री. राजकुमार घायाळ | बीड | ७५) | तुषार नातू | नाशिक |
| ११) | श्री. वासुदेव रघुनाथ भुसारी | नांदेड | ७६) | लक्ष्मीकांत गडम | सोलापूर |
| १२) | श्री. विश्वनाथ शिवमूर्ती तोडकर | उस्मानाबाद | ७७) | बाबा पानसरे | पुणे |
| १३) | श्री. लक्ष्मण मारूती गायकवाड | लातूर | ७८) | संपतराव पवार | सातारा |
| १४) | श्री. सुभाष निंबाळकर | लातूर | ७९) | विलास भोंगडे | नागपूर |
| १५) | श्री. समीर गुलाब मणियार | अहमदनगर | ८०) | दामाजी दोरे | रायगड |
| १६) | अॅड. सुरेखा दळवी | रायगड | ८१) | अल्का महाजन | रायगड |
| १७) | श्री. रामभाऊ नवश्या वाढू | ठाणे | ८२) | अंजनाबाई गोणते | पुणे |
| १८) | श्री. महंमद युसुफ | मुंबई | ८३) | कादरखान पठाण | नांदेड |
| १९) | सुशिला मल्लू नाईक | निपाणी | ८४) | अण्णासाहेब जाधव | सातारा |
| २०) | श्री. बापूसाहेब दत्तोबा भोसले | इचलकरंजी | ८५) | कुंजबिहारी | भुसावळ |
| २१) | श्री. महादेव सोपान सरतापे | सातारा | ८६) | कविता कांबळे | निपाणी |
| २२) | श्री. सलीम अ. शेख | इंदापूर | ८७) | कमल बोराडे | उस्मानाबाद |
| २३) | श्री. शिवाजी अंबालाल जाधव | पुणे | ८८) | मंदाकिनी आंधळे | मुंबई |
| २४) | गौराबाई सलवादे | गडहिंग्लज | ८९) | भानुदास झांजले | भोर |
| २५) | श्री. वसंत फुटाणे | अमरावती | ९०) | प्रतिभा शिंदे | धुळे |
| २६) | श्री. हरीभाऊ तेलंग | चंद्रपूर | ९१) | शालन वाघमारे | सातारा |
| २७) | श्री. अप्पा करपे | अहमदनगर | ९२) | रेहाना बैलीम | यवतमाळ |
| २८) | श्री. जयवंत मठकर | पुणे | ९३) | रघुनाथ बाबू कसबे | पुणे |
| २९) | श्री. बाळासाहेब इरगोंडा पाटील | कोल्हापूर | ९४) | काशीबाई बळीराम सातभाई | धुळे |
| ३०) | डॉ. भीमराव गस्ती | बेळगांव | ९५) | तात्याबा दगडू साळुंके | सातारा |
| ३१) | श्री. सुरेखा शिंदे | फलटण | ९६) | प्रविण राजाराम येरूरणकर | मुंबई |
| ३२) | श्री. मोहन गुंजाळ | नाशिक | ९७) | सुरैय्या निजाम शेख | नाशिक |
| ३३) | श्री. वाहरू सोनवणे | धुळे | ९८) | संतोष बापूराव यावले | अमरावती |
| ३५) | श्री. दिलावर दलवाई | रत्नागिरी | ९९) | लक्ष्मण परशुराम खुने | उस्मानाबाद |
| ३६) | सलमा शिरोळकर | सांगली | १००) | सुधाकर ज्ञानदेव गायकवाड | पुणे |
| ३७) | श्री. ज्ञानेश मावळे | नागपूर | १०१) | लता प्र. म. | मुंबई |
| ३८) | श्री. राजाराम साबळे | लोणावळा | १०२) | शहाजी दादासाहेब शिंदे | निरा |
| ३९) | श्री. सुभाष लोमटे | औरंगाबाद | १०३) | राधेश्याम फुलचंद रजपूत | जालना |
| ४०) | हरिश्चंद्र सुडे | लातूर | १०४) | मारूती श्रीपती चिखले | भोर |
| ४१) | विश्वनाथ लक्ष्मण मयेकर | रत्नागिरी, | १०५) | कमल परूळेकर | सिंधुदुर्ग |
| ४२) | श्री. बाबूराव घोलप | सातारा | १०६) | उदय चव्हाण | सातारा |
| ४३) | डॉ. जी. एन. पदकी | इचलकरंजी | १०७) | इंदल चव्हाण | जळगाव |
| ४४) | नंदकिशोर नाळे | पुणे | १०८) | शिवाजी जगताप | उस्मानाबाद |
| ४५) | डॉ. हरिश घुरट | नागपूर | १०९) | मेहताबबी शेख | पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६) | श्री. लिंबाजी खताळ | धुळे | ११०) | मुकुंद दीक्षित | नाशिक |
| ४७) | श्रीमती मालती श्रीराम | मुंबई | १११) | अविनाश पाटील | जळगाव |
| ४८) | श्री. रंगा राचुरे | उदगीर | ११२) | लता पवार | अहमदनगर |
| ४९) | श्रीमती चंदाबाई बारामते | गडहिंग्लज | ११३) | नितीन पवार | पुणे |
| ५०) | कमल डोके | पुणे | ११४) | सूर्यभान सदाशिव खोब्रागडे | चंद्रपूर |
| ५१) | शरद फापळे | पुणे | ११५) | चंद्रकांत विठ्ठलराव वानखेडे | यवतमाळ |
| ५२) | युवराज फुलझेले | नागपूर | ११६) | देवानी नवलू तोफा | गडचिरोली |
| ५३) | शेख हसन कादरी | अकोला | ११७) | कविता काळोखे | अहमदनगर |
| ५४) | अशोक चोपडे | वर्धा | ११८) | सुरेखा भीमराव गाडे | पुणे |
| ५५) | लक्ष्मीबाई कानडे | अहमदनगर | ११९) | संजय दौलत महाजन | नंदुरबार |
| ५६) | बानो सय्यद | पुणे | १२०) | वाघू मारूती दळवी | लोणावळा |
| ५७) | नरसिंग परदेशी | अमळनेर | १२१) | विनायक जयवंतराव जामगडे | नागपूर |
| ५८) | महिंद्र इंदूलकर | रत्नागिरी | १२२) | राजाराम रा. जाधव | सातारा |
| ५९) | संजय देशमुख | सातारा | १२३) | पन्नालाल सदू राजपूत | नागपूर |
| ६०) | रामकुमार रायवाडीकर | लातूर | १२४) | भाऊराव हरिभाऊ आटपले | जालना |
| ६१) | यशवंत बाबूराव फडतरे | सोलापूर | १२५) | नसीमा महम्मद अमीन हूरजूक | कोल्हापूर |
| ६२) | रमेश वसावे | धुळे | १२६) | शांताबाई डांगे | लातूर |
| ६३) | राजन मधुसूदन वेलींगकर | पुणे | १२७) | संजय जॉलेन्द्रनाथ चोणकर | मुंबई |
| ६४) | सुर्यभान बनकर | औरंगाबाद | १२८) | दिलीप बाबूराव वाघमारे | पुणे |
| ६५) | बाळासाहेब हिरामण साळवे | नाशिक | १२९) | शामभाई पु. ठाकूर | नागपूर |

या कार्यकर्त्यांना मानधन दिले आहे.

## ४.७ जागृत अपंगाची संघटना

अपंगांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बाबा आढावांची जाणीव जागृत संघटना व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली स्वाभिमानी अनोखे व्यक्तिमत्व कल्याण संस्था व संयुक्त अपंग हक्क समिती अनेक वर्षापासून कार्य करीत आहेत. अपंगांमध्ये अंध, अस्थिव्यंग, मूक / कर्णबधीर आणि मतिमंद या चार प्रमुख प्रवर्गाचा उल्लेख होतो. त्याशिवाय बहुविकलांग, आत्ममग्न असणाऱ्यांचाही समावेश अपंगामध्ये होतो. अपंग व्यक्तींचे सर्वांगीण पूनर्वसन व्हावे या उद्देशाने केंद्राने अपंग व्यक्ती कायदा, अपंग पुनर्वसन कायदा, राष्ट्रीय न्यास कायदा असे काही कायदे केले. राज्य सरकारनेही अपंग कल्याणाच्या योजना राबविण्याकरीता कृती आराखडा केला. स्वतंत्र आयुक्तालयाची निर्मिती केली. तरी अपंगांवर होणारे अन्याय कमी होत नाहीत. त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होतच आहे. बाबा आढावांच्या मते अपंगांना समाजामध्ये

तिरस्काराने वागविले जाते. कार्यालयात, कामाच्या ठिकाणी तुच्छतेची वागणूक मिळते. अपंगांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक वेळा मोर्चा, निदर्शने करावी लागतात. जाणीव जागृतीच्या माध्यमातून मानव कांबळे, रामदास म्हात्रे यांनी बाबा आढावांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षे अपंगासाठी कार्य केले. मुळशी तालुक्यातील माण येथील महात्मा फुले अपंग प्रशिक्षण केंद्र सुरू आहे. या केंद्रातून अपंग विद्यार्थ्यांना व्यावयायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. आर्थिक उत्पन्नाचे साधन व रोजगार निर्मितीचे साधन या प्रशिक्षण केंद्रातून अपंग विद्यार्थ्यांना दिले जाते. अपंगासाठी अनेक संस्था संघटना कार्य करीत आहे.

हरिदास अशोक शिंदे हे दोन्ही पायांनी अस्थिव्यंग अपंग (१००%) आहेत. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पांचग्री या गावातून १९९२–९३ साली शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात आले. अपंगाच्या एका विशेष शाळेत त्यांचे १० वी. पर्यंतचे शिक्षण झाल्यावर ते पुन्हा गावी गेले महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना अपंगांच्या समस्यांची जाणीव झाली.  त्यांनी अपंगांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी कार्य सुरू केले. सुरूवातीला कामाचे स्वरूप खुप छोटे होते. पुढे ते पुन्हा पुण्यात आले पुढील शिक्षण घेत एकीकडे कार्य चालु ठेवले कला शिक्षक पदविका (ए.टी.डी.) पर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांना आपल्याच शाळेत अर्थात त्यांनी १० वी. पर्यंत शिक्षण घेतलेल्या अपंगांच्या विशेष शाळेत कलाशिक्षक म्हणून नोकरी मिळाली त्या शाळेत शालेय शिक्षणाबरोबरच धंदेपूर्व शिक्षण तसेच अपंग व्यक्तींसाठी न्याय केंद्र होते. आपल्याच शाळेत रोजगार मिळाल्यामुळे शिंदे अतिशय आनंदाने काम करत असत. शाळेतील विद्यार्थ्यांसोबत त्यांचे मैत्रिचे संबंध होते. शाळेचा माजी विद्यार्थीसुद्धा शाळेत आल्यावर शिंदेंना भेटल्याशिवाय जात नसे.

एके दिवशी असाच एक माजी विद्यार्थी शाळेत आला त्याच्या काहीतरी घरगुती अडचणी सोडवण्यासाठी शाळेतील न्याय केंद्राची माहिती घेण्यासाठी शाळेच्या संचालकांना विचारपूस केली त्या संचालकाने त्याला माहिती तर दिलीच नाही उलट लंगड्या बाहेर हो असे म्हणत त्याला शिवीगाळ करत धक्काबुक्की केली त्या अपंग विद्यार्थ्याचे मानसिक संतूलन बिघडले त्याला काही सूचेनासे झाले. सर्व कर्मचारी उघड्या डोळ्याने प्रसंग पहात होते. परंतु कोणीही काही भूमिका घ्यायला तयार नव्हते. शेवटी हरिदास शिंदेंनी आपली शाळेची वेळ

संपताच त्या अपंग विद्यार्थ्याची भेट घेतली. त्याची मानसिकता थेट आत्महत्तेपर्यंत गेली होती. त्याला शांत करून शिंदेंनी समजावले व स्वत: शिक्षक असताना आपल्या शाळेच्या बेजबाबदार संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी त्या अपंगाला मदत केली नंतर विविध वृत्तपत्रातील बातम्यांमुळे प्रकरण खूपच तापले शिंदेवर खूप दडपण होते. एकीकडे नोकरी व दुसरीकडे 'अपंग व्यक्तीला मारहाण करणाऱ्या संचालकावर कडक कारवाई करण्यासाठी डॉ. बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली एक मोर्चा काढण्यात आला'[२५]. त्यानंतर संयुक्त अपंग हक्क सुरक्षा समिती सुरू करण्यात आली. आठवड्यातून एकदा बाबा आढावांसोबत सर्व कार्यकर्त्यांची बैठक होते या बैठकीत कामाच्या आढाव्यासह पुढील नियोजनही केले जाते.

आजपर्यंत बाबा आढावांच्या मार्गदर्शनाखाली या समितीने अपंगाना मोफत बसपास योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला. अपंग प्रमाणपत्र वितरणातील अडथळे, सार्वजनिक ठिकाणी अडथळा विरहीत वातावरण निर्मिती सर्व प्रवर्गांचा समांतर विकास होण्यासाठी प्रचलित कालबाह्य योजनांचे पुनर्विलोकन तसेच नवीन योजनांसाठी विविध मागण्या करणे, चर्चासत्रे मोर्चे, आंदोलने आदी कार्यक्रम सुरू केले आहेत.

### ४.८ अंधश्रद्धा निर्मूलन समिती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चळवळ गेली २५ वर्षे जिद्दीने महाराष्ट्रात शोषण आणि विषमतेविरूद्ध संघर्ष करीत आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या मार्गदर्शनाखाली आणि ज्येष्ठ विवेकवादी कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या प्रेरणेने ऑगस्ट १९८९ मध्ये महाराष्ट्र अंनिस ची स्थापना झाली. सुरवातीस उपेक्षा मग उपहास, त्यातून संघर्ष अशा विविध टप्प्यांचा सामना करत संघटनेने प्रवास केला. महाराष्ट्रामधील परिवर्तनवादी चळवळीतील एक महत्त्वाची व सक्षम चळवळ म्हणून 'महाराष्ट्र अंनिस' ला मान्यता मिळाली.

बाबा आढाव सांगतात, 'अंधश्रद्धा निर्मूलन म्हणजे संवेदनशील वास्तवासोबत काम करणे'[२६]. यात शाबासकी नाहीच पण शिव्याशाप मिळण्याची शक्यताच अधिक तरीही हे सर्व सोसत अत्यंत जोशाने व लोकशाही तत्वाने कार्य केले. युवकांचा सहभाग वाढवला संघटनेला सामुहिक शिस्त निर्माण केली. त्यामुळे दरवर्षी ३००० पेक्षा जास्त व्याख्याने व चमत्कार

सादरीकरणाचे प्रयोग होतात. २५ हजारहून अधिक शिक्षक प्रशिक्षित केले आहेत. ३ लाखाहून अधिक विद्यार्थी संघटनेतर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेला बसले आहेत. राज्यव्यापी सर्पयात्रेचे आयोजन, फिरते नभांगण दाखवणे, विज्ञान बोध वाहिनी अशा उपक्रमांमधून संघटना विद्यार्थ्यांशी संवाद साधते. चर्चासत्र, सत्यशोधक यात्रा, प्रबोधन मोहिम, मासिक ध्वनिफीत, चित्रफीत अशा अनेक प्रभावी माध्यमांचा वापर करून 'महाराष्ट्र अंनिस' लोकांचे प्रबोधन करीत आहे. चळवळींनी रेटा लावल्यामुळे सरकारने जादूटोणा विरोधी कायदा संमत केला. भूत, भानामती, तथाकथित चमत्कार, करणी, जादूटोणा, मंत्रतंत्र, गंडेदोरे अशा अनेक अमानुष अनिष्ट व अधोरी प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी 'महाराष्ट्र अंनिस'ने महाराष्ट्राला मिळवून दिलेले हे प्रभावी हत्यार आहे. ज्या ज्या ठिकाणी गरज पडेल त्या – त्या ठिकाणी बाबा आढाव व त्यांचे कार्यकर्ते अंनिसच्या मदतीला धावून जातात.

### ४.९ रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्था

रिक्षा पंचायतीची स्थापना झाल्यानंतर रिक्षा चालकांची आर्थिक पत सुधारावी. त्यांच्या पाठीवरील खाजगी सावकराचा बोजा कायमचा निघावा. त्या कर्जातून रिक्षा चालकांनी मुक्त व्हावे या हेतूने 'बाबा आढावांच्या पुढाकाराने १६/०४/२००२ रोजी रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना झाली'[२७]. आज १५००० रिक्षा चालक पतसंस्थेचे सभासद असून रिक्षा चालकांना आर्थिक पत पुरवठा झाला आहे. रिक्षा दुरूस्ती व कौटुंबिक खर्चासाठी ३० हजारापर्यंतची तर नवीन रिक्षा खरेदीसाठी कमी व्याज दराच्या कर्ज योजनांची सोय पतसंस्थेत केली आहे. रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड शहरात असून पतसंस्थेला सतत 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. दि.३१/०७/२०१४ रोजी पतसंस्थेची आर्थिक स्थिती अतिशय उत्तम आहे. पतसंस्थेचा रजिस्टर नं.पी एन ए / आर एस आर / (सी आर) / १५० / सन २००२ – २०१३ दि.१६/०६/२००२ असा आहे. भवानी पेठेतील प्लॉट नं. ८९, न्यु टिंबर मार्केट येथे पतसंस्थेचे कार्यालय असून १४६१ सभासद संख्या आहे. एकूण निधी २०,३३,२१५ रूपये, संस्थेचा स्वनिधी ५५,६५,३८८ रूपये, संस्थेच्या ठेवी ६०,३७,७३१ रूपये, गुंतवणूक ३८,६९,५५४ रूपये, वसूल भागभांडवल ६८,०२० रूपये, कर्ज वाटप ९०,५९,८७६ रूपये

आहे. रिक्षा चालक–मालक सभासदांना द.सा.द.शे. १४% दराने गृहतारण, वाहन तारण, सोने तारण कर्जाची सुविधा देण्यात येते.

डॉ. बाबासाहेब पांडूरंग आढाव हे संस्थापक चेअरमन, श्री सय्यद करिम मु (व्हाईस चेअरमन), श्री. पठाण हुसेन मेहबूब मानद सचिव, श्री.लवटे तानाजी शंकर, जॉ. सेक्रेटरी तर संचालक मंडळात चव्हाण सिद्धार्थ शंकर, शिंदे रघुनाथ सिताराम, वाढवणे सुभाष रघुनाथ, वाघमारे प्रकाश मारूती, बेलमकर आनंद कृष्णाजी, कदम रावसाहेब सोपानराव, घोगरे सोपान शंकर, सय्यद यासीम महमंद, गाडे शैलेंद्र माधवराव, खान अब्दुल हफिज हे सदस्य कार्यरत आहेत.

सभासद रिक्षावाल्यांना लग्न, अपघात, आजारपण किंवा इतर कारणासाठी कर्ज दिले जाते. गरीब रिक्षाचालकांसाठी पाचवी पासून पुढच्या मुलांना वह्या वाटप केले जाते.

### ४.१० कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायत

'डॉ. बाबा आढावांची महात्मा फुले समता प्रतिष्ठान दलित स्वयंसेवक संघ, एस. एन. डी. टी. च्या प्रौढशिक्षण केंद्रातील लक्ष्मी नारायण व पूर्णिमा चिकरमाने यांच्या एकत्रित प्रयत्नातून १९९३ मध्ये कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायतीची स्थापना झाली.'[२८] कचरावेचकांची ट्रेड युनियन बांधणं टिकवणं आणि एका राजकीय दबाब गटात रूपांतरीत करणं ही अशक्य वाटणारी गोष्टी बाबा आढावांनी करून दाखविली आहे. सरकारी दरबारी सातत्यांने प्रश्नांचा पाठपुरावा करत. ताजे प्रयोग, प्रयत्न, उपक्रम राबवत पंचायत कार्य करत आहे. कचरा वेचण्याच्या कामात गरीब माणसांचा भरणा जास्त आहे. फाटक्या अवस्थेत जगत असलेली ही कचरा वेचक माणसं जातीय आणि वर्गीय उतरंडीत आज सर्वात तळाला आहेत. कुंडीत उतरून, रस्त्यावरून, डंपिंगवरच्या असह्य घाणीतून बरा कचरा वेचून, विकून आपापली घरं चालवत आहेत. शहरी कचऱ्याच्या विल्हेवाटीला थेटपणे मदत करत आहेत. या कचरा वेचकांची सेवा शहर वासियांना हवी असते. पण ही माणसं नकोशी असतात मूलभूत प्रश्नांच्या घेऱ्यातून सुटता सुटत नसलेल्या या माणसांकडे पाहायला कुणीच तयार नाही अशी परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर, व्यवस्थेला या कचरावेचकांकडे पाहायला लावण्याचं काम 'पंचायत करत' आहे.

पोलिसांकडून होणारा छळ आणि व्यापाऱ्यांकडून होणारं आर्थिक शोषण हे दोन कचरा वेचक बाईच्या दृष्टीने कळीचे प्रश्न या मुद्यांना धरून सुरूवातीला पंचायतीने संघर्ष सुरू केला. कचरावेचक बाई हे पोलिसांसाठी संशयाचं सॉफ्ट टार्गेट. चोरी केल्याचा संशय म्हणून चौकीत बोलावून दमदाटी केली जात होती. पंचायत नव्हती तेव्हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार होता. परंतु आता पंचायतीने दमदार पर्याय बायकांना दिला आहे. पंचायतीच्या सर्व सभासद महिलांना अधिकृत ओळखपत्रे दिली. त्यामुळे कचरावेचक बाईला ओळख मिळाली. ही बाई एकटी राहिली नाही आता तिच्यामागे संघटना आहे. असा दाब तयार झाला. त्यामुळे अत्याचाराचं प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले. पंचायतीच्या भरवशावर कचरावेचक बायकांनी गुत्यावरची दारूची पिंप उलथी पालथी करून टाकली. ती व्यापाऱ्यांकडून मालाची पक्की पावती मागू लागली. कचरावेचकांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाला निवेदन देण, मध्यमवर्गीय कॉलन्यांमध्ये पत्रकं वाटणं. खासदार, आमदार, महापौर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अजेंड्यावर कचरा वेचकाचे प्रश्न यावेत म्हणून बहुसंख्येने रस्त्यावर उतरण्याचे धाडस पंचायतीने दाखविले कचरावेचक महिलांचे बचत गट सुरू केले. सावकारी कर्जाच्या विळख्याला छेद देणारा ' कागद, काच, पत्रा, सहकारी पतसंस्थे' चा प्रयोगही त्यातूनच उभा राहिला या पतसंस्थेचे ३२०० च्या आसपास सभासद आहे. भंगार मालाची दुकानं चालवण्याचा यशस्वी प्रयत्नही पंचायतीने केला, वस्तीत वह्या वाटपाचा कार्यक्रम, शैक्षणिक कर्ज देण्याचा उपक्रम घेतला. 'पंचायती'च्या सभासद असलेल्या सर्व कचरावेचक महिलांच्या आरोग्यविम्याची जबाबदारी 'पंचायती'च्या प्रयत्नांमुळे महानगरपालिकेने स्विकारली आहे. गेल्या काही वर्षात तर 'स्वच्छ' उपक्रमांतर्गत खुद्द महानगरपालिकेने या 'पंचायती' सोबत जोडून घेतले आहे. महानगरपालिका व स्थानिक नगरसेवकांनी विकास निधीतून या कामगारांना ढकलगाडी, सायकल रिक्षा, घंटा गाडी, कचरा गोळा करायचे रबराचे साहित्य पुरवठा केला. या योजनेतून तीन हजार महिलांना काम मिळाले. कचरा वेचणाऱ्या कामगारांना व्यावसायिक प्रतिष्ठा मिळाली आहे. पुणे शहरात जवळपास सहा हजार असंघटित असुरक्षित अशा कचरावेचक महिलांना सदस्य बनवून 'पंचायती'ने एका छत्राखाली आणलं आहे.

१९९७ साली संघटनेला जेव्हा महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार मिळाला तेव्हा या पुरस्काराचे तीन लाख रूपये संघटनेच्या नावाने गुंतवण्यात आले. स्त्री सभासदांमध्ये निरक्षरतेचं प्रमाण जास्त असल्याने त्यांच्या साठी प्रौढ शिक्षण वर्ग, मुलांसाठी अनौपचारिक शिक्षण वर्ग सुरू केले आहेत. त्याशिवाय बालकामगारांचं पुनर्वसन, मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण, दारूबंदी, हुंडाबंदीची मोहीम, मोफत आरोग्य तपासणी व औषधे, सामुदायिक विवाह सोहळा इ. उपक्रम 'बाबा आढावांच्या मार्गदर्शनाखाली कागद, काच, पत्रा संघटनेचे मोहन ननावरे, दलित स्वयंसेवक संघाचे दादासाहेब सोनवणे हे घेत आहेत'[२९].

तळागाळातील कष्टकऱ्यांना पत मिळवून देण्याचे कार्य बाबा आढावांनी केल्याचे दिसून येते.

### ४.११ शेतकरी, शेतमजुर पंचायत

ग्रामीण कष्टकऱ्यांना त्यांच्या हक्कासाठी जागृत करून संघटितपणे संघर्षास सिद्ध करण्याचे दृष्टीने १९७० चे दरम्यान शेतकरी शेतमजुर पंचायतीची स्थापना महाराष्ट्रात केली. 'संघटनेच्या स्थापनेत साधी एस. एम. जोशी, बा. न. राजहंस, पन्नालाल सुराणा व डॉ. बाबा आढाव यांचा प्रामुख्याने सहभाग होता'[३०]. शेतकरी, शेतमजुर पंचायतीचा प्रचार राज्यभर झाला. १९७२ च्या दुष्काळात शेतकरी, शेतमजुर पंचायतीने पुढाकाराने मोठी जबाबदारी पार पाडली. राज्यभर दुष्काळी कामे काढून, मागेल त्याला काम द्यावे म्हणून महाराष्ट्र पिंजून काढला, त्याचबरोबर रोजगाराचा हक्क प्रस्थापित झाला पाहिजे यासाठी आग्रह धरला. इतर पक्ष संघटनांच्या संयुक्त प्रयत्नाने महाराष्ट्र शासनाला रोजगार हमीचा कायदा करण्यास भाग पाडले. १९७५ ते १९७७ च्या आणीबाणीच्या काळात डॉ. बाबा आढाव, बा. न. राजहंस हे प्रमुख कार्यकर्ते जेलमध्ये गेल्यामुळे व वार्षिक विवरण न भरल्यामुळे, संघटनेची मान्यता रद्द केली गेली, मात्र १९७९ साली पुन्हा शेतकरी, शेतमजुर पंचायत याच नावाने नोंदणी केली.

शेतकरी, शेतमजुर पंचायतच्या स्थापनेपासून ग्रामीण कष्टकऱ्यांना हक्काचे काम उपलब्ध करून द्यावे. या प्रमुख मागणीसाठी सातत्याने संघर्ष करण्यात आले. रोजगार हमी कायद्यातील मागेल त्याला काम किंवा बेकार भत्ता देण्याची तरतूद यासाठी राज्यभर दौरे केले. रोजगार हमी योजनेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी म्हणून शेतकरी शेतमजुर पंचायतने राज्य शासनाकडे ज्या मागण्या केल्या त्या पुढीलप्रमाणे.

१)  रोजगार हमी योजने अंतर्गत उत्पादन कामे प्रत्येक गावाचे ५ कि.मी. चे आत काढा.

२)  रोजगार हमीची कामे ही सर्व बांधकामाची असल्याकारणाने रोजगार हमी कामगारांना बांधकाम कामगारांचे वेतन देण्यात यावे.

३)  रोजगार हमी योजनेवरील मजुरांना दरडोई एक किलो धान्य कामाच्या मोबदल्याचा भाग म्हणून द्यावे.

४)  रोजगार हमी योजना कामाचे ठिकाणी पिण्याचे पाणी, लहान मुलांसाठी पाळणा घर, सावलीची व्यवस्था, मजुरीचा दर फलक इ. बाबींची काटेकोर पूर्तता करण्यात यावी.

शेतकरी, शेतमजुर पंचायतीने कष्टकरी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्याचप्रमाणे भूमिहीनांनी सरकारी जमिनीवर आपल्या उदरनिर्वाहासाठी केलेली अतिक्रमणे नियमित करण्यासाठी शेतकरी शेतमजुर पंचायतीने नेहमीच आग्रही भूमिका घेतली. परिणामी १९७८ व १९९० साली महाराष्ट्र सरकारला या संबंधीचे कायदे करावे लागले व राज्यातील हजारो भूमिहीनांना जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे मिळाले.

### ४.१२ पथारी व्यावसायिक पंचायत

'पथारी व्यावसायिक पंचायत या संघटनेची स्थापना १९७७ साली झाली.'[३१] पथारी व्यावसायिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम डॉ. बाबा आढाव यांनी केले आहे. या व्यावसायिकांसाठी कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करून दिले. पथारी व्यवसाय अत्यंत अस्थिर स्वरूपाचा असल्याने किमान बचत करणंही या व्यावसायिकांना शक्य होत नाही. म्हणून संघटनेच्या वतीने बचतगट योजना राबवण्यात आली. पुण्यातील साधारण वीस निरनिराळ्या विभागात संघटनेचं काम चालतं. प्रत्येक शाखेने आर्थिक उलाढालीच्या स्वरूपाप्रमाणे आपला दैनंदिन बचतीचा कोटा ठरवून घेतला आहे. तो दोन रूपयांपासून पंचवीस रूपयांपर्यंत आहे. पुणे शहरात सुमारे पन्नास हजार पथारी धारक ओत. त्यापैकी सुमारे अकरा हजार पथारी व्यावसायिकांना बाबा आढावांनी संघटनेच्या छत्राखाली एकत्र केलं आहे. पथारीवाल्यांमध्ये फळं व भाजीपाला विकणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्या खालोखाल तयार कपडे, खेळणी सौदर्य प्रसाधने वगैरेंचे विक्रेते असतात.

स्टॉलधारक, हातगाडीवाले व सोयी–सुविधेविना रस्त्यावर, पदपथावर व्यवसाय करणारे व्यावसायिक.परवाना नसणाऱ्या व्यावसायिकांना सातत्याने महानगरपालिकेच्या कारवाईला सामोरं जावं लागतं. या पथारीवाल्यांकडून विविध सेवांचा लाभ घ्यायचा मात्र त्यांना कोणतंही संरक्षण नाही. म्हणून त्यांच्यासाठी बाबा आढावांचे कार्य महत्त्वाचे ठरत आहे. पथारी व्यावसायिकांसाठी शहरात स्वतंत्र विभाग तयार करण्याची मागणी बाबा आढावांनी केली आहे.

संघटनेने वेळोवेळी केलेल्या आंदोलनाची शासनाने दखल घेतली आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानांतर्गत महानगरपालिका हद्दीतील दहा हजार पथारीधारकांना पक्की दुकानं बांधून देण्यात येणार आहेत. संघटनेच्या कामाची ही पावतीच आहे.

### ४.१३ बांधकाम कामगार पंचायत

१९९३ मध्ये बांधकाम कामगार मजुरांचे प्रश्न घेऊन बाबा आढावांनी बांधकाम कामगार पंचायत’ नावाची संघटना उभी केली[३२]. पुण्यात सुमारे दीड लाख बांधकाम मजुर असून, त्यापैकी एक लाख हे महाराष्ट्राबाहेरील स्थलांतरीत आहेत. यांचा सामाजिक स्तर पाहिला तर ह्या मजुरांमध्ये प्रामुख्याने दलित, आदिवासी, इतर मागासवर्ग व स्त्रियांचं प्रमाण अर्धे आहे. व्यवसायाचं अस्थिर स्वरूप, परप्रांतीयांची अधिक संख्या असल्याने त्यांचं संघटन करणं अवघड असतं. श्रमाच्या तुलनेत त्यांना वेतनकमी मिळतं तेही वेळेवर मिळत नाही. किंवा मजुरी बुडवण्याचेही प्रकार घडत असतात. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातांचं प्रमाणही अधिक असतं पण अपघात ग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात टाळाटाळ केली जाते. या प्रश्नांसंदर्भात आणि बांधकाम मजुरांना कामाच्या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात ही संघटना काम करते. केंद्र सरकारने बांधकाम कामगारांना सुरक्षा देणारा कायदा १९९६ साली केला. महाराष्ट्र शासनाने हा कायदा लागू करावा ही मागणी घेऊन पंचायत प्रयत्नशील आहे.

### ४.१४ सामाजिक सुरक्षा कायदा

बाबा आढावांनी १९९५ सालापासून सामाजिक सुरक्षा कायद्यासाठी सातत्याने आंदोलने केली आहेत. आपल्या देशात संघटित क्षेत्रातील समुहांचे हितसंबंध जपले जातात.

कारण त्यांचा असंतोष निवडणुकीच्या राजकारणात परवडणारा नसतो. पण मोठ्या संख्येने असलेल्या व मतदान प्रक्रियेतही मोठ्या संख्येने सहभागी होणाऱ्या असंघटितांकडे मात्र सर्वच राजकीय पक्षांचं व शासनाचं सतत दूर्लक्ष होतं. त्यांचे प्रश्न कधी निवडणुकीचा मुद्दा बनत नाहीत. डॉ. बाबा आढावांच्या प्रयत्नांनी 'अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती' अंतर्गत सर्व क्षेत्रातील असंघटित कामगारांना घेऊन सामाजिक सुरक्षा कायद्याची मागणी पुढे रेटली जात आहे. डॉ. आढावांच्या मते अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशात १९३५ पासून कष्टकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षा कायदा अंमलात आहे. पण कल्याणकारी लोकशाहीचा पुरस्कर्ता असलेला भारत मात्र त्याबाबत उदासीन दिसतो आहे. 'ही उदासीनता दूर करण्यासाठी व जनजागृतीसाठी डॉ. बाबा आढावांनी २००७ साली महाड चवदार तळे ते दिल्ली असा लाँग मार्च आपल्या ७७ व्या वर्षी आयोजित करून दिल्लीला राष्ट्रीय स्तरावरील प्रचंड निदर्शक संघटित केले.'[३३] ४५ दिवस अनेक राज्यांतून ३,२०० कि.मी.चा प्रवास करून जनतेला असंघटितांच्या प्रश्नांबाबत जागृत करण्याचे व चळवळ देशव्यापी बनवण्याचे प्रयत्न केले. या मोहिमेचा परिणाम असा झाला की आज ४० कोटी मजुरांना हा कायदा लागू झाला आहे. याचे सर्व श्रेय बाबा आढावांना जाते.

### ४.१५ मोलकरीण पंचायत

१९८० साली पुण्यात मोलकरणींनी पहिला संप केला. त्यावेळी त्यांची कोणतीही संघटना अस्तित्वात नव्हती. ना त्यांना कुठल्या सामाजिक वा राजकीय संघटनांचं पाठबळ होतं. परंतु वाढत्या महागाईने व तुटपुंज्या पगाराने त्यांना रस्त्यावर आणून संप करण्यास भाग पाडले. महागाई सतत वाढत असूनही मालकीनी त्यांचे पगार मात्र वाढवून द्यायला तयार नव्हत्या. त्यामुळे त्यांना आपल्या मागण्या मांडण्यासाठी संपाचे हत्यार उपसावे लागले. 'मोलकरीण पंचायतीची स्थापना २००२ साली पुण्यातील पूर्व भागातील दलित, मुस्लिम वर्गातील मोलकरणींनी एकत्र येऊन केली'[३४]. प्रत्येक पंधरवड्यात महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या सभागृहात मोलकरणींची मिटींग घेतली जाते. त्यांच्या समोर संघटनेचे काम त्यांच्या कौटुंबिक अडचणी, कामावरील अडचणी, आर्थिक प्रश्न इ. गोष्टींवर सविस्तर चर्चा केली जाते. पूर्वी या महिला मिटींगला आल्यावर फक्त ऐकून घ्यायच्या. परंतु आता त्यांचा

मिटींगमधला सहभाग वाढला. मोर्चे, आंदोलनात धीटपणे त्या प्रश्न मांडतात. त्यांना संघटना म्हणजे आपल्या हक्काचं व्यासपीठ वाटू लागलं आहे. प्रत्येक ठिकाणी संघटक म्हणून मोलकरीण भगिनीच विनावेतन काम करतात. संघटनेमध्ये ॲड. शारदा वाडेकर, कमल पायगुडे, राजाराम साबळे, शांताबाई पाटील, माधव घोटमुकले यांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

समाजवादी व डाव्या घरकामगार संघटनांच्या सततच्या दबावामुळे शासनाने 'महाराष्ट्र घर कामगार कल्याणकारी मंडळ कायदा २००८' हा कायदा मंजूर केला. घरेलू कामगारांसाठी ''जिल्हा घरेलू मंडळ'' नियुक्त करणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे. यासाठी संघटनेला अनेक वर्षे लढा द्यावा लागला. ही मागणी मोर्चे, आंदोलने, उपोषण इ. मार्गांनी लावून धरली होती. या कायद्यामुळे असंघटित क्षेत्रात मोडणाऱ्या महिलांना एकत्र आणता येईल. त्यांच्या कामात व वेतनात समानता आणता येईल. वृद्धापकाळात त्यांच्यासाठी भविष्य निर्वाहनिधी, फंड यांसारख्या कल्याणकारी योजना राबवता येतील. महाराष्ट्रातील घरकामगारांत महिला मोलकरणींची संख्या सर्वात मोठी म्हणजे ९२% इतकी आहे.

### ४.१६ विषमता निर्मूलन समिती

समाजात निर्माण झालेले भय, भ्रष्टाचार, भाववाढ या भीषण समस्यांमुळे समाज हैराण झाला आहे. समाजातील विषमता ही देशासमोरील गंभीर समस्या बनली आहे. दलितांवर स्त्रियांवर, अल्पसंख्याकांवर राजरोस हल्ले होत आहेत. भारताची एकात्मता धोक्यात आली तरी बेहतर अशा वृत्तीने दंगली पेटवल्या जातात व अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत. समाजातीलच वाईट प्रवृत्तीचे लोक हे करत असतात.

असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, आरक्षणा संदर्भातील प्रश्न, स्त्रियांवरील अत्याचार, बलात्काराच्या घटना, आरोग्य, गुन्हेगारी, अपंगांचे प्रश्न, भटक्या विमुक्त जमातीचे प्रश्न, शिक्षणाचे खाजगीकरणाचा प्रश्न हे सर्व प्रश्न स्वातंत्र्यानंतरही ६७ वर्षामध्ये संपले नाहीत. कारण भारतीय लोकशाहीने राजकीय समता दिली परंतु सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, सांस्कृतिक विषमता, व स्त्री पुरूष विषमता तशीच राहिली.

हे सर्व प्रश्न पुन्हा एकदा घेऊन डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली विषमता निर्मूलन शिबिरे होतात. महाराष्ट्रातील समविचारी, पुरोगामी व्यक्ती व संघटना यास चांगला

प्रतिसाद देतात. यामध्ये महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, हमाल पंचायत, महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळ, राष्ट्रीय एकात्मता समिती, राष्ट्र सेवा दल, समाजवादी महिला सभा, कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, नानासाहेब गोरे अकादमी, मोलकरीण पंचायत, मुस्लिम सत्यशोधक युवा मंच, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भारतीय बहुजन पक्ष, मिळून साऱ्याजणी, सुगावा प्रकाशन, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, स्त्रियांसाठी व दलितांसाठी काम करणाऱ्या संघटना सहभागी होतात. या सर्व समविचारी संघटनांचे निमंत्रक म्हणून बाबा आढाव काम पाहत आहेत.

सर्व भारतीयांना सन्मानाने जगता यावे यासाठी भारतीय संविधानाने संधीच्या समानतेची हमी दिलेली आहे. ही हमी वास्तवात आणण्यासाठी डॉ. बाबा आढावांच्या नेतृत्वाखालील विषमता निर्मूलन समितीचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

'१९७७ साली महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या पुढाकाराने खास करून डॉ. बाबा आढावांच्या प्रयत्नातून विषमता निर्मूलन समितीची स्थापना झाली.'[३५] बाबा आढावांची विषमता निर्मूलन समिती ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची पुरोगामी चळवळ आहे. परिवर्तनवादी संघटनांमध्ये सुसंवाद सहकार्य आणि समन्वय निर्माण घेऊन या चळवळी अधिक व्यापक व गतिमान व्हाव्यात हा या समितीचा उद्देश होता. जिथे-जिथे अन्याय होतो. तिथे-तिथे बाबा आढाव आणि समितीचे कार्यकर्ते धावून जातात. अन्याय ग्रस्तांना न्याय देण्याचा त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतात सुरूवातीच्या काळात महाराष्ट्रात विविध ठिकाणी विषमता निर्मूलन परिषदा आयोजित करण्यात आल्या, पुणे, मुंबई, लातूर, नागपूर, कोल्हापूर, बारामती, सासवड, पिंपळनेर, संगमनेर, येवला अशा विविध भागात शिबिरे झाली. विषमता निर्मूलन शिबिरे सुरू होऊन आता ३५ वर्षाहूनही अधिक काळ लोटला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या चळवळी, 'एक गाव एक पाणवठा' ची चळवळ आणि दुष्काळातून निर्माण झालेले प्रश्न यांची पार्श्वभूमी विषमता निर्मूलन शिबिर सुरू करण्यास होती. सुरूवातीची शिबीरे ही मार्च महिन्यातील १९,२०,२१ या तारखेला होत होती. महाराष्ट्रातून शिबिरासाठी अडीचशे ते तीनशेच्या दरम्यान कार्यकर्ते उपस्थित असायचे. यात प्रामुख्याने डाव्या चळवळीतील प्रत्यक्ष

लढणाऱ्या आणि विविध विचारछटा असणाऱ्या कार्यकर्त्यांचा समावेश होता. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश अशा शेजारच्या राज्यातूनही विषमता निर्मूलन शिबीरात सहभागी होण्यासाठी कार्यकर्ते येत असतात.

या शिबीरामुळे विशिष्ट क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या परिचयातून विषमताग्रस्तांच्या प्रश्नांचे व्यापक संदर्भ स्पष्ट होतात. एकमेकांच्या अनुभवांमधून मार्गदर्शन मिळते. या प्रश्नाविषयी ज्यांना आस्था आहे. पण प्रत्यक्ष कार्याचा मात्र अनुभव नाही त्यांच्यासाठी तर हे शिबीर अत्यंत उद्बोधक व विचारांना नवी दिशा देणारे ठरते. चळवळीत नव्या घटकांना समाविष्ट करून घेण्याचे फार मोठे सामर्थ्य अशा शिबिरात असते.

बाबा आढाव कार्यकर्त्यांना अनेक कानमंत्र देतात. भावी काळात विषमता निर्मूलन समितीसमोर कोणते कार्यक्रम असावेत या बद्दल चर्चा करतात. एकदा जातीअंताच्या लढाईसाठी सज्ज झाले पाहिजे. आंतर जातीय लग्न, सत्यशोधकी पद्धतीची लग्ने, समाजात घडली पाहिजेत. महात्मा फुलेंनी सांगितलेल्या ‘स्त्री शुद्रातिशुद्र’ एकजुटीचा संदेश अंमलात आणला पाहिजे, कोणाला आवडो न आवडो परंतु प्रत्येक कार्यक्रमाची सुरूवात ही महात्मा फुलेंच्या ‘अखंड’ गायनानेच व्हायला पाहिजे. परिवर्तनाचे काम हे जनतेच्या खांबावर उभे राहते. त्यामुळे जनतेवर पूर्ण विश्वास ठेवावा. कार्यकर्त्यांनी आहे त्या ताकदीवर समाधान न मानता त्यांची ताकद वाढवली पाहिजे. प्रतिकार शक्ती व चळवळींचा प्रभाव वाढवला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येणे महत्त्वाचे आहे. समाजात कष्टकरी स्त्रियांची व दलितांची संख्या जास्त आहे. त्यांच्यासाठी जनतेच्या संघटना निर्माण झाल्या पाहिजेत, आर्थिक विषमता, शैक्षणिक विषमता या विषयीचे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. रिक्षावाल्यांनी सत्यनारायणाच्या पूजेऐवजी घटनेची प्रत ठेवून पूजा केली पाहिजे. १५ ऑगस्ट व २६ जानेवारीचे चौकाचौकात कार्यक्रम घेतले पाहिजेत. प्रत्येक चौकात संविधानाची प्रत ठेवून त्याला सलामी दिली पाहिजे. राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी केलेले कार्य जनतेपर्यंत नेण्याची तळमळ कार्यकर्त्यांना बाबा आढाव बोलून दाखवतात. देशातील १२५ कोटी लोकांपर्यंत महापुरूषांचे विचार नेण्याची गरज चळवळीची आहे. तरच आपली राष्ट्रीय एकात्मता टिकून राहिल असे

बाबा आढाव सांगत असतात. निखिल वागळे यांनी लिहिलेल्या ग्रेट भेट या पुस्तकातील नरेंद्र दाभोळलकरांच्या मुलाखतीतील पान नं.१९४ वर विषमता निर्मुलन समिती संदर्भात उल्लेख आलेला आहे. दाभोळकर लिहितात, विषमता निर्मूलन समिती नावाच एक परिवर्तनवादी चळवळीतल्या कार्यकर्त्यांचं वार्षिक संमेलन दरवर्षी व्हायचं. बाबा आढाव त्यांचे नेतृत्व करायचे.

### ४.१७ निवृत्ती वेतनासाठी लढा

देशातील असंघटित कष्टकऱ्यांना त्यांचे म्हातारपण अत्यंत हलाखीच्या अवस्थेत काढावे लागते. आयुष्यभर कष्ट केल्यानंतरही वयाच्या साठीनंतरहरी त्यांना जगण्यासाठीचा संघर्ष करावा लागतो. साडे आठ कोटी कष्टकरी लोकांना असंघटित जीवन जगावे लागत आहे. या 'ज्येष्ठांना सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी सर्व असंघटित कष्टकऱ्यांना किमान निवृत्तीवेतन मिळावे यासाठी माझा लढा सुरू आहे'[३६]. देशात सार्वत्रिक पेन्शन लागू करावी यासाठी गेल्या वर्षी पुण्यात परिषद घेतली. त्यातील निर्णयानूसार संसदेच्या २०१२ सालच्या अधिवेशना वेळीही धरणे धरण्यात आले. मात्र त्या वेळी कोणताही निर्णय झाला नाही.

कष्टकऱ्यांच्या निवृत्ती वेतनासाठी २७ नोव्हेंबर २०१३ रोजी दिल्ली येथे जंतर मंतर या ठिकाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अरूणा रॉय व डॉ. बाबा आढावांनी इतर सहकाऱ्यांसमवेत धरणे धरले होते. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या घरासमोरही सत्याग्रह केला. मात्र सरकारला कोणतीही दया आली नाही. यावेळी हे आंदोलन बेमुदत चालू ठेवले. विविध राज्यातून आलेले ज्येष्ठ नागरिक या धरणे आंदोलनात सहभागी झालेले होते. दोन हजार रूपये निवृत्ती वेतन सन्मानाने द्यावे अशी बाबा आढावांची सरकारकडे मागणी आहे. धरणे आंदोलनाच्या काळात काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी, केंद्रीय ग्रामविकास मंत्री जयराम नरेश यांच्या भेटी घेतल्या. जयराम रमेश यांनी लेखी आश्वासन दिले. प्रस्ताव केंद्रिय मंत्रिमंडळासमोर ठेवला होता. परंतु दोन हजार रूपये देण्यास केंद्र सरकार तयार नाही. पाचशे रूपये देण्यास सरकारने संमती दर्शविली आहे. पण सरकारने अजून कोणताही निर्णय घेतला नाही. आजमितीला सर्वसामान्यापुढे रेशन, पेन्शन, शिक्षण आणि आरक्षण हे मुद्दे आहेत. केंद्र सरकार विविध लोकप्रिय योजनांवर कोट्यावधी रूपये खर्च करते. त्यामुळे कष्टकऱ्यांवर सुद्धा

सरकारने निधी खर्च करायला हवा. जर सरकारने पाचशे रूपये पेन्शन देण्याचा निर्णय घेतला तर एक लाख साठ हजार कोटी रूपये लागणार आहेत. या निधीची तरतूद केंद्र सरकारने पुरवणी मागण्यात करावी. अशी बाबा आढावांची मागणी आहे. प्राप्तीकरात दोन लाख कोटींच्या सवलती दिल्या जातात. अशा गोष्टी टाळून हा निधी उभारता येणे शक्य आहे. मुळात कष्टकऱ्यांचे म्हातारपण विशेषत: महिलांचे जगणे दिवसेंदिवस अडचणीचे होत आहे. दररोजच्या अन्नापासून औषधांपर्यंत त्यांना मदतीची गरज आहे. ही गरज भागविणे सरकारचे काम आहे. असे बाबा आढावांना वाटते. पाँडिचेरीसारख्या छोट्या–छोट्या राज्यांनी असंघटितांसाठी निवृत्तीवेतन योजना सुरू केली आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात वेळोवेळी मागणी करूनही दुर्दैवाने दखल घेतली जात नाही. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्राची वाट न पाहता राज्य पातळीवर निवृत्तीवेतन योजना सुरू करावी अशी बाबा आढाव यांनी मागणी केली आहे.

### ४.१८ समारोप :

डॉ. बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत असताना अनेक उपक्रमांना संस्थात्मक रूप दिले आहे. या सगळ्या संस्थामधून कष्टकरी, कामगारांच्या उत्कर्षाचा व भवितव्याचा विचार केला गेला. डॉ. बाबा आढावांनी निर्माण केलेल्या संस्था कष्टकरी कामगारांच्या मदतीला अनेकवेळा धावून तर आल्याच पण त्यापेक्षा हे महत्त्वाचे आहे की, डॉ. बाबा आढावांनी निर्माण केलेल्या संस्था कष्टकरी कामगारांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून निर्माण झाल्या.

एखाद्या संघटनेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या इतक्या उत्कृष्ट संस्था इतक्या निरंतर कालावधीनंतर चांगल्या प्रकारे चालू शकतात हे या संस्थाच्या कारभारावर दृष्टीक्षेप टाकल्यावर निदर्शनास येते.

## ४.१९ संदर्भ सूची


१) देशपांडे वसंत, हमाल पंचायत, प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, जुलै १९८९, पृष्ठ १६

२) कित्ता

३) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि.०४/११/२०१३.

४) देशपांडे वसंत, हमाल पंचायत, प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, जुलै १९८९, पृष्ठ २०

५) मुलाखत, विरूळे बापू, पुणे, दि.२५/०१/२०१४.

६) कित्ता

७) दरपत्रक, हमाल पंचायत, भवानी पेठ, पुणे, दि.२५/०१/२०१४.

८) मुलाखत, बिनवडे नवनाथ, पुणे, दि.०४/११/२०१४.

९) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि.०४/११/२०१३.

१०) मुलाखत, विरूळे बापू, पुणे, दि.२५/०१/२०१४.

११) लेख, विदुला मुकुंद गायकवाड, दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि. १ जून २००९ पृष्ठ – ४

१२) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे–१४, एप्रिल २०१४ पृष्ठ १३८

१३) कित्ता

१४) मुलाखत, विरूळे बापू, पुणे, दि.२५/०१/२०१४.

१५) देशपांडे वसंत, हमाल पंचायत, प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, जुलै १९८९, पृष्ठ ९३

१६) कित्ता

१७) कित्ता

१८) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे–३०, १४ एप्रिल २०१४, पृष्ठ १३५

१९) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि.०४/११/२०१३.

२०) कित्ता

२१) लेख, सुनिल सव्वाशे, दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि. १ जून २००९ पृष्ठ – ४

२२) मुलाखत, डॉ. आढाव बाबा, दैनिक सकाळ, दि. १० डिसेंबर २०१३ पृष्ठ ५

२३) सामाजिक कृतज्ञता निधी, द्वैवार्षिक अहवाल, १९९६, पृष्ठ ४

२४) सामाजिक कृतज्ञता निधी, परिवर्तन कोश, कार्याध्यक्ष, सामाजिक कृतज्ञता निधी, पुणे, २६ जानेवारी २००९, पृष्ठ १६६

२५) मुलाखत, शिंदे हरीदास, पुणे, दि.२६/०१/२०१४.

२६) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि.०४/११/२०१३.

२७) लेख, सिद्धार्थ चव्हाण, दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि. १ जून २००९ पृष्ठ – ५

२८) विषमता निर्मूलन शिबिर, विशेषांक, ऑगस्ट २०१४. पृष्ठ ६१

२९) मुलाखत, ननावरे मोहन, पुणे, दि.०८/०२/२०१४.

३०) सामाजिक कृतज्ञता निधी, परिवर्तन कोश, कार्याध्यक्ष, सामाजिक कृतज्ञता निधी, पुणे, २६ जानेवारी २००९, पृष्ठ १३६

३१) खरीखुरी टीम इंडिया, युनिक फीचर्स, अकरावी आवृत्ती, समकालीन प्रकाशन, पुणे दि. १५/०८/२००८, पृष्ठ १०५

३२) कित्ता

३३) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे–१४, एप्रिल २०१४ पृष्ठ १३५

३४) लेख, वाडेकर शारदा – मोलकरीण पंचायत पुस्तिका, सन २००८

३५) विषमता निर्मूलन शिबिर, विशेषांक, ऑगस्ट २०१४, पृष्ठ १०

३६) मुलाखत, बाबा आढाव, पुणे, दि.०४/११/२०१३.

प्रकरण पाचवे

# समकालीन सामाजिक चळवळींचा अभ्यास

| | |
|---|---|
| ५.१ | प्रस्तावना |
| ५. २ | समाजवादी विचारांची चळवळ |
| ५.२.१ | डॉ. लोहियांची सप्तक्रांती |
| ५.२.२ | समाजवादी चळवळींचे मूल्यमापन |
| ५.२.३ | संपूर्ण क्रांती |
| ५.२.४ | समाजवादी महिला सभा |
| ५.२.५ | राष्ट्रसेवा दल |
| ५.२.६ | छात्रभारती |
| ५.३ | शेतकरी कामगार प्रश्नांची चळवळ : शेतकरी कामगार पक्ष |
| ५.४ | आघाडी सरकारे व समाजवादी नेते |
| ५.५ | भारतीय रिपब्लिकन पक्ष |
| ५.६ | आंबेडकरी चळवळीचे अंतरंग |
| ५.७ | शंकरराव खरातांची डिफेन्स कामगार संघटना |
| ५.८ | एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमी |
| ५.९ | कम्युनिस्ट चळवळ |
| ५.९.१ | कम्युनिस्ट लोकलहर अंक |
| ५.१० | पिंपरी चिंचवड मधल्या कामगार चळवळी |
| ५.११ | भूमिहीनांचा सत्याग्रह |
| ५.१२ | मुस्लिम सत्यशोधक मंडळ |
| ५.१३ | दलित स्वयंसेवक संघ |
| ५.१३.१ | आळंदी प्रकरण |
| ५.१३.३ | काळा स्वातंत्र्य दिन |

| | |
|---|---|
| ५.१३.४ | देवदासी तक्रार समारंभ |
| ५.१३.५ | नामांतर प्रश्न |
| ५.१३.६ | स्मरणिका |
| ५.१३.७ | क्रांतीज्योत पद्‌यात्रा |
| ५.१३.८ | दलित ऐक्यासाठी प्रयत्न |
| ५.१३.९ | अण्णा भाऊ साठे स्मारक संस्था |
| ५.१३.१० | कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत |
| ५.१३.११ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक निर्माण समिती |
| ५.१३.१२ | महिलांचा सन्मान |
| ५.१३.१३ | अल्कोहोलविरोधी लढा |
| ५.१३.१४ | अण्णा भाऊ साठे व्याख्यानमाला |
| ५.१४ | अंधश्रद्धा निर्मूलन समिती |
| ५.१५ | बहुजन समाज पार्टी |
| ५.१६ | रिपब्लिकन पक्षाच्या दहा मागण्या |
| ५.१७ | बामसेफ |
| ५.१८ | दलित पँथर |
| ५.१९ | समारोप |
| ५.२० | संदर्भ सूची |

## प्रकरण पाचवे

# समकालीन सामाजिक चळवळींचा अभ्यास

### ५.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरण हे डॉ. बाबा आढाव व समकालीन सामाजिक चळवळींच्या अभ्यासाचे आहे. डॉ. आढाव यांचा बालपणीचा काळ हा 'राष्ट्रसेवा दल' यामध्ये गेला. राष्ट्रसेवा दलातील संस्कार घेवून पुढे त्यांनी १९५५ साली हमाल पंचायतीची स्थापना केली. हमाल, कष्टकरी, विस्थापित, श्रमिक, असंघटितांसाठी कार्य करत असतानाच त्यांचा संपर्क समविचारी असणाऱ्या समाजवादी चळवळीशी आला. समाजवादी चळवळीतील जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आचार्य नरेंद्र देव हे बाबा आढावांना गुरुस्थानी होते. डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा पगडा सर्वात जास्त होता. शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी यांच्यासाठी जे लढे उभारले गेले त्यांच्यामध्ये डॉ. बाबा आढावांचा सक्रीय सहभाग आहे.

समाजवादी महिला सभा, राष्ट्रसेवा दल, छात्र भारती शेतकरी कामगार पक्षाची चळवळ, रिपब्लिकन पक्षाची चळवळ, एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, नानासाहेब गोरे अकादमी, कम्युनिस्ट पक्षाची चळवळ, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, दलित स्वयंसेवक संघ, आंबेडकरी चळवळ, दलित पँथर यासारख्या पुरोगामी विचारांच्या चळवळींचे कार्य गेल्या ५० वर्षांपासून चालू आहे. डॉ. बाबा आढाव व त्यांच्या समकालीन सामाजिक चळवळींचा अभ्यासाचे संशोधनाच्या दृष्टीने अतिशय महत्व आहे. डॉ. बाबा आढाव यांना समकालीन असणाऱ्या चळवळींचा अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.

### ५.२ समाजवादी विचारांची चळवळ

राजकारण हे समाजजीवनाचे महत्वाचे अंग आहे. भारताचा नवा नागरिक हा क्रांतिकार्य करण्याला उत्सुक व समर्थ असला पाहिजे. तरुणांची वैचारिक व भावनिक बैठक मजबूत बनवली पाहिजे. ही समाजवादी विचारांची धारणा होती. जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, अशोक मेहता, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, कमलादेवी चटोपाध्याय, युसूफ मेहेर अली इत्यादी तरुण १९३०–३२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात काँग्रेस चळवळीत भाग घेत होते.

पुढे याच तरुणांनी १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना केली. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी काँग्रेस जे आंदोलनात्मक कार्यक्रम घेईल त्यात भाग घ्यायचा, त्याचबरोबर शेतकरी, विविध क्षेत्रातील कामगार यांच्या संघटना बांधायच्या, असे काम समाजवादी कार्यकर्ते करु लागले. कष्टकऱ्यांच्या न्याय मागण्या मान्य करुन घेण्यासाठी आवश्यक ते वर्गीय संघर्ष ही समाजवादी कार्यकर्ते करत राहिले.

१९४२ च्या 'चले जाव' ठरावात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतकऱ्यांचे व कामगारांचे राज्य स्थापन करण्याचा स्पष्ट संकल्प नोंदवण्यात आला होता. त्या चळवळीत देशव्यापी भूमिगत आंदोलने चालवण्याचे शौर्यशाली कार्य समाजवादी नेत्यांनी केले. पोलिसांच्या हाती न लागता सतत तीन वर्षे भूमिगत चळवळ चालवली. १९४८ च्या मार्चमध्ये नाशिक येथे झालेल्या अधिवेशनात काँग्रेसमधून बाहेर पडून 'समाजवादी पक्ष' (Socalist Party) या नावाने चळवळीचे कार्य सुरु झाले. १९४८ सालापासून खऱ्या अर्थाने शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी यांच्यासाठी समाजवादी कार्यकर्ते लढू लागले.

१९५२ च्या निवडणुकीत समाजवादी पक्ष पूर्ण ताकदीनिशी उभा राहिला. १९५२ च्या जून महिन्यात अन्नधान्याच्या किंमती वाढल्याने त्याविरुद्ध समाजवादी पक्षाने सत्याग्रह केला.

१९५५ साली समाजवादी नेते नानासाहेब गोरे, मधू लिमये, शिरुभाऊ लिमये आदींनी गोवा मुक्तिसाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी पणजी येथे जाहीर सभा घेऊन घणाघाती भाषण दिले. जनतेच्या चळवळीमुळे भारत सरकारला गोव्याचा प्रश्न सोडवावा लागला. १९५५ पासून सुरु केलेला लढा १९६१ मध्ये संपला. साडेचारशे वर्षांची गोव्याची गुलामगिरी आंदोलनामुळे संपवली.

गोवामुक्ति आंदोलनापाठोपाठ समाजवादी कार्यकर्त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात उतरावे लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी शेतकरी कामगार पक्ष, प्रजा सोशालिस्ट पार्टी, कम्युनिस्ट पार्टी, लाल निशाण, रिपब्लिकन, हिंदू महासभा आदी पक्षांचे नेते एकत्र येवून त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन केली.[१] त्यामध्ये आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे आदि साहित्यीक-पत्रकार सुद्धा होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यवाह म्हणून एस. एम. जोशी यांच्या नावाला संपूर्ण पाठिंबा होता. अन्य भाषिकांना त्रास होवू न देता चळवळ

शांततामय मार्गाने चालू ठेवली. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन खेडोपाड्यात पोहोचवले. अनेक स्त्री–पुरुष एकत्र येवू लागले. मध्यम वर्गीयांपासून तो कामगार वस्त्यांपर्यंत सर्वत्र समाजवादी कार्यकर्त्यांची साखळी निर्माण झाली. राज्य कारभाराची भाषा मराठी असावी हा मुख्य मुद्दा असला तरी भांडवलदारांनी मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला असल्याने राज्यभर त्यांच्याविरुद्ध कामगार व शेतकऱ्याची एकजूट उभी रहायला मदत झाली. जातीभेदांच्या भिंती ओलांडल्या गेल्या, त्या वेळी निवडणुकांत सर्वसाधारण मतदार संघातून दलित उमेदवार निवडून आले. प्रचंड सामाजिक घुसळण झाली. राज्याला समाजवादाच्या दिशेने नेण्याची भाषा नेते मंडळी आत्मविश्वासाने करु लागली. विधानसभेच्या निवडणुकीत, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात संयुक्त महाराष्ट्र समितीला भरघोस यश मिळाले. 'संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीमुळे १ मे १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र राज्याचे स्वप्न साकार झाले.'[२]

सत्तापद लोकांच्या संमतीने, म्हणजे निवडणुकीच्या मार्गाने मिळवणे हाच रास्त मार्ग होय अशी समाजवाद्यांची धारणा आहे. निवडणुका मोकळ्या वातावरणात व्हाव्यात, सर्व स्त्रिपुरुषांनी निर्भयपणे मतदान करावे. सत्ताकांक्षी राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपली भूमिका व केलेले कार्य सांगून मतदारांची मने आपल्याकडे वळवावीत, धर्मश्रध्दा, जून्या सरंजामशाही समजुती वा रुढी यांचा वापर करु नये, तसेच गुंडगिरीने धाक बसवणे किंवा पैशाचे प्रलोभन दाखवणे या गैरमार्गांचा अवलंब करु नये. राजकारण करण्यासाठी वापरायची साधने शुद्ध असावीत, अशी समाजवाद्यांची पक्की धारणा आहे. सत्ता हाती मिळवून कुठली धोरणे राबवायची व कार्यक्रम अंमलात आणायचे, यांबाबत अनेक वर्षांच्या विचार मंथनातून व विविध प्रश्नांवर केलेल्या चळवळी, त्यातून मिळालेला अनुभव या आधारे लोकशाही समाजवाद ही विचारसरणी समाजवाद्यांनी स्विकारली आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार जीवन जगता यावे, तिच्या त्या अधिकारावर कोणीही आक्रमण करु नये, स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार सर्वांना आहे. समाजाचा कारभार सर्वांना सुखकर व हितकर होईल अशा रीतीने चालवण्यासाठी त्यांच्यात परस्पर बंधुभावाची भावना असली पाहिजे आणि सर्वांना न्याय मिळावा या दृष्टीने समाजाची सर्व शक्ती–बुद्धी वापरली जावी ही मूलभूत भूमिका

कायम ठेवून परिस्थिती व तिच्यातून निर्माण झालेले प्रश्न यांचा सम्यक् दृष्टीने अभ्यासकरुन अल्पकालीन धोरणे व कार्यक्रम ठरावावेत, अशी लवचिकता लोकशाही समाजवादाला अभिप्रेत आहे. अशा प्रकारची व्यवस्था चालवण्याचे काम केवळ दंडशक्तीच्या जोरावर करता येत नाही, जास्तीत जास्त नागरिकांनी ती भूमिका विचारपूर्वक स्विकारली, तरच न्याय आणि समतेवर आधारलेली व्यवस्था सुरळीतपणे चालू शकेल. त्यासाठी नागरिकांना, त्यांच्या छोट्या छोट्या गटांना, म्हणजे समूहांना वरील विचारसरणी समजून देणे हे प्रबोधनाचे काम सातत्याने समाजवादी कार्यकर्ते करत आहेत. शेतकरी, कामगार, मच्छीमार, कष्टकरी आदि व्यावसायिकांच्या संघटना उभारायच्या तसेच महिला व युवकांच्या संघटना बांधायच्या व त्यांच्या विशिष्ट मागण्या मान्य करुन घेण्यासाठी मालकवर्ग, शासनकर्ते वा जे कोणी निर्णय घेण्याच्या स्थानावर बसले आहे, त्यांच्याविरुद्ध गरजेप्रमाणे आंदोलने करायची. मात्र ती शांततेच्या मार्गानेच चालवण्याचे बंधन पाळायचे. 'समाजाच्या विविध आर्थिक व सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी सहकारी वा स्वयंसेवी संस्था चालवायच्या हे सगळे करणे म्हणजे लोकशाही समाजवादी राजकारण करणे होय. फावडे, तुरुंग, मतपेटी ही तीन प्रतीके समाजवाद्यांनी स्वीकारली आहेत.'[३]

भारतीय राजकारणात आपण प्रभावीपणे हस्तक्षेप केला पाहिजे त्यासाठी प्रथम समाजवाद्यांची एकजूट घडवावी असे प्रजा समाजवादी पक्ष व समाजवादी पक्ष या दोन्ही पक्षांतल्या अनेकांना वाटत होते. अन्नधान्याची टंचाई, वाढती महागाई या प्रश्नांवर शहरे व खेडी सर्वत्र असंतोष वाढला होता. ते प्रश्न व त्याचबरोबर शेतमालाला किफायतशीर भाव मिळाला पाहिजे या मागण्यांसाठी महाराष्ट्रात प्रजा समाजवादी व समाजवादी पक्ष तसेच हिंद मजदूर सभा, हिंद मजदूर पंचायत यांनी आंदोलनाचा कार्यक्रम आखला. ठिकठिकाणी निदर्शने व सत्याग्रह झाले. १९६४ साली हुतात्मा चौक ते काळाघोडा असे मोर्चाने जावून सत्याग्रह करायचा कार्यक्रम सलगपणे पाच दिवस चालला. अनेक तरुण–तरुणी समाजवादी चळवळीत येवू लागल्या. त्यातच १९६५ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. जनावरांसाठी चारा व पाणी, माणसांसाठी रोजगार व स्वस्त धान्य पुरवठा आदी मागण्यांसाठी ग्रामीण भागात मोर्चे, निदर्शने झाली. दुष्काळग्रस्त स्त्री–पुरुषांसाठी समाजवादी कार्यकर्त्यांनी कपडे व धान्य जमा

करुन पाठवले. तसेच एस. एस. सी.  परीक्षेचे केंद्रे असत त्याठिकाणी खेड्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांची निवास भोजनाची सोय करणारी केंद्रे चालवली.

थोडक्यात, गोवा मुक्ति आंदोलन व संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये समाजवादी विचारांनी भारावलेल्या तरूणांनी सहभाग घेतला व त्यानंतर, महाराष्ट्रामध्ये समाजवादी विचारांच्या तरूणांचे एक प्रभावी संघटन निर्माण झाले.

### ५.२.१  डॉ. लोहियांची सप्तक्रांती

१९५४ साली समाजवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहापासून दूर जावून वेगळा पक्ष डॉ. लोहियांनी सुरु केला होता. त्यांनी सप्तक्रांतीची भूमिका मांडली होती. सात वर्षात भारत समाजवादी बनवू अशी घोषणा केली होती. त्यामधील 'अंग्रेजी हटाव' ची चळवळ मोठ्या शहरांतून चालली, नरनारी समता, चौखंबा राज, जातिप्रथा निर्मूलन व मागासांना विशेष संधी, सत्तेत भरीव वाटा या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. देशात समग्र परिवर्तनाची गती वाढवण्यासाठी डॉ. लोहियांचे विचार महत्त्वाचे ठरले.

१९५३ मध्ये अन्नधान्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले त्याविरुद्ध समाजवादी पक्षाने आंदोलन उभे केले भाववाढ सर्वसामान्य लोकांना किती जाचक आहे व ती कशी टाळता येईल याबाबत जनजागरण मोहीम सुरु केली. गावोगावी सभा घेण्यात आल्या आणि नंतर प्रत्यक्ष सत्याग्रहाला सुरुवात झाली.

'१९५४ च्या ऑक्टोबर महिन्यात हडपसर येथे महाराष्ट्राच्या पातळीवर श्रमप्रतिष्ठान मेळावा घेण्यात आला. जयप्रकाशजी भूदानाच्या कामात गेल्यानंतर देशातील युवक व युवतींना देशासाठी विधायक कामाची प्रेरणा मिळावी व त्यासाठी त्यांनी दररोज किमान एक तास काम करावे या दृष्टीने राष्ट्रसेवादलाने 'देश के लिए एक घंटा' ही घोषणा दिली.  जयप्रकाश नारायण, एस्. एम्. जोशी, भाऊसाहेब रानडे, अशी थोर मंडळी या श्रमप्रतिष्ठान मेळाव्यात सहभागी झाली होती.'[४] ५० एकर जमिनीला पाणी घालण्याचे व कसण्याचे काम तीन दिवस चालले. या वेळी जयप्रकाशजी म्हणाले, ''संघर्षाचे बरोबरीने रचनेचे काम करणेही महत्त्वाचे

आहे. तेव्हा केवळ राजकीय पक्षांनीच नव्हे तर ज्यांचा विधायक कामावर भर आहे त्या सर्वांनी एकत्रितपणे या कामाला वाहून घ्यावे.'' मेळाव्याच्या निमित्ताने श्रमप्रतिष्ठेचा संदेश पुणे शहरातच नव्हे तर महाराष्ट्रभर पोहोचविण्यात आला.

समाजवादी पक्षाच्या कामामध्ये कामगार बहुसंख्येने होते आणि नंतर शेतकऱ्यांमध्ये काम करणारी मंडळीही बहुसंख्येने होते. समाजवादावर आणि राष्ट्रवादावर ज्यांचा विश्वास आहे अशा व्यक्ती एकत्र होवू लागल्या आणि त्यातून पक्ष मोठा होत गेला.

१९५२ साली पुणे म्युन्सिपालटीचे महानगरपालिकेत रुपांतर करण्याचा मुंबई सरकारने निर्णय घेतला. जिल्ह्याचे कलेक्टर श्री. स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार मंडळ नियुक्त केले होते. पुणे महानगरपालिकेमध्ये येरवडा, घोरपडी, बोपोडी, दापोडी, खडकी, मुंढवा, हडपसर, कोंढवा खुर्द, कोथरुड, हिंगणे बु.।। ही गावे समाविष्ट करण्यात आली.

सल्लागार मंडळाने पुणे शहरातील मिळकतींसाठी कर बसविण्याचा निर्णय घेतला आणि हा मिळकत कर ग्रामीण भागालाही लागू झाला. ग्रामपंचायतीमधील घरपट्टीपेक्षा मिळकत कराची रक्कम जास्त असल्यामुळे समाजवादी पक्षाने त्याविरुद्ध आंदोलन सुरु केले. यासाठी मोहिनुद्दीन, हॅरिस, बॅरिस्टर धारीया, श्री. खेर यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात आंदोलन सुरु झाले. एकेकाळी हडपसर म्हणजे समाजवादी विचारांचा बालेकिल्ला होता. एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, मोहन धारीया, पतंगराव कदम या मंडळींनी राजकारण, समाजकारण, शिक्षण, आरोग्य, सहकार या चळवळीत काम केले. एस. एम्. जोशी व नानासाहेब गोरे हे तरुणांचे दैवते होती. त्यांच्यामुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक व बौध्दिक जडण घडण झाली. पुरोगामी विचारांचा जो चेहरा मिळाला त्यात कर्मवीर भाऊराव पाटील, एस. एम्. जोशी, नानासाहेब गोरे यांचा सिंहाचा वाटा आहे. जवळपास ६० वर्षे या त्रयीनी आपले योगदान चळवळीमध्ये दिले. नानासाहेब म्हणजे बुद्धिनिष्ट व तर्कशुद्धता यांचे मेरुमणी, संपूर्ण महाराष्ट्रात प्रबोधनाची भूमिका त्यांनी केली. एस्. एम्. यांचा रचनात्मक व विधायक कार्यावर भर असायचा. नानासाहेब त्या विचारावर प्रबोधन करायचे. पुणे शहरातील सामान्य कार्यकर्त्यांवर आप्पा मायदेव, आचार्य केळकर, प्रा. ग. प्र. प्रधान यांच्याही विचाराचा फार मोठा प्रभाव होता.

'संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हडपसरमध्ये सत्याग्रह झाले.  ३०० ते ४०० लोक जेलमध्ये गेले. २१ दिवसांची शिक्षा रामभाऊ तुपे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना झाली.'[५]

१८ जून १९८८ रोजी पुण्यामध्ये गोवा मुक्ती संग्रामातल्या स्वातंत्र्य सैनिकांचे एक अखिल भारतीय संम्मेलन पुणे शहरात भरविले होते. त्यात शिरुभाऊ लिमये, जयवंतराव टिळक वगैरे नेते सहभागी झाले होते. भारत सरकारकडून या गोवा मुक्ती लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन योजना लागू करावी यासाठी आंदोलन करण्यात आले.  १९८६ पासून पेन्शन योजनेसाठी पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश आले. ग. प्र. प्रधान, मधू दंडवते व शरद पवार यांच्या प्रयत्नाने पुण्यात येरवडा येथे 'स्वातंत्र्य सैनिक नगर' महाराष्ट्र सरकारने उभे केले आहे.

### ५.२.२ समाजवादी चळवळीचे मूल्यमापन

'समाजवाद' हा मानवी मूल्यांची जपणूक करणारा सर्वात श्रेष्ठ विचार आहे. लोकशाही समाजवादामध्ये स्वातंत्र्याचा हक्क सर्वांना दिला गेला पाहिजे यावर एकमत आहे. 'एक माणूस एक मत' ही भूमिका लोकशाहीला पोषक अशा स्वरूपाची आहे. समाजवादी विचारांनी लोकशाहीवर विश्वास व्यक्त करून जी लोकशाही समाजवादाची मांडणी केली खऱ्या अर्थाने तेच योगदान आहे.

प्रत्येक स्त्री–पुरुषाला प्रामाणिकपणे शारीरिक व बौध्दिक कष्ट करुन त्याच्या जीवनावश्यक गरजा भागविता आल्या पाहिजेत आणि स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. प्रत्येक स्त्री–पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त शक्तींचा पूर्ण विकास करण्याची त्याला संधी मिळाली पाहिजे. सुत्ररुपाने हा समाजवादाचा आशय आहे. लोकशाही समाजवादाला नैतिक अधिष्ठान आहे आणि समता हे मूल्य चिरकालीन आहे.  समतेच्या मूल्याचे बियाणे समाजवाद्याने जपले. यामध्येच समाजवादी चळवळीचा गौरव आहे. १९५३ साली पुण्यात जयप्रकाशजींनी २१ दिवस प्रायश्चित म्हणून उपोषण करताना सांगितले, 'हिंदुस्थानातील परिस्थिती बघितल्यानंतर माझे असे मत झाले की, मानवी जीवनाच्या म्हणून ज्या उर्मी

आहेत, आकांक्षा आहेत त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने मार्क्सच्या द्वंदाला विरोध पुरेसा नाही– कारण माणसाने चांगले का व्हावे याचे उत्तर त्यात मिळत नाही.'

### ५.२.३ संपूर्ण क्रांती

आपल्या समाजातील सामाजिक विषमतेला, जातीच्या उतरंडीला, अस्पृश्यतेला जयप्रकाश नारायण यांचा विरोध होता. संपूर्ण क्रांती म्हणजे जातिव्यवस्थेचे निर्मूलन झाले पाहिजे, हे सर्व तरुणांना मान्य होते. 'परंतु 'जाती तोडा', 'हुंडा घेवू नका' आदी गोष्टी चळवळीत नकोत, असे संघातील प्रमुख कार्यकर्त्यांनी एस्. एम्. यांना सांगितले.'[६]

६ मार्चला दिल्ली येथे झालेल्या मोर्चामुळे जयप्रकाशजींचे आंदोलन बिहारपुरते मर्यादित न राहता देशव्यापी झाले. नागरी हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन झालेल्या 'सिटीझन्स फॉर डेमोक्रसी' च्या कामासाठी समाजवादी पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी काम केले.

मे १९७५ मध्ये पुण्याजवळ हडपसर येथे देशातील प्रमुख समाजवादी कार्यकर्त्यांचे एक शिबिर झाले. शिबिरात एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, मधू लिमये, कर्पुरी ठाकूर, हरभजन कसंग, मधू दंडवते आदी नेत्यांनी भाग घेतला. इंदिरा गांधीनी सर्व विरोधकांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असल्यामुळे अल्पावधीत संघर्ष सुरु होईल असे सर्वांचे मत पडले. एस्. एम्. जोशी चर्चेत म्हणाले, 'मला केवळ राजकीय संघर्षात रस नाही. इंदिरा गांधींना विरोध केला पाहिजे. राजकीय लढा टाळता येणार नाही. टाळू ही नये. परंतु तो करताना या देशातील गरिबांना आणि दलितांना न्याय मिळवून देणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे याचा विसर पडणार नाही.'[७]

यावरून असे म्हणता येईल की कष्टकरी, दलित, स्त्रिया, भूमिहीन, शेतकरी, शेतमजूर यांसह सर्वांचा विकास साधणारी संपूर्ण क्रांती समाजवादी चळवळीला अभिप्रेत होती आणि त्या चळवळीच्या प्रयत्नार्थ राहणे हे समाजवादी आपले कर्तव्य समजत असत.

### ५.२.४ समाजवादी महिला सभा

'स्वातंत्र्यपूर्व काळात जाती धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादावर उभारलेली राष्ट्र सेवादल ही संघटना काम करत होती. परंतु त्यामध्ये प्रौढ स्त्रिया सेवालदाच्या शाखेवर भाग घेत नाहीत हे लक्षात आल्यावर १९५९ साली समाजवादी महिला सभेची स्थापना झाली.'[८] तसेच खास

महिलांच्या प्रश्नांवर काम करण्याची गरज भासू लागली. स्त्रियांवर होणारा अन्याय, तिला मिळणारी दुय्यम वागणूक, ह्याची तिला जाणीव करुन दिली पाहिजे व ह्या अन्यायाविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य तिच्यात आले पाहिजे या जाणीवेने संघटना उभी राहिली. लोकशाही समाजवादावर निष्ठा असणाऱ्या स्त्रियांची संघटना हे प्रमुख उद्दिष्ठ होते. स्त्रियांनी देशाचा एक जबाबदार घटक व जागरुक नागरिक म्हणून तयार व्हायला झगडले पाहिजे असे महिला सभेचे मत होते. स्त्रियांना समाजात स्थान निर्माण करण्यासाठी त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी अभ्यासमंडळे, चर्चासत्रे, शिबीरांचे आयोजन करण्यात आले. या दृष्टीने अभ्यास मंडळाचा कार्यक्रम आखण्यात आला. प्रत्येक शाखेवर त्यांच्या सोयीने साप्ताहिक, पाक्षिक अभ्यासमंडळे सुरु झाली. अभ्यासाबरोबर ध्येयगीते, समूहगीते, आसने, हस्तकला, पाककला इ. विषय या शिबीरातून घेतले जात. गरीब मागास भागांतून बालवाड्या सुरु केल्या. क्रीडाकेंद्र, वाचनालय, आरोग्य, हस्तकला, उद्योग हे प्रयोग घेण्यात आले. पुणे शहरात मंगळवार पेठेत 'आवाबेन नवरचना केंद्र' कार्यरत आहे. १९६५ च्या सुमारास समाजवादी महिला सभेने गृहिणी शिक्षक वर्ग ही एक वैशिष्ठ्यपूर्ण योजना सुरु केली. यामध्ये स्त्रियांचे नवीन कायदे, स्त्रियांच्या चळवळी, तिचे हक्क, त्याचबरोबर आरोग्य शास्त्र, बालसंगोपन शास्त्राचे शिक्षण दिले जाते. स्त्रियांसाठी उद्योग केंद्रे सुरु केली. आजही पुणे सांगली, मुंबई, ठाणे येथे उद्योगकेंद्र चालू आहेत. समाजवादी महिला सभेने समाजात होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सतत संघर्ष केला. महागाई विरोधी मोर्चा, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, महिला अन्याय निवारण्यासाठी परित्यक्त्यांचा मोर्चा व मागण्यासाठी आंदोलन, स्त्री अत्याचार विरोधात मोर्चा काढला. समाजवादी महिला सभेने सोप्या भाषेतील १८ पुस्तके प्रकाशित केली. समाजवादी महिला सभेची दरवर्षी चौदा हजार वार्षिक वर्गणी जमते. देणग्या घेतल्या जातात व विशिष्ठ प्रकल्पासाठी सरकारी अनुदानही घेतले जाते.

### ५.२.६ राष्ट्र सेवा दल

धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा, राष्ट्रीयता, लोकशाही व समाजवाद या पाच मुल्यांवर आधारलेली संघटना म्हणजे राष्ट्र सेवा दल. राष्ट्र सेवा दल ही राष्ट्रासाठी आदर्श नागरिक बनवणारी बिनभिंतीची शाळा आहे. समाजसेवेच्या परिवर्तनवादी चळवळीत झोकून देण्याचे

कार्य सेवादलात होत आहे. सेवादलाचा समूहगानावर विशेष भर आहे. साने गुरुजी, वसंत बापट, यांची भावसधन गाणी आजही घराघरातून, शाळेतून, आकाशवाणीवरुन म्हटली जातात. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे दरवाजे दलितांसाठी उघडावेत म्हणून साने गुरुजींनी उपोषण केले होते. त्या आधी महाराष्ट्रात कलापथकाने जनजागरणाचा दौरा केला. लोकरंजनातून लोकशिक्षण हा कलापथकाचा गाभा होता. कवी वसंत बापट व साथीदारांनी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला.

सेवादलाने एक वर्ष श्रमदान पथक संघटित केले. शेकडो मैल रस्ते बांधले, तळी तयार केली, शाळा बांधल्या, विहिरी साफ केल्या. हे श्रमदान सेवादलापुरते न राहता कॉलेज अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. द्या देशाला एक तास, करा करा श्रम एक तास' या साने गुरुजी सेवापथकामुळे हजारो हात देशाच्या नवनिर्माणात गुंतले गेले. विज्ञान पथक, गिर्यारोहण पथक, छोट्यांसाठी कथामाला, तरुण वर्गासाठी अभ्यास मंडळे, शिक्षण व्यासपीठ असे अनेक कार्यक्रम सेवादलात घेतले जातात. कोयना परिसरातील धरणीकंप, गुजरातमधील पुरात बुडालेली मोरवी, ओरिसातील वादळग्रस्त, १९९३ सालचा उस्मानाबाद येथील भूकंप अशा ठिकाणी सेवादल सैनिक पोहोचले आहेत. सेवादलाचा मूळ बंधच कुमार वयाशी असल्यामुळे आपत्तीग्रस्त भागातील शाळात जावून शैक्षणिक साहित्याचे वाटप करत असतानाच उस्मानाबाद जिल्ह्यात नळदुर्ग येथे 'आपलं घर' म्हणून अनाथालाय सुरु केले. महिलांसाठी उद्योग प्रकल्प सुरु केला.

राष्ट्रसेवा दलाच्या वतीने १९४६ सालापासून कुमारांसाठी, युवकांसाठी व प्रौढांसाठी मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. '१९४६ साली सातारा येथे पहिला मेळावा झाला.'[९] त्यावेळी २५००० कार्यकर्ते जमा झाले होते. १९५४ साली पुण्याला हडपसरला मेळावा झाला त्यामध्ये विधायक स्वरुपाचे मांजरी सोसायटीचे शेताचे बंडींग काम केले त्यावेळी १०,००० कार्यकर्ते एकत्र आले होते. १९६१ साली मुंबईला ३ दिवसांचा क्रीडा मेळावा झाला. १९९१ साली पुणे येथे सुवर्ण महोत्सवी मेळावा झाला, २५००० कार्यकर्ते सहभागी झाले होते. १९९४ साली डिसेंबर महिन्यात कुरुंदवाडला ३ दिवसांचा क्रीडा मेळावा झाला. ३५०० क्रीडा प्रेमी युवकांनी सहभाग नोंदवला. कुस्त्या व मल्लखांब या स्पर्धा घेण्यात आल्या. १९९८ साली साने

गुरुजी जन्मशताब्दी अभियान अंमळनेरला घेण्यात आले. १०,००० कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून साने गुरुजींना अभिवादन केले.

### ५.२.६ छात्रभारती

१८ डिसेंबर १९८३ रोजी जळगाव येथे छात्रभारतीची स्थापना करण्यात आली. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रवाद या भारतीय घटनेतील पाच तत्वांवर निष्ठा ठेवून संघटना काम करत आहे. छात्र भारती मानवता धर्माचा पुरस्कार करते. सर्व जाती–धर्माचे विद्यार्थी विद्यार्थीनी यामध्ये सहभागी आहेत. संघटनेतील विद्यार्थी सभासद आणि शिक्षक सभासद यांनी प्रथम आपले कर्तव्य पार पाडण्याचे बंधन आहे. त्यानंतर राहिलेल्या वेळेचे नियोजन करुन छात्र भारतीसाठी वेळ दिला जावा असा संकेत आहे. 'विज्ञान युगातील विद्यार्थ्यांची समतावादी संघटना' हे घोषवाक्य घेवून जन्मास आलेल्या छात्रभारतीने १९८३ पासून महाराष्ट्रातील शिक्षण व सामाजिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. ज्येष्ठ समाजसेवक व भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे प्रणेते अण्णा हजारे यांच्या आंदोलनातही छात्र भारतीने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. ग्रामीण भागातील गरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या शाळा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलांची ही संघटना आहे त्यामुळे 'विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, रात्रशाळेच्या मुलांसाठी मशाल मोर्चा, नापास विद्यार्थ्यांचे मेळावे, दुष्काळग्रस्त मुलांसाठी एक मूठ धान्यांचा उपक्रम, चौथीच्या मुलाला साक्षर करणे, एकलव्य पुरस्कार, प्राथमिक शिक्षणावर भर देणारे उपक्रम, खेडे दत्तक योजना, कॉपीविरोधी अभियान असे अनेक कार्यक्रम छात्रभारती करीत आहे.'[१०] भारतातील सर्व छात्रांना संघटित करु पाहणारी ग्रामीण गरीब अंगमेहनती विद्यार्थ्यांची छात्रभारती संघटना महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून भारतव्यापी स्वरुप धारण करण्यासाठी पुढे जात आहे.

### ५.३ शेतकरी, कामगार प्रश्नांची चळवळ : शेतकरी कामगार पक्ष

पुण्याजवळील देवाची आळंदी येथे कॉँग्रेसचा उपपक्ष म्हणून ३ ऑगस्ट १९४७ रोजी या पक्षाची स्थापना करण्यात आली. पक्ष संस्थापकांमध्ये शंकरराव मोरे, केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव यांचा समावेश होता. १९४६ साली मुंबई राज्यात

काँग्रेस मंत्रिमंडळ सत्तेवर असताना उच्चवर्णीय सत्ता गटाचे कष्टकरी जनतेच्या कल्याणाकडे लक्ष वेधले. शेतकऱ्यांची दैन्यावस्था दूर करावी, बहुजन, कष्टकरी, शेतकरी आणि श्रमजीवी यांच्या संदर्भात कल्याणकारक कार्यक्रम हाती घ्यावा, त्यांची कर्जे माफ करावीत, शेतसारा कमी व रद्द करावा, आदिवासींच्या कल्याणकारी योजनांस प्राधान्य द्यावे या प्रमुख उद्दिष्टांसाठी हा पक्ष स्थापन करण्यात आला. 'पक्ष स्थापन्याचा दुसरा हेतू म्हणजे काँग्रेस अंतर्गत उच्चवर्णीय व उजव्या नेतृत्त्वाच्या वाढत्या प्रभावाला शह देण्यासाठी ११ सप्टेंबर १९४६ रोजी काँग्रेस पक्षांतर्गत शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली.'[११] शेतकरी, कामकरी राज्य स्थापन करण्याच्या काँग्रेसच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच हा संघ स्थापन करण्यात येत आहे. असा दावा या संघाच्या संस्थापकांनी केला. मुंबई काँग्रेस अधिवेशनात स्वतंत्र संघटना व कार्यक्रम असलेल्या संघटनेचे सभासदत्व काँग्रेस कार्यकर्त्यांना स्विकारता येणार नाही, असा नियम आला. त्यामुळे २६ एप्रिल १९४८ पासून या पक्षाने स्वतंत्र पक्ष म्हणून काम सुरु केले.

१९५० च्या नाशिक (दाभाडी) अधिवेशनापासून मार्क्सवाद, लेनिनवादाचा पक्षाच्या वतीने अधिकृतपणे स्विकार करण्यात आला व कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे मार्गदर्शन पक्षाने मान्य केले. पुढील वाटचालीत समाजवादी पक्षाबरोबर युती करुन १९५३ मध्ये संयुक्त मार्क्सवादी आघाडी स्थापन करण्यात आली. 'मार्क्सवादी विचारसरणी व बोल्शेव्हिकीकरण' या नावावरुन कॉम्रेड दत्ता देशमुख व शंकरराव मोरे यांच्यात तीव्र मतभेद झाल्याने देशमुखांनी 'कामगार किसान पक्ष' स्थापन केला.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शे. का. प. ला खूप कमी मते मिळाल्याने पक्ष विसर्जित करावा असे मत शंकरराव मोरे यांनी मांडले, पण त्याला विरोध झाला. सरचिटणीस ए. के. खाडीलकर यांना पक्षविरोधी कारवायांमुळे बडतर्फ करण्यात आल्यावर त्यांनी १९५५ मध्ये भारतीय कामगार किसान पक्षाची स्थापना केली. पुढे पक्षाचे संस्थापक जेधे, जाधव, मोरे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला व पक्ष संपुष्टात येण्याच्या अवस्थेत असताना १९५५ च्या लातूरच्या चौथ्या अधिवेशनात सर्वश्री उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, एन. डी. पाटील यांनी पक्षाची जबाबदारी घेतली.

सुरुवातीच्या काळात पक्षाचे मुखपत्र 'जनसत्ता' साप्ताहिक होते. पक्षाचा प्रचार व लोकशिक्षणाचे काम या पत्राने केले. मार्क्सची विचारसरणी लोकसभेत मांडण्याचे कार्य या पक्षाने केले. स्थानिक प्रश्नांना गती दिली. परंतु पक्षांतर्गत लढ्यात वर्तमानपत्राकडे दुर्लक्ष झाले. मतपत्राचा वाचक मुळातच मर्यादित असतो. खप कमी झाल्याने ते बंद पडले. त्याची जागा 'संग्राम' या मतपत्राने घेतली.

स्वातंत्र्यलढ्यात देशाचे नेतृत्त्व करणारा काँग्रेस प्रस्थापित आणि पैसेवाल्यांचा पक्ष (शेटजी, भटजींचा) अशी टिप्पणी करुन बहुजन समाजातील अनेक नेत्यांनी बाहेर पडत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लगेचच पर्यायी राजकीय पक्षाच्या उभारणीला प्रारंभ केला. शेतकरी कामगार पक्ष हा त्यातील प्रमुख पक्ष आहे. एक विशेष म्हणजे संस्थापकापैकी असलेले शंकरराव मोरे, केशवराव जेधे, तुळशीदास हे जुने काँग्रेसवाले. महाराष्ट्रातील पश्चिम पट्ट्यात या नेत्यांनी १९४८ मध्ये शेकापची स्थापना केली. 'नाशिक जवळ दाभाडी येथे या पक्षाची घटना लिहिली गेली. 'दाभाडी प्रबंध' म्हणून तो प्रसिद्ध आहे.'[१२] शेकाप आणि कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांनी मार्क्सवादी विचार प्रणाली स्विकारली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शेकाप काँग्रेस पक्षाचा प्रमुख विरोधी पक्ष होता. कोल्हापूर सारख्या काही जिल्ह्यात तर काँग्रेसची टोपीच दिसणार नाही, इतका या पक्षाचा दबदबा होता. क्रांतिसिंह नाना पाटील, भाऊसाहेब राऊत, उद्धवराव पाटील, ए. के. खाडीलकर, विठ्ठलराव हांडे यांच्यासारखे अभ्यासू नेते शेकापच्या वतीने उभे होते. या निवडणुकीत मुंबई राज्य, हैद्राबाद राज्य आणि मध्य प्रांत या भागातील मराठी भाषा पट्ट्यात शेकापने उमेदवार उभे केले व लोकसभेच्या दोन जागा मिळवल्या तसेच विधानसभेच्या मुंबईत १७, मराठवाड्यात ८ व विदर्भात ४ जागा मिळाल्या. मात्र यानंतर शेकापला ग्रहण लागले.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी शेकाप, प्रजा समाजवादी, कम्युनिस्ट व रिपब्लिकन या चार काँग्रेसेतर पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. काँग्रेसला १९५७ च्या निवडणुकीत समितीने पश्चिम महाराष्ट्रात जोरदार यश संपादन केले. या भागातील १३२ पैकी १०० जागा समितीने मिळविल्या. मराठी भाषिकांच्या टापूतील २६५ पैकी निम्म्या जागा समितीकडे होत्या. शेकापला लोकसभेच्या ५, विधानसभेच्या ३२ जागा मिळाल्या. या

दरम्यान संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन मुख्यमंत्रीपदी यशवंतराव चव्हाण आले. त्यांच्या बेरजेच्या राजकारणामुळे या तिन्ही पक्षातील अनेक नेते काँग्रेसमध्ये गेले. १९६२ च्या निवडणुकीनंतर पुरोगामी पक्षांची संसदीय प्रभाव शक्ती कमी होऊ लागली. शेकापला विधानसभेत फक्त १५ जागा मिळाल्या. यानंतर सीमाप्रश्नावरुन आंदोलने सुरु झाली. त्याचा फायदा शेकापला १९६७ च्या निवडणुकीत मिळाला. तो विधानसभेच्या २२ जागा मिळवून प्रमुख विरोधी पक्ष झाला. भाई दाजीबा देसाई, नार्वेकर, त्र्यंबक सीताराम कारखानीस यांचे पक्षात मोठे योगदान होते. दत्ता गव्हाणे पाटील आदींनी विधानसभेच्या कामाला गती दिली. पुढे तात्विक मुद्दयावरुन कम्युनिस्ट पक्षाचे विभाजन झाले. समाजवादी पक्षाची सुद्धा दोन शकले झाली.

### ५.४ आघाडी सरकारे व समाजवादी नेते

१९६२–६४ हा काळ देशापुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या दृष्टीने नाजुक काळ होता. १९७२ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेसपुढे महाराष्ट्रातील शेकापसह विरोधीपक्षांची शक्ती क्षीण झाली. आणिबाणी उठविल्यावर झालेल्या १९७७ च्या निवडणुकीत समाजवादी संघटना, काँग्रेस, जनसंघ व लोकसेवादल यांचा मिळून बनलेला जनता पक्ष सत्तेवर आला. शेकापतले ६ आणि मार्क्सवादी पक्षाचे ३ खासदार निवडून आले.

शरद पवारांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पुलोद सरकारच्या प्रयत्नात (१९७८–१९८०) शेकापचा सरकारमध्ये सहभाग होता. यानंतर मात्र या पक्षांची शक्ती संसदीय राजकारणात कमी होत गेली. शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेसच्या रुपाने नवे समीकरण सुरु झाले. त्यांनी पुलोद आघाडी स्थापन केली. त्यात शेकाप व जनता पक्ष होता. या आघाडीने १९८५ च्या निवडणुकीत चांगले यश मिळविले. जनता पक्षाने २०, शेकापला १३ व भाजपला १५ जागा मिळाल्या. शिवसेनेच्या प्रभावी उदयानंतर डावे पुरोगामी व धर्मनिरपेक्ष बाजूला पडत गेले. पुरोगामी पक्षांच्या जोडीला २००२ मध्ये जनता दल (एस्), समाजवादी जनपरिषद, लोकसंघर्ष मोर्चा यांची 'सोशालिस्ट फ्रंट' स्थापन झाली.

एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, दंडवते पती–पत्नी, मृणाल गोरे आदींचे या पक्षातील काम महत्त्वपूर्ण होते. भाई वैद्य आजही उतार वयात या पक्षासाठी झटत आहेत. शेकाप व सोशालिस्ट फ्रंटचे नेते ऐंशी वयाच्या पुढे गेलेले आहेत.

**५.५ भारतीय रिपब्लिकन पक्ष**

मानवी जीवनाचे चलनवलन राजकीय सत्ता जरी करीत असली तरी राजकीय पक्षांना सामाजिक तोंडावळा असला पाहिजे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. जातीविहीन समाजरचना हे बाबासाहेबांचे स्वप्न व उद्दिष्ट होते. त्या स्वप्नपूर्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाला जन्म दिला.

७ मार्च १९६० रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना विविध मागण्यांचे निवेदन घेवून एक शिष्टमंडळ भेटले होते. त्यामध्ये महत्त्वाची मागणी होती बौध्दांना त्यांची आर्थिक बाब लक्षात घेवून ताबडतोब पूर्वीच्या शेड्युल्ड कास्टस्च्या सवलती जाहीर कराव्यात. बौध्द विद्यार्थ्यांची ही बाब लक्षात घेवून शैक्षणिक सवलती द्याव्यात अशी मागणी रिपब्लिकन पक्षाने केली होती.

एप्रिल १९७४ मध्ये नागपूर येथील पक्षाच्या अधिवेशनात बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. गवई गटाच्या लोकांनीही नोव्हेंबर १९७५ ला पुणे येथे आपल्या गटाचे अधिवेशन बोलावले त्यामध्ये रा. सु. गवईना पक्षाचे अध्यक्ष म्हणून मान्यता दिली.

रिपब्लिकन पक्षाच्या पुनर्बांधनीच्या कामासाठी ५ व ६ मे १९८४ रोजी अहिल्याश्रम, नानापेठ पुणे येथे पुनर्गठीत रिपब्लिकन पक्षाचे पहिले अधिवेशन संपन्न झाले. त्यामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षपदी ॲड. प्रतापचंद्र धनवे (नांदेड) यांची तर मुख्य सचिवपदी डॉ. निलमताई गोऱ्हे (पुणे) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

महाराष्ट्रातील साखर सरंजामशाही नष्ट करण्याच्या विचाराने रिपब्लिकन पक्षाच्या वतीने माणगाव (कोल्हापूर) ते पुणे असा एक मोर्चा आयोजित केला होता. दिनांक १७ ते २७ नोव्हेंबर १९८५ च्या दरम्यान चाललेला हा मोर्चा अत्यंत अभूतपूर्व होता. पक्षाने शेतजमिनी

विषयक केलेल्या यशस्वी आंदोलनाचा परिणाम म्हणून महाराष्ट्र शासनाने गायरान कसणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे संरक्षण करण्याचा निर्णय घेतला.

१९९६ साली ११ व्या लोकसभेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पुणे लोकसभा मतदार संघातून नामदेव ढसाळ यांनी निवडणुक लढविली या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला पराभव पत्करावा लागला.

२५ डिसेंबर १९९८ ला पुणे येथे आयोजित केलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनात प्रा. जोगेंद्र कवाडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

रिपब्लिकन पक्ष म्हणजे लोकसत्ताक पक्ष. खुल्या पत्रात उत्तर देताना डॉ. बाबासाहेब लिहितात, पक्ष हा सैन्यासारखा असतो, त्याला खालील बाबींची आवश्यकता असते. १) सरसेनापती सारखा पुढारी, २) संघटना यामध्ये अ) सभासद, ब) मुलभूत योजना, क) शिस्त या गोष्टींचा समावेश होतो. ३) ध्येय धोरण, तत्वज्ञान, ४) कार्यक्रम ५) राजकीय डावपेच व मुत्सद्देगिरी.

रिपब्लिकन पक्षाची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातील झाली नाही. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ ला या पक्षाची स्थापना झाली. पक्षाच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक चळवळी झाल्या. त्यामध्ये प्रामुख्याने दादासाहेब गायकवाडांनी भूमिहीनांचे आंदोलन दिर्घकाळ चालवले. हा लढा दलित, आदिवासी, भूमिहीन यांच्यासाठी होता. देशभर हे आंदोलन गाजले होते.

प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी त्याच्या पुढच्या काळात ग्रामीण दलितांच्या जमिनीचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या किमान वेतनाचा प्रश्न आणि मोठ्या शेतकऱ्यांनी घशात घातलेल्या वतनी जमिनीचा प्रश्न घेवून मोठे आंदोलन उभारले. डाव्या पक्षांच्या सहकार्याने त्यांनी या लढ्यात मोठी शक्ती ओतली. मुळामध्ये खुद्द बाबासाहेब आंबेडकरांनी जमिनीच्या राष्ट्रीयकरणाची मागणी केली होती. सरकारी पडीक जमीन येथील गरिबांना मालकी हक्काने मिळावी हा त्यांचा आग्रह होता.

### ५.६ आंबेडकरी चळवळीचे अंतरंग

५ व ६ मे १९८४ रोजी पुण्यात पक्षाचे विराट अधिवेशन झाले. पक्षाची पुनर्बांधणी करण्याचा विचार झाला. ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाने अनेक लढे, सत्यागृह, मोर्चे केले. भूमिहीन शेतमजूर, झोपडपट्टीवासीय, भटके विमुक्त, महिला, राखीव जागा या प्रश्नांवर परिषदा घेतल्या. भूमिहीनांच्या प्रश्नावर 'भूमिहीन हक्क संघर्ष समिती' स्थापन करुन प्रचंड राज्यव्यापी रास्ता रोको आंदोलन केले.

ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय रिपब्लिकन पक्षाने अनेक कार्यक्रम केले. प्रचंड जनसमूहास लढ्याला तयार केले. महाराष्ट्रातच नव्हे तर संबंध भारतात या देशातील जनसामान्यांचे दलितांचे, शोषितांचे नेते म्हणून, 'लिडर ऑफ दि मासेस' म्हणून प्रकाश आंबेडकरांचे नाव घेतले जाते.

ते 'या देशातील पुरोगामी, आणि समाजवादी मंडळींना नम्र आवाहन करावेसे वाटते की विषमतावादी व्यवस्था बदलल्याशिवाय परिवर्तन अशक्य आहे. सामाजिक, आर्थिक परिवर्तन हे सत्ता हातात आल्याशिवाय होणार नाही'.

ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखालील भारतीय रिपब्लिकन पक्ष हा केवळ महाराष्ट्रातच राहिलेला आहे असे नाही तर उत्तर प्रदेश, मध्ये प्रदेश, हरियाना, बिहार, आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यात देखील पक्षाचा विस्तार होत गेला.

कुठल्याही क्षेत्रातील आणि कुठल्याही स्वरुपाची पिळवणूक असो, ती मुळापासून उपटून काढणे हे पक्षाचे प्रमुख कर्तव्य, हा खरा म्हणजे अमूलाग्र समाजक्रांतीचाच कार्यक्रम आहे. समाज वेगवेगळ्या देवदेवतांच्या, श्रद्धा-अंधश्रद्धांच्या कचाट्यात सापडला आहे. महागाईचा प्रश्न रोजगारीचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न, अन्याय, अत्याचार, आदिवासी, स्त्रिया, भटके, भंगी, चांभार, मातंग यांचे प्रश्न उभे आहेत. लोकशाही आणि समाजवाद या दोन्ही गोष्टी रिपब्लिकन पक्षात फार महत्त्वाच्या आहेत. पुरोगामी चळवळीसाठी दैनिके चालविणे गरजेचे होते त्यानुसार सांस्कृतिक परिवर्तन रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून झाले.

**स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीची दिशा –**

आंबेडकरी चळवळीने गेल्या काही वर्षात काही महत्त्वाचे प्रश्न धसास लावले आहेत.

१)	गायरान जमिनीचा प्रश्न

२)	बौध्दांच्या सवलतीचा प्रश्न

३)	नामांतर

४)	रिडल्स

५)	एस्. सी. / एस्. टी कमिशन

६)	आर्थिक विकासाची तरतूद

७)	भटक्या विमुक्त जातींना गुन्हेगारसंबोधण्याचा प्रश्न हे सर्व प्रश्न आंबेडकरी जनतेने स्वबळावर व स्वतंत्रपणे लढून सोडवले.[१४]

तरीसुद्धा दलित समाजाच्या पोटापाण्याचा, रोजगाराचा आणि भूमिहीन शेतमजुरांचा जो सार्वत्रिक प्रश्न आहे त्याकडे अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. शिवाय गावागावामध्ये जाती प्रमाणे जे वाडे आहेत ते उद्ध्वस्त करुन वेशीबाहेर राहणाऱ्यांना वेशीच्या आत घेण्यासाठी चळवळ उभी राहिली पाहिजे. ज्या समाजाची हजारो वर्षे मानसिक, वैचारिक कुचंबणा झाली, जो दबला गेला होता. त्याची प्रगती व्हायची असेल तर त्या समाजाला सतत जागृत ठेवणे आवश्यक आहे.  अजूनही तीन पिढ्यांना संघर्ष करावा लागेल.

फुले, आगरकर, आंबेडकर, शाहू महाराज यांच्या नावाचा प्रश्न येतो तेव्हा तो एका व्यक्तीशी निगडीत नसून तो तत्वाशी असतो, पुरोगामी विचारसरणीशी असतो. कुठल्याही चळवळीचे नेतृत्त्व हाच मध्यम वर्ग करत असतो. योग्य दिशा घेवून सामाजिक चळवळ उभी राहिली तर दलितांमधील मध्यमवर्ग व सुशिक्षित निश्चितपणे चळवळीत उतरतील.

सामाजिक विषमता दूर करायची असेल तर सामाजिक समता, आर्थिक व राजकीय समता ही त्रिमुर्ती साकार झाली पाहिजे. त्यासाठी भारतात समान नागरी कायदा करावा लागेल.

### ५.७ शंकरराव खरातांची डिफेन्स कामगार संघटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जाहीर सभा पुण्यात झाली होती.  सभा प्रचंड मोठी होती.  ‘अहिल्याश्रम’ या पुण्यातील संस्थेस आंबेडकरी चळवळीत तसे महत्त्वाचे स्थान आहे. ही एक नाना पेठेतील प्रसिद्ध शिक्षणसंस्था, थोर समाजसेवक आण्णासाहेब उर्फ वि. रा. शिंदे

यांनी स्थापन केलेल्या 'डिस्प्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेची 'अहिल्याश्रम' एक शाखा. अहिल्याश्रम येथील वसतिगृहात शिक्षणासाठी महाराष्ट्रातून आलेले दलित विद्यार्थी असत. या अहिल्याश्रमात दलित विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम होत असत. वसतिगृहातील बहुतेक विद्यार्थी आंबेडकरवादी होते. 'जनता पत्रकाचे' वाचन, आंबेडकरांच्या चळवळीची चर्चा ऐकणे, चळवळीत भाग घेणे अशी कामे विद्यार्थी करत.

मुलांनी डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स या नावाची संस्था स्थापन केलेली होती. त्या संस्थेचे अध्यक्ष श्री. आर. आर. भोळे होते. या संस्थेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते.

अहिल्याश्रमामध्ये अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् फेडरेशन या पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक झाली होती. या बैठकीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबर एन्. शिवराज, जे. एन. मंडल, आर. एल. गोपालसिंग, कुरिल, दादासाहेब गायकवाड, बापूसाहेब राजभोज, आर. आर. भोळे, विश्वास हे नेते हजर होते.

'१९५४ साली २५ डिसेंबरला देहूरोड येथील बौद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते भगवान बुध्दांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना झाली होती.'[१५] त्यावेळी सभाही मोठी झाली होती.

एक राजकीय व सामाजिक कार्यकर्ता म्हणून शंकरराव खरातांचे नाव लोकांपुढे आले होते. पुण्यातील कामगार क्षेत्रातही ते काम करत होते. डिफेन्स कामगार संघटनेत एक पदाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. राजकीय क्षेत्रात १९५४ सालापासून महाराष्ट्राचा संघटक सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. १० एप्रिल १९५५ रोजी पुण्यात महाराष्ट्र शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक झाली. त्यामध्ये दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, जी. के. माने, दादासाहेब रुपवते आदि नेते हजर होते.

दलित कामगार संघटनेसाठी शंकरराव खरातांनी विशेष योगदान दिले. खडकी भागातील संरक्षण खात्यात काम करणाऱ्या दलित कामगारांसाठी शेड्युल्ड कास्ट व शेड्युल्ड ट्राइब्ज कामगार संघटना सुरु केली. ॲम्युनिशन फॅक्टरी, एच्. ई. फॅक्टरी व इतर डेपोसाठी एस्. सी. / एस्. टी. संरक्षण कामगार संघटना सुरु केल्या. दलित कामगारांना कायदे कानुन

मध्ये काही खास अधिकार दिलेले आहेत. विशेषत: सरकारी औद्योगिक केंद्रात कारखान्यात, फॅक्टरीत नोकर कामगारांची भरती करताना दलित कामगारांसाठी काही खास राखीव जागा ठेवलेल्या असतात. अशा राखीव जागा भरल्या आहेत किंवा नाही? भरल्या नसल्यास त्या का भरल्या नाहीत? या व अशा अनेक न्याय्य मागण्यासाठी दलित कामगार संघटना काढाव्या लागल्या.

शेड्यूल्ड कास्ट व आदिवासी प्रमाणे भटक्या विमुक्तांना घटनात्मक संरक्षण मिळण्यासाठी भटक्या विमुक्तांना जीवन चरितार्थासाठी नोकऱ्या, शेतीसाठी पडीक जमीन मिळण्यासाठी १७ जुलै १९७१ या दिवशी 'मांग गारुडी' समाजातील कार्यकर्त्यांनी पुणे शहरातून मोर्चा काढला होता.

शंकरराव खरातांनी वेश्यांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी शुक्रवार पेठेतील एका हॉलमध्ये जाहीर सभेचे आयोजन केले होते. सभेला पुण्यातील प्रतिष्ठित नेते मंडळी हजर होती. ही सभा चांगलीच गाजली आणि त्याच सभेत वेश्यांचा प्रश्न हाती घेतला. 'पुण्यात वेश्या व्यवसाय प्रतिबंधक या नावाची अखिल भारतीय स्वरुपाची परिषद भरविण्यात आली होती.'[१६]

### ५.८ एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमी

१९६६ साली 'सोशालिस्ट फाऊंडेशनची' स्थापना झाली. थोर समाजवादी नेते एस्. एम्. जोशी यांनी आपल्या षष्ठब्दीपूर्ती निमित्त मिळालेल्या निधीतून फाऊंडेशनची स्थापना केली. परिवर्तनवादी चळवळींतील कार्यकर्त्यांचा योगक्षेम भागविण्यासाठी त्यांना दरमहा मानधन देण्याची व्यवस्था करण्यात आली. एस. एम. जोशी यांच्या निधनानंतर फाऊंडेशनला त्यांचे नाव देवून कामाचा विस्तार करण्यात आला. समाजातून मोठ्या प्रमाणावर देणग्या जमल्या. दीर्घ मुदतीच्या ठेवीच्या व्याजातून उपक्रमांचा खर्च भागविला जातो. 'महाराष्ट्रातील अकरा व मध्य प्रदेश व बिहारमधील एकेक अशा तेरा संघटनांच्या मिळून २९ कार्यकर्त्यांना मानधन देण्यात येते.'[१७] याशिवाय परिसंवाद, व्याख्याने, पुस्तक प्रकाशन, शिबिरे असे कार्यक्रम केले जातात.

नानासाहेब गोरे अकादमीच्या मार्फत दूरशिक्षण उपक्रम चालविला जातो. सामाजिक विकास कार्याभ्यास, कामगार जीवनाभ्यास असे अभ्यासक्रम घेतले जातात.

### ५.९ कम्युनिस्ट चळवळ

१ ते ५ ऑक्टोबर १९६४ रोजी तलासरी, जि. ठाणे येथे कम्युनिस्ट पक्षातील डाव्या गटाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. स्वातंत्र्य, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय व पुरोगामी विचारपरंपरांचा माकपने कृतिशील पुरस्कार केला आहे. अंतिमदृष्ट्या जनताच क्रांती करते यावर माकपचा विश्वास आहे. लोकांना वेगवेगळ्या जनसंघटनांमध्ये संघटित करण्यावर माकप भर देत आहे. त्या दृष्टीने पक्षाने कामगार, शेतकरी, शेतमजूर, युवक, विद्यार्थी, महिला इत्यादी जनसंघटनांची बांधणी करण्यास प्रोत्साहन दिले आहे. १९७०–८० च्या दशकात जनसंघटनांची बांधणी केली. 'कम्युनिस्ट पक्षाने १९५२ मध्ये महागाई विरोधी लढा दिला.'[१८] १९५२ व १९५३ च्या दरम्यान महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळ निवारणासाठी मोठे कार्य हाती घेतले. १९५५ मध्ये गोवा स्वातंत्र्य लढा, १९५६ ते १९६० या काळात संयुक्त महाराष्ट्राचा लढा पुकारला होता. या सर्व लढ्याचे वैशिष्ठ्य असे की, सर्व लढे समान उद्दिष्टांसाठी समविचारी व प्रमुख व्यक्तींनी एकत्र येवून केलेले होते. दुष्काळ निवारण्याच्या कार्यात कॉंग्रेस सह सर्वच राजकीय पक्ष होते. गोवा स्वातंत्र्य लढा हा तर अपुऱ्या राहिलेल्या स्वातंत्र्य लढयाची पूर्तता होती. १९४२ च्या चळवळीतील अनेक कार्यकर्ते तसेच डावे व समाजवादी पक्षातील नवीन लोकांची पहिली प्रांतिक परिषद पुण्यात गोखले हॉलमध्ये झाली. त्यावेळी शेतकरी अहवाल तयार करण्यात आला होता. अशा परिस्थितीत हजारो शेतकऱ्यांचे जीवन बरबाद करणाऱ्या दुष्काळाची कारण परंपरा शोधली व उद्योजकासाठी परिषदा घेण्यात आल्या.

### ५.९.१ कम्युनिस्ट लोकलहर अंक

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने आपल्या चळवळीचे कार्य घराघरात पोहोचविण्यासाठी 'लोकलहर' हे साप्ताहिक सुरु केले. १८ फेब्रुवारी १९७९ या दिवशी सुरु झालेल्या या साप्ताहिकास ३७ वर्षे पूर्ण झाली. समाजाशी संबंधीत सर्व विषयांचे विवेचन या साप्ताहिकात मांडण्यात आले. लोकलहर बरोबरच जीवन मार्ग, पीपल्स डेमॉक्रसी, मार्किस्ट,

शबताब या नावाची साप्ताहिके व दैनिके सुरु केल्यामुळे चळवळीचे लोन घराघरात पोहोचले. आजपर्यंत मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने.

१. बालकामगार चळवळ

२. रोजगारी व सामाजिक सुरक्षा

३. सर्वधर्मसमभाव व आतंकवाद

४. आर्थिक सुधारणा

५. नव उदारमतवादी सुधारणा

६. संघर्षासाठी एकता.

७. कामगारांसाठी योग्य वेतन संघर्ष

८. किसान सभा/ मजदूर किसान सभा.

९. जनवादी महिला संघटना

१०. युवती व अल्पसंख्यांकाची सुरक्षा

११. संविधान की रक्षा

१२. महिला आरक्षण

१३. हुंडा विरोधी चळवळ

१४. घरकाम स्त्रियांसाठीचे प्रश्न

१५. आणिबाणीच्या विरोधात संघर्ष

१६. मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. आंबेडकर असे नामकरण करण्यासाठी संघर्ष

१७. दुष्काळग्रस्तांसाठी संघर्ष

१८. भाडेकरु संघर्ष समिती

१९. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणासंबंधी संघर्ष

२०. शेतकऱ्यांचे प्रश्न (कर्ज, आत्महत्या)

२१. दारुबंदी प्रचार

२२. स्वस्त धान्य दुकानावरील शिधा

२३. विजेचा प्रश्न

२४. पाण्याचा प्रश्न

२५. पडीक जमिनीचा प्रश्न

२६. हमालीचे दर

२७. रोजगार हमी योजनेचे वेतन दर या प्रश्नांवर काम केले आहे.

**५.१० पिंपरी चिंचवड मधल्या कामगार चळवळी**

१९५४ साली पिंपरीजवळ एच. ए. फॅक्टरी सुरु झाली. तेव्हापासून इथल्या औद्योगिकरणाची सुरुवात झाली. १९५७ पासून इतर कारखाने पिंपरीत येवू लागले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली. ७० च्या दशकात टेल्को, बजाज अशा मोठ्या कंपन्या स्थिरावल्या. ७० च्या दशकात नवीन उद्योग सुरु झाले. कामगार भरती जोरात होती. औद्योगिक प्रशिक्षण झालेल्या तरुणांना कुशल कामगार म्हणून लगेच नोकरी मिळत होती. अल्पशिक्षितांना गरजेनुसार नोकऱ्या सहजासहजी मिळत होत्या. १९७०–७१ पर्यंतचा काळ हा उद्योगधंदे आणि कामगार यांच्या दृष्टीने स्थिर होण्याचा काळ होता. या काळात संघटना बांधणी सुरु होती. पण बहुतांश कामगारांना नोकरी मिळाली यातच आनंद होता. त्यामुळे सुरुवातीच्या काळात लढा, संप, संघर्ष अशा घटना घडल्या नाहीत. १९७२ नंतर कामगार संघटना अधिक बळकट होऊ लागल्या. व्यवस्थापनाशी संघर्षाच्या पावित्र्यात या संघटना उभ्या राहू लागल्या. कामगार हितासाठी या भागात जे लढे झाले, त्यामध्ये पहिला मोठा संघर्ष स्वस्तिक रबर लि. या कारखान्यात १९७४ मध्ये झाला. त्यामध्ये वेतनवाढीच्या करारासाठी शेवटी कंपनी बंद झाली. ती दुसऱ्याला विकली गेली. हा या परिसरातील सर्वात मोठा लढा. सुमारे तीन हजार कामगार यामध्ये सहभागी झाले होते.

१९७७ साली ट्रॉब इंडिया म्हणजेच पी. एम. टी. कंपनीत वेतनवाढीच्या करारासाठी सहा महिने संप झाला. कामगार नेतृत्त्व व व्यवस्थापन यांच्यात तडजोड होऊन कंपनी सुरु झाली पण लढ्याचे नेतृत्त्व करणाऱ्या चार कामगारांना आपल्या नोकरीस मुकावे लागले. या लढ्याचे नेतृत्त्व 'सर्वश्रमिक संघटना' या मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष ए. डी. भोसले यांनी केले होते.

१९७७ साली आकुर्डी येथील डेव्हिड ब्राऊन ग्रीव्हज लि. या कारखान्यातही मोठा संघर्ष झाला. वेतनवाढीसाठी कामगारांनी निदर्शनाचा मार्ग अवलंबला. व्यवस्थापनाने लढ्याचे नेतृत्त्व करणाऱ्या कामगारांची खातेनिहाय चौकशी सुरु केली. कामगारांच्या मनात तीव्र चीड निर्माण झाली. त्यांनी व्यवस्थापनाला घेराव घातला. पोलिसांचा हस्तक्षेप झाला. कामगारांचा घेराव घालवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला, अनेक कामगार जखमी झाले. जखमी कामगारांना दवाखान्यात नेताना पाहून आजुबाजूच्या कारखान्यातील कामगार रस्त्यावर आले. त्याला नागरिकांनीही साथ दिली. उत्स्फूर्तपणे रास्ता रोको आंदोलन झाले. संप, टाळेबंदी असा प्रकार सहा महिने चालला. शेवटी तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी लक्ष घातले. व्यवस्थापनाने ५४ कामगारांना निलंबीत केले पण शेवटी नेतृत्व करणाऱ्या चार कामगारांना नोकरीस मुकावे लागले. या लढ्याचे नेतृत्व टी. रामाराव यांनी केले.

पुढच्याच वर्षी १९७८ साली चिंचवड येथील एस्. के. एफ. बेअरिंग्ज या कारखान्यात लढा झाला. वेतनवाढीसाठी तीन महिने संप व टाळेबंदी असा लढा झाला. कामगारांनी काढलेल्या मोर्च्यावर चिंचवडगावात पोलिसांनी लाठीमार केला होता. या लढ्याचे नेतृत्व अंतर्गत कामगार संघटनेचे भास्करन यांनी केले होते.

१९७९ साली बजाज ऑटो लि. मध्ये जो कामगार लढा झाला होता तो पोलिसांच्या गोळीबारामुळे गाजला. बजाज ऑटोमध्ये व्यवस्थापनाने एक वर्षभर चर्चेचे गुऱ्हाळ चालू ठेवले. कामगारांनी चिडून आक्रमक पवित्रा घेतला. दगडफेक सुरु केली. अधिकाऱ्यांवर हल्ला केला. पोलिसांनी हस्तक्षेप केला. कामगारांना काबूत आणण्यासाठी लाठीमार, अश्रुधूर यांचा वापर केला. तरीसुद्धा जमाव पांगला नाही. उलट जमाव पोलिसांकडे सरकला. पोलिसांनी अमानूषपणे गोळीबार केला. गोळीबारात दत्ता पाडळे, वहिद इब्राहिम हे दोन कामगार व चौधरी नावाचा एक दुकानदार असे तीन जण ठार झाले. कित्येकजण जखमी झाले. ही घटना १७ जून १९७९ रोजी घडली. गोळीबार आणि त्यामध्ये प्राण गमावण्याची वेळ कामगारांवर आली. पिंपरी चिंचवडच्या कामगार चळवळीतील ही महत्वाची घटना होती. त्या नंतर सहा महिने कारखाना बंद राहिला. या लढ्याचे नेतृत्त्व रुपमय चटर्जी यांनी केले. १९८० साली बजाज टेंपो लि. कंपनीमध्ये वेतनवाढ करारावरुन संघर्ष झाला. कॉ. प्रभाकर मानकर यांच्या

नेतृत्वाखाली कामगार संघटना कार्यरत असताना व्यवस्थापनाने अंतर्गत युनियन तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले. यातून संघर्ष झाला. व्यवस्थापनाने दोन कामगार कार्यकर्त्यांना निलंबित केले. कामगारांनीही त्याच्याकडे दुर्लक्ष केले. निलंबित केलेल्या कामगारांपैकी पिल्ले या कामगाराने आत्महत्या केली.

१९८८ साली बेक लि. या पिंपरीच्या कारखान्यात 'नॅशनल फेडरेशन ऑफ लेबर' ही संघटना कार्यरत होती. कारखान्याची दुसरी शाखा गुजरात मध्ये सुरु झाली. फेडरेशनने युनियनला मान्यता देण्याचे नाकारले. त्यामुळे पिंपरी येथे निदर्शने सुरु झाली. कारखान्यातील काम बंद झाले. कंपनीतून माल बाहेर काढत असताना कामगारांनी विरोध केला. या वेळी नॅशनल फेडरेशन ऑफ लेबरच्या इतर संघटना असलेल्या स्पॅको, महिंद्रा मार्शल, ॲटलास या कारखान्यातील कामगार रस्त्यावर आले व लढ्यामध्ये सहभागी झाले. १९८९ सालचा टेल्कोचा लढा हा औद्योगिक परिसरातील सर्वात मोठा सार्वजनिक लढा होता. वेतनवाढ करारासाठी लोकशाही मार्गाने आलेल्या कामगार प्रतिनिधींशी बोलणी करण्यास व्यवस्थापनाने विरोध केला. यातून संघर्ष निर्माण झाला. पाच हजार कामगार शनिवारवाडा येथे उपोषणाला बसले. उपोषण काळात कामगारांनी ठिकठिकाणी निदर्शने, रास्ता रोको केले. पहिल्यांदाच कामगारांच्या कुटुंबातील महिला संघटितपणे रस्त्यावर आल्या. त्यांनी मोर्चे काढले. या लढ्याला सार्वजनिक रुप प्राप्त झाले. पुणे औद्योगिक परिसरातील बहुतांश संघटनांनी पाठींबा दिला. शनिवारवाड्याजवळ दहा दिवस कामगार ठाण मांडून बसले. अखेर दहाव्या दिवशी कामगारांना पोलिसांनी हस्तक्षेप करुन अटक केली व महाराष्ट्रातील विविध भागातील तुरुंगात रवाना केले. व्यवस्थापनाने शेवटी लढा मोडून काढला. कामगारांना हमीपत्र लिहून देवून कामावर हजर रहावे लागले. पुण्यातील हा सर्वात मोठा लढा होता. या लढ्याचे नेतृत्त्व राजन नायर व जयसिंग पोवार यांनी केले.

गरवारे नायलॉन ही कंपनी २७ ऑगस्ट १९९६ रोजी व्यवस्थापनाने अचानक बंद केली. त्यामुळे १२०० कामगार बेकार झाले. कामगारांना आर्थिक लाभ मिळावा यासाठीच्या लढ्याचे नेतृत्व अशोक पोटघन यांनी केले. त्यानंतर पथेजा फोर्जिंग ही कंपनी बंद झाली यामधील सुमारे २५०० कामगार बेकार झाले.

टेल्कोच्या ऐतिहासीक लढ्यानंतर कामगार चळवळीचा जोश कमी झाला. नंतरच्या काळात परिस्थिती बदलली. औद्योगिक मंदीला सुरुवात झाली. कामगार कपात, स्वेच्छा निवृत्ती अशा योजना सुरु झाल्या. कामगारांना नोकरीची शाश्वती राहिली नाही. कामगार संघटना निस्तेज झाल्या. संघटनांची धार बोथट झाली. वेतनवाढ व इतर सोयी सुविधा यांपेक्षा आहे ही नोकरी टिकावी ही किमान अपेक्षा कामगारांमध्ये निर्माण झाली. ९० च्या दशकात कामगार जीवनातील भरभराटीच्या काळाला ओहोटी लागली. लघुउद्योग संकटात आले. मोठे उद्योग अडचणीत सापडले. कामगार जीवन भविष्यकाळातील अंधकारामुळे चिंताग्रस्त झाले. कामगार संघटना नावापुरत्या शिल्लक राहिल्या. एकेकाळी स्वतःच्या हक्कासाठी भांडणारा, संघटित शक्तीच्या जोरावर व्यवस्थापनाशी दोन हात करणारा कामगार परिस्थितीने हतबल झाला. कामगार चळवळीला रुपमय चटर्जी पासून राजन नायर पर्यंत अनेकांचे धडाडीचे नेतृत्व लाभले. कॉम्रेड ए. डी. भोसले, प्रभाकर मानकर, एस्. एम्. जोशी., बा. न. राजहंस, सदाशिव बागाईतकर, सुभाष वैद्य, शामकांत मोरे यांनी तसेच बाबा आढाव, आण्णासाहेब मगर, दया सावंत अशा अनेक मातब्बर व्यक्तींनी कामगार चळवळीला बळ दिले. मुकुंदराव गोरे, उदयराव पटवर्धन, बाळासाहेब पानवलकर, कालिदास कागदे, विनायक महाराज, बाळासाहेब साठे या भारतीय मजदूर संघाच्या कार्यकर्त्यांनी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. कारखान्यात कामगार म्हणून काम करणारे कामगार मधू जोशी, प्रभाकर लेले, वसंत शेवडे, सुभाष सरीन, बाळासाहेब म्हसे, बापू गायकवाड, जी. ए. इनामदार, अनिल हिंगे, मनोहर भिसे, सदानंद राणे, दत्ता जाधव, मोहन पानसे, श्री. सहस्त्रबुद्धे अशा कामगारांनी कामगार चळवळ अधिक गतिमान केली. तसेच अशोक मनोहर, अजित अभ्यंकर, अनिल हिंगे, माधव रोहम, गंगाधर आंबेडकर, ॲड. राम शेवाळ यांनी कामगार चळवळीचे नेतृत्व केले.

### ५.११ भूमिहीनांचा सत्याग्रह

१९५८ साल हे भूमिहीनांच्या सत्याग्रहाने महाराष्ट्रात गाजले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड, नाना पाटील, शामराव परुळेकर, गोदूताई परुळेकर, कॉम्रेड आर. बी. मोरे व इतर अनेक नेत्यांनी तुफानी दौरे काढले. शेवटी सरकारशी वाटाघाटी होवून काही मागण्या

मान्य करणे सरकारला भाग पाडले व त्याची अंशता अंमलबजावणी झाली. लाल व निळे झेंडे एका वर्गीय एकजुटीमध्ये लढण्यात एकत्र येण्याचे महाराष्ट्रातील ते स्फूर्तीदायक उदाहरण ठरले.

गोदूताई परुळेकर यांनी येरवडा तुरुंगात असताना नोव्हेंबर १९६५ मध्ये त्यांचे पती कॉ. शामराव परुळेकर यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकाचे लेखन केले. येरवडा तुरुंगात जवळजवळ सहा महिने पुस्तके लिहिण्यासाठी लागले. त्यापूर्वी मुंबईला तुरुंगात असताना शामराव परुळेकरांचे ३ ऑगस्ट १९६५ साली हृदय विकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. एप्रिल १९६६ मध्ये तुरुंगवासातून मुक्तता झाल्यानंतर गोदूताईंनी अनेक सामाजिक चळवळीत भाग घेतला. १९७२-७३ साली महाराष्ट्रात अभूतपूर्व दुष्काळ पडला त्याचा सामना करण्यासाठी गोदावरी परुळेकर, गंगाधर आप्पा बुरांडे, नरेंद्र मालुसरे, रामचंद्र घंगारे, विठ्ठलराव नाईक यांनी संघर्षाचे नेतृत्त्व केले.

शेतकरी कामगार पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि कामगार व शेतकऱ्यांच्या इतर डाव्या पक्ष संघटनांना बरोबर घेवून संयुक्त लढा दिला. दुष्काळाच्या काळात डावे पक्ष व किसान संघटनांनी केलेल्या लढ्याच्या परिणामीच राज्य सरकारला रोजगार हमी योजना आणि कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु करावी लागली हे चळवळीचे मोठे यश होते.

भारतातील सामाजिक विषमता आणि दलितांची, स्त्रियांची हलाखी धर्मातून निर्माण झाली हे विसरता येणार नाही. भारतात सांस्कृतिक क्रांती घडविण्याची जरुरी आहे कारण त्याशिवाय विषमतेचे निर्मूलन होणार नाही. भारतातील राजकारण, अर्थकारण व धर्मकारण हे एकमेकांत गुंतलेले विभाग आहेत.

१९७५ साली भाई वैद्य पुणे शहराचे महापौर झाले आणि त्यांनी पहिल्या सभेत जाहीर केले की, ''मी कोणताही प्रचलित धर्म मानीत नाही. परंतु ज्ञानोबा - तुकोबांच्या पालख्यांचे स्वागत सांस्कृतिक वारसा म्हणून अवश्य करीन मात्र शंकराचार्यांचे आणि सय्यदनांचे स्वागत करण्याचे नाकारले. तथापि शाहू महाराजांची जन्मशताब्दी अभिमानपूर्वक साजरी केली. झोपडपट्ट्यांतून बालवाड्या सुरु करुन व प्राथमिक शाळांच्या सुधारणेवर भर देत कारकीर्द पूर्ण केली.

### ५.१२ मुस्लिम सत्यशोधक मंडळ

'१९७० मध्ये पुणे शहरात थोर समाजसुधारक हमीद दलवाई यांच्या प्रेरणेने मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली.'[१९] मुस्लिम जगताच्यादृष्टीने हे प्रखर क्रांतिकारी अशीच घटना होती. भारतातील मुस्लिम समाज गटाला तर हा जबरदस्त हादराच ठरला होता. म्हणूनच हमीद दलवाई व त्यांच्या अनुयायांवर हल्ला करण्याचा प्रयत्नही मुस्लिम सनातन्यांनी केला. या चळवळीमुळे मुस्लिम महिलाही निर्भिडपणे आपली गाऱ्हाणी मांडू लागल्या. विषमता निर्मूलनाशी बांधीलकी असणाऱ्या पण विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना एकत्र आणण्याचा पुणे शहरातील प्रयत्नही परिवर्तनवादी शक्तींच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. राखीव जागा व मंडल आयोग शिफारशी बाबतच्या आग्रहाचा पुनरुच्चार पुणे येथेच दलवाई यांनी केला होता.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करणे ही एक क्रांतीकारी घटना होती. २२ मार्च १९७० साली सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, राष्ट्रसेवा दल, युवक क्रांतीदल, हमीद दलवाई, बाबूमियाँ बँन्डवाले, हुसेन जमादार, सय्यदभाई यासारख्या व्यक्तींची व असंख्य मुस्लिम कार्यकर्त्यांची साथ मिळाली. संपूर्ण मुस्लिम समाजाचा समतोल विकास हा प्रमुख उद्देश घेवून मंडळाने कार्य सुरु केले. मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य समता, बंधुता व लोकशाही या आधुनिक मुल्यांचा अधिकाधिक प्रचार करण्यासाठी मंडळ सदैव कार्यरत राहिले. महिलांच्या समस्या, धर्मांधता, राष्ट्रीय एकात्मता या मुद्दयांवर भर दिला गेला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची विचारधारा संपूर्ण देशभरात प्रसारित झाली. हमीद दलवाई, मेहरुन्निसा दलवाई, बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात अनेक परिवर्तनवादी कार्यक्रम यशस्वी केले.

| | | |
|---|---|---|
| २८ नोव्हेंबर १९७१ | : | अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद, पुणे |
| ३,४ डिसेंबर १९७१ | : | ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स, नवी दिल्ली. |
| २७, २८ डिसेंबर १९७१ | : | मुस्लिम महिला परिषद, पुणे |
| ३०, ३१ डिसेंबर १९७३ | : | मुस्लिम शिक्षण परिषद, कोल्हापूर, जिहाद-ए-तलाक परिषद, पुणे राज्यव्यापी सामाजिक परिषद, पुणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ ते १८ नोव्हेंबर १९८५ | : | शहाबानोचा पुणे येथे सत्कार, कोल्हापूर ते नागपूर–तलाक मुक्ती मोर्चा आणि मुंबई येथे 'पोटगी बचाव परिषद'. |
| २१, २२ फेब्रुवारी १९८६ | : | पंतप्रधान राजीव गांधी, राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांना निवेदन व दिल्ली येथे भेट. |
| १९९० | : | ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्सची स्थापना व इतर अनेक राज्यात परिषदांचे आयोजन. |

**(स्त्रोत–मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे माहितीपत्रक)**

अशा उपक्रमांची कार्यकक्षा वाढतच गेली. गेल्या ४५ वर्षांमध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यामुळे मुस्लिम समाजात परिवर्तनाची लाट आलेली आहे. अनेक मुस्लिम मुलं ही मराठी माध्यमांच्या शाळांतून शिक्षण घेत आहेत. शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटू लागले आहे. महिला संघटित होवून कार्य करण्यास पुढे येत आहे. उदारमतवादी व परिवर्तनवादी विचारांच्या मुस्लिमांची संख्या वाढत आहे. तलाकपिडीतांसाठी मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र अनेक जिल्ह्यातून चालवले गेले. तलाकपिडीत महिलांसाठी उद्योग केंद्र सुरु केले. १९९१ मध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ५००० मुस्लिम कुटुंबांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सर्वेक्षण करण्यात आले. १९९५ मध्ये बिजींग येथे पाचवी जागतिक महिला परिषद भरली. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा प्रतिनिधी म्हणून हुसेन जमादार यांना चीनला जाण्याची संधी मिळाली. १ जानेवारी ते ३० जानेवारी २००४ अखेर सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांत सद्‌भावना अभियान दौरा केला. सुमारे १ लाख लोकांपर्यंत व्याख्याने व मोहल्ला सभा यांच्या द्वारा अभियानाचा संदेश पोहोचविण्यात आला. ३० नोव्हेंबर २०१० रोजी कोल्हापुरात 'तोंडी तलाक बंद करा परिषद' घेण्यात आली. समाज अधिकाधिक मानवतावादी होण्यासाठी तसेच समता निर्माण होण्यासाठी अनेक कृती कार्यक्रम बाबा आढाव, भाई वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले आहेत. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (त्रैमासिक प्रकाशन), मुस्लिम सत्यशोधक महिला मंच, मुस्लिम सत्यशोधक युवा मंच, हमीद दलवाई स्टडी सर्कल

व ग्रंथालय, बकरी ईदच्या दिवशी रक्तदानाचा कार्यक्रम, २२ मार्च वर्धापन दिनादिवशी चर्चासत्र व समाजप्रबोधन पुरस्कार, ३ मे रोजी सत्यशोधक हमीद दलवाई व दिनकरराव जवळकर स्मृतिदिन, ११ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षण दिन (मौलाना अबुल कलाम आझाद जन्मदिवस) असे कार्यक्रम दरवर्षी आयोजित केले जातात. 'गेली ४५ वर्षे बाबा आढाव, भाई वैद्य हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या विविध कार्यक्रमात हजर राहून मार्गदर्शन करीत आहेत.'[१२]

### ५.१३ दलित स्वयंसेवक संघ

'महाराष्ट्रात वेगवेगळ्या दलित संघटनेच्या वतीने अन्याय–अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला जातो परंतु संघर्ष करीत असतानाच रचनात्मक व विधायक दृष्टीने कार्य करण्यासाठी दलित स्वयंसेवक संघाची स्थापना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीदिनी म्हणजे २८ नोव्हेंबर १९७७ रोजी करण्यात आली.'[२१]

दलितांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने सेवा करणारी संघटना या अर्थाने सहज अर्थ या नावात आहे. दलित या शब्दांची व्याख्या दलित स्वयंसेवक संघाची साधी सोपी आहे.

१) अन्यायी राक्षसी रुढीच्या वरवंट्याखाली चिरडला गेलेला श्रमिक व स्वत: पिळला जाणारा कष्टकरी वर्ग.

२) शेतमजूर व उद्योग व्यवसायाच्या प्रगतीस कारणीभूत असलेला भटका, विमुक्त समाज.

३) डोंगरदऱ्यामध्ये राहणारा मानवी जीवनापासून दूर असलेला आदिवासी, वनवासी, भटका, विमुक्त समाज.

४) भांडवलदारी व्यवस्थेत बळी पडलेला आर्थिक दुर्बल घटक हे सर्व घटक दलित या शब्दात अभिप्रेत आहे.

महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज, वीर लहूजी वस्ताद साळवे, अण्णाभाऊ साठे, यांच्या विचारांशी बांधिलकी स्वीकारुन दलित स्वयंसेवक संघाने ने काम सुरु केले.

दलित चळवळीच्या ज्या चुका, त्रुटी, धोके निरीक्षणास आल्या त्या सर्वांचा विचार करुन परिस्थितीनुरुप परिवर्तन करुन दलित स्वयंसेवक संघाची उभारणी केली. दलित संघटना नेतृत्त्वाच्या वादात नष्ट झाल्या. कार्यकर्ते भ्रष्ट व विकावू झाल्याने चळवळीचे नुकसान होते हे पाहून दलित स्वयंसेवक संघाने सामुदायिक नेतृत्त्वाचा स्वीकार केला. पाण्यासारखी पारदर्शकता असण्याची काळजी घेतली. या संघटनेची संसदीय राजकारणापासून अलिप्त राहून दलितांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक सुधारणा करणे आवश्यक वाटते याच विचाराने आजतागायत ३४ वर्षे दलित स्वयंसेवक संघ कार्यरत आहे.

दलित स्वयंसेवक संघाची स्थापना होताना २१ प्रमुख स्वयंसेवकांची जी समिती होती त्याच समितीस संस्थापकीय सदस्य म्हणून मान्यता दिली. दलित स्वयंसेवक संघाचे सदस्यत्व ध्येय धोरण मान्य असणाऱ्या जात, धर्म, लिंग, न पाहता संघाच्या प्रतिज्ञा पत्रकावर स्वरक्ताने सही करणाऱ्या व्यक्तीस देण्यात येते. सामाजिक परिवर्तनाच्या कामी रक्त सांडण्याची तयारी दर्शवणारी व स्वतःच्या रक्ताशी बेईमान होणार नाही अशी नावीन्यपूर्ण शपथ घ्यावी लागते.

''समाज को बदल डालो'' हे संघाचे ब्रीदवाक्य आहे. भारतातील वर्गीय व जातीय शोषण, अस्पृश्यता, अनिष्ट रुढी, परंपरा नष्ट करुन श्रम प्रतिष्ठा व समतेवर आधारित अशी वर्ग व वर्ण विरहित समाजवादी, मानवतावादी समाज निर्माण करण्याच्या ध्येयाला अनुसरुन हे घोषवाक्य स्विकारण्यात आले आहे.

दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी अनेक आंदोलने, मोर्चा, सत्याग्रह, घेराव व उपोषण डी. एस. एस. ने आयोजित केले. दलितांची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी संस्कार वर्ग चालविले. आर्थिक पाया मजबूत करणे, शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न करणे, यासाठी संघाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत.

दिनांक ६ एप्रिल १९७८ रोजी, मागासवर्गीय संघर्ष समितीच्या सहकार्याने बिहारमधील कर्पुरी ठाकूर यांच्या मंत्रिमंडळातील राखीव जागेला विरोध करणाऱ्या श्री. विजयकुमार व जगदीशकुमार या दोन आमदारांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले.

**५.१३.१ आळंदी प्रकरण**

येथून दरवर्षी निघणाऱ्या ज्ञानेश्वर–तुकाराम यांच्या पालख्यांबरोबर वारकऱ्यांच्या ज्या दिंड्या निघतात त्यामध्ये दलितांच्या दिंड्या पुढे सारुन जातीयता निर्माण केल्याने त्या विरुद्ध हराळे वैष्णव समाज व द. स्व. संघाच्या वतीने सक्रिय सत्याग्रह केला. मानाचे घोडे सर्वात पुढे करा व सवर्णाच्या दिंड्यामध्ये समावेश करा अशी मागणी केली. न्यायालयीन चौकशीने रुढ असलेली प्रथा रद्द ठरवून न्याय दिला. २४ डिसेंबर १९७८ रोजी दलित स्वं. सेवक संघाचे खेड, जुन्नर, आंबेगाव या तालुक्यांचे अधिवेशन मंचर येथील अण्णासाहेब आवटे कॉलेज येथे भरले होते.  त्या अधिवेशन परिसराला कै. भाऊ बापू मांग नारायणगावकर व व्यासपीठाला अण्णा भाऊ साठे हे नाव दिले होते. अध्यक्षस्थानी ॲड. एम. बी. भोंडे व प्रमुख वक्ते म्हणून अण्णासाहेब आवटे कॉलेजचे प्राचार्य पानमळसर, आमदार बि. डी. काळे होते. सदर अधिवेशनाला बँक ऑफ इंडिया नारायणगाव शाखेच्या वतीने मदत करण्यात आली. त्याची फल निष्पत्ती म्हणून गरीब व मागासवर्गीयांसाठी लोणकर वसतिगृह सुरु करण्यात आले व ते आठ वर्ष कार्यरत राहिले.

समाजाच्या अंतरंगामध्ये पोखरुन काढणाऱ्या वाईट रुढी, परंपरा व अंधश्रद्धा यांना मुळापासून उखडून नष्ट करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रबोधन, साम, दाम, दंडाचा प्रयोग अमलात आणावा लागला. १६/२/१९८० रोजी आकाशातील ग्रहताऱ्यांच्या सावल्यांच्या खेळातून जे ग्रहण दिसते. त्या ग्रहणासंबंधी अंधश्रद्धा मानणाऱ्या व्यक्ती 'दे दान सुटे गिऱ्हाण', 'मांगाला दान, वस्त्रदान' अशी आरोळी मारत असतात. ह्या अनिष्ट रुढी मानू नका याकरिता बैठका, मेळावे, सभा याद्वारे प्रबोधन करण्यात आले. ग्रहण मागणाऱ्या विरुद्ध शहरातील पोलीस कमिशनरमार्फत बेगर ॲक्ट फर्मान काढण्याची विनंती काढण्यात आली. आकाशवाणीद्वारे जे ग्रहण मागण्यास बाहेर पडतील त्यांना 'बेगर ॲक्ट' खाली अटक करावी असा बंदोबस्त केला. तसेच प्रत्येक शहरामध्ये व गावामध्ये २५ जणांचा गट करुन सायकलवर संपूर्ण रात्र फिरवून गिऱ्हाण मागणाऱ्यांना प्रतिबंध करण्यात आला. 'पोतराजकी संदर्भातसुद्धा असाचा आराखडा आखून या दोन्ही रुढी महाराष्ट्रातून उखडून काढण्यात आम्ही यशस्वी झालो.' [२२]

### ५.१३.२ काळा स्वातंत्र्य दिन

भारताला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे झाली परंतु गरीब आणखी गरीब होत गेले आणि श्रीमंत जास्तच श्रीमंत झाले. कष्टकरी, श्रमिक, दलित शारीरिक कष्ट करीत राहिले आणि वरचा वर्ग तूप रोटी खात गाद्यावर लोळत राहिला. याची चीड येवून २६ जानेवारी १९७९ रोजी 'प्रजासत्ताकाच्या निषेधार्थ दलित स्वयंसेवक संघाने पुणे शहर पोलीस आयुक्तांच्या बंदी हुकुमाचा भंग करुन मशाल मोर्चा आयोजित केला व तत्कालीन भारताचे पंतप्रधान मा. मोरारजी देसाई यांच्या प्रतिमेचे जाहीर दहन केले. या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे धरुन गंज पेठेतल्या वीर लहूजी वस्ताद तालमीपासून मशाल मोर्चा काढण्यात आला व त्याचा महात्मा फुले यांच्या वाड्यात समारोप केला. यावेळी दोनशे स्त्री–पुरुष स्वयंसेवकांना अटक करण्यात आली व बंदी हुकूम मोडल्याबद्दल २२ स्वयंसेवकांवर खटले भरण्यात आले.

१५ ऑगस्ट १९८० या स्वातंत्र्यदिनी पुणे शहरात ३०० स्त्री–पुरुषांनी आपल्या तोंडावर काळ्या पट्ट्या बांधून व दोन्ही हात काळ्या कपड्यांनी बांधून 'असा प्रतीकात्मक मोर्चा पुणे शहराच्या मध्यवर्ती लक्ष्मी रोडने जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला.

### ५.१३.३ पुणे महानगरपालिकेच्या कार्यालयात स्वयंपाक

सर्व्हे नं. ९८ शिवाजीनगर येथील म. न. पा. ने झोपड्या पाडल्या आणि तेथील दलितांना बेघर बनविले. या प्रसंगी दलित स्वयंसेवक संघाने महापालिका आयुक्तांची भेट घेवून हा प्रश्न सोडविण्याची विनंती केली परंतु त्यांच्या नकारार्थी उत्तराने प्रकरण चिघळले आणि आयुक्तांच्या कार्यालयात झोपडपट्टीतील नागरिकांना घेवून चुली पेटवून भाकरी करण्यास सुरुवात केली.

### ५.१३.४ देवदासी समारंभ तक्रार दाखल

१५/१२/१९९१ रोजी देवदासी समारंभास विरोध केला. शंभर कार्यकर्त्यांनी मिठगंज पोलीस चौकीवर जाऊन देवदासी प्रतिबंध कायद्याखाली सदरील देवीच्या सर्व भक्तांना अटक करावी अशी मागणी केली व पोलिसांना तक्रार घेण्यास भाग पाडले. दि. २२/१२/१९९१ रोजी सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव या गावी यल्लमा देवीच्या यात्रेमध्ये देवदासी सोडणाऱ्यांना अटक करावी अशी मागणी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांच्याकडे दलित स्वयंसेवक संघाने केली.

### ५.१३.५ नामांतराचा प्रश्न

नामांतराच्या प्रश्नात डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे यासाठी अनेक आंदोलने केली. लॉंग मार्चमध्ये मोठ्या संख्येने भाग घेऊन तुरुंगवास पत्करला. तसेच 'औरंगाबाद येथे दलित स्वयंसेवक संघ व महाराष्ट्र युवक परिषदेच्या वतीने अटक करुन घेतली.'[२३]

उत्तर प्रदेशात देऊळी आणि साधुपूर या ठिकाणी जे हत्याकांड घडले त्याच्या निषेधार्थ पुणे शहराच्या रस्त्यावरुन म. फुले यांच्या निवासस्थानी म. फुले समता प्रतिष्ठानच्या सहकार्याने मूक मोर्चा आयोजित केला होता. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांसाठी एक मोठे अधिवेशन सातारा जिल्ह्यातील पाली या ठिकाणी अण्णा बयाजी साठे यांच्या अध्यक्षतेखाली दलित स्वयंसेवक संघाने आयोजित केले होते. या अधिवेशनामध्ये राज्यमंत्री प्रेमानंद आवळे व लक्ष्मण ढोबळे यांनी मार्गदर्शन केले.

### ५.१३.६ दलित स्वयंसेवक संघाची स्मरणिका

दलित स्वयंसेवक संघाचा सर्व इतिहास लिखित स्वरुपात २४ मे १९८२ रोजी प्रकाशित करण्यात आला. सर्व कार्याचा आढावा स्मरणिकेत घेण्यात आला तसेच विविध कार्यक्रमांची यशस्वी गाथा प्रथमच लिहिण्यात आली. सदर स्मरणिकेत बाबा आढाव, प्रा. रावसाहेब कसबे, ॲड. एम. बी. भोंडे, सुधीर बाडेकर आदि मान्यवरांचे लेख प्रकाशित करण्यात आले.

### ५.१३.७ क्रांतिज्योत पदयात्रा

अण्णाभाऊ साठे क्रांतिज्योत पदयात्रेचे आयोजन अण्णा भाऊंचे जन्मगाव वाटेगावपासून १८ जुलै १९८२ रोजी सुरुवात करुन पश्चिम महाराष्ट्रातून औरंगाबाद, लातूर, नांदेड, नागपूर मार्गे मुंबईला समारोप करण्यात आला. संपूर्ण महाराष्ट्रात सहा हजार किलोमीटर क्रांतीज्योत पदयात्रेने अण्णाच्या विचाराचा प्रचार केला.

### ५.१३.८ दलित ऐक्यासाठी प्रयत्न

२१ जानेवारी १९८९ रोजी महाराष्ट्रातील विविध संघटनांना एकत्र करुन राजकीय व्यासपीठ निर्माण करावे व गरीब, श्रमिक जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून पुण्यातील नाना पेठ येथे महात्मा फुले हायस्कूलच्या मैदानावर राजकीय परिषद संपन्न झाली. सदर परिषदेला त्यावेळी ८० हजार रु. खर्च आला व २० हजार लोक जमले होते.

पुण्यातील टिळक स्मारक भवनमध्ये सुशीलकुमार शिंदे तत्कालिन अर्थमंत्री, महाराष्ट्र यांचे हस्ते राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या श्रीमती विठाबाई भाऊ बापू मांग नारायणगावकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याच वेळी पोतराज केशवपनही सुशीलकुमार शिंदे यांचे हस्ते करण्यात आले.

दिवंगत जमनालाल बजाज यांचा पूर्णाकृती पुतळा जेथे उभा केला तेथून तो पुतळा हलवावा म्हणून द. स्व. संघाने ४३ दिवस चक्री उपोषण चालविले ते म. न. पा. च्या दुटप्पी धोरणामुळे. १९७२ साली अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याकरिता सारसबाग चौकातील जागा निवडली होती. परंतु म. न. पा. ने पुणे शहरातील वाढती लोकसंख्या व वाढत्या वाहतूक समस्या याचे कारण पुढे करुन पुढील काळात कोणत्याही पुतळ्यास पुणे शहरातील चौकातील जागा दिली जाणार नाही असे धोरण स्वीकारल्याचे कारण दाखवले. गुरुवार दि. २५ डिसेंबर १९७५ रोजी अण्णाभाऊ साठेंच्या पुतळ्याला चौकातील कडेला जागा दिली. परंतु दि. २७ डिसेंबर १९८८ साली म.न.पा.ने या धोरणात्मक निर्णय बाजूला ठेवून जमनालाल बजाज यांच्या पुतळ्यास चौकातील जागा दिली. या अन्यायाचा विरोध करण्यासाठी 'बजाज पुतळा हटाव' या मागणीसाठी ४३ दिवसांचे चक्रीय उपोषण करुन भांडवलदारी प्रवृत्तीला विरोध केला. एस. एम. जोशी व शरद पवारांनी सुद्धा या आंदोलनाची दखल घेतली. ''या चक्री उपोषणाला बसलेल्या मुलांचे समाधान'' प्रथम करा. ''नंतर बजाज पुतळ्याचे उद्‌घाटन करा' अशी दोघांनीही भूमिका घेतली. दोन वेळा उद्‌घाटनाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. या आंदोलनामुळे द. स्व. संघास ग्रंथालयासाठी नेहरु स्टेडियममधील एक गाळा दिला व अण्णा भाऊ साठे स्मारक भवनकरिता अण्णांच्या पुतळयामागील जागेचे एस. एम. जोशी व शरद पवार यांचे हस्ते भूमिपूजन प्रथम केले. त्यानंतर कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी राजकारण केले व भूमीपूजनाचा दिखावा केला. अण्णा भाऊ साठेचे स्मारक न बांधता फसवणूक केली.

१७ नोव्हेंबर १९९१ रोजी इचलकरंजी (कोल्हापूर) येथे मातंग समाजाचे भव्य अधिवेशन संपन्न झाले. सदर अधिवेशनात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून १ लाखापेक्षा जास्त लोक जमा झाले होते. या अधिवेशनात विविध मागण्या मांडण्यात आल्या. सर्व महाराष्ट्रात या मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यात आला.

### ५.१.९ अण्णा भाऊ साठे स्मारक संस्था

अण्णाभाऊ साठे स्मारकसंस्थेची स्थापना दि. २१ मार्च १९८६ रोजी दलित समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी झाली. दलित समाजातील शिक्षण घेवून सुधारलेली आणि अंगमेहनती कामगार, ज्यांची हातावर पोटे आहेत अशी, अशा दोन्हीमध्ये जी दरी निर्माण झाली होती ती भरुन काढण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी गेली २५ वर्षे अण्णा भाऊ साठे स्मारक संस्था कार्यरत आहे. या आपल्या संस्थेच्या वतीने समाजोपयोगी अनेक उपक्रम राबविले. समाजजागृती त्याचप्रमाणे समाज प्रबोधन अशा प्रकारचे रचनात्मक व विधायक उपक्रम सातत्याने चालू ठेवण्यात यश मिळविले आहे. ते खालीलप्रमाणे होते.

१. पुणे शहरात अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक भवन उभारण्याचा मानस आहे.
२. विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगारांना मार्गदर्शनासाठी युवा सर्वांगीण विकासकेंद्र चालविले जाते.
३. समाजातील उपेक्षित कलाकारांकरिता अण्णा भाऊ साठे कला व सांस्कृतिक प्रबोधिनीची स्थापना.
४. मोफत कायदेविषयक सल्लागार केंद्र महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शनिवारी चालविले जाते.
५. अण्णा भाऊ साठे निसर्गोपचार केंद्र प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सायंकाळी ५. ३० वाजता चालू असते.
६. अण्णा भाऊ साठे सर्व जात–धर्मिय वधू–वर सूचक मंडळ चालविले जाते.
७. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्र व विचारांचा प्रचार करण्यासाठी ‘दीनजनांचा स्फूर्तिदाता’ ही ध्वनिफित कॅसेट एक लाख रूपये खर्चून काढण्यात आली. संस्थेच्या वतीने खालील पुस्तकांचे प्रकाशन समारंभ आयोजित केले.

१) कोल्हापूरचे अनंत घोडे लिखित ''अश्रू आणि अंगार'' या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित कादंबरीचे प्रकाशन.

२) ॲड. करुणेश डोलारे लिखित ''अण्णा भाऊ साठे'' या पुस्तकाचे प्रकाशन.

३) किशोर जाधव (जळगाव) लिखित ''निळ्या आकाशातील लाल तारा'' या पुस्तकाचे प्रकाशन.

४) अनंत घोडे लिखित ''संत गाडगेबाबा'', ''क्रांतिवीर लहूजी वस्ताद साळवे'' या दोन पुस्तकांच्या प्रकाशनाची जबाबदारी संस्थेच्या वतीने पार पडली. सदर पुस्तकांचे प्रकाशन प्रसिद्ध विचारवंत डॉ. मा. प. मंगुडकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

५) पी. डी. ननावरे गुरुजी संपादित ''कृतज्ञता'' ''त्रैमासिक'' प्रकाशन समारंभ १ ऑगस्ट २००१ रोजी मारुतीराव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. विलास वाघ, सुगावा प्रकाशनाचे संपादक यांच्या हस्ते संपन्न झाला.

**५.१३.१० कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत**

ही संस्था दलित स्वयंसेवक संघाच्या कार्यामधून निर्माण झाली आहे. कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायतीची स्थापना गुलटेकडीच्या हमाल पंचायतीमध्ये डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते करण्यात आली. त्या कार्यक्रमाला एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या वतीने तीन प्रतिनिधी कार्यक्रमास उपस्थित होते. तदनंतर, कष्टकरी पंचायतमध्ये त्यांना समाविष्ट करुन घेण्यात आले. पुणे शहरातील सर्व झोपडपटट्यांमधून कागद, काच, पत्रा, वेचणाऱ्या लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षणांकरिता संस्थेनी फार कष्ट घेतले. ग्रामीण भागातून आलेली मंडळी नागझरी नाला व झोपडपट्टीत राहतात. हाताला काम मिळत नसल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी बिगर भांडवली धंदा म्हणून पहाटे चारपासून दुपारी चार वाजेपर्यंत कचरा पेट्या धुंडाळायची कामे करुन कुटुंबाचे पालनपोषण करीत असतात. त्यांच्यावर पोलीस, गुंड आणि दुकानदार यांच्याकडून अमानूष अत्याचार होत होते. या संघटनेमुळे हा त्रास कमी झाला. महानगरपालिकेने प्रत्येकाला फोटोपास दिला. बचत गट निर्माण झाले. संघटनेची स्वत:ची दुकाने निर्माण झाली. त्यामुळे या गरिबांची फसवणूक बंद

झाली. रेशनिंगकरिता बी. पी. एल.  ची कार्ड मिळवली. कागद वेचणाऱ्या महिलेला स्वत:चे रक्षण करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याचबरोबर आपल्या मुलांना जनावरासारख्या जीवनापासून दूर ठेवण्याची जिज्ञासा त्यांच्यात निर्माण झाली. सदर कार्यामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. मोहन ननावरे यांचा सिंहाचा वाटा आहे.

मागासवर्गीय मंहामंडळाच्या एकत्रीकरणाच्या व महाराष्ट्र शासनाच्या धोरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी दलित स्वयंसेवक संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे लाक्षणिक धरणे धरण्याचा कार्यक्रम दि. १९/०९/२००१ रोजी झाला. सदर प्रसंगी महाराष्ट्र शासनाने अनेक जनहित विरोधी निर्णय घेण्याचा जो सपाटा चालविला आहे, त्याचा संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

### ५.१३.११ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सार्वजनिक स्मारक निर्माण समिती

२२ ऑगस्ट २००३ चा काळा दिवस अण्णा भाऊ साठे प्रेमी जनता कधीही विसरणार नाही. त्या दिवशी, भांडवलशाहीविरुद्ध आयुष्यभर लढणाऱ्या अण्णा भाऊंचे स्मारक त्याच व्यापारी पद्धतीने (बी. ओ. टी.) करण्याचा ठराव पुणे म. न. पा. ने केला होता. याविरुद्ध दलित स्वयंसेवक संघाच्या पुढाकाराने सर्वांनी आवाज उठविला. तर पुणे महानगरपालिकेबाहेर रस्त्यावर धरणे आंदोलन केले. तातडीने १ सप्टेंबर २००३ समविचारी संस्था, संघटना, व्यक्तींची बैठक जाहीर केली. संपूर्ण महाराष्ट्रात आज समाजामध्ये फार मोठ्या प्रमाणात जागृती झालेली दिसते.  परंतु त्यामध्ये युवक व महिलांचा सहभाग होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून पुढील काळामध्ये युवक व महिला यांच्यात जाणीव निर्माण करणे व सहभाग वाढविणे हे दलित स्वयंसेवक संघाचे मुख्य लक्ष आहे. गेल्या ३५ वर्षांपासून दलित स्वयंसेवक संघ महाराष्ट्रात कार्यरत आहे. सर्व संकटावर मात करुन दलित स्वयंसेवक संघ पाय रोवून आहे.

### ५.१३.१२ महिलांचा सन्मान

हजारो वर्षांपासून स्त्रियांना उपभोग्य वस्तूंच्या दृष्टीकोनातून पाहिलं जातं. त्यांच्या अंगी उत्कृष्ट गुण, विविध कौशल्ये असतानाही त्यांना समाजात दुय्यमस्थान दिलं जातं. ‘या हजारो वर्षांच्या परंपरेला छेद देण्यासाठी दलित स्वयंसेवक सघाने पुढाकार घेवून महानगरपालिकेतील

सफाई काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मुकादमपदी स्त्रियांची निवड करुन स्त्रियांना सन्मान प्राप्त करुन दिला.’[२४]

### ५.१३.१३ अल्कोहोलविरोधी लढा

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. भक्तीमार्गातून जगण्याची नवी शक्ती बहाल करणारे संत याच भूमीतले. संताच्या शिकवणीस अनुसरुन संपूर्ण देशात विज्ञानवादाचा संदेश देवून समतेचं रणशिंग फुंकणारे महापुरुषही महाराष्ट्रातलेच परंतु २१ व्या शतकात महाराष्ट्राचा वारसा विसरलेली राज्यकर्ती मंडळी मात्र इथल्या तरुणाईला कुरवाळण्यासाठी शासनाने नवा अध्यादेश काढून की, महाराष्ट्रातल्या छोट्या–छोट्या दुकानांवर, पान ठेल्यांवर कमी तीव्रतेची व मादक अम्लांमध्ये अल्कोहोलचे प्रमाण कमी ठेवून अल्कोहोल मिश्रीत सर्व प्रकारची नशिली पेये विकण्यास सर्वच दुकानांना परवानगी दिली.

राज्य पातळीवर शासनाच्या अल्कोहोल मिश्रीत पेय विक्री या कायद्याच्या विरोधात प्रचंड आंदोलन केले. या आंदोलनास संपूर्ण महाराष्ट्रातून सर्व मिडिया व सर्वच पुरोगामी संघटनांनी प्रचंड पाठींबा दिला आणि या तीव्र आंदोलनासमोर शासनाने आपली बाजू नमती घेतली आणि तो दारुविक्रीस परवानगी देणारा कायदा रद्द केला. प्रस्तुत सर्व सामाजिक लढे हे माणसांच्या आत्मनिर्भयता व स्वाभिमानासाठी लढले आहेत. काळानुरुप समाजाची स्थिती बदलत गेली. समाजाची प्रतिके, श्रद्धास्थान, आदर्श, दैनंदिन जगण्याच्या पद्धती यांसारखे दृश्य अदृश्य बदल झाले. या सर्व बाबी लक्षात घेवून द. स्व. संघाने विविध स्वरुपाचे उपक्रम हाती घेतले.

**१) दुर्बल विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अधिकारी बनण्याच्या स्वप्नांना पंख दिले**

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्याभागातून IAS होण्याचं स्वप्न उराशी बाळगून पुण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे मोफत मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षेस उपयुक्त पुस्तकांची उपलब्धता करुन ग्रामीण गरीब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देवून त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत करीत आहेत.

**२) विचारपरिवर्तन संपूर्ण परिवर्तनाचे मूळ आहे**

माणसांच्या विचार करण्याच्या पद्धतीत उच्च दर्जाचे विचार करण्याची सवय लावली असता माणूस चांगल्या पद्धतीने जीवन जगण्याचा विचार करु लागतो आणि परंपरागत गुलामीतून मुक्तता मिळविण्याचा प्रयत्न करतो म्हणून अण्णा भाऊ साठे स्मारक संस्थेच्या वतीने मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येतात. यामध्ये डॉ. सत्यरंजन साठे, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य यांसारखी दिग्गज मंडळी व्याख्यानमालेसाठी येवून वैचारिक प्रबोधन करीत असतात. आता पर्यंत व्याख्यानमालेचे २६० वे पुष्प गुंफले गेले आहे.

**३) नापासांना आधार**

१० वी, १२वी इयत्तेमध्ये नापास झालेले विद्यार्थी मानसिकदृष्ट्या खचून जातात व कायमचे शिक्षणापासून दूर जातात. म्हणून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवून देशाला नवा आधारस्तंभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १० वी, १२ वी नापास विद्यार्थ्यांना ज्या विषयात नापास झाले त्या विषयाचे मोफत शिकवणी घेवून त्यांच्यात शिक्षणाविषयी आत्मीयता निर्माण करण्याचे कार्य करीत आहे.

**४) गुणवंताना प्रोत्साहन**

१० वी, १२ वी मध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यााठी प्रोत्साहन मिळावे व १२ वी नंतर काय? या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात असणाऱ्यांना मार्गदर्शन व यशस्वी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य देवून त्यांचा सत्कार करण्याचा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून दर वर्षी राबविला जातो.

**५) वाचाल तर वाचाल चा सल्ला**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाला वाचाल तर वाचाल चा संदेश दिला. आणि महाराष्ट्रातील लाखो दलित समाज वाचायला शिकला. त्यांच्या त्या वाचनाच्या प्रक्रियेला गतिमान करण्यासाठी संघटनेच्या मुख्यालयात दररोज सायं. ५ ते ८ वाजेपर्यंत मोफत ग्रंथालय चालविले जाते. त्यात विविध विषयावरील ग्रंथ उपलब्ध आहेत.

अनेक लढ्यांचा व संस्थात्मक कार्याची दखल घेवून दलित स्वयंसेवक संघाला महाराष्ट्रातील बहुजन समाजाने आणि अण्णाभाऊ साठे स्मारक संस्थेला महाराष्ट्र शासनाने भरभरुन प्रतिसाद दिला. या सर्व कार्याची पावती म्हणून सामाजिक क्षेत्रातील तुरा समजला जाणारा 'दलित मित्र' हा बहुमान देवून सन्मानित केले. शासनाचा हा पुरस्कार म्हणजे अण्णा भाऊ साठे स्मारक संस्थेच्या संपूर्ण उपक्रमाला जाहीर स्वरुपाचा शासकीय पातळीवरची पावती आहे.

संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला असता दि. २८/११/१९७७ रोजी नव्या समाजनिर्मितीची ऊर्मी मनाशी बाळगून मनाला मनगटाचं सामर्थ्य आणि मनगटाला बुद्धीवादाचं तेज देवून स्वतःच्या सळसळणाऱ्या रक्ताने सही करुन सामाजिक परिवर्तनाचा लढा यशस्वी करण्याचा करार केलेल्या युवकांचा तो संकल्प आहे. गेल्या ३५ वर्षांच्या काळात अथक परिश्रमातून सामाजिक परिवर्तनाची वीज महाराष्ट्रातील उपेक्षित वर्गाच्या कानापासून मनापर्यंत आणि मनातून आचरणात उतरताना दिसते आहे. ज्या ज्या बहुजन महापुरुषांनी सामाजिक परिवर्तनाचं स्वप्न पाहिलं आणि त्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य पणाला लावलं. त्या सर्व महापुरुषांच्या अर्धवट स्वप्नांच्या पूर्तीसाठी संवैधानिक मार्गाने संघर्ष करणारी द. स्व. संघ ही एक महाराष्ट्रातील संघटना नसून ते माणसाला धर्म, परंपरा, अंधश्रध्दा, रुढी, प्रथा, वाईट गोष्टी, प्रस्थापितांची गुलामी यामधून मुक्ती मिळवून देण्याचे एक प्रभावी वैचारिक हत्यार आहे.

**५.१३.१४ अण्णा भाऊ व्याख्यानमाला**

अण्णा भाऊ साठे स्मारक संचालित व्याख्यानमाला सन १९९० साली सुरु करण्यात आली. सातत्याने गेली २६० महिने अखंडितपणे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी व्याख्यानमालेचे पुष्प आयोजित करुन अखंड ज्ञान यज्ञ चालू ठेवला आहे त्यांना शृंखलांमध्ये विविध विषयांवर, जीवनाच्या पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी सर्व क्षेत्रांतील ज्ञानवंत प्रज्ञावंत विद्वानांनी संस्थेच्या कार्यालयात उपस्थिती लावली आहे. त्यापैकी ज्ञानमहर्षी बाळासाहेब

भारदे, डॉ. सत्यरंजन साठे, रा. प. नेने, विनायकराव कुलकर्णी, प्रा. फडके, निळू फुले, प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, मच्छिंद्रनाथ देवणीकर.

भारताचा अर्थसंकल्प या विषयांची मांडणी सुलभा ब्रह्मे, अल्पसंख्याक या विषयावर रझिया पटेल, सय्यदभाई, लतिफभाई मगदूम, समतेसाठी संतांचे योगदान या विषयावर डॉ. रामचंद्र देखणे, एस. के. लोंढे भारताचा अर्थ संकल्प प्रा. अजित अभ्यंकर, अंधश्रद्धा यावर दत्ता देसाई, मानसिक स्वास्थ्यास विपश्यना व आनापान योगशिक्षक दत्ता कोहिनकर पाटील यांनी मांडणी केली. भारतातील इस्लाम यावर डॉ. बाबासाहेबांचे नातजावई डॉ. आनंद तेलतुंबडे व संसदेतील राजकारणावर प्रा. प्रकाश पवार, आदिवासी कातकरी समाज डॉ. महादेव डोंगरे, लोकपाल विधेयक डॉ. विजय कुंजीर यांनी मार्गदर्शन केले.

या व्याख्यानमालेत जुने जाणते ख्यातनाम वक्ते बोलविण्यात आले तसे नवीन तरुण विद्यार्थी यांना सुद्धा पाचारण करण्यात आले होते. पुणे शहरामध्ये २६० व्याख्याने चालविणारी ही संस्था दलित स्वयंसेवक संस्था आहे.

### ५.१४ अंधश्रद्धा निर्मूलन समिती

अंधश्रद्धा निर्मूलन ही एक चळवळ पुणे शहरामध्ये अनेक वर्षांपासून डॉ. नरेंद्र दाभोळकर चालवित होते. त्यांनी यावर पुणे शहरात आजवर अनेक व्याख्याने दिली. अनेक प्रयोग करुन जनतेसमोर दाखविले. दैव ही कल्पना मानसिक गुलामगिरीची आणि म्हणूनच अंधश्रद्धांची पायाभूत कल्पना आहे. त्यांना आत्तापर्यंत भ्रम आणि निराश, अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, अंधश्रद्धा विनाश विचार तर कराल?, श्रद्धा–अंधश्रद्धा इत्यादी पुस्तकांचे लेखन केले आहे. हकिकत, वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेकवाद, धर्मचिकित्सा, अंधश्रद्धेचे विविध प्रकार इ. विषयावर लेखन केले आहे.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा समजून घेताना अडचण येते, कारण त्या कालसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष असतात. काही वर्षापूर्वी राजस्थान येथे देवराला या गावात पतीच्या निधनानंतर एक स्त्री सती गेली आणि संपूर्ण देशभर एकच गदारोळ उडाला. सती जाण्याला बंदी करणारा कायदा होता परंतू देशभरातील लोकांची मागणी लक्षात घेवून तो कायदा कडक करावा लागला. या शतकाच्या सुरुवातीला पुणे शहरामध्ये अनेक स्त्रिया तांबडी अलवणी नेसलेल्या

आणि डोक्याचे केशवपण केलेल्या दिसत. या अभागी विधवा होत्या. त्यांनी केशवपन करणं हा त्या काळचा धर्मसंस्कार, धर्मश्रद्धेचाभाग होता. शिक्षणाचा, विज्ञानाचा आणि आधुनिकीकरणाचा प्रसार होईल त्या प्रमाणामध्ये अंधश्रद्धा आपोआप कमी होतील. वैज्ञानिक दृष्टीकोन आपल्या समाजात नव्हता आणि तो असणे अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणून १९७६ साली इंदिरा गांधींनी आपल्या देशाच्या घटनेमध्ये दुरुस्ती केली. तोपर्यंत देशाच्या घटनेमध्ये नागरिकांचे हक्क फक्त होते. त्याचबरोबर इंदिराजींनी घटनेमध्ये नागरिकांच्या कर्तव्याचा समावेश केला आणि त्यापैकी एक महत्त्वाचे कर्तव्य असे आहे की, प्रत्येक भारतीय नागरिकांचं हे कर्तव्य आहे की, स्वतःमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, शोधक बुद्धी आणि मानवतावाद याचा प्रसार होईल. पंतप्रधान राजीव गांधी यांनी नवं शैक्षणिक धोरण जाहीर केले, या नव्या शैक्षणिक धोरणाच्या गाभा घटकामध्ये जे महत्त्वाचे घटक आहेत त्यापैकी एक घटक 'वैज्ञानिक मनोभावाची निर्मिती ' हा आहे.

५० वर्षांपूर्वी एक माणूस पुण्यामध्ये जिवाच्या आकांताने हे सांगत होता की, 'लोकहो वाढत्या लोकसंख्येनं आपलं सर्व राष्ट्र धोक्यामध्ये येणार आहे तेव्हा वाढती लोकसंख्या कमी करा.' त्यावेळेला त्या माणसाचं कुणीही ऐकल नाही. किंबहुना त्या माणसाला खुळ्यात काढलं कुटुंबनियोजन व संतती नियमन हे शब्द आज ऐकताना आपल्याला काही वाटत नाही. हे शब्द त्या काळात अश्लिल मानण्यात यायचे आणि असे शब्द उच्चारल्या बद्दल, याचा प्रचार केल्याबद्दल र. धो. कर्वे यांना म्हणजेच भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांचे चिरंजीव त्यांना पुण्यामध्ये अश्लिल वाडमयाची निर्मिती केल्याच्या खटल्याला सामोरे जाव लागलं. पण त्यांनी ते सत्य सांगितले. ते सत्य जर आपल्याला समजलं असतं तर आज आपल्या राष्ट्राची होणारी दमछाक वाचली असती.

देवदासी रुढी म्हणजे तरी काय? लहानपणी मुलीच्या केसाला तेलपाणी नसतं, वेणी फणी नसते, केसातील गुंता न सोडवल्यानं आणि अस्वच्छतेनं केस एकमेकात गुंतत जातात. कोणीतरी देवऋषी केसातील त्या गुंत्याकडे बोट दाखवतो मुलीच्या आई बापाला सांगतो, 'तुमच्या लेकीच्या केसात यल्लमा आईची जट आली आहे.' मग मुलीची शाळा सुटते. हळूहळू शुक्रवारी तिच्या अंगात येऊ लागतं. डोक्यावर जग येतो, त्याच्यासह पाच घरं फिरुन जोगवा

मागणं चालू होतं आणि मग ती तरणीताठी स्त्री कधीतरी सौंदत्तीला जाऊन देवाशी लग्न लावते. 'काही वेळेला आईबापाचे नवस फेडण्यासाठी मुलीला देवाला सोडल जातं. देवाशी लग्न लागल्यानंतर आणखी कोणाशी लग्न लागण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रत्यक्षात मात्र तिच्या नशिबी गावचे टगे येतात. पुण्याच्या किंवा मुंबईच्या वेश्यावस्तीतील दलालांना ती विकली जाते. तिच्या सुखी संसाराची राखरांगोळी होते. खरं तर या विरुद्धचा कायदा आहे १९३४ सालचा. गेली वीस वर्षे या विरोधात चळवळ चालू आहे.'[२५] हजारो जटा सोडवण्यात व कापण्यात आल्या आहेत. शासनाच्या देवदासी प्रथेविरोधी अभ्यासगटांच्या शिफारशींची अंमलबजावणी काही प्रमाणात चालू आहे. परंतु तरीही परंपरेत चिवट मूळ धरुन असलेली ही प्रथा जाण्यासाठी बराच संघर्ष करावा लागत आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रश्न हा सांघिक स्वरुपात सोडविण्याची गरज आहे. भारताच्या संविधानामध्ये जी मूल्यं उद्घोषित केलेली आहेत. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय आणि शोषण विरहित समाजरचना या मुल्यांचा स्विकार करुन आम्ही भारतीय असा संकल्प करतो की, आम्ही या मूल्य पद्धतीचे राष्ट्र उभारु. हा संकल्प जर प्रत्यक्षात यायचा असेल तर, एका बाजूला अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ प्रभावी व्हावी लागेल. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ प्रभावी झाली तर, घटनेमध्ये असलेल्या ज्या मूल्य संकल्पना या समाज जीवनामध्ये खऱ्या अर्थाने साकार झाल्या तर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला पाठबळ मिळेल असा हा परस्पर अवलंबून असलेला संबंध आहे. स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा, स्त्रियांची आरोग्य व्यवस्था सुधारणे, स्त्रियांना स्त्री म्हणून मूल्य मिळालं तरच परंपरेला चिकटून असलेल्या स्त्रिया डोळसपणे बघायला शिकतील.

७ जुलै १९९५ रोजी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत नांदेडचे आमदार पी. जी. दस्तूरकर यांनी जादूटोणाविरोधी कायद्याचे अशासकीय विधेयक मांडले. विधेयकाचे रुपांतर कायद्यात व्हावे यासाठी ८० हजार निवेदने अंधश्रद्धा समितीकडे आलेली होती. कायद्यावर हरकतीही आल्या होत्या. प्रत्येक समाज हा रुढी, कर्मकांडे, परंपरा यांच्यात अडकून पडलेला आहे. त्यापैकी अनेकांना धर्माचरणाचे रुप येते. शतकानुशतके हे चालत आलेले आहे. आपण असे का वागतो. हे न तपासता आंधळेपणाने आचरण सुरु होते. बहुसंख्य समाज भोळे भाबडे

पणाने या आचारणालाच धर्म समजतो. दुसऱ्या बाजूला या परिस्थितीचा फायदा घेणारा मतलबी छोटा वर्ग तयार होतो. यासाठी धर्माचा बुरखा वापरतो. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर या सर्व सुधारकांचे असे स्पष्ट मत होते, की अंधश्रद्धेमुळे शूद्र आणि अतिशूद्र यांच्यावर अनेक अनिष्ट परिणाम होतात. ते फसले जातात. तो समाज दैववादी व क्रियाशून्य बनतो. स्वतःचे शोषण हे पूर्वजन्मीचे पाप मानू लागतो. विचारांच्या गर्तेतून निर्माण होणाऱ्या आचाराच्या अरिष्टात सापडतो. हा बहुजन समाज याच अंधश्रद्धेच्या मानसिक गुलामगिरीत कायम खितपत पडावा असेच प्रतिगाम्यांना वाटते म्हणून ते विधेयकाला विरोध करतात. परिवर्तनासाठी प्रभावी प्रबोधन लागते आणि कायदाही लागतो. जनशक्तीची जागृती हवीच, पण त्याला दंड शक्तीची जोड हवी.

### ५.१५ बहुजन समाज पार्टी

भारतीय अस्पृश्य जातींना राजकीय प्रतिनिधीत्त्व देण्यात यावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेमध्ये ब्रिटीशांकडे केलेली स्वतंत्र मतदार संघाची मागणी ब्रिटीशांनी मान्य केल्याने त्यास महात्मा गांधीनी विरोध केला. शेवटी अस्पृश्यांना संयुक्त मतदार संघात राखीव जागा देवून राजकीय प्रतिनिधीत्त्वाचा अधिकार देण्याची तडजोड मा. गांधी – डॉ. आंबेडकर यांच्यात झालेल्या पुणे करारात करण्यात आली. कांशीराम यांनी दलितांमध्ये राजकीय जाणीव जागृती करण्यासाठी पुणे कराराचा धिक्कार करण्याचे धोरण आखले. २४ ऑक्टोबर १९८२ रोजी या पुणे कराराला ५० वर्षे पूर्ण झाली होती. या निमित्ताने कांशीराम यांनी 'पुणे करार धिक्कार' हा कार्यक्रम आखला. संघटनेच्या वतीने या कराराबाबत भूमिका मांडताना कांशीराम म्हणतात, ''हा करार दहशतवाद व फसवणूक यातून झाला होता. या करारात गांधीची भूमिका फसवी होती, जातीय निवाडा हा येथील जातीभेद, अस्पृश्यता, विषमता इत्यादी सामाजिक संघर्षाचा स्वाभाविक परिणाम आहे. अस्पृश्यांवर 'पुणे करार' लादून त्यांचे हक्क हिरावून घेतले गेले तीच पाळी आदिवासी व ओबीसींवर येऊ शकते. त्यातून अल्पसंख्यांकही सुटू शकणार नाहीत. तेव्हा या सर्व दलित शोषितांनी आपल्या उज्ज्वल परंपरेसाठी धिक्कार करावा तसेच हा धिक्कार मुख्यतः दोन मुलभूत समस्यांकडे लक्ष

वेधण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. एक म्हणजे जातीभेदाकडे समाजाचे लक्ष वेधणे व दुसरे म्हणजे समाजातील चमचेगिरी बंद करणे. ''.

पुणे कराराचे सामान्य माणसाला धोकेबाज स्वरुप कळावे. या करारामुळे आंबेडकरी राजकारणाची पिछेहाट झाली ही वास्तवता लक्षात यावी. दलित शोषितांचे आपले निवडून गेलेले प्रतिनिधी हे किती लाचार आहेत हे स्पष्ट व्हावे. स्वाभिमानाने आंबेडकरी राजकारण पुन्हा उभे राहिले पाहिजे हे धिक्कार करण्यामागचे उद्देश होते. पुणे करार धिक्कार परिषदांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील राजकारणात अग्रेसर असलेल्या नवबौध्दांना संघटित करणे, रिपब्लिकन पक्षांच्या नेत्यांच्या चमचेगिरीवर टिका करणे व राजकीय अस्मिता निर्माण करणे या स्वरुपाचे कार्य बहुजन समाज पक्षाने केले.

मंडल आयोगाच्या समर्थनात पुणे येथे सी. पी. थोरात, यशवंत कांबळे या नेत्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मंडल आयोगामध्ये इतर मागासर्वीयांना सेवा, सुविधा व आरक्षण देण्याची शिफारस केली होती. मंडल आयोगाच्या समर्थनार्थ हे कार्यक्रम पुण्यात झाले.

बसपाने आजपर्यंत पुणे शहराच्या माध्यमातून जातीचे मेळावे, धोबी समाज मेळावे, मंडल आयोगाच्या समर्थनार्थ प्रबोधनात्मक कार्यक्रम, जनसांसद व जनजागरण मोहीम.

१) पाच सुत्री आंदोलन (१९८८).

२) जाती तोडो समाज जोडो अभियान (१९८९).

३) असली आजादी का संघर्ष (१९९७).

४) घटना पुनर्विलोकन विरोधात बहुजन समाज पक्षाचे राज्यव्यापी आंदोलन (१९९८).

५) स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती (१९९८).

६) बहुजन समाज संमेलन (१९९८)

७) पुणे विद्यापीठास छ. शाहू महाराजांचे नाव द्यावे ही मागणी (आरक्षण दिन) इत्यादी प्रश्न हाताळले आहेत.

## ५.१६ रिपब्लिकन पक्षाच्या दहा मागण्या

ऑक्टोबर १९६४ मध्ये रिपब्लिकन पक्षाने केलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रह आंदोलनाचेवेळी पक्षाने केंद्र सरकारकडे केलेल्या दहा मागण्या व्यापक जनाधार निर्माण करण्यासाठी राबविलेल्या पक्षाच्या धोरणाच्या निदर्शक आहेत.

१) देशातील शेतीला लायक असलेली पडीक जमीन कसणाऱ्या भूमिहीनांना देण्यात यावी.

२) पडीक जमिनीचे वाटप सर्व जाती जमातीतील भूमिहिनांना करण्यात यावे.

३) अन्नधान्याचे पुरेसे वाटप जनतेत करण्यात यावे. वाढत्या महागाईला आळा घालण्यात यावा.

४) झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्या यांची सुधारणा करण्यात यावी व त्यांना नागरी सोयी पुरविण्यात याव्यात.

५) १९४८ चा किमान वेतन कायदा सर्व उद्योगधंद्यांना अविलंब लागू करावा.

६) अनुसूचित जातींना जे हक्क व सवलती भारतीय घटनेत बहाल करण्यात आल्या आहेत त्या सवलती नवदीक्षित नवबौद्धांना मिळाव्यात.

७) दलितांवरील होत असलेल्या अन्याय अत्याचाराला त्वरीत पायबंद घालण्यात यावा.

८) अस्पृश्यता निवारण कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.

९) अनुसूचित जाती–जमातींचे आरक्षण त्वरीत भरण्यात यावे.

१०) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र लाकसभेच्या केंद्रीय सभागृहात लावण्यात यावे.

### ५.१७ बामसेफ

बामसेफ हे नाव दि ऑल इंडिया बॅकवर्ड (एस्. सी. / एस्. टी. / ओबीसी) अँन्ड मायनॉरिटी कम्युनिटी एम्प्लॉइज् फेडरेशन या शब्दावलीचे संक्षिप्त रुप आहे. बॅकवर्ड क्लास (मागास वर्ग) ही बहुव्यापक संज्ञा आहे. या संज्ञेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व धार्मिक अल्पसंख्याक यांचा समावेश होतो. बामसेफ संबंधीचा विचार समाज हिताच्या कल्पनेच्या स्वरुपात १९७३ च्या दरम्यान उदयास आला. पुणे व दिल्लीतील शिक्षित कर्मचाऱ्यांनी दिल्ली येथे ५ दिवसांच्या बैठकीत ५ वर्षांच्या निर्धारीत कालावधीत

बामसेफची स्थापना करावयाचे ठरविले व दिल्ली येथे बोट क्लबच्या पटांगणावर ६ डिसेंबर १९७८ रोजी बामसेफची स्थापना झाली.

समाज परिवर्तनाची कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिचे नेतृत्त्व समाजातील बुध्दिजीवी वर्गाने करणे गरजेचे असते. फुले, आंबेडकर चळवळ व भारतातील इतर समाज व्यवस्था विरोधी चळवळींचा परिणाम म्हणून दलित मागासवर्गीय जातीत बुद्धिजीवी वर्गाचा उदय झाला. सर्वसाधारणपणे हा वर्ग शासकीय सेवेत कार्यरत आहे. आंबेडकरी चळवळीचे अपत्य असलेल्या कर्मचाऱ्यांचे, बुध्दिजीवी वर्गाचे संघटन बामसेफच्या माध्यमातून होत आहे. बामसेफने बहुजन समाजाला ब्राह्मणवादी विचार व संघटनांपासून वेगळे करुन त्यांना फुले आंबेडकरी चळवळीत संघटित करण्यासाठी त्यांचे प्रबोधन करण्याची भूमिका घेतली.

बामसेफच्या माध्यमातून अनटचेबल इंडिया, डिप्रेस्ड इंडिया, बहूजन संघटक, बहूजन नायक ही नियतकालिके व साप्ताहिके सुरु केली. बामसेफने आजपर्यंत अनेक कार्यक्रम हाती घेतले यामध्ये आंबेडकरी मेळा, वैद्यकीय सल्ला केंद्र, संडे सिरीज, साहित्य शाखा, ब्रदरहूड सेंटर, कॅडर कॅम्प इत्यादींचा समावेश करावा लागेल.

## ५.१८ दलित पँथर

दलित पँथर पुणे शाखेच्या अध्यक्षपदी एल. डी. भोसले तर मुख्य सचिवपदी जयदेव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारणीचे बहुतेक सदस्य पूर्वाश्रमीचे साम्यवादी किंवा साम्यवादाकडे कल असणारे होते. पुण्याचे भूतपूर्व मेयर शांताराम दिवेकर यांच्या घरीच पुणे शाखेचे कार्यालय बनवले होते.

२२ जून १९७५ ला पुणे येथे महाराष्ट्र कार्यकारिणीची सभा भरविण्यात आली. त्यापुर्वी एक महिना ढसाळांना या विषयी आमंत्रण दिले असताना ते व त्यांचे अनुयायी सभेस उपस्थित राहिले नाहीत. शांताराम दिवेकर, एस्. चव्हाण व सुनिल दिघे सभेला उपस्थित होते. १९७५ च्या आणीबाणीमुळे दिघे दिवेकर गट नामशेष झाला व फक्त ढसाळ गट कार्यरत राहिला. या गटाचे पुर्वाध्यक्ष लतिफ खाटिक यांच्या जागी एल्. डी. भोसले यांची १ मार्च १९७७ ला नियुक्ती करण्यात आली. ढसाळ ढालेंच्या नेतेपदाच्या रस्सीखेचीला कंटाळून

अनिल कांबळे, पुणे शाखेचे संस्थापक यांनी चळवळीतून अंग काढून घेतले. पुण्या बरोबरच मुंबई व नाशिक येथे नामदेव ढसाळांचे कार्य होते. ढसाळ गटाने ऑगस्ट १९७७ पासून 'विद्रोह' चे प्रकाशन सुरु केले होते. संपादकपदी नामदेव ढसाळ व जयदेव गायकवाड हे होते. पुढील कार्यकारणी जाहीर केली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | : | लतिफ खाटिक |
| २) | उपाध्यक्ष | : | सुनिल दिघे |
| ३) | मुख्य सचिव | : | नामदेव ढसाळ |
| ४) | सह सचिव | : | अर्जुन डांगळे |
| ५) | खजिनदार | : | एस्. एम्. खडताळे |
| ६) | संघटक | : | प्रल्हाद चेंदवनकर |
| ७) | सदस्य | : | बाळ खैरमोडे |
| ८) | सदस्य | : | मल्लिका ढसाळ |
| ९) | सदस्य | : | हिरामन पगारे |
| १०) | सदस्य | : | सी. निकाळजे |
| ११) | सदस्य | : | पी. राठोड |

अहिल्याश्रम पुणे येथे श्री. एल. डी. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली त्यामध्ये कार्यक्रमापेक्षा संघटनाबांधणीवर यापुढे विशेष भर देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. यास गटाच्या महिला व युवा वर्गाकडून मोठा पाठिंबा देण्यात आला. दरम्यान काँग्रेसमध्येच फुट पडली. काँग्रेस (आय) व काँग्रेस (ओ) यापैकी ढसाळ गट यशवंतराव चव्हाण व बी. रड्डी यांच्या पाठीशी उभा राहिला. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत श्री. ढसाळ शिवसेनेकडे झुकले या निष्ठाबदलूपणामुळे सदस्यांचा विश्वास उडाला.

सप्टेंबर १९७८ मध्ये नेहरु मेमोरियल हॉल (पुणे) अध्यक्ष एल. डी. भोसले यांनी बैठक बोलावली आणि अन्याय निवारण व दलितोध्दारासाठी एकत्रित येण्याचे आवाहन केले.

कौन्सिल हॉल मध्ये १० सप्टेंबर १९७२ रोजी ३ दिवसांची पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली तेव्हा तेथे मोर्चारुपी धरणे आयोजित केले होते. त्यामागचा उद्देश असा होता की

यदुनाथ थत्ते यांच्या संपादकत्त्वाखालील 'साधना स्वातंत्र्यदिन' विशेषांकात काळा स्वातंत्र्यदिन या लेखात राष्ट्रीय झेंड्याची बदनामी करणारा राजा ढालेंनी जो लेख लिहीला होता त्या विरुद्धचा त्या दोघांवरील (ढाले व थत्ते) खटला मागे घेण्यात यावा.

१७ सप्टेंबर १९७२ रोजी पँथर्स, समाजवादी पक्ष व युवजन सभा यांनी संयुक्त मोर्चा काढला होता. त्यात त्यांची मागणी अशी होती की प्रथम दलितांवर जे वाढते अत्याचार होत आहेत, त्याची जबाबदारी नाकारणाऱ्या गृह आणि समाज कल्याण खात्याचे राज्यमंत्री दादासाहेब रुपवते यांनी राजीनामा द्यावा.

२४ सप्टेंबर १९७२ रोजी पँथर्स, समाजवादी पक्ष, युवक क्रांतीदल आणि रिपब्लिकन ऐक्य दल यांनी संयुक्तपणे मोर्चा काढला होता. त्यावेळचे संरक्षणमंत्री जगजीवनराव यांनी नव बौद्धांना ज्या खास सवलती देण्यात आल्या आहेत त्या मागे घेण्यात याव्यात याला पाठिंबा देणारे जे निवेदन सादर केले होते त्याच्या निषेधार्थ हा मोर्चा होता.

४ नोव्हेंबर १९७२ ला पुन्हा दलित पँथरने मोर्चा काढला. पोलिसांनी दलितांना दिलेल्या वाईट वर्तणुकीच्या निषेधार्थ व कलम १५३ ए च्या अंतर्गत अटक करण्यात आलेल्यांची सुटका.

१४ ऑगस्ट १९७३ रोजी जिल्हा कलेक्टर कचेरीवर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. दलितांवरील अत्याचार असेच चालू राहिले तर त्यांना वेगळे 'दलितस्थान' स्थापन करण्याची चळवळ नाईलाजाने उभी करावी लागेल असे नामदेव ढसाळांनी सांगितले होते.

हिंदूंचे जे ढोंगी नेते होते त्यांच्यावर पँथर्स जोरदार हल्ले करत. बुवा, साधू तसेव हरेकृष्ण चळवळीचे प्रसारक यांच्या विरुद्ध त्यांनी मोहिम उघडली. शंकराचार्य, आचार्य रजनीश, दत्ता बाळ यांनी चातुर्वण्यपद्धत चालू ठेवली म्हणून त्यांच्यावर खूप टीका केली.

१९७४ च्या मध्यावधी संसदीय निवडणुका आणि पुणे कॉर्पोरेशनच्या सप्टेंबर १९७४ मधील स्थानिक निवडणुका या सर्वांवर दलित पँथर्सनी बहिष्कार टाकला होता. स्वातंत्र्य मिळाल्यावर या निवडणुका योग्य लोकशाही वातावरणात घेतल्या जात नाहीत असा त्याचा आरोप होता.

फेब्रुवारी १९७५ मध्ये शांताराम दिवेकर यांच्या नेतृत्त्वाखाली महागाईच्या विरोधात, पंतप्रधान इंदिरा गांधीच्या पुणे येथील बेसुमार खर्चाच्या भेटीच्या विरोधात व सार्वजनिक विहिरी सर्वांसाठी खुल्या करण्यात याव्यात यासाठी मोठा मोर्चा काढला होता.

४ जानेवारी १९७६ पुण्याजवळील राजगुरुनगर येथे भूमिहीन मजूर व गरीब शेतकऱ्यांसाठी कार्यक्रम हाती घेण्यात आला.

१५ नोव्हेंबर १९७६ रोजी ढसाळ गटाची पुण्यात अहिल्याश्रमात परिषद भरली. झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न त्यावेळी केला. ही परिषद दलित लेखक आणि नामवंत डावे पुढारी बाबुराव बागुल यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सुशिलकुमार शिंदे हे त्यावेळचे समाज कल्याणमंत्री होते, गृहनिर्माण खात्याचे मंत्री प्रभाकर कुंटे आणि काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सावंत यांचीही भाषणे झाली. त्यांनी पँथर्सना झोपडपट्ट्यांच्या वसाहतीत साक्षरतेचा कार्यक्रम हाती घेण्यास सांगितले. या परिषदेने पुढील ठराव पास केले.

१) झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्थलांतर करताना प्रथम त्यांच्या करिता पर्यायी जागा देण्यात याव्यात तसेच स्थलांतर योग्य हंगामात करावे.

२) सरकारने दादागिरी करणारे जमीनदार, दारुभट्टी गाळणारे आणि सावकार यांच्यावर नियंत्रण ठेवावे.

३) झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी वाचनालय हॉल, ग्रंथालय, अभ्यासगृहे यांची तरतूद करण्यात यावी.

४) काळ्या पैशाचा वापर झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी करावा.

५) झोपडपट्टी मध्ये सांस्कृतिक केंद्रे सुरु करावीत.

अनुसूचीत जाती आणि जमातींना जे प्राधान्यांचे हक्क होते ते सर्व नवबौध्दांना मिळावेत यासाठी ढसाळ गटाने पुण्यात कार्यक्रम हाती घेतला. अनुसूचीत जातीचे बौद्ध धर्मात रुपांतर झाल्यावर सरकार त्यांना हक्क सवलती देण्याचे थांबवते या खास हक्कांची सरकारची मुदत १९८० मध्ये संपणार होती. ही समस्या सोडविण्यासाठी नव बौध्दांनी सरकारकडे तगादा लावला होता. या लढ्यास उग्र संघर्षाचे स्वरुप मिळत होते. दलित चळवळीच्या सर्व घटकांनी

या आंदोलनात भाग घेतला तथापि जनता पक्षाच्या राजवटीत त्यावर काही उपाय सापडला नाही. ढसाळ गटाने राजभवनावर धरणे धरले होते.

मराठवाडा विद्यापीठाच्या बाबतीत ढसाळ गटाने सुरुवातीस विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यात यावे या मागणीस पाठींबा दिला होता. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे नाव देण्यास विलंब करीत आहेत यावर प्रखर टीकाही ढसाळांनी केली होती.

१९७८ च्या जुलै महिन्यात कौन्सिल हॉलच्या पुढ्यात नामांतराच्या मागणीसाठी निदर्शने केली. ढसाळ आणि भोसले यांना अधिवेशन संपेपर्यंत गजाआड करण्यात आले.

२० जुलै १९७९ रोजी विद्यार्थी नागरी समितीने चळवळीची पुढील दिशा ठरविण्यासाठी एक बैठक बोलावली होती. ६ डिसेंबर १९७९ रोजी नामांतराच्या चळवळीस पाठींबा व्यक्त करणाऱ्या संघटनांचा लॉंग मार्च व सत्याग्रहाचा कार्यक्रम आखला गेला. या लॉंगमार्चसाठी युक्रांद, भीमसेना, दलित पॅंथरचे काही गट, सीपीएम, लाल निशान, छात्र युवा संघर्ष वाहिनी, फॉरवर्ड ब्लॉक, जनता पक्षाची युवक आघाडी, भारिप गवई गट या सारख्या निरनिराळ्या संघटनांच्या अनेक नेत्यांनी आणि राजकीय पक्षंनी या कार्यक्रमास मोठ्या उत्साहाने पाठिंबा दिला. बाबा आढाव यांनी लॉंग मार्चचे समता दिंडी असे वर्णन केले. त्यांनी लोकांना या दिंडीत सामील होण्यासाठी तळमळीचे आवाहन केले. म. फुलेंच्या पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे २८ नोव्हेंबर १९७९ रोजी बाबा आढाव यांच्या नेतृत्त्वाखाली लॉंग मार्च पूर्ण झाला.

### ५.१९ समारोप

डॉ. बाबा आढावांच्या समकालीन सामाजिक चळवळींमध्ये समाजवादी चळवळ, समाजवादी महिला सभा, राष्ट्रसेवादल, छात्रभारती, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्ष, एस्. एम्. जोशी सोशालिस्ट पार्टी, नानासाहेब गोरे अकादमी, कम्युनिस्ट पक्ष, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, दलित स्वयंसेवक संघ, आंबेडकरी चळवळ, दलित पॅंथर–यासारख्या पुरोगामी विचारांच्या चळवळींचे कार्य मानव मुक्तीच्या लढ्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून चालू आहे.

डॉ. आढाव यांनी समकालीन सामाजिक चळवळीद्वारा चालविलेल्या विविध उपक्रमात सहभाग घेतला, बंद, उपोषणे, मोर्चा, सत्याग्रह, जेल भरो आंदोलने यांसारख्या जनआंदोलनाला सक्रीय पाठींबा दिला.

एस्. एम्. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, नानासाहेब गोरे अकादमी, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, दलित स्वयंसेवक संघ, दलित पँथरसारख्या संघटनांच्या निर्मितीमध्ये आढावांचा सक्रीय सहभाग होता.

## ५.२० संदर्भ सूची


१) जोशी अेस्. अेम्. मी– अेस्. अेम्. तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०, २००३ पृष्ठ क्र. २०९.

२) प्रधान ग. प्र. महाराष्ट्राचे शिल्पकार, अेस्. अेम्. जोशी, पुनर्मुद्रण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २५, २००४. पृ. क्र. ५८.

३) पळशीकर सुहास, सत्याग्रही समाजवाद, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सप्टेंबर १९९४, पृष्ठ क्र. ९८.

४) जोशी अेस्. अेम्. , मी अेस्. अेम्., तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०, २००३, पृ. क्र. १६४.

५) तुपे रामभाऊ, राहिले ते आपुले आत्मकथा, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०, २००५, पृ. क्र. १३६.

६) प्रधान ग. प्र. महाराष्ट्राचे शिल्पकार, अेस. अेम. जोशी, पुनमुर्द्रण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २१, २००४, पृ. क्र. ८८.

७) कित्ता, पृ. क्र. ८८.

८) सुराणा पन्नालाल, बुलंद आवाज बाईचा, प्रथम आवृत्ती, साधना प्रकाशन पुणे ३०, २०१०, पृष्ठ क्र. ३४.

९) जोशी अेस्. अेम्., मी अेस्. अेम्., तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०, २००३, पृ. क्र. १९२.

१०) डॉ. शहा मु. ब. राष्ट्र सेवा दल : इतिहास और कार्य, प्रथम आवृत्ती, राष्ट्र सेवा दल वाङ्‌मय विभाग, पुणे ३०, २००२, पृ. क्र. १४८.

११) प्रा. राऊत गणेश. महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स. १८१८ ते १९६०, तृतीय आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००७.

१२) जोशी अेस्. अेम्., मी अेस्. अेम्., तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०, २००३, पृ. क्र. १७३.

१३) डांगळे अर्जुन, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, दुसरी आवृत्ती, लोकवाङ्‌मय प्रकाशन, मुंबई २५, २००७, पृ. क्र. ७६.

१४) आंबेडकर प्रकाश, समकालीन राजकारण आणि बहुजन चळवळ, प्रथमावृत्ती, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृ. क्र. २३.

१५) खरात शंकरराव, तराळ–अंतराळ, पुनर्मुद्रण कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, २००४, पृ. क्र. ४२४.

१६) कित्ता, पृ. क्र. ४७३.

१७) माहिती पत्रक, एस्. एम्. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, पुणे ३०.

१८) भागवत कमल, न संपणारी वाट, पहिली आवृत्ती, वरद प्रकाशन, पुणे १६. १९९६, पृ. क्र. ७०.

१९) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे ३०, २०१४, पृ. क्र. १९१.

२०) तांबोळी शमसुद्दिन, हमीद दलवाई, क्रांतिकारी विचारवंत, द्वितीय आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २०१४, पृ. क्र. १४

२१) स्मरणिका, आण्णा भाऊ साठे स्मारक संस्था, रौप्य महोत्सवी वर्षाची यशस्वी वाटचाल, पुणे ३०, २०११, पृ. क्र. ५.

२२) कित्ता, पृ. क्र. ९.

२३) दै. सकाळ – दिनांक १५ डिसेंबर १९९१, पृ. क्र.४

२४) मुलाखत – दादासाहेब सोनवणे, दि. १ सप्टेंबर २०१३.

२५) डॉ. दाभोळकर नरेंद्र, श्रद्धा–अंधश्रध्दा, आवृत्ती चौथी, राजहंस प्रकाशन, पुणे ३०, २००१, पृ. क्र. ९७.

प्रकरण सहावे

# वैचारिक अभ्यास

| | |
|---|---|
| ६.१ | प्रस्तावना |
| ६.२ | पुरोगामी सत्यशोधक |
| ६.२.१ | डॉ. बाबा आढाव यांचे चळवळीबद्दलचे लेखन |
| ६.२.२ | देवदासी चळवळ |
| ६.२.३ | धर्मांतराचा प्रश्न |
| ६.२.४ | स्त्री मुक्ती चळवळ १९७५–१९८५ |
| ६.२.५ | अपंग कल्याण |
| ६.२.६ | मोलकरीण चळवळ |
| ६.२.७ | वेश्या वस्तीमधील मुलांचे शिक्षण |
| ६.२.८ | साखरशाळा |
| ६.२.९ | परित्यक्ता |
| ६.२.१० | बालमजूर |
| ६.२.११ | रोजगार हमी |
| ६.२.१२ | पथारी चळवळ |
| ६.२.१३ | सामुदायिक लग्ने |
| ६.२.१४ | दारूबंदी |
| ६.२.१५ | रोजगाराचा हक्क |
| ६.२.१६ | समानतेचे सूत्र |
| ६.२.१७ | कष्टकऱ्यांचा जाहीरनामा |
| ६.२.१८ | महागाईचा प्रश्न सुटणार कधी |
| ६.२.१९ | सामाजिक सुरक्षा कायदा दिन |
| ६.२.२० | चळवळीसाठी आयुष्य वेचणाऱ्यांसाठी दोन शब्द |

| | |
|---|---|
| ६.२.२.१ | क्रांती विरांगना इंदूताई पाटणकर |
| ६.२.२.२ | बाबू गेनूंना आठवताना |
| ६.२.२.३ | एक बहुजन नेतृत्व – यशवंतराव |
| ६.२.२.४ | एक तेजोरेखा लुप्त झाली |
| ६.२.२.५ | भाई वैद्य यांच्या पंच्याहत्तरी निमित्त |
| ६.२.२.६ | डॉ. सुराणा नाबाद ७१ वर्षे |
| ६.२.२.७ | सदाबहार नानासाहेब |
| ६.२.२.८ | बाबुमियाँ बँडवाले |
| ६.२.३ | जाती अंताच्या लढाईसाठी लेखन |
| ६.२.४ | पुरोगामी सत्यशोधक मधील डॉ. बाबा आढावांचे इतर लेखन |
| ६.२.४.१ | पेन्शन मागणी परिषद |
| ६.२.४.२ | दारिद्र्याचे आकलन की आकलनाचे दारिद्र्य? |
| ६.२.४.३ | स्त्री – शुद्रातिशुद्राच्या आघाडीवर |
| ६.३ | हमाल मापाडी वार्ता |
| ६.३.१ | महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या अधिवेशनाच्या निमित्ताने |
| ६.३.२ | हमाल मापाडीचे पुणे अधिवेशन |
| ६.३.३ | माथाडी कायद्याची वाटचाल |
| ६.३.४ | कंत्राटी पद्धत – कायदेशीर वेठबिगारी |
| ६.४ | ध्येयवादाची आश्वासक वाटचाल |
| ६.५ | 'हमीद दलवाई एक क्रांतिकारक' या पुस्तकामधील मधील डॉ. बाबा आढाव यांची प्रस्तावना |
| ६.६ | एक गाव एक पाणवठा |
| ६.७ | सत्यशोधनाची वाटचाल |
| ६.८ | 'साधना' मधील डॉ. बाबा आढावांचे लेखन |

| | |
|---|---|
| ६.९ | अमेरिकेतील सामाजिक सुरक्षा कायदा |
| ६.१० | हे तर शेटची–भटजींचे आधुनिक दासच! |
| ६.१०.१ | मराठा जातीची लोकसंख्या किती? |
| ६.१०.२ | नेतृत्व श्रीमंत मराठ्यांचेच |
| ६.१०.३ | मराठा स्त्री : चूल आणि मूल |
| ६.१०.४ | ही विसंगती का खटकू नये? |
| ६.१०.५ | सांस्कृतिक क्रांतीची भाषा बोलणे सोपे... |
| ६.१०.६ | फुले – शाहू : विचार मांडणीत मूलभूत फरक |
| ६.१०.७ | 'त्यांनी ब्राह्मण्याचा धिक्कार केलाच नाही...' |
| ६.१०.८ | मराठा जातीतील श्रीमंतांची मिरासदारी |
| ६.१०.९ | सत्तेबरोबरच संपत्तिसंचय |
| ६.१०.१० | महाराष्ट्राच्या राजकारणातील मराठा जातीचे वाढते प्राबल्य! |
| ६.११ | देशमुख मराठा स्त्रियांचे दास्य |
| ६.११.१ | शहाण्णव कुळीतील स्त्रियांची स्थिती |
| ६.११.२ | गांधर्व विवाह : दोन अनुभव |
| ६.११.३ | बुरसटलेली मनोवृत्ती |
| ६.११.४ | तिचे जीवन बहरासाठी नसतेच! |
| ६.११.५ | शील गेले, तरी कूळ राहिले |
| ६.१२ | समारोप |
| ६.१३ | संदर्भसूची |

## प्रकरण सहावे

# डॉ. बाबा आढाव यांचा वैचारिक अभ्यास

### ६.१ प्रस्तावना

डॉ. बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळीमध्ये कार्यरत असताना व अनेक लोकांचे प्रश्न सोडवताना केलेले वैचारिक प्रबोधन एक महत्त्वाचा घटक ठरलेला आहे. त्यांची जडण घडण समाजवादी विचारांमध्ये झाल्यामुळे समाजवादी विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या विचारावर उमटलेले दिसते.

डॉ. बाबा आढाव यांचा वैचारिक अभ्यास करत असताना त्यांनी केलेले लेखन, भाषणे, चिंतन या सर्वांचा अभ्यास केल्यावरच त्यांची विचारधारा आपल्या लक्षात येईल. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांडे, बुवाबाजी, धर्मचिकित्सा, धर्मग्रंथ, तत्वज्ञान, सामाजिक प्रश्न यासारख्या अनेक घटकांवर आपले विचार मांडलेले आहेत या सर्वांमधून त्यांची विचारधारा आपल्या लक्षात येते.

डॉ. बाबा आढाव यांनी पुरोगामी सत्यशोधक या त्रैमासिकामधून केलेले लेखन, साप्ताहिक साधनामधून केलेले लेखन, एक गाव एक पाणवठा यामधून व्यक्त झालेले अनुभव तसेच सत्यशोधनाची वाटचाल हा प्रकाशित झालेला लेखसंग्रह या सर्वांमधून त्यांची नेमकेपणाने विचारधारा काय होती हे समजण्यास मदत होते. त्यामुळे वरील प्रकाशित साहित्याच्या आधारे प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबा आढावांची विचारधारा समजून घेऊन त्याचा अभ्यास करण्याचे योजिले आहे.

### ६.२ पुरोगामी सत्यशोधक

डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या परिवर्तनवादी चळवळीला गतीमानता येण्यासाठी अविनाश डोळस, अनिल अवचट, नागेश चौधरी या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पुरोगामी सत्यशोधक हे त्रैमासिक सुरू केले. १९७४ साली पुरोगामी सत्यशोधकचा पहिला अंक निघाला. १९७८ च्या पुरोगामी सत्यशोधकामध्ये या अंकाची किंमत २ रूपये, वार्षिक वर्गणी संस्थासाठी १२ रूपये, व्यक्तींसाठी ८ रूपये, आजीव सभासदासाठी १००० रूपये वर्गणी असल्याचे नोंदविले आहे. तर एप्रिल १९७८ चा पुरोगामी सत्यशोधक हा अंक दुसरा व वर्ष

चौथे असल्याचे नोंदवले आहे. व्यवस्थापक म्हणून दत्ता काळेबेरे व बापू विरूळे हे काम पाहत होते, कार्यालयाचा पत्ता ७३, नाना पेठ, पुणे ४११ ००२ हा होता. या अंकाला महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले होते.

पुढील काळात पुरोगामी सत्यशोधकाच्या संपादक मंडळाची जबाबदारी डॉ. य. दि. फडके, प्रकाश पवार, शरद जावडेकर, रमेश चव्हाण, जनार्दन वाघमारे, लक्ष्मण माने, किशोर बेडकीहाळ, गजानन खातू यासारख्या विचारवंतानी स्विकारलेली होती. 'पुरोगामी सत्यशोधक' मध्ये विविध विषयांवरील वैचारिक साहित्य विपुल प्रमाणात प्रसिद्ध झाले आहे. सामाजिक रूढी परंपरा, श्रद्धा–अंधश्रद्धा, कर्मकांडे, बुवाबाजी, धर्मचिकित्सा, ईश्वर, धर्मग्रंथ, तत्त्वज्ञान, वर्णजातिव्यवस्था, ग्रामीण भागातील वास्तव, विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था, विधवाविवाह हुंडाबंदी, स्त्रीदास्य, पुरूषप्रधान व्यवस्था, शेतकरी–शेतमजूर, कामगार, वेठबिगारी, अस्पृशता, निर्मूलन, दलितमुक्ती, देवदासी, हमाल, सफाई कामगार व असंघटित क्षेत्रातील कामगार, मुस्लिम समाजातील तलाकपिडीत स्त्रिया, परित्यक्ता स्त्रिया, आदिवासींचे प्रश्न, बेकारी, आरक्षण, लोकविज्ञान, राजकारण, बालकामगाार, सहकार, पर्यावरण, विषमतानिर्मूलन, भटक्या विमुक्तांचे प्रश्न, धरणग्रस्तांचे प्रश्न, जागतिकीकरण, शिक्षण अशा अनेक विषयांवर चिकित्सक, अभ्यासपूर्ण वैचारिक साहित्य प्रकाशित झाले आहे.

भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाचा नवा अन्वयार्थ फुले–शाहू–आंबेडकरांची विचारधारा, सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ, दलित चळवळ आणि त्यांचे साहित्य, ग्रामीण साहित्य, दुर्मिळ कागदपत्रे, उपेक्षित सत्यशोधकांचे चरित्र अशा विषयावर साहित्य प्रसिद्ध झाले आहे.

साहित्याबरोबर सामाजिक चळवळी, आंदोलने, समकालीन सामाजिक वास्तव, लोकमानस, कार्यकर्त्यांचे अनुभव, आठवणी, प्रश्न, समस्या यांना 'पुरोगामी सत्यशोधक' ने सातत्याने व्यापक प्रसिद्धी दिली. तसेच निर्भिडपणे पाठराखणही केली. डॉ. बाबा आढावांची 'एक गाव एक पाणवठा' चळवळ, देवदासी निर्मूलन चळवळ, नामांतराचा लढा, धरणग्रस्तांचे पुनर्वसन, भटके विमुक्तांची आंदोलने, असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, अशी अनेक आंदोलने, शेकडो कार्यकर्ते व त्यांचे अस्वस्थ करणारे अनुभव यांचा अविष्कार 'पुरोगामी

सत्यशोधक' मधून झाला आहे. गेल्या चाळीस वर्षातील महाराष्ट्राचा सामाजिक–सांस्कृतिक इतिहास व त्याचे संदर्भ 'पुरोगामी सत्यशोधक'मध्ये आले आहेत.

'पुरोगामी सत्यशोधक'चे संपादक डॉ. बाबा आढाव हे कृतिशील सामाजिक कार्यकर्ते असल्याने त्यांनी परिवर्तनवादी सामाजिक चळवळी व सामाजिक प्रश्न यांना आपल्या नियतकालिकातून अग्रस्थान दिले. सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास उजेडात आणण्याचे मोठे कार्य 'पुरोगामी सत्यशोधक'ने केले आहे. १९६० नंतरचा महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास अभ्यासण्यासाठी 'पुरोगामी सत्यशोधक' मधील लेखन अस्सल विश्वसनीय साधन ठरते. सामाजिक चळवळींचा ४० वर्षांचा इतिहास 'पुरोगामी सत्यशोधक' मध्ये घेण्यात आला आहे. पुरोगामी सत्यशोधक या त्रैमासिकामध्ये डॉ. बाबा आढाव यांनी केलेल्या लेखनाचा आढावा पुढीलप्रमाणे.

### ६.२.१ डॉ. आढावांचे चळवळीबद्दलचे लेखन

डॉ. बाबा आढाव यांच्यावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. हे आपण आधी अभ्यासलेच आहे. त्यांची विचारधारा पुरोगामी असल्यामुळे पुरोगामी चळवळींबद्दल त्यांना विशेष आस्था होती. चळवळींच्या माध्यमातून समाजाचे हीत साधले जावे यासाठी त्यांनी चळवळीमधून उपस्थित झालेल्या कोणत्या प्रश्नावर लेखन केले याचा तपशील खालीलप्रमाणे देता येईल.

### ६.२.२ देवदासी चळवळ

डॉ. बाबा आढाव यांनी देवदासींबद्दल 'पुरोगामी सत्यशोधक' व वर्तमानपत्रे यामधून सातत्याने लेखन केलेले आहे. त्यांनी देवदासींबद्दल जे लेखन केले आहे त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी देवदासींना माणूस म्हणून सन्मान मिळावा व त्यांना जगण्याचे अधिकार मिळावेत अशा मागणीयुक्त पद्धतीने लेखन केलेले आहे. महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने देवदासींचे पुर्नवसन करण्याचा प्रयत्न डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली हाताळल्या गेल्यामुळे त्यांनी देवदासींबद्दल केलेल्या लिखाणाला संघर्षाची धार चढलेली दिसते. त्यांनी देवदासींच्या प्रश्नावर केलेल्या लिखाणामधून खालील मागण्या केलेल्या दिसतात.

१) देवदासींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे.

२) कंपोझिंग, विणकाम, टायपिंग, भरतकाम या प्रकारचे शिक्षण देवदासींना देणे.

३) महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांचे मिळून देवदासी बोर्ड स्थापन करणे.

४) देवदासींमधील अंधश्रद्धा कमी होण्यासाठी शासकीय स्तरावर प्रबोधन कार्यक्रम हाती घेणे.

५) वयोवृद्ध देवदासींना शासकीय पेन्शन सुरू करणे.

६) भविष्यात देवदासी निर्माण होवू नयेत यासाठी कठोर कायदा करण्यात यावा.

याबाबत डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या चळवळीची दिशा ठरवताना लिहिलेले वाक्य महत्त्वाचे आहे, ते लिहितात, 'देशातील समतेच्या चळवळीशी नाते ठेवूनच हे काम करावे लागणार आहे.'[१]

### ६.२.३ धर्मांतराचा प्रश्न

धर्मांतर हा तसा समाजातील संवेदनशील विषय आहे. भारतामध्ये धर्मांतरानंतर अनेक प्रश्न उपस्थित होतात. धर्मांतरासाठी पैसा, प्रलोभने इत्यादी विषय प्रकर्षाने समोर येतात. त्याचबरोबर धर्माचा संबंध राजकारणाशी जोडला जातो व त्यामधून जातीय दंगली होतात आणि या जातीय दंगलीमुळे माणसाच्या जगण्याचे प्रश्न बाजूला राहतात. माणसांच्या जगण्याच्या प्रश्नांवर खऱ्या अर्थाने विचार होणे गरजेचे आहे.

धर्म ही माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाची बाबा आहे परंतू त्यामधील जहालवाद माणसाला विनाशाकडे घेवून जाणारा असतो. या संदर्भात डॉ. बाबा आढाव पुरोगामी सत्यशोधकमध्ये लिहिलेले लिखाण महत्त्वाचे आहे ते लिहितात.

'धर्मांतराच्या प्रश्नावर भारतातील वृत्तपत्रांतून वाटेल तेवढ्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. धर्मांतर करणे योग्य आहे का? त्याला वाव देणे कितपत योग्य आहे? धर्मांतराला कायद्याने बंदी का घालू नये? धर्मांतराच्या मागे अरबी पैसा आहे का? मुस्लीम सनातनवाद्यांचा आंतरराष्ट्रीय कट तर नाही ना? धर्मांतराला राष्ट्रदोहाचा गुन्हा का मानू नये? इत्यादी प्रश्नावर उलटसुलट मार्गदर्शन होत असते. तामीळनाडू राज्यातील मीनाक्षी पुरमच्या दलितांनी इस्लाम धर्माचा स्विकार केला आहे. लोकसभेत व विधानसभेत दिलेल्या

माहितीनुसार दोन हजारांवर दलितांनी धर्मांतर केलेले आहे. एक बाब स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे हिंदू दलित धर्मांतराला प्रवृत्त होत आहे. या देशात हिंदू–मुस्लिम प्रश्न तात्काळ भडका घेतो त्याला राजकीय रंग तात्काळ चढतो. भारताच्या फाळणीमुळे येथील हिंदुमन विलक्षण संवेदनाक्षम बनलेले आहे. परंतु हे संवदेनाक्षम मन दलितांच्या वेदना समजून घेण्यास तयार नाही. धर्मांतरामुळे मुस्लिमांची संख्या वाढून या देशाची परत फाळणी होईल या भीतीने ग्रासलेले मन गावोगावचा 'महारवाडा, मांगवाडा, चांभारवाडा, भंगीहटी' च्या वेगळ्या जगाला समावून घ्यायला तयार नाही.'[२]

'धर्मांतर' ही तशी नवी बाब नाही. धर्मांतराला शेकडो वर्षांचा इतिहास आहे येथील दलितांनी इस्लाम, ख्रिश्चन, बुद्ध इ. धर्मांचा स्वीकार केला. जुलूम, लाचलुचपत, फसवणूक यामार्गांनी धर्मांतर घडवून आणण्यास भारतीय संविधानाने मज्जाव केलेला आहे.

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास गेली अनेक वर्षे या कोंडीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न काही पुरोगामी संघटना व संस्था एकाकीपणे करीत आहेत १९७० साली मुस्लीम सत्यशोधक मंडळाची पुण्यात स्थापना झाली. १९७२ साली म. फुले समता प्रतिष्ठानाच्या वतीने 'एक गाव एक पाणवठा' चळवळ सुरू झाली. १९७५ साली देवदासी प्रश्नाला वाचा फुटली. शीख समाजातील मानकुँवर सहगल या डॉक्टर तरूणीच्या आत्महत्येमुळे धर्मगुरूंची सक्ती उजेडात आली. पुष्पा लुंकड या जैन तरूणीच्या दीक्षाविधीमुळे जैन समाजातील हुंडा प्रथेचा प्रश्न पुढे आला. अशी कितीतरी प्रकरणे आहेत.

धर्मनिरपेक्ष नीतिवादासाठी भारतात यापूर्वीही प्रयत्न झालेले आहेत. त्यांची दखल घेऊन तो प्रवाह बळकट केला पाहिजे. आजच्या काळाची ती गरज आहे. भारतीय संविधानाने आधुनिक मूल्यांना मान्यता दिली ती केवळ कायद्याची चौकट म्हणून नव्हे, नव्या चौकटीचा आराखडा घटनेला अभिप्रेत आहे. एकूणच डॉ. बाबा आढाव यांना धर्म या संकल्पनेकडे व्यवहार्य दृष्टीकोनातून पाहून तेवढेचे महत्त्व धर्माला द्यावे असे वाटते व त्यापेक्षा अधिक माणसाच्या जगण्याचे प्रश्न आहेत यावर लक्ष वेधताना त्यांनी शब्दाचे आसूड ओढले इतके व्यापक ऐतिहासिक महत्त्व या लिखाणामध्ये आहे.

### ६.२.४ स्त्री मुक्ती चळवळ १९७५–८५

१९७५ साली मेक्सिकोला भरलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे साल आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले व १९७५ ते १९८५ या दशकात स्त्रियांच्या समानतेला व विकासाला चालना मिळेल असे कार्यक्रम व कायदे प्रत्येक घटक देशाने करावे असेही सुचविले. सर्व जगात स्त्री–पुरूष समानता यावी व प्रत्येक देशाच्या विकासाला योग्य ते स्थान व हिस्सा मिळावा हा या परिषदेचा हेतू होता.

डॉ. बाबा आढाव यांनी उच्चवर्णीय स्त्रियांच्या राजकीय चळवळीतील प्रवेशाबाबत व्यक्त केलेल्या मताचा सारांश खालीलप्रमाणे आहे. '१९७५–१९८५ या काळात भारतातील स्त्री–मुक्ती चळवळ वाढली. १९७५ साल आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले असले तरी भारतात स्त्रियांना दुय्यम स्थानाचा विचार व त्याबाबत कृती १९ व्या शतकाच्या अखेरीपासूनच सुरू झालेली आहे. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या सुधारकांची एक पिढीच भारतात निर्माण झाली. बालविवाह, विधवांचा प्रश्न सारख्या ज्वलंत प्रश्नावर त्यांनी भूमिका घेतल्या व जमेल तशी कृती केली. हे सर्व सुधारक पुरूष होते. गांधीजींच्या स्त्रिविषयक विचारांमध्ये काही विसंगती होत्या. गांधीजींना स्त्री–पुरूषांमधली श्रमविभागणी मान्य होती. पुरूषाने अर्थार्जन करावे तर स्त्रीने गृहकाम, बालसंगोपन करावे हे त्यांना मान्य होते. महात्मा गांधीमुळे राजकीय चळवळीत भाग घेतलेल्या उच्चवर्णीय स्त्रियांना सुरक्षिततेचे वाटले. भारतात प्रथमच मोठ्या संख्येने स्त्रिया स्वातंत्र्याच्या कार्यक्रमात उतरल्या. यातूनच 'अखिल भारतीय महिला परिषद' स्त्री संघटनेचा जन्म १९२७ साली झाला. अनेक स्त्रियांनी स्त्रियांसाठी विधायक कार्याला वाहून घेतले.'

'स्वातंत्र्यपूर्व काळात 'स्वातंत्र्य' हे मूल्य घेऊन स्त्रियांना सामाजिक, राजकीय चळवळीत आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. महाडच्या सत्याग्रहापासून डॉ. आंबेडकरांच्या प्रत्येक कार्यक्रमात मोठ्या संख्येने दलित स्त्रिया भाग घेत होत्या. १९२७ नंतरच्या काळात बाबासाहेबांनी अनेक स्त्री परिषदा घेतल्या व स्त्रियांना चळवळीत सक्रीय करण्याचे प्रयत्न केलेले आहेत.'[३]

१९३० साली नागपूर येथे भरलेल्या स्त्री–परिषदेने केलेल्या मागण्या पाहिल्यावर त्यांच्या व्यापक दृष्टीकोनाची कल्पना येते. सार्वत्रिक स्त्री–शिक्षण, शारदा बिलाची

अंमलबजावणी, अस्पृश्य मुलींसाठी वसतिगृहे, बहु–पत्निकत्वाला कायद्याने बंदी, या प्रमुख मागण्या होत्या. डॉ. आंबेडकरांनी दलित स्त्रियांना अस्मिता दिली. यातूनच १९४२ साली 'अ. भा. दलित महिला फेडरेशन'ची स्थापना झाली. हिंदू कोड बील ही डॉ. आंबेडकरांनी समस्त भारतीय स्त्रियांना दिलेली अनमोल देणगी आहे.

स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीच्या विचारांचा धागा घेऊन पण त्यातच भर घालून स्त्री स्वातंत्र्याचा जास्त तळमळीने विचार केला तो डॉ. राम मनोहर लोहियांनी. स्त्रिचा माणूस म्हणून त्यांनी प्रथम विचार केला. स्त्री–पुरूषांना एकच नीतीमूल्ये लावली पाहिजेत हा त्यांचा आग्रह होता यातूनच 'समाजवादी महिला सभा' कार्यान्वित झाली. कम्युनिस्ट चळवळीतून अनेक स्त्री कार्यकर्त्या पुढे आल्या. त्यांनी १९५४ साली 'भारतीय महिला फेडरेशनची' स्थापना केली. १९५५ सालचे हिंदू कोड बील, १९६२ सालचा हुंडाविरोधी कायदा पास करून घेण्यासाठी प्रयत्न केले गेले.

'महागाई प्रतिकार संयुक्त महिला समितीने' १९७२–७४ या काळात 'लाटणे मोर्चा' काढला. १९७५ साली पुण्यात ऑक्टोबर महिन्यात स्त्रियांच्या प्रश्नावर व्यापक पातळीवर एक परिषद भरविण्यात आली. महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणांहून ८००–९०० च्या संख्येने महिला – सहभागी होत्या. 'आणीबाणी' जाहीर झाली, असतानाही या परिषदेला मिळालेला प्रतिसाद खूपच चांगला होता. १९७७ साली पुरोगामी स्त्री संघटनेतील कार्यकर्त्यांनी 'बायजा' हे द्वैमासिक सुरू झाले. १० आणि ११ फेब्रुवारी १९७९ या दोन दिवशी पुण्यात महाराष्ट्र पातळीवर एक शिबीर आयोजित केले होते. प्राध्यापिका, शिक्षिका, ग्रामसेविका, लेखिका, पत्रकार, डॉक्टर, पारिचारिका, विद्यार्थिनी अशा विविध व्यवसायातील स्त्रिया त्यात सहभागी होत्या. या शिबीरातच 'स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती' स्थापन झाली.

मथुरा प्रकरणामुळे ठिकठिकाणी 'बलात्कार विरोधी मंच' स्थापन झाले. जाहीर सभा झाल्या. मथुरेला न्याय मिळावा म्हणून देशभर स्वाक्षरी मोहीम सुरू झाली. या काळात अनेक स्त्री संघटना स्थापन झाल्या. प्रामुख्याने 'नारी अत्याचार विरोधी मंच', 'महिला संघर्ष समिती', गुजरातमध्ये 'स्त्री जागृती सभा', बंगलोरमध्ये 'विमोचना', हैद्राबाद येथे 'स्त्री–

मुक्ती संघटना', पुणे येथे 'नारी समता मंच', दिल्लीत 'मानुषी ग्रुप', 'सहेली'. कलकत्यात 'प्रगतीशील महिला संघ' अशा अनेक स्त्री संघटना निघू लागल्या.[३] डॉ. बाबा आढाव यांना स्त्री पुरूषांमधील समानता मान्य आहे. नव्हे तर स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे हक्क मिळाले पाहिजेत हेच मत त्यांनी मांडलेले दिसते.

### ६.२.५ अपंग कल्याण

अपंगांसाठी कल्याणकारी योजना व अपंगास समानता मिळालीच पाहिजे. अपंग म्हणजे समाजाचा भार नसून तो समाजाचा उपयुक्त घटक आहे. या जाणीवेने त्यांच्याकडे समाजाने पाहिले पाहिजे. उत्क्रांतीच्या सुरूवातीच्या काळात अपंग मुले समाजाला निरूपयोगी आहेत. तो समाजावर एक प्रकारचा भार आहे, या समजुतीमुळे लहान अपंग मुलांना ठार मारीत असत. शतकानुशतके ख्रिस्तपूर्व काळापर्यंत ही क्रिया चालू होती. अपंगांना नदीत फेकून देत किंवा त्या त्या रितीरिवाजाप्रमाणे ठार मारीत. निरनिराळे धर्म जसजसे उदयास येऊ लागले. तसतशी अपंगाबद्दल दयाबुद्धी वाढत जाऊ लागली. 'जागतिक मानवी हक्काचा जाहीरनामा' सर्व राष्ट्रांनी मान्य केला तेंव्हापासून अपंगांना नागरी हक्क मिळू लागले.

अपंगाविषयी डॉ. बाबा आढाव यांनी पुरोगामी सत्यशोधकमध्ये याप्रकारे लिहिले आहे, 'अपंगामध्ये सामाजिक बदल कसा करता येईल हा प्रश्न वेगळ्या दृष्टीकोनातून सोडवला पाहिजे. सामाजिक कायदे अपंगांचे हक्क व कर्तव्य यासाठी सामाजिक कायद्याची जरूरी आहे. अपंगांना शिक्षणाच्या सुविधा निर्माण करू द्याव्यात. अपंगांसाठी स्वतंत्र शाळा, खास प्रशिक्षित शिक्षक, खास शैक्षणिक सवलती, निरनिराळी शैक्षणिक साधने निर्माण करून द्यावीत. अपंगासाठी मदत केंद्र असावीत.'[४] या विवेचनावरून बाबा आढाव यांची अंपगांकडे पहाण्याची दृष्टी आपल्या निदर्शनास येते.

अपंगासाठी फायदेशीर नोकऱ्या, लग्न व कुटुंब व्यवस्था निर्माण करून देण्यासाठी शासकीय व खाजगी क्षेत्रातही अपंगाचा विचार करावा. ''समाज आपल्या मागे आहे व आपण समाजाचे एक घटक आहोत'' ही भावना वाढीस लागेल या दृष्टीने अपंगासाठी कल्याणकारी योजना, कार्यक्रम राबविले पाहिजेत. १९८१ साल जगभर अपंग वर्ष म्हणून साजरे झाले. या वर्षात अपंगत्व, यांच्यात असलेली जिद्द, त्यांचे समानतेसाठी प्रयत्न इत्यादीला भरपूर प्रसिद्धी

मिळाली. त्यामुळे अपंगाकडे पाहण्याची जी दुर्लक्षित भावना होती ती कमी झाली, समाजाच्या अस्तित्वातील तो एक घटक आहे, ही जाणीव समाजात निर्माण झाली. १९८३ ते १९९२ हे 'अपंग दशक' म्हणून यूनोने जाहीर केले. त्यामुळे अपंगाच्या आशा–आकांक्षा वाढीस लागतील. अपंगाच्या आशा–आकांक्षा, समानता, संरक्षण यासाठी समाजाने खूप काम करणे महत्त्वाचे आहे.

**६.२.६ मोलकरीण चळवळ**

सन १९८० मध्ये पुण्यामध्ये मोलकरणींचा संप झाला. संपानंतर मोलकरणीच्या अनेक प्रश्नांवर बाबा आढाव यांनी स्पष्ट भूमिका घेतली. मोलकरणी या समाजातील असंघटित घटकांवर त्यांचे प्रश्न समजावून घेवून ते सोडवण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी पुरोगामी सत्यशोधकमध्ये असंघटित मोलकरणीच्या प्रश्नांना वाट मुक्त करून दिली या मागण्या पुढीलप्रमाणे : पगारवाढ, दिवाळीचा बोनस, महिन्यातून पगारी सुट्ट्या अशा प्रकारच्या या मागण्या होत्या. डॉ. बाबा आढाव यांच्याच शब्दात या मागण्या व एकूणच संपाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. थोडी पगारवाढ, दिवाळीला बोनस, महिन्यातून एक दोन सुट्या या संपाने मोलकरणींमधला आत्मविश्वास निर्माण झाला.

कष्टकरी, असंघटित वर्गांचे शोषण पिढ्यान पिढ्या तसंच चालू आहे. रोज आठ–दहा तास काम करणाऱ्या मोलकरणींना कितीतरी शारीरिक कष्ट उपसावे लागतात. त्यांच्या आयुष्यातले दुःख कमी होत नाहीत. मोलकरणींमध्ये विधवा, परित्यक्ता व निराधार स्त्रियांचे प्रमाण यात अधिक आहे. व्यसनी नवरे, धरणग्रस्त, विस्थापित, शेतमजूर, गिरण्या, कारखाने बंद पडल्यात म्हणून देशोधडीला लागलेली कुटुंबे या सर्वांमुळेच मोलकरणींची संख्या वाढत आहे. त्या घरच्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलत असतात.

'मोलकरीण पंचायतने व पुणे शहर मोलकरीण संघटनेने मोलकरणींसाठी मोर्चे काढले, संप केले, आंदोलने केली. मालेकरणींचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न म्हणून त्यांच्याकडे पाहण्यासाठी उद्युक्त केले आहे त्यातून मोलकरणींसाठी 'महाराष्ट्र घर कामगार कल्याणकारी मंडळ कायदा–२००८' हे विधेयक मंजूर करून घेतले. त्यामुळे दीर्घकाळ उपेक्षित राहिलेल्या

या वर्गाच्या मागण्यांना सरकारने काही प्रमाणात का असेना न्याय दिलेला आहे. घरेलू कामगारांनी जिल्हा घरेलू मंडळ नियुक्त करणारे 'महाराष्ट्र'[५] हे पहिले राज्य आहे.

कष्टकरी हे जरी उपेक्षित असले तरी मोलकरणी हा घटक आहे. १९८० मध्ये डॉ. बाबा आढाव यांनी मोलकरणींच्या प्रश्नांवर पुरोगामी सत्यशोधक मध्ये नेमकेपणाने मत मांडले आहे.

### ६.२.७ वेश्या वस्तीतील मुलांचे शिक्षण

वेश्या वस्तीतील मुलांचं शिक्षण हा प्रतिष्ठानच्या कामाचा मुख्य भाग आहे. गेली ५–६ वर्षे जून महिन्यामध्ये इथल्या मुलांना नजिकच्या शाळेत घालण्याचे काम केले आहे. शाळेतून आल्यानंतर मध्यरात्रीपर्यंत हया मुलांना घरात प्रवेश नसतो. गैरहजेरीचे प्रमाण अधिक असते. अस्वच्छता यामुळे शाळेत आस्थेची वागणूक नाही. शिक्षणाचा दर्जा अतिशय खालावलेला एक दोन वेळा नापास झाल्यावर शाळेचा दरवाजा कायमचा बंद होऊन पुढचं आयुष्य अपरिहार्यपणे वस्तीतल्या काळ्या धंद्यात गुरफटून जायचे.

शाळेनंतरच्या वेळात मुलांचा अभ्यास व्हावा. त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा, यासाठी रात्रीच्या वेळात मुलांचा वर्ग सुरू करण्यात आला. डिसेंबर १९८५ पासून सुखलाजी स्ट्रीट येथील शाळेतील वर्ग महापालिकेकडून मिळाला असून रोज संध्याकाळी ६ ते ८.३० हया वेळात मुलं इथे अभ्यास करतात. प्रतिष्ठानच्या १०–१२ कार्यकर्त्यांचा गट त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करतो. हयामध्ये ४५ पैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाली. मुलांचा आत्मविश्वास वाढविणारी ही बाब असली तरी इतर शाळांच्या तुलनेत इथल्या मुलांचा दर्जा खूपच निकृष्ठ आहे.

वस्तीतल्या वातावरणाचा मुलांच्या विकासावर विपरीत परिणाम होतो. म्हणून त्यांचं शिक्षण वस्तीबाहेर होणं हे अधिक चांगलं परंतु मुलाला आपल्यापासून दूर ठेवायला आया सहसा तयार होत नाहीत. बऱ्याच प्रयत्नांतून तयार झाल्याच तर संस्थांच्या नियमानुसार वागणे त्यांना जमत नाही. वेश्यांच्या मुलांना प्रवेश देणाऱ्या संस्था फारशा नाहीत काही ठिकाणचं वातावरणही योग्य नाही. मात्र कोंढवा (पुणे) येथील बाल संगोपन केंद्र ही संस्था केवळ वेश्यांच्या मुलांसाठी उत्तम तऱ्हेने वसतीगृह चालवीत आहे. गेल्या वर्षी कामाठी

पुऱ्यातीलं मुलांची सोय हया संस्थेमध्ये करण्यात आली, ताडदेवच्या युसुफ मेहेर आली हायस्कूलमध्येही तीन मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. हया मुलांची फी, गणवेष, वह्या, पुस्तके इत्यादींची जबाबदारी प्रतिष्ठानने स्वीकारली. मुलांच्या शालेय शिक्षणाबरोबरच कलागुणांना वाव देणारे उपक्रम घेण्यात आले. सुट्टीमध्ये बाल वाचनालय चालविण्यात आले. सहल काढण्यात आली.

कामाठी पुऱ्यातील वेश्यांमध्ये देवदासी प्रथेतून आलेल्या स्त्रियांचा भरणा मोठ्या प्रमाणावर आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद त्याप्रमाणे कर्नाटकाच्या सीमा भागातून आलेल्या देवदासी स्त्रिया आहेत. देवाशी लग्न होऊन आज भोगदासी बनलेल्या हया स्त्रियांना शासनाच्या देवदासी पुनर्वसन योजनांचा कुठलाच लाभ मिळत नाही. सावकार, दलाल, मालकिणी यांच्या अघोरी पाशाने ऐन उमेदीत शरीराची दैना होते आणि जीव जगण्यासाठी पुढची पिढी बरबाद करण्यावाचून गत्यंतर उरत नाही. वेश्या व्यवसायाला देवदासी प्रथेची मान्यता असल्याने दरवर्षी माघ पौर्णिमेला मुंबईतील अनेक मुली देवाच्या नावाने सोडल्या जातात.

महाराष्ट्र शासनाच्या पुनर्वसन योजनेनुसार देवदासींच्या मुलींसाठी वसतिगृहाची योजना शासनाला सादर करण्यात आली. आमदार मृणाल गोरे, प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा पुष्पा भावे यांच्या समवेत अर्थमंत्री सुशिलकुमार शिंदे यांना भेटून प्रकल्पाची माहिती देण्यात आली. देवदासी पुनर्वसन कार्यासाठी सभागृहात २५ लाखांच्या अनुदानाची घोषणा करून महाराष्ट्र शासनाने केवळ ५० हजार रूपयेच उपलब्ध केले.

देवदासी प्रथा, स्त्रीचं दुय्यम स्थान, वाढते दारिद्र्य आणि शासनाची उदासिनता यामुळे सक्तीचा वेश्याव्यवसाय वाढतोच आहे. शासनाने काही ठोस पावलं उचलली आणि समाजाचा दृष्टीकोन काहीसा बदलला तर निश्चितच हया स्थितीमध्ये सुधारणा होईल असे प्रतिष्ठानला वाटते. स्वातंत्र्याच्या ४० वर्षात आज देखभर लाखो स्त्रियांना जनावरांसारखे पिंजऱ्यातल्या बंदिवासात बसावे लागत आहे, ही लांच्छनास्पद गोष्ट आहे. हया प्रश्नाकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधण्यासाठी १५ ऑगस्ट १९८६ रोजी कामाठी पुऱ्यात धरणे धरण्यात आले. धरण्याच्या निमित्ताने पुढील मागण्या करण्यात आल्या.

१) वेश्यांच्या मुलांना मागासवर्गीयांच्या सवलती लागू करावयात. त्यांना शिक्षण आणि आरोग्यविषयक सोयी उपबध करून दिल्या जाव्यात.

२) वेश्या– व्यवसायात ढकलल्या गेलेल्या स्त्रियांच्या खरेदी विक्री व्यवहारात कर्जाचे ओझे त्या स्त्रीच्या डोक्यावर बसते. ह्या वेठबिगारीतून मुक्तता होण्यासाठी कर्जमाफी विषयक पावले उचलून पुर्नवसनाची व्यवस्था केली जावी.

३) १९३४ च्या देवदासी कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी. देवदासी आयोग नेमण्यात यावा. वृद्ध देवदासींना पेन्शन देण्यात यावी.

४) वाढत्या वेश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी व्हावी.

या धरण्यामध्ये स्थानिक स्त्रिया, मुले यांजबरोबर राष्ट्र सेवा दल, छात्र युवा संघर्षवाहिनी समिती आंदोलन, महिला दक्षता समिती हया संघटनांच्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

'हजारो स्त्रियांची ही वस्ती कुणाला 'व्होट बँक' वाटते. तर कुणाला काळे धंदे चालविण्यासाठी तिचा आश्रय घ्यावासा वाटतो. अनैतिक व्यवसायाबरोबर अशा मंडळींचा दहशतवादही इथे चालू असतो. अशाही अवस्थेत मुलांच्या शिक्षणाचे आव्हानात्मक काम प्रतिष्ठानला करायचे आहे. गेल्या काही वर्षांच्या कामामुळे इथल्या स्त्रियांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. अभ्यासिकेत येणाऱ्या मुलांची नियमितपणे आरोग्य तपासणी करून, त्यांना मोफत आरोग्य सेवा देण्याची योजना आखीत आहे.'[६]

### ६.२.८ साखरशाळा

महाराष्ट्रामध्ये अनेक साखर कारखाने आहेत. या साखर कारखान्यामध्ये ऊसतोड कामगार म्हणून दूरच्या भागातले ऊस तोड कामगार सहभागी होत असतात. या सर्व ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या शाळेचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. डॉ. बाबा आढाव यांनी साखर शाळेचा प्रश्न पुरोगामी सत्यशोधक मधून मांडलेला आहे. या मांडणीमधून त्यांनी साखरशाळेची संख्या वाढवली पाहिजे असे आवाहन केल्याचे आपल्याला २००३ मधील पुरोगामी सत्यशोधकच्या अंकामधील लेखातून आढळते.

महाराष्ट्राला ‘साखरशाळा’ ही कल्पना नवी नाही. शासनाने अध्यादेश जारी करून बहुतेक साखर कारखान्यांवर ‘साखरशाळा’ सुरू केल्या आहेत. नव्या शैक्षणिक धोरणात साखरशाळेचा समावेश करण्यात आला आहे. ऊसतोडणी मजूर सहकारी भटकंती करत असतात. अशा वंचित, उपेक्षित मुलांसाठी शिक्षणाची सोय असावी म्हणून साखर शाळांची सोय केली आहे.

शिका मुलांनो शिका
शाळा आता शिका ।।धृ।।
आळस करू नका
शाळा बुडवू नका
अंगठा देऊन झाला तोटा
जीवनाला आहे खोटा
शिका मुलांनो शिका ।।१।।
खेड्यापाड्यात आल्या शाळा
शिक्षण आहे तिसरा डोळा
असून डोळे सदा आंधळे
अडाणी आता राहू नका
शिका मुलांनो शिका ।।२।।
देशाची ही किमया सारी
विज्ञानाची आहे भरारी
समता नांदो दारोदारी
व्यर्थ जीवन जगू नका
शिका मुलांनो शिका
शाळा आता शिका ।।३।।

'मराठवाड्यातील काही जिल्ह्यांतून झेपावणारे हे मजूर भटकंती करत असतात. या मजुरांच्या मुलांना शिकता येत नाही. सर्वांना शिक्षण ही संकल्पना पूर्णत्वाला जाण्यासाठी साखर शाळांची आवश्यकता आहे.'[७]

### ६.२.९ परित्यक्ता

महाराष्ट्राच्या सर्व खेड्यापाड्यांतून, शहरांमधून परित्यक्त्या स्त्रियांची संख्या खूप मोठी आहे. ती जवळ जवळ ६ ते ७ लाखांपर्यंत असावी. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने समाजात परित्यक्त्यांची संख्या वाढणे हे समाज स्वास्थ्याच्या व लग्न संस्थेच्या दृष्टीने अतिशय घातक लक्षण आहे. परित्यक्त्यांची संख्या कमी करणे व ज्या आहेत त्यांना मूलभूत गरजा तरी मिळवून देणे हेच आजच्या समाज व्यवस्थेपुढे खरे आव्हान आहे. हे आव्हान सामाजिक संस्था, शासन संस्था यांनी एकत्रितपणे पेलले पाहिजे व परित्यक्ता स्त्रिला योग्य आधार मिळवून दिला पाहिजे. या उद्देशाने डॉ. बाबा आढावांनी पुरोगामी सत्यशोधकामध्ये लेख लिहिलेले आहेत.

परित्यक्ता स्त्रियांचे कायदेविषयक प्रश्न व सामाजिक प्रश्न यांवर चर्चा करण्यासाठी दि.०३ मार्च २००२ रोजी म. फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने एक चर्चासत्र देखील घेण्यात आले होते. या चर्चासत्रात कायदे क्षेत्रातील महिला व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यात आले होते.

परित्यक्ता स्त्रियांच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना डॉ. बाबा आढाव लिहितात, 'कुटुंब न्यायालय, पोटगीचा प्रश्न, परित्यक्ता महिलांना न्याय याविषयी माहिती देण्यात आली. महाराष्ट्रात सामाजिक संघटनांच्या रेट्यामुळे व चळवळींमुळे परित्यक्ता स्त्रिया धीटपणाने व आत्मविश्वासाने आपले प्रश्न आंदोलनाच्या माध्यमातून शासनापुढे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.'[८] हजारोंच्या संख्येने महिला संघटनांनी परित्यक्त्यांचे मोर्चे विधानसभेवर नेले आहेत. परित्यक्त्यांचे प्रश्न सुटावेत म्हणून परिषदा, चर्चासत्रे आयोजित करत आहोत त्याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र सरकारला कायद्यात बदल करणे भाग पडले आहे. महाराष्ट्रात पोटगीची रक्कम रू.५०० दर माणशी वरून १५०० रूपयांपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. कोर्ट फी स्टॅम्पमधून स्त्री अशिलांना सूट मिळालेली आहे. स्त्रियांना पुरूषांच्या

बरोबरीने पालक म्हणून नाव लावण्याच्या समान अधिकार मान्य करण्यात आलेला आहे. परंतु कागदावरील व कायद्यातील समानता प्रत्यक्षात यायला समाजाचे परिवर्तन व कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी आवश्यक आहे.'

परित्यक्ता स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे म्हणून डॉ. बाबा आढाव प्रयत्नशील होते. या प्रयत्नांना त्यांनी कृतीशिलतेची जोड दिली होती. या सर्व प्रयत्नाचा भाग म्हणून त्यांनी सत्यशोधक पुरोगामीमध्ये या स्त्रियांच्या समाजातील सद्यस्थितीवर वास्तवादी मांडणी केलेली आहे, डॉ. बाबा आढाव लिहितात, समाज परित्यक्ता महिलांच्या प्रश्नाकडे उदासीनतेने बघतो. कुटुंबातील अगदी माहेरची माणसे देखील परित्यक्ता स्त्रियांचा स्वीकार आनंदाने करीत नाहीत, ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे अशा व्यक्ती हया आयुष्यभर कुटुंबात नाकारलेली व्यक्ती असे जीवन जगतात. उपेक्षित, एकाकी व आश्रित असल्यासारखे जगावे लागते. परित्यक्ता स्त्रियांना समाजात, घरात पत मिळविण्यासाठी तिला तिचे अधिकार देण्याची गरज आहे. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा व न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने त्यांना जमिनीचा तुकडा दिला पाहिजे. त्यांच्या निवासाची सोय मोफत घरे बांधून किंवा स्वतंत्र वसतिगृहे बांधून शासनाने करून दिली पाहिजे. त्यासाठी सामाजिक संस्था व शासन दोघांनी एकमेकांची मदत घेऊन काम केले पाहिजे. परित्यक्ता महिलांचे आर्थिक पुनर्वसन केले पाहिजे तरच त्यांना खरा न्याय व अधिकार मिळेल, यासाठी काही महत्त्वाचे ठराव प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले.

१) कुटुंब न्यायालयांकडून पोटगीची वसुली करताना प्रभावी व कार्यक्षम यंत्रणेचा वापर करून स्त्रियांना पोटगीची रक्कम त्वरीत देण्यात यावी. यासाठी निश्चित कालमर्यादा असावी.

२) पोटगीचा अर्ज कोर्टात दाखल केल्यानंतर त्यांना तात्पुरती किंवा अंतरिम पोटगी मिळण्याचा हुकूम मूळ पावतीचा अर्ज दाखल तारखेच्या दिवशीच व्हावा.

३) राज्य शासनाने परितक्त्यांसाठी एखादी योजना व उपक्रम राबविल्यास त्यामध्ये केवळ आर्थिक लाभ परित्यक्त्याला मिळत आहे. या कारणास्तव तिचा नवऱ्याकडून पोटगी मागण्याच्या हक्कास बाधा येता कामा नये.

४) परित्यक्ता स्त्रियांसाठी शासनाने त्वरित ‘परित्यक्ता निराधार योजना’ तयार करून दरमहा रूपये १००० मिळतील अशा स्वरूपाचे काम त्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.

५) परित्यक्ता स्त्रियांसाठी मोफत घरांची योजना राबवण्यात यावी व तेथेच त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी.

६) स्वयंरोजगार, कुटिरोद्योग, लघुउद्योग यासाठी वयाची व शिक्षणाची अट न घालता व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येऊन अल्प व्याजदरात व्यवसायाकरता पतपुरवठा करण्यात यावा.

७) परित्यक्ता महिलांच्या मुलांसाठी शासनाने मोफत वसतिगृहे व शिक्षणाची सोय करावी.

८) ज्यांच्या निवासाची सोय नाही अशा स्त्रियांना मोफत वसतिगृहे व स्वयंरोजगाराची सुविधा विनामूल्य करून देण्यात यावी.

वरील मागण्या डॉ. बाबा आढाव यांनी जून २००२ च्या जून मधील अंकात वाचकांसाठी मांडलेल्या आहेत.

### ६.२.१० बालमजूर

जगातील बालमजुरांच्या एकूण संख्येत भारताचा प्रथम क्रमांक लागतो. अशा आशयाची माहिती १९९४ साली केंद्रिय कामगार राज्यमंत्री पी. ए. संगम्मा यांनी राज्यसभेत एका प्रश्नात उत्तर देताना सांगितली. त्यानंतर बाबा आढाव यांनी बालमजूर या समाजातील ज्वलंत प्रश्नावर पुरोगामी सत्यशोधकमध्ये बालमजुरीवर लेख लिहून बालमजुरी ही भारतातील गंभीर समस्या असल्याचे मत नोंदवले आहे. बालमजुरीमध्ये भारताचा जगात प्रथम क्रमांक असणे ही भारतासाठी भूषणावह नाही असेही ते पुढे म्हणतात. या लेखामध्ये त्यांनी बालमजुरीच्या संदर्भातील आपली प्रखर मते पुढीलप्रमाणे नोंदवली आहेत. ज्या राष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत ४ ते ५ % बालमजुरांची संख्या असावी, त्या राष्ट्राचा भविष्यकाळ उज्जवल आहे. असे कोणत्या तोंडाने म्हणावयाचे?

स्त्री कष्टकऱ्यांच्या संख्येबरोबरच बालमजुरांच्या संख्येत वाढ होत आहे. आसपास चालू असलेल्या बांधकामावर वीट, वाळू, माती वाहून नेण्यासाठी कितीतरी मुलामुलींना कामाला जोडलेले असते. मोलकरणींच्या बरोबर त्यांची मुले हमखास आढळतात. रात्री अपरात्री कागद, काच, भंगार गोळा करणाऱ्या महिलांच्याबरोबर मुलेमुली असतात. आई कचराकुंडी धुंडाळायला गेली की मुले सापडलेल्या जिनसाच्या पिशव्या घेऊन बाजूला बसतात. विडी व्यवसायात तर सारे घर हालते. महाराष्ट्रातील शहरातून बालमजुरांची सर्वाधिक संख्या आढळते हॉटेलातून. उडपी हॉटेलातून तर या मुलांना दक्षिण कर्नाटकातून मोठ्या संख्येने आणले जाते. बांधकाम व्यवसायातील लमाण आंध्रातून येतात तर महाराष्ट्रातील ऊसतोडणी कामगारांच्या मदतीला हंगामात मुलामुलींना शाळा बुडवून आईबापाबरोबर जावे लागते.

जीवनमानाचा स्तर उंचावतो. पण प्रपंच भागत नाही. महागाईबरोबर टिकाव धरता येत नाही. गरजा वाढतात, अशावेळी कष्टकरी कुटुंबातील ओढ व ग्रस्तता विलक्षण असते. ती हाराकिरी करतात. अजाण बालकांना काहीतरी कमावण्यासाठी कामाला लावतात.

अशा मुलांनी काम किती तास करावे? मध्यंतरात सुटी असावी की नसावी? त्यांचे आरोग्य? खाणे पिणे? शिक्षण? यापैकी कोणत्याही बाबींकडे कामगार अधिकारी लक्ष देत नाहीत....... ''एरव्ही ही मुले म्हणजे गुन्हेगार बनतील!'' असे सर्रास बोलले जाते.

बाल कामगारांच्या संरक्षणार्थ असलेल्या कायद्यांची अंमलबजावणीच होत नसल्याने त्यांचे भयावह शोषण सुरू राहते. त्यात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण पाहिले की हे लक्षात येईल.

देशातील कामगार संघटनांना हा विषय महत्त्वाचा वाटत नाही. बालमजुरांच्या प्रश्नावर त्यांनी केलेली एकही कृती ऐकीवात नाही. या उपक्षेचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रामुख्याने ही मुले 'स्त्री शुद्रातिशुद्र' वर्गातील आहेत. लब्ध प्रतिष्ठित, उच्च व कनिष्ठ मध्यम वर्गातून 'बालकामगार' आढळत नाहीत.

लॉटरी, दारू इ. अनैतिक, बेकायदेशीर व्यवसायातून बालकामगारांचा वापर करण्याची प्रवृत्ती बळावत चालेली आहे. मुंबईतील अतिरेकी टोळ्यांतून होणाऱ्या भारतीय पूर्वाश्रमी बालकामगारांचा भरणा सर्वाधिक आहे.

'भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने तरी बालकामगारांच्या समस्येची उपेक्षा थांबली पाहिजे.'[९]

बालमजूरीचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकामगारांच्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करते, बालकांना प्राथमिक गरजा उपलब्ध करून देणे गरजेचे असून, लॉटरी, दारू, अनैतिक व बेकायदेशीर व्यवसायातून बालकांचे पुनर्वसन करणे गरजेचे असून किंबहुना या घटकामध्ये बालकांचा वापरच होणार नाही असा काही ठोस कार्यक्रम आखण्याची बाबा आढाव यांनी वरील लेखामधून घेतलेली भूमिका निश्चितच समाजाला दिशादर्शक आहे.

**६.२.११ रोजगार हमी**

भारतात जातीधर्मामध्ये आणि चार्तुवर्ण्यावर विभागलेल्या समाजामध्ये आधीच विषमता असताना स्वातंत्र्योत्तर काळात गरीब व श्रीमंत ही आर्थिक निकषांवरची दरी रूंदावताना दिसते. उच्चशिक्षण घेऊनही रोजगार उपलब्ध नसलेले युवक भारतात असे आढळतात तसेच शिक्षण न घेतलेली व रोजगार उपलब्ध नसलेली अनेक युवक आढळतात. म्हणूनच या बेरोजगाराची हमी शासनाने घ्यावी अशा आशयाची मागणी बाबा आढावांनी या लेखातून केली आहे.

रोजगार हमीच्या कामावर तरूण तरूणींची संख्या जास्त काही कामावर मुलं मुली तर मुद्दाम कामाला येतात. तेथे गुणाचं बंधन नसतं. हवा तसा धिंगाणा घालायला मिळतो. एकमेकांची चेष्ठा करायला मिळते. दुपारी विश्रांती घेण्याऐवजी एकमेकांची टीकाच जास्त चालते. या मजुरांना बाहेरच्या जगाची ओळख नसते. प्रत्येक उगवलेला दिवस असाच घालवीत राहतात. जीवनाचा अर्थ त्यांना कळत नाही. वाईट गोष्टी ताबडतोब लक्षात राहतात. पण आपण संस्कारमय जीवन कसे जगावे हे त्यांना समजत नाही.

'जो दुःखी असतो तोच दुसऱ्याचे दुःख जाणतो.' जो उपाशी आहे त्यालाच उपाशी राहिल्यावर पोटाला किती पीळ पडतो ते कळते. रोज आरामशीर जीवन जगणाऱ्या ऐतखाऊंना

काय दुःख होणार? उपाशी लोकांबद्दल काय वाटणार? या रोजगार हमीवर मजुरांची चोहोबाजूनी कोंडी होत होती. पगार कमी, वेळेवर नाही, कामाची पद्धत बरोबर नाही. हे सगळं कोणं बदलणार? पाऊल कोण उचलणार? प्रत्येकजण जगणं स्वतःसाठी पहात असतो. स्वतःला सुखी कसे होता येईल. पण स्वतः सुखी होत असताना आपण दुसऱ्यांना चिरडून टाकतो त्याचे यांना भानच नसते.

'यासाठी वेगवेगळ्या विषयावर मजुरांच्यात चर्चा होणे गरजेचे आहे. त्यांच्यात जाणीव, जागृती होत होत संघटनेचे महत्त्व पटले पाहिजे. या गरिबांच्या जीवावर पोसणारी, प्रचंड भ्रष्टाचार करणारी ही नवी मुकादमांची जात नष्ट करायला हवी.'[१०]

**६.२.१२ पथारी चळवळ**

स्वयंरोजगार करण्यासाठी अनेक युवक–युवती समाजातून पुढे येत आहे. स्वाभिमानाने जगावे असे प्रत्येकाला वाटते यातूनच हातगाडीवाले, फेरीवाले, पथारीवाले यांच्या आयुष्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पथारीवाल्यांना शासनाने संरक्षण द्यावे व कायद्याच्या चौकटीत बसून त्यांना जगण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या अर्थाने बाबा आढावांनी 'पथारी चळवळ' या आशयाचा लेख पुरोगामी सत्यशोधकमधून लिहिला आहे.

नवीन आर्थिक धोरणामुळे बेकारी प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. त्यातच भर पडली आहे ती जागतिक आर्थिक मंदीची. बेकारीला तोंड देण्यासाठी जगण्याचे साधन म्हणून साहजिकच स्वयंरोजगार करण्यामागे आजचा तरूण लागतो, छोटा धंदेवाला म्हणून हातगाडी, पथारी, फेरीवाला यांचा जन्म होतो. आज मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे इ. शहरात कित्येक लोक मेहनत करून या मार्गाने स्वयंरोजगार करताना दिसत आहे. परंतु या मेहनती माणसांना आर्थिक मदत करण्यासाठी, सरकार मदत तर सोडा अडथळे आणण्याचे काम करताना दिसते. हातगाडीवाले, पथारीवाले, फेरीवाले सरकारचा व समाजाचा बोजा न बनता स्वतःच्या मेहनतीने कुटुंबाचा चरितार्थ चालवत असतात. परंतु सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था हया हातगाडीवाल्यांना, फेरीवाल्यांना, पथारीवाल्यांना एकत्र डोकेदुखी गुन्हेगारच दृष्टीकोनातून पहात असतात. श्रीमंत म्हणून ओळखला जाणारा फ्लॅट संस्कृतीतील

वर्ग आपल्या सोसायट्यामधून 'फेरीवाला हातगाडीवाल्यांना प्रवेश नाही.' असे बोर्ड गेटवर लावतात. त्यातून समाज व शासन फेरीवाल्यांकडे कोणत्या नजरेतून पाहते आहे ते स्पष्ट दिसते.

पोलीस कायद्याखाली खोट्या केसेस घालून १०० रू. पासून ते १००० रू. पर्यंत दंड वसूल करणे हे काम महाराष्ट्र सरकार पोलिसांमार्फत करत असते. तर स्थानिक स्वराज्य संस्था परवाने बंद ठेवून, पावती प्रकार कधी बदं तर कधी चालू ठेवून हप्ते वसूल केले जातात. हप्ता न देणाऱ्याना माल जप्त करणे, मालाची नासाडी केली जाणे, वेळ प्रसंगी पोलिसांच्या मदतीने हातगाडीवाले, फेरीवाले, पथारीवाले यांना मारहाणसुद्धा नित्याची बाब झाली आहे.

महाराष्ट्रातील फेरीवाल्यांची वार्षिक आर्थिक उलाढाल पन्नास हजार कोटी रूपयांहून जास्त आहे. शेती उत्पादनातील बहुसंख्य माल उदा.भाजी, फळे, फुले इ. हातगाडीवाले, फेरीवाले, पथारीवाले यांच्यामार्फत विकला जातो.

'महाराष्ट्रातील फेरीवाल्यांनी जर ७ दिवस बंद पाळून 'माल विकत घेणार नाही व विकणार नाही' असे ठरविले तर कोट्यावधी रूपयांचा शेतीमाल नासून जाईल. यामुळे समाजाच्या दैनंदिन गरजा भागणार नाहीत तसे व्यापारी वर्गाचे समाजाचे व सरकारचे आर्थिक नुकसान होईल. यावरून फेरीवाल्यांची, हातागडीवाल्यांची, पथारीवाल्यांची किती आवश्यकता आहे. त्यांचा हा धंदा केवळ त्यांच्या उपजिवीकेचे साधन नसून एक प्रकारे समाजाची सेवा आहे, हे लक्षात येईल. या सर्व गोष्टीचा विचार केल्यावर हातगाडीवाले, पथारीवाले, फेरीवाल्यांनी माणूस व नागरिक म्हणून जगता यावे यासाठी जगण्यासाठी पुढील गोष्टींची शासनाने पूर्तता केली पाहिजे.'[११]

१) हमाल मापाडी महामंडळाच्या धर्तीवर पथारी महामंडळ निर्माण करणे.

२) अपघात, मृत्यू याप्रसंगी विम्याचे संरक्षण मिळावे.

३) सहभागी भविष्यनिर्वाह निधीची सोय व्हावी.

४) अतिक्रमण विभाग, पोलीस गुंड यांच्याकडून होणारा अन्याय याबाबत संरक्षण मिळावे.

५) महाराष्ट्रातील सर्व फेरीवाल्यांना कायदेशीर परवाना द्यावा.

६)	धंदा करण्यासाठी पर्यायी जागा द्यावी.

७)	हप्ता वसुली, जप्ती, दंड आकारू नये.

८)	पुनर्वसन होत नाही तोपर्यंत अतिक्रमण खात्याकडील कार्यवाही थांबली पाहिजे.

### ६.२.१३ सामुदायिक लग्ने

कष्टकरी, कामगारांमधील विवाहाचे स्वरूप हे साधारणपणे त्यांच्या परंपरानुसार ठरलेले असते. खोट्या प्रतिष्ठेसाठी आर्थिक परिस्थिती नसतानाही विवाहामध्ये भरपूर पैसा खर्च केला जातो. या विवाहांना मार्गदर्शक ठरतील अशा पद्धतीचे विवाह कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतीने २४ जून १९९९ रोजी हमाल भवनामध्ये केले. या विवाहांचे वैशिष्ट्ये म्हणजे हे ४ विवाह सामुदायिक पद्धतीने साजरे गेले गेले. या विवाहामधून आलेल्या अनुभव कथन पुढील लेखामधून केलेले आहे ते याप्रमाणे.

गुरूवार दि.२४ जून १९९९ रोजी पुण्याच्या हमाल भवनात एक आगळा वेगळा समारंभ साजरा झाला. कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतीने ४ विवाह सामुदायिक पद्धतीने साजरे केले. कोणी म्हणेल यात काय अप्रुप? पंचायतीच्या १०,००० महिला सभासद आहेत. बहुसंख्य दलित यातही मातंग. गेले वर्षी ७ विवाह झाले. यंदा फक्त ४ कारण यंदा समज वाढली आहे. विवाहयोग्य वयाची अट कटाक्षाने पाळली गेली. मुलाचे २१ मुलीचे १८ ससूनच्या डॉक्टरांचा दाखला आवश्यक ठरवला. त्यामुळे मूळच्या १५ ची यादी ४ वर आली. मात्र याची शिक्षा पंचायतीला भोगावी लागली. १५ विवाहांच्या जेवणाचे बजेट १८००० ठरले होते. १५ x १०० एवढे वऱ्हाडी मोजले होते. ऐनवेळी विवाहांची संख्या कमी झाली तरी जेवणाचा बेत कायम ठेवावा लागला. १२०० ते १३०० वऱ्हाडी जेवले. भात, वरण, भाजी, जिलेबी, मसाला भात असा बेत होता वधू–वरांच्या जोडीकडून रू.१००० घेतले. प्रत्येक जोडीला स्टीलची बादली भेट देण्यात आली. पंचायतीच्या एका सभासदास कचऱ्यात सापडलेल्या सोन्यातून मणी–मंगळसूत्र बनवून देण्यात आले. बँड लावून वरांची मिरवणूक झाली. बँडवाले आप्तातले होते. वरबाप, वधूबाप, वधू आईला कपडे घेण्यात आले.

मुलामुलींचे कपडे ज्याने त्याने केले होते. कौटुंबिक मानपानही ज्यांनी–त्यांनी सांभाळले. सारे वऱ्हाड–नटून थटून आले होते. फुलांचे गजरेवाला गजरे विकत होता. वरमाया करवल्यांनी हिरवे चुडे भरले होते. वरबाप खांद्यावर चादरी पांघरून इकडे तिकडे मिरवत होते. जेवणाच्या पंगती झडत होत्या.

'५ चा मुहूर्त ६ वाजता डॉ. श्रीराम लागू व डॉ. बाबा आढावांनी अंतरपाट धरला. ५ मंगलाष्टके झाली. बाबांनी म. फुलेंचे मंगलाष्टक म्हटले. लग्न झाल्यानंतर डॉ. लागू म्हणाले, ''अशा तऱ्हचा अनुभव मला यापूर्वी आला नाही, या आनंदोत्सवात सहभागी होण्याची संधी ही मला मिळाली, येथे माणुसकीचा प्रत्यय आला. श्रीमतांच्या लग्नात संपत्तीचे प्रदर्शन असते. मंडळी मानापमानाच्या नशेत असतात. तांदळाच्या अक्षतांच्या ऐवजी फुलांचा वापर केला. हजारो टन तांदूळ आपण वाया घालवतो. तुम्हा सर्वांना शुभेच्छा देतो.'' डॉ. बाबा आढावांनी वधूवरांना नावे घ्यायला लावली आणि कार्यक्रमात रंगत आली. वधूवरांच्या आई बाबांना स्टेजवर बोलवून ओळख करून दिली. या उपक्रमाला छान दाद मिळाली. इतर संघटनांची दाद मिळायला हवी.'[१२]

एखाद्या संघटनेने अशा पद्धतीचे सामुदायिक विवाह लावण्याचे केलेले हे कार्य निश्चित दुर्मिळ पद्धतीचे आहे. स्वतः बाबांनी या उपक्रमाला दाद मिळाल्याचे सांगून इतर संघटनांनी देखील या उपक्रमाला दाद द्यायला हवी अशा प्रकारचा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

### ६.२.१४ दारूबंदी

भारतातील अनेक पुरूष वर्ग दारूच्या आहारी गेला आहे. जीवनात आलेले नैराश्य कमी करण्यासाठी व रोजच्या ताणाला सामोरे जाण्यासाठी प्रत्येकजण दारूच्या आहारी जाताना दिसतो. दारूमुळे कित्येक संसाराची धुळधाण होताना दिसत असताना सुद्धा सरकार काहीही करत नाही. दारूमुक्ती चळवळीसाठी अनेक महिला पुढे येताना दिसतात. परंतु त्यांच्या कार्याला म्हणावा तसा पाठिंबा मिळत नाही.

परमीट रूमला महिला वर्गाचा विशेष विरोध असतो. जिल्ह्यात दारूमुक्ती मंडळे नियुक्त केलेली आहेत. दारूमुक्ती चळवळीत प्रतिष्ठानाचाही सहभाग असतो. अबकारी अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांना साकडे घातले तरी शासनाचे धोरण दुटप्पी व दुतोंडी असते.

निर्ढावलेपणा मुळे निदर्शनांचा परिणाम होत नाही. क्वचित लाचलुचपतीचे व्यवहार होतात. दमदाटी, खोटेनाटे आरोप, खोट्या सह्यांची पाठींबा पत्रे सारखे प्रयत्न कार्यकर्त्यांना फोडण्यासाठी होतात.

'संपूर्ण दारूबंदी झाली तर हातभट्टीला चालना मिळते शिवाय उच्च व मध्यम वर्गात दारू पिणे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले आहे. दारू पिण्याचे प्रमाण सतत वाढत आहे. कॉलेजातील मुले बीअर ऐवजी अेक नवीन मादक पेय घेऊ लागली आहेत. आरोग्याचे प्रश्न विशेषतः लिव्हरचे विकार वाढत आहेत. कुटुंबे बरबाद होत आहेत. रोज किमान २० रू. खर्ची पडतात. असे मजूर सांगतात. भारतात देखील दारूचे उत्पादन १० पटीने वाढले आहे.'[१३]

### ६.२.१५ रोजगाराचा हक्क

मार्केटयार्डातून अनेक भाजी विक्रेते भल्या पहाटे येऊन भाजी खरेदी करतात व शहर परिसरात विक्री करतात, आलेल्या पैश्यातून उदरनिर्वाह चालू असतो परंतू त्याला सुद्धा सामाजिक परिस्थिती कशी त्रास देते याबद्दल बाबा आढावांनी रोजगाराचा हक्क या लेखातून आपले विचार मांडले आहेत.

पुण्याला गुलटेकडी मार्केटयार्डात शेतकऱ्यांच्या मालाची कोटी रूपयांची उलाढाल होते. बिचारे पथारीवाले, हातगाडीवाले हा माल दिवसभरात शहराच्या दूरवर नेऊन पोचता करतात. यांना कोणतेही संरक्षण नाही. खाजगी सावकारांकडून भांडवलासाठी पैसे घ्यावयाला व्याजाचा दर, दरमहा ३० रू शेकडा. या सावकारांना मलबारी म्हणतात. मार्केटयार्डात वेगवेगळ्या भाज्या निरनिराळ्या ठिकाणी जाऊन विकत घ्याव्या लागतात. गाडीला संरक्षण नसते. वेळा पहाटेच्या असतात. व्यवधान ठेवावे लागते. माल भरून रस्त्याने जायचे व ठिय्यावर विक्री सुरू करायची दुपारी १ ते २ वाजतात. राहिलेला माल अंगावर पडतो. काही वेळेस मार्केटातील दलाल न खपलेला माल गळ्यात मारतात. दिवसभराच्या विक्रीतून फक्त पोट काढायचे. परंतू कधी भांडवल देखील सूटत नाही. पनोती लागल्या सारखे पोलीस, अतिक्रमण, आरोग्य खाते, स्थानिक नगरसेवक, मंडळे, दादा मंडळी, सर्वांना नैवद्य ठेवावा लागतो. नाही म्हणायची सोय नसते. नाही म्हणाले तर पनोती मागे लागते.

सध्या अतिक्रमणाच्या गाडीला मरीआई आली आहे. नाशवंत माल सगळी गाडीच उचलून नेतात. माल म्हणे नदीत टाकतात. गाडी सोडवायची तर ५०० रू. दंड! पथारीवाल्यांचा मोर्चा निघाला. पोट भरण्याचा हक्क मिळालाच पाहिजे! धंद्याला जागा मिळालीच पाहिजे. प्रत्येकाला लायसन मिळालेच पाहिजे! आमचे पुनर्वसन झाले पाहिजे. पथारीवाल्यात महिलांची संख्या अधिक होती.

'पुण्याच्या आयुक्तांनी समक्ष पाहणी करून पुनर्वसनाच्या योजनेसाठी पुढाकार घेतला.'[१४] या सर्वांना कायमस्वरूपी रोजगार मिळावा व त्या सर्वांचे पुनर्वसन व्हावे ही मनोमन आशा बाबा आढाव नेहमीच व्यक्त करीत असतात.

### ६.२.१६ समानतेचे सूत्र

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी समतेचा लढा सुरू केला. समतेच्या लढ्यातून सामाजिक सुधारणा होतील अशी फुले दांम्पत्यांची मनोमन आकांक्षा होती पण इतके वर्ष होऊनही मूळ प्रश्न अजूनही सुटलेला नाही. 'समानतेचे सूत्र' या लेखातून बाबा आढावांनी शंभर वर्षाच्या सामाजिक जीवनावर भाष्य केले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, विज्ञाननिष्ठा अशा ३० मानवी मूल्यांचा उद्‌घोष आहे. महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्य' असा शब्द प्रयोग वापरला आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध, कबीर व फुल्यांना गुरूस्थानी मानले आहे. ब्राह्मणी धर्माची फुल्यांनी चिकित्सा केली व त्या व्यवस्थेवर अक्षरशः कोरडे ओढले. अनेक धर्मग्रंथांचा फुल्यांनी समाचार घेतला. गांधीजीच्या डोळ्यांवर बांधलेली पट्टी काढून टाकली व स्त्री शिक्षणाची सुरूवात केली. सती व पतिव्रत्याचे स्तोम माजवलेल्या समाजात फुल्यांनी आपले क्रांतिकारक निरीक्षण नोंदवले. जगातील सर्व धर्म पुस्तके पुरूषांनी लिहिली आहेत. एकही धर्मपुस्तक स्त्रिने लिहिलेले नाही. पुरूषांनी बळाने गोमा करून 'सती' निर्माण केली. स्त्रिने धर्मपुस्तक लिहिले असते तर तिने 'सती' निर्माण केली नसती, मातृत्वाच्या नैसर्गिक

देणगीचा दाखला देत फुल्यांनी नव्या समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे स्वप्न मांडले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' हे वचन उद्धृत केले आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत माता आपल्या मुलांवर ममतेने संस्कार करील. पुढे यातून समताधिष्ठित समाज निर्माण होईल, या विचाराने भिडे वाड्यात पहिली शाळा सुरू झाली, सावित्रीबाई फुले शिक्षिका बनल्या. फुल्यांना सांस्कृतिक क्रांती अभिप्रेत होती. त्यासाठी नव मूल्यांचा त्यांनी मनोमन स्वीकार केला. 'स्त्री शुद्रातिशुद्र' असा शब्द प्रयोग प्रचारात आणला.

१८१८ मध्ये पुण्यात पेशवाईची अखेर झाली. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाली. १८१८ ते १८५७ या कालखंडात कंपनी सरकारने सती प्रथा, भ्रूण हत्या आदी ३० प्रकार कठोरपणे मोडून काढले. १८५४ मध्ये सार्वजनिक शाळांची सुरूवात झाली. कंपनी सरकारच्या ३९ वर्षात सामाजिक सुधारणेची घौडदौड हा अभ्यासाचा विषय आहे. १८५७ च्या बंडानंतर राणीचे राज्य सुरू झाले. राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला.

'धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन' घोषित झाले. सामाजिक धोरण मागे घेतले गेले.

जाती ही विलक्षण अंधश्रद्धा आहे. जातीला वैज्ञानिक आधार नाही. मात्र ती धर्मतत्वाशी जुळलेली आहे. जाति व्यवस्था, स्त्री-पुरूष भेद, अस्पृश्यता, श्रमप्रतिष्ठा इ. ना धर्मात मान्यता आहे. त्यासाठी 'ब्रह्मगिरी' अस्तित्वात आहे. संतांनी हे गिर्यारोहण टाकले व त्याला वळसा घालून आत्म्याच्या समतेपर्यंत वाटचाल केली, मात्र मूळ प्रश्न सुटला नाही. कितीतरी उदाहरणे देता येतील. मूळ प्रश्न आहे, पुढे काय?

'फुल्यांनी घरचा हौद खुला केला. डॉ. आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी उचलले. शाहू छत्रपतींनी गंगाराम कांबळेच्या हॉटेलात न्याहरी घेतली. विठ्ठल रामजी शिंदे व जनाक्का अहिल्याश्रमात जाऊन राहिले. साने गुरूजींनी पंढरपूरचे मंदिर खुले व्हावे म्हणून प्राण पणास लावले. डाव्यांनी सत्ता-संपत्ती प्रतिष्ठेचे लढे उभारले. औद्योगिक क्रांती, मतपेटी, सार्वत्रिक शिक्षण, विज्ञान इ.ना. 'जात' पुरून उरली आहे. तिला पुरून टाकण्याचा निर्धार हवा. ११ एप्रिलला महात्मा फुले जयंती, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब जयंती धूमधडाक्याने साजऱ्या होतील. पुतळ्यांना मोठमोठे हार घातले जातील. प्रश्न उरतो विचारांचा, भारतीय

स्वातंत्र्यालाही आता ६० वर्षे पूर्ण होतील. माओवाद्यांनी नेपाळची राजसत्ता संपवली आहे. भारतीय संस्थाने १९४७ मध्येच विलीन झाली. परंतु नेपाळपुढे भारत कोणता आदर्श ठेवणार आहे? असे अनेक प्रश्न आहेत. म. फुल्यांचे स्वप्न साकार होणे ही काळाची गरज आहे.' [१५]

बाबा आढावांचे अवघे जीवन हे महात्मा फुल्यांच्या विचारांना समर्पित झालेले आहे. महात्मा फुले यांनी जीवनात सामाजिक सुधारणांच्या बाबतीत वेगवेगळे प्रयोग केले. त्यामुळे निद्रिस्त झालेल्या समाजाला नवचेतना मिळाली. परंतु अजूनही समाजातला मूळ प्रश्न आहे तसाच आहे याचे दुःख आढावांना झाल्यावाचून राहत नाही.

### ६.२.१७ कष्टकऱ्यांचा जाहिरनामा

'भारत देश महासत्ता होण्याच्या दिशेने चालला असला तरी आजही भारतातील ८३ कोटी लोक दिवसाकाठी २० रू. सुद्धा स्वतःच्या जगण्यासाठी खर्च करू शकत नाहीत. म्हणून कष्टकरी, कामकरी, कामगार वर्गांला सन्मानाने आणि शांतीने जगण्यासाठी खालील मुद्यांची दखल घेतली जावी असे डॉ. बाबा आढाव यांना वाटते.'[१६]

१) सामाजिक सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सर्व कष्टकऱ्यांना सामावून घेण्याच्या उद्देशाने लवकरात लवकर आणि प्रभावीपणे व्हावी. देशाच्या उत्पादनात सकल घरेलू उत्पादनाच्या ६% रक्कम सामाजिक सुरक्षा योजनांसाठी राखून ठेवावी. जनस्वास्थ्य विमा योजना, जनश्री विमा योजना अशा तुकड्या – तुकड्यांच्या योजनांमार्फत व विमा कंपनीच्या लहरीवरची सामाजिक सुरक्षा उपयोगाची नसून आम्हाला सर्व कष्टकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षेचा कायदेशीर अधिकार हवा आहे.

२) शेतमजूरांसहित सर्व अकुशल कारागिरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. मजूरांच्या किमान वेतनात महागाई निर्देशांकानुसार त्वरीत वाढ करावी व किमान वेतन अंमलबजावणीसाठी यंत्रणा निर्माण करावी. ते दुर्बल घटक आहेत. घटनेच्या ४६ व्या कलमानुसार त्यांचे जीवनमान उंचावण्याची जबाबदारी सरकारवर आहे.

३) भारतीय शेतीमधील सार्वजनिक गुंतवणूक वाढली पाहिजे. पायाभूत सुविधा वाढल्या पाहिजेत. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर भाव मिळालेच

पाहिजेत. हे भाव ठरविताना शेतकऱ्यांचे कष्ट व श्रम विचारात घेतले पाहिजेत. हे भाव मिळण्यासाठी शासकीय स्तरावर सुसज्ज अशी खरेदी यंत्रणा असली पाहिजे.

४) ग्रामीण रोजगार हमी योजना नीट चालली पाहिजे. शहरी रोजगार हमी योजना सुरू झाली पाहिजे.

५) दगडखाण कामगार, बांधकाम मजूर, मच्छीमार यांसारख्या कष्टकऱ्यांना सर्व प्रकारच्या नागरी सुविधा मिळाल्या पाहिजेत. दगडखाण कामगारांच्या मुलामुलींसाठी पाषाण शाळा प्रकल्पास कायमस्वरूपी अनुदानासह मान्यता मिळाली पाहिजे. दगडखाण रॉयल्टीतील १०% हिस्सा दगडखाण कामगारांच्या विकासासाठी मिळाला पाहिजे.

६) आम्हाला कष्टकरी म्हणून ओळखपत्र मिळालेच पाहिजे.

७) राहायला हक्काचे घर परवडणाऱ्या किंमतीत मिळालेच पाहिजे.

८) झोपडपट्ट्यांतून पाणी, संडास, गटारे इ. नागरी सुविधा मिळाल्याच पाहिजेत.

९) हक्काचा रोजगार मिळालाच पाहिजे.

१०) वेतन भत्ता मिळालाच पाहिजे.

११) अंगणवाडी यांना किमान वेतन मिळालेच पाहिजे.

१२) महागाई भत्ता न मिळणाऱ्या कष्टकऱ्यांना १३ जीवनावश्यक वस्तू गहू, ज्वारी, तांदूळ, डाळी, तेल, साखर, दूध, मिरची, चहा, गूळ, कपडा, रॉकेल, साबण, रेशनिंग पद्धतीने मिळालेच पाहिजे.

१३) सामान्य जनतेला सरकारी दवाखान्यातच माफक किंमतीत आणि वेळेत औषधे, आरोग्यसुविधा मिळाल्या पाहिजेत.

१४) भारतीय समाजात गरिबांचे शिक्षण व श्रीमंताचे शिक्षण अशा दोन विषम शिक्षण व्यवस्था कार्यरत आहेत. भारतीय समाजातील परंपरागत आणि जातिआधारित विषमतेला यामुळे खतपाणी घातले जात आहे. शिक्षणावर सकस घरेलू उत्पादनाच्या ७% खर्च केला पाहिजे. प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे शिक्षण घेता आले पाहिजे व याची आर्थिक जबाबदारी सरकारनेच घेतली पाहिजे.

१५) मध्यमवर्गाने स्वतःच्या संकुचित स्वार्थाच्या कोषातून बाहेर पडून कष्टकऱ्यांच्या प्रश्नासाठी सक्रिय व्हावे.

### ६.२.१८ महागाईचा प्रश्न सुटणार कधी?

महागाईची जाणीव सरकारला असली तरी त्यांनी केलेल्या उपाययोजना कुचकामी ठरल्या आहेत. शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही ते न्याय देऊ शकले नाहीत. शेतीमाल विकण्यासाठी बाजार समिती कायदा आला. त्यात शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. असे सांगून मॉडेल कायदा आला, मॉलला तसेच शेतकरी व मोठ्या कंपन्यांमध्ये परस्पर व्यवहाराला परवानगी दिली. रिलायन्ससारख्या कंपन्या कोथिंबिरीची विक्री करू लागल्या. परंतू यातून चित्र असे दिसून लागले की, शेतकरी व ग्राहकांना न्याय मिळू शकला नाही. दोघांमधला मध्यस्थ असलेल्या दलालांची संख्या मात्र वाढत चालली आहे. या दलालांचे हितसंबंध राजकारण्यांशी जोडले आहेत.

त्यामुळे, 'महागाईचा मुकाबला करण्यासाठी सामाजिक सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे. रेशनिंग कायद्याने मिळालेला हक्क आहे. या व्यवस्थेत सुधारणा करून लोकांना रास्त भावात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला पाहिजे. त्यासाठी सरकारने त्यांच्या धोरणाला मुरड घातली पाहिजे हे करताना शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. त्यासाठी दलालांची फळी मोडून काढली पाहिजे. नंतर दोनची अर्थव्यवस्था मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलली पाहिजेत. लोकशाहीने लोकांना मत मिळाले, पत मिळाली नाही. सामान्य माणसाची पत कशी वाढेल, हे पाहिले पाहिजे.'[१७]

### ६.२.१९ सामाजिक सुरक्षा कायदा दिन

सामाजिक सुरक्षा कायदा हा मंजूर होऊनही अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू झालेली नाही. या संदर्भात आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने हमाल पंचायतीच्या वतीने या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात राष्ट्रपतींना एक निवेदन पाठवण्यात आले. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचा दिवस हा कष्टकरी वर्गाने 'सामाजिक सुरक्षा कायदा मागणी दिन' म्हणून साजरा केला होता. देशातील असंघटित, असुरक्षित कामगार व कष्टकऱ्यांसाठी या कायद्याला लोकसभेने १७ डिसेंबर २००८ रोजी मंजूरी दिली. त्यानंतर

राष्ट्रपतीची स्वाक्षरीही झाली, तथापी या कायद्यातील अनेक तरतूदींची अंमलबजावणी झालेली नाही आणि या कायद्याप्रमाणे प्रत्येक राज्यात असंघटितांसाठी मंड्ळ स्थापन करणे अनिवार्य असूनही त्याचीही स्थापना खुद्द महाराष्ट्रात झालेली नाही. या संबंधातही मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे निवेदने दिलेली आहेत. आज देशातील ४० कोटी अशा वर्गाच्या जगण्याचा हा विषय आहे. 'असंघटित कामगारांसाठी आरोग्य व प्रसूतीचे लाभ, वृद्धापकाळासाठी व निवृत्तीवेतन, अपंगांना सुविधा याचबरोबर निवासाची सुविधा, मुलांसाठी शैक्षणिक योजना आणि भविष्यनिर्वाह निधीची तरतूद अशा गोष्टी सरकारने मान्य केल्या आहेत.'[१८] तथापी, या एकूण प्रकरणाच्या बाबतीत अद्यापही सरकारी स्तरावर आणि राज्य स्तरावर मोठ्या हालचाली झालेल्या नाहीत. राज्य सरकारने केंद्राच्या कायद्याचा आधार घेऊन असंघटित कामगारांचे स्वतंत्र मंडळ कल्याणकारी योजना राबविण्यासाठी स्थापन करण्याची गरज आहे. कर्नाटक, पश्चिम बंगाल आणि ओरिसा या राज्यात या मंडळाची स्थापना झाली आहे.

### ६.२.२ चळवळीत आयुष्य वेचणाऱ्यांसाठी बाबांचे दोन शब्द

डॉ. बाबा आढाव यांनी पुरोगामी सत्यशोधक मधून समाजात भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांला वाचा फोडली. त्याचबरोबर सामाजिक चळवळी करताना जे जे सोबती जग सोडून गेले त्या सोबत्यांबाबत सुद्धा बाबांनी आपले विचार पुरोगामी सत्यशोधक मधून मांडले त्याच्यामध्ये क्रांती वीरांगना इंदुताई पाटणकर, हुतात्मा बाबू गेनू सैद, एक बहुजन नेतृत्व यशवंतराव, डॉ. अनिता अवचट, सरदार नानासाहेब गोरे, बाबूमियाँ बँडवाले. तसेच त्यांचे खास ज्येष्ठ सहकारी भाई वैद्य, डॉ. वीणा सुराणा, निळू फुले यांच्याबाबतही डॉ. आढाव यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

#### ६.२.२.१ क्रांती वीरांगना इंदुताई पाटणकर

इंदुताई पाटणकर या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी व समाजवादी विचारांच्या होत्या. इंदुताईंनी संपूर्ण आयुष्य सामाजिक चळवळीसाठी वेचले. त्यांच्याबद्दल डॉ. आढाव म्हणतात, खरे म्हटले तर इंदुबाईंनी आत्मचरित्र लिहायला हवे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या जीवनातील बंडखोरी. मराठा समाजात अशी उदाहरणे अपवादानेच आढळतात.

इंदुताईंचे वडील स्वातंत्र्य सैनिक होते. सातारच्या प्रतिसरकारच्या काळात इंदुताईंची जडण घडण झाली. शालेय शिक्षण, स्वातंत्र्य चळवळीत भाग, मेळे, मोर्चे, पदयात्रा, घोड्यावर बसणे, पोहणे, सायकल चालवणे, पत्रके वाटणे, बंदुक– पिस्तूल बाळगणे व ते चालवणे हे सारेच एखाद्या नवल कथेसारखे वाटावे असे आहे. स्वातंत्र्याच्या नवल कथेतील परी वाटावी अशी भूमिका इंदुताईंनी वठवली आहे. लग्नाला नकार देऊन त्यांनी सासवडच्या आश्रम गाठला. तेथे त्यांचा गांधीवाद, गांधी वाद्यांशी परिचय झाला. चारित्र्य संपन्न झाले. साने गुरूजींच्या व पांडू मास्तरांच्या हाकेला साद देत त्यांनी मुंबई गाठली.

'वय वाढले तरी इंदुताईंनी शैक्षणिक प्रगती थांबवली नाही. पतीच्या अपघाती निधनानंतर त्या शिक्षिका बनल्या. मुलगा मार्क्सवादी, सून गेल ऑमवेटने लिहिलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील सांस्कृतिक उठाव या इंग्रजी पुस्तकाने म. फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीशी वैचारिक बांध जमला. इंदुबाई ग्रामीण भागात परित्यक्ता कष्टकरी महिला गटात काम करत. बहुजन समाजात, विशेषतः मराठा समाजात परित्यक्त्यांचा प्रश्न अत्यंत उपेक्षित आहे.'[१९]

स्वातंत्र्य, गांधीवाद, समाजवाद, सत्यशोधक विचार व स्त्री दलित कष्टकरी समूहाबरोबर त्यांची चाललेली वाटचाल 'क्रांती विरांगना' या विशेषणाला साजेशी आहे.

### ६.२.२.२ बाबू गेनूंना आठवताना

स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचे नाव म्हणजे हुतात्मा बाबू गेनू सैद. बाबू गेनू यांनी स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान केले. त्यांच्याबद्दल डॉ. बाबा आढाव बाबू गेनूंना आठवताना लिहितात, हुतात्मा बाबू गेनू सैद यांची जन्मशताब्दी २००८ मध्ये साजरी करण्यात आली. बाबू गेनू यांनी गोदी विभागात काम केल्यामुळे हमाल बांधवांना याचा विलक्षण अभिमान वाटतो. बाबू गेनूंच्या असामान्य बलिदानामागे उत्तुंग ध्येयवाद होता. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांचे अंतःकरण पेटलेले होते.

'बाबू गेनू यांनी 'सायमन परत जा' या मोहिमेत भाग घेतला, मीठ सत्याग्रहात भाग घेतला, मुंबईतील जातीय दंगलीत हिंदु–मुस्लिम ऐक्याचे काम केले. त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग वाढत गेला. म.गांधीच्या अहिंसा व्रताचे त्यांनी तंतोतंत पालन केले.

सशस्त्र क्रांतिकारकांच्या काळात बाबू गेनूंचे 'अहिंसक अग्निदिव्य' एखादा दिवा विझावा – तसे विझून गेले.'[२०]

### ६.२.३.३ एक बहुजन नेतृत्व : यशवंतराव

डॉ. बाबा आढाव यांनी यशवंतराव चव्हाण यांना हमाल पंचायतीच्या वतीने पुण्याच्या 'विशाल सह्याद्री' या दैनिकाच्या कार्यालयासमोर अडविले होते. यशवंतरावांच्या उरूळी कांचन येथील जमिनीवर सत्याग्रह केला. त्यानंतर धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी जुन्नर येथील कुकडी धरणाच्या कोनशीला समारंभ यशवंतरावाच्या हस्ते होणार होता तो डॉ. बाबा आढावांनी उधळून लावला होता.

डॉ. बाबा आढाव यशवंतरावाबद्दल लिहितात, 'सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळीनंतर महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारणात यशवंतरावांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यशवंतराव म्हणजे 'माणुसकीत भिजून निघालेले एक अभिजात व्यक्तिमत्त्व' यशवंतरावांनी महाराष्ट्राचे बहुजन समाजाचे नेतृत्व मोठ्या कौशल्याने केले.'[२१]

यशवंतराव चव्हाण यांचा 'प्रति शिवाजी' म्हणून उल्लेख होतो. यशवंतराव संरक्षणमंत्री झाले त्यावेळी 'महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला' असं वर्णन झालं होतं. पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर झालेल्या निरोपाच्या सभेच्या वेळचे भाषण ऐकल्याचे स्वतः डॉ. बाबा आढावांनी लिहिले आहे.

### ६.२.२.४ एक तेजोरेखा लुप्त झाली

समाजसेविका व चळवळीतील अग्रणी डॉ. अनिता अवचट यांच्याबद्दल डॉ. बाबा आढाव लिहितात, डॉ. अनिल अवचट यांच्या पत्नी डॉ.अनिता अवचट यांचे कॅन्सरच्या आजाराने निधन झाले. आढावांच्या साक्षीने डॉ. अनिल अवचट व डॉ. सुनंदा सोहोनी यांचे लग्न भाऊसाहेब नातूंच्या वाड्यात झाले. तेंव्हा ते दोघेही युक्रांदमध्ये काम करत होते. शेतकी महाविद्यालयातील मुलांचा लढा सुरू होता. हमाल पंचायतीला दवाखाना सुरू करायचा होता. सुनंदा अवचट यांना चळवळीपेक्षा दवाखान्यात जास्त रस होता. प्रा. व. द. देशपांडे यांच्या सल्ल्याने दवाखान्याला सुरूवात झाली. आढावांची आई सुनंदा अवचटही आपली मानलेली मुलगी मानत असे. दोघीही 'कष्टकरी भाकर' केंद्रात जात. तेथील काही महिलांच्या अंगात

येई. विटाळ पाळला जाई. डॉ.सुनंदा अवचटांनी या अंधश्रद्धा दूर केल्या. ससून हॉस्पीटलमधील समाज अधिकारी श्रीमती मंदाकिनी द्रवीड यांच्या सहकार्याने महिलामध्ये जागृती केली. त्यामुळे देवदेव, जत्रा कमी झाल्या, निरनिराळ्या आजारांची माहिती मिळत गेली. महिलाचे बाजूला बसणे बंद झाले. हमाल पंचायतीच्या दवाखान्यात जात असतानाच, येरवड्याच्या मेंटल हॉस्पीटलमध्ये मनोविकार रूग्ण सहाय्य म्हणून नोकरी सुरू केली. पुढे दोघांनी व्यसनमुक्तीचे काम सुरू केले. ''मुक्तांगण' संस्था सुरू असतानाच डॉ. अनिता म्हणजेच पूर्वाश्रमीची डॉ. सुनंदा हीचे अकाली जाण्याने आढावांना जिव्हारी लागले.'[२२]

### ६.२.२.५ भाई वैद्य यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त

भाई वैद्य आणि डॉ. बाबा आढाव यांची १९४३ सालापासून शिवाजी मराठा हायस्कूल मधील सुरू झालेली मैत्री आजपर्यंत टिकून आहे. डॉ. बाबा आढाव भाई वैद्य यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त लिहितात,

'भाई वैद्य व आढाव यांची ७० वर्षांची दोस्ती आहे.'[२३] समाजवादी चळवळीतील हे वाटसरू. अजून वाट संपलेली नाही. पाय थांबत नाहीत. लोकशाही समाजवादाशिवाय दुनियेला पर्याय नाही. समाजवादाची पहाट नक्कीच उगवेल. भाई व बाबा हे एकाच शाळेत शिकले. एखाद्या वर्षाच्या अंतराने. भाई दोन वर्षांनी वडील शिक्षणात एका इयत्तेने पुढे या दोघांचा शालेय काल १९४० ते १९४७ चा. हा काळ जागतिक महायुद्धाचा, म.गांधीच्या चलेजाव आंदोलनाचा, स्वातंत्र्याच्या आगमनाचा. शिवाजी मराठा हायस्कूलात शिक्षण सुरू होते. परंतु या दोघांनाही घडवले राष्ट्र सेवा दलाने. राष्ट्रसेवा दलाची स्थापना १९४० साली झालेली. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा' हे ध्वजगीत होते. 'एक दो– एक दो' म्हणत सलामी व्हायची. भाई प्रथमपासून प्रौढ वृत्तीचा. तो शाळेतच देशभक्त बनलेला. मॅट्रिकनंतर शैक्षणिक वाटा बदलल्या. भाई कला शाखेकडे तर बाबा विज्ञान शाखेकडे वळले. भाई एम.ए.बी.एड. झाले तर बाबांनी रसायन शास्त्राची पदवी व आयुर्वेदाची पद्विका मिळविली. भाई शिक्षक तर बाबा डॉक्टर झाले. १९५४–५५ सालात भाईंनी सेनापती बापटांच्या तुकडीत गोवा मुक्ती आंदोलनात भाग घेतला. मांतेरोने केलेल्या मारहाणीत डाव्या हाताची दोन्ही हाडे मोडली.

नंतर ती नीट जुळली नाहीत. १५ ऑगस्ट १९५५ ला पुनःश्च कणकुंबीच्या तुकडीत बाबांच्या मदतीला आले.

१९५६ ला पुण्यात हमाल पंचायतीच्या एका आंदोलनात भाईंनी एका गाडीपुढे आडवे पडून सत्याग्रह केला. शंभर हमालांना घेऊन भाई येरवडा कारागृहात गेले.

१९५७ ला संयुक्त महाराष्ट्राचा ऐतिहासिक लढा सुरू झाला. भाई सर्व वेळ सेवक बनले. १९६१ साली पुण्यात पानशेत प्रलय झाला. पुनर्वसनाच्या प्रश्नांत भाईंनी लक्ष घातले. १९६२ साली भाई व बाबा पुणे महानगरपालिकेवर सदस्य म्हणून निवडून आले. १९६२ ते १९६७ व १९६७ ते १९७१ या दोन्ही वेळेस दोघेही महानगरपालिकेत नगरसेवक होते.

१९७० साली भाईंच्या घरातच मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. भाई राजकारणात असले तरी त्यांना समाजकारण अभिप्रेत होते. १९७४–७५ साली भाई वैद्य पुण्याचे महापौर झाले. महापौर असतानाच त्यांना मिसाखाली तुरूंगात जावे लागले. दोन–तीन महिन्यानंतर बाबांना अटक झाली.

भाई आमदार झाले. नामदार झाले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा याच काळात पेटला. पुढे भाईंनी समाजवादी जनपरिषदेची स्थापना केली. अजूनही भाईंचे काम सुरूच आहे.

### ६.२.२.९ डॉ. वीणा सुराणा – नाबाद ७१ पूर्ण

पन्नालाल सुराणांच्या सहचारिणी डॉ. वीणा सुराणा या व डॉ. बाबा आढाव पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे विद्यार्थी १९४९–१९५० ते ५४ या काळात शिक्षणक्रम पूर्ण झाला. दोघांनाही आयुर्वेदाची पदविका मिळाली. महाविद्यालयातील काळात राष्ट्रसेवा दलाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने यांनी महाविद्यालय गाजवले. पुण्याच्या झोपडी संघाच्या सहाय्याने रात्रीचे शेकोटीचे कार्यक्रम झाले. त्या काळातील वाद–विवाद, सभा विलक्षण गाजवल्या.

पदविका मिळाल्यानंतर वीणा व पन्नालाल सुराणा विवाहबद्ध झाले बार्शीत दवाखाना सुरू झाला. काही वर्षांनी 'प्रसन्न प्रसूतिगृह' सुरू केले. ३५–४० वर्षे प्रॅक्टीस केली. पंरतू त्याचबरोबर अनेक रचनात्मक कामांची सुरूवात केली.

'बार्शीला असलेल्या हमाल पंचायतीच्या कामात यांनी भरपूर वेळ दिला. हमाल कुटुंबाच्या प्रश्नात लक्ष घातले. हमाल मजूर सहकारी संस्थेच्या कामात काटेकोर हिशोबाचा सतत आग्रह धरला. सावित्रीबाई फुले महिला औद्योगिक सहकारी संस्थेची स्थापना करून महिलांना पापड, कुरड्या आदी 'वाळवण माल' तयार करून त्या मालाला बाजारपेठ मिळवून दिली. महिला उत्कर्ष प्रतिष्ठानच्या वतीने विधवा, परित्यक्ता, निराधार, महिला व मुलींसाठी वसतिगृह सुरू केले. वसतिगृहे व औद्योगिक केंद्रामुळे महिलांना स्वपायावर उभे राहता येऊ लागले. खेड्यापाड्यातून कामे सुरू केली. शिराळ्याला सामुदायिक शेती सोसायटीची स्थापना करून १३ भूमिहीन कुटुंबांना ५२ एकर जमीन कसण्यासाठी मिळवून दिली. समाजवादी महिला सभेच्या कामातही रस घेतला.'[२४]

### ६.२.२.७ सदाबहार नानासाहेब

नानासाहेब गोरे हे समाजवादी नेते होते. ते पुण्याचे महापौर होते. नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, गुरूवर्य बाबुराव जगताप, नानासाहेब परूळेकर, भाई वैद्य यांनी मिळून पुणे शहराचा विकास केला आहे. शहरातील झोपडपट्टीवाले, फेरीवाले, शहरातील विषम पाणी पुरवठा, पूर्वभागाची होणारी हेळसांड, प्राथमिक शिक्षण व्यवस्थेची होणारी आबाळ या अशा कितीतरी प्रश्नावर नानासाहेबांनी काम केले. डॉ. बाबा आढाव त्यांच्या बद्दलचा अनुभव सांगताना लिहितात.

आम्ही पुण्यातील फेरीवाल्यांचा मोर्चा महापालिकेत घुसवला होता. पुणे महापालिकेचे तत्कालिन आयुक्त भुजंगराव कुलकर्णी यांना आम्ही 'घेराओ' घातला. महापौर नानासाहेबांना आमची कृती आवडली नाही. त्याच दिवशी सायंकाळी पुणे महापालिकेच्या सभागृहात आमच्याविरूद्ध, निषेधाची तहकुबी काँग्रेस पक्षाने आणली. आम्ही या संधीचा फायदा घेऊन फेरीवाल्यांवर होणाऱ्या अन्यायाचा पाढा सभागृहापुढे मांडला 'जप्त करून आणलेल्या सफरचंदासारख्या फळांचा लिलाव अधिकारी एक नया पैशात कसा करतात' हे सप्रमाण दाखवले. तहबुकी मंजूर झाली, परंतु सभागृहाबाहेर पडताना नानासाहेब म्हणाले, 'अरे, याची मला कल्पना नव्हती.'[२५]

### ६.२.२.८ बाबूमियाँ बँडवाले

हमीद दलवाईंच्या बरोबरीने ज्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य आजीवन केले ते म्हणजे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक बाबूमियाँ बँडवाले होय. बाबूमियांविषयी बाबा आढाव लिहितात.

'मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष व वयोवृद्ध स्वातंत्र्यसैनिक बाबूमियाँ बँडवाले यांचे नुकतेच निधन झाले. श्रीगोंदा परिसरात बाबूमियाँचा बँड प्रसिद्ध आहे. व्यवसायाने वादक असलेले बाबूमियाँ सत्यशोधक होते. हमीद दलवाईंनी १९९० साली मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली, तेंव्हापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत बाबूमियाँनी मंडळाची साथ केली. प्रत्येक संघर्षात ते आघाडीवर राहिले. पांढऱ्या शुभ्र खादीचे कपडे, डोक्यावर गांधी टोपी, धोतर, नेहरू सदऱ्यावर जाकीट असा त्यांचा पेहराव असे, श्रीगोंद्याला हमाल पंचायत स्थापन झाली. मिरवणूकीत बाबूमियाँ सामील झाले. पुढे त्यांचे बँडपथक होते. मुक्तीमोर्चावर जागोजाग दगडफेक झाली. बाबूमियाँ मागे हटले नाहीत. श्रीगोंद्याच्या मशिदीचे विश्वस्त होते. काही वर्षांपूर्वी पुण्याच्या ताहेरभाई पुनावाला यांना हमीद दलवाई पुरस्कार देण्याचा समारंभ श्रीगोंद्यात पार पडला. सनातन्यांनी या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला होता. बाबूमियाँच्यामुळे ते गडबड करू शकले नाहीत. सामाजिक कृतज्ञता निधीचा खास पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले होते. सूर आणि संघर्ष यांची बंदिशी म्हणजे बाबूमियाँ! बाबूमियाँच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!'[२६]

### ६.२.३ जाती अंतांच्या लढाईसाठी बाबांची लढाई

डॉ. बाबा आढाव यांनी विषमतेला नाकारून समतेवर आधारीत समतावादी समाज रचने स्वप्न पाहिले होते. त्यांच्यावर शालेय जीवनापासून महात्मा फुले यांच्या कार्याचा व विचारांचा मोठा प्रभाव होता. प्रस्थापित व्यवस्थेला छेद देऊन स्त्री दास्य, शुद्रातिशद्र यामध्ये भेद न करता समाज रचना अस्तित्वात यावी यासाठी आढावांची असणारी तळमळ मोठी होती. त्यांच्या या विचारधारेचा प्रभाव त्यांच्या लेखनात प्रतिबिंबित होणे हे अभिप्रेत होते. त्याच विचारधारेतून पुरोगामी सत्यशोधक मधून फासेपारधी (१९७७), ठाकर (१९८७),

बोहरा (१९७७), नंदीवाले (१९७७), चांभार (१९७७), टकारी (१९८५), मुस्लीम (१९८५), मेहतर (१९७७), उत्तर भारती भटका, तेली (२०११), मराठा समाज (१९९९) इत्यादी जातींवर लेखन केले आहे.

### ६.२.४ पुरोगामी सत्यशोधक मधील डॉ. बाबा आढावाचे इतर लेखन

डॉ. बाबा आढाव यांनी शिक्षण, आरोग्य, राजकारण या व्यतीरिक्त देखील कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांवरती लेखन केलेले आहे. त्यांनी घेतलेल्या परिषदांचा आढावा त्यांच्या लेखनामधून घेतलेला आहे या परिषदांच्या अहवाल लेखनामधून त्यांची कामगारांच्या प्रती असणारी भूमिका स्पष्ट होते. त्यांनी कामगारांचे अनेक प्रश्न समाजासमोर व शासनासमोर मांडलेले आहे. यातून कामगारांना निर्भिड, निर्भय व संघर्षशील बनवण्याचा प्रयत्न लेखनातून दिसून येतो.

#### ६.२.४.१ पेन्शन मागणी परिषद

अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समितीने सार्वजनिक पेन्शनची मागणी करून जागोजागी पेन्शन मागणी परिषदा संघटित करण्याची मोहीम सुरू केली आहे. नुकताच आम्ही मराठवाड्याचा दौरा केला. पश्चिम महाराष्ट्रातही काही ठिकाणी सभा झाल्या.

‘अशा परिषदांतून आम्ही धार्मिक संपत्ती देशासाठी वापरण्याची मागणी करीत आहोत. धार्मिक संस्थांकडे अगणित संपत्ती आहे. ती केवळ पडून आहे. हजारो टन सोने आहे. सोन्याची आयात करण्यात आपल्या देशाला डॉलर घालवावे लागताहेत. शासनाने निर्धारपूर्वक ही संपत्ती उपयोगात आणावी. फारतर त्यासाठी अशा संस्थांना रीतसर व्याज द्यावे. किमान परकीय कर्जाची फेड केली तरी देशातील अनेक योजना कार्यान्वित होऊ शकतील.’[२७]

‘अर्थपूर्ण’ या नियतकालिकाचे संपादक श्री.यमाजी मालकर यांनी या मोहिमेला प्रतिसाद दिला आहे. एक गाव एक पाणवठा, एक मत समान पत मोहिमेनंतर पेन्शन परिषदांच्या उपक्रमालाही वाढता प्रतिसाद मिळत आहे.

पेन्शन परिषदेच्या वतीने दिल्लीच्या जंतरमंतरवर सातत्याने निदर्शने होत आहेत. मंत्री, खासदारांना निदर्शक विचारताहेत, ‘तुमच्या पेन्शनची सोय झाली; आमचे काय?’

सत्यशोधक–सत्याग्रही–समाजवादी चळवळ पुढे नेण्याचे सामुहिक प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी शोषण व विषमतेविरूद्ध सतत संघर्षाची भूमिका रेटावी लागते. ही लढाई अत्यंत जीवघेणी असते, ती सरळ नसते. नैतिक मूल्यांचे बळ खचणार नाही याची काळजी व पथ्य सांभाळावे लागते. 'साधन सुचिता' जपावी लागते. शिवाय ही सारी खटपट पारदर्शक ठेवावी लागते.

### ६.२.४.२ दारिद्र्याचे आकलन की आकलनाचे दारिद्र्य?

१९ मार्च २०१२ रोजी केंद्रिय नियोजन मंडळाने भारतातील दारिद्र्यरेषा व दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या लोकसंख्येच्या संदर्भात एक परिपत्रक जाहीर करून असे म्हटले आहे की २००४–२००५ ते २००९–२०१० या काळात दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्यांची संख्या ७.३ टक्क्यांनी कमी झाली आहे. म्हणजेच दुसऱ्या भाषेत सरकारला असे म्हणायचे आहे की जागतिकीकरण व भांडवलशाहीच्या धोरणाचे हे यश आहे! जागतिकीकरणाला विरोध करणे ही अडाणीपणाची भूमिका आहे.

तक्ता नं.६.१ मध्ये दारिद्र्य रेषेखालील जनतेची टक्केवारी दाखवली आहे.

**तक्ता क्र.६.१**

| दारिद्र्य रेषेखालील जनता | | | टक्के |
|---|---|---|---|
| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकूण (टक्के) |
| २००४–०५ | ४२ | २५.७ | ३७.२ |
| २००९–१० | ३३ | २०.९ | २९.८ |

(स्त्रोत – पुरोगामी सत्यशोधक, जानेवारी २०१२)

ऑक्टोंबर २०११ रोजी भारत सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते व त्यात सरकारने असे म्हटले होते की, 'जो माणूस शहरात दररोज रू.३२ व खेड्यात रू.२६ पेक्षा कमी उपभोग खर्च करतो ती व्यक्ती गरीब समजावी.' २००९–२०१० रोजी प्रा. सुरेश तेंडुलकर समितीच्या हिशोबप्रमाणे ज्यांचा दरडोई दररोजचा उपभोग खर्च शहरात रू.२८.३५ व ग्रामीण भागात रू.२२.४२ पेक्षा कमी आहे त्यांना गरीब समजले गेले आहे.

प्रा. तेंडुलकर समितीच्या हिशोबाप्रमाणे भारतात दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्यांची संख्या तक्ता क्र.६.२ मध्ये दाखवली आहे.

**तक्ता क्र.६.२**

| **भारतातील गरिबांची संख्या** | | | **कोटी** |
|---|---|---|---|
| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकूण (कोटी) |
| २००४–०५ | २२.५८ | ८.१४ | ४०.७२ |
| २००९–१० | २७.८२ | ७.६८ | ३५.४६ |

(स्त्रोत – पुरोगामी सत्यशोधक, त्रैमासिक, जानेवारी २०१२)

याचा अर्थ असा की गेल्या पाच वर्षांत पाच कोटी जनता दारिद्र्य रेषेच्यावर सरकून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे! २००९–१० चा पाया धरून दरडोई दरमहा खर्च दारिद्र्य रेषेच्यावर जगण्यासाठी शहरात रू.८५९.६० व ग्रामीण भागात रू.६७२.८० असणे जरूर आहे. म्हणजेच पाच जणांच्या कुटुंबाचा उपभोग खर्च दरमहा ग्रामीण भागात रू.३,३६४ व शहरात रू.४,२९० असेल तर ते कुटुंब दारिद्र्य रेषेच्या वर समजले जाईल.

तक्ता क्र.६.३ मध्ये सामजिक वर्गीकरणानुसार गरिबीचे प्रमाण दाखवले आहे.

**तक्ता क्र.६.३**

**दारिद्र्य रेषेखालील जनता (टक्केवारी)**

| सामाजिक घटक | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| अनूसूचित जमाती | ४७.८ | ३०.४ |
| अनूसूचित जाती | ४२.३ | ३४.१ |
| इतर मागासवर्गीय | ३१.९ | २४.३ |
| सर्व वर्ग | ३३.८ | २०.९ |

(स्त्रोत – पुरोगामी सत्यशोधक, त्रैमासिक, जानेवारी २०१२)

'धार्मिक गटांमध्ये, मुस्लिम समाजात शहरात दारिद्र्याचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ३३.९% आहे तर ख्रिश्चन समाजात दारिद्र्याचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १२.९% आहे. ग्रामीण भागात शीख समाजात दारिद्र्याचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ११.९% आहे.'[२८]

### ६.२.४.३ स्त्री–शुद्रातिशुद्राच्या आघाडीवर

बाईचा नवरा मेला म्हणून कुंकू पुसायचे, बांगड्या फोडायच्या, मंगळसत्रू तोडायचे, अगदी निर्दयपणे हे कर्मकांड उरकले जाते. ब्राह्मणवर्गाने हे सर्व सोडून दिले आहे. बहुजन मात्र कवटाळून बसले आहेत. 'तोरणाला अन् सरणाला हजेरी' हे जातीचे बंधन लोक श्रद्धेने पाळतात. पुण्यातील शिवप्रेमी मंडळींनी यावेळी १० मार्चला एक कृती कार्यक्रम जाहीरपणे केला.

नवरा मेला – कुंकू पुसणार नाही

नवरा मेला – बांगड्या फोडणार नाही

नवरा मेला – मंगळसूत्र तोडू देणार नाही

'८ मार्च जागतिक महिला दिनाच्या दिवशी बहुजन महिलांनी दोन–तीन ठिकाणी निदर्शने केली. वृत्तपत्रांनी दखल घेतली नाही. का तर म्हणे 'महिला दिनाच्या दिवशी हे अशुभ कशाला?' अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याला याच मनोवृत्तीतून विरोध होत आहे. शिवप्रेमी मंडळी व सर्व बहुजनांनी सनातन्यांनी दिलेल्या या आव्हानाचा रस्त्यावर उभे राहून मुकाबला केला पाहिजे. त्याची सुरूवात झाली आहे. आम्ही या घटनेचे स्वागत करतो. याच काळात एक प्रकार घडला. कँप भागातील एका बहुजन महिला संस्थेने हळदीकुंकवाचा समारंभ आयोजित केला होता. तळटीप होती, 'हळदीकुंकू समारंभाच्या निमित्ताने दिले जाणारे वाण फक्त सवाष्ण महिलांनाच दिले जाईल!' यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही!'[२९]

## ६.३ हमाल मापाडी वार्ता

हमाल मापाडी वार्ता नियतकालिक डॉ बाबा आढावांनी सुरू केले. या नियतकालिकामध्ये हमालांशी संबंधित अनेक लेख आलेले आहेत. यामधील त्यांचे लेख हे नैमित्तिक स्वरूपाचे आहेत, हमालांचा उत्कर्ष व्हावा, हमालांचे प्रश्न सुटावेत, हमालांना शासनाने सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ही या लेखांची वैशिष्ट्ये आहेत. या लेखांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

### ६.३.१ महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या अधिवेशनाच्या निमित्ताने

महाराष्ट्र राज्य हमाल महामंडळाचे १६ वे द्वैवार्षिक अधिवेशन एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भरले होते. केंद्रिय मजूरमंत्री श्री. साहिब सिंग वर्मा यांची नुकतीच दूरदर्शनवर मुलाखत झाली. श्रम आयोगाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारावर देशातील असुरक्षित असंघटित–अंगमेहनती–हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांना 'कायद्याचे छत्र' मिळवून देण्यासाठी लोकसभेत नवे कामगार विधेयक सादर केले जाणार आहे. श्रम आयोगाने सादर केलेल्या अहवाल व सूचनावर उलट सुलट चर्चा सुरू आहे. या आयोगाने संघटित क्षेत्रातील कामगारांचे बहुसंख्य कायदेशीर अधिकार काढून घेण्याच्या, पातळ करण्याच्या सूचना केल्या आहेत. 'हायर ॲण्ड फायर' चे मुक्त अधिकार मालकवर्गाला मिळावेत अशी आशयाची आयोगाची सूचना आहे. जागतिकिकरण, खाजगीकरणाच्या वाटेचा तो परिणाम आहे. एकूण कामगार–कष्टकऱ्यांच्या संख्येत संघटित क्षेत्राचे प्रमाण फक्त ७% उरले आहे. दिवसेंदिवस ते खाली घसरत चालले आहे. संघटित क्षेत्रांतील कामगारांचे हक्क हिरावून घेत असतानाच आयोगाने ९३% असुरक्षित क्षेत्रासाठी 'कायद्याचे छत्र' बहाल करण्याचा इरादा जाहीर केला आहे. हे मधाचे बोट आहे की आपले सरकार कामगार विरोधी नाही असे दाखवण्यासाठी चेहऱ्याची रंगरंगोटी आहे?.... यावर खल माजेल आमच्या मते या निमित्ताने कां होईना लोकसभेत प्रथमतःच असंघटित असुरक्षित कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फुटेल.

केंद्रीय श्रम आयोगापुढे महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या वतीने आढावांनी साक्ष दिली. निवेदने सादर केली. मागण्या केल्या. आयोगाच्या पूर्ण पीठासमोर चर्चा केली. आयोगाने विविध उपसमित्या तयार केल्या होत्या. त्यातील एका समितीत आढावांचे नाव होते. ''बैठकांना गैरहजेरी परंतू कामकाजाला मदत.'' असे धोरण आम्ही अवलंबिले. आयोगाच्या समग्र अहवालात त्याची नोंद आहे.

महाराष्ट्र राज्यातील माथाडी हमाल कामगार कायद्याच्या धर्तीवर देशातील तमाम शहरी–ग्रामीण, स्त्री–पुरूष कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देता येईल असे प्रतिपादन करताना आम्ही येथले अनुभव पेश केले. आयोगाने पुण्याला खास भेट दिली. माथाडी हमाल मंडळ, शेतीमालबाजार समिती, व्यापारी संस्था, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना इ. बरोबर खुलेआम चर्चा केली. महाराष्ट्र राज्यातील हमाल मापाडी व यार्डातील स्त्री–कामगारांना

भविष्य निर्वाहनिधी, सामुदायिक विमा, वार्षिक बोनस, ग्रॅच्युइटी, नुकसान भरपाई, आरोग्य सुविधा–उपलब्ध झालेल्या आहेत. हा वर्ग आता पेन्शनची मागणी करीत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या तिजोरीवर भार न येता सर्व कष्टकऱ्यांना सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देता येते. लोकसभेत नवे विधेयक मांडले जाईल व त्यावर चर्चा होईल. अशावेळी महाराष्ट्रातील खासदारांनी सजगपणे चर्चेत भाग घ्यावा यासाठी या अधिवेशनाला खासदार शरद पवार यांनी उपस्थित राहावे असा आढावानी प्रयत्न केला त्यांनी निमंत्रण स्वीकारले निश्चिती नंतर कळवावे असे सांगितले. पवारांप्रमाणेच इतर खासदारांना भेटण्याचा आढावाचा प्रयत्न सुरू आहे. शरद पवार हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. लोकसभेचे विद्यमान सभापती मनोहर जोशीही मुख्यमंत्री होते. हे उभयता लोकसभेतील चर्चेला विधायक वळण लावतील अशी अपेक्षा आढाव बाळगून आहोत. यानिमित्ताने महाराष्ट्रातील माथाडी–हमाल कामगार कायद्याची माहिती सर्व देशात पसरेल. असंघटितांच्या संघटन कार्याला यातून चालना मिळेल अशी उमेद आम्ही बाळगून आहोत.

देशातील मालकवर्गाचे प्रतिनिधी, कायद्याच्या छत्राऐवजी कंत्राटी कायद्याची भलावण करीत आहेत. एका बाजूचे चीनचे उदाहरण देणारी ही मंडळी त्या देशातील कामगार कष्टकऱ्यांना मिळणाऱ्या सामाजिक संरक्षणाकडे कानाडोळा करतात. त्यांना येथे गुलामांचे बाजार व वेठबिगारी निर्माण व्हावेसे वाटतात. की काय अशी आम्हाला साधार भिती वाटते. देशात शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. शहरात आलेल्या कष्टकऱ्यांची स्थिती किती भयावह आहे हे बांधकाम, खाण, वीट कामगारांच्या स्थितीवरून सहज लक्षात येते.

महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाची जबाबदारी यावेळी वाढलेली आहे. स्थानिक पातळीवर, राज्यपातळीवर संघटित व्हावेच लागेल. परंतु आता ते काम हमाल मापाड्यांपुरते मर्यादित ठेवून भागणार नाही. इतर क्षेत्राला जाणिवपूर्वक संबंध निर्माण केले पाहिजे. इतर राज्यात ही चळवळ नेली पाहिजे.

स्त्री कष्टकरी परिषदांची २००० साली लातूरला सुरूवात झाली. आजच्या घटकेला अंगमेहनती कष्टकरी स्त्रीला पुरूषाच्या निम्मेच वेतन मिळते. 'समान काम समान दाम' ही घोषणा कागदावरच उरते. मेहनतीच्या क्षेत्रात कष्टकरी 'स्त्री दुबळी पडते असा सर्व साधारण

पक्का समज असतो. स्त्री वादी महिला वर्ग हा समज किती निराधार आहे हे पटवून देण्यात उणा पडतो. किंबहुना शहरी मध्यवर्गीय स्त्री कार्यकर्त्यांना हा विषय महत्त्वाचा वाटत नाही.' आढावांच्या मते व पाहणीनुसार 'स्त्री' पुरूषापेक्षा अधिक काम करते. कामांतील सातत्य व बारकावा स्त्रिला सांभाळावा लागतो. 'बाईच्या हाताला खिनभर दम नसतो' असे म्हटले जाते त्यात निश्चित तथ्य आहे. स्त्रिचे सांपत्तिक हक्क मर्यादित आहे. घरासाठी ७/१२ च्या उताऱ्यावर नांव असणारी सरकारी जमीन मिळावी अशी एक मागणी त्यासाठींच केली जात आहे.

माथाडी हमाल कामगार कायदा व मंडळे, शेती माल बाजार समिती कायदा व समित्यांच्या कारभाराबद्दल हमाल मापाडी स्त्री कष्टकऱ्यांची खूप नाराजी आहे. त्यासाठींच राज्याचे कामगार मंत्री नामदार सतीश चतुर्वेदी व कामगार राज्यमंत्री डॉ. हेमंत देशमुख, पणन मंत्री नामदार हर्षवर्धन पाटील, राज्याचे कामगार सचिव, पणन संचालक इ. ना अधिवेशनाची निमंत्रणे आग्रहपूर्वक दिलेली आहेत. राज्याचे कामगार सचिव कॅप्टन अशोक खोतांनीही सामुदायिक विमा व पेन्शन योजनेचे सुतोवाच केले आहे. शेती माल बाजार समिती कायद्यात दुरूस्त्या करणारे विधेयक विधान सभेच्या पटलावर आहे. महामंडळाने आपले निवेदने सादर केले आहे. चर्चा सत्रात भाग घेतला नाही. मागण्यांच्या पूर्ततेसाठी जागोजागी मोर्चे काढले आहेत. धरणे, उपोषण केले आहे. २० मार्च २००२ रोजी आझाद मैदान दुमदुमुन टाकले आहे. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी जवळगावकर मंडळी सज्ज झालेली आहेत. त्यांनी केलेल्या स्वागताचा स्वीकार करून आपण भारतातील सर्व स्त्री पुरूष कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार एकजुटीने करूया ''हम सब एक है, भारत माता की जय.''

### ६.३.२ हमाल मापाडीचे पुणे अधिवेशन

भारतातील कामगार चळवळीला एक नवा आयाम प्राप्त झाला आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार व सरकारी निमसरकारी, सहकारी क्षेत्रातील कर्मचारी, बाबू यांच्यापुरतेच तिचे क्षेत्र मानले जात होते. असंघटित-असुरक्षित कष्टकऱ्यांच्या चळवळीने हे जुने गृहीत मोडीत काढले आहे. 'कामगार' शब्दाची व्याख्याच बदलली आहे. ज्याला कष्ट करून जगावे लागते, ज्याचे पोट हाता-पायावर आहे, तो कष्टकरी. ही नवी व्याख्या प्रचलित झाली आहे.

डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते हा प्रत्येक कष्टकरी ‘कसबी’ आहे. परंपरागत कसबी, निमकसबी, बिनकसबी या संज्ञा त्यांनी नाकारल्या. १९९१ सालापासून देशात मुक्त अर्थव्यवस्था सुरू झाली. भारतीय घटनेने लोकशाही समाजवादाचा सरनाम्यात स्वीकार केलेला असतानाही भांडवलशाहीला मान्यता दिली गेली. त्याचबरोबर कल्याणकारी राज्याचा आभास निर्माण करण्यासाठी ‘छत्री कायदा’, ‘सामाजिक सुरक्षा कायदा’ असे नवे पर्याय पुढे आले. त्यासाठी वापरण्यात आलेली भाषा To radicalize the present Labour Laws and offer an umbrella type legislation to the unorganized ही छत्री उघडलीच गेली नाही. मात्र या निमित्ताने असंघटितांचे अंधारातील जग उजेडात आले. सध्याच्या सरकारने ‘छत्री कायदा’ हा शब्दप्रयोग नाकारला व ‘सामाजिक सुरक्षा कायदा’ हे नवे नाव सुचविले. खासदार रविंद्र वर्मा आयोगाने असंघटीत कामगारांच्या १०५ रोजगारांची यादी प्रसिद्ध केली आणि एकूण लोकसंख्येतील प्रमाण ३८% असल्याचे उजेडात आणले.

डॉ. अर्जुन सेनगुप्ता आयोगाने त्याचबरोबर देशाची ७७% लोकसंख्या दरडोई दररोज २० रूपयेही खर्च करू शकत नाही हे ढळढळीत सत्य लोकसभेत मांडले. तेंडुलकर कमिशनने हा आकडा ३८% मांडला. योजना आयोगाचे उपाध्यक्ष माँटेकसिंगांनी ३३% असल्याचे मान्य केले आहे. आकडेवारीचा हा खेळ तसा जीवघेणा आहे. देशात निर्माण होणाऱ्या एकूण संपतीचा आकडे ‘जीडीपी’ अशा शब्द वापरून जाहीर केला जातो. ‘जीडीपी’ वाढतोय असा सरकारी दावा आहे. २ ऑक्टोबर २०११ रोजी पंतप्रधानांच्या उपस्थितीत टाईम्स ऑफ इंडियाने आम्हाला दिलेल्या पुरस्काराच्या समारंभात आम्ही ‘जीडीपी’चा ‘गरीब दलित पीडित’ असा उल्लेख केला. हे वास्तव आजही कायम आहे. कष्टकऱ्यांच्या वाट्याला जीवनाश्यक वस्तूंची जीवघेणी महागाई, बेकारी, भीषण शोषण, क्रुरता आलेली आहे. जिरायती शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शहरीकणाचा वेग तुफानी आहे. देशातील ४५ कोटी कष्टकऱ्यात ४३ कोटी असुरक्षित, असंघटित आहेत. शेतमजूरांची संख्या सर्वाधिक आहे. तसेच महिलांचे प्रमाणही मोठे आहे. बांधकाम मजूर, खाण कामगार, मच्छिमार असे नंबर लागतात. बालमजूर, अपंग कामगार आहेतच. परंपरागत सामजिक जातीय मागासपण आहेतच. महिला कष्टकऱ्यांनी ‘समान काम समान दामचा’ नारा दिला आहे. आता ५०%

आरक्षणामुळे महिलांना शासन दरबारी प्रमाण वाढले आहे. चळवळीचे नेतृत्व महिला कष्टकऱ्यांच्या हाती येत आहे. वृद्ध महिलांची पेन्शनची मागणी सरकारचा पिच्छा पुरवित आहे. वृद्ध पुरूष–कष्टकरीही याबाबतीत मागे नाहीत. आर्थिक क्षेत्रात अमेरिकेची नक्कल करणारे सरकार सामाजिक सुरक्षा कायदा मान्य करूनही अंमलात का आणीत नाही? सरकारजवळ पैसा नाही मात्र श्रीमंतांना परकीय भांडवलदारांना सवलती देण्याची खैरात सुरू आहे. स्वीस बँकेत काळा पैसा आहे. धार्मिक संस्थांजवळ तर अफाट सोने–नाणे व पैसा आहे. त्याचा वापर का नाही करायचा? भांडवलदार तो पैसा वापरतात. सरकार का नाही वापरत?

'असंघटित देशपातळीवर संघटित होवून संघर्ष करावा लागेल त्यासाठी निष्ठावान कार्यकर्त्यांचे बळ व जाळे आवश्यक आहे. प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल. हर जोर जुल्म में टक्कर में संघर्ष हमारा नारा है। परिवर्तनवादी राजकारणाला असंघटितांची उपेक्षा करून पुढे जाता येणार नाही. ही उपेक्षा थांबली तरच समाजवादी क्रांतीचे आघाड्यांच्या राजकारणात रूतलेले चाक रस्त्यावर येईल.'[३०]

### ६.३.३ माथाडी कायद्याची वाटचाल

माथाडी, हमाल व इतर अंगमेहनती सुरक्षित कामगार कायदा १९६९ साली अस्तित्वात आला. या कायद्याच्या पुस्तकावर तशी नोंद आहे. भारतात अशा प्रकारचा कामगार कायदा महाराष्ट्र सोडून अन्य राज्यात तो पावेतो झालेला नव्हता ती वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र राज्यात हे घटित कसे घडले याचा इतिहास पडताळून पाहणे अग्रस्थानी ठरणार नाही.

मुंबईत गोदीमध्ये बोटीतून पोती बाहेर काढण्याचे व बोटीवर पोती रचण्याचे काम करणाऱ्या हमालांना 'माथाडी' म्हणतात. हा शब्द कसा निर्माण झाला असावा याबाबत एक तर्क करता येतो. साधारणतः मुंबईबाहेर विशेषतः गोदीच्या बाहेर भरलेले पोते पाठीवर घेतले जाते. गोदीत पोते खांद्यावर घेऊन माथ्याच्या आधाराने पेलले जाते. त्यामुळे 'माथाडी' ही संज्ञा तयार झालेली असावी. गोदीत काम करणारांना मराठीत गोदी कामगार, तर इंग्रजीत 'डॉक लेबर' म्हणतात. गोदीत अनेक प्रकारची कामे चालतात. त्यामुळे गोदी कामगार वा

डॉक लेबर ही संज्ञा माथाड्यांसह सर्वसमावेशक बनते. या कामगारांसाठी 'डॉक लेबर बोर्ड' अस्तित्वात आहे. माझ्या माहितीप्रमाणे पी. डिमेलो यांनी मुंबईत गोदी कामगारांच्या संघटनेचा पाया घातला; पुढे त्यांनी तिचा विस्तार राष्ट्रीय पातळीवर वाढवला.

'बॉम्बे पोर्ट ट्रस्ट' या संस्थेबरोबर सर्वश्री पी. डिमेलो, एस. आर. कुलकर्णी, मनोहर कोतवाल, के. आर. प्रभुदेसाई इ. नेत्यांनी अनेक करार घडवून आणलेले आहेत. गोदीतील माथाड्यांचे 'उपरेपण' जावे यासाठी निर्उपरीकरण डोळयापुढे ठेवून वेळोवेळी काही योजना मंजूर करून घेतलेल्या आहेत. त्यांतूनच पुढे एक 'योजना' आकाराला आली. १९४८ साली समाजवादी मंडळी काँग्रेसपासून अलग झाली. त्यांनी सोशलिस्ट पार्टी–समाजवादी पक्षाची स्थापना केली. शेतकरी कामगार पक्षाची स्थापना याच काळात झाली. डाव्या विचारांच्या अनेक मंडळींना काँग्रेसचा त्याग करावा लागला. त्या काळातही काँग्रेसवर 'बनिया' गटात प्रभाव मोठा होता.

'१९५२–५३ च्या सार्वत्रिक निवडणूकीत समाजवाद्यांना लोकसभा–विधानसभांच्या निवडणूकीत दारूण पराभत पत्कारावा लागला असला, तरी मुंबईतील कामगार चळवळीवर अशोक मेहतांची पकड कायम राहिली. श्री. मेहतांचे मार्गदर्शन मुंबईबाहेरच्याही कामगार चळवळीला मिळत होते. १९४८ साली धुळ्याच्या मार्केट कमिटीतील हमालांनी साथी ॲड. शंकरराव परांजपे, साथी शंकरराव सापे यांच्या नेतृत्वखाली संप केल्याची नोंद आढळते. परंतु जुन्या मुंबई राज्यात माथाडी–हमाल वर्गाला न्याय मिळणे अशक्यप्राय होते.'[३१]

### ६.३.४ कंत्राटी पद्धत : कायदेशीर वेठबिगारी

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कंत्राटी कामगार पद्धतीबद्दल एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. संघटित क्षेत्रात कंत्राटी पद्धत वापरून कामगारांचे शोषण करण्याला त्यामुळे पायबंद बसेल अशी अपेक्षा आहे.

असंघटित क्षेत्रातील कंत्राटी पद्धतीतील कामगारांच्या शोषणाच्या प्रश्नाची जड अद्याप लागलेली नाही. त्या पद्धतीने राजरोस शोषण सुरू आहे. कंत्राटी कामगार कायद्यात शासनाने

काही बदल केले; परंतु त्रुटी अशा ठेवल्या की ज्यामुळे तो कायदा 'ठेकेदार संरक्षण कायदा'च बनला आहे. मजूर सहकारी सोसायट्यांची पळवाट शोधून अनेक ठेकेदार सहज चरत असतात. शासनकर्त्यांने आदर्श मालक बनावे अशी साधारण अपेक्षा असते. परंतु येथे राज्य व केंद्राची शासनेच या कंत्राटी पद्धतीचा अवलंब करतात. महाराष्ट्रात सहकारक्षेत्राचा उदोउदो होतो तेथेही ही पद्धत सर्रास वापरली जाते.

रेल्वे स्टेशनवर १९४८ पर्यंत प्रवाशांच्या सामानाची चढउतार, ने-आण करण्याचे हमाली काम खाजगी ठेका देऊन केले जाई. १९४८ पासून परवाना पद्धत अंमलात आली. बिल्ला हमाल किंवा लायसेन्स्ड पोर्टर या पद्धतीतील हमालाला थेट राष्ट्रपतींच्या नावे करारपत्र भरून द्यावे लागते. दर महिन्याला परवाना फी रेल्वे प्रशासनाकडे भरावी लागते. हमाली कामाचे दर रेल्वे प्रशासन निश्चित करते. या हमालांना कामगारविषयक कोणतेही संरक्षण नाही. सामूहिक अपघात संरक्षक विमा, वैद्यकीय सहाय्य, प्रवासासाठी पास, रेल्वेच्या नियमित सेवेत सामावून घेण्याची तरतूद, सहभागी भविष्य निर्वाह निधी इ. मागण्या वेळोवेळी केल्या जातात. रेल्वेमंत्र्यांचे साचेबंद उत्तर मिळते. ''बिल्ला हमाल रेल्वेचे नोकर नसऱ्याने प्रश्न उद्‌भवत नाही.'' मधू दंडवते, जॉर्ज फर्नांडिसांसारखे रेल्वमंत्री झाले. रेल्वेच्या दवाखान्यात उपचाराची मुभा, रेल्वे स्थानकार बिल्लाहमालांसाठी वेगळे आरामगृह अशा किरकोळ सुविधा मिळाल्या. परंतु मूळ प्रश्न कायम राहिला. रेल्वेतील रोजंदार व हंगामी मजूरांचे प्रश्न अद्याप सुटलेले नाहीत. बिल्ला हमालांचा नंबर कधी लागणार असे खाजगीत प्रश्न विचारले जातात. या हमालांकडून पार्सल विभागात बॉक्सबॉय म्हणून रेल्वे काम करून घेते. करारपत्रात तशी शर्त असते. मात्र असे काम करताना अपघात झाल्यास वा मृत्यू झाल्यास रेल्वेला फरक पडत नाही.

'रेल्वे स्टेशनपेक्षाही रेल्वे मालधक्क्यातील स्थिती भीषण असते. मालाची चढ-उतार, वाहतुकीचे काम खाजगी दलाल-हुंडेकऱ्यांमार्फत करवून घेतले जाते. त्यामुळे या कामगारांचे काहीही घेणे रेल्वे लागत नाही! सफाई नाही, पाणी नाही, नागरी सुविधा नाहीत. तेथील परिस्थिती नरकयातना, यमयातना या शब्दप्रयोगांना लाजवणारी असते. प्रत्येक शहरात रेल्वेचे स्वतंत्र संस्थान असते. स्थानिक नगरपरिषदांचे अधिकारी इकडे ढुंकूनदेखील पाहत

नाहीत. पुण्यासारख्या शहरात मालधक्क्यात वर्षानुवर्षे तुंबलेल्या उघड्या मैला–वाहिनीची सफाई व दुरूस्ती करून घेण्यासाठी एरिया सुपरिटेंडेंटच्या कार्यालयासमोर आम्हाला १० दिवस धरणे धरावे लागले. २ ते ३ हजार हमाल मजूर येथे काम करतात. एवढी उपेक्षा का? तर हमाल रेल्वेचे नोकर नाहीत! रेल्वेला मालवाहतूक व्यवसायातून नफा मिळतो. पण हमालांसाठी किमान सुविधा करण्यासाठी निधी नसतो.’[३२]

### ६.४ ध्येयवादाची आश्वासक वाटचाल

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे २०१० हे सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. २०१० मध्ये महाराष्ट्र आरोग्य मंडळाने सुवर्णमहोत्सवी विशेषांक प्रसिद्ध केला या अंकात ‘ध्येयवादी आश्वासक वाटचाल’ या डॉ. बाबा आढावांच्या लेखाचाही समावेश करण्यात आला आहे. या लेखात डॉ. बाबा आढाव यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळाची स्थापनेमागची भूमिका विषद केली आहे तसेच पन्नास वर्षाच्या यशस्वी वाटचालीचा मागोवा घेतलेला आहे.

महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या स्थापनेत सर्वश्री डॉ. सिताराम गुजर, डॉ. मार्तंड पाटील, डॉ. गोपाळ शहा, डॉ. सिंधू केतकर व डॉ. बाबा आढाव एकत्र आलो. खाजगी दवाखान्यांचे सार्वजनिक विश्वस्त निधीत रूपांतर झाले. व्यवसाय करावयाचा पण खाजगी मिळकतीसाठी नाही. धर्मादाय संस्थाही चालवायची नाही तर झोपडी रूग्णालय चालेल पण फुकट दवापाणी नाही. डॉक्टरांनी किती पैसे घ्यावेत? एस. एम. जोशी म्हणाले आमदारांच्या मानधनाइतके! त्यावेळी दरमहा अडीचशे रूपये मानधन होते. हे असिधाराव्रत पेलणे अत्यंत अवघड होते. अशक्यप्राय होते. परंतु ते शक्य करून दाखविण्याचे दिव्य डॉक्टरांनी पत्करले. १९६२ साली बाबा आढावांची पुणे महानगरपालिकेवर निवड झाली. नगरसेवक म्हणून मिळणारे मानधन हिशोबात धरले जाऊ लागले. त्यात हे सर्वजण आयुर्वेदिक ‘डॉक्टर’, हा प्रयोग यशस्वी होईल का? अनेकांशी चर्चा केली. प्रा. देवदत्त दाभोळकर म्हणाले, ‘‘म. गांधींच्या मते जनतेची गरज व पाठिंबा असेल तर उपक्रमांत जनसहभाग उपलब्ध होईल. अज्ञात आधार मिळतील.’’

‘वैद्यकीय व्यवसायाचे स्वरूप रोज बदलत आहे. लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. विज्ञानाची झेप रोज नवनवे शोध लावीत आहे. देशाच्या अर्थकारणाने खाजगीकरण मान्य केले आहे. त्यामुळे गरिबांची दैना उडत आहे. अशा वेळी संस्थांना टिकाव धरणेही अवघड होत

असणे स्वाभाविक आहे. अशाही वेळी तळागाळातल्या माणसांसाठी धडपड करणे ब्रीद बनते. महाराष्ट्र आरोग्य मंडळाला या कसोटीत उतरावे लागेल. आरोग्यच नव्हे तर शिक्षणाबाबतही हेच घडत आहे. महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाला आपले चारित्र्य टिकवून धरावे लागेल.'[३३]

वरील शब्दात डॉ. बाबा आढाव यांनी वैद्यकीय व्यवसायाबाबत आपले परखड मत व्यक्त करून महाराष्ट्र आरोग्य मंडळाला आपल्या जबाबदारीचे भान करून दिले आहे.

### ६.५ 'हमीद दलवाई एक क्रांतिकारक' या पुस्तकामधील मधील डॉ. बाबा आढाव यांची प्रस्तावना

हमीद दलवाई एक क्रांतिकारक या पुस्तकाला डॉ. बाबा आढाव यांनी प्रस्तावना दिली आहे. या प्रस्तावनेमधून त्यांच्या विचारधारेवर प्रकाशझोत टाकता येतो. सत्यशोधक चळवळीमध्ये त्यांची जडण घडण झालेली आहे. समाजवादी विचारांचा प्रभाव देखील त्यांच्यावर आहे. हमीद दलवाई एक सत्यशोधक होते त्यामुळे हमीद दलवाईच्या कार्याचा आढावा घेताना त्यांनी सत्यशोधक चळवळीचा इतिहास थोडक्यात आपल्या प्रस्तावनेत लिहिला आहे. ते आपल्या प्रस्तावनेत लिहितात –

'सत्यशोधक हमीद दलवाईंना जाऊन तीस वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने आम्ही प्रतिवर्षी ३ मे रोजी दलवाईंचा स्मृतीदिन साजरा करतो. सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीचे क्रांतीकारी नेते श्री. दिनकरराव जवळकर यांचा स्मृतीदिनही ३ मे रोजीच साजरा होतो. या दोघांचाही स्मृतिदिन एकाच दिवशी साजरा करण्याचा समता प्रतिष्ठानचा प्रघात आहे. ३ मे १९३२ रोजी जवळकरांचे निधन झाले. दलवाई ३ मे १९७७ रोजी निवर्तले. सत्यशोधक दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मयाचे प्रकाशन आम्ही पंचवीस वर्षांपूर्वी केले. आता नव्या आवृत्तीची तयारी सुरू आहे. दलवाईंच्या स्मृतीदिनानिमित्त डायमंड पब्लिकेशन्सच्या वतीने प्रा. शमसुद्दिन तांबोळी यांनी संपादित केलेले हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. आम्ही या पुस्तकाचे मनापासून स्वागत करतो. प्रा. शमशुद्दिन तांबोळी, सय्यदभाई व मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांना धन्यवाद देतो.

वास्तविक हमीद दलवाईंनी लिहिलेले सर्व लिखाण 'समग्र हमीद दलवाई' या नावाने प्रसिद्ध व्हावयास हवे. यथावकाश हे होईल याची आम्हाला खात्री आहे.'[३४]

### ६.६ एक गाव – एक पाणवठा

डॉ. बाबा आढाव यांचा वैचारिक अभ्यास करायचा असेल तर एक गाव – एक पाणवठा या त्यांच्या ग्रंथाला आपण टाळू शकत नाही, यावरून या ग्रंथाचे स्थान आपल्या लक्षात येईल. सन १९७३ साली महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला शंभर वर्षे पूर्ण होत होती त्यानिमित्ताने महात्मा फुलेंना अभिप्रेत असणारा समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी राज्यभरात एक गाव एक पाणवठा ही चळवळ चालवली. राज्यामध्ये सर्वदूर एक गाव एक पाणवठा ही चळवळ सुरू असताना जे अनुभव आले व प्रवासादरम्यान ग्रामीण महाराष्ट्रातल्या जातीयतेचे जे वास्तव जाणवले या सर्वांचा आढावा या ग्रंथामध्ये घेतलेला आहे.

डॉ. बाबा आढाव यांनी पुरोगामी चळवळीत कार्यरत असताना अंधश्रद्धा, अज्ञान यावर कडाडून हल्ला केला, कष्टकरी कामगारांची बाजु घेतली व महत्त्वाचे म्हणजे त्यांनी जातीभेदाला केलेला प्रखर विरोध होय. या जातीभेदाला विरोध म्हणून डॉ. बाबा आढावांनी एक कृतीशील कार्यक्रम आखला तो म्हणजे 'एक गाव एक पाणवठा' होय.

डॉ. बाबा आढाव यांना 'एक गाव एक पाणवठा' या कार्यक्रमाची प्रेरणा महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून मिळाली असल्याची नोंद स्वतः बाबा आढावांनी 'एक गाव एक पाणवठा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये केलेली आहे. 'एक गाव एक पाणवठा' या चळवळीविषयीची भूमिका स्पष्ट करताना डॉ. बाबा आढावांनी पुस्तकाच्या प्रारंभीच प्रस्तावनेतच लिहिले आहे. फुल्यांनी स्वतःच्या घरचा हौद दलितांसाठी खुला करणे काय किंवा पुण्याच्या सदाशिव पेठेतील हौदावर अंघोळ करण्याचा सत्याग्रह करणे काय, ही सारी त्या बंडखोरीची चिन्हे, फुल्यांचे कार्य व्यापक व सखोल आहे. त्याची इकडे हडपसर आणि तिकडे भांबुर्डा अशी थट्टा करणारांनी केवढी तरी आलवंचना करून समाजास परत त्या परंपरेच्या गर्तेत ढकलून लावण्याचा पुरूषार्थ केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला. १९३२ च्या पुणे करारानंतर त्यांनी ठक्कर

बाप्पांना पत्र पाठवून सवर्णांना अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम दिला होता. त्यातील पहिले कलम खेड्यातील सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांना खुल्या कराव्यात हे होते. डॉ. राममनोहर लोहियांनी 'संसो पोने बांधि गांठ पिछडा पावे सौ में साठ' अशा घोषणाद्वारे आपली राजकीय जातिनीती स्पष्ट केली. ब्राह्मणी संस्कृतीला डॉक्टर साहेबांनी शेवटपर्यंत विरोध केला. त्याच्या कार्याचे मूल्यमापन या ठिकाणी अप्रस्तुत ठरेल. एवढे निश्चित की, माझ्या विचार प्रक्रियेला त्यांच्या विचारांनी खूप मदत केली. यावरून डॉ. बाबा आढावांची 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ सुरू करण्यामागची भूमिका निश्चित पणाने समजू शकेल.

१९७१ साली महाराष्ट्रामधील खेड्यांमधून भटकंती करीत असताना डॉ. बाबा आढावांनी अनेक ठिकाणी अंधश्रद्धा, दारिद्र्य, विषमता, जातीयता, बेकारी याची दृश्ये पाहिली या सर्वांचे चित्रण डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या नोंदीमधून केलेले आहे.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात सुपे खुर्द गावातून डॉ. बाबा आढावांच्या 'एक गाव एक पाणवठा' या मोहिमेला सुरुवात झाली. झांज व ढोलाच्या तालावर मिरवणूक गावात पोहचली. एका दलित भगिनीने त्या विहिरीतून पाणी काढले. त्यावेळी डॉ. बाबा आढाव यांनी सरपंच शंकरराव जगताप यांनी दिलेली माहिती व एका बौद्ध म्हातारीने दिलेली माहिती पुस्तकाच्या सुरूवातीलाच दिलेली आहे, ते लिहितात, आमच्या समक्ष स्पृश्य अस्पृश्य महिला एकमेकींना सहजपणे हंडे आणून देत होत्या.

समोरच्या दृश्यावर विश्वास बसत नव्हता शेवटी न राहवून आम्ही चौकशी सुरू केली. शंकरराव म्हणाले, 'गेली छत्तीस वर्षे पाणवठा एकच आहे. तुम्हाला खोटे वाटेल, परंतु हा पाहा पुर्वीचा रामोशांचा पाणवठा, चांभाराचा पाणवठा........ आता हे झालेत गुरांचे पाणवठे..... नवा पाणवठा सर्वांसाठी एकच, जेवणाच्या पंगतीही मांडीला मांडी लावून.....'

का कुणास ठाऊक, या सांगण्यावर माझा विश्वास बसेना. मी एकटाच शेवटी बौद्धाच्या काही घरातून गेलो. एक म्हातारी म्हणाली, खरचं गावात बाट नाही उगा खोडी तर का काढावी?

पुस्तकाच्या सुरूवातीलाच सुपे खुर्द या गावात सवर्ण दलित असा कोणताही भेद नसल्याचे डॉ. बाबा आढाव यांनी नोंदविल्यानंतर पुढे मात्र स्पृश्य अस्पृश्य भेद अधिक

ठळकपणे नोंदविले आहेत. डॉ. बाबा आढाव यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरामध्ये शासकीय खर्चाने होणारी पूजा बंद करण्यात यावी अशी भूमिका घेतलेली होती व त्याचा राग म्हणून रत्नागिरी येथे डॉ. बाबा आढाव यांच्या व्याख्यानाला तेथील स्थानिकांनी जागा दिली नाही त्यावेळी बाबा लिहितात, 'एक गाव एक पाणवठा' या व्याख्यानाला रत्नागिरीच्या स्थानिकांनी जागा नाकारली, अ. भा. वि. प. च्या व काही जनसंघीय हिंदुत्ववादी लोकांनी चालकांना चिथावल्याचे समजले. याच रत्नागिरीत अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणाऱ्या सावरकरांचे पतित पावन मंदिर आहे. माझ्या लक्षात आले, हा मी पंढरपूरच्या शासकीय पूजेला विरोध केला याचा राग असावा. सात्विक चर्चेत निष्प्रभ होणारी ही कर्मठ मंडळी सत्यशोधक चळवळीत विचारांचा शांतपणे समाचार घेण्यास तयार नसतात.

जातीजातीमधील भेद, स्पृश्य–अस्पृश्यता, जाती अंतर्गत भेद याची सूक्ष्मपणे निरीक्षणे डॉ. बाबा आढावांनी नोंदवली आहेत. राजापूर तालुक्यातील जैतापूर गावातील चर्मकार समाजातील अशी एक माहिती पान नं.२५ वर नोंदवलेली आहे, ते लिहितात, 'राजापुरात आले तेव्हा चांभार समाजातील ५–६ कार्यकर्ते कोंडविलकरांसोबत आले होते. चांभार समाजाचे आधुनिक शिक्षणापेक्षा व्यवसायाकडे अधिक लक्ष आहे. बौद्धातील व चांभारातील शिवाशिव तुरळक ठिकाणी आढळते. चांभार समाजातील तरूण नेतृत्वाचा काँग्रेसविषयी पूर्ण भ्रमनिराश झालेला दिसून येतो, एकाने तर स्पष्टपणे सांगितले काही प्रमाणात म. गांधीच्या राजकारणामुळे महारेतर मंडळी काँग्रेसकडे वळाली. दलित समाजामध्ये कायमची फूट पडली, त्याचे प्रायश्चित आजपर्यंत भोगत आहोत.'

या महत्त्वाच्या निरीक्षणाबरोबर डॉ. बाबा आढावांना या चळवळीत असंख्य अनुभव आलेले आहेत. काही लोकांच्या आजोबा–पणजोबांनी एक दोन रूपयांच्या उसनवारीत आंब्याची झाडे गहाण ठेवलेली आहेत. भावाभावांची भांडणे खून करण्यापर्यंत गेलेली आहेत. एखादा रूग्ण कोल्हा चावून इंजेक्शन न मिळाल्याने दगावलेला आहे. माणसामाणसातील समानता कायद्यानं मान्य केलेली असली तरी मनानं मान्य केलेली नाही. तरीसुद्धा संघर्ष न होता आर्थिक, सामाजिक प्रश्न सुटला पाहिजे.

मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८, अधिनियम ४५(६) प्रमाणे सार्वजनिक विहिरीवर सर्व समाजातील लोकांना पाणी भरण्याचा अधिकार आहे. असा अधिकार असताना सुद्धा पाण्यासाठी खून झालेले आहेत.

याच पुस्तकात डॉ. बाबा आढावांनी अस्पृश्यता व विषमता, धरणग्रस्त, शैक्षणिक समस्या, जातीव्यवस्था, कष्टकरी वर्ग, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य, आंतरभारतीचे कार्य, साधना साप्ताहिकाचे कार्य, डॉ.राम मनोहर लोहियाचे कार्य, म.फुलेंचे कार्य, समता प्रतिष्ठानचे कार्य, नामांतरावरील कार्य, पानशेत पुनर्वसन कार्य, मराठवाडा आपदग्रस्त मदत कार्य, महाड चवदार तळे सत्याग्रहाचे ५० वे वर्ष २० मार्च १९७७, विषमता निमूर्लन समिती, स्त्री कामगारांवरील अत्याचार इत्यादी बाबत आलेले अनुभव लिहिलेले आहेत.

'एक गाव एक पाणवठा' या पुस्तकात १५८ पानावर डॉ. बाबा आढाव लिहितात, १ जून १९७४ मध्ये मुख्यमंत्र्यांनी शाहू जन्म शताब्दी वर्षाचा कार्यक्रम म्हणून 'एक गाव एक पाणवठा' मोहिमेचा कार्यक्रम जाहीर केला. मला मोठे आश्चर्य वाटले. त्यासाठी आमदार शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. समितीत माजी आमदार डॉ. बापूसाहेब काळदाते, 'साधने'चे संपादक यदुनाथ थत्ते, सौ.कमल विचारे, आमदार नामदेवराव व्हटकर इत्यादी कार्यकर्त्यांचा समावेश झाला.

महाराष्ट्रातील अनेक मान्यवर साहित्यिकांनी पुस्तकाचे कौतुक केले. हे पुस्तक 'एक गाव एक पाणवठा' मोहिमेशी संबंधित आहे. पुस्तकामुळे अनेकांच्या अंतःकरणात अस्वस्थता निर्माण झाली. या पुस्तकाला केसरी-मराठा ग्रंथालयाचे न. चि.केळकर पारितोषिक, मॅजेस्टिक बुक डेपोचे पारितोषिक आणि बाँबे बुक डेपोचे मेडल मिळाले. हे पुस्तक निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे असेच म्हणावे लागेल.

### ६.७ सत्यशोधनाची वाटचाल

१८ सप्टेंबर १९७१ साली साप्ताहिक साधनामध्ये डॉ.बाबा आढाव यांनी 'हे तर शेटजी-भटजींचे आधुनिक दासच!' हा प्रदीर्घ लेख लिहिला होता. महात्मा फुले यांच्या विचारांचा समाजातील नेत्यांनी कसा पिर्यास केला, याची सोदाहरण मांडणी डॉ. बाबा आढावांनी या लेखात केली आहे.

१९७१ ते १९८९ अखेरपर्यंतचे डॉ. बाबा आढावांचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख एकत्र करून 'सत्यशोधनाची वाटचाल' या नावाने पुस्तक छापले आहे. या पुस्तकाला श्री. नानासाहेब गोरे यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. श्री. दत्ता काळेबरे यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. मार्च १९८९ मध्ये 'सत्यशोधनाची वाटचाल' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. संपादकाने लेखांची विभागणी दोन विभागात केली आहे. पहिल्या भागात व्यक्तिचित्रणे व दुसऱ्या भागात वैचारिक लेख आहेत. ते लेख खालीलप्रमाणे आहेत.

हे तर शेटची भटजींचे आधुनिक दास, क्षत्रियत्वाची मगरमिठी, सत्यशोधक चळवळीचे तारू कुठे भटकतेय? बहुजन समाजातील माणूस मुक्त कधी होणार? शिक्षणसंस्थातील जातीयवादी हैदोस, शिक्षाक्रमात सत्यसाईबाबांचा शिरकाव, ब्राम्हणी संस्कृती आणि आजचे ब्राम्हणी नेतृत्व, संघाची ढोंगबाजी, संघापासून सावध, भारतीय संस्कृतीची विचारधारा, बहुजन समाज व शैक्षणिक क्षेत्रातील वास्तवता यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

डॉ. बाबा आढावांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा, कार्याचा प्रभाव आहे. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार संदर्भ बिंदू मानून त्याच्या तुलनेत एकूण बहुजन समाजाच्या व विशेषतः मराठ्यांच्या चळवळीची डॉ. बाबा आढावांनी परखड समीक्षा केली आहे, हे तर शेटजी भटजींचे आधुनिक दासच! या लेखात त्यांनी महात्मा फुले यांच्यापासून सुरूवात करून शाहू छत्रपती, केशवराव जेधे, जवळकर ते यशवंतराव मोहिते इथपर्यंतच्या नेत्यांच्या विचारांचा परामर्श घेतला आहे. आजपर्यंत हे राजकारणी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नावे सोयीप्रमाणे वारंवार घेतात. डॉ. बाबा आढाव लिहितात की महात्मा फुल्यांचा सत्यशोधकी विचार मराठा नेतृत्वाने स्विकारलेला नाही. महात्मा फुले यांनी स्त्री, दलित व कष्टकरी या तीनही समाज घटकांसाठी जीवाचे रान केले. जन्माधिष्ठित उच्चनीचता नाकारली इतकेच नव्हे तर, मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि धर्मभेद, जाती भेद, लिंग भेद यांना ठोकरणारी विचारसरणी मांडली. तशी विचारसरणी आजचे मराठा नेतृत्व स्विकारताना दिसत नाही.

राजकारणाबाबत नाही तर शिक्षण क्षेत्रातही मराठा समाजाने मक्तेदारी निर्माण केली आहे असे डॉ. बाबा आढावांचे मत आहे, बाबा आढाव लिहितात, जुने राजे गेले. आता नवे

महर्षी व सम्राट निर्माण झाले आहेत! त्यांच्या दरबारी लक्ष्मी, सरस्वती, पार्वती साऱ्याजणी पाणी भरीत आहेत. सर्व काही 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असे कसे म्हणता येईल, हा प्रश्न डॉ. बाबा आढावांना पडलेला आहे.

याच लेखात डॉ. बाबा आढाव मराठा तरूणांना गंभीरपणे विचार करायला लावणारे मुद्दे देतात. बाबा आढाव लिहितात, सामाजिक विषमतेचा रोग आर्थिक समतेने नाहीसा होईल हे तितकेसे खरे नाही. मराठा समाजाने नेतृत्व करावे पण ते लोकशाही समाजवादी मूल्याचे असावे, समताधिष्ठित राजकारणाचे व सत्यशोधकी विचारांचे असावे असे डॉ. बाबा आढावांनी लेखातून लिहिलेले आहे.

### ६.८ 'साधना' मधील डॉ. बाबा आढावांचे लेखन

१९७४ सालात डॉ. आढाव हे साधना साप्ताहिकाचे सहसंपादक असल्याचा उल्लेख १९ ऑगस्ट १९७४ च्या वर्ष २७ अंक १–२ वरून दिसून येतो. या अंकात त्यांनी 'एक गाव एक पाणवठा मोहीम आणि महाराष्ट्र शासन' असा लेख लिहिल्याचे दिसून येते. १९७४ च्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'एक गाव एक पाणवठा' चळवळीतील छायाचित्र छापले आहे. १९७४ ते १९८० सालापर्यंत साधना साप्ताहिकामधून डॉ. बाबा आढावांनी लेखन केल्याचे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

| वर्ष | लेखाचे नाव |
|---|---|
| १९७४ | एक गाव एक पाणवठा मोहीम आणि महाराष्ट्र शासन |
| १९७४ | लोकशाहीला माया कुठ्यं? |
| १९७४ | एक गाव एक पाणवठा – मोहिमेचा पहिला टप्पा |
| १९७४ | तर इतिहास तुम्हाला क्षमा करणार नाही, ढाले, ढसाळ, यांना पत्र |
| १९७४ | अशी ही आपली आमची गांधी जयंती |
| १९७४ | नागरिक स्वातंत्र्याचा जयजयकार असो |
| १९७५ | सगळा कारभार बंभोले शंकर पद्धतीचा राहणार |
| १९७५ | अठरा गावे – अठरा विश्वे |
| १९७५ | दीन दुबळ्यांची नवी वाढ –अशी ही धडपडणारी मुले |

| | |
|---|---|
| १९७५ | ज्ञानदेवी खणते पाया |
| १९७७ | छात्र युवा संघर्ष वाहिनी शिबीर |
| १९७७ | दळयाच्या राज्यावर बुळ्याची सवारी |
| १९७७ | हमीद दलवाई स्मृतिदिन |
| १९८० | समताधिष्ठित सांस्कृतिक क्रांतीची गरज |

### ६.९ अमेरिकेतील सामाजिक सुरक्षा कायदा

अमेरिका हा भांडवली देश असूनही तेथे सामाजिक सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी केली जाते. भारतात ब्राह्मणी बुद्धिजिवी कष्टकऱ्यांच्या सरकारी सोयी–सवलतींच्या नेहमीच विरूद्ध असतो. प्रगत देशात सवलती दिल्या जात नाहीत, असा भ्रम सतत पसरवीत असतो. राखीव जागा, सामाजिक सुरक्षा इ. प्रगत अशा अमेरिका खंडातही कशाप्रकारे राबिविली जाते आणि भारतात असघंटित कामगारांना गरज असतानाही राज्यकर्ते नाकर्तेपणा दाखवीत आहेत, याचा प्रस्तुत संपादकीयात परामर्श घेतला आहे.

अमेरिकेत १९५६ साली सामाजिक सुरक्षा कायदा मान्य झाला. १४ ऑगस्ट १९३५ रोजी तत्कालीन अध्यक्ष फ्रँकलीन रूझवेल्ट यांनी त्यावर सही केली. १९३७ साली प्रत्येक कष्टकऱ्यांच्या पगारातून विशिष्ट प्रमाणात (पेन्टॅक्स) करवसुली सुरू झाली. त्याच वर्षात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ‘सामाजिक सुरक्षा कायदा’ अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ‘सामाजिक सुरक्षा कायदा’ अमेरिकन तरतुदीनुसार असल्याचा निर्वाळा दिला. १९४० साली श्रीमती फुलेर या कष्टकरी महिलेला चेक मिळाला. फुलेर वयाच्या १०४ वर्षांपर्यंत जगल्या.

सामाजिक सुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीला ७५ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. (१९३५–२०१३) या काळात अनेक घडामोडी व बदल झालेले आहेत. अमेरिकेत समृद्ध भांडवलशाही आहे. तिला समाजवादाचे वावडे आहे. गरिबी–श्रीमंतीचे चित्र पुढीलप्रमाणे आहे.

अवघ्या १% कुटुंबियांकडे देशातील ४०% राष्ट्रीय संपत्ती आहे. १०% श्रीमंताकडे ७०%, तर ८०% लोकसंख्येकडे १७% संपत्ती आहे. तळागाळातील ४०% टक्क्यांकडे अवघी १ टक्का संपत्ती आहे. (याच वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून

ही आकडेवारी उपलब्ध झाली आहे.(Social Security, Medicare & Government Pentions NOLO)

भारतीय संविधानाने लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला आहे. तरीही भारतात आजच्या घटकेला ७७% जनता दरडोई दररोज २० रूपयेही खर्च करू शकत नाही. अन्न–वस्त्र–निवारा–रोजगार–शिक्षण इत्यादी किमान गरजाही भागवू शकत नाही. जगातील १० श्रीमंतात २ भारतीय आहेत.

२००९ सालातील अमेरिकेन संसदीय समितीच्या अहवालात, सामाजिक सुरक्षा योजनेत लाभार्थीची संख्या ६० दशलक्ष आहे. कष्टकऱ्यांची संख्या १४५ दशलक्ष आहे. लाभार्थीच्या संख्येत सतत होणारी वाढ व कर भरणाऱ्यांच्या संख्येत सतत होणारी वाढ व कर भरणाऱ्यांच्या संख्येतील घट या घटितावर येथे चिंता व्यक्त केली जाते. सामाजिक सुरक्षा कायद्याचे विरोधक खासगीकरणांची मागणी करतात. सामाजिक सुरक्षेचे समर्थक कर मर्यादेची १,१३,७०० डॉलर्सची मर्यादा रद्द करण्यासाठी मागणी करतात. अमेरिकेत वयोवृद्ध व निराधारांना जगता यावे या अंगाने विचार होतो. त्यासाठी फूड स्टँप्स, बेकारभत्ता, घरयोजना इ. सुविधा आहेत. सामाजिक सुरक्षा योजनेला अमेरिकन अंगठीतील हिरा मानले जाते. १८८० साली जर्मनीत सामाजिक विम्याची सुरूवात केली. अमेरिकेने १९३५ साली जगात सर्वप्रथम सामाजिक सुरक्षा कायदा मंजूर केला. सामाजिक विमा योजनेच्या पुढचे पाऊल उचलले गेले. जगातील  विविध राष्ट्रांनी आपापल्या नागरिकांसाठी विविध योजना बनविल्या आहेत. घर, शिक्षण, आरोग्य, सेवानिवृत्ती वेतन, अपंग व निराधारांना साहाय्य अशा बाबतीत 'योजना' अंमलात आल्या आहे.

सामाजिक सुरक्षा कायदा एकाकी मंजूर झालेला नाही. त्यामागे अनेक घटनांनी नोंदलेला इतिहास आहे. शेतकरी, शेतमजूर, स्वयंरोजगारी, पगारी, खासगी, सार्वजनिक अशा प्रकारच्या १४–१५ कोटी कष्टकरी नागरिकांना लाभ घेता येतो. अमेरिकेतील प्रत्येक ६ पैकी एक जण या योजनेत आहे. अमेरिकेची लोकसंख्या ३०–३२ कोटी. भारताच्या एक चतुर्थांश, मात्र देशाचा भौगोलिक विस्तार भारताच्या तिप्पट आहे. १४९२ साली कोलंबसने या भूमीवर पाय ठेवला. गेल्या ५००–५२५ वर्षांत या देशाची जडणघडण झाली. विविध देशांतून येथे

लोक आले. आजही त्यांची मूळ ओळख सांगितली जाते. आफ्रिकेतील निग्रोंना गुलाम म्हणून वागावे लागले. पुढे वर्णभेद विरूद्ध संघर्ष झडले. शिकागो शहरातील गिरणी कामगारांनी १८३९ साली १ मे रोजी केलेल्या उठावाचा व त्यांच्या हत्याकांडाचा दिवस कामगार दिन म्हणून जगभर पाळला जातो. लाल बावट्याच्या निर्मितीचा इतिहास असा सांगितला जातो. शिकागो अमेरिकेतच आहे, मात्र अमेरिकेचा कामगार दिन वेगळा आहे. येथेच सामाजिक सुरक्षा कायदा सुरू व्हावा हा केवळ योगायोग मानता येणार नाही.

सामाजिक सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रचंड यंत्रणा आहे. मुख्य कार्यालय बाल्टीमोर येथे आहे. आता उत्तर कॅरोलिनात नवे विस्तारीत कार्यालय सुरू आहे. तशी देशात विभागीय कार्यालयेही आहेत. डॉ. आढाव सांगतात, महाराष्ट्रातील माथाडी, हमाल कामगार कायद्याची माहिती असल्याने येथील सामाजिक सुरक्षा कायदा व अंमलबजावणी समजून घेणे काहीसे सुलभ झाले. बाल्टीमोरला भेट देता आली.अनेकांशी चर्चा करता आली. शंकाकुशंकांचे निरसन झाले. सामाजिक सुरक्षा कायदा फेडरल आहे. तो ऐच्छिक नाही. प्रत्येक कष्टकऱ्याच्या पगारातून होणारी करकपात व तेवढीच मालकाकडून वसुली अशी योजना आहे. सामाजिक सुरक्षा कर ६.२०%, आरोग्य दक्षता कर १.४५%, एकूण ७.६५% अशी आकारणी होते. मालकालाही तेवढीच रक्कम द्यावी लागते. स्वयंरोजगारी कष्टकऱ्याला स्वतःच्या आमदनीतून ७.६५ + मालकाचे ७.६५ असा भरणा करावा लागतो. स्वतःच्या आमदनीचा हिशोब ठेवावा लागतो. येथील सेवानिवृत्तीचे वय ६७ आहे. पूर्वी ते ६५ वर्षे होते. वयाच्या ६२ व्या वर्षी निवृत्त होता येते. मात्र त्याप्रमाणात सेवानिवृत्त सुविधेत कपात होते. सर्व रकमांचा भरणा समाजिक सुरक्षा निधीत होतो. या निधीतूनच सेवानिवृत्तीनंतरच्या अनेक सुविधा उपलब्ध होतात. म्हातारपण, अपंगत्व, निराधार, अवलंबित, बहुतेक सर्व अल्पवयीन अपत्ये इत्यादी निकष आहेत. कामगारांना मार्गदर्शन करणाऱ्या संस्था व्यक्ती आहेत. आर्थिक व्यवहार चेकने होत असल्याने कामे सुलभ होतात. घरसफाईसाठी आलेली टीमही चेक घेऊन जाते.

लाभार्थी कष्टकऱ्याला सामाजिक सुरक्षा योजनेत नोंद करून घेण्यासाठी किमान ४० क्रेडिटस् (पात्रता) मिळवावी लागतात. वर्षातून चार क्रेडिटस् मिळतात. १९९९ साली एका

क्रेडिटससाठी आमदनीची किमान रक्कम ७४० डॉलर्स होती. किमान दहा वर्षे करभरणा करावा लागतो. महागाई निर्देशंकाप्रमाणे या रकमेत वाढ होऊ शकते. सामाजिक सुरक्षा निधी सरकारी नोंदीत विश्वस्त निधी आहे. त्यातील उर्वरित रक्कम सरकारी कर्जरोख्यात गुंतवली जाते. त्याचे व्याज इत्यादी फायदे सामाजिक सुरक्षा निधीच्या उत्पन्नात जमा होते. अशा तऱ्हेच्या कर संकलनातून सेवानिवृत्तीनंतर, मध्येच अपंगत्व आल्यास, शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी, विधवा व विधुरास सेवानिवृत्ती वेतन, आरोग्य सुविधा उपलब्ध होतात. त्यासाठी फार सुसज्ज व सुनियोजित यंत्रणा उभारलेली आहे. सुविधा प्राप्त होण्यासाठी प्रत्येकाला तारीख ठरवून दिलेली आहे. साधारणतः जन्म तारखेवर ठरविली जाते. उदा.१ ते १० दुसरा बुधवार, ११ ते २० तिसरा बुधवार, २१ ते ३१ चौथा बुधवार.

सर्वत्र इलेक्ट्रॉनिक सुविधा आहे. सामाजिक सुरक्षा योजनेतून मिळणाऱ्या फायद्याची रक्कम किती असावी? आजच्या घटकेला ४०% सामाजिक सुरक्षा लाभार्थींना यावर आयकर भरावा लागतो! लग्न, घटस्फोट, नावबदल, अपत्याची काळजी, दत्तक मूल, सुविधा मिळू लागल्यानंतर तुम्हाला अपत्य झाल्यास, तुमच्यावर गुन्ह्यासाठी अटक वॉरंट असल्यास, तुम्ही गुन्हेगार ठरल्यास, सामाजिक सुरक्षा कायद्याच्या नियमांचे उल्लंघन केल्यास, देशांतर केल्यास इत्यादी बाबी लक्षात घेऊन उपाययोजना ठरविल्या आहेत. तुम्हाला सामाजिक सुरक्षा व रेल्वे बोर्डाकडून पती/पत्नी नोकरीत असल्याने त्यामधूनही फायदे असतील तर त्याबाबतीत विचार केला जातो. आरोग्यसुविधा चार प्रकारे पुरवले जाते. (वयाच्या ६५ नंतर)

१) हॉस्पिटलमध्ये राहावे लागल्यास.

२) बाह्य रूग्णांसाठी वैद्यकीय सहाय्य.

३) हॉस्पिटल व दवाखाना एकत्रित सोय हवी असल्यास.

४) औषधे - रूग्णसाधनांसाठी.

उतारवयात सामाजिक सुरक्षा कार्ड असणे ही फार मोठी हमी आहे. सर्वांना सुलभतेने माहित व्हावे यासाठी पुढील उदाहरणे देत आहे. सामाजिक सुरक्षेचे फायदे मिळवण्यासाठी सर्व पात्रता पूर्ण झाल्या असतील तर, वयाची ६२ वर्षे पूर्ण केली असता १११३ डॉलर्स दरमहा, वयाची ६७ वर्षे पूर्ण झाली असता १६१९ डॉलर्स दरमहा, वयाची ७० वर्षे पुर्ण केली असता

२०१३ डॉलर्स दरमहा, तुम्ही बाकी सर्व पात्रता मिळवल्या असतील आणि मध्येच अपंगत्व आल्यास, १४१४ डॉलर्स दरमहा, तुमचे वारस, मुलेही सुविधेला पात्र ठरतील, मूल ११३१ डॉलर्स दरमहा, अर्धांगी – मुलाची काळजी घेणारी ११३१ डॉलर्स दरमहा, मात्र वरील दोन्ही मिळून १५०८ डॉलर्स दरमहा, कुटुंबाचे एकत्रित २७७८ डॉलर्स दरमहा.

७४–७५ वर्षांच्या कारभारामुळे व्यवस्थापन सुरळीतपणे चालते. सर्व माहिती फुकट पुरवली जाते. आधुनिक पद्धतीने व तंत्राने व्यवहार करता येतात. नवनव्या सुधारणा केल्या जातात. 'क्लेम' मान्य होणे जिकिरीचे असते. त्यात थोडासा वेळ जातो. प्रत्येक सेवानिवृत्त कष्टकऱ्याला त्याने स्वतःच्या आमदनीतून भरलेल्या कररकमेतून सुविधा प्राप्त होतात. तिथे कोणाची मेहेरबानी नसते तर त्यांचा हक्क असतो. अतिश्रीमंतांना त्यासाठी पदरमोड करावी लागत नाही. (वार्षिक १,१३,७०० डॉलर्सच्या खाली) अमेरिकेप्रमाणेच युरोपातील काही देशांतून सामाजिक विम्यासारख्या योजन्या राबवल्या जात आहेत. 'आरोग्य विमा' ही लोकप्रिय संकल्पना बनली आहे.

भारतात ३० डिसेंबर २००८ रोजी सामाजिक सुरक्षा कायदा मंजूर झाला. त्याप्रमाणे केंद्र पातळीवर मंडळाची स्थापना झाली. कारभारासाठी अवघे १,००० कोटी रूपये मंजूर झाले. ४५ कोटी कष्टकरी संख्या व त्यासाठी अशी तुटपुंजी तरतूद. केंद्राने राज्यांवर भार टाकला. साधारणतः सेवानिवृत्ती वेतन, आरोग्य सुविधा, निराधार, अपंग, अल्पवयीन, बेवारसांना साहाय्यासाठी योजना करण्याच्या सूचना दिल्या. राज्यांनी याकडे विशेष लक्ष दिले नाही. आता २०१४ च्या निवडणुकींमुळे काही हालचाली सुरू झाल्या आहेत. गोवा सरकार वयोवृद्धांना दरमहा २००० रूपये, दिल्ली दरमहा १००० रूपये, राजस्थान दरमहा ५०० रूपये याप्रमाणे सुरूवात झाली आहे. सामजिक सुधारणांत आघाडीवर असलेले महाराष्ट्र राज्य अद्याप मागे आहे. केंद्रात कायदा पास करून घेण्यासाठी २००५ सालापासून सतत पदयात्रा, सायकल फेऱ्या, धरणे, मोर्चे, सुरू आहेत. मात्र अद्याप जनमताचा हवा तेवढा रेटा निर्माण झालेला नाही हे वास्तव आहे. २०१४ साल लक्षात घेऊन मध्यवर्ती शासनाने अन्न सुरक्षा कायदा घाईगर्दीत का होईना अंमलात आणला आहे. संसदेची मान्यता गृहीत धरली आहे. २ रू. किलो दराने गहू, ३ रू. दराने तांदूळ, १ रू. दराने भरड धान्य, महिन्याला

प्रत्येकी ५ किलो धान्य मिळणार आहे. राशन, पेन्शन सुरू करून टेन्शन कमी करण्याचा प्रचलित सरकारचा इरादा स्पष्ट आहे.

**६.१० हे तर शेटजी–भटजींचे आधुनिक दासच!**

भारतातील अनेक प्रांतात तेथील प्रमुख जातींचा प्रभाव सत्तेच्या राजकारणात पडलेला आढळतो, श्री. एम. एन. श्रीनिवास यांच्यासारख्या विचावंतानी 'प्रभावी जाती' चा (डॉमिनन्ट कास्ट) सिद्धान्तच मांडला आहे.

'प्रभावी जात ही केवळ आर्थिक आणि राजकीय वर्चस्वाने ढवळाढवळ करते, असे नसून खेड्यात अगर स्थानिक पातळीवर संख्येच्या दृष्टीने ती बलवत्तर असते.' या सिद्धांताची मांडणी त्यांनी अन्य प्रांतांतील परिस्थितीच्या अवलोकनाने केलेली दिसते. महाराष्ट्राचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. ब्राह्मण, मराठे व महार या महाराष्ट्रातील प्रभावी जाती. संख्येच्या बाबतीत ब्राह्मण, महार– मराठ्यांची कधीच बरोबरी करू शकणार नाहीत. महारांचा प्रभाव स्थानिक पातळीवर संख्या असूनही पडणे शक्य नाही. महाराष्ट्रातील परिस्थिती अगदी विशिष्ट आहे, असे मी एवढ्याचसाठी म्हणतो. या परिस्थितीचा फायदा महाराष्ट्रातील मराठा जातीचे नेतृत्व बुद्धिपुरस्पररीत्या घेत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''प्रौढ मतदान पद्धतीने एकदा संसदीय राज्यव्यवस्था प्रस्थापित झाली की, मानवांच्या हालअपेष्टा संपतील, असा इतिहासाचा निर्वा नाही. जर एका जातीचे वर्चस्व मानणाऱ्या मातब्बर वर्गाच्या हातांत राष्ट्रीय सरकार पडले, तर शिक्षण व सुबत्तेची दारे त्याच वर्गाला खुली होतील आणि इतर जातींतील वर्चस्व मानणाऱ्या मातब्बर वर्गाच्या हातांत राष्ट्रीय सरकार पडले, तर शिक्षण व सुबत्तेची दारे त्याच वर्गाला खुली होतील आणि इतर जातींतील लोकांचे जिणे दास्यातच जाईल. आणि ही परिस्थिती आहे. या सत्तेपेक्षा (ब्रिटिश) वेगळे असणार नाही.''

ही जाणीव संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही डॉक्टरसाहेबांनी स्पष्टपणे बोलून दाखवलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील निर्मितीबरोबर एक सवाल उपस्थित करण्यात आला होता : 'महाराष्ट्र राज्य मराठ्यांचे की मराठी भाषकांचे होणार?' राज्यकर्त्यांनी या प्रश्नाला तत्काळ उत्तर दिले होते : 'मराठी माणसांचे!' हे एक प्रकारचे जाहीर आश्वासन होते.

'या आश्वासनाचा भंग होत आहे, सत्तेत मराठा जातीचे प्राबल्य वाढत आहे,' असे मी म्हणताच अनेकांना माझी विचारमांडणी जातीय वाटली. काहींनी राजकीय हेतूंचाही आरोप केला, तर काहींनी 'मराठा जातीचे प्राबल्य वाढले, तर बिघडले काय?' असा मलाच उलट प्रश्न केला! काहींनी म्हैसूरमधील लिंगायत–वक्कलिंग, केरळमधील नायर–एवळा–ख्रिश्चन–मुसलमान, आंध्रमधील रेड्डी–कामा, गुजरातमधील बनिया–पाटीदार–हळपती, बिहारमधील भूमिहार–कायस्थ–राजपूत या जमातींच्या वर्चस्वाची उदाहरणे दिली आणि या न्यायाने महाराष्ट्रात मराठा जातीचे सर्वस्व राहणारच, असा युक्तीवाद केला.

### ६.१०.१ मराठा जातीची लोकसंख्या किती?

इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्राची परिस्थती आणखी वेगळी आहे. वर उल्लेखिलेल्या प्रांतांतून बहुजन समाजातील जातींत स्पर्धा व भांडणे होतात. म्हैसूरमधील लिंगायत व वक्कलिंगाचे उदाहरण सांगता येईल. म्हैसूर राज्यात या दोन्ही जमातींची संख्या अनुक्रमे २० ते १४ % आहे. महाराष्ट्रात मराठा जातीची बरोबरी लोकसंख्येच्या बाबतीत कोणतीही इतर एकएकटी जात करू शकत नाही. ताया झिंकिन यांनी आपल्या 'कास्ट टुडे' या पुस्तकात म्हटले आहे. 'महाराष्ट्रात मराठा जातीला तुल्यबळ अशी दुसरी जमात नाही, हेही महाराष्ट्रातील स्थिरतेला एक प्रमुख कारण आहे, असे म्हणणे गैर होणार नाही.'

प्रा.देवदत्त तुंगार व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा.मोईन शाकीर यांनी मराठा जातीच्या लोकसंख्येतील मान्य प्रमाणाबाबत शंका व्यक्त केली आहे. प्रा.शाकीर यांनी मराठा जातीचे प्रमाण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत ४५ ते ५०% असावे व मुंबई वगळून बाकीच्या महाराष्ट्रात ते ६५ टक्क्यांपर्यंत असावे, असे विधान केलेले आहे. त्यांच्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी डॉ.इरावती कर्वे यांच्या 'महाराष्ट्र लॅण्ड ॲण्ड इट्स पीपल' व आलू दस्तूर यांच्या 'स्टेट पॉलिटिकस इन इंडिया' या पुस्तकांचे आधार दिले आहेत.

डॉ.इरावती कर्वे म्हणतात, ''कुणबी आणि मराठे मिळून महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा अर्धा भाग होतो,'' तर आलू दस्तुर म्हणतात, ''मराठी भाषकांतील मराठ्यांचे प्रमाण पंचेचाळीस टक्क्यांवर आहे.''

डॉ.इरावती कर्वे यांनी अंदाज दिलेला आहे, हे वरील विधानावरून स्पष्ट होईल. डॉ.आलू दस्तुर यांनी तर महाराष्ट्रातील फक्त मराठी भाषकांच्या संख्येपुरतेच मर्यादित विधान केलेले आहे. प्रा.शाकीर यांनी आपली विधाने परत एकदा तपासावीत, असे मला आग्रहाने सुचवावेसे वाटते. डॉ.इरावती कर्वे यांनी आपल्या पुस्तकात अन्यत्र एन्थोवेनच्या १९०३ च्या पुस्तकाचा उल्लेख केलेला आहे. शिरगणती अहवाल व एन्थोवेनचे 'ट्राइब्ज ॲण्ड कास्ट ऑफ बॉम्बे' – खंड ३ (१९३२) यात कोठेही मराठ्यांच्या बहुमताला आधार देणारे विधान सापडत नाही.

१९३१ सालापर्यंत जातवार शिरगणतीचे आकडे उपलब्ध होतात. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने १९४८ साली प्रसिद्ध केलेल्या सातव्या प्रकाशनात संयुक्त महाराष्ट्राची माहिती दिली आहे. त्यात १९३१ व ४१ च्या शिरगणतीच्या आधारे मराठी प्रदेशाची लोकसंख्या मुंबई उपनगर, देश, मोगलाई, नागपूर–वऱ्हाडी अशी एकत्रित करून दाखवली आहे. १९३१ च्या शिरगणती अहवालावरून महाराष्ट्रातील काही प्रमुख जातींची लोकसंख्या वेगळ्या तक्त्यात दिलेली आहे. 'संयुक्त महाराष्ट्र आणि महागुजरात यांच्या समग्र माहितीचा ज्ञानकोश' या चिं.ग कर्वे, स. आ. जोगळेकर व डॉ. साकरलाल याज्ञिक यांनी संपादित केलेल्या ग्रंथातही असाच तक्ता दिलेला आहे. महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या जातींची लोकसंख्या इ.स.१८८१, १८९१, १९०१, १९११, १९२१, १९३१ व १९४१ पर्यंत दिलेली आहे. हा ग्रंथ १९६० साली प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी १९५४ साली डॉ. याज्ञिक सोडून बाकीच्या वरील लेखकांनीच 'महाराष्ट्र परिचय' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यातील पान ९६ व १०० यांवर प्रस्तुत आकडेवारी दिलेली आहे. या आकडेवारीच्या आधारार्थ 'महाराष्ट्र सांवत्सरिक'चा उल्लेख केलेला आहे. १९३१ व १९४१ च्या शिरगणतीचे अहवाल पुण्याच्या गोखले अर्थसंस्थेत उपलब्ध आहेत. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने दिलेल्या तक्त्यातील आकडेवारी व श्री.कर्वे यांनी दिलेली आकडेवारी मी शिरगणती अहवालाशी पडताळून पाहिली आहे. त्यात मराठा व कुणबी यांच्या लोकसंख्येचे आकडे बरोबर असल्याचे मला आढळले. काही मराठेतर जातींच्या लोकसंख्येबाबत मला शंका निर्माण झाली आहे. तिचे अद्यापि निरसन झालेले नाही. गौरी देशपांडे व जी.एस. सूर्यवंशी यांच्या नावाने प्रसिद्ध झालेल्या 'इलस्ट्रेटेड वीकली'च्य २

मे १९७१ च्या अंकातील लेखात त्यांनी असे विधान केले आहे की, ''मराठा हा एक समाजघटक म्हणून १९११ पासून गणला जातो. त्यात कुलवंत मराठे व कुणबी यांचा समावेश होतो. त्यांची संख्या इतर कोणत्याही दुसऱ्या जातीपेक्षा अधिक आहे. ती ३८ टक्क्यांच्या घरात भरेल.''

प्रा. शाकीर व श्री.तुंगार यांनी व्यक्त केलेल्या शंकेमुळे मी याची तपासणी केली. १९३१ साली महाराष्ट्राची लोकसंख्या दोन कोटी चाळीस लक्ष होती. श्री. जी. एस. सिंग यांनी १९६२ च्या जणगणना अहवालाचा आधार दिला आहे. (मराठी जिओफिजिक ॲण्ड इंडियन नेशन). महाराष्ट्राच्या या लोकसंख्येत हिंदूंची लोकसंख्या दोन कोटी चार लक्ष आहे. याचा अर्थ उरलेली ३६ लाख लोकसंख्या जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन, मुस्लीम इत्यादी इतर धर्मीयांची आहे. त्या वेळी मराठा जातीची लोकसंख्या (मराठा व मराठा – कुणबी मिळून) ६८ लक्ष आहे. हे प्रमाण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या २८.३% इतके पडते. मराठ्यांच्या खालोखाल महारांचे प्रमाण आठ टक्के आहे. ब्राह्मणांचे तीन ते साडेतीन टक्के, माळी तीन टक्के, कोळी (आगरी कोळी, महादेव कोळी, इत्यादी मिळून) तीन ते साडेतीन टक्के, धनगर अडीच ते तीन टक्के असा क्रम आढळतो.

महाराष्ट्र सरकारच्या 'महाराष्ट्र' या १९६८ च्या प्रकाशनातही 'हिंदूमध्ये मराठ्यांची बहुसंख्या आहे.', असाच उल्लेख आहे. त्या अगोदर १९५५ साली कालेलकर आयोगाला सरकारने १९५१ ची आकडेवारी दिलेली आहे. मागास जाती ठरवताना तिचा उपयोग केलेला असावा. लोकसंख्यावाढीचे प्रमाण साधारणतः सारखे धरल्यास मराठ्यांची संख्या प्रमाणाबाहेर वाढण्याचे कुठलेही संयुक्तिक कारण मला दिसत नाही! तेव्हा असे म्हणावयास हरकत नाही की, महाराष्ट्राच्या लोकसंख्येत मराठे २८% आहेत, मागास जाती–जमाती व आदिवासी २२ %, हिंदु व्यतिरिक्त इतर धर्मीय १५% व इतर जाती ३१.५% असे प्रमाण दिसते.

### ६.१०.२ नेतृत्व श्रीमंत मराठ्यांचेच

नेतृत्व २८ की ३८%, याविषयी माझी फारशी तक्रार नाही; आहे ती मराठा नेतृत्वाने घेतलेल्या राजकारणातील जातीय भूमिकेबाबत. ही तक्रार करत असताना मी यच्चयावत सर्व मराठा जातीला दोषी ठरवतो, असा काहींचा गैरसमज आहे. उलट, आजचे नेतृत्व श्रीमंत

मराठ्यांचे आहे, हे मराठा नेतृत्व गरीब मराठे, गरीब मराठेतर व दलित बांधवांना न्याय देणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. आज नेतृत्वपदी असलेली मराठा मंडळी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नावे सोयीप्रमाणे वारंवार घेतात. सत्यशोधक चळवळीचे आपणच वारस आहोत, असा प्रसंगी ते दावाही करतात. त्यांच्या या विधानांचा व भूमिकेचा परामर्श घेणे मला अगत्याचे वाटते.

सत्यशोधक चळवळीचा वारसा कोणता, याचे उत्तर नीटपणे दिले पाहिजे. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ म्हणजे ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वादाची चळवळ, असे मोघमपणे बोलले जाते, आणि या मोघमपणाचाच फायदा सत्तेवरील मराठा नेतृत्व घेते. यामुळेच राजकारणात भाषा समतेची व समाजवादाची, पण कृती मात्र विषमतेची, अशी विसंगती जाणवते. महात्मा फुल्यांचा सत्यशोधकी विचार या नेतृत्वाने स्वीकारलेला नाही, हे मला आग्रहाने बजावावयाचे आहे. म.जोतीराव फुल्यांनी स्त्री, दलित व कष्टकरी या तिनही समाजघटांसाठी जिवाचे रान केले. जन्मधिष्ठित उच्चनीचता त्यांनी धिक्कारली. इतकेच नव्हे, तर मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि धर्मभेद, जातिभेद, लिंगभेद यांना ठोकरणारी विचारसरणी त्यांनी मांडली. महात्मा फुले म्हणतात,

*''धर्मराज्य भेद मानवा नसावे ।। सत्याचे वर्तावे ।। ईशासाठी ।।*

*ख्रिस्त महमंद मांग ब्राह्मणासी ।। धरावे पोटाशी ।। बंधूपरी ।।*

*निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक ।। भांडणे अनेक ।। कशासाठी ।।''*

''जोतीबांनी देवाविरूद्ध, धर्माविरूद्ध, तीर्थस्थानांच्या विरूद्ध, गुरूंच्या विरूद्ध, धर्मग्रंथाविरूद्ध आणि सर्व पवित्र वंद्य परंपरेच्याविरूद्ध बंड केले. ईश्वराची कल्पना सोडल्यास इतर सर्व बाबतींत फुले पूर्ण बुद्धिवादी दिसतात. त्यांना कोणतीही धर्मसंस्था मान्य नाही. विवेकबुद्धी (कॉन्शन्स) आणि बुद्धी (रीझन) यांचे पृथक् अस्तित्व ते मान्य करत नाहीत. पूजा, भक्ती, प्रार्थना, नामस्मरण, जप इत्यादी गोष्टींची त्यांच्या ईश्वराला गरज नाही. उलट त्या निष्फळ आहेत, असे त्यांचे मत आहे. परलोक, पुनर्जन्म, स्वर्ग, मोक्ष, कर्मविपाक इत्यादी गोष्टी त्यांना मान्य नाहीत.... शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने

ग्रासलेल्या हिंदू समाजातील जनतेला आत्मपरीक्षण करण्याचा पहिला आदेश जोतीबांमुळे मिळाला...''

जोतीरावांची ही धर्मातीत विचारसरणी त्यांच्या काळात केवढ्या बंडखोरीची होती, हे एवढ्यावरून लक्षात येईल. वांशिक अभिमानांना सुरूंग लावण्यासाठी त्यांनी देशस्थ ब्राह्मणांपासून महार–मांगापर्यंत सर्वजण एकाच वंशाचे आहेत व सर्व जण क्षत्रिय आहेत, अशी विधाने केलेली आहेत. त्यांचा 'क्षत्रिय' शब्द क्षेत्रपती यापासून निर्माण झालेला आहे. या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी काही समाजशास्त्रीय आधार दिलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या पोवाड्याचे 'कुळवाडीभूषण पवाडा गातो भोसल्याचा। छत्रपती शिवाजीचा ।।' असेच ध्रुवपद आहे.

### ६.१०.३ मराठा स्त्री : चूल आणि मूल

बऱ्याच मराठा पुढाऱ्यांच्या मनात आपली जात लढाऊ असल्याचा अहंकार असतो. छत्रपती शिवाजीमहाराजांचा वारसा मराठे सांगतात. वास्तविक इंग्रजांनी सैन्यामध्ये प्रवेश देताना भेदनीतीचा वापर अगदी बारकाव्याने केलेला आहे. मराठ्यांतील पंचकुळी, सप्तकुळी, शहाण्णव कुळी हे वंशभेद कोठल्या आधारावर निर्माण झाले आहेत? मानववंशशास्त्राचा याला काहीही आधार नाही. वांशिक अभिमान बाळगणे हे जोतीराव फुल्यांच्या विचाराशी प्रतारणा करणारे नाही काय? मला तर त्याच्या पुढे जाऊन सांगावयाचे आहे, की स्त्रीचे स्वातंत्र्य नाकारण्यात या अहंकाराची जोपासना आहे. आपल्या घराण्यातील स्त्रीला विधवा झाल्यानंतर पुनर्विवाहाचा हक्क नाकारला जातो, यात कोणता पुरूषार्थ आहे? आणि मराठा जातीतील कुणबी व पाटील यांच्यामध्ये पुनर्विवाहाची चाल आहे; परंतु आपण उच्चकुलीन आहोत, हे दाखवण्यासाठी ही बाब झाकून ठेवण्यात येते. याचे परिणाम किती गंभीर असून शकतात, याचे प्रत्यंतर मराठा स्त्रियांच्या शैक्षणिक मागासलेपणात दिसून येईल.

या स्त्रिया 'चूल आणि मूल' यांत किती गुरफटून गेलेल्या आहेत, याचा अनुभव हडपसरला दवाखान्यात काम करताना आला. तो नमूद करण्यासारखा आहे.

औषधासाठी आलेल्या शेतकरी भगिनीला सहज विचारले असे, ''काय बाई, मुलाची तब्येत कशी आहे? टायफॉइड आहे; सांभाळा हं.''

बाईचे सहजोद्गार, ''त्यो अभ्यासच लई करतो, बघा. शाळंच्या काचानं त्याची तब्येत बिघडली...''

मी – ''बाई, टायफॉईडचा आणि अभ्यासाचा संबंध नसतो. खाण्या–पिण्यातून हे दुखणं येतं!''

बाई – ''अवो, खाण्यापिण्यातनं वाईटवकट घालाया आमाला कुणी दुस्मन न्हाई, बगा. म्या बाहेरवशाचं समदं बगितलं. हे अभ्यासानंच झालंय, बगा. लई काळजी करतो.... मी म्हणते, काय करायचं आपल्याला शिकून, काय बालिस्टर व्हायचयं? घरी चांगली जिमीन–जुमला आहे. नांगरच धरायचा ना एवढं शिकून....''

मी – ''अहो, असं कसं म्हणता?''

बाई – ''जाऊ द्या, बघा! अवो, एवढी वाढावली वर्तावली, आता एकदा त्यांचे दोनाचे चार हात झाले, म्हंजी मी सुटले! जल्म दिला ना मी!''

ही ग्रामीण भागातील प्रवृत्ती आहे.

जोतीराव फुल्यांनी भारतात स्त्री–शिक्षणाची सुरूवात केली. तिचा फायदा केवशपत व सती जाणे या प्रथा पाळणाऱ्या ब्राह्मण समाजाने पहिल्या प्रथम घेतला. पुण्याच्या सदाशिव पेठेत सुशिक्षित पदवीधर महिलांचे प्रमाण २५ ते ३० टक्क्यांपर्यंत सापडते; परंतु बहुजन समाजात ते एक–दीड टक्काही आढळत नाही! १९६१ च्या शिरगणतीत पुण्यातील साक्षरतेच्या प्रसाराची उद्बोधक आकडेवारी सापडते. सदाशिव पेठेत स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ८५%, तर महात्मा फुले यांचे वास्तव्य ज्या गंज पेठेत, तेथे मात्र अवघे ९%!

फुल्यांनी पुरूषांपेक्षा स्त्रीला श्रेष्ठ मानले आहे. ते म्हणतात, ''एखाद्या स्त्रीने आजपावेतों जर धर्मपुस्तक केलें असतें, तर मानव पुरूषांनीं एकंदर सर्व स्त्रियांच्या हक्कांविषयी हयगय करून त्यांनी आपल्या पुरूषजातीच्या हक्कांविषयी मात्र वाचाळपणा केला नसता. कारण स्त्रिया जर ग्रंथ लिहिण्याजोगत्या विद्वान असत्या, तर पुरूषांनी असा उघड गोमा करून पक्षपात केला नसता.''

''स्त्री–स्वातंत्र्याचा एवढा मोठा उद्गाता अमेरिकेतही अद्याप जन्माला आलेला नाही,'' असे या विषयाचा सखोल अभ्यास केलेल्या गेल ऑम्व्हेट या अमेरिकेन विदुषीने

म्हटले आहे. अमेरिकन पुरूषांबद्दल तक्रार करताना त्या म्हणतात. ''अमेरिकेतील तरूण आजमितीस 'वुई शॅल नॉट वर्क अण्डर द वूमन'– आम्ही स्त्रीच्या हातांखाली काही झाले, तरी काम करणार नाही, असे बोलतात. इतकेच नव्हे, तर हे तरूण म्हणतात, अमेरिकेच्या घटनेत ऑल मेन आर ईक्वल, बट नॉट वूमेन, असे म्हटले आहे. महात्मा जोतीराव फुल्यांची झेप केवढी अफाट होती, हे यावरून लक्षात येते; परंतु फुल्यांचे नाव घेणारे पुढारी कोल्हापुरात आपल्या घरच्या लग्नप्रसंगी आजही संपूर्ण गोशा पाळतात व त्याबाबत ना.यशवंतराव मोहितेंसारख्यांना काहीही वाटत नाही, ही मोठी दुःखद बाब आहे!''

### ६.१०.४ ही विसंगती का खटकू नये?

फुल्यांनी व फुल्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकरी व मजुरांच्या चळवळी उभारल्या. फुल्यांनी आपल्या चळवळीची मुहूर्तमेढ शेतकऱ्यांत रोवली, असे म्हटले तर अतिशयोक्तीचे होणार नाही. (काहीं मार्क्सवादी मंडळी शेतकी क्रांतीचे श्रेय चीनच्या माओला देतात, हे या वेळी मुद्दाम नमूद करतो.) कष्टकरी जीवनाबद्दल फुल्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात सत्यवर्तन करणाऱ्याची व्याख्या सांगितली आहे, ''स्त्री अथवा पुरूष, जे शेतकी अथवा कलाकौशल्य करून पोटें भरणारांस श्रेष्ठ मानितात, परंतु शेतकरी वगैऱ्यांस मदत करणारांचा आदरसत्कार करतात, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.''

महात्मा जोतीराव फुल्यांनी स्वतःच्या घरची विहीर अस्पृश्यांसाठी खुली केली आणि आजचे राज्यकर्ते महात्मा फुले व महात्मा गांधीचे नाव घेत प्रत्येक खेड्यात स्पृश्यास्पृश्यांसाठी वेगवेगळ्या विहिरी बांधत आहेत! ही विसंगती का खटकू नये? खेडोपाडी आज दलित बांधवांवर कोण अन्याय करत आहे? दलित हेडमास्तरांच्या थोबाडीत भडकाव... दलितांना सरकारी जमिनीवरून हुसकावून दे... होळीला विस्तव मिळाला नाही, म्हणून सबंध वस्तीला आग लावून दे... असे प्रकार का घडतात? प्रत्येक खेड्यातील या टगेगिरीला मानसिक सामर्थ्य कुठून मिळते? खेड्यातील महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही तीच तऱ्हा! अनेक महिलांनी आत्महत्या केल्या; परंतु हे समाजमन मोठे बधिर झालेले आहे. या बधिर मनाची प्रेरणा कोणती?

१९७९ साली पेरूमलराव समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. समितीने आपल्या अहवालात अनेक नोंदी केल्या आहेत. अस्पृश्यता गुन्हा ठरवणारा कायदा १९५५ साली संमत झाला; परंतु त्या कायद्याच्या पुस्तिकेची प्रत अनेक जिल्हा निरीक्षकांच्या कचेरीतही सापडली नाही. कित्येक पोलीस अधिकाऱ्यांना अशा प्रकारचा कायदा असल्याचेही माहित नव्हते! या कायद्यात अस्पृश्यता बाळगण्याच्या गुन्ह्यासाठी सहा महिन्यांच्या कारावासाची व पाचशे रूपये दंडाची तरतूद आहे. समिती आपल्या अहवालात म्हणते, ''बहुसंख्य ठिकाणी गुन्हेच नोंदवले जात नाहीत! थोडेफार नोंदवलेच, तर पुढे पुराव्याची मारामार. यातूनही गुन्हा शाबीत झाला, तर बऱ्याच ठिकाणी न्यायालयांनी ताकिदीवरच भागवलेले अगर एक ते पाच रूपये दंडाची शिक्षा फर्मावलेली!''

या कायद्याखाली समितीच्या कालापर्यंत सबंध भारतात जास्तीत जास्त सात दिवसांची शिक्षा झालेली आहे! समितीने महाराष्ट्र राज्यातील शिरसगाव प्रकरणाचा उल्लेख केलेला आहे. हरिजन महिलेची घोर विटंबना येथे झाली. समितीने महाराष्ट्र शासनाचे एक उदाहरण आपल्या अहवालात नोंदवले आहे. भुसावळजवळील कुऱ्हेगावाला अस्पृश्यतानिवारण–कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने पाचशे रूपयांचे बक्षीस दिलेले आहे. याच गावात पूज्य विनोबाजी भावे यांचा भूदान पदयात्रेत मुक्काम झालेला आहे. समितीने या गावाला मुद्दाम भेट दिली. समितीला या आदर्श गावात काय आढळावे? गावातील न्हावी अस्पृश्यांची अजूनही हजामत करत नाहीत व धोबी कपडे धुण्याचे नाकारतात !

मातीच्या गणपतीची सोंड तुटली, गाईला धक्का लागला, महादेवाच्या पिंडीवर हिरवे फडके टाकले, म्हणून महाराष्ट्रात दंगली उसळतात, रक्तपात होतो. काही माणसांचे प्राण जातात; परंतु अस्पृश्य बांधव व स्त्रियांची विटंबना झाली, तर समाज थंडपणाने पाहत बसतो. 'ठेविलं अनंतें तैसेंचि राहावें। चित्तीं असू द्यावें समाधान' ही टाळकुटेगिरी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने टाळ–मृदंगाची देणगी प्रत्येक खेड्याला दिली आहे! महात्मा फुल्यांनी या संतांची संभावना 'पायलीचे पंधरा व अधोलीचे सोळा' अशा शब्दांत केलेली आहे.

**६.१०.५ सांस्कृतिक क्रांतीची भाषा बोलणे सोपे...**

आजचे मराठा नेतृत्व श्रमाची प्रतिष्ठा मानते, यावर माझा विश्वास नाही. राज्यात दहा–बारा औद्योगिक कलह व मजूर कायदे आहेत. २३०४ कामगार संघटना आहेत; परंतु राज्यातील किती कष्टकऱ्यांना याचा फायदा मिळतो? बहुसंख्याकांचा व्यवसाय शेतीचा. पन्नास लाख शेतमजुरांसाठी आज एकही कायदा नाही. मुंबई– पुणे–नागपूर सोडल्यास बहुसंख्य शहरांतील कामगार या कायद्यांपासून वंचितच आहेत. त्यामुळेच आज महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजूर, सालगडी, हमाल, छोट्या– मोठ्या कारखान्यांतून काम करणाऱ्या महिला इत्यादी प्रत्यक्ष श्रम विकणाऱ्यांना न्याय मिळत नाही व त्यांचे हितसंबंध रक्षण करण्याची बुद्धी महाराष्ट्र सरकारला होत नाही! कष्टकऱ्यांना सतावणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा होत नाही. पुण्यातील उदबत्तीच्या कारखान्यात गरीब महिलांनी आपली संघटना केली व मालकाकडे वेतनवाढ व बोनसची मागणी केली. त्यांची केस औद्योगिक न्यायालयात चालली, पण न्यायालयाचा निर्णय मालकाने मानला नाही. प्रकरण उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाने या महिलांना बोनसदाखल १०,००० रूपये मालकाने द्यावेत, असा निकाल दिला; परंतु प्रत्यक्षात मालकाने बहुसंख्य स्त्रियांना कामावरून काढून टाकले! खाजगी तडजोड केली व २,५०० रूपये कबूल केले, परंतु तेही दिले नाहीत.

वर उपस्थित केलेल्या चर्चेत मी सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा जोतीराव फुले यांचे विचार उद्‌धृत केले आहेत व महाराष्ट्र राज्यातील परिस्थितीचा मागोवा घेतला आहे. महात्मा फुल्यांचे विचार व आजच्या मराठा नेतृत्वाची भूमिका यांचा ताळमेळ कसा लावायचा? माझी तक्रार सर्व साम्यवादी व समाजवादी पक्षांबद्दल आहे, हे ही पुन्हा सांगतो. सांस्कृतिक क्रांतीची भाषा बोलणे सोपे असते; परंतु त्या क्रांतीला सामाजिक आशय आवश्यक आहे, याचा विसर पडू देता उपयोगी नाही, उजव्या–डाव्या पक्षांचे पुढारी कामगारांच्या संघटना उभारतात. वर्गलढ्याची भाषा बोलतात. पोलादी एकजुटीची संघटना होते; परंतु क्रांतीसाठी आसुसलेला कामगार वर्ग किमान सामाजिक समतेचा विचार स्वीकारतो का, याचे उत्तर प्रामाणिकपणे दिले पाहिजे, माझ्या मते कामगार चळवळी व वर्गलढे यांत फरक पडण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीने, शिक्षणप्रसारामुळे, औद्योगिक क्रांतीने, ज्ञानाच्या प्रगतीने, आर्थिक क्रांतीने सर्व बदल आपोआप घडतील, असा आशावाद वर्षांनुवर्षे बाळगण्यात आला. शेवटी आंबेडकरांना धर्मांतराने प्रश्न सुटेल, असे वाटले, परंतु यांपैकी कशाने बदल झाला आहे? सांस्कृतिक मूल्ये जागच्या जागी आहेत. मुसलमानांकडे बोट दाखवावे; मराठ्यांनी ब्राह्मणांकडे बोट दाखवावे; महारांनी मराठ्यांकडे बोट दाखवावे, असा एक कटू अनुभव नेहमी येतो. आता हा खो-खोचा खेळ किती दिवस चालणार? मुसलमान चार बायका करतात, ही बाब केव्हाही गर्हणीय आहे, असेच म्हटले पाहिजे; परंतु त्याकडे बोट दाखवणारा ब्राह्मण तरूण मुंजीच्या संस्काराचा त्याग का करत नाही? एका तरूणाला मी हा प्रश्न विचारला. त्याने उलट विचारले, ''काय बिघडले?''

मी म्हटले, ''उपनयन-संस्काराचा हक्क सर्वांना नाही. हा संस्कार मुलाच्या मनात जन्माधिष्ठित उच्चपणाचा भाव निर्माण करतो.''

त्या तरूणाने प्रश्नाचे उत्तर टाळण्याचा प्रयत्न केला. खरे बोलायचे म्हणजे ब्राह्मणी मनात काही कल्पना कायमच्या घर करून राहिल्या आहेत. विज्ञानाच्या क्षेत्रात ज्ञानार्जनासाठी ते धडपडतात. याच विज्ञानाने घरबांधणीचे तंत्र बदलले. नव्या स्वयंपूर्ण गृहरचनेत संडासाची बांधणी चुलीशेजारी होत आहे. संडासाला घरात प्रवेश देणारे मन भंग्याला मात्र घरात प्रवेश नाकारते! या ढोंगीपणाला काय म्हणावे? असेच प्रकार मराठी मंडळी करतात. एका विहीरीचे पाणी चालत नाही; परंतु हातभट्टीच्या रसायनाला शिवाशीव नसते! तेथे तर उष्टा ग्लासही चालतो! श्रीमंत मराठ्यांत धार्मिक समारंभाचे वेड वाढते आहे. महारही मराठ्यांचे अंधानुकरण करू लागले आहेत. त्यांना इतर जातींचा स्पर्श सहन होत नाही! हे आजचे घातचक्र आहे.

डॉ.इरावती कर्वे म्हणतात, ''गुजरातमध्ये ह्या दिवसांमध्ये अतिशय जोराने पुढे सरसावलेला शेतकरी-वर्ग पाटीदार आहे. दुर्दैवाने पाटीदारांना कुठल्याही तऱ्हेचे क्षत्रियत्व चिकटलेले नाही. वाटेल ते काम नाक घासून करायला ते तयार असतात. आणखी आमच्याकडचे जे मराठी आहेत, ते ब्राह्मणांना जसे ब्राह्मणत्व चिकटले आहे, तसे त्यांना क्षत्रियत्व आणि कुळी चिकटली असल्यामुळे, पाटीदारांइतकेच जोमाने पुढे सरसावलेले नाहीत. अजून ते आपले क्षत्रियत्व आणि कुळी यांतच अडकून पडलेले आहेत.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'मुक्ति कोन पथे?' या पुस्तकात लिहितात, ''हिंदूंतील समाजसुधारकांबाबत कोणाचे काय मत असेल, ते असो. माझ्या मनात त्यांच्याबद्दल अत्यंत तिटकारा आहे. मला त्यांचा चांगला अनुभव आहे. आणि या अर्धवट लोकांचा मला अगदी वीट आला आहे. ज्या लोकांना आपल्या जातीत राहावयाचे आहे; आपल्या जातीत मरावयाचे आहे; अशी खोटी वल्गना करावी व त्या वल्गनेवर अस्पृश्य लोकांनी विश्वास ठेवला नाही, म्हणून संतप्त व्हावे, ही गोष्ट मोठी आश्चर्यांची आहे!''

### ६.१०.६ फुले – शाहू : विचार मांडणीत मूलभूत फरक

महाराष्ट्राच्या इतिहासाने फुले, आगरकर, लोकहितवादी, सावरकर, पंडिता रमाबाई या सर्वांनाच गिळंकृत केले की काय, अशी शंका येऊ लागते! काही समाजसुधारकांना चातुर्वण्यविरहित हिंदू समाजाची निर्मिती शक्य आहे, असे वाटत आहे; परंतु तो निव्वळ भ्रम ठरलेला आहे आणि आजचे नेतृत्वही पांगुळ्याप्रमाणे झाले आहे. भावी काळात हे प्रश्न आपोआप सुटतील, असा पोकळ आशावाद व्यक्त करत आहेत, हा सत्यशोधकी वारसा सांगणाऱ्या नेतृत्वावर माझा आक्षेप आहे. चातुर्वर्ण्यावर अधिष्ठित समाजरचना मोडण्याचे तर राहू देत, परंतु ती समाजरचना बळकट करण्याचेच काम मराठा नेतृत्व करत आहे. याला काही ऐतिहासिक कारणे असावीत. ५०–७५ वर्षांचा इतिहास त्यासाठी तपासून पाहावा लागेल. प्रचलित घटनांची काही बीजे इतिहासात नेहमीच आढळतात. मुंबईत शिवसेनेच्या चळवळीत दाक्षिणात्यांच्या विरूद्ध प्रचार होतो. परंतु प्रबोधनकार ठाकरे (बाळ ठाकरे यांचे वडील) यांच्या लिखाणात 'गूळ तेथे माशी व व्हेकन्सी तेथे मद्रासी!' अशा म्हणी चाळीस–पन्नास वर्षापूर्वीच आलेल्या आहेत.

महात्मा जोतीरावांच्या सत्यशोधक चळवळीची सुरूवात १८७३ साली झाली; पण त्यांचे कार्य त्याअगोदरच सुरू झाले. तेंव्हापासून आतापर्यंतचा कालखंड विचारात घेतला पाहिजे. १८९४ साली राजर्षी शाहू महाराजांचा राज्याभिषेक कोल्हापूरला झाला आणि १९०० सालात वेदोक्ताचे प्रकरण घडले. महाराज क्षत्रिय नाहीत, तेव्हा त्यांना वेदमंत्रांचा अधिकार नाही, असे त्यांना ब्राह्मण राजोपाध्यांनी सुचवले व पुराणोक्त मंत्र म्हणण्याचाच आग्रह धरला! छत्रपती शिवाजी महाराजांना हाच अनुभव आला होता. कोल्हापूरात शिवाजी क्लबाच्या

चळवळीला पाठिंबा देणाऱ्या लोकमान्य टिळकांनी राजोपाध्यायांना कानपिचक्या द्यावयाचे बाजूलाच राहिले; उलट महाराजांनाच दूषण दिले! या घटनेचे पडसाद साऱ्या महाराष्ट्रात उमटले आणि ब्राह्मण–ब्राह्मणेतरवादाचा वणवा भडकला. त्याचे विखार आजही जाणवतात.

राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक यांचा कालखंड व त्यात घडलेल्या घटना नीट तपासल्या पाहिजेत. शाहू महाराजांचे कार्य अफाट आहे; परंतु त्यामागे वेदोक्तातील अपमानाची पार्श्वभूमी व जोतीरावांच्या सत्यशोधक चळवळीचा इतिहास आहे. वेदोक्तानंतर महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर चळवळीचा झंझावात सुरू झाला आहे. महाराजांच्या प्रेरणेने शिक्षणप्रसाराची लाट सुरू झाली. अनेक संस्था आणि वसतिगृहे सुरू झाली. अनेक परिषदा भरल्या. महाराजांनी जागोजाग मार्गदर्शन केले. ब्राह्मणेत्तर चळवळीच्या मागे ते पर्वतासारखे उभे राहीले! शंकराचार्यांचे नवे पीठ त्यांनी तयार केले व वेद–शिक्षणाची शाळा काढली. राजघराण्यांतून आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. कोल्हापूर संस्थानात अनेक कायदे केले. आगरकरांच्या 'सुधारका'ला मदत केली व डॉ.आंबेडकरांना भेटायला ते मुंबईला बी.आय.टी. चाळीत स्वतःहून गेले. महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा ओघ महाराजांकडे वळला. महाराजांच्या कार्याला संस्थानाधिपतीची मर्यादा स्वाभाविकच होती. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी समाजसुधारणेची चळवळ मागे टाकावयास लोकमान्य टिळक तयार झाले, असे नेहमी बोलले जाते; परंतु राजर्षी शाहू महाराज, आगरकर, पंडिता रमाबाई यांची संभावना टिळकांनी योग्य प्रकारे केली नाही, हे मान्य केले पाहिजे. टिळक हे सनातनी होते, सुधारणावादी नव्हते, हे स्पष्ट आहे. तेव्हा स्वातंत्र्याच्या चळवळीत समाजसुधारणेमुळे फूट पडते, म्हणून टिळक समाजसुधारणेला विरोध करत, हे एक लंगडे समर्थन आहे. जोतीराव फुल्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या व स्वतःच्या घरची विहीर अस्पृश्यांसाठी खुली केली. राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांना वकिलीच्या सनदा दिल्या. आक्कामहाराजांच्या लग्नात महारांच्या कमरेला तलवारी लटकावून त्यांना वरातीत सामील करून घेतले. कोल्हापूरात भरवस्तीत कांबळे नावाच्या अस्पृश्याला हॉटेल उघडून दिले. फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची रूपरेषा दाखवणाऱ्या या घटना सारख्या असल्या, तरी दोघांच्या विचारमांडणीत मूलभूत फरक होता.

आर्य धर्मावर, वैदिक हिंदू धर्मावर छत्रपती शाहू महाराजांची श्रद्धा होती. ते आर्य समाजाच्या विचाराचे असून मूर्तिपूजा करत राहिले! महात्मा फुले यांचे विचार त्यांना एका टोकाचे वाटत. प्रत्येक जातीने आपले संघटन करावे व ज्ञाति–पुढाऱ्यांनी शिक्षणप्रसाराच्या द्वारे आपल्या जातीची प्रगती करावी, अशी त्यांच्या कार्याची दिशा होती. प्रसंगी त्यांनी स्वतःला कष्टकरी, शेतकरी म्हणवून घेतलेले आहे. त्यांना फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म संपूर्णपणे मान्य होता, असे म्हणता येणार नाही. महाराजांचा ओढा मराठ्यांना क्षत्रिय म्हणून मान्यता मिळावी, याकडे अधिक होता. त्यांची क्षत्रियत्वाची कल्पना चातुर्वर्ण्य पद्धतीशी मिळतीजुळती होती. त्यांचा ब्राह्मण विरोधी पराकोटीचा होता. ब्राह्मणेत्तरांचा पक्ष तयार व्हावा, यासाठी त्यांनी अपार मेहनत घेतली. महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळ व मद्रासमधील ब्राह्मणेत्तर चळवळ यांची एकजूट व्हावी, असेही त्यांना वाटे. अनेकदा ते आपली भूमिका स्पष्ट शब्दांत मांडत.

''ब्राह्मणेतराची चळवळ यशस्वीपणाने कशी चालवावी, हे आपणांस मद्रासकडून शिकले पाहिजे. यासाठी मद्रासचे वक्ते आणू या व पुण्या–मुंबईस त्यांनी केलेल्या कामाची जाणीव करून देऊ या. मुंबई–पुणे येथील ब्राह्मणेतर या चळवळीच्या चिकाटीत मद्रासपेक्षा फारच मागे आहेत. तेथील ब्राह्मणेतरांच्या, पुढाऱ्यांच्या शिक्षणामुळे आमचे पुढारी म्हणजे केवळ मुलाप्रमाणे शोभतील. एखाद्या विवक्षित जातीचे लोक तुम्हांला मदत करतो, म्हणून पुढे येतील. त्यांच्यावर विश्वास ठेवू नका व स्वस्थ बसू नका. 'जो दुसऱ्यावरती विश्वासाला, त्याचा कार्यभाग बुडाला,' हे ध्यानी ठेवा. ब्राह्मणेतर बंधूंनो, पुष्काळ ब्राह्मण लोक सावधपणाने ढोंग करून तुम्हांस मदत करण्याकरता म्हणून पुढे येतील; परंतु त्यांच्यावर बिलकूल विश्वास ठेऊ नका.''

स्वातंत्र्य–चळवळीतील महात्मा गांधींबद्दल त्यांनी आदराचे उद्‌गार काढले आहेत; परंतु असहकाराच्या चळवळीला त्यांनी पाठिंबा दिला नाही, उलट विरोध केलेला आहे. 'माझी मते' या शीर्षकाखाली त्यांनी आपली मते छापून प्रसिद्ध केलेली आहेत. त्यांचा स्वातंत्र्याच्या मागणीला विरोध नव्हता; परंतु येणारे स्वातंत्र्य बहुजन समाजाला हजारो वर्षे सामाजिक बंधनांत गुंतवून ठेवणाऱ्या ब्राह्मणांच्या हाती जाईल, असे भय त्यांना वाटे. टिळक

व छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सामाजिक सुधारणा व राजकीय स्वातंत्र्याची चळवळ या जणू काय परस्परांच्या विरोधी उभ्या राहिल्या आहेत. जातीनिहाय संघटना बांधणे, यात कोणाला काही गैर वाटत नव्हते. मराठा जातीची वेगळी संघटना १९१६ च्या दरम्यान पुण्याला तयार करण्यात आली ('ऑल इंडिया मराठा लीग' व 'मराठा शिक्षण परिषद') मराठा जातीसाठी वेगळ्या मराठा मतदारसंघाची मागणी १९१७ सालीच केली! 'ऑल इंडिया मराठा लीग'ने 'पार्लमेंटरी सिलेक्ट जॉइंट कमिटी'ला तशा अर्थाने निवेदनही दिले आणि पुढे त्याचा परिणाम म्हणून इंग्रज सरकारने मराठा व अलाइड जमातींसाठी सहा जागा राखीव ठेवल्या. महाराजांनी निवेदनात एका ठिकाणी म्हटले, ''हाती कसब आणि धंदा असलेल्या तेली, तिलोरी, सोनार, सुतार, लोहार, एवढेच काय, महार–मांगापेक्षाही मराठ्यांची स्थिती वाईट आहे.''

खामगाव येथील अकराव्या मराठा शिक्षण परिषदेत ३१ डिसेंबर १९१७ रोजी मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल महाराजांनी जाहीर निर्वाळा दिला. त्यांच्या याच भूमिकेचे पडसाद पुढे जेधे–जवळकरांच्या भूमिकेत उमटले. महाराजांच्या काळात सत्यशोधक चळवळीत मराठा समाज हा अलग झाला व त्याचे संघटनही झाले.

**६.१०.७ 'त्यांनी ब्राह्मण्याचा धिक्कार केलाच नाही...'**

शाहू छत्रपतींच्या काळानंतर जेधे–जवळकर व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जमाना सुरू झाला. डॉ.आंबेडकरांची चळवळ व जेधे–जवळकरांची सत्यशोधक चळवळ एकरूप का झाल्या नाहीत, याला नीटपणे उत्तर दिले पाहिजे. इंग्रजांचे इथले अस्तित्व हे मान्य करूनही काही प्रश्न शिल्लक राहतात. महाडच्या सत्याग्रहाला व नाशिकच्या काळाराम मंदिरप्रवेश आंदोलनाला जेधे–जवळकरांनी शाब्दिक पाठिंबा दिला; परंतु आंबेडकरांनी आपल्या चळवळीतून ब्राह्मण वगळावेत, अशी अट घातली. ब्राह्मणांच्या विरोधाने आंबेडकर, जेधे–जवळकर एकत्र आल्यासारखे दिसतात. जवळकरांच्या 'देशाचे दुश्मन' या पुस्तकातील खटल्यात डॉ.आंबेडकरांनी त्यांचे वकीलपत्र घेतले होते.

पुढच्या काळात जवळकर कालवश झाले व जेधे कॉँग्रेसमध्ये गेले, परंतु या वेळेला जेधे घराणे देशमुखीकडे वळले, ही घटना खास नमूद करण्यासारखी आहे. मराठ्यांचे नेतृत्व

बहुजनसमाजाने ब्राह्मणेत्तर चळवळीत स्वीकारले, ते अपरिहार्य होते; परंतु त्याच वेळी मराठेत्तरांच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे, असे दाखवणारी काही विधाने या काळात सापडतात. क्षत्रियत्वाची भूमिका घेऊनही शाहू महाराजांना सर्वसंग्राहकता ठेवता आली, ती त्यांच्यानंतरच्या काळातील नेत्यांना घेणे अवघड होते. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. आजच्या मराठा नेतृत्वाच्या वैचारिक भूमिकेचा उद्‌गम येथे सापडतो. याच काळात विधायक शैक्षणिक कार्यात व अंत्योदयास वाहून घेतलेल्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या ऋषितुल्य माणसावर मराठा जातीने बहिष्कार टाकला होता व 'महार' म्हणून त्यांची भर पंक्तीतून हकालपट्टी केलेली होती! अस्पृश्यांच्या बाबतीत, नकळत का होईना, कोणत्या मनोवृत्तीची जोपासना झाली, याचे गमक येथे सापडते.

गेल्या महिन्यात धुळ्याला मी व्याख्यानासाठी गेलो होतो. तेथे पद्‌मश्री डॉ.दादासाहेब घोगरे यांची भेट झाली. जुन्या सत्यशोधक चळवळीतील ते एक नेते मानले जातात. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे संयुक्त छायाचित्र त्यांच्याकडे आहे. कर्मवीर शिंदे यांच्या संभावनेचा उल्लेख करून ते म्हणाले, ''अस्पृश्यांना एका सतरंजीवर बसू दिले, एवढ्यासाठी धुळ्याच्या मराठा समाजाने माझ्यावर बहिष्कार टाकला होता!''

जवळकरांनी अशी एक भूमिका मांडली होती, असे म्हणतात. 'हिंदू धर्मात परत येणाऱ्या माणसास मराठा जातीत घ्यायचे,' ही त्यांची सूचना जशी क्रांतिकारी होती, त्याचबरोबर जेधे यांच्या भूमिकेशी मतभेद दाखवणारीही. या सर्व विवेचनावरून एक निष्कर्ष काढता येणे शक्य आहे. महात्मा जोतीराव फुल्यांनी सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा मूलभूत प्रयत्न केला; परंतु पुढच्या काळात त्याला फक्त हिंदू धर्मसुधारणेचे स्वरूप आले. चिरोल कमिशनपुढे साक्ष देताना व सत्यशोधक समाजाच्या षष्ट्यब्दी समारंभात भाषण करताना भास्करराव जाधवांनी धर्म सुधारण्याचीच भूमिका मांडली होती. ब्राह्मणेतर चळवळीच्या अधोगतीचे विश्लेषण करताना डॉ.आंबेडकर म्हणाले, ''त्यांनी ब्राह्मण्याचा धिक्कार केलाच नाही. उलट गुलाम मनोवृत्तीने त्यांची नक्कल करत ब्राह्मण्याचा हव्यास बाळगला. त्यांच्यापैकी अनेकांनी दुय्यम दर्जाचे ब्राह्मण बनण्याचा प्रयत्न केला.''

सत्यशोधक चळवळीतून केशवराव जेधे काँग्रेसकडे वळले, याचे आणखी एक कारण म्हणजे महात्मा गांधींची समन्वयवादी भूमिका हे होय. रोटी–व्यवहाराला जेध्यांच्या विरोध नव्हता; परंतु बेटी–व्यवहाराला त्यांची मुळीच संमती नव्हती.

### ६.१०.८ मराठा जातीतील श्रीमंतांची मिरासदारी

कै. शंकरराव मोरे यांची वैयक्तिक निर्भर्त्सना काही ब्राह्मण मित्रांकडून झाली, तरी जेधे यांनी विरोधाचा सूर काढल्याचे आढळले नाही! सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा या तिन्हीही बाबतींत सरंजामदारी मूल्यांचा प्रभाव व नेतृत्वावर पडलेला दिसला. याची दोन उदाहरणे देता येतील. 'ऑल इंडिया मराठा लीग'ने पार्लमेंटरी कमिटीला सादर केलेल्या निवेदनात सरदार व जहागीरदारांसाठी दोन राखीव जागा मागितल्या होत्या! शाहू महाराजांची मते खामगाव येथील अकराव्या 'मराठा शिक्षण परिषदे'त व्यक्त झालेली होती. जातिभेद चिरकाल गाडून टाकले पाहिजेत, असे म्हणताना पुढे ते म्हणाले, ''उच्च कुलामुळे अथवा वतनदारपणामुळे येणारा सामाजिक दर्जा जगात सर्व देशांत व सुधारलेल्या समाजांत प्रचलित आहे. राष्ट्राची उभारणी करण्याच्या बाबतीत हा दर्जा कधीही आड आलेला नाही. जातिपद्धतीइतकी ही गोष्ट वाईट नाही. जन्मसिद्ध हक्कांबरोबर कर्तव्यकर्म व जबाबदारी यांची जोड असते.''

माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणेच्या काळात रानडे, गोखले आदी विद्वानांनीसुद्धा इलाइट (elite) समाजाचीच अपेक्षा धरलेली दिसली. महाराष्ट्रात जमीन फेरवाटपाला मराठा वर्ग विरोध करील, अशी भीती वरचेवर व्यक्त केली जाते; कारण शेतीकडे उत्पादनसाधनाऐवजी वनतदारांच्या भावनेने पाहण्याचा दृष्टीकोन या अर्थाने ऐतिहासिक आहे. गौरी देशपांडे आणि जी.एस. सूर्यवंशी आपल्या लेखात म्हणतात, ''चौदाव्या, पंधराव्या आणि सोळाव्या शतकांत मराठा सत्ताधारी नव्हता; पण भारीपैकी जमीनमालक मात्र झालेला होता. या जमिनी त्यांनी एक तर दुबळ्या शेतकऱ्यांकडून लुबाडल्या होत्या किंवा मुस्लीम, सुलतान आणि अन्य सत्ताधाऱ्यांकडून मिळवल्या होत्या.''

कौन्सिल, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा लोकल बोर्ड यांच्या निवडणुकांची सुरूवात ही बाबही सत्यशोधक चळवळीवर परिणाम करणारी ठरली. सुरूवातीच्या काळात सांपत्तिक स्थितीवरच मतदानाचा अधिकार अवलंबून होता. त्यामुळे या संस्थांतून

निरनिराळ्या जातींतील श्रीमंत वर्ग, कॉन्ट्रॅक्टर, व्यापारी, कारखानदार, जहागीरदार असेच श्रीमंत निवडून येत. ब्राह्मण समाजातून सनातनी व सुधारक दोन्ही प्रकारचे पुढारी निवडून येत. पुण्याच्या महानगरपालिकेचा इतिहास प्रसिद्ध झालेला आहे. पुण्यातील काही घराणी पिढ्यान्‌पिढ्या या नगरपालिकेवर प्रतिनिधित्व करत आहेत! मतदानाचा हक्क सार्वत्रिक झाल्यानंतर छोट्या जातींतील श्रीमंतांनाही निवडून येणे अवघड झाले आहे. मराठा जातीतील श्रीमंतांची मिरासदारी मात्र वाढीस लागली आहे! १९६० साली पुणे नगर संस्था शताब्दी ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यामध्ये पान ८९ वर मुदलियार घराणे, नाईक घराणे, शिरोळे घराणे, फुलंब्रीकर घराणे, बारणे घराणे, सणस घराणे यांची व पुणे सबर्बनमध्ये भोसले घराणे व ढोले घराणे या सर्व घराण्यांपैकी मुदलियार, नाईक व फुलंब्रीकर या घराण्यांची वहिवाट बंद झालेली असून शिरोळे, भोसले, ढोले, सणस इत्यादी घराण्यांची वहिवाट १९६७ पर्यंत व आजही चालू असल्याचे दिसून येते. आजचे मराठा नेतृत्व श्रीमंत मराठ्यांचे आहे, या विधानासाठी मी हे उदाहरण पुराव्यादाखल देत आहे. सार्वत्रिक मतदानात छोट्या जातीच्या उमेदवाराला पाडणे सहज सोपे असते; परंतु मराठ्यांची मातब्बरी टिकून राहते, याचे हे ढळढळीत उदाहरण आहे.

या श्रीमंत नेतृत्वाच्या वैचारिक जडणघडणीमुळे ब्राह्मणी संस्कृतीचे पुनरूज्जीवन होण्याचा धोका निर्माण झालेला आहे, असे मला वाटते. साडेतीन टक्के ब्राह्मणांचे नेतृत्व किंवा पेशवाई राज्य येथे येण्याचा धोका मला अजिबात दिसत नाही. शासनातील काही मंडळी, विशेषतः यशवंतराव मोहित्यांसारखे नेते 'लांडगा आला, रे' म्हणून आवई उठवतात. अशी भूमिका जनमानसात घर करून ठेवण्यात सत्ताकांक्षी राजकारणाचा मतलब साधतो. कारण ब्राह्मण–वर्चस्व झुगारून देण्यासाठी सर्व ब्राह्मणेतर संघटित झालेले होते व काही प्रमाणात तो आकस अजून शिल्लक आहे. पुण्यात ब्राह्मणी प्रवृत्तीला 'सदाशिव पेठी प्रवृत्ती' असे टोपणनाव दिले जाते! काँग्रेसचे मुखपत्र दैनिक 'विशाल सह्याद्री'च्या अग्रलेखांतून या शब्दाचा वापर वरचेवर होई. त्यामुळे एस. एम. जोशी, ना. ग. गोरे यांच्यासारख्या समाजवादी नेत्यांची नावे न घेताही जात सहज उद्धरता येई; परंतु यात फार मोठी विनोदाचा भाग असा की, याच सदाशिव, नारायण पेठांतून आजच्या केंद्र सरकारचे दोन मंत्री, सात खासदार, तेरा

आमदार, सात–आठ नगरपिते, काही माजी महापौर व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वास्तव्य करून राहिलेले आहेत! ही वस्तुस्थिती आहे आणि ही संख्या वाढतच आहे. ब्राह्मणांना शिव्या देत ब्राह्मणी संस्कृतीचा हव्यास बाळगणाऱ्या या नेतृत्वाची मजल कोठपर्यंत जाते, याचा मला चांगला अनुभव आहे. गेली चौदा– पंधरा वर्षे पुण्यातील झोपडपट्ट्यांच्या कार्यात माझा संपर्क आहे. सदाशिव पेठेत घरोघरी भांडी घासण्याचे काम करणाऱ्या अनेक मराठा स्त्रिया आहेत. त्यांचे पुरूष शहरात मोलमजुरी करतात. या मराठा कुटुंबांच्या काही वस्त्या सदाशिव, नवी पेठ, डेक्कन जिमखाना भागांत आहेत. त्यांना उठवून लावण्यासाठी सध्याच्या धनवंत मराठा आमदारांनी सनातनी ब्राह्मण पुढाऱ्यांबरोबर संगनमत करून कशी कारस्थाने केली, याची मला माहिती आहे! वास्तविक ही आमदार मंडळी अगदी अलीकडेच सदाशिव पेठेत राहण्यास आलेली आहेत!

महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीची वाट चुकलेली आहे आणि त्यामुळेच सांस्कृतिक चळवळीत कोंडी निर्माण झालेली आहे. राज्यकर्ते राज्य करताना या प्रश्नांची उकल करून घ्यावयास तयार नाहीत, कारण त्यांच्या सत्तेला हे एक आव्हानच आहे. विरोधकांची ताकद अतिशय अल्प आहे. उलट त्यातील काही प्रवाहांचा जन्म याच वैचारिक भूमिकेतून झाला आहे व काही प्रवाह ब्राह्मण वर्गातील नेतृत्वामुळे शापित झालेले आहेत. समतेची व समाजवादाची चळवळ महाराष्ट्रात कुंठित झालेली आहे.

### ६.१०.९ सत्तेबरोबरच संपत्तीसंचय

चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे राज्य महाराष्ट्रात पकड घेऊ पाहत आहे. या माझ्या विधानाच्या पुष्ट्यर्थ आणखी एक पुरावा मला सादर करावयाचा आहे. महाराष्ट्राची शासन व्यवस्था खेड्यापासून राजधानीपर्यंत जुन्या सरंजामदारी प्रवृत्तीने वावरते. सत्यशोधकांच्या चळवळीत जेधे–जवळकरांनी 'शेटजी–भटजी' उपाधी वापरली; भटजी–प्रवृत्तीचा समाचार यापूर्वीच घेतला आहे; परंतु शेटची–प्रवृत्तीचे काय? आजचे मराठा नेतृत्व सत्तेबरोबरच संपत्तिसंचयाच्या मागे लागलेले आहे, असा माझा आरोप आहे. निवडणुकांच्या राजकारणात सत्ता, संपत्ती व संख्येला अनन्यसाधारण महत्त्व असते! 'इकॉनॉमिक वीकली'च्या ९, ११ व १७ जुलैच्या अंकांत महाराष्ट्र राज्यातील भांडवली परिस्थितीसंबंधी (कॅपिटल स्ट्रक्चर) काही

उद्बोधक माहिती प्रसिद्ध झाली आहे. त्यामध्ये मालकीचा क्रम एक गुजराती, दोन मारवाडी, तीन पारशी, चार सिंधी व पाच महाराष्ट्रीय असा दिलेला आहे. दहा वर्षापूर्वी महाराष्ट्रीयांचा क्रमांक तिसरा होता; मग महाराष्ट्रीयांच्या या अवनतीचे नेमके कारण काय? उभ्या महाराष्ट्राची आणि सर्व मराठी माणसांची दानत वाढवण्याचा संकल्प कोठे गेला? श्रीमंत मराठ्यांचे नेतृत्व आपल्या श्रीमंतीचे साम्राज्य वाढवण्याच्या मागे लागले आहे. महाराष्ट्रातील शेटजी–प्रवृत्तीबरोबर त्यांचे विलक्षण मेतकूट जमलेले आहे! मराठी माणसाला व्यापार–उदीम जमणाराच नाही व जमत नाही, असा एक न्यूनगंड सर्वत्र बोलला जातो. याचीही कारणमीमांसा नीटपणे तपासली पाहिजे. महाराष्ट्र शासनात व मंत्रिमंडळात शेटजी–प्रवृत्तीचा प्रभाव खूप वाढलेला आहे! याचे कारण हा न्यूनगंड नसून संपत्तिसंचयाने नेत्यांना जडलेले अनावर व्यसन हेच देता येईल.

महाराष्ट्र राज्य हौसिंग को–ऑ. बँकेच्या चेअरमनपदी श्रीमान जवाहरलालजी दर्डा आहेत. नामदार वसंतराव नाईक व नामदार आबासाहेब पारवेकर देशमुख यांचे व दर्डा शेटजींचे प्रेमाचे व्यावहारिक संबंध सर्वांना माहीत आहेत! कऱ्हाडहून पुण्याला आलेले भारत फोर्जचे श्रीमंत कल्याणी शेट नामदार यशवंतरावजी चव्हाण यांचे मित्र, भारत फोर्जचा कारखाना उभारण्यासाठी पुण्यात त्यांना खास जागा व जकातीची माफी मिळाली! धुळ्याचे संचालक बाफना बिर्लांच्या हिंदुस्थान मोटर्सचे एजंट व मराठवाडा सिमेंट फॅक्टरीचे संचालक. महाराष्ट्राच्या मंत्र्यांची व यांची किती मैत्री असावी! २६ एप्रिल १९७० ला शेटजींच्या मुलीचे लग्न धुळे येथे झाले लग्नाचा थाट काय वर्णावा! खास सुवर्णाक्षरात छापलेली अप्रतिम निमंत्रणपत्रिका, मुंबईच्या सिनेसंगीत पार्श्वगायिकेने गायिलेली मंगलाष्टके या साध्या बाबी झाल्या. अकलूजच्या शंकरराव मोहित्यांनी मुलामुलींच्या लग्नात विहिरीत बर्फाच्या लाद्या टाकल्या होत्या, असे म्हणतात! परंतु संचालक बाफना यांनी ५००० लोकांना बसता येईल, असा लग्नमंडप अवतीभोवती बर्फाच्या खास भिंती उभ्या करून वातानुकूलित केला होता! जेवणाच्या थाटाचे वर्णन किती करावे? शेटजींनी मुलीला अनेक चिजा दिल्या. मारवाडी समाजात त्याला पेरावणी म्हणतात. पेरावणीचे प्रदर्शनही केले जाते! त्यात चांदीच्या ताटात पंचवीस हजार रोख रूपये ठेवले होते, म्हणतात! वरासाठी खास ॲम्बॅसिडर गाडी सजवून

आंदण दिली होती! तिचेही प्रदर्शन होते. जडजवाहीर, दागदागिने, कपडालत्ता, फर्निचर, गालीचे या साऱ्याच वस्तू होत्या. (महाराष्ट्रात हुंडापद्धतीविरूद्ध कायदा आहे, असे म्हणतात!) या थाटाच्या समारंभाला महाराष्ट्र राज्याचे १३ मंत्री हजर होते! 'मुख्यमंत्री वसंतराव नाईक, प्रदेशाध्यक्ष वसंतदादा पाटील व वसंत ऋतू या तीनही वसंतांची बहार धुळ्याला झाली,' असे एका कवीने आपल्या काव्यात नमूद करून ठेवले आहे! जेधे-जवळकरांना पाहताना नक्की शंका आली असेल, कोण बदलले? शेटजी, भटजी की सधन मराठे? या लग्नाचा साखरपुडा मुंबईच्या ताजमहाल हॉटेलात झाला. तेथे सौ.वत्सलाबाई नाईक व सौ. वानखेडे खास हजर होत्या! महाराष्ट्रात चंद्रभान धाकलिया, जवाहरलाल मुनोत, खुटोल, मोहनशेठ लुंकड अशी बरीच मोठी प्रस्थे आहेत. ही यादी बरीच लांबवता येईल. चौगुले, किर्लोस्कर, गरवारे हेही यात आहेत, हे आवर्जून सांगितले पाहिजे! महाराष्ट्रातील एक मोठे भांडवलदार मध्यावधी निवडणुकीच्या काळात अगदी अर्ज भरण्याच्या दिवशी ना. यशवंतराव चव्हाणांकडे सपत्नीक गेले होते. त्यांनी त्यांना विनंती करून सांगितले म्हणतात की, निवडणुकीसाठी काही मागण्याचा आपला हक्क आहे. गाड्या, विमाने-सर्व काही! त्यांच्या विमानाचा वापर झाला असल्याची माहिती मला तुरूंगवासाची शिक्षा होऊनही गजाआड न जाणाऱ्या एका धनाढ्याला संरक्षण कसे मिळाले, याची वाच्यता महाराष्ट्र विधानसभेत यापूर्वीच झालेली आहे. अगदी अलीकडचे उदाहरण द्यावयाचे म्हणजे पुणे शहरातील एका शेटजीचे देता येईल. शेटजीचे पूर्णपणे दिवाळे वाजले होते; परंतु केंद्राचे एक मंत्री, एका सहकारी कारखान्याचे संचालक व स्टेट फिनान्स कॉर्पोरेशन हे सारे या गरिबाच्या साहाय्याला धावले! पंचवीस लाख रूपयांचे कर्ज त्याला मिळवून देण्यात आले. निवडणुकांच्या उलाढाली पडद्यामागच्या हालचाली करण्यात हे शेटजी अगदी तरबेज!

शेटजी-प्रवृत्तीशी वागताना शासनकर्त्यांची आणखी एक सोय होते. सत्तेच्या क्षेत्रात शेटजी मंडळींना काहीच नको असते! संपत्तीच्या क्षेत्रात मात्र ते भागीदारीसाठी तयार असतात. पुण्या-मुंबईतील मोठमोठ्या औद्योगिक कारखान्यांपासून पंढरपूर तालुक्यातील नव्याने पाटाखाली येणाऱ्या शेतजमिनी खरेदी करण्यापर्यंत संपत्तीच्या क्षेत्राचा विस्तार महाराष्ट्र राज्यात सहज वाढवता येतो! 'धरणग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमीन द्या,' अशी

मागणी आम्ही केली, की 'जमीन काय रबर आहे काय? तेव्हा ते ताणून तुम्हांला जमीन द्यावयाची?' असा उलट प्रश्न आम्हांला विचारण्यात येतो; परंतु पुणे जिल्ह्यातील एकट्या दौंड तालुक्यात गेल्या चार-पाच वर्षांत याच प्रवृत्तीचे हजारो एक जमीन खरेदीचे व्यवहार केले गेलेले आहेत! या प्रश्नांची चर्चा खूप होते. चळवळी होतात; परंतु निवडणुकीच्या रिंगणात हे प्रश्न आव्हानाच्या स्वरूपात पुढे येत नाहीत. महाराष्ट्राच्या मनोभूमिकेची नाडी मराठा नेतृत्वाचे व राज्यकर्त्यांनी ओळखली आहे. यांना क्रांतीची भाषा वेगळेपणाची वाटते. अलीकडे हिरव्या क्रांतीपर्यंत मजल आलेली आहे. महाराष्ट्रातील तरूणांना माझी आग्रहाची व आर्जवाची विनंती आहे की, त्यांनी या परिस्थितीचे मूल्यमापन केले पाहिजे. महात्मा ज्योतीराव फुल्यांच्या विचारांना, सामाजिक व आर्थिक समतेच्या चळवळीला महाराष्ट्रात गती मिळाली पाहिजे. वर्ण, वर्ग व वर्चस्व यांवर प्रहार सुरू झाले पाहिजेत. स्त्री, दलित व कष्टकरी यांना न्याय मिळाला पाहिजे. १८७३ साली जोतीराव फुल्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. १९७३ साली त्याला १०० वर्षे पूर्ण होतील. सत्यशोधक चळवळीचा तुटलेला धागा जोडण्याची संधी आता गमावता उपयोगी नाही. १९७४ हे साल श्रीशिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक समारंभाच्या त्रिशताब्दीचे व राजश्री शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीचे. महाराष्ट्राच्या अभिमानाचे हे क्षण आहेत. या धामधुमीत धार्मिक पुनरूज्जीवनवादी मंडळी कमाल करतील व या गोंधळात महात्मा फुल्यांच्या विचारांचा विसर पडेल, अशी मला चिंता वाटते. गाईपेक्षा, गणपतीच्या सोंडेपेक्षा आपल्यासारख्याच माणसांची-गरीब व दलितांवर अन्याय झाल्यावर उसळून बंड करणाऱ्या बंडखोरांची आज महाराष्ट्राला नितांत गरज आहे. ही बंडखोरी सतत चालली पाहिजे. महाराष्ट्रातील तरूण पुरूषार्थाला हे आवाहन आहे. पुढील दोन वर्षे किमान एका उद्दिष्ट्यासाठी तरी सर्व महाराष्ट्रात प्रबोधन व्हावे. सभा, परिषदा, मिरवणुका यांनी महाराष्ट्रातील बंद पडलेली विचारांची दालने खुली व्हावीत. १९७३ च्या सप्टेंबर महिन्याच्या २४ तारखेला महाराष्ट्रातील सर्व खेड्यांत सर्वांसाठी एक विहीर सुरू व्हावी. ती पहाट फुल्यांच्यानंतर १२५ वर्षांनी का होईना, परंतु उमलावी आणि फुल्यांचे स्वप्न साकार व्हावे !

**६.१०.१० महाराष्ट्राच्या राजकारणातील मराठा जातीचे वाढते प्राबल्य!**

महाराष्ट्र राज्यातील मराठा जातीच्या प्राबल्याद्दल विचार करण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येत मराठा जातीचे प्रमाणे ३८ टक्केच आहे! परंतु सत्तेच्या भागीदारीत या जातीचे प्रमाण ७५ ते ८०% आहे. मराठेतर मंडळींच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड व भय सदैव जाणवते. याउलट मराठा जातीच्या पुढाऱ्यांचा अहंगंड सत्ताबाजी नशेचे स्वरूप धारण करू लागला आहे. लोकशाही समाजवादी राज्यात अशा प्रवृत्तींचा बीमोड होणे आवश्यक आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळात महाराष्ट्रातून निवडलेल्या सहा मंत्र्यांपैकी चार मंत्री केवळ मराठा जातीचे आहेत. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात ७५% मंत्री मराठा जातीचे आहेत. २५ जिल्हा परिषदांचे अध्यक्ष जवळपास सर्वच्या सर्व मराठा जातीचे आहेत. विधानसभेच्या २६० आमदारापैकी २०० च्या जवळपास आमदार मराठा जातीचे आहेत. महाराष्ट्रात निवडून गेलेल्या ४० खासदारांपैकी ३० ते ३२ खासदार मराठा जातीचे आहेत. सहकारी साखर कारखान्यांचे संचालक (काही तुरळक अपवाद वगळता) मराठा जातीचे आहेत. हीच परिस्थिती जिल्हा सहकारी बँका, खरेदी–विक्री संघ, भू–विकास बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या यांतून आढळते. सरकारने नेमलेल्या कॉर्पोरेशन्सवर याच जातीच्या मंडळींची वर्णी लावली जाते.

कॉंग्रेसचे राज्य असल्यामुळे ही परिस्थिती आहे, असेही म्हणता येणार नाही. महाराष्ट्र विधानसभेतील बहुसंख्य विरोधी पक्षांचे नेते (शे. का. प., सो. पा., कम्युनिस्ट पार्टी, विधान परिषदेत जनसंघ) याच जातीतील आहेत. याला अपवाद फक्त मुख्यमंत्रीपदाच्या यादीचा!! श्री. यशवंतराव चव्हाण यांचे नाव वगळता कै. बाळासाहेब खेर (ब्राह्मण), मोरारजी देसाई (गुजराती), कन्नमवार व वसंतराव नाईक (बंजारा) हे मराठेतर मुख्यमंत्री. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष शाखांच्या अध्यक्ष–चिटणीसपदावर मराठा जातीतील पुढाऱ्यांचा भरणा आढळतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे कोणत्याही समारंभात विघ्नहर्त्या गणपतीची पूजा बांधण्यात येते, त्याचप्रमाणे मराठा जातीच्या पुढाऱ्याला सामावून घेतल्याशिवाय कोणाचे पानच हलत नाही, अशी परिस्थिती झालेली आहे.

भारतातील इतर प्रांतांपेक्षा ही परिस्थिती जरा वेगळीच आहे. तामीळनाडूमधील डी. एम. के. चे रूप न घेताही मराठा जातीला येथे सर्व काही उपलब्ध होत आहे. आंध्रमध्ये रेड्डी (काही प्रमाणात 'राव') व कोमटी; गुजरातमध्ये जैन, पटेल व लेवा पटेल; उत्तर भारतात रजपूत, जाट, यादव, कायस्थ यांची बरोबरी आपल्याकडील बहुजन समाज या अर्थी करता येईल. सर्व देशात बहुजन समाजवादाची एक लाट पसरत असली, तरी महाराष्ट्रात तिचे स्वरूप आणखी वेगळे आहे. त्याची नीटपणे तपासणी केली पाहिजे.

महाराष्ट्र राज्यात पाटील, देशमुख व कुणबी असे मराठा जातीतील पोटभेद आहेत. ब्राह्मणेतर वादामुळे महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर असे विभाग पडलेले आहेत. वाद मंदावला असला, तरी मूळ भूमिका बदलेल्या नाहीत. ब्राह्मण समाज लोकसंख्येच्या पाच टक्केच आहे, परंतु वर्णाश्रम मोडण्याची या समाजाची तयारी नाही. सुशिक्षित मंडळींनी विज्ञाननिष्ठा स्वीकारली असली, तरी चातुर्वर्ण्याचा कर्मठपणा सोडावयास हा समाज तयार नाही. पोशाखातील बदल, आहारातील बदल, दैनंदिन कर्मकांड कमी झाले, तरी बहुसंख्य ब्राह्मणवर्ग वर्णवर्चस्वाच्या मनोभूमिकेतूनच वावरताना आढळतो.

महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा पुरेपूर फायदा मराठा जातीने उठवलेला आहे. असे असले, तरी मराठा जातीने समतेच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केलेला आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही. स्वतःच्या जमातीला क्षत्रिय म्हणून मान्यता मिळत नाही, एवढाच या समाजाचा राग आहे. याचा अर्थ, ही जातही वर्णाश्रम व्यवस्थेच्या बाहेर पडावयास तयार नाही, असाच करता येईल. श्रीमंत मराठ्यांचे सर्व समारंभ धार्मिक रूढींनी भरलेले असतात व त्याचा बोलबाला मोठा होतो, हे याचेच उदाहरण आहे. स्वतःया जातीच्या नावापुढे क्षत्रिय नावाची उपाधी लावून घेण्यात बारीकसारीक जातींचे पुढारी अजूनही धन्यता मानतात. क्षत्रिय-माळी, क्षत्रिय-धनगर, क्षत्रिय-नामदेव शिंपी समाज इ. उदाहरणे देता येतील. वास्तविक १८७१ ते १८९७ या काळात झालेल्या सत्यशोधकांच्या चळवळीत जन्माधिष्ठित जातिव्यवस्था पूर्णपणे अव्हेरण्यात आली होती. मानवी समतेचा पुरस्कार फुल्यांनी केला, स्त्री व शूद्रांचे बंधविमोचन त्यांनी केले. त्यांच्या क्रांतिकार्यात व १९०४ ते १९३० च्या दरम्यान झालेल्या सत्यशोधक चळवळीत मौलिक फरक आहे. राजर्षी शाहू महाराजांचा ओढा

क्षात्रतेजाकडे अधिक होता आणि याच काळाचा परिणाम महाराष्ट्रातील बहुजन समाजावर झालेला आहे. महात्मा फुल्यांच्या समतेच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार मराठा जातीने केलेला नाही व त्याचबरोबर श्रम–मूल्याचा मनोमन स्वीकार ही केलेला नाही; त्यामुळेच सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेची सारी स्थाने उपभोगीत असलेले या जातीचे पुढारी खालच्या वर्गांना न्याय देतील, असे सुतराम वाटत नाही. जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत सर्वसाधारण जागेवर उभा केलेला मागासवर्गीय उमेदवार हमखास पराभूत होतो, हा याचाच पुरावा आहे. मराठा जातीची महाराष्ट्रातील ही विशिष्ट परिस्थिती असल्यामुळे त्या जातीचे पुढारी हातातील सत्ता टिकवण्यासाठी निरनिराळे प्रकार करताना आढळतात. हातात सत्ता असल्यामुळे छत्रपती कल्टची जोपासना करता येते. मराठा जातीतील तरूण अभ्यास, कष्ट, व्यासंग, तपश्चर्या यांपैकी कोणताही गुण नसताना सत्तेच्या शिडीवरून राजमान्यतेच्या शिखरावर सहजपणे पोहोचू शकतो. थोडे शिक्षण व पैसा जवळ असला व मंत्रिमहोदयांबरोबर संबंध असले की, त्याच्या मनात सत्ताकांक्षेचा अंकुर फोफावू लागतो. आजची सामाजिक परिस्थिती या अंकुरास खतपाणी घालते व परिणामी ३८% मराठे सत्तेच्या प्रांगणात ७५% जागा सहज अडवू शकतात. खेडेगावातून पाटील मंडळी या लोकभावनेचा पुरेपूर फायदा करून घेतात. त्यांना राखीव जागेव्यतिरिक्त दलितांचा विचार करावासा वाटत नाही. ब्राह्मणाची बुद्धी विकत घेता येते व कारभार–व्यवस्थेत त्याला राबवता येते. इतर जमातींपुढे सत्तेचे चार तुकडे टाकता येतात, असे गणित व खूणगाठ मनाशी बांधूनच ही मंडळी वावरतात. यातूनच त्यांच्या भाषेत रग येऊ लागते. ग्रामीण भागातील ब्राह्मण वर्ग शहराकडे फार मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झालेला आहे व नवबौद्धांनी तह केल्याने त्या जातीपुढे आता कोणतेच आव्हान राहिलेले नाही. एक प्रकारची आत्मसंतुष्ट वृत्ती या समाजात निर्माण झालेली आहे. कदाचित याचमुळे कलेच्या व साहित्याच्या क्षेत्रांत हा समाज मागे असावा. उच्च शिक्षणातही हा समाज मागे आहे. लढाऊ जमात म्हणून अभिमान बाळगणारी ही जमात नव्या युगात नव्या मनुने वागण्याची टाळाटाळ करीत आहे. समतेच्या व समाजवादाच्या लढाईचा फक्त बहाणा करीत आहे.

या जातीचे नेतृत्व आजच्या घटकेला श्रीमंत मराठ्यांच्याकडेच आहे. महाराष्ट्रातील शेत–जमिनीच्या फेरवाटपास या पुढारीवर्गाचा तीव्र विरोध आहे. मराठा जातीकडे

महाराष्ट्रातील शेतीची अधिकांश मालकी आहे. या शेतकरी–वर्गापैकी बागायतदार व मोठे जामीनदार यांनीच सत्तेतील मोठी अधिकारपदे पटकावली आहेत. श्री.यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व महाराष्ट्र काँग्रेसला लाभलेले आहे. बेरीज–वजाबाकीचे राजकारण करण्यात येते तरबेज आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेसने अनेक तह वेळोवेळी केलेले आहेत. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये धुसफुस खूप चालते; परंतु ती सत्तापदांच्या बाबतीतच मर्यादित असते, कोणतीही वैचारिक भूमिका त्यामागे असत नाही. मराठ्यांचे बहुमत आहे, त्याला मराठे काय करतील, असा साळसूद प्रश्न कोणी उपस्थित करतील; किंवा मराठेतरांनी संघटित व्हावे, असावी सल्ला देतील, इतर जमातीचे पुढारी राज्यावर आले, तरी हेच करतील, असाही सूर लावतील. परंतु ही विधाने मूळ प्रश्न टाळण्यासाठीच असतात. मराठ्यांच्या नैसर्गिक बहुसंख्येला कोणीच हरकत घेतलेली नाही. स्वतःची सत्ता टिकण्यासाठी संसदीय लोकशाहीत बहुमत टिकवण्यासाठी मराठेत्तर जमातींबरोबर सख्य करण्यास मराठे पुढारी नेहमीच तयार असतात. त्या त्या जमातीतील पुढाऱ्यांना मंत्रिपद देणे, सरकार नियुक्त समित्यांवर घेणे, मानपदांची खैरात करणे इ. प्रकार सर्रासपणे सुरू असतात आणि आणिबाणीचा प्रसंग आलाच, तर राज्य जोशी–डांगे यांचे पाहिजे की चव्हाण–देसाईंचे, असा मौलिक प्रश्न हवेत सोडून देण्यात येतो. वैश्य प्रवृत्तीबरोबर समझोता करून कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर खास प्रतिनिधित्वाची सोय मार्केट ॲक्टने करण्यात आली आहे. हे तह सवडीप्रमाणे बदलण्यात येतात. नवबौद्धांनी आता बहुजन समाजाबरोबर किती दिवस वाद करायचा, असा पोक्त विचार करून तह केलेला आहे. ब्राह्मण, नवबौद्ध या संघटित जातींची ही तऱ्हा, तर इतर अल्पसंख्य जातींबद्दल काय बोलायचे? तेव्हा मराठेत्तर जाती संघटित होण्याची सुतराम शक्यता नाही. निवडणुका आल्या की, या जातींची अधिवेशने होतात. पाहुणे असतात काँग्रेसचे मंत्री. आपल्या जातीला मंत्रिपद व आमदारकी मिळावी, एवढेच टुमणे लावले जाते. यामुळेच सामाजिक व राजकीय कोंडी महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे.

मराठा वर्गातील आजचे नेतृत्व केवळ मराठा जातीचे म्हणून त्याज्य वा हिणकस असे कधीच म्हणता येणार नाही. पंरपरेने चालत आलेले हे नेतृत्व आहे, असेही नाही. लौकिक अर्थाने सर्वत्रच सुधारणावादी आहेत. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील कर्तबगारी उल्लेखनीय

असेल; परंतु समाजाला–जनसामान्यांना न्याय देण्यासाठी तिचा काहीही उपयोग होत नाही. म्हणजे राज्यकारभाराच्या दृष्टीने ती कर्तबगारी नालायक ठरते. श्रीमंत ऊस–बागायतदारांनी द्राक्षे पिकवली, साखर कारखाने काढले, यात वैयक्तिक कर्तबगारीचा भाग मोठा आहे; परंतु शेतमजुरांना न्याय कोणता मिळणार? कर्तबगारीबरोबर त्यांनी सामाजिक समता स्वीकारली, असेही होत नाही. उलट अशा भुखंडांच्या गावीही हरिजनांवर जास्तीत जास्त घोर अन्याय झालेला दिसतात.

मराठा जातीतील बहुसंख्य पुढारी सत्तेबरोबर आज संपत्तीच्या मागे लागलेले दिसतात. पुणे जिल्ह्यात काँग्रेसचे १२ आमदार आहेत. त्यांपैकी ११ मराठे आहेत. प्रत्येकाकडे त्याच्या कुटुंबीयांच्या नावावर किती संपत्ती वाढली आहे, याची मोजदाद केली, तर आढळेल की, बहुतेक लाखाचे घराणे आहे. काही दहा लाखांच्या पुढे आहेत. निरनिराळ्या समित्या यांच्याकडे आहेत. मतदारसंघातील, जिल्ह्यातील प्रमुख पदांवर हीच मंडळी. तीन कोटी रूपयांच्या जलसिंचन योजनांची कार्यवाही झाली नाही. परंतु महाराष्ट्र सरकार अजून विचार करीत आहे की, कोणत्या कलमाखाली संबंधितांना पकडावयाचे! मंत्री, आमदार, खासदार व पदाधिकारी, सरपंच सर्वच जण स्वतःचे सांपत्तिक सामर्थ्य वाढवीत आहेत. आमदारकीचा खर्च ३०–३५ हजार करण्याची कुवत असल्याशिवाय भागत नाही. मग तिची तयारी अगोदरपासून सुरू असते. राज्यकारभारात अनेक गैरप्रकार चालतात. 'जिल्हा परिषद मान्यता देईल, या अपेक्षेने मान्य केलेली सर्व टेंडर्स' सर्वसाधारण सभेत मंजूर होतात! बहुतेक जिल्हा परिषदांच्या सभा पाच–दहा मिनिटांत उरकल्या जातात. एकपासून तीनशेपर्यंत सर्व ठराव पास होतात! बहुजनसमाजी खाक्या उर्फ छत्रपती कल्ट जागोजाग फोफावतो आहे. आदिवासी विभागात रहिवासी म्हणून नाव नोंदवून घेतले की, सर्व सोयी मिळू शकतात. काँग्रेसच्या सभापतीने सर्व जंगल तोडून नेले, तरी काही होत नाही; परंतु कढीलिंबाचा भारा घेऊन निघालेल्या गरीब मराठा स्त्रीला मात्र रेंजरसाहेब अडवतात. असे नेहमी घडते. मंत्र्याच्या सत्काराचा व समारंभातील खर्चाचा ठराव स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्थांमधून बिनबोभाट मंजूर होतो. अनेक ठिकाणी दलितांना दिलेल्या सरकारी जमिनींवर गावच्या सरपंच व पाटलांनी अतिक्रमण केलेले आढळते.

तालुका पातळीपासून ते दिल्लीपर्यंतच्या पुढाऱ्यांनी स्वतःची एक बांधीलकी निर्माण केलेली आहे. कोणलाही या चाकोरीच्या बाहेर पडता येत नाही. सत्यशोधक चळवळीत शेटची-भटजींना शिव्या देण्याची पद्धती बदलेली आहे. आता प्रत्येक ठिकाणी शेटजी मंडळी, कंत्राटे, परमिटे, कमिशन एजन्सी यांचा वापर होतो. शिवाय महाराष्ट्रातील मोठ्या उद्योगपतींबरोबर हा वर्ग मंत्र्याचे खास लागेबांधे निर्माण करून देतो.

दिवसेंदिवस हा गुंता वाढत आहे. जुने राजे गेले. आता नवे महर्षी व सम्राट निर्माण झाले आहेत! त्यांच्या दरबारी लक्ष्मी, सरस्वती, पार्वती साऱ्याजणी पाणी भरीत आहेत. सर्व काही 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असे कसे म्हणता येईल?

नामदार यशवंतराव मोहिते मात्र अधूनमधून काही विधाने करतात. त्यांच्या मते राज्यकर्त्यांना समाजवाद आणण्याची अगदी घाई झाली आहे. आडकाठी आहे, ती फक्त नोकरशाहीची. सचिवालय व न्यायालयाकडे बोट दाखवून ते विचारतात, ''तेथे असलेले अधिकारी कोणत्या जातीतील आहेत?'' जुना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उकरून काढण्याची ही नवी तऱ्हा आहे. स्वपक्षाचे अकर्तृत्व झाकण्याचा हा ओंगळ प्रयत्न आहे. पावशी बहुमत हातात असताना दलितांना न्याय देण्यासाठी कोण कोणचा हात धरत आहे? या असल्या नेतृत्वामुळे मराठा तरूणांच्या मनातील अहंकाराची बीजे निष्कारण फुलतात.

महाराष्ट्रात समाजवाद लवकर यावा, असे जनसामान्यांना वाटते. जनमत बरोबर घेतल्याशिवाय ते शक्य नाही. केवळ सत्ता हातात टिकवून धरण्याने ते साध्य होणार नाही. सामाजिक विषमतेचा रोग आर्थिक समतेने नाहीसा होईल, हे तितकेसे खरे नाही. मराठा समाजाने नेतृत्व केल्याबद्दल तक्रार नाही; परंतु कोणत्या प्रकारचे नेतृत्व? क्षात्रतेजाच्या अहंकाराचे? धार्मिक रूढींचे? मस्तवालपणाचे? की लोकशाही समाजवादी मूल्यांचे? राज्यकर्ता पक्षात कोण चिंतन करतो आहे या परिस्थितीचे? सुशिक्षित मराठा तरूणांनी याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे.

मराठा जातीने परंपरेचा भार व वृथा अहंकार सोडला पाहिजे. किंबहुना त्या नेतृत्वास भाग पाडण्याइतपत जागृती महाराष्ट्रात संघटित झाली पाहिजे. महात्मा फुले यांनी घातलेला समतेचा पाया भक्कम केला पाहिजे. त्यांची तपश्चर्या वाया जाता उपयोगी नाही.

समताधिष्ठित समाजवादाची प्रतिष्ठापना करण्यासाठी क्रांतिकारक मूल्ये जोपासली पाहिजेत. त्यासाठी मनाची तयारी ठेवली पाहिजे. महाराष्ट्र बंडखोरांसाठी प्रसिद्ध आहे. ती बंडखोरी संपुष्टात येता उपयोगी नाही व एका विशिष्ट जमातीची मिरासदारीही खपवून घेता उपयोगी नाही.[३५]

### ६.११ देशमुख मराठा स्त्रियांचे दास्य

भारतातल्या राजकारणाबाबत डॉ. बाबा आढाव अगदी व्यथित होऊन लिहित आहेत. राजकारणातच नव्हे तर शिक्षण क्षेत्रातही या सर्वांनी मक्तेदारी निर्माण केली आहे असे डॉ. बाबा आढावांचे मत आहे. आजपर्यंत आपल्या संस्कृतीने भारतीय स्त्रियांना गुलामगिरीचीच वागणूक दिलेली आहे. बुरसटलेल्या मनोवृत्तीतून अगदी उच्च कुळातील स्त्रियासुद्धा या मानसिक गुलामगिरीतून सुटलेल्या नाहीत हेच डॉ. बाबा आढावांच्या या लेखनातून समजून येते.

सामाजिक सुधारणा व्हावी म्हणून महाराष्ट्रात अनेक चळवळी झाल्या. त्यांना शे–दीडशे वर्षांचा इतिहास आहे. १८७३ साली महात्मा जोतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या शिक्षणप्रसाराच्या – विशेषतः दलित व स्त्री शिक्षणाच्या कार्यास १८४८ सालीच सुरूवात झाली होती. फुल्यांनी वर्णवर्चस्व व जन्मधिष्ठित जातधर्माच्या कल्पनेला सुरूंग लावला. गोपाळराव आगरकरांनी अनेक हल्ले चढवले. सती जाणे, केशवपन करणे, बालविवाह म.फुले यांनी स्त्रियांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण केला. या चळवळी काही वर्षे चांगल्याच फोफावल्या. त्यांचे परिणाम अगदी क्रांतिकारक ठरले. परंतु महाराष्ट्राच्या खेड्यांपाड्यांतून व काही शहरांतून स्त्रियांचे दास्य संपले नाही. कायद्यात बदल झाले, तरी रूढींचे राज्य कायम राहिले आहे. द्विभार्या प्रतिबंधक कायदा झाला, परंतु जातीरिवाजाप्रमाणे, पंचांसमक्ष सोडचिठ्ठी घेण्यास मुभा राहिली.

#### ६.११.१ शहाण्णव कुळीतील स्त्रियांची स्थिती

महाराष्ट्रातील मराठा देशमुख समाजात स्त्रियांचे स्थान काय आहे, याची खरोखर पाहणी झाली पाहिजे. पुरूषांना आजही अनेक विवाह करता येतात, परंतु स्त्रीला पुनर्विवाह करण्यास सामाजिक बंदी आहे. हिंदू समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आपण अगदी वरचे

आहोत, असे दाखवण्याचा सदैव प्रयत्न होतो. आडनावापुढे 'देशमुख' असे शेपूट आवर्जुन लावण्यात येते. वास्तविक बहुसंख्य मराठा देशमुख मंडळी शेती करतात. शेती करणे व वेदप्रणीत व्यवस्थेत शूद्राचे काम आहे. तरीही ही मंडळी शहाण्णव कुळीचा अभिमान सदैव बाळगतात. आपण विप्र व राजवंशाच्या जवळचे, हा फुकाचा अहंकार बाळगतात. वर्षातून एकदा 'जानवे' अडकवून नव्या जमान्याची 'जाणीव' नाकारतात. हा अहंकार जोपासण्यासाठी स्त्रियांवर अन्याय होत राहतो. मुस्लीम धर्मातील पडदापद्धतीवर हल्ला होतो; परंतु आमची देशमुख मंडळी अजूनही बायकांना पडद्यात ठेवतात. मराठवाड्यात घराची बांधणी यासाठी विशिष्ट पद्धतीने करतात. तटबंदीच्या या घरात स्त्रिया पाहुण्यापुढे येत नाहीत. 'खानदानी आदब' पुरूष दाखवतात व घरच्या स्त्रिया पाठीमागच्या अंगणात भांड्याचे ढिगारे विसळीत असतात. जुनेर झाकण्यासाठी अंगावर बुथ पांघरतात. सत्यशोधक चळवळीला ९६ वर्षे झाली. ९६ कुळीतील स्त्रियांची परिस्थिती पुढे आणण्याचा हा खटाटोप.

सामाजिक रूढींचे स्त्रियांचा मनांवर प्रचंड ओझे आढळते. कोणीही परपुरूष अगर पाहुणा दिसला की, डोक्यावरचा पदर सावरणे, चावडीसमोर जाताना पायांतील चपल हातात घेऊन पदराच्या खाली लपवून पुढे अनवाणी जाणे, स्वच्छ पातळ न नेसणे (गोल पातळामुळे आयतीच सोय झाली असली, तरी) बहुतेक मराठा मंत्र्यांच्या व पुढाऱ्यांच्या बायका डोक्यावरचा पदर शक्यतोवर ढळू न देण्याची पराकाष्ठा करतात. पीएच.डी. झालेल्या एक बाई तर कटाक्षाने पदर घेतातच. तो पदरही दोन्ही कान झाकून घ्यावा लागतो. एरव्ही शालीनता व खानदानीला बाध येत असावा. स्त्रियाही या चाली अगदी निमूटपणे पाळतात. मराठमोळा म्हणतात याला. सतराशेसाठ वेळा इतरांच्या पाया पडणे ही तर घृणास्पद आपत्ती असते. घरातील नणंदांना वयपरत्वे दिवाणसाब, आक्कासाहेब, ताईसाहेब, दिरांना रावसाहेब, दादासाहेब अशा शब्दांत उल्लेखणे हाही एक खानदानी रिवाज आहे. या सर्व रूढी मुसलमानी राज्यांमुळे आलेल्या असाव्यात. मुस्लीम राजे गेले, इंग्रज गेले, परंतु हे 'राजे' कायम राहिले आहेत. उलट या सर्व रिवाजांची अपेक्षा तरूण पुरूष अगदी आग्रहाने धरताना आढळतात.

अत्याधुनिक पद्धतीने वेशभूषा करणारा आजचा तरूण वर्ग सिनेमातील नटांची ऐट आणतो. परंतु त्याच वेळी स्त्रियांना मात्र 'नटी' सारखे वागण्याचे स्वातंत्र्य नाकारतो.

हडपसरला असताना एक प्रकार मी डोळ्यांनी पाहिला. सोलापूर रोडने एक वरात चालली होती. गोरज मुहूर्तावर लग्न लावून घेण्यासाठी नवरदेव चालले होते. पाठीमागे ५०–६० बैलगाड्यांची रांग होती. बँड, वाजंत्री, ताशे, ढोल, लेझीमचा दणका उसळत होता. अशा मिरवणूकीत साहजिकच नवरानवरी पाहण्याची उत्सुकता असते. वराचे वय ६० ते ६५ वर्षांचे असावे. आडवातिडवा बांधा व राकट चेहऱ्याचे ते ध्यान पाहून मी चकित झालो. सहज कुतूहलाने शेजाऱ्याला विचारले, ''कोणाचे लग्न आहे?'' उत्तर मिळाले, ''हे पलीकडच्या गावचे पाटील आहेत. यांचे हे सहावे लग्न. पहिल्या सर्व बायका जित्या आहेत. बहुतेक सगळ्या मागे मिरवणुकीत आहेत. मूल नाही म्हणून लग्न करतो आहे धाकट्या मेव्हणीशीच. ती आहे १६ वर्षाची.'' मी विचारले, ''द्विभार्याप्रतिबंधक कायदा असताना हे कसे काय?''उत्तर मिळाले, ''अहो, पहिल्या सर्व बायकांशी जातिरिवाजाप्रमाणे त्यांनी काडीमोड घेतलेला आहे. शिवाय या वेळी मुलीला मोप पैका दिला आहे म्हणतात!''

या लग्नाला आजूबाजूच्या गावांतील मोठमोठे बागायतदार, आमदार मंडळी हजर होती. लग्नानंतर मुलीच्या सर्व लक्षात आले. परंतु मंगळसूत्राच्या काळ्या धाग्याने तिचा गळा करकचून आवळला गेला होता.

### ६.११.२ गांधर्व विवाह : दोन अनुभव

आमचे घर मराठा समाजातील. शेजारीच एक लोहाराचे घर होते. पिढ्यान्‌पिढ्या शेजारी राहिल्याने अगदी नात्यागोत्याचे संबंध निर्माण झालेले. लोहारदादांना चार–पाच मुली होत्या. मुलगा नव्हता आणि अशाच एका बाळंतपणात त्यांची पत्नी दगावली. काही दिवसांनी त्यांनी गांधर्व विवाह करून एक नवी बायको आणली. मला चांगले आठवते, या बाईंना मराठ्यांच्या घरची मंडळी सार्वजनिक समारंभात हळदकुंकू देत नसत. इतकेच नव्हे, तर एखाद्या लग्नसमारंभात मुला–मुलीला हळद लावताना त्यांना 'पुढे येऊ नका,' असे सांगण्यासही बायका कचरत नसत. अशाच एका प्रसंगी त्या बाईंच्याबरोबर कडाक्याचे भांडण झाले व दोन्ही घरांमध्ये कायमचे वितुष्ट आले.

माझ्या एका नातेवाईकाचे लग्न ठरले. साखरपुडा, सुपारी, लग्नपत्रिका हे सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडले. मुलगी खूप देखणी होती. मुलगा काळासावळा, पण

शिकलेला होता. लग्नाची तिथ ठरली, मुहूर्त निघाला आणि एवढ्यात कोठे तरी माशी शिंकली व लग्न मोडल्याची बातमी माझ्या कानावर आली. का, तर म्हणे, मुलीच्या आईचा गांधर्व विवाह झालेला आहे. मला त्या मुलीच्या बापाचे हाल अजून आठवतात. तो केविलवाण्या सुरात आर्जव करत होता. मुलाच्या पाया पडत होता, परंतु मुलगा गप्पा. आई–वडलांची संमती हवी म्हणे! मला मनस्वी चीड आली होती, पण काय करावे?

नुकताच एक प्रकार घडला. मुंबईत नोकरी करणाऱ्या मुलाला सातारा जिल्ह्यातील मुलगी दाखवण्यात आली. मुलाच्या वडीलांनी संमती कळवली. लग्न झाले. हळदीच्या अंगाने मुलगी माहेरी गेली व सोळाव्यासाठी माघारी आली. नवऱ्यामुलाने आदल्याच रात्री विषप्राशन करून आत्महत्या केली का, तर म्हणे त्याला मुलगी पसंत नव्हती. आता या मुलीने जन्म कसा जाळावा? मुलीचा बाप गुडघ्यात मान घालून बसला होता. मनात विचार करत असावा, ही का नाही मेली?

माझ्या आत्या नुकत्याच वारल्या. निधनसमयी त्यांचे वय ७५ वर्षांचे असावे. त्या बालविधवा होत्या. त्यांचे लग्न त्यांना पुसटसे आठवे. सातव्या आठव्या वर्षी विवाह झालेला. पाच महिन्यांत प्लेगच्या साथीत त्यांचे पती निवर्तले. तेव्हापासून त्या माहेरीच होत्या. त्या नेहमी म्हणत, 'बायकांना रांडपण येऊ नये.' सारा जन्म धुणे–भांडी विसळण्यात गेला त्यांचा. त्या सांगत, तरूण वयात त्यांना कोठेही बाहेर जाण्याची परवानगी नसे. परपुरूषांशी बोलणे तर दूरच. देवाला जायचे, तेसुद्धा कोणाच्या तरी बरोबरच. सज्जात उभे राहायचे नाही, पाहुण्यांच्या पुढे यायचे नाही. लग्न समारंभात मागे मागे राहायचे. पांढरे कपाळ अशुभ. त्याचे कोणाला दर्शनही होऊ नये म्हणून सारी काळजी... आत्या सांगत. घरात एकसारखी धुसफूस चाले. विधवा नणंद घरात म्हणून भावजयांच्या माहेरची माणसे एकसारखी घालून पाडून बोलत. कितीही कष्ट उपसा, पण चाजुबाजूंनी हिडिसफिडीस. जणू काही एक गुलामच आपल्या ताब्यात मिळालेला. नेहमी ऐकवणे, 'लक्ष ठेवा, नाही तर ध्या. दुपारा एखाद्याचा हात धरून जाईल....' बरे, शिक्षण नाही. त्यामुळे आयुष्यभर रूमालीत बांधलेल्या ज्ञानेश्वरीची पूजा करण्याव्यतिरिक्त काही करता आले नाही.

### ६.११.३ बुरसटलेली मनोवृत्ती

दक्षिण महाराष्ट्रातील एका काँग्रेस पुढाऱ्याने ते विधुर झाल्यानंतर एका विधवेबरोबर पुनर्विवाह केला. त्या प्रकरणाची फार मोठी चर्चा झाली. दिल्लीच्या मंत्र्यांनी जागेवर जाऊन त्यांना बोध केला. 'विवाह करण्यरची काय आवश्यकता?' असेही विचारले. परंतु त्या बहाद्दराने आपला विचार तडीस नेला व तथाकथित भयानक सामाजिक परिणामांचा फुगा फोडून टाकला. या प्रकरणात चर्चा करताना त्या स्त्रीच्या चारित्र्याची जाहीरपणे चर्चा झाली. डॉ.राममनोहर लोहिया यांनी या बाबतीत एक क्रांतिकारक विचार बोलून दाखवला आहे. भारतीय समाज पुरूषाची योग्यता त्याच्या बुद्धीवर अजमावतो, तर स्त्री–पुरूष समान भूमिका असूनही भारतीय नारीची योग्यता मात्र तिच्या योनिसुचितेवर ठरतात. स्त्री बुद्धीने तल्लख असली व कर्तृत्वाने श्रेष्ठ असली, तरी हीन लेखण्यात जुनाट बुरसटलेली मनोवृत्ती स्पष्ट होते.

माझ्या आजोळच्या गावी काही वर्षांपूर्वी एक प्रकार घडला. एका गरीब पाटलाच्या घरी त्याची सून तिच्या भावाने नांदावयास आणून पोचवली. परंतु तिला घरात कोणी घेईना. नवरा मुलगा अगदी बावळा व डोक्यात फूल पडलेला. तो सरळ रानात निघून गेला. त्याची आई घरात होती. तिने सुनेला घरात घेणार नाही म्हणून बजावले. लग्न समारंभातल्या देण्याघेण्यावरून काही भांडण शिल्लक उरले असावे. सासूबाईंच्या मते मुलगी अगदी 'चाभरट' व 'चोरटी' आहे. तिला 'आधी सुधारावी व मगच सासरी आणून पोचती करावी.' त्यांनी सुनावले. गाव अगदीच खेडेगाव. भाऊबंदांची घरे शेजारीच खेटून. परंतु कोणालाच मध्ये बोलण्याची मुभा नसते. 'तोंड खुपसायला चोंबडेपणा कोण करणार?' मुलीचा भाऊ जरा अरकट असावा. त्याने बाहेरूनच विचारले. 'हिला घरात घेणार की नाही? नाही तर तुमच्या हातून तिला जिवंत मारून टाका. आम्ही विचारायला येणार नाही. पण सतरा वेळा ही परवड नको' भांडण वर्दळीवर आले. सासूबाई बाहेर येऊन म्हणाल्या, 'आम्हांला कशाला मारायला सांगता? तुमच्या हातानंच तुम्ही तिचं काळंबेरं करा. धा नवरे करून द्या, नाहीतर विहिरीत ढकलून द्या.... मी शाप घरात घेणार नाही.' मुलीच्या भावाचे डोके भडकले. कारण बहिणीला प्रत्येक वेळीच घेऊन येणे व पाणउतारा करून माघारी घेऊन जाणे यामुळे तो वैतागला असावा. त्याने बहिणीला फराफर ओढीत नेले आणि गावाबाहेरच्या विहीरीत ढकलून

दिले. त्या मुलीचा तो केविलवाणा टाहो, 'अरे भाऊ, मला मारू नको. नको रे भाऊ...' ती वर निघण्याचा प्रयत्न करू लागली, तसा त्याने वरून एक धोंडा उचलून विहिरीत टाकला... तीन दिवसांनी प्रेत फुगून वर आले. सगळे चिडीचूप. 'पाणी भरायला गेली आणि पाय घसरून पडली,' एवढा पंचनामा झाला! सासर–माहेरच्या दोन्हीकडील मंडळींनी सुटकेचा श्वास सोडला. कुळाची अब्रू राहिली.

### ६.११.४ तिचे जीवन बहरासाठी नसतेच!

आमच्या आळीतील एक प्रतिष्ठित कुटुंबातील पुढील घटना आहे. दोन भाऊ व एक बहिण. बहीण सर्वांत मोठी. तिच्या सासरची परिस्थिती अगदीच साधारण. त्यामुळे एकुलत्या एक अशा या लाडूबाई नेहमी माहेरीच राहत. हलके हलके तिचा नवराही काही दिवस सासरी येऊन राहिला. भावांची लग्न झालेली नव्हती व आई म्हातारी, त्यामुळे सारे कारभारीपण या बाईंच्या हातात. भावांची लग्न तिच्याच संमतीने झाली. भाऊ शिक्षणाने अगदीच कमी, परंतु पहिलवानी पेशाचे. धंदा चांगला असल्याने परिस्थिती गबर. चांगल्या घरच्या मंडळींनी सुखाच्या आशेने येथे मुली दिल्या. नणंदबाईंचा तोरा काही पुसू नका! त्यात मध्यंतरीच त्यांचा नवरा आपल्या घरी निघून गेला व कारभारीपणाला चटावलेल्या 'दिवाणसाब' (थोरल्या नणंदेला 'दिवाणसाब' म्हणण्याची रीत अजूनही आहे.) माहेरच राहिल्या. पुढे काही वर्षांनी नवऱ्याचा व त्यांचा संबंध अजिबात तुटला. 'बायकोस नांदविता न येणारा पुरूष' म्हणून त्याची पत संपली. या बाईंनी भावजयांना इतका त्रास दिला की, थोरल्या भावजयीने अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेतले व आत्महत्या केली. दुसरी भावजय माहेरी गेली. दिवाणसाहेबांचे मेतकूट दिवाणजीबरोबर जमल्याचे आजूबाजूचे लोक रात्रंदिवस पाहत.

माझ्या लहानपणातील एक आठवण आहे. सासरी जरा काही खुट्ट झाले की, मुलीला माहेरी पाठवून द्यायचे, असा सासरच्या माणसांचा खाक्या असे. एखादे मूल होईपर्यंत हा सासुरवास चाले. मुलीच्या आई–वडीलांनाही तोपर्यंत काळजी घ्यावी लागे. 'मुलगी नांदून निघाली म्हणजे झाले,' अशी एक म्हण आहे. 'मालन' नावाच्या एका मुलीला एकदा असेच माहेरी यावे लागले. लग्नानंतर मांडव परतणीच्या व्यवहाराची काही तरी शिल्लक उरल्याबद्दल

सासरची तक्रार असावी. रात्री १० नंतर सडकेवरून 'मालेऽऽस मालेऽऽस' ओरडत मालिशावाले जात. त्या घरातील म्हातारी मालनला एकसारखे विचारी, 'माले, तुला रात्री कोण हाक मारते ते खरं सागां.' एकदा तर तिला चांगला चोप मिळाला. कारण म्हातारीला 'मालेऽऽस' शब्दातील 'स' ऐकू येत नसे. हा विनोद असला, तरी स्त्रियांच्या मनोव्यापाऱ्याची दशा यातून व्यक्त होते. स्त्रीला सदैव जपावे लागते. तिचे जीवन बहरासाठी नसतेच. 'दिल्या घरी तू सुखी राहा,' एवढे सांगण्यासाठीच असते.

या साऱ्या घटना सत्य आहेत व त्या मराठा समाजातील आहेत. पंचकुळी, शहाण्णव कुळी, पाटील व कुणबी असे ढोबळ मानाने प्रकार पडतात. मराठा संस्थानिकांची राजघराणी व त्यांचे जहागीरदार यांचा समावेश पंचकुळी उर्फ 'राजवंशीय' यात होतो. शहाण्णव कुळी उर्फ देशमुख मंडळींचा एक वेगळा जथा आहे. महाराष्ट्रातील बाळासाहेब देसाई, मुगुटराव काकडे, शंकरराव मोहिते–पाटील आदींचा यात समावेश होतो. मातब्बर देशमुखांच्या राजघराण्याशीही सोयरिका झालेल्या आहेत. उदा.फलटणचे नाईक–निंबाळकर व नागपूरचे प्रसिद्ध जमीनदार रामराव देशमुख. तिसरा वर्ग पाटील मंडळींचा. त्यातही अनेक प्रकार आहेत. यशवंतराव चव्हाण, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब हिरे आदी या गटात मोडतात. पाटील मंडळींतही कडू व गोड घराणी आहेत.

मोठमोठ्या पाटील घराण्यांच्या सोयरिका देशमुख घराण्यांबरोबर झालेल्या आहेत व काही पाटील स्वतःला देशमुखच मानतात. शेवटचा वर्ग कुणबी समाजाचा. विदर्भात व कोकणात हा वर्ग मोठ्या प्रमाणावर आढळतो.

महाराष्ट्रातील माळी, कुणबी आदी समाजांत स्त्रियांच्या पुनर्विवाहास 'गांधर्व विवाह,' 'म्होतूर लावणे' व 'पाट लावणे' असे म्हणतात. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी धनगर व मराठे यांचे विवाह संबंध जुळवले. परंतु ही पद्धत रूढ झाली नाही. दुसऱ्याला हीन कुळातील लेखून त्याचा पाणउतारा करण्याची कर्णकालीन पद्धत अजूनही चालू आहे. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे व राजमाता जिजाबाईंचा विवाह याच कारणासाठी लखुजी जाधवांना मान्य नव्हता. हे सारे संस्कार मोगलकालीन असावेत. प्रगत विज्ञानाकडे पाठ फिरवून मराठा समाजातील बरेच सुशिक्षितही स्वतःचा बडेजाव मिरवतात व लग्नसमारंभात

स्वतःच्या खानदानीचे प्रदर्शन करतात. वास्तविक, स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क नाकारला म्हणजे झाले, अशी गोड समजूत यामागे असत. संसार करण्याचा, अपत्यप्रेमाचा हक्क हिरावून घेतलेल्या स्त्रिया निसर्गतःही गप्प बसत नाहीत. त्यांच्या अनैतिकतेकडे डोळेझाक करण्यात येते.

महाराष्ट्रातील चार ते पाच कोटी लोकसंख्येत दीड ते दोन कोटी संख्या मराठा वर्गाची आहे. कुळाचा अभिमान फार जबर असतो. यामागे काही फार मोठे कर्तृत्व असते, असे मानण्यास कुठलाही पुरावा आढळत नाही. त्याची सर्व मदार मर्दाच्या शौर्यापेक्षा स्त्रियांच्यावर लादलेल्या गुलामीच्या क्रौर्यावर आहे. लग्नसमारंभात बायकांना पडद्यात ठेवणे, त्यांना मिरवू न देता सर्व कार्यक्रम पुरूषांनीच उकरणे व स्त्रियांचा पुनर्विवाह निषिद्व मानणे एवढ्यावरच सारे अवलंबून आहे. मराठा समाज म्हणजे 'बहूजन समाज.' तो झपाट्याने पुढे पुढे चालला असण्याचा विनाकारक बकवा करण्यात येतो. परंतु या समाजाला बुद्धीने वागण्यापेक्षा रगीत सर्व जिरवण्याची सवय लागली आहे. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी छत्रपतींची नावे ही मंडळी घेतात; परंतु ते फक्त ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाव्या संदर्भात. ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरूद्ध लढताना सुद्धा ही मंडळी स्वतःचा शुद्र अभिमान विसरत नाहीत.

### ६.११.५ शील गेले, तरी कूळ राहिले

मांजर डोळे मिटून दूध पिते. त्याला वाटते, आपल्याकडे कोणाचेच लक्ष नाही. परंतु सर्व गावभर बभ्रा होत असतो. तरीही याला वाचा का फुटत नाही? याचे कारण 'आवडी'चे व 'नावडी'चे राज्य. ही पुरूष जीवनातील फारकत मराठा समाजाने मान्य कलेली आहे. एवढे सारे असताना स्त्रिया संघटित का होत नाहीत, असा प्रश्न कोणी उपस्थित करील. त्याची दोन-तीन कारणे आहेत. अगदी मातब्बर धनवंताच्या घरातून काहीही चालते. अगदी थोरल्या भावजयीबरोबर धाकट्या दिराने पुनर्विवाह केला, तरी समाजात विशेष बिघडत नाही. मुलीच्या रूप-सौंदर्यामुळेही बरेच प्रश्न सुटतात आणि राजघराण्यातील बायकांच्याजवळ पैसा असल्याने लग्ने न करता त्या सर्व सुखांचा उपभोग घेतात व भानगडी जिरवतात.

एका मोठ्या राजघराण्यातील सुंदर राणीने वैधव्य प्राप्त झाल्यानंतर कोळी जातीतील आपल्या शोफरबरोबर संबंध ठेवले, ही बाब सर्वांना ठाऊक आहे; तर दुसऱ्या एका

राणीसाहेबांचे व नवऱ्याचे कधीच जमले नाही. त्या सदैव मुंबईत राहून तनखा खर्च करत. राजघराण्यातील स्त्रियांनी केलेल्या स्वैराचाराच्या व दुष्कर्माच्या अनेक कहाण्या चविष्टपणे गावभर सांगितल्या जातात. शील गेले तरी कूळ राहिले, म्हणजे यांनी राजरोस दुसरा नवरा केला नाही ना, मग भागले! त्याचीही दोन कारणे असतात. दुसरा विवाह केला, तर ऐश्वर्याला व संपत्तीच्या हक्कांना मुकावे लागते. आंधळ्या व्यवहाराला मान्यता असते. आडनावापुढे देशमुख म्हणून आवर्जुन लिहिणाऱ्या एका धनाढ्याने आपल्या भावकीतल्या विधवा पुणतीला जवळ केले आहे. अशा संबंधातून मग दासीवंश व रांडेच्या अवलादी गावागावांतून निर्माण झालेल्या आढळतात. असे असूनही शिक्षणात मागे पडलेल्या, जीवनाच्या उपभोगाला पारख्या झालेल्या स्त्रिया काही वेळेस राजरोसपणे दुसऱ्याच्या घरात घुसतात. मराठा देशमुख पुरूषांना अनेक पत्नी करता येत असूनही रांडबाजी करण्यात पुरूषार्थ वाटतो, परंतु स्त्रियांच्या पुनर्विवाहाचे धाडस तो करत नाही.

इतरांच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, बराचसा मोठा वर्ग सधन असल्याने विधवा, परित्यक्ता मुलींना पोसण्यास तो समर्थ असतो.[३८]

अगदी कनिष्ठ म्हणजे काही पाटील व कुणबी घराण्यांत स्त्रियंचे पुनर्विवाह सर्रासपणे चालतात. पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, सातारा, सांगली हे जिल्हे वगळले, तर इतरत्र पाट लावण्याची चाल सर्रास सुरू आहे. नगर, नाशिक, सोलापूर या विभागातही ही चाल आहे. खानदेशातील लेवा पाटील समाजातही स्त्रियांच्या पुनर्विवाहाची चाल आहे. विदर्भातील कुणबी समाजातहीही चाल आहे. याचा अर्थ दोन ते अडीच कोटी मराठा समाजातील फार थोड्यापर्यंत केवळ हा व्यर्थ अहंकार शिल्लक आहे. परंतु खोट्या अभिमानाचा दर्प मात्र सर्वत्र आहे. काही कुटुंबाना आपल्या नावापुढे 'देशमुख', 'पाटील' असे लावण्याचा विलक्षण सोस आढळतो. परंतु यापकी अनेकाच्या घरात परस्परांतील अनैतिक संबंधाचा रोग एवढा जडला आहे की, त्याला अन्यत्र तोंड सापडणार नाही.

एक देवदासी म्हणाली, 'आज आम्हाला भाऊ भेटले. नाय तर रोजचीच 'इचक दाणी' चाललीय!' भाजी मंडईतील महिला कष्टकऱ्यांना 'संघटना' आधार वाटते. अतिप्रसंग करू पाहणाऱ्या मालकांना त्या जरब बसवतात. या बाबतीत शिक्षक, प्राध्यापकही मागे

नसतात. लग्नाचे आश्वासन देऊन वसतीगृहातील आदिवासी मुलीला गटवली. तिला दिवस गेल्यानंतर हा महाभाग नामानिराळा झाला. भारताच्या जनगणनेत स्त्री–पुरूषाच्या संख्येतील प्रमाण तफावत चिंतनीय आहे. सध्या शहरीकरणाचा वेग तुफान वाढत आहे. शहरांतून स्त्री–पुरूष संख्येतील तफावत आणखी भयावह आहे. दिल्ली सारख्या शहरात सायंकाळी सूर्यास्तानंतर महिलांना बाहेर पडणे मुश्लिक होते.

पुरूषी मानसिकतेला सनातनीने बळ दिले आहे. मानस दिले आहे. यात कोणताही धर्म मागे नाही. घटनेतील 'इदवादी' शब्दाचे रूपांतर सर्वधर्म समभावत केले गेले आहे. स्त्रियांना न्याय द्यायचा असेल तर आपल्याला निश्चयपूर्वक परंपरांचा त्याग करावा लागेल. त्यासाठी शिक्षणातून चिकित्सा करावयाला मुभा दिली पाहिजे. धर्म चिकित्सेला या देशात श्रद्धांच्या नावाखाली विरोध होतो. धर्माच्या नावाखाली आक्रमक दहशतवाद पोसला जातो. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या बरोबर काम करताना आम्हाला याचा अनुभव घ्यावा लागला आहे.

कष्टकरी स्त्रिया या अत्याचारांचा सामुदायिकरित्या मुलाबला करू लागल्या आहेत. दारू व बाईबाजी विरूद्ध त्या जाब मागू लागल्या आहेत. उच्चभ्रू समाजातील महिला मूकपणे अश्रु ढाळताहेत. स्त्री–शुद्रातिशूद्रांच्या कष्टकरी संघटनातून या प्रश्नाची सोडवणूक होताना दिसते. स्त्री–पुरूष समतेचा विचार शिक्षणातून रूजवला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेला घटना प्रत सादर करताना या विसंगतीवर नेमके बोट ठेवले आहे. त्यामुळेच दलित चळवळीत प्रश्न विचारला जातो. राज्य भीमस्मृतीचे? की मनुस्मृतीचे? हा प्रश्न केवळ हिंदू धर्मियांपुरता मर्यादित नाही तर तो सर्व धर्मांत आहे. तो संपवावा असा निर्धार–निश्चय नाही. राजकीय इच्छाही नाही. त्यामुळे कायदा करूनही अंमलबजावणी कठोरपणे होईल याची शाश्वती नाही. स्त्री–शूद्रातिशूद्र हा केवळ शब्दप्रयोग नाही तर त्यात 'वर्ण–वर्ग' बांधणीचे सूत्र आहे. आर्थिक, केवळ सामाजिक असे द्वंद्वही नाही. भारतीय संदर्भात या सूत्राचा वापर करण्यात आजही मनमोकळेपणा जाणवत नाही.

शेतकरी व कामगारांच्या एकजुटीचा जयजयकार होतो. परंतु या दोन्ही घटकात होत असलेला व झालेला बदल दुर्लक्षित होतो. कष्टकरी स्त्री 'स्त्री–शुद्रातिशूद्र' समूहाचे नेतृत्व

करायला सिद्ध झाली आहे. संसदीय पातळीवर त्यांची संख्या वाढत आहे. नेतृत्वाची मशाल तिच्या हातात येत आहे. या घटिकाचे मनापासून स्वागत केले पाहिजे. बलात्काराविरूद्ध उसळलेल्या क्षोभाचे विधायक कृतीत रूपांतर व्हायला हवे. त्यासाठी दैनंदिन जीवनाला कार्यक्रम दिला पाहिजे. विषमतावादी परंपरांचा कठोरपणे त्याग केला पाहिजे.[३६]

## ६.१२ समारोप

डॉ. आढाव हे ज्येष्ठ समाजवादी विचारवंत आहेत. १९४२ चा स्वातंत्र्य लढा, साने गुरूजींचे पंढरपूरचे उपोषण, १९४७ चे भारताचे स्वातंत्र्य, गोवा मुक्ती संग्राम, महाराष्ट्राची निर्मिती, पानशेत धरण, १९७२ चा दुष्काळ, आणीबाणीचे दिवस या सर्व घटनांचे ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारत व स्वातंत्र्योत्तर भारत यांना जोडणाऱ्या दुव्यांपैकी एक दुवा म्हणजे डॉ. बाबा आढाव आहेत.

शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित व स्त्रियांच्या उत्थानासाठी अनेक वैचारिक लेखन त्यांनी केलेली आहे. महात्मा फुले समता प्रतिष्ठान ही प्रकाशन संस्था स्थापन करून त्याद्वारा गेली चाळीस वर्षे 'पुरोगामी सत्यशोधक' हे त्रैमासिक चालवित आहेत. पुरोगामी सत्यशोधकाच्या माध्यमातून सामाजिक विषमता, पुरूष प्रधान संस्कृती, दैववाद, श्रद्धा–अंधश्रद्धा, देवदासी प्रथा, आदिवासींचे प्रश्न, धरणग्रस्तांचे प्रश्न यांच्यावर कडाडून हल्ले केलेले आहेत.

त्याचबरोबर त्यांचे 'एक गाव एक पाणवठा' हे पुस्तक विशेष गाजले, 'सत्यशोधनाची वाटचाल' मराठा जातीचे प्राबल्य, ही पुस्तके शेटजी–भटजीचे आधुनिक दास, देशमुख मराठा स्त्रियांचे दास्य, संघाची ढोंगबाजी, संघापासून सावधान हे लेख विशेष गाजले आहेत.

## ६.१३ संदर्भसूची


१) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८५ वर्ष ५, अंक १, पृष्ठ ३

२) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८१ वर्ष १, अंक १२, पृष्ठ ३६

३) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८५ वर्ष १०, अंक २, पृष्ठ १७

४) कित्ता, पृष्ठ ३

५) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००६ वर्ष ३२, अंक २, पृष्ठ ३

६) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८८ वर्ष १२, अंक २, पृष्ठ ४५

७) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००३ वर्ष २९, अंक ४, पृष्ठ १९

८) कित्ता, पृष्ठ ७२

९) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९४ वर्ष १९, अंक ३, पृष्ठ १८

१०) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८७ वर्ष १२, अंक ३, पृष्ठ ८

११) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९८ वर्ष २४, अंक १, पृष्ठ ३२

१२) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८९ वर्ष २४, अंक २, पृष्ठ १७

१३) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९९ वर्ष २५, अंक ४, पृष्ठ २६

१४) कित्ता, पृष्ठ ४७

१५) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००७ वर्ष ३३, अंक ४, पृष्ठ २४

१६) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००३ वर्ष २९, अंक २, पृष्ठ ५७

१७) लेख दैनिक सकाळ, दिनांक ०२/०८/२०१०

१८) लेख दैनिक सकाळ, दिनांक १७/०८/२०१०

१९) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००७ वर्ष ३३, अंक २, पृष्ठ ५८

२०) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००८ वर्ष ३४, अंक ३, पृष्ठ १२

२१) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९८५ वर्ष १०, अंक १, पृष्ठ ३

२२) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९७ वर्ष २३, अंक १, पृष्ठ २३

२३) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २००३ वर्ष २९, अंक २, पृष्ठ ९

२४) कित्ता, पृष्ठ २०

२५) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९३ वर्ष १८, अंक २, पृष्ठ २

२६) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, १९९७ वर्ष २३, अंक ३, पृष्ठ ४४

२७) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २०१२ वर्ष ३८, अंक ४, पृष्ठ ५

२८) कित्ता, पृष्ठ ६

२९) पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, २०१३ वर्ष ३९, अंक १, पृष्ठ ५

३०) हमाल मापाडी वार्ता – जळगाव अधिवेशन विशेषांक.

३१) हमाल मापाडी वार्ता – माथाडी कायदा विशेषांक १९६९, पृष्ठ क्र.३७

३२) कित्ता, पृष्ठ क्र.६५

३३) महाराष्ट्र आरोग्य मंडळ, सुवर्ण महोत्सवी विशेषांक २०१०, पृष्ठ क्र.१८

३४) तांबोळी शमशुद्दिन, हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत, द्वितीय आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३०, २०१४, पृष्ठ क्र.३

३५) आढावा बाबा, सत्यशोधनाची वाटचाल, संपादक, दत्ता काळेबेरे, प्रथमावृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, मार्च १९८९.

३६) साप्ताहिक साधना, स्वातंत्र्यदिन विशेषांक १९७०.

# प्रकरण सातवे

# मूल्यमापन

## समाजवादी बाबा आढाव

समाजवादी ध्येयनिष्ठा धरून आयुष्यभर लढे, चळवळी केलेले अनेक कर्ममहर्षी आपल्यात आहेत. त्यांच्यातील पहिली पिढी आता नाहीशी होत आहे. जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, ग. प्र. प्रधान, भाई वैद्य यांनी आयुष्यभर समाजवादाची चळवळ भारतामध्ये रूजवली. यांसारख्या कर्ममहर्षींची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात कार्यरत असणारे समाजवादी विचारवंत म्हणजे डॉ. बाबा आढाव. वर्गहीन, वर्णहीन, समाजव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य आयुष्यभर त्यांनी केले.

समाजवाद म्हणजे संपत्तीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेवून सर्वांना समान मानणारी व संपत्तीचे न्याय्य वितरण करून सर्वांना एकाच समान पातळीवर आणणारी विचारप्रणाली. उत्पादन, विभाजन आणि विनिमन यांची साधने जनतेच्या म्हणजे समाजाच्या मालकीची व्हावीत, प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणांची जोपासना करण्याची समान संधी दिली जावी व त्यातून समाजाच्या उत्पादनशक्तीचा विकास व्हावा ही तत्त्वे यामध्ये दिसून येतात. दारिद्र्य आणि शोषण संपुष्टात आणून एकच पातळीवर समाजाची पुनर्रचना करणे व मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करण्याचे आवाहन समाजवादाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे समाजवादी विचारसरणी ही समता व न्यायावर आधारित नव्या समाजव्यवस्थेचा पुरस्कार करते. समाजवादी विचार सरणीमध्ये व्यक्तिहितापेक्षा समाजहित अतिशय महत्त्वाचे आहे. एकोणीसाव्या शतकात समाजवादाचा विचार पुढे आला आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या मुलभूत अधिकारावर आधारित नवी रचना उदयास आली. सर्व स्त्री–पुरूषांत समानता स्थापन करणे, उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची करून त्यांचे न्याय्य वितरण करणे. प्रत्येकास त्याच्या कामाप्रमाणे व योग्यतेप्रमाणे मोबदला देणे. समाजातील उत्पादक शक्तीचा विकास घडवून आणणे आणि त्याद्वारे मानवी विकासास नव्या पातळीवर नेणारा वर्गविहीत व राज्यविहीत समाज स्थापन करणे या गोष्टींचा समावेश समाजवादात येतो. जगामध्ये समाजवादाचे अनेक प्रकार दिसून येतात.

भारताने १९७६ साली बेचाळीसावी घटना दुरूस्ती करून लोकशाही समाजवाद स्विकारला आहे. भारतामध्ये लोकशाही समाजवादी विचारसरणीची मूलतत्त्वे काँग्रेसांतर्गत स्थापन झालेल्या समाजवादी गटांत आढळून येतात.

समाज परिवर्तनाची गरज मान्य करून रोज आठ तास काम करण्याची व समाजाबरोबर राहण्याची तयारी आहे अशी कोणतीही व्यक्ती समाजवादी चळवळीमध्ये भाग घेत आहे. कामगार वर्ग, मध्यमवर्ग, शेतकरी, छोटे व्यावसायिक हा वर्गसुद्धा समाजवादी विचारवंतांकडे आशेने पाहत आहे. लहान मोठा कोणताही धंदा असो त्यात कामगार संघटना असतेच, गिरणी कामगार, खाण कामगार या कामगारांनी प्रचंड मोठ्या संघटना उभारून सामाजिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. गोदी कामगार, रेल्वे कामगार, एस. टी. कामगार, औषधी कामगार या मोठ्या प्रकारातील कामगार संघ काम करताना दिसत आहेत.

वेगवेगळ्या उद्योगातील व्यावसायातील कामगार संघटित होऊन स्वतःच्या मागण्यांसाठी लढताना दिसत आहेत. सरकारी कर्मचारी, शिक्षक संघटना, बँकेचे कर्मचारी, पोलीस इत्यादींच्या संघटना संप, मोर्चे, बंद या सारखे प्रकार करताना दिसतात.

अलीकडच्या काळात शेतकरी वर्ग सुद्धा वेगवेगळ्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरताना दिसत आहे. धान्याचे भाव बांधून देण्याची चळवळ, कर्जमुक्तीची चळवळ, कसेल त्याची जमीन ही चळवळ, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची चळवळ या चळवळींनी शेतकरी वर्ग जागृत झालेला आहे. बालकामगारांची स्वतःच्या हक्कासाठी, बेकारांची रोजगारांसाठी, वेठबिगारांची स्वतःच्या मुक्ततेसाठी चळवळी झाल्या. समाजवादाच्या दृष्टीने या संघटनांना खास महत्त्व आहे.

भाषिक राज्यांसाठी चळवळी व आंदोलने झाली. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, प्रांताचा विकास, विभागाचा विकास, मागासलेल्या विभागासाठी आर्थिक व शैक्षणिक सवलतींसाठी चळवळी, महागाई विरोधी चळवळी, महिला सबलीकरणासाठी जाणीव जागृतीच्या चळवळी गेल्या अनेक वर्षांपासून झाल्या आहेत. यातील काही चळवळी यशस्वी झाल्या आहेत, परंतु काही मर्यादित राहिल्या.

७ ते ८ कोटी दलित समाजाच्या उत्थानाची चळवळ ही लोकशाही चळवळ आहे. मंदिरातील प्रवेश, गावकीची कामे न करणे, भूमिहीनांना जमीन, नोकरीत शिक्षणात सवलती व

राखीव जागा यांसाठी दलितांनी चळवळी केल्या आहेत, समाजवादी समाजाच खऱ्या अर्थाने अस्पृश्यता, वर्णीयता नष्ट करणार आहे.

समाजवादामुळे राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात बदल घडून येईल. समाजाच्या विविध प्रकारच्या कलांना उत्तेजन मिळेल. आपला समाज अंधश्रद्धेच्या आहारी गेला आहे. पाप–पुण्य, नशीब, गतजन्मीचे फळ या साऱ्या विचारांचा पगडा समाजावर आहे. अशा समाजाला शास्त्रीय विचार देणे गरजेचे आहे. कृतीतून, पुस्तकातून शास्त्रीय विचारांचा प्रचार करून समाजावरील अविचाराचा पगडा दूर करणे गरजेचे आहे. शास्त्रनिष्ठा व प्रयोगशिलता विकसित झाली पाहिजे. जगाच्या इतर देशांमध्ये हे घडलेले आहे. आपल्या देशातही हे होईल. या देशात नवा भारतीय समाजवादी माणूस व त्यांची समाजवादी जीवनमूल्ये निर्माण होतील. नव्या समाजात कला, शास्त्र, सर्जनशीलता या गोष्टींना महत्त्व राहील.

समाजवादाला खरा विरोध आहे तो भांडवलदार वर्गाचा, जमिनदाराचा, अतिश्रीमंत व्यक्तींचा. वर्ण व्यवस्था कायम ठेवण्याचे काम हे प्रस्थापितच करत आहेत. प्रतिगामी विचार त्यांच्या डोक्यातून अजून जात नाहीत. गरिबांविषयी त्यांना अजूनही कळवळा येत नाही. त्यांच्या डोक्यात अजूनही ती संरजामशाही व राजेशाही प्रवृत्ती कायम दिसते. या प्रवृत्तीत बदल व्हायला हवा. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला सुरक्षतेची हमी मिळाली पाहिजे. त्यांना जीवनावश्यक वस्तु, शिक्षण, नोकरी, घरे, वैद्यकीय मदत, पेन्शन, सांस्कृतिक सुविधा इत्यादींची सुविधा या समाजवादातूनच मिळते.

माणसाची माणसाली चालविलेल्या, पिळवणूकीच्या पद्धतीवर आधारलेल्या, उच्च–निच्च वर्गवारी असलेल्या समाजरचनेचा अंत करणे युक्त आहे. असा विचार समाजवादी विचारसरणीच्या मुळाशी आहे. समाजरचनेचा केवळ आर्थिक पाया बदलून मानवी पिळवणूक थांबणार नाही तर प्रत्येक देशात समाजवादी विचार आणणे गरजेचे आहे. लोकशाही समाजवादामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या नैतिक आदर्शवादाचा अविष्कार करणारा अराज्यवाद पुरस्कृत आहे. लोकशाही समाजवादात व्यक्तिस्वातंत्र्य, संघटना स्वतंत्र्य अशी लोकशाहीला अभिप्रेत असलेली सर्व मूल्ये लोकसत्ताक स्वरूपाची समाजवादी शासन संस्थात जोपासू शकेल म्हणून शासन संस्थेला कोणताही धोका पोहचू न देता राज्याचे स्वरूप बदलवून ते आपल्याला पाहिजे तसे करून घेता आले पाहिजे. असे कार्य वेगवेगळ्या चळवळींच्या

माध्यमातून करणे शक्य आहे. समता व सनदशीर मार्ग या गोष्टी समाजवादी विचारात येतात. जनसामान्यांच्या सामाजिक, आर्थिक न्यायासाठी लोकशाही घटनात्मक मार्गाने समाज संघटीत करणारा सिद्धांत व चळवळ म्हणजे लोकशाही समाजवाद होय.

समाजातील दारिद्र्य संपुष्टात आणण्याचा, समाजाची पुनर्रचना करून मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठीचा प्रयत्न समाजवादात दिसून येतो. गेल्या ६० वर्षात डॉ. बाबा आढाव यांनी शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित, बालकामगार, धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त, रिक्षा चालक, झोपडपट्टीधारक, कष्टकरी, हमाल, मोलकरीण व पाण्यासाठी केलेला संघर्ष हा समाजवादी विचारसरणीतूनच झालेला आहे.

१९५२ पासून बाबा आढावांचा चळवळीशी संबंध आला. राष्ट्रसेवादलात त्यांचे मोठे बंधू हे सुद्धा सामाजिक चळवळीत भाग घेत असत. विद्येचे माहेरघर तसेच स्वातंत्र्यसंग्रामाचे केंद्र असलेल्या पुण्यामध्ये १ जून १९३० रोजी आढावांचा जन्म झाला. बाबांचा त्यांच्याहून पाच सहा वर्षे मोठा असलेला भाऊ चळवळीत थोडे बहुत काम करीत होता. त्या वातावरणाचा आढावांच्या मनावर परिणाम झाला. ते राष्ट्र सेवा दलात नियमाने जाऊ लागले. त्यांनी साने गुरुजींचे साहित्य वाचले. साने गुरुजींचे एक भाषणही ऐकले. घरातील आईचे सुसंस्कार आणि भोवतालचे देशभक्तीने भारलेले वातावरण यातून आढावांच्या मनाची घडण झाली. शिवाजी मराठा हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर आढावांनी पुण्यातल्या फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश घेतला. इंटर सायन्स पास झाल्यानंतर पुण्याच्या लोकमान्य टिळक आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला, आयुर्वेद महाविद्यालयात राष्ट्रीय विचारांचे आणि ध्येयवादी वृत्तीचे वातावरण होते. याचाही आढावांच्या मनावर सुसंस्कार झाला. शिवाय दादा गुजर, गोपाळ शहा, मार्तंड पाटील, सिंधू केतकर आदि सेवादलातील मित्र आयुर्वेद महाविद्यालयातच शिकत होते. हे सर्वजण शिकत असतानाच भावी ध्येयवादी जीवनाच्या योजना आखत होते. त्यावेळी हडपसर हे राष्ट्र सेवा दलाचे एक प्रमुख केंद्र होते. तेथे रामभाऊ तुपे व त्याचे सहकारी समाजवादी पक्षाचेही काम धडाडीने करीत होते. १९६० साली एस्. एम्. जोशी नुकतेच वैद्य झालेल्या बाबा आढाव, दादा गुजर यांना बोलावून 'हडपसरला गरिबांसाठी दवाखाना सुरु करा' असे सांगितले'. एस. एम्. जोशी यांच्या सांगण्यानुसार वरील पाच डॉक्टरांनी एकत्र येवून 'महाराष्ट्र आरोग्य मंडळ' ही संस्था स्थापन केली. या डॉक्टरांनी सेवादलाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने दवाखाना सुरु

केला. १९६० च्या आधी हडपसरमध्ये रात्रीच्या वेळी आरोग्य सुविधा मिळत नव्हती, ती मिळू लागली व त्यामुळे हडपसर परिसरातील गोरगरिबांच्या आरोग्याचे प्रश्न सुटण्यास मदत झाली. हवेली तालुक्यातील हडपसर व पूर्व भागातील लोकांना महाराष्ट्र आरोग्य मंडळाचा लाभ मिळावा या हेतूने लोणी काळभोर, कुंजीरवाडी, आळंदी चोराची याठिकाणी छोटे–छोटे दवाखाने सुरु करण्यात आले. औषधाबरोबर राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून आवाबेन देशपांडे यांच्या नेतृत्त्वाखाली स्त्री पथक तयार करण्यात येवून कुटुंब नियोजनाच्या कामाला सुरुवात केली. हडपसरगावातील लोकांचे आरोग्य सुधारावे म्हणून पिण्याच्या शुद्ध पाण्याचा व्यवस्थेस प्रारंभ झाला. महाराष्ट्र आरोग्य मंडळामध्ये संस्थेच्या सुरुवातीपासून कित्येक वर्षे बाबा आढाव यांनी निरपेक्षपणे उत्कृष्ट काम केले याची नोंद समाजाला घ्यावी लागेल. महाराष्ट्र आरोग्य मंडळाने समाजातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तसेच आदिवासी विभागातील मुलांच्या शिक्षणासाठी एक वसतीगृह हडपसर येथे सुरु केले. साधना सहकारी बँक, साधना शैक्षणिक संकुल, साने गुरुजी शिक्षण संस्था, डॉ. एस्. एम्. जोशी महाविद्यालय, हडपसरमध्ये निर्माण करण्यात आले. महाराष्ट्र आरोग्य मंडळाची रचना, कार्यकुशलता मोठ्या प्रमाणात वाढली आणि महाराष्ट्र आरोग्य मंडळ ही उत्कृष्ट संस्था म्हणून नावारुपास आली. १९ जून १९६० रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यावेळी एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे यांचे मार्गदर्शन डॉक्टरांना लाभले होते. या डॉक्टरांनी स्वत:च्या उत्पन्नावर मर्यादा घालून महिन्याला फक्त अडीचशे रुपये मानधन घ्यावयाचे आणि दवाखान्याचे बाकीचे उत्पन्न कामाच्या वाढीसाठी देण्याचे ठरविले. हडपसर गावठाण्यात डॉ. बाबा आढाव यांचा स्वत:चा दवाखाना आणि छोटे हॉस्पिटल होते. त्याचचं रुपांतर महाराष्ट्र आरोग्य मंडळामध्ये झाले. मुळातच डॉ. बाबा आढाव हे समाजसेवी वृत्तीचे असल्यामुळे स्वत:चा व्यवसाय चालू न ठेवता ग्रामीण लोकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा या हेतूने 'महाराष्ट्र मंडळ' स्थापन झाले. शुध्द, सरळ सेवाभावी व सहिष्णुतेच्या हेतूने ही संस्था स्थापन झाल्यामुळे आज त्याला सुंदर फळे लागली आहेत.

प्रसिध्द समाजवादी कार्यकर्ते व लढाऊ वृत्तीचे नेते. जनआंदोलनातून साकारलेले प्रभावी नेतृत्व. महात्मा फुल्यांच्या विचारांशी असलेली बांधीलकी मानणारे आणि जपणारे मनस्वी पुरोगामी व्यक्तिमत्त्व म्हणून आढाव कार्य करीत आहेत. त्यांनी विविध सामाजिक व राजकीय आंदोलनांमध्ये सहभाग घेतला, त्याकरिता अनेक वेळा तुरुंगवासाची शिक्षा भोगली.

बाबा आढाव यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा तसेच समाजवादी विचारसरणीचा प्रभाव आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची समाजाला आजही गरज आहे, असे त्यांचे मत आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. त्याकरिता विधायक संघर्षाच्या मार्गाचा त्यांनी पुरस्कार केला आहे.

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रकारच्या जनआंदोलनामध्ये त्यांनी वेळोवेळी भाग घेतला आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ, धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी झालेले आंदोलन, दलित, भटक्या व विमुक्त जातींच्या न्याय्य हक्कांसाठी चाललेल्या चळवळी इत्यादी अनेक चळवळींत ते नेहमी अग्रभागी राहिले आहेत.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही बाबांनी भाग घेतला आहे. समाजातील जातिभेद व वर्णव्यवस्था यांस त्यांचा प्रखर विरोध आहे. स्त्रीजातीवर होणारा अन्याय व देवदासी प्रथा यांविरुध्दही त्यांनी संघर्ष केला आहे. ते विधवाविवाहाचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात.

सन २००५ मध्ये बाबांनी 'म्हातारपणाचं करायचं काय, पेन्शन घेतल्याबिगार राहायचं नाय' हा मंत्र येथील संघटित कष्टकऱ्यांना देवून एका जिवंत पण दुर्लक्षित समस्येस वाचा फोडत एक नवे आंदोलन छेडले.

मे, २००७ पासून त्यांनी 'जातिविरहीत समाज रचना' ही नवी परिवर्तनवादी चळवळ हाती घेतली आहे.

सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून त्यांनी 'एक गाव –एक पाणवठा' ही मोहीम चालविली होती. दलित व उपेक्षित वर्गांना त्यांचे न्याय हक्क मिळालेच पाहिजेत याविषयी ते विशेष आग्रही आहेत. या प्रश्नावर समाजात जागृती घडवून आणण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. हमालांचे व श्रमिक कामगारांचे संयमी पण कृतिशील नेते म्हणूनही बाबा कार्यरत आहेत. निर्भिड आणि निःस्पृह कामगार नेते या नात्याने बाबांची एक आगळी प्रतिमा जनमानसावर उमटली आहे. त्यांनी पुण्यात हमालांसाठी 'हमाल भवन' ही वास्तू उभारली असून' ना नफा ना तोटा' या तत्वावर ठिकठिकाणी 'कष्टाची भाकर' केंद्रे उभी केली आहे. आदर्श कामगार नेतृत्त्व कसे असावे याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे.

महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीस दिशा दाखवून देणाऱ्या 'पुरोगामी सत्यशोधक' या त्रैमासिकाचे संपादकपद त्यांनी भूषविले आहे.

स्वतंत्र भारतात गरीब, कष्टकरी, अंगमेहनती, स्वयंरोजगार समुहांना माणूसपणांचं जिणं मिळवून देणाऱ्या यशस्वी प्रयत्नांमध्ये डॉ. बाबा आढाव यांचे कार्य निर्विवादपणे अव्वल आहे. गेली साठ वर्षे डॉ. आढाव कष्टकरी जनसमूहांच्या न्याय प्रश्नावर झगडत आहेत. त्यांना संघटित करत आहेत. त्यांच्या संरक्षणासाठी शासनाच्या पाठी लागून कायदे करुन घेत आहेत. संघर्षाबरोबरच विधायकदृष्टी ठेवून रचानात्मक कामेही उभी करत आहेत. हमाल, पथारीवाले, मोलकरणी, कागद–काच–पत्रा उचलणारे, बांधकाम मजूर, रिक्षावाले, टेंपो चालक, अशा उपेक्षित व नाकारलेल्या समाज घटकांना मानाचं आणि आर्थिकदृष्ट्या सुस्थिर जीवन जगता यावे यासाठी सर्व ते प्रयत्न बाबा आढाव व त्यांच्या संघटना करत आहेत. हे काम थोडथोडकी नव्हे, तब्बल सहा दशके चिकाटीने, चिवटपणे आणि अदम्य बांधिकलकीने चालू आहे. बाबा आढावांच्या कामाला महात्मा फुले समता प्रतिष्ठान, विषमता निर्मूलन परिषद, सामाजिक कृतज्ञता निधी, एक गाव एक पाणवठा मोहीम असे इतरही अनेक आयाम आहेत. जाती निर्मूलन, जातिअंतासाठी राजकारण, प्रबोधनाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, महात्मा फुले, सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर चळवळीशी संबंधित संशोधन अशा अंगानेही बाबांनी महत्त्वपूर्ण काम केलं आहे. गंजपेठेतील महात्मा फुले वाड्याचे स्मारक करण्याचा प्रयत्न केला परंतु स्मारक करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. शासनाने हे पूर्ण काम महापालिकेकडे सोपवले होते. शरद पवारांनी १९९० साली स्मारकाच्या ठिकाणी लक्ष घातले. याचे कारण तेथे व्हि. पी. सिंग यांच्या उपस्थितीत म.फुले यांना अभिवादन करणारा मेळावा झाला तो अति विराट होता. स्मारकाच्या ठिकाणची मुख्य अडचण म्हणजे भाडेकरुंना पर्यायी जागा देण्याची. एकूण १३२ कुटुंबे होती. ६० कुटुंबे नवीन जागेत गेली होती. अजून ६७ ते ६८ कुटुंब आणि २० छोटी दुकाने हलवायची होती. छगनराव भुजवळ यांनी पुढाकार घेल्यामुळे स्मारकाभोवतालची जागा थोडी मोकळी झाली. डॉ. बाबा आढाव यांनीही बराच प्रयत्न केला. त्यांच्या मते शनिवार वाड्यात जसा लाईट साऊंड शो असतो तसा येथे सुरु व्हायला हवा.

एस. एम. जोशी यांनी सांगितल्यानंतर बाबा आढावांच्या असे लक्षात आले की, असंघटित कामकारांना कोणी वाली नाही. त्यांचे प्रश्न कोणी मांडत नाही. ना चळवळ आहे ना कायदा. कमी पगारात दिवसभर राबणाऱ्या हमाल बांधवात एकप्रकारचा असंतोष दिसत होता.

तेव्हा चालू असलेल्या गोवा मुक्ती आंदोलनाशी त्यांचा संबंध होता. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्यांचा सहभाग राहिला. याच काळात बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली 'हमाल पंचायत' या संघटनेचा जन्म झाला. हमाली दरात वाढ मिळवून देणं, हे सुरुवातीचे प्राथमिक उद्दिष्ट होतं. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर हमाल पंचायतीच्या कामाला जोर आला. कामगार कायद्याचं संरक्षण मिळण्यासंबंधीची मागणी त्यातून पुढे आली.

१९७० च्या सुमारास विविध वस्तुंच्या बाजारातील हमाल स्थानिक व्यापाऱ्याच्या शोषणाविरुद्ध पंचायतीच्या झेंड्याखाली एकत्रित आले. बाजारपेठ बंद ठेवणं, छकड्यांचा सत्याग्रह, व्यापाऱ्यांची नाकेबंदी करुन आपल्या मागण्यासाठी संघर्ष केला. 'दामाशिवाय काम नाही', 'आमच्या पाठीचे आम्ही मालक' अशा घोषणा बाजारपेठेतून घुमू लागल्या. १९६९ साली महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायदा संमत झाला. या कायद्यानुसार कामगारांच्या सेवाशर्ती निश्चित करणं, कामगारांची सुरक्षितता, कल्याण व आरोग्य यासाठी उपाय योजणे, टाळता येण्यासारख्या बेकारीस प्रतिबंधक उपाय योजणं इ. उद्दिष्टांचा समावेश आहे. हमालीच्या पैशावर डॉक लेबर बोर्डाने हमालीच्या प्रमाणात लेव्ही द्यायची व त्यातून हमालांना प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅच्युईटी, हक्काच्या रजा, विमा, वैद्यकीय सहाय्य इ.सुविधा सुरु झाल्या. या कायद्याच्या विरोधात व्यापारी वर्ग न्यायालयात गेल्याने त्याच्या अंमलबजावणीस १९८० साल उजाडाव लागलं.

कष्टकऱ्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याचे प्रयत्न बाबा आढावांनी पुण्यातून केले. हमाल पंचायतीच्या माध्यमातून अनेक विधायक उपक्रम त्यांनी सुरु केले. यामध्ये कष्टाची भाकर, भाऊ भेट, दवाखाना, शाळा व पतसंस्था इ.प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. हमाल पंचायतीने 'ना नफा ना तोटा' या तत्वावर स्वस्त व सकस आहार देण्यासाठी १९७५ साली कष्टाची भाकर ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. गेली ४० वर्ष कष्टाची भाकरची केंद्रे व्यवस्थित चालवली जात आहेत.

जे हमाल मृत्यू पावतात त्यांना तातडीने मदत पुरविण्यासाठी १९७५ साली भाऊ भेट हा उपक्रम सुरु केला. १९७६ साली पुस्तक पेढी हा उपक्रम पंचायती तर्फे सुरु केला. हमालांच्या मुलांना गरजेप्रमाणे पुस्तक उपलब्ध करुन दिली गेली. १९७० मध्ये डॉ.अनिल अवचट यांच्या पुढाकाराने स्वस्त दवाखाना हा उपक्रम सुरु करण्यात आला.

डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या खासगी दवाखान्याची जागा या योजनेसाठी दिली. अंगमेहनती कामगार अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडतात. पाठीवर ओझं उचलून हमालांना निरनिराळे पाठीचे आजार जडतात. तसेच रसायन, घातक द्रव्य, सिमेंट, तिखट इ.पदार्थ वारंवार हाताळावे लागतात. त्यामुळे व कामाच्या ठिकाणी किमान सोयी सुविधांचा अभाव असल्याने हमालांचे आरोग्य कमालीचे खालावते. म्हणून स्वस्त दरात उपचार व औषधे पुरवली जातात. शिवाय त्यांना आरोग्य विषयक शिक्षण दिलं जातं. दारुचं व्यसन, कुटुंब नियोजन या संदर्भात ही प्रबोधन केलं जात. बाहेरची मदत न घेता हमाल कामगारांनी उभारलेल्या निधीतून हा दवाखाना चालवला जातो.

हमालांच्या स्वत:च्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यातही पंचायतीने पुढाकार घेतला आहे. हमाल नगर योजनेतून तसा प्रयत्न करण्यात आला. गुलटेकडी मार्केटयार्डाच्या पाठीमागील बाजूस हमाल नगर वसवलं आहे. पहिल्या टप्प्यात ३४ घरकुल आणि दुसऱ्या टप्प्यात ३८८ कुटुंबासाठी घरं बांधण्यात आली. कष्टकरी लोकांची मुलं शिक्षणांत पुढे जावीत या हेतूने जून २००० साली हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाची सुरुवात केली गेली. सुरुवातीपासून सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्याने जिल्हा परिषदेची मान्यताही त्वरीत मिळाली.

पुणे हे औद्योगिकरणाच्या बाबतीत अधिक वेग असलेल शहर आहे. औद्योगिकीकरणातून होणाऱ्या शहरी करणाच्या विस्ताराबरोबरच दुचाकी वाहनं व ऑटो रिक्षाचीही संख्या वाढत गेली. पुण्यात पी. एम्. टी. ची सेवा अपुरी व अकार्यक्षम असल्याने रिक्षांना महत्त्व आलं. सुमारे ५०००० रिक्षा शहरात धावतात मात्र रिक्षांच्या वाढत्या संख्येबरोबर रिक्षावाल्यांचे प्रश्नही गुतागुंतीचे बनत गेले पेट्रोलचे वाढते दर, भाडेवाढीला ग्राहक, आर.टी.ओ. व शासनाचा विरोध, पोलिसांकडून होणारा त्रास या व अशा मुद्यांना धरुन डॉ. बाबा आढाव यांनी १९९४ साली रिक्षा पंचायतची स्थापना केली. सुमारे १५००० रिक्षा चालक पंचायतीचे सभासद झाले. सदस्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांचे सर्वसाधारण जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट सुरुवातीस होतं. १९९६ नंतर रिक्षा चालकांच्या संघटनेला राज्यव्यापी स्वरुप मिळालं. विविध मागण्यासाठी १९९४ ते डिसेंबर १९९८ या काळात आंदोलने, बंद, निदर्शनं, मोर्चा, सत्याग्रह केला गेला.

वाढत्या शहरीकरणाबरोबरच पथारी व्यावसायिकांच्या संख्येत ही वाढ होत आहे. रोजगाराअभावी, कोणत्याही तांत्रिक कौशल्याअभावी, भांडवलाअभावी शहराच्या आसपासच्या भागातून स्थलांतरीत होणारे तरुण पथारी व्यावसायिक बनतात. पुणे शहरात सुमारे ५०००० पथारी व्यावसायिक आहेत. त्यापैकी सुमारे ११००० पथारी व्यावसायिकांना बाबा आढावांनी संघटनेच्या छत्राखाली एकत्र आणले आहे. १९९७ साली या संघटनेची स्थापना झाली. पथारी व्यावसायिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याचे प्रयत्नात आहेत. या व्यावसायिकांना कमी व्याज दराने भांडवल उपलब्ध करुन देणे. ही एक भुमिका होती. संघटनेच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांची शासन दरबारी दखल घेतली जाऊ लागली आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत महानगरपालिका हद्दीतील १०००० पथारी धारकांना पक्की दुकाने बांधून देण्यात येणार आहेत. संघटनेच्या कामाची ही पावतीच आहे.

कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत–समाजातील सर्वात कनिष्ठ गटाला प्रतिष्ठा मिळवून देणारा हा उपक्रम आहे. भंगार वेचणारे कामगार हे असंघटित कामगारांच्या वर्गवारीत व एकूणच जातीव्यवस्थेत सर्वात खालच्या स्तरात मोडतात. कागद, काच, पत्रा इ.भंगार वेचणाऱ्याकडे समाज भिकारी किंवा चोर म्हणून पाहतो. दृष्टिकोन बदलण्यापासून व त्याची कामगार म्हणून ओळख प्रस्थापित करण्याची कामगिरी पंचायतीने पार पाडली आहे. या संघटनेची सुरुवात पुण्यातील एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या प्रौढ शिक्षण केंद्राच्या उपक्रमातून झाली. या केंद्राचे प्रौढ शिक्षण वर्ग झोपडपट्ट्यात चालत. त्यातून भंगार वेचणाऱ्या स्त्री कामगारांचे अनेक प्रश्न समोर आले. त्यामुळे सुमारे १५०० स्त्रियांची एक परिषद घेण्यात आली व लगेचच संघटना स्थापन करण्यात आली. पुण्यात या व्यवसायात सुमारे ५०००० कामगार आहेत. त्यापैकी सुमारे ८००० कामगार या संघटनेचे सभासद आहेत. उत्पादक कामात प्रत्यक्ष सहभाग जरी या कामगारांचा नसला तरी पुनर्निमिती प्रक्रियेला व पर्यावरणाला हे कामगार हातभार लावतात हा दृष्टिकोन समोर ठेवून १९९५ मध्ये महापालिका व संघटनेच्या वतीने सुमारे ३५०० भंगार कामगारांना ओळखपत्रे देण्यात आली.

या कष्टकऱ्यांना पत मिळवून देण्याकरता कागद, काच, पत्रा सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. १९९४ पासून संघटनेने सभासदांचे बचतगट सुरु केले. १९९६ मध्ये

सहकारी पतपेढी सुरु केली. या पतपेढीच्या सुमारे १५०० महिला सभासद आहेत. १९९७ मध्ये संघटनेला महाराष्ट्र फाऊंउेशन पुरस्कार मिळाला. स्त्री सभासदांमध्ये निरक्षरांचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांच्यासाठी प्रौढ शिक्षण वर्ग, मुलांसाठी अनौपचारिक शिक्षण वर्ग सुरु केले गेले. त्याशिवाय संघटनेतर्फे बालकामगारांचे पुनर्वसन, मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण, दारु बंदी, हुंडा बंदीची मोहीम, मोफत आरोग्य तपासणी व औषधे, सामुदायिक विवाह सोहळा इ.उपक्रम चालतात.

रोज आठ तास काम करणाऱ्या मोलकरणीही कामगार आहेत त्यामुळे त्यांना कायद्याचं संरक्षण मिळालं पाहिजे अशी संघटनेची मागणी होती. त्यांच्यासाठी पंचायतीने इतर मोलकरणींच्या संघटनांच्या सहकार्याने मोर्चा, निदर्शने, आंदोलने सुरु केली होती.

ग्रामीण क्षेत्रातून विविध कारणांमुळे विस्थापित झालेले लोक शहरांमध्ये येवून काम शोधत असतात. त्यातील मोठा गट बांधकाम मजूर म्हणून कार्यरत असतो. या बांधकाम मजुरांचे प्रश्न घेवून बाबा आढावांनी १९९३ मध्ये बांधकाम कामगार पंचायत नावाची संघटना उभी केली.

१९७३ मध्ये सत्यशोधक समाजाची शताब्दी धुमधडाक्यात साजरी केली. १९७० च्या सुमारास एक गाव एक पाणवठा या मोहिमेला चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. सामाजिक अशांतता दिसताच अग्निशामक दलाप्रमाणे बाबा आढाव धावून जातात. कोणत्याही हाकेची वाट न पहाता दलित स्त्री अथवा असंघटित कामगार यांच्यावर कोठेही अत्याचार झाला असे कळताच पीडीतांना आधार देण्यासाठी बाबा आढाव सुसाट सुटलेच असा अलिखित नियम आहे. देवदासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न, नामांतर लढ्याचे प्रखर नेतृत्त्व त्यांनी केले. बाबा आढाव हे महात्मा फुले यांच्या समाज क्रांतीच्या कृतीशील विचाराने पछाडलेले व्यक्तित्व आहे.

हमाल पंचायतीच्या स्थापनेला ६० वर्ष झाली आहेत. १९५६ साली ऐतिहासिक संप झाला. केवळ संपच नव्हे तर १०० हमालांना भाई वैद्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करावा लागला. येरवडा जेलची यात्रा घडली. तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.शेख यांच्या मध्यस्तीने संप मिटला. त्या अगोदर कितीतरी दिवस संघटना बांधणीचे काम सुरु झाले होते. डॉ.आढाव राष्ट्र सेवा दलाच्या संस्कारात वाढले. बंधू साक्षरता प्रसाराचे काम करीत. ते पालखी चौकातील बोर्डावर बातम्या लिहित असत. त्यावेळी आताच्या सारखी पेटी वाचनालये नव्हती. पालखी

विठोबा चौक बाजारपेठेत आहे. नाना–भवानी –गुळ आळी– गणेश – रविवार या पुण्यातील पूर्वापार व्यापार पेठा. त्यामुळे वाड्या वाड्यातून हमालांची बिऱ्हाड राहत. काही हमाल बिऱ्हाड गावाला ठेवून दुकानातच मुक्मामाला असत. त्या बदल्यात व्यापारी साफसफाई, गाद्यांवर चादर घालणे, पाणी भरणे, कचरा गोळा करुन टाकणे इ.कामे हमालांच्याकडून करवून घेत. असा कचरा, मेलेल्या घुशी व उंदीर रस्त्यावर टाकले की हमालांचे नगरपालिकेच्या सफाई कामगारांबरोबर भांडण होई. बहुसंख्य सफाई कामगार दलित स्त्री वर्ग असल्याने अरे–कारेची भाषा होई. त्या बाया युनियनचा धाक घालीत. त्याकाळी नगरपालिका कामगार संघटनेचा दबदबा होता. हमालांचे संघटन नव्हते. यातून लक्ष्मण सुद्रिकादी हमालांना आपली संघटना कराविशी वाटू लागले. १९५५ सालचे गोवा– मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून हमालांसारख्या 'खास मराठी बाण्याच्या' कष्टकऱ्यांना चेतना मिळाली. ग्रामीण भागातून आलेले पहिलवानी पेशातील हे तरुण. त्यांची ढोल लेझीम कोणत्याही मिरवणुकीत आकर्षण ठरे. या मंडळींनी जमायला सुरुवात केली. आढावांचा दवाखाना व राहते घर जवळच होते. समाजवादी चळवळीत कामगार संघटना कार्याला प्राथमिकता असे. पहिल्या सभेला १७ हमाल जमा झाले. भवानी पेठेतील हमाल चौकात छोटेसे राम मंदिर आहे तेथे विचार झाला. ग्रामीण प्रभाव असल्याने संघटनेचे नाव' हमाल पंचायत' ठेवले. बैठका, सभा, मोर्चे, सत्याग्रहांचा धडाका सुरु झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हमाल आघाडीवर राहिले. १९६० साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. हमालांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९६१ साली पुण्यात पानशेत प्रलय झाला. १९६२ साली विशाल सह्याद्री दैनिकाच्या प्रकाशन समारंभाला ते पुण्यात आले असताना हमाल पंचायतीने टिळक रोडवर जोरदार निदर्शने केली. मुख्यमंत्री मोर्चाला सामोरे आले. कामगार कायद्याचे जाहीर आश्वासन दिले. त्यांनी एका समितीकडे हा प्रश्न सुपुर्द केला. अशा तीन कमिट्या झाल्या. प्रत्येकवेळी मालक मजूर नात्याचा प्रश्न उपस्थित होई. व्यापारी वर्गाचे म्हणणे असे की, ''हमाल आमचा नोकर नाही. तो गिऱ्हाईकाचे काम करतो. गिऱ्हाईकाकडून हमाली घेतो. आडत व्यापारी म्हणत आम्ही शेतकऱ्याला पट्टीतून पैसे देतो, संयुक्त महाराष्ट्रापूर्वी असलेल्या मुंबई राज्यात श्री. यशवंतराव चव्हाण पुरवठा मंत्री होती. त्यांच्या काळातच व्यापाऱ्यांचे म्हणणे ग्राह्य मानून हमालांना शॉप ॲक्टमधून वगळण्यात आले व तशा प्रकारचे परिपत्रक निघाले हाते.

शेवटी आमदार शिवाजीराव गिरीधर पाटलांच्या कमिटीने माथाडी–हमाल कामगार कल्याणासाठी कायद्याची शिफारस केली.

माथाडी कामगार योजना श्री.डिमेलो व त्यांच्या सहकाऱ्यांनी गोदीतील माथाडी हमाल कामगारांसाठी सुरु केली होती. डॉक वर्कर्स लेबर युनियनने आपले संघटनही सुरु केले होते. त्यातून अनेक नेते निर्माण केले. महाराष्ट्र राज्य माथाडी, हमाल व इतर असुरक्षित कामगार कायदा १९६९ साली अस्तित्वात आला. त्याची अंमलबजावणी १९७४ साली मुंबई, पुणे, नागपुरातील काही बाजारपेठेतून सुरु झाली. पुण्यातील व्यापारी कोर्टात गेले. कोर्टाने स्टे दिला. १९८० साली सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याला हिरवा कंदिल दाखवला. दरम्यानच्या काळात अनेक आंदोलनात हमाल पंचायतीने भाग घेतला. पुण्यातील झोपडपट्ट्या, महागाई, धरण व प्रकल्पग्रस्त, पुनर्वसन, शेतजमीन फेरवाटप, सत्यशोधक समाजाची शताब्दी, राजर्षि शाहू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी, एक गाव–एक पाणवठा, देवदासी प्रथा निर्मुलन व पुनर्वसन, भटके विमुक्त, आणिबाणी इत्यादी आंदोलनात हमाल पंचायतीने सक्रीय योगदान दिले याच काळात सरकारी गुदामातील हमाली कामाच्या टेंडर पदधतीविरुद्ध पंचायतीने निकराचा लढा दिला. सरकारने मजूर सहकारी सोसायट्यांचा पर्याय काढला. परंतु मजुरांच्या सोसायट्यातील स्पर्धेमुळे प्रश्न बिकट बनले. खाजगी कंत्राटदारांनी, राजकीय पुढाऱ्यांनी बनावट मजूरसोसायट्या बनवल्या. आजही काही जिल्हाधिकारी हमालांच्या पाठीचा लिलाव पुकारतात. त्यातील कमी दरात मजूर सोसायट्यांना काम स्विकारायला भाग पाडतात. तत्वतः हमाल पंचायतीने हमाली कामाच्या टेंडर पध्दतीला विरोध केलेला आहे. आता संघटित क्षेत्रात कंत्राटी पद्धतीचा सर्रास वापर केला जात आहे.

१९८० सालापासून महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या कामास सुरुवात झाली. हमाल भवनाचे उद्‌घाटन झाले. त्या अगोदरच नाना–भवानी पेठेतील बाजाराचे गुलटेकडी मार्केट यार्डावर स्थलांतर झाले. हमालांच्या आरोग्यात त्यामुळे सुधारणा झाली. अंधारलेल्या, आडवळणी, कोंदट, वेड्यावाकड्या जिन्यांच्या माड्यातून काम करावे लागे त्यात परिणामकारक बदल झाला. व्यापारी दलाल नव्या जागेवर जाण्यास तयार नव्हते. हमाल पंचायतीने निकराचे लढे दिले. तुरुंगवास पत्करला. पुढे मार्केट यार्डात दारुगुत्ते सुरु होऊ नयेत यासाठी व्यापाऱ्यांसह आंदोलन केले. शासनाने मागणी मान्य केली व दारु विक्री परवान्यावर बंदी

घातली. मार्केट कमिटीवर हमाल मापाड्यांनी प्रतिनिधित्त्व मिळवले. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाची अधिवेशने सुरु झाली. पहिले अधिवेशन अहमदनगर येथे १९८० साली झाले. त्यानंतर फलटण–पंढरपूर–सांगली–धुळे–जळगाव–अमरावती–नागपूर इ.ठिकाणी अधिवेशने झाली. अधिवेशन दोन वर्षांनी होते. मधल्या वर्षात मध्यवर्ती आंदोलनाची आखणी होते. मुंबई मोर्चा, दिल्ली मोर्चा, नागपूर मोर्चा, औरंगाबाद मोर्चा असे स्वरुप. महामंडळाच्या सभा नियमितपणे होतात. राज्यात मुंबई, ठाणे, रायगड बाहेर प्रत्येक जिल्ह्यातील अगदी तालुका पातळीवर संघटनात्मक बांधणी झालेली आहे. मातेऱ्यावर जगणाऱ्या महिलांना मार्केट कमिटीचा परवाना मिळू लागला आहे. काही ठिकाणी त्यांना माथाडी कायद्याचे संरक्षणही उपलब्ध आहे. पुण्याच्या भुसार विभागात पूना मर्चंट्स चेंबरच्या सहकार्याने माथाडी कायद्याच्या धर्तीवर महिला कामगार कल्याणकारी योजना अंमलात आली आहे. एस. टी. हमाल, रेल्वे स्टेशनवरील बिल्ला हमाल, रेल्वे मालधक्क्यावरील हमालांनाही माथाडी कायद्याचे संरक्षण उपलब्ध झाले आहे. बाजार समित्यांनी साह्य केल्याने जागोजाग हमाल भवने साकारली गेली आहेत. राष्ट्रीय एकात्मता, आरक्षण, मंडल आयोग, मराठवाडा विद्यापीठ नामांतर, शिवजयंती, डॉ. आंबेडकर जयंती, म. फुले स्मृतिदिन, १ मे कामगार दिन मोठ्या ताकदीने व सहभागाने साजरा केला जातो. त्यात नाविन्यपूर्व उपक्रम आखले जातात. साक्षर झालेल्या हमालांनी स्वतःच्या सह्यांचा हार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अर्पण केला, कर्नाटक–महाराष्ट्र सीमेवरच्या देवदासी ब्राह्मण गावच्या महिलांना भाऊबीज केली, जयपूरच्या मनू पुतळा हटाव मोहिमेत सक्रीय सहभाग केला.

हमाल पंचायत कष्टाची भाकर योजनेला ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. रोज १५०० कष्टकरी तिचा लाभ घेतात. पुण्याच्या सांस्कृतिक जीवनाचा तो भाग बनला आहे. हमाल पंचायतीचे सर्व कार्यक्रम म.फुल्यांच्या सामुदायिक अखंड गायनाने व क्रांतीगीत गायनाने सुरु होतात. वृक्षारोपण होते, वृद्ध कष्टकरी स्त्रीपुरुषांचा सत्कार होतो. फेटे–हार–फटाकड्यांना फाटा दिला जातो. नारळ व फुलांवर भागवले जाते. कार्यक्रमात शिस्त असते. हमालांचे वागणे जवान सैनिकांसारखे असते. आता चळवळीचे लोण घरकाम करणाऱ्या मोलकरणी, कागद–काच–पत्रा गोळा करणाऱ्या भगिनी, पथारी व्यावसायिक, रिक्षा, टेंपो चालक, अपंग, बांधकाम,

मजूर, शेतमजूर इ.घटकात पसरले आहे. संघटित –असंघटित कष्टकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

जात, धर्म, लिंग, भाषा प्रदेश इ.भेदांच्या भिंतीपलिकडे 'कष्टकरी' एकजुटीचे चित्र साकारत आहे. केंद्रिय मंत्रिमंडळाने नुकतीच सामाजिक सुरक्षा कायद्याला मान्यता दिली आहे. उतारवयात पेन्शन, आजारपणांत उपचार व साह्य, मुलांचे शिक्षण इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध होतील. 'कामगार' या शब्दाची व्याख्या बदलत आहे. हमाली काम म्हणजे बिन कसबी –पत नसलले काम हा समज खोडला गेला आहे. हमालांना बोनस–प्रॉव्हिडंड फंड मिळू लागला परंतु अद्याप पेन्शन मिळालेली नाही ती मिळेल याची खात्री आहे. हमालांना न्याय केवळ स्वत:पुरता मर्यादित नको आहे. तो सर्व कष्टकऱ्यांना उपलब्ध व्हावा यासाठी धडपड सुरु आहे. स्त्री–पुरुष वेतनातील तफावत दूर करावयाची आहे. मताचा अधिकार मिळाला असला तरी पत मिळालेली नाही. ७/१२ च्या उताऱ्यावर नाव असावे यासाठी शेतजमीन फेरवाटप, हमालनगरासाठी सरकारी जागांची मागणी सुरु आहे. पुण्यात हमाल पंचायतीने आदर्श हमालनगर उभारले आहे. हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय सुरु झाले आहे. बालवाड्या तर प्रथमपासून कार्यरत आहेत. हमालांच्या नारी पतपेढीचा व्यवहार सहकारी बँकेच्या तोडीचा आहे. 'एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' हे स्वप्न प्रत्यक्षात आले आहे. प्रश्न संपलेले नाहीत पाठीवरचे साखरेच्या पोत्याचे ओझे एक क्विंटलचे असते. त्यामुळे गुडघे, कंबरदुखी, मानमोडी असे विकार उद्भवतात. हमालात सिनिअर –ज्युनिअर नसते. सर्वांना सारखीच हमाली मिळते. बाजारातील उलाढालींशी हमालाचे नाते नसते.

हमाल हे उपेक्षित व नाकारलेल्या समाज व्यवस्थेचे घटक़ आहेत. हमालीचे काम कष्टाचे आहे. या कामाला प्रतिष्ठाही नाही. हमाली कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे व प्रचलित हमालीच्या दरात वाढ करणे हे सुरुवातीचे हमाल पंचायतचे प्राथमिक उद्दिष्ट होते. डॉ. बाबा आढाव यांनी नाना, भवानी, गूळ आळीतील हमालांना हमाल पंचायतच्या झेंड्याखाली एकत्रित केले. ''दामाशिवाय काम नाही'', 'आमच्या पाठीचे आम्ही मालक'' अशा घोषणा बाजारपेठांतून घुमू लागल्या, बाजारपेठा बंद ठेवणं, छकड्यांचा सत्याग्रह, व्यापाऱ्यांची नाकेबंदी करुन आपल्या मागण्यांसाठी हमाल पंचायतने संघर्ष केला. हमाल पंचायतीच्या कामाला गती आली. हमालांच्या मनातील भिती जाण्यास सुरुवात झाली. १९६३ च्या सुमारास शिवाजी नगर

येथील गोदामातील हमाल संघटित झाले व हमाल पंचायतीत सामील झाले. १९६५ च्या सुमारास लाकूड बाजार आणि १९७० च्य सुमारास मालधक्का येथील हमाल पंचायतीत आले. मजुरीचे दर पक्के होत गेले तरी पहिला अधिकृत करार १९६८ मध्ये झाला. हा ऐतिहासिक करार 'हमाल पंचायत' आणि 'पूना मर्चंटस् चेंबर' यांच्यात झाला.

१९६८ साली हमालांनी चाळीस दिवसांचा संप केला. बाजारातील व्यवहार ठप्प झाले. 'पुण्यात हमाल कमी आहेत म्हणून तुम्हाला कायम स्वरुपाचे काम मिळेल '' असे सांगून सुमारे चाळीस हमाल संप फोडण्यासाठी मुंबईहून आणले. त्यांना एका धर्मशाळेत ठेवले होते. पंचायतच्या सभासदांनी त्यांना खरी परिस्थिती समजावून सांगितली, तेव्हा व्यापाऱ्यांकडून प्रवास खर्च घेवून ते परत गेले.

हमालांना प्रचलित कामगार कायद्यापासून संरक्षण मिळत नव्हते. हमालांना कामगार कायद्याचे संरक्षण मिळावे ही मागणी मुंबई व पुणे येथे जोर धरु लागली असताना महाराष्ट्र शासनाने ३ नोव्हेंबर १९५९ रोजी पूना मर्चंटस् चेंबरला पाठविलेल्या पत्रानुसार हमालांना शॉप ॲक्ट मधून वगळण्यात आले.

सन १९६२-६३ मध्ये आमदार निवासातील श्री. बा. न. राजहंस यांनी रुम नं.३०९ मध्ये वारंवार बैठका घेतल्या व असुरक्षित हमालांसाठी काय करता येईल यावर चर्चा घडवून आणल्या. या बैठकीला समाजवादी आमदारांच्या बरोबर श्री. मनोहर कोतवाल व श्री. आण्णासाहेब पाटील हजर होते.

महाराष्ट्र शासनाने माथाडी, हमालांच्या आंदोलनाची दखल घेवून श्री. बी. एस. कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली लोखंडी जथा कामगार चौकशी समिती (जानेवारी १९६५), श्री. के. आर. पवार यांच्या अध्यक्षतेखाली माथाडी लेबर कमिटी (ऑक्टोबर १९६५) व श्री. शिवाजीराव गिरीधर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती अशा एकूण तीन वेगवेगळ्या समित्या नेमल्या होत्या. या समित्यांनी माथाडी, हमालांच्यासाठी स्वतंत्र कायदा करावा अशी शिफारस केली. या शिफारशींचा विचार करुन शासनाने १९६८ मध्ये विधेयक सादर केले आणि मार्च १९६९ मध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन कल्याण) या नावाचा कायदा संमत झाला.

माथाडी, हमाल कामगार कायदा संमत झाला आणि मुंबई येथील व्यापारी वर्गाचा विरोध सुरु झाला. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी व्यापाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावून घेतले आणि विचारले. ''तुम्हाला लोकशाही पाहिजे का हुकूमशाही?'' व्यापारी म्हणाले, ''लोकशाही'' संकल्पित माथाडी कायद्यात व्यापाऱ्यांचे, कामगारांचे व सरकारचे प्रतिनिधी असतील, मग विरोध का? यशवंतरावांनी विचारले. व्यापारी प्रतिनिधी गप्प बसले. नंतर काही दिवसांनी व्यापाऱ्यांनी विरोध नसल्याचे कळविले. दिनांक १५/१२/६९ रोजी किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई व लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळ, मुंबई या दोन मंडळांची स्थापना झाली. सर्वश्री यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील इ.नेत्यांच्यामुळे मुंबईतील माथाडी, हमालांच्या चळवळीला चालना मिळाली.

याच काळात दिनांक ६/२/१९६८ रोजी पुण्यात तत्कालिन गृहमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांची गाडी अडविण्याचा इरादा हमाल पंचायतने घोषित करुन त्यांना भर रस्त्यावर निवेदन दिले. श्री. यशवंतराव चव्हाण पुरवठा मंत्री असतानाच्या कारकिर्दीत शॉप ॲक्टमधून कसे वगळले याची आठवण त्यांना करुन दिली.

१९६८-६९ चा काळ देशामध्ये नवे आर्थिक राजकीय बदल घडविणारा होता. इंदिरा गांधींच्या नव्या धोरणाचा प्रभाव जाणवू लागला होता. बँकांच्या नव्या धोरणाचा प्रभाव जाणवू लागला होता. बँकाच्या राष्ट्रीयकरणाचा महत्त्वपूर्ण निर्णय याचा काळात घेतला गेला. अशा क्रांतीकारी निर्णयाचा परिणाम राज्य सरकारांवर झालेला दिसतो. १९६९ च्या माथाडी, हमाल कामगार कायद्याच्या निर्मितीला हे वातावरण पूरक ठरले.

हमाल पंचायतने या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. पुणे शहरासाठी योजना तयार केली. १९७४ साली पालखी चौकात मंडळाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. अंमलबजावणीला पूना मर्चंटस् चेंबरचा विरोध होता. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या विरोधात व्यापारी कोर्टात गेले. सहा वर्षे कायद्याची अंमलबजावणी थांबली. हमालांचे कधीही भरुन न येणारे नुकसान झाले. १९८० साली कोर्टाची स्थगिती उठली. १५ सप्टेंबर १९८० ला मंडळाचे नव्याने उद्‌घाटन झाले व कायद्याची अंमलबजावणी पुणे शहरात सुरु झाली.

मंडळाच्या कामकाजासाठी बाजारपेठेत जागा उपलब्ध होत नव्हती. डॉ. बाबा आढाव यांनी श्री. शांताराम दिवेकर यांच्या माडीवरील म. फुले समता प्रतिष्ठानचा मिटींग हॉल मंडळाच्या कामकाजासाठी रिकामा करुन दिला. मार्केट यार्डातही मंडळाच्या कार्यालयाचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा हमाल पंचायतने 'हमाल भवन' येथे मंडळाचे कार्यालय सुरु करण्यास परवानगी दिली. अनेक अडचणींचा सामना करीत कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. या कायद्यामुळे हमालांना कामाची हमी मिळाली तशीच भविष्याचीही हमी मिळाली. हमाल पंचायतीच्या संघर्षातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

हमाल पंचायतच्या संघर्षाची गाथा महाराष्ट्रात पसरली. महाराष्ट्रातील हमाल मापाडी हमाल पंचायतला भेट देत. हमाल पंचायतच्या कामकाजाची माहिती घेत. आपली गाऱ्हाणी, कामाच्या अडचणी सांगत असत. यातून संवाद व पत्रव्यवहार वाढला. हमाल मापाड्यांची महाराष्ट्रव्यापी संघटना असावी अशी कल्पना पुढे आली. महाराष्ट्रातील हमालांच्या चळवळीला मिळत असलेला पाठिंबा पाहून 'महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ' ही संघटना स्थापन झाली. महामंडळाचे पहिले अधिवेशन नगर येथे १९८० साली संपन्न झाले. पुणे, धुळे, फलटण, सांगली, जळगाव, लातूर इ.ठिकाणी महामंडळाची अधिवेशने झाले. महाराष्ट्र राज्य सल्लागार मंडळावर पूर्वी कामगार प्रतिनिधी मुंबईचेच असत. त्यात महाराष्ट्रातील कामगार प्रतिनिधींचा समावेश नव्हता. १९८० सालानंतर महाराष्ट्रातील कामगार प्रतिनिधींची वर्णी सल्लागार मंडळावर लागली. डॉ. बाबा आढाव सल्लागार मंडळाचे सदस्य झाले. माथाडी, हमाल कामगार कायदा मुंबई–नागपूर व पुणे शहरातच अडकून पडला. महामंडळाच्या माध्यमातून डॉ. बाबा आढाव यांनी झपाटून काम केले. शंभरपेक्षा जास्त ठिकाणच्या हमाल, मापाडी, गाडीवान स्त्री–पुरुष कष्टकऱ्यांच्या संघटना महामंडळाच्या झेंड्याखाली एकत्र आल्या, महामंडळाच्या सहकार्याने, हमाल पंचायतच्या खंबीर पाठिंब्याने व डॉ. बाबा आढाव यांच्या कुशल नेतृत्वाने माथाडी, हमाल कामगार कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये सुरु झाली आहे. यामुळे लाखो हमाल, मापाड्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान सुधारलेले आहे. हमालांच्या जीवनात आर्थिक क्रांती झाली म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

हमाल मापाडी वार्ता हे महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे मुखपत्र आहे. तसे ते अनियतकालिक आहे. महाराष्ट्र राज्यातील अंगमेहनती कष्टकऱ्यांबरोबर संवाद व्हावा यासाठी

केवळ हमाल मापाडीच नव्हे तर बांधकाम मजूर, शेतमजूर, स्त्री कष्टकरी, बालकामगार, स्वयंरोजगारी (रिक्षा, टेंपो, पथारी, फेरीवाले), घरेलू कामगार, मोलकरणी, रेती कामगार, वाळू कामगार, वीट कामगार, अपंग कामगार, गुमास्ता, ऊस तोडणी, खण, कागद, काच, पत्रा गोळा करणारे कामगार इ. विभागाबरोबर संवाद साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो.

१९७० साली हमाल पंचायतने आळंदी येथे एक शिबीर आयोजित केले होते. हे शिबीर कुटुंब शिबीर होते. आळंदीला एक हमालांची धर्मशाळा आहे. त्यावरुन मनात हमाल भवनची कल्पना आली. हमाल, त्यांच्या घरातील इतर काही व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, मुले, यांच्या उपस्थितीत हमाल भवनचा निर्णय घेण्यात आला.

हमालांच्या बैठका रस्त्यांवर, मंदिरात किंवा तालमीत होत असत. बैठक चालू असताना हितसंबंधी मंडळी हमालांना हाकलून लावीत असत. हमाल भवनचे उद्‌घाटन जॉर्ज फर्नांडिस यांच्या हस्ते झाले. उद्‌घाटनानंतर ते हमालांच्या पंगतीत बसून जेवले. हमाल भवनात भारताचे माजी पंतप्रधान श्री. व्ही. पी. सिंग यांनीही कष्टाची भाकर खाल्ली आहे.

आज येथे सभा, संमेलने, मेळावे, शिबिर बैठका व चर्चासत्रांची रेलचेल चालते. कष्टक़ऱ्यांच्या मुलामुलींची लग्नेही होतात. हमाल पंचायतने हमाल भवन उभारुन महाराष्ट्रातील कष्टकऱ्यांना व पुरोगामी संघटनांना चळवळीचे केंद्र उपलब्ध करुन दिले आहे.

या हमाल भवनाचा आदर्श घेवून अनेक हमाल मापाड्यांनी ठिकठिकाणी ‘हमाल भवन’ दिमाखाने उभी केली आहे.

हमालांसारख्या अनेक कष्टकऱ्यांना वडापाव खावून आपली भूक भागवावी लागत होती. कष्टकऱ्यांना आवश्यक असणारा पोषक आहार व उष्मांक पुरेशा प्रमाणात मिळत नव्हता. ताजा, स्वच्छ व सकस आहार सहज उपलब्ध व्हावा व तो स्वस्त असावा या उद्देशाने हमाल पंचायतने ‘ना नफा ना तोटा’ या तत्वावर ‘कष्टाची भाकर’ ही अभिनव योजना १९७४ साली सुरु केली. कष्टाची भाकर कष्टकऱ्यापर्यंतच मर्यादित राहिली नाही ती समाजाची गरज बनली आहे. या ठिकाणी काम करणारे स्त्री–पुरुष हमालांशी संबंधीत आहेत. कष्टाची भाकरचे कर्मचारी व हमाल पंचायतमध्ये आपुलकीचे व जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या कर्मचाऱ्यांना हमाल पंचायत कामगार कायद्यानुसार सर्व सेवा सवलती प्रदान करते.

'कष्टाची भाकर' आजही कामगारांना जगण्यासाठी आधार देत आहे. १९६०–६१ च्या दरम्यान हमाल पंचायतीची सुरूवात झाली. १९७४ साली पुणे शहरातील कष्टकऱ्यांसाठी कमी दराने अन्न उपलब्ध व्हावे या उद्देशाने कष्टाची भाकर ही संकल्पना राबविण्यात आली. अनेक वर्षे उलटली असली तरी आजही महागाईत होरपळणाऱ्या कष्टकऱ्यांना कष्टाची भाकर केवळ उदरभरण करत नसून सन्मानाने जगण्याचा अधिकार देत आहे. त्याकाळी शहराच्या कानाकोपऱ्यातून हमाल कामासाठी पुण्यात येऊ लागले. त्यावेळी व्यापाऱ्यांच्या दुकानात काम करून त्यातून तो उत्पन्न मिळवत असे. कामगारांना जास्त जेवण लागत असल्याने त्यावेळी कामगारांना शहरातील खानावळींनी जेवण देण्यास नकार दिला. त्यावेळी भवानी पेठ येथे हमाल पंचायतीमार्फत हमाल पंचायत कष्टाची भाकर या अन्न पुरविणाऱ्या केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रामार्फत सुरूवातीच्या काळात चपाती, भाजी, भाकर, जिलेबी, भजी यांचा समावेश होता. भाकर ६० पैश्यामध्ये तर चपाती ४० पैश्यामध्ये मिळत होती. आज भाकर ६ रूपये तर चपाती ४ रूपयाला मिळत आहे. ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालू झालेल्या हमाल पंचायत कष्टाची भाकर या संस्थेचे शहरात मार्केटयार्ड, पुणे स्टेशन, मालधक्का, स्वारगेट या ठिकाणी केंद्रे कार्यरत आहेत. आज या संस्थेमधून सुमारे १३ ते १४ हजार लोकांना दररोज अन्न पुरविले जाते. सुरूवातीपासून शहरातील इतर खानावळींपेक्षा स्वस्तात जेवणावर भर देण्याचे काम संस्थेने केले आहे. सुरूवातीला अतिशय कमी लोकांच्या सहभागाने सुरू झालेल्या संस्थेत आज १४० कामगार कार्यरत आहेत. यामुळे ६० ते ६५ स्त्रिया, २८ सेल्समन, ९ आचारी, ५ ड्रायव्हर कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

सुरूवातीच्या काळात किलोवर धान्य घेऊन सुविधा पुरविल्या जायच्या, आज ट्रकनी माल आणावा लागतो असे केंद्राचे व्यवस्थापक दिलीप मानकर यांनी सांगितले. कालांतराने पदार्थांमध्ये भर पडत गेली. आज जेवणात भात, शिरा, पोहे, लाडू यांचा समावेश झालेला आहे. शहरात आज श्रीमंतांबरोबर गरीब, कष्टकरी, सामान्य नागरीक यांची संख्या वाढतच आहे, श्रीमंत लोकांपेक्षा आजही गरिबीत जिवन जगणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. त्यापैकी बहुतेक लोकांचा आजही सकाळचा नाष्टा, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण याच केंद्रात होत आहे. अशा लोकांसाठी कष्टाची भाकर हे केंद्र आपले दुसरे घर असल्याचे वाटत आहे. अशा भावना केंद्रात जेवायला येणाऱ्या हमालांनी व्यक्त केल्या. पांडुरंग कांबळे हा हमाल म्हणाला

गेली ३० वर्षे मी हमाली करत आहे. हमाल पंचायत कष्टाची भाकर संस्थेमार्फत स्वस्तात अन्न मिळत असल्यामुळे पोटभर खाता येते. आजही इतर खानावळीत महागाईबरोबर अन्नपदार्थांच्या किंमतीत वाढ होत आहे त्याप्रमाणात कष्टाची भाकरमध्ये तेच अन्न स्वस्तात मिळत आहे.

कष्टाची भाकर या संस्थेतल्या कामगार कलावती कामठे म्हणाल्या सुरूवातीच्या काळात हमाल लोकांच्या जेवणाचे खुप हाल होत होते, हमाल पंचायत कष्टाची भाकर स्थापन झाल्यानंतर त्यांना कमी पैशात पोटभर अन्नाची सुविधा उपलब्ध झाली. त्यावेळी बेसण भाकरीला मोठ्या प्रमाणात मागणी होती. आज लाडू, शिरा या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या २५ वर्षात कष्टाची भाकर खाणाऱ्यांची संख्या वाढत गेली आणि आजही वाढत आहे. कमी दरात अन्न उपलब्ध करून देण्यासाठी कष्टाची भाकरची स्थापना करण्यात आली. शहरात मोठ्या प्रमाणात नागरिक जिल्ह्यातून तसेच इतर ठिकाणावरून रोजगार, सरकारी काम तसेच ससूनमध्ये उपचारांसाठी येतात. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना हॉटेलमधील जेवण परवडत नाही. अशांसाठी चांगला व योग्य पर्याय म्हणजेच हमाल पंचायतीची ‘कष्टाची भाकर’.

महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली झुणका भाकर केंद्र व इंदिरा कम्युनिटीने सुरु केलेली झुणका भाकर बंद पडली. परंतु कष्टाची भाकर ४० वर्षांपासून सुरु आहे. जनतेची मागणी मोठी आहे. अनेक अडचणींना कष्टाच्या भाकरला तोंड द्यावे लागत असल्यामुळे मागणी तसा पुरवठा होत नाही.

इतरांकडे न्याय्य मागणी करणाऱ्या हमाल पंचायतने आपल्या कष्टाची भाकर केंद्रावरील कामगारांना न्याय देवून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. इथे अस्पृश्यतेला अजिबात थारा नाही.

घर पहावे बांधून व लग्न पाहावे करुन अशी एक म्हण आहे. हल्ली घर बांधणे व लग्न करणे या दोन्ही गोष्टी सोप्या राहिलेल्या नाहीत. त्यात कित्येकांचे घर बांधण्याचे स्वप्न आयुष्यात पूर्ण होत नाही. शहरात जागांच्या आणि घरांच्या आकाशाला भिडलेल्या किंमती पाहून डोळे पांढरे होण्याची वेळ सामान्य माणसांवर आलेली आहे. हमाल पंचायतने मात्र आपल्या सभासदांचे घर बांधण्याचे स्वप्न संघटित शक्तीच्या बळावर साकार केले आहे. मार्केट

यार्डच्या शेजारी, डोंगराच्या पायथ्याशी छानसे हमाल नगर वसले आहे. पुण्याच्या सौंदर्यात भर टाकणारे हमाल नगर आहे. यामुळे हमालांची एक मूलभूत गरज पूर्ण झाली आहे.

भाई वैद्य गृहराज्यमंत्री असताना हमाल नगरची जागा मिळाली. या ठिकाणी चारशे बावीस कुटुंब राहतात. 'हमाल नगर' एक मिश्रवस्तीचे आहे. जातीयता व अस्पृश्यता हटवून समता प्रस्थापित करण्याच्या अनेक प्रयत्नांपैकी हमाल पंचायतचा हा एक यशस्वी प्रयोग आहे.

कर्जाच्या चक्रात अडकलेल्या हमालांच्यासाठी हमाल पंचायतने पतपेढी काढली. काही वर्षांपूर्वी हमालांना बँक दारापुढे उभी करत नव्हती. माथाडी, हमाल मंडळाकडून दरमहा पगार मिळू लागल्यामुळे हमालांची पतपेढीही यशस्वी वाटचाल करु लागली आहे. राष्ट्रीयकृत बँकाही कर्ज वसुलीच्या हमीमुळे हमाल मापाड्यांना साह्य करु लागल्या आहेत. हमालांना कर्जासाठी कुणाकडेही हात पसरावे लागत नाही. पतपेढीतून गरज भागविण्याइतके कर्ज सहज उपलब्ध होत आहे. या योजनेमुळे समाजात पत नसलेल्या हमालांना 'पत' मिळाली आहे.

हमालांच्या मुलांनी हमाली करु नये. उच्च शिक्षण घ्यावे, समाजात मोठ–मोठी पदे भुषवावीत. आई–वडिलांचे हमाल पंचायतचे नाव मोठे करावे असे प्रत्येक हमालांना वाटत होते. जातीयवादी मंडळी आपल्या शाळांतून विषमतेवर आधारित शिक्षण प्रचार व प्रसार करीत. विषमतेचा पुरस्कार करणारे संस्कार विद्यार्थ्यांवर परिणाम घडवितात. विषमतेचा पुरस्कार करणारे शिक्षण न देता समतेचा पुरस्कार देणारे शिक्षण आपल्या मुलामुलींना देण्याच्या उद्देशाने कष्टकरी विद्यालयाची स्थापना झाली.

सांस्कृतिक कार्यक्रम : श्री. छत्रपती शिवाजी महाराज, म. ज्योतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे या महापुरुषांची जयंती हमाल पंचायत साजरी करते. शिस्तबद्ध मिरवणूक असते. मिरवणूकीत महापुरूषांचे फोटो असतात. महापुरूषांच्या प्रतिमेला हार घातले जातात. महापुरुषांच्या जीवनांवर कार्यकर्त्यांची भाषणे होतात.

शिवाजी महाराज ' गो ब्राह्मण प्रतिपालक' नव्हते तर ते 'जाणता राजा' होते. फुले–आंबेडकर विषमतेवर हल्ला करणारे व स्त्री–पुरुषांमध्ये समता प्रस्थापित करणारे होते. अण्णाभाऊ साठे केवळ लोकशाहीर नव्हते तर दलित समाजातील साहित्यरत्न होते. असे पुरोगामी विचार प्रकट केले जातात. फुले–आंबेडकर व्याख्यानमालेतही महत्त्वाच्या विषयांवर व

जनतेचे प्रबोधन करणाऱ्या बाबींवर चर्चा होते. यामुळे हमाल, मापाडी, स्त्री–पुरुष कष्टकऱ्यांचे प्रबोधन होते.

मालधक्कयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य सांस्कृतिक भवन उभारावे अशी मागणी हमाल पंचायत कित्येक वर्षांपासून करीत होती. पुणे महानगरपालिकेने उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनमुळे हमाल पंचायतचे एक स्वप्न साकार झाले. स्मारक उभारण्याची मूळ कल्पना डॉ. बाबा आढाव यांची होती.

पूना मर्चंटस् चेंबर, पूना डिस्ट्रिक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन, हुंडेकरी असोसिएशन व कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्याबरोबर रोज संबंध येतात. अनेक प्रश्नांवर वाद–विवाद होतात. समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे वाद मिटतात. कित्येत वेळी तुटेपर्यंत वाद झालेले आहेत. कै. उत्तमचंदजी पोकर्णा नेहमी म्हणत की, ''व्यापाऱ्यांचे आणि हमालांचे नाते नवरा–बायको सारखे आहे. व्यापारी शिव्या देत असत. शिव्या दिल्याची तक्रार हमाल युनियनकडे व व्यापारी पूना मर्चंट चेंबरकडे करीत असत. डॉ. बाबा आढाव व कै. बाबा पोकर्णा या परिपक्व नेतृत्वाने कुणीही कुणाला शिवी द्यायची नाही. मूळ तक्रारीवर निर्णय देण्यापेक्षा शिवी देणाऱ्याला शिक्षा केली जाईल असा नियम केला. दोन बाबांच्यामुळे शिव्या देण्याची संस्कृती नष्ट झाली व बाजारपेठेत एक नव्या सुसंस्कृत संस्कृतीचा जन्म झाला. मालकांच्या असोसिएशन बरोबर किंवा एखाद्या व्यापाऱ्याबरोबर हमाल पंचायतीने कधीही वैर बाळगले नाही.

हमाल पंचायतने कष्टाची भाकर, पतपेढी, हमाल नगर, कष्टकरी विद्यालय, माथाडी, हमाल कामगार मंडळ, महामंडळ इ.उपक्रमाद्वारे हमालासारख्या उपेक्षित घटकाचा स्वाभिमान जागा केला. पत वाढविली. संघर्षासोबतच विधायक दृष्टी ठेवून रचनात्मक कामंही उभी केली आहेत. या उपक्रमांमधून हमालांमधील भावनिक नातं व त्यातून एकजूट पक्की होताना दिसते.

हमाल पंचायतने आपल्या मागण्यासंदर्भात शासन संस्थेशी संघर्ष करत असतानाच दुसऱ्या बाजूला सामुहिक प्रयत्नातून संस्थात्मक उभारणी करुन हमालांचं सामाजिक व आर्थिक स्थान उंचावण्यात मोठा सहभाग दिला आहे.

हमाल पंचायतच्या चळवळीला निव्वळ आर्थिक लाभाची चळवळ बनू न देता त्याला भक्कम वैचारिक आधार दिला. चळवळीतील कामगारांना व्यापक सामाजिक प्रश्नांवर भूमिका घ्यायला भाग पाडलं. कष्टकरी समूहांना एकत्र करणं, रचनात्मक मार्गाने कल्याणकारी योजना

निर्माण करुन आधार देणं आणि शासन यंत्रणा व संबंधितांशी संघर्ष करुन न्याय्य मागण्या पदरात पाडून घेणे असं तिहेरी काम डॉ. बाबा आढाव यांनी केलं आहे.

हमाल पंचायत ही देवदासी, झोपडपट्टीवासी, धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी, मोलकरीण, हमाल मापाडी, कागद–काच–पत्रा वेचणाऱ्या महिला, पथारी व्यावसायिक, रिक्षावाले व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. नामांतराच्या वेळी लाँगमार्चमध्ये हमाल मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. सत्याग्रह करुन अनेकांनी डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्त्वाखाली अटक करुन घेतली. मंडल आयोगाच्या शिफारशीचा आग्रह धरला. राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम सलोखा निर्माण केला, शीख समाजामध्ये संवाद निर्माण करण्यात पुढाकार घेतला. मनूचा पुतळा हटविण्याच्या आंदोलनात व दहशतवादाच्या विरोधात जनजागरण मोहीम चालविली. अंधश्रद्धा निर्मूलन, विषमता निर्मूलन, इ.सामाजिक व परिवर्तनाच्या चळवळीत भाग घेतला. अशा चळवळींमध्ये भाग घेतल्यामळे हमालांचे प्रबोधन झाले.

हमाल पंचायतने राजकारणाला कधीही नकार दिला नाही. राजकारण नको याचा अर्थ संघटनेच्या कामगार सदस्यांना राजकारण नको असे नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छेनुसार आवडीप्रमाणे स्वतंत्र्यरित्या राजकारणात भाग घेवू शकते. महानगरपालिकेच्या निवडणुकीपासून गावच्या ग्रामपंचायत व सहकारी सोसायटीपर्यंतच्या निवडणुकीत हमाल आज भाग घेतो आहे. यशस्वी होत आहे.

हमाल पंचायतच्या तक्रार निवारण समितीच्या बैठकीचा उपयोग राजकीय कार्यकर्ता घडविण्यासाठी झाल्याचे यशस्वी झालेले हमाल आवर्जून सांगतात.

हमालांच्या आर्थिक गरजांची पूर्ती झाल्याने त्यांनी इतर कष्टकऱ्यांच्या व असंघटित कामगारांच्या लढ्यात सामील व्हावं यासाठीही हमाल पंचायतने त्यांच राजकीय प्रबोधनाचं प्रयत्न केले. परिणामत: हे हमाल इतर असंघटितांच्या लढ्यात सामील झालेले दिसतात. देशातील संघटित कामगारांना जे जमले नाही ते हमाल पंचायतने करुन दाखविले.

हमाल पंचायतची यशस्वी वाटचाल सुरु असताना काही उणीवाही दिसत आहेत. नवीन हमाल सभासदांना प्रबोधनाची गरज आहे. हमाल पंचायत व माथाडी मंडळाचा संघर्षाचा इतिहास माहित नाही. पतपेढीचे कर्ज फेडणे, मंडळात संपूर्ण हमाली भरणे, भ्रष्टाचाराला

प्रोत्साहन न देणे या बाबी नव्याने शिकवण्याची वेळ आली आहे. सार्वजनिक हितापेक्षा, स्वहिताकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात वाढ होत आहे. याला वेळीच पायबंद घालणे जरुरी वाटते.

प्रत्येक समाजक्रांतीच्या व समाज परिवर्तनाच्या चळवळीत असा अनुभव येत असतो, की चळवळ ज्या वेळी सफल होण्याच्या दिशेला पोहोचते, त्यावेळी त्या चळवळीने वर उचलले गेले नेतृत्त्व आपल्या हाती सत्ता एकवटण्याचा प्रयत्न करते. मग त्याचा आणि चळवळीतील सामान्य कार्यकत्याचा संबंध दुरावतो.

ज्या ध्येयाने चळवळ सुरु झाली, त्या ध्येयाचा विसर पडतो, इतकेच न्वहे, तर कधी कधी त्या ध्येयाच्या विरोधी असे स्वरुपही त्या चळवळीला प्राप्त होते. क्रांतीचा घात होतो किंवा क्रांती आपली मुले खाऊन टाकते, असे जे म्हटले जाते, ते या अर्थाने खरे असते.

हमाल पंचायत ही संघटना किती वर्षांची झाली हा प्रश्न महत्त्वाचा नाही तर या संघटनेची तत्वे काय आहेत ती संघटना काय साध्य करु इच्छिते आणि तिची सुप्त शक्ती काय आहे. या बाबीच महत्वाच्या आहेत.

साथी एस्. एम्. जोशी, साथी नानासाहेब गोरे, श्री. मोहन धारिया, साथी विनायकराव कुलकर्णी व साथी भाई वैद्य यांच्या मार्गदर्शनाने व डॉ. बाबा आढाव यांच्या झुंजार, लढावू नेतृत्वाखाली हमाल पंचायतने ५० वर्षांची यशस्वी वाटचाल केली आहे.

सुरुवातीला केवळ स्वप्न वाटणारी योजना सत्यात उतरल्यानंतर एखाऱ्या कलाकाराला आपल्या निर्मितीचा जो आनंद मिळतो तसाच आनंद हमाल–नगरी उभारताना होत आहे अशा शब्दांत या नगरीचे प्रणेते डॉ. बाबा आढाव भावना व्यक्त करतात. आजमितीस हमालांची कुटुंबे हमाल नगरात रहायला गेली आहेत. सर्वांच्या जीवनमानाचा स्तर उंचावलेला आहे. हमालांच्या मुलांबरोबर त्यांच्या मुलींनीही शिक्षण घेतले. रचनात्मक व कृतिशील सामुदायिक निर्णय प्रक्रियेमुळे व हमाल पंचायतीच्या नेतृत्वामुळे हमाल कष्टकऱ्यांची पत समाजात वाढली आहे. 'हमाल भाय अन् हिसाब नाय' ही म्हण पूर्णपणे बदलली. हमालांची मुले वडिलांचा व्यवसाय करीत नाहीत. अनेक मुले पदवीधर झाली आहे, तर काहींनी स्वयंरोजगाराचामार्ग स्वीकारला, हमाल वर्गाची पत उंचावली, समाजात आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या या वर्गाला माथाडी हमाल कायद्यामुळे मोठा आधार मिळाला.

महाराष्ट्रातील हमाल कामगारांचे नेतृत्त्व करणारी व कामगारांची आदर्श असणाऱ्या पुणे शहरातील हमाल पंचायत, पुणे या संस्थेचे विविध उपक्रम डॉ.बाबा आढाव यांच्या नेतृत्त्वाखाली हमाल भवन, हमाल पंचायत, कष्टाची भाकर, हमाल मजूर सहकारी संस्था मर्यादित, नागरिक सहकारी ग्राहक भांडार मर्यादित, हमाल नगर घरबांधणी योजना, हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय व हमाल कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित इत्यादी कार्यरत आहेत. त्यामधील हमाल कामगार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, या संस्थेची स्थापना दि. ८/१०/१९९० रोजी झाली. प्रामुख्याने पुणे शहरातील हमाल व इतर कष्टकऱ्यांची बँक असावी, अशी डॉ. बाबा आढाव यांची कल्पना आहे. त्यादृष्टीने त्यांची वाटचाल चालू आहे.

हमाल कामगारांना काम असेल तर दाम मिळतो. काम नसेल तर आर्थिक गरजा भागत नसल्यामुळे खाजगी सावकारांकडून पैसे घेण्यावाचून पर्याय नव्हता. सावकारांचे व्याजाचे दर कमी नसून त्यामुळे बऱ्याचदा कामगार वर्ग सावकारांच्या जाळ्यात अडकत असे. कामगारांच्या आर्थिक अडीअडचणींच्या गरजा सोडविण्यासाठी अशा संस्थेची गरज होती. त्यातून पतसंस्थेची निर्मिती झाली.

संस्था स्थापनेच्या वर्षी १९९०–९१ या सालात संस्थेचे १७३६ सभासद होते. सन २००६–०७ या सालाअखेर ३३२४ सभासद आहेत. वसूल भागभांडवल रु.२,०८,११०/– होते ते रु.८३,४७,६८०/– एवढे आहे. राखीव व इतर निधी रु.१७३६/– होते तो आता रु.४१,८२,६४३/– इतका आहे. संस्थेकडे पहिल्या वर्षी १,८२,०००/– च्या ठेवी होत्या. त्या आता रु.१,०८,०२,४०२/–च्या आहेत. संस्था प्राथमिक अवस्थेत रु.३५००/– पर्यंत कर्जवाटप करत होती. आज संस्था कोणत्याही बँकेचे कर्ज न घेता स्वभांडवलातून रु.५०,०००/– पर्यंत जामिनकी, व वाहन तारणावर रु.१,५०,०००/– पर्यंत व घर तारणावर रु.३,००,०००/– कर्ज वाटप करत आहे. दि.३१/३/२००७ अखेरचे कर्ज येणे रु.१,७५,८६,०८८/– एवढे आहे. थकबाकी ३.६३% आहे. संस्था पहिल्या वर्षांपासून नफ्यात आहे. संस्थेस सन २००६–०७ या आर्थिक सालात ५,३२,८७३/– इतका नफा झालेला आहे. संस्था गेली १६ वर्षे दोन वर्षाचा अपवाद वगळता 'अ' वर्गात आहे.

संस्थेचे स्वमालकीची इमारत खरेदी केली आहे. हमाल पंचायत उपक्रमांतर्गत असणाऱ्या हमालनगर, मार्केट यार्ड, पुणे –३७ येथे इमारत क्र.१६ मधील पहिला मजला १७१७

स्के. फूटचा व दुसरा मजला १५८९ स्के.फूटचा खरेदी केलेला आहे. तसेच ४ लाखाचे अद्यावत फर्निचर केलेले आहे.

संस्थेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ दिनांक ५/१०/२००२ रोजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे हस्ते व डॉ. बाबा आढाव यांचे अध्यक्षतेखाली झाला. सदरच्या कार्यक्रमास तत्कालीन शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हासदादा पवार हे उपस्थित होते.

मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातील आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेली स्पर्धा, बँकिंग क्षेत्रात होणारे नवनवीन बदल, मुक्त व्याजदर, ठेव संकलनातील प्रलोभनासहित असणारी स्पर्धा, कर्ज वाटप व कर्ज वसुली यातील समस्या याचा विचार करता पतसंस्थांचे अस्तित्व टिकविणे व वाटचाल चालू ठेवणे ही तारेवरची कसरत आहे.

अशा परिस्थितीत सभासदांमधील आपुलकी, सेवक, पदाधिकारी यांचा योग्य असा समन्वय, परिश्रम, चिकाटी यांच्यामुळे हमाल, कामगार नागरी सहकारी पतसंस्थेने प्रगती केलेली आहे.

**बाबा आढावांच्या चळवळींविषयी वृत्तपत्रात आलेल्या बातम्या**

२१ ऑगस्ट १९५५ सालातील केसरीच्या अंकात गोवा मुक्ती लढ्यासंदर्भात विविध बातम्या वाचायला मिळतात. त्यापैकी दंडवते यांच्या तुकडीस बेदम मारहाण, सर्व सत्याग्रही सावंतवाडीस परतले अशी बातमी आहे. या सत्याग्रहाच्या वेळी गोळीबार झालाच तर योग्य ती वैद्यकीय मदत मिळण्यासाठी वैद्यकीय पथक कार्यरत होते. त्यावेळी वैद्यकीय पथकामध्ये डॉ. बाबा आढाव कार्यरत होते.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभासद नोंदणीबाबत ७ मार्च १९५८ सालात केसरीच्या अंकात बातमी आलेली आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीचे चिटणीस एस. एम. जोशी यांनी सभासद नोंदणीबाबत काढलेले पत्रक आहे.

एस. एम. जोशी यांनी पुण्यातील शिवजयंती उत्सवात केलेल्या भाषणातील मजकूर ९ मार्च १९५८ सालातील केसरीच्या अंकात छापलेला आहे. शिवजयंती निमित्त भाषण करताना त्यांनी केलेल्या आंदोलनाचा उल्लेख आलेला आहे. भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे प्रतापगडावरील छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करणार होते. आंदोलनामध्ये डॉ. बाबा आढावांचा सक्रीय सहभाग होता.

१९६१ साली पानशेत धरण फुटले. पूरग्रस्तांच्या समस्या निर्माण झाल्या. डॉ. बाबा आढाव व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुण्यातील पेठांमधील घाण स्वच्छ केली. केसरीच्या २३ जुलै च्या पुनर्वसनाचे कार्य यासंदर्भातील लेखन प्रसिद्ध आहे.

१९६७ साली नागरी संघटनेच्या वतीने नगरसेवक पदी निवडून आल्यानंतर, महापौर व उपमहापौर पदाच्या निवडी संदर्भात काँग्रेस पक्षाच्या समितीशी नागरी संघटनेच्या वतीने श्री. बा. व. गोगटे, श्री. रामदास परांजपे, सरदार किराड व डॉ. बाबासाहेब आढाव यांनी चर्चा केली अशी बातमी केसरी वर्तमानपत्रातील ७/१०/१९६७ च्या अंकात दिसून येते.

गुऱ्हाळ युनियन, फेरीवाले, यांच्या अडचणींचे निवेदन नगरसेवक श्री. भुजंगराव कुलकर्णी यांना देण्यात आले. गुऱ्हाळावरील हॉटेल कर रद्द करावा, आरोग्य खात्याची परवाना फी कमी करावी, गुऱ्हाळांना परवाना द्यावा, हातगाडीवाले, फेरीवाले यांच्यावरील जाचक प्रश्नांबाबत चर्चा झाली. केसरीच्या ७ ऑक्टोंबर १९६७ च्या अंकात ही बातमी दिसून येते.

पुण्यातील व्यापारी जीवनावश्यक वस्तूंचे साठे करून सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्य करीत असताना ही स्थिती केवळ असहाय्यपणे पाहत राहणे या पुढे शक्य होणार नसून, बंगाल प्रमाणेच येथील परिस्थिती बिघडत चालली आहे. याची दखल जिल्हाधिकाऱ्यांनी आणि सरकारने घ्यावी असा इशारा संयुक्त समाजवादी पक्षाच्या पुणे शाखेचे अध्यक्ष श्री. राम वडके यांनी दिला. संयुक्त समाजवादी पक्षाच्या वतीने जीवनोपयोगी वस्तूंच्या भाववाढ विरोधी निदर्शने करण्यासाठी पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेलेल्या मोर्चात हमाल पंचायतीचे हमाल सुद्धा सहभागी झाले होते. हमालांच्या मोर्चानेही एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. २८ ऑक्टोंबर १९६७ मधील केसरीच्या अंकात ही बातमी दिसून आली.

रेल्वे मालधक्क्यावर सुरू असलेला संप महापौर श्री.नामदेवराव मते यांच्या मध्यस्थीने मिटविण्यात आला. महापौरांच्या कार्यालयात बोलविण्यात आलेल्या बैठकीस उपमहापौर नामदेव रूकारी, जिल्हाधिकारी बी. के. चौगुले, खासदार मोहन धारीया, आमदार भाऊसाहेब शिरोळे, हमाल पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, हुंडेकरी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नामदेवराव सूर्यवंशी, शिवसेनेचे नंदू घाटे, भाई वैद्य, शिवाजीराव ढेरे, शांताराम दिवेकर, बबनराव किराड, म. वि. अकोलकर इत्यादी मंडळी होती. कोणत्याही परिस्थितीत बाहेरचे हमाल कामावर घ्यायचे नाहीत. ता. १५ डिसेंबर १९७० रोजी कामावर हजर असलेल्या सर्व हमालांना काम करता येईल. हमालीचे दरवाढीबाबत उपमजूर आयुक्तांकडे वाटाघाटी करण्याचे

ठरले. त्यावेळी झालेल्या करारावर हमाल पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, हुंडेकरी असोशिएशनचे अध्यक्ष नामदेव सूर्यवंशी, शिवसेनेचे नंदू घाटे यांच्या सह्या आहेत. दै. विशाल सह्याद्रीच्या १ जानेवारी १९७१ च्या अंकात ही बातमी दिसून येते.

संयुक्त समाजवादी व शिवसेना यांच्या कार्यकर्त्यांत मारामारी झाली. दोन दिवस चाललेल्या या चकमकीत पंचवीसजण जखमी झाले. संयुक्त समजावादी पार्टी व कम्युनिस्ट कचेऱ्यांवर दगडफेक झाली. काही दुकानांची मोडतोड व लुटालुट पण करण्यात आली. हमालांचा संप आणि हमाल पंचायत यासंबंधी शिवसेनेने जी भूमिका घेतली त्यातून हे रण माजले असे सांगण्यात येते. हमालांच्या संघटनेमध्ये शिवसैनिकांनी प्रवेश करून हमाल पंचायतीला धक्का दिला म्हणून संयुक्त समाजवादी पक्ष खवळला. अशा आशयाचे संपादकीय दै. विशाल सह्याद्रीच्या ९ जानेवारी १९७१ च्या अंकात दिसून येते.

शेतकऱ्यांच्या मालास भाव मिळावा म्हणून समाजवादी पक्ष आणि शेतकरी शेतमजुर पंचायत समितीच्या वतीने सत्याग्रहाची मोहिम हाती घेण्यात आली. सर्वत्र कायदेशीर रेशनिंग सुरू करावे, दरमहा दरमाणशी बारा किलो धान्य, दुष्काळग्रस्तावर अन्याय करणारे आदेश रद्द करावेत, मागेल त्याला काम आणि दररोज चार रूपये मजुरी, रब्बी हंगामासाठी बैल, बी–बीयाणे व कर्ज, भाववाढ थांबविण्यासाठी काळा पैसा बाहेर काढा आणि शंभर व हजाराच्या नोटा रद्द कराव्यात. अशा मागण्या पंचायतीने केलेल्या आहेत. धान्यांची एकाधिकार खरेदी शासनाने करावी आणि ज्वारी ९० रूपये, गहु १०० रूपये, भात ८० रूपये, बाजरी ९० रूपये, मका ८० रूपये क्विंटल या भावाने खरेदी करावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली आहे. अशी बातमी १३ ऑगस्ट १९७३ सालच्या केसरीच्या अंकात आलेली आहे.

पाऊस झाल्यामुळे महाराष्ट्रातील दुष्काळाची तात्कालीक परिस्थिती संपली असली तरी दुष्काळाचा धोका संपलेला नाही. महाराष्ट्रातील दुष्काळाचे निर्मुलन होण्यासाठी जमिनीची बांधबंदिस्ती आणि पाणीपुरवठा यांच्या असंख्य योजना शासनाने पूर्ण कराव्यात आणि पुनश्च दुष्काळ पडण्याची वाट न पाहता ही सारी कामे तातडीने हाती घ्यावीत असे आवाहन महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण व निर्मुलन मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रामीण भागातील श्रमिकांच्या परिषदेत करण्यात आली. समाजवादी पक्षाच्या वतीने डॉ. बाबा आढाव यांनी भूमिका मांडली. अशा आशयाची बातमी केसरीच्या १७ सप्टेंबर १९७३ च्या अंकात दिसून येते.

माथाडी कायद्यास दीर्घकाळ मनाई ठेवण्याचा आदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेगे यांनी दिला. मालक व नोकर यांसदर्भात याचिकांची सुनावणी सुरू असल्याची बातमी केसरीच्या २५ जुलै १९७४ च्या अंकात दिसून येते.

'झोपडपट्टीवाशीयांना सुधारणेचे महत्त्व कळू द्या' अशा आशयाची बातमी १९ ऑगस्ट १९७४ च्या अंकात आहे. या बातमीत डॉ. बाबा आढाव यांनी सूचना केलेल्या आहेत. झोपडीतील अतीगरीब अशा साठ टक्के लोकांच्या सुधारणेचा आणि पुनर्वसनाची जबाबदारी महानगरपालिका आणि शासन यांनी उचलावी, त्यासाठी काही व्यवहारी मार्गांचा अवलंब करावा. पक्की घरे त्यांना बांधून द्यावीत.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावर सहा डिसेंबर रोजी औरंगाबाद येथे होणाऱ्या सत्याग्रहात गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांनी सामील व्हावे असे आवाहन डॉ. बाबा आढाव यांनी केले. महात्मा फुले समता प्रतिष्ठान तर्फे या प्रश्नावर बोलविलेल्या समविचारी संघटनांच्या बैठकीत बोलत होते. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी पुण्यातून २८ नोव्हेंबर रोजी महात्मा फुले यांच्या राहत्या घरापासून समता दिंडी निघेल अशा आशयाची बातमी दै. सकाळ मधील ३० ऑक्टोंबर १९७९ च्या अंकात दिसून येते.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर मागणीसाठी पुण्याहून निघालेल्या सत्यागृहींना नगर जिल्ह्यात सुप्याजवळ अटक करण्यात आली. अटकेपूर्वीच्या सभेत डॉ. बाबा आढाव यांनी सभेत भाषण केले. दै. सकाळच्या १ डिसेंबर १९७९ च्या अंकात छायाचित्रासह बातमी दिसून येते.

जयप्रकाश नारायण यांचे निधन झाल्यानंतर पुण्यात नागरिकांचा मूकमोर्चा निघाला होता. हमाल पंचायतीची दुखवट्याची सभा डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली होऊन कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. नाना व भवानी पेठेतील व्यापाऱ्यांनीही व्यवहार बंद ठेवले होते. शहरातील हॉटेल्स, काही स्टेशनरी, औषध-दुकाने सुरू होती. स्वतःच्या सुखद जीवनाची स्वप्ने न रंगवता नव्या समाजजीवनाची चित्रे रेखाटण्यात जयप्रकाशजींनी आपले आयुष्य व्यतीत केले. त्यांच्या मृत्युने क्रांतीच्या मार्गाचा शोधक आज गेला आहे. पण त्यांच्या स्मरणातूनही क्रांतीची वाट शोधता येते. अशा शब्दात 'एक गाव एक पाणवठा' चळवळीचे प्रणेते डॉ. बाबा आढाव यांनी जय प्रकाशजींनी श्रद्धांजली वाहिली. अशा आशयाची बातमी दै.सकाळ, ९ ऑक्टोंबर १९७९ रोजीच्या अंकात आलेली आहे.

डाव्या आघाडीतर्फे महागाई निषेधार्थ पुण्यात जिल्हाधिकारी कचेरी समोर झालेल्या सत्याग्रहात पुण्यात ७३१ जणांना अटक करण्यात आली. महागाई, दलितांवरील, महिलांवरील अत्याचार यांच्या निषेधार्थ मोर्चा निघाला होता. त्यात शिवाजीराव भोसले, पांडुरंग तरवडे, बी.डी. किल्लेदार, पोपटराव खिलारे, कुमार सप्तर्षी इ. कार्यकर्ते होते. दै. सकाळ, ३ ऑक्टोंबर १९८० या दैनिकांत दिसून येते.

मालधक्का संपात डॉ. आढावांना अटक अशा आशयाची बातमी दै. सकाळच्या १४ ऑक्टोंबर १९८० च्या अंकात आलेली आहे. हमाल पंचायतीचे हमाल काम करण्यास तयार असतानाही सिमेंट गाड्यामध्ये भरण्यासाठी बाहेरचे हमाल आणल्याने गाडी रोखण्याचा प्रयत्न केल्यानंतर डॉ. बाबा आढावांना अटक केली.

दलितांच्या प्रश्नांबाबत कम्युनिस्ट व समाजवाद्यांनी ठोस भूमिका घ्यावी. अशा आशयाची बातमी दै. सकाळच्या २६ ऑगस्ट १९८३ च्या अंकात दिसून येते. महाराष्ट्रात डॉ. बाबा आढाव यांच्या कार्याने दलित समाज उभा राहताना दिसतो परंतु यातही पुढे कोंडी निर्माण झालेली दिसते. पुरोगामी महाराष्ट्राची ही कोंडी फोडण्यासाठी समाजवाद्यांनी दलितांसाठी ठोस भूमिका घ्यावी.

वर्ग व्यवस्था, जातिव्यवस्था आणि पुरूषवर्ग व्यवस्था या तीन बेड्यात भारतीय स्त्री अडकलेली आहे. स्त्री मुक्तीची चळवळ बळकट होण्यासाठी या तिन्ही बेड्यांवर संयुक्त आघात करणारी व्यापक स्त्री–मुक्तिचळवळ राज्यात निर्माण होण्याची गरज आहे. स्त्री– मुक्ति चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात याच प्रश्नावर चर्चा होण्यासाठी सत्यशोधक महिला सभेतर्फे हा मेळावा झाला. अशा आशयाची बातमी दै.केसरीच्या ११ मे १९८८ च्या अंकात दिसून आली.

विधेयकाद्वारे धर्मगुरूंच्या अधिकारावर मर्यादा घालाव्यात अशा आशयाची बातमी दै. सकाळच्या दि.२३ मे १९८८ च्या अंकात दिसून येते. लोकस्वतंत्रता संघटनेच्या बैठकीत बोहरा समाजातील सुधारणावादी नेते असगर अली इंजिनिअर व डॉ. बाबा आढाव यांनी विचार मांडले. या वेळी डॉ. बाबा आढाव म्हणाले द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचे राजरोस उल्लंघन होत असल्यामुळे, दुसरे लग्न करणे हा दखलपात्र गुन्हा ठरवला जाण्याची गरज आहे. परित्यक्तांना केवळ पोटगी मिळण्याने भागणार नाही, तर त्यांचे मानाने पुनर्वसन झाले पाहिजे असेही ते म्हणाले, प्रत्येक खेड्यात जन्ममृत्यूंच्या नोंदीप्रमाणे लग्नाच्या नोंदी होण्याची व्यवस्था करण्यात

यावी. कुटुंब प्रमुख म्हणून केवळ पुरूषाचेच नाव न लावता पती–पत्नी दोघांचीही नावे लावण्यात यावीत.

तीचे घरात राहण्याचे सर्व मार्ग खुंटल्यानंतर ती घराबाहेर पडते व पोटगीचा अर्ज करते. परंतु पती–पत्नीची फारकत झाल्यास त्यांच्या राहत्या घरावर पत्नीचा हक्क असावा.

शासकीय ग्रंथालयातील प्राप्त झालेल्या वृत्तपत्रांमधून खालील प्रमाणे बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत, या बातम्या डॉ. बाबा आढावांच्या चळवळीचे मूल्यमापन करताना महत्त्वाच्या वाटतात.

| क्र. | शीर्षक | वष | दैनिक |
|---|---|---|---|
| १ | गोवा मुक्ती लढा डॉक्टरांचे पथक | २१/८/१९५५ | दै.केसरी |
| २ | संयुक्त महाराष्ट्र समिती | ७/३/१९५८ | दै.केसरी |
| ३ | गोवा मुक्ती–महिला आघाडी | ७/३/१९५८ | दै.केसरी |
| ४ | शिवजयंती | ९/३/१९५८ | दै.केसरी |
| ५ | पुण्यातील घरे व गलिच्छ वस्त्या | २२/९/१९६१ | दै.केसरी |
| ६ | पुरग्रस्त साफसफाई | २३/७/१९६१ | दै.केसरी |
| ७ | झोपडपट्टीबाबत सूचना | ४/८/१९६१ | दै.केसरी |
| ८ | फेरीवाले निवेदन | ७/१०/१९६७ | दै.केसरी |
| ९ | नागरी संघटना | ७/१०/१९६७ | दै.केसरी |
| १० | पुरग्रस्त मागण्या | ७/१०/१९६७ | दै.केसरी |
| ११ | भाववाढ मोर्चा | २८/१०/१९६७ | दै.केसरी |
| १२ | शेतकरी सत्याग्रह | १३/८/१९७३ | दै.केसरी |
| १३ | दुष्काळ | १७/९/१९७३ | दै.केसरी |
| १४ | माथाडी कायदा मनाई | २५/७/१९७४ | दै.केसरी |
| १५ | झोपडपट्टी सुधारणा | १९/८/१९७४ | दै.केसरी |
| १६ | बेघरांसाठी निर्दशने | १७/५/१९८८ | दै.केसरी |
| १७ | तणावाची स्थिती | १४/५/१९८८ | दै.केसरी |
| १८ | दंगलग्रस्तांना मदत | १६/५/१९८८ | दै.केसरी |
| १९ | सेवादल व धर्मगुरू | २३/५/१९८८ | दै.केसरी |
| २० | रिक्षा बंद | २९/५/१९८८ | दै.केसरी पृ.२ |
| २१ | स्त्री–मुक्ति चळवळ | ११/५/१९८८ | दै.केसरी पृ.५ |
| २२ | हमालांचा संप मागे | ११/५/१९८८ | दै.केसरी पृ.५ |
| २३ | महिला कामगार | १२/५/१९८८ | दै.केसरी पृ.३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | समाजाची वाटचाल सनातनतेकडेच | ३१/५/२०१४ | दै.लोकासत्ता पृ.२ |
| २५ | जाती विषमते विरूद्ध पुन्हा लढा | १/६/२०१४ | दै.लोकासत्ता पृ.४ |
| २६ | उपोषण | ८/१०/२०१६ | दै.दिव्य मराठी पृ.४ |
| २७ | कष्टकऱ्यांचा नेता | १३/६/२०१७ | दै.महाराष्ट्र टाईम्स पृ.४ |
| २८ | आर्थिक विषमतेबाबत विचार कधी? | १८/६/२०१७ | दै.महाराष्ट्र टाईम्स पृ.६ |
| २९ | आढावांचे अभिनंदन | २/७/१९७७ | दै.विशाल सह्याद्री पृ.२ |
| ३० | हमालांचा संप | १/१/१९७१ | दै.विशाल सह्याद्री पृ.५ |
| ३१ | शिवसेना व हमाल पंचायत | ८/१/१९७१ | दै.विशाल सह्याद्री पृ.२ |
| ३२ | डॉ. आढाव अटक | ३/१०/१९८० | दै.सकाळ |
| ३३ | डॉ. आढाव अटक | १४/१०/१९८० | दै.सकाळ |
| ३४ | नामांतर लढा | २०/०१/१९८० | दै.सकाळ |
| ३५ | लाँग मार्च | ९/१२/१९८० | दै.सकाळ |
| ३६ | दलितांचे प्रश्न | २६/८/१९८३ | दै.सकाळ |
| ३७ | जेपींना श्रद्धांजली | ९/१०/१९८९ | दै.सकाळ |
| ३८ | नामांतर लढा | ३०/१०/१९७९ | दै.सकाळ |
| ३९ | नामांतर लढा | १/१२/१९७९ | दै.सकाळ |
| ४० | ही आणि मी, मुलाखत | ३/७/२०११ | दै.सकाळ |
| ४१ | झाली फुले कळ्यांची | ७/८/२०१२ | दै.लोकसत्ता |
| ४२ | आठवणीतले पुणे | २८/१२/२०१३ | दै.लोकमत |
| ४३ | डॉ. बाबा आढाव (विशेषांक) | १/६/२००९ | दै.बहुजन महाराष्ट्र |

महाराष्ट्रातील विविध प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांतून डॉ. बाबा आढावांच्या कार्याची माहिती सांगितली आहे ती पुस्तके व लेखक पुढीलप्रमाणे आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १ | मनातले ज्योतीराव | अनिल अवचट |
| २ | शिकवले ज्यांनी | अनिल अवचट |
| ३ | सत्यशोधकांचे अंतरंग | जी. ए. उगले |
| ४ | मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा | राम जगताप |
| ५ | दगडावरची पेरणी | सय्यदभाई |
| ६ | खरेखुरे आयडॉल्स | युनिक फिचर्स |
| ७ | राष्ट्रसेवादल इतिहास और कर्य | डॉ. मु. ब. शहा |
| ८ | रूपवेध | डॉ. श्रीराम लागु |
| ९ | माझी वाटचाल | ग. प्र. प्रधान |
| १० | अस्सा हा महाराष्ट्र | के. सागर प्रकाशन |
| ११ | प्रबोधन पर्व – प्रा.विलास वाघ गौरव ग्रंथ | गौरव समिती |
| १२ | निळु फुले – जनामनातला माणूस | रजनीश जोशी |
| १३ | एक गाव एक पाणवठा | डॉ. बाबा आढाव |
| १४ | सत्यशोधनाची वाटचाल | डॉ. बाबा आढाव |
| १५ | राहिले ते आपुले | रामभाऊ तुपे |
| १६ | परिवर्तनाचे साथी आणि सारथी | भाई वैद्य |
| १७ | बुलंद आवाज बाईचा | पन्नालाल सुराणा |
| १८ | मी एसेम | एस. एम. जोशी |

झोपडपट्टीधारक, कष्टकरी, हमाल, मोलकरीण, रिक्षा चालक यासारख्या असंघटित कामगारांच्या प्रश्नांसाठी आपले आयुष्य वेचणारे बाबा आढाव खऱ्या अर्थाने पुणेकरांचे बाबा बनले आहेत. गोरगरीबांकरिता संघर्ष करताना, अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचे धाडस अंगी बाणलेल्या बाबांचे पूर्ण आयुष्य संघर्षमय राहिले आहे. बाबांनी अल्पकाळ राजकारण तर आयुष्यभर समाजकारण केले. पूर्व आणि पश्चिम पुणे ही केवळ भौगोलिक विभागणी नाही. ती

मानसिक विभागणीही आहे. पूर्व पुणे हे उपेक्षितांचे असून, त्यांच्या न्याय हक्कांसाठी बाबांनी आयुष्यभर संघर्ष केला आहे.

बाबांनी केलेली आंदोलने तसेच त्यांच्या चळवळींची दखल ही देशपातळीवरही वारंवार घ्यावी लागली आहे. एक गाव एक पाणवठा, हमाल माथाडी कायदा, पथारी व्यावसायिकांसाठीचे धोरण, रिक्षा पंचायतीद्वारे रिक्षाचालकांच्या प्रश्नांची झालेली सोडवणूक अशी अनेक उदाहरणे ही बाबांच्या चळवळींचे फलीत दर्शवणाऱ्या आहेत. बाबा १९६२ ते १९७१ या काळात पुणे महानगरपालिकेचे सदस्य होते. नागरी आघाडीतर्फे बाबांचे नाना जोशी, नानासाहेब गोरे, काँग्रेसचे नेते शिवाजीराव ढेरे, नामदेवराव काची, नामदेवराव मते असे मान्यवर त्यांचे पालिकेतील सहकारी होते.

पानशेत धरण १९६१ साली फुटले आणि पुणे पुराच्या तडाख्यात सापडले. या काळात पुरग्रस्तांसाठी वसाहतही सुरू करण्यात आल्या. याच काळात बाबांचे राजकारण बहरू लागले होते. हमाल पंचायत, झोपडपट्टी संघांच्या माध्यमातून बाबांनी समाजकारण सुरू केले. पुराच्या पाण्यामुळे बकाल झालेल्या झोपडपट्ट्या कॅनालच्या आजूबाजूला बसू लागल्या. सुरूवातीला दलित वस्ती या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होती. मात्र पुणे विस्तारू लागले तेव्हा पुण्याची आर्थिक प्रगती होऊ लागली, तसे या झोपडपट्ट्यांमध्ये जात-धर्म वगळून गर्दी झाली. या झोपडपट्ट्यांचा विकास व तेथील प्रश्न सोडवण्यासाठी बाबांनी प्रयत्न सुरू केले.

झोपडपट्टी पुनर्वसनात पक्षीय राजकारण नको, ही भूमिका घेतली गेली होती. बाबांनी २५० झोपडपट्ट्यांमध्ये संघटन केले होते. हमाल पंचायत, झोपडी संघ पुणे शहरातील प्रत्येक आंदोलनात सहभागी होत होते. महापालिका बजेटमध्ये कोणाचा नेमका विचार केला जातो, असा प्रश्न बाबांनी उपस्थित करत झोपडपट्टीधारकांना उपरे समजले जाते, या विरोधात आवाज उठवला. झोपडपट्टीधारकांना घरे मिळवून देण्याच्या प्रयत्नांबरोबरच त्यांनी पूरग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

पूर्व आणि पश्चिम पुण्याची मानसिक विभागणी कशी आहे, यावर त्यांनी या काळात खऱ्या अर्थाने प्रकाश टाकला. बजेटमध्ये कमला नेहरू उद्यानावर किती खर्च होतो तसेच पुर्वेकडील शाहू उद्याानावर होणारा खर्च किती, यातील फरक त्यांनी दाखवला. पश्चिमेकडील सांस्कृतिक भवनावर होणारा खर्च, तोच पश्चिमेत किती केला जातो, पूर्व आणि पश्चिम पुण्याला मिळणारे पाण्याची त्यांनी तांत्रिकदृष्ट्या मोजदाद केली आणि पूर्व पुण्यावर होणाऱ्या

अन्यायाला त्यांनी वाचा फोडली. नानावाडा येथे हायस्कूल सुरू करण्यात आले. पालिकेची शाळा असलेले ते पहिले हायस्कूल होते.

अशाप्रकारे बाबांनी उपेक्षित, असंघटितांसाठी संघर्ष सुरू केला. त्यासाठी त्यांनी सक्रिय राजकारणाची पाठ सोडली. असंघटितांना पेन्शन मिळावे, यासाठी अनेक आंदोलने उभी केली. काही प्रमाणात त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. हमाल, रिक्षा चालक, मोलकरीण, झोपडपट्टीधारक अशा अनेक असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी डॉ. बाबा आढावांचा संघर्ष सुरूच आहे.

## निष्कर्ष

डॉ. बाबा आढाव यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास केल्यानंतर खालीलप्रमाणे निष्कर्ष निघतात.

डॉ. बाबा आढाव यांचे जीवन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये घडलेले आहे.

डॉ. बाबा आढावांमुळे पुणे शहर व जिल्ह्यामध्ये अनेक चळवळी गतीमान झालेल्या आहेत. या चळवळींना प्रेरणा देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केलेले आहे. या चळवळींमध्ये हमाल, रिक्षा व्यावसायिक, मजूर, असंघटित कामगारांची चळवळ, काच–कागद–पत्रा गोळा करणाऱ्यांची चळवळ, देवदासीची चळवळ, अंधश्रद्धा निर्मुलन माथाडी कामगार चळवळ या चळवळींचा यामध्ये समावेश करता येईल.

सर्वात महत्त्वाची असणारी व ज्या चळवळींनी राज्यभरात निश्चित भूमिका घेवून कार्य केले ते म्हणजे 'एक गाव एक पाणवठा' व नामांतर चळवळ होय.

या चळवळींमुळे कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर, हमाल, मापाडी, रिक्षा चालक यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत झालेला आहे.

हमाल पंचायत व रिक्षा पंचायतीचे नेते म्हणून डॉ. बाबा आढाव यांनी वेळोवेळी त्यांना केलेल्या मार्गदर्शनामुळे चळवळीला वैचारिक धार आलेली आहे.

पुरोगामी सत्यशोधक या नियतकालिकाने कष्टकरी कामगारांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडलेली आहे. तसेच ते प्रश्न 'पुरोगामी सत्यशोधक'मुळे यशस्वीरितीने सुटलेले आहेत. तर महात्मा फुले यांच्याशी निगडीत अनेक बाबींचा उलघडा केवळ पुरोगामी सत्यशोधकमुळेच झालेला आहे.

पुणे येथील गंज पेठेमधील महात्मा फुले वाड्याचे राज्य संरक्षक वास्तू म्हणून जे जतन झाले यामध्ये डॉ. बाबा आढाव यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

डॉ. बाबा आढाव यांना शेतकरी, कामगार, हमाल व स्त्रियांच्या चळवळींचा नेता म्हणून मान्यता मिळालेली आहे. त्या मान्यतेला साजेसं कार्य डॉ. बाबा आढाव यांनी मोठा संघर्ष केलेला आहे. त्यांच्या संघर्षामुळेच महाराष्ट्र घर कामगार कल्याणकारी मंडळ कायदा २००८ हा कायदा लागू झालेला आहे.

तसेच माथाडी कामगार व असंघटित कामगारांच्या हिताचे संरक्षण करणारा कायदा त्यांच्यामुळेच लागू झालेला आहे.

'एक गाव एक पाणवठा' या चळवळींमुळे महाराष्ट्र राज्यात अस्पृश्यता निर्मूलन होण्यास मदत झालेली आहे.

महाराष्ट्र आरोग्य मंडळ निर्माण करून डॉ.बाबा आढावांनी माफक दरात आरोग्य सुविधा सर्वसामान्य घटकांना उपलब्ध करून दिल्या व त्याचा लाभ अनेक गरीब रूग्णांना घेता आला.

नगरसेवक म्हणून त्यांनी पुणे शहरातील लोकांच्या मुलभूत प्रश्नांवर सभागृहात केलेली मांडणी न्यायी वृत्तीची होती.

हमाल पंचायतीच्या माध्यमातून सुरू केलेली कष्टाची भाकर हा एक विधायक कार्यक्रम आहे. गरीब कष्टकऱ्यांना कष्टाची भाकर मुळे अल्पदरात दोन वेळ जेवणाची व्यवस्था झाली आहे.

हमालांसाठी लढत असताना व व्यवस्थेशी संघर्ष करत असताना हमाल भवन, हमाल नगर, हमाल मजूर सहकारी संस्था, भाऊबीज, स्वस्त दवाखाना, पुस्तकपेढी इत्यादी सारखे उपक्रम प्रचंड लोकप्रिय झाले.

विषमतेच्या विरोधातील त्यांनी घेतलेली भूमिका त्यांच्या जीवनात महत्त्वाची होती. स्त्री–दास्य, चार्तुवर्ण्य, विषमता, भांडवलदार यांच्या विरोधात त्यांचा अविरत संघर्ष आहे. या चळवळींनी जनमानसात प्रेरणा व स्फूर्ती निर्माण केली.

त्यांनी महात्मा गांधीची व साने गुरूजींची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणली आहे. म. गांधीजींच्या खादीच्या व्रताचे व सत्याग्रहाच्या तंत्राचे ते विशेष चाहते आहेत. साने गुरूजींप्रमाणे त्यांचे नैतिक आचरण, करूणा व जिव्हाळा आहे. आढावांचे नैतिक आचरण भारतीय नागरीकांस एक वाटाड्या म्हणून उपयोगी पडणार आहे.

समाजातील अस्पृश्यता, जातीभेद, धर्मभेदासारख्या समाज विघातक प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी फार मोठे योगदान दिले आहे. मराठा समाजात जन्म घेऊनही आढावांनी दलित, आदिवासी, स्त्रियांसाठी काम केलेले आहे. समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्याचे धाडसी पाऊल टाकले आहे.

डॉ. बाबा आढाव हे निष्काम, निस्वार्थी कर्मयोगी आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने स्वातंत्र्य सैनिकांस देऊ केलेले मानधन, सवलती, पुरस्कार त्यांनी नाकारले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढणे हे एक कर्तव्य होते, ते कोणत्याही लाभासाठी त्यावेळी लढले नाहीत. म्हणून सर्व सवलती नाकारल्या. देशभक्त कसा असावा असा आदर्श गुण समाजासमोर

आणला. हा त्यांचा आदर्श व वैशिष्ट्यपूर्ण गुण निश्चितच भारतीयांना प्रेरणादायी असा असणार आहे.

एक उत्तम संघटक म्हणून बालवयापासून नागरिक सहकारी भांडार, विकास व्याख्यानमाला, राष्ट्रसेवादल, हमाल पंचायत, रिक्षा पंचायत अशा सारख्या अनेक संघटना त्यांनी आयुष्यभर बांधल्या. या संघटनांचे उत्कृष्ट असे संघटन करून एक उत्तम संघटक म्हणून सिद्ध केले. हा वैशिष्ट्यपूर्ण पैलू भावी युवा पिढीस दिपस्तंभासारखा उपयोगी ठरणार आहे.

पुण्यात आणि संपूर्ण महाराष्ट्रात धर्मसहिष्णूवृत्तीची जोपासना करून ऐक्य टिकवण्यास मदत केली. सर्व जाती धर्माच्या लोकांसमवेत बंधुभावाचे वर्तन केले. पुण्यामधल्या दंगली, महाराष्ट्रातील जातीय व धार्मिक दंगलीच्या वेळी शांतता निर्माण करण्याचे व जातीय सलोखा पुनःस्थापित करण्याचे काम केले. हे त्यांचे कार्य ऐक्यासाठी निश्चितीच लाभदायक व प्रेरणादायी ठरणार आहे.

अन्यायाविरूद्ध त्यांनी वेळोवेळी आवाज उठविला. अनेक चळवळी निर्माण केल्या. गरीब, दलित, स्त्रियांच्या शोषणांविरूद्ध आवाज उठविला. यासाठी आयुष्यभर कायदेशीर लढा देऊन सामान्यांना न्याय मिळवून दिला. हा त्यांचा न्यायप्रियता गुण भावी पिढीस उपयोगी पडणार आहे.

पारदर्शक कारभार हे बाबा आढावांचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना लोकांच्या पैशाचा हिशोब देता आला पाहिजे यासाठी ते प्रखर आहेत. त्यांनी ज्या ज्या संस्था स्थापन केल्या त्या सर्व संस्थामधील हिशोब चोख ठेवला आहे. प्रत्येक वर्षी संस्थाचे लेखा परिक्षण करून कारभार स्वच्छ ठेवला आहे.

महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी जातीय अत्याचार, दंगली, स्त्रियांवरील अत्याचार झाले. त्या ठिकाणी तत्परतेने भेट देणे, अन्यायग्रस्तांना दिलासा देणे. न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने जाणिवपूर्वक प्रयत्न करणे यासाठी सण, समारंभ, सुट्टी किंवा कोणत्याही दिवसाचा त्यांच्या दृष्टीने अडसर येत नाही.

भ्रष्टाचाराची कीड ही सर्वात वाईट आहे. भ्रष्टाचारासाठी कडक कायदे अंमलात येणे गरजेचे आहे. रोजगाराची संधी निर्माण करून दिल्या पाहिजेत. खाजगीकरणात सुद्धा महिलांना काम करण्यासाठी ५०% आरक्षण ठेवले पाहिजे.

दारू, चरस, गांजा, अफू, बिडी, सिगारेट, व्हाईटनर या शरीराला घातक असणाऱ्या आणि कुटुंबे उध्वस्त करणाऱ्या वस्तूंचे उत्पादन घटवले पाहिजे. सक्षम समाज निर्माण होण्यासाठी याची गरज आहे असे ते म्हणतात.

सरकारी खर्चातून ज्यांची इच्छा आहे त्यांचे सामुदायिक विवाह सोहळे वर्षातुन दोनदा तालुका स्तरावर साजरे झाले पाहिजेत. मुलींचा जन्मदर सुधारण्यासाठी मुलींच्या जन्माच्या वेळी १,००,००० एक लाख रूपयाची मुदत ठेव सरकारने मुलीच्या नावे जमा करावी.

दोन अपत्ये झाल्यानंतर तिसऱ्या अपत्याच्या वेळी त्या कुटुंबाचे रेशनिंग कार्डवरील धान्य वितरण बंद करावे, त्याच्या सर्व शासकीय कागदपत्रावर तिसरे अपत्य असा शिक्का मारावा. ज्या घरात कोणालाच रोजगार नाही त्यांना प्रत्येकी २००० रू. पेन्शन सुरू करावी. मोफत वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी आग्रह धरावा.

वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुलांप्रमाणेच मुलींनाही समान हक्क देण्यासाठी हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ मध्ये दुरूस्ती करण्यास केंद्रिय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या दुरूस्तीचे परिणाम देशातील स्त्रियांच्या जीवनात बदल घडवून आणणारे ठरणार आहेत. त्यासाठी शेतजमिनीवर म्हणजेच ७/१२ व स्थावर मालमत्तेतील वाटा हा सर्व मुला मुलींना सारखा मिळाला पाहिजे याचा ते आग्रह धरतात.

डॉ. बाबा आढाव राष्ट्रसेवादलाचे सदस्य होते. राष्ट्रसेवा दलाच्या समाजातील विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर रूजले आहेत. त्यामुळे लोकशाही समाजवाद हा मूल्यविचार त्यांनी जीवनभर निष्ठापूर्वक जतन केला आहे.

दुसऱ्याचं दुःख ज्यांना समजू शकतं त्यांनाच जीवनाचा खरा अर्थ कळतो. डॉ. बाबा आढाव यांनी समाजातल्या गोरगरीबांचं दुःख समजून घेतलं. अंगमेहनती, कष्टकरी, कामगारांचं दुःख जवळून अनुभवल म्हणून कष्टकरी माणसाच्या दुःखाला वाचा फोडण्याचं अतिशय महत्त्वाचं आणि अवघड काम त्यांनी केले आहे.

# परिशिष्ट्ये

१) प्रश्नावली

२) डॉ. बाबा आढाव यांना मिळालेले महत्त्वाचे मान सन्मान

३) डॉ. बाबा आढाव यांचे हस्तलिखित

४) डॉ. बाबा आढाव यांची रोजनिशी

५) पुरोगामी सत्यशोधक १९७८ च्या अंकाचे मुखपृष्ठ

६) पुरोगामी सत्यशोधक १९७८ च्या अंकाचे मलपृष्ठ

७) महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाची सुरूवात 'अखंड' गायनाने होते तो अखंड.

८) क्रांती गीत

९) क्षणचित्रे

१०) महात्मा फुले यांचा पुरोगामी सत्यशोधकाच्या १९८५ च्या अंकावरील मुळ फोटो.

११) शासनाच्या चरित्रे साधने प्रकाशन समितीत सदस्य.

१२) महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचा नोंदणी दाखल १९७१.

१३) महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचा नोंदणी दाखल १९७२.

१४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जीवनसाधना गौरव पुरस्कार मानपत्र.

१५) पुणे पीपल्स को. ऑप. बँक लि. पुणे सन्मानपत्र.

१६) 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' या महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकात संपादक य. दि. फडके यांचे निवेदन (आवृत्ती पाचवी)

१७) 'महाराष्ट्रातील समाजसुधारक' या महाराष्ट्र शासनाच्या पुस्तकातील 'बाबा आढावांविषयीची माहिती'

१८) हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ निमंत्रण पत्रिका.

१९) सामाजिक कृतज्ञता निधी–पुरस्कार वितरण कार्यक्रम पत्रिका.

२०) महात्मा फुले समता प्रतिष्ठानची प्रकाशने.

२१) डॉ. बाबा आढावांचा जीवनपट

## १) प्रश्नावली

सदर प्रश्नावली मुक्त प्रश्नावली स्वरूपाची असून उत्तरदात्यांना ढोबळ मानाने विचारलेल्या प्रश्नांची यादी पुढीलप्रमाणे.

१) उत्तरदात्याचा अल्पपरिचय.

२) डॉ. बाबा आढावांशी तुमची पहिली भेट कधी व कशी झाली?

३) सुरूवातीच्या काळात तुम्हाला आलेला अनुभव कसा होता?

४) डॉ. बाबा आढाव यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते वेगळेपण सांगता येईल?

५) 'एक गाव, एक पाणवठा' या चळवळीतल्या कामाचा काय अनुभव सांगता येईल?

६) सामाजिक कृतज्ञता निधीच्या उभारणीतील कामाबद्दल काय सांगता येईल?

७) सामाजिक निर्मुलन, भटक्या विमुक्तांची चळवळ, अंधश्रद्धा निर्मुलनाच्या कामाकडे कसे पाहता येईल?

८) तुम्ही कोणकोणत्या चळवळीत सहभाग घेतला आहे?

९) आपण केलेल्या कोणकोणत्या चळवळी यशस्वी झालेल्या आहेत.

१०) समाजाला तुम्ही कोणता संदेश द्याल.

## २) डॉ. बाबा आढाव यांना मिळालेले महत्त्वाचे मान सन्मान

१९८९ – पहिल्या छत्रपती शाहू पुरस्काराचे पहिले मानकरी

१९९१ – यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक

१९९४ – आदर्श कार्यकर्ता – वसंतराव नाईक पारितोषिक

१९९४ – महात्मा फुले पुरस्कार

१९९४ – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची डी.लिट पदवी प्रदान

१९९९ – सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार


२००६ – 'त्रिदल' संस्थेचा पुण्यभूषण पुरस्कार

२००८ – गोदावरी गौरव पुरस्कार

२००८ – सिल्व्हर अॅवार्ड

२०१२ – महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार

## ३) डॉ. बाबा आढाव यांचे हस्तलिखित



२२।१२।८७

प्रिय शरद

विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागांत कोण

करता. सुहास पळशीकर, सायंकाळी करते येणार ?

यांची विचारणा करावीस. त्यांना वाहनाची गरज

असल्यास आठे Pickup करायची.

तत्त्वज्ञान विभागांत कोणी असेल. डॉ. सदानंद मोरे

यांना 'संतसंप्रदाय व धर्मनिरपेक्षता' या विषयावर

रवि. सायं. या कामी बोलण्यास तयार करावेत. तो हवा

येणार नाही विचारून घ्यावेस

बि.

बाबा आढाव

दवाखान्याची गाडी [illegible] आहे. त्याचा उपयोग

घ्यावी.

३३९०८९

३३५५४८ } पु.

# ४) डॉ. बाबा आढाव यांची रोजनिशी

(अ)

11 1994

स० १० ३० — X

'आपटे'

X. नविकृत करावे व इथल्या बरोबरच्या काही हमालांना चिंचवड बेजार हा – हमाल पंचायतीच्या राजीनामा देऊन ऑल वर्कर्स युनियनचे अनेक सदस्य आहे. त्यांची तक्रार नीट न वागल्याबद्दल व म्हणणे नीट समजून न घेतल्याबद्दल आहे काल श्री बिनवडे, सुबराव, गाडे इ. त्यांना भेटायला गेले होते. 'बाबांना बाहेरगावची कामे करता येतात – आमच्या कामांना ते महत्त्व देत नाहीत' असे विधान त्यांनी केल्याचे मला सांगण्यात आले. सकृद्दर्शनी हे खरे वाटावे असे आहे. वास्तविक गेली १॥ २ वर्षे मी चिंचवडला आठवड्यातून दोन वेळा जात होतो. कसबेचे म्हणणे "बेजार हाजसकचे टेंडर ऐवजी सरळ नोकरदार करून घेण्याचे काम पंचायतीने केलेले नाही – ऑल वर्कर्स युनियनने केले."

काही हमाल स्वतःच्या स्वार्थापलीकडे विचारच करीत नाहीत. कसबेचे चारित्र्य असेच आहे. उमासते पत्यान! उसरे काय!

X. हडपसरच्या भाजीमंडईतील शेतकऱ्यांचा संप वारगकला. कमलाकर भाऊ होले यांनी ऐनवेळी तेथे उपस्थित राहून किरकोळ हडवल माथाडी हमाल कामगार कायद्याच्या अंमल बजावणीला या शेतकऱ्यांचा विरोध आहे!

X. वाईच्या व्यापाऱ्यांनी असाच विरोध चालवला आहे. वाईच्या गाड्या रोखल्या आहेत. व्यापाऱ्यांना आरकीमार नावाचे – मानी मजूर अधिकारी कुंदन भेटले आहेत.

X. परभणीच्या रोजे मालविक्रयावरील हमालांनी साप्ताहिक सुट्टीसाठी 'बंद' पाळला आहे. गेले तीन दिवस 'गायकवाड' नावाचा कार्यकर्ता फोन करतो.

12 1994

Wednesday

बांधकाम कामगार पंचायत
साय ७

X. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतीच्या महिलांनी 'स्वातंत्र्याचे झाले काय? – आमच्या हाती आले काय?' हे पथनाट्य सादर केले. अभिनय व समरसता उत्कृष्ट होती.

X. बांधकाम कामगार पंचायतीचा वर्धापनदिन 'ठाकसेदार' वाटला. दत्ता रुके व त्याच्या मित्रांनी केलेल्या धडपडीस आलेसाद मिळाला असे वाटते. सामूहिक विमा, नुकसान भरपाई, साप्ताहिक सुट्टी, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी इ. मागण्या केल्या गेल्या. कायद्याची अंमलबजावणी – संघटना नसल्याने निष्प्रभ ठरते. निरक्षरता, व्यसनाधीनता!

X.

(ब)

October 1994 **13** Thursday

दस-याचा दिवस आहे. सकाळी ९ ते ११॥. २ वाजेपर्यंत रोजच्या सारखेच काम झाले. नानापेठेतल्या पैलवान गुलाबादरवडेचे हृदयविकाराने निधन झाल्याचे समजल्याने त्याच्या घरी जाऊन तार घातली. आज शीला व अरुण झेंडेचा वाढदिवस. राष्ट्रीय पातळीवर तिथीप्रमाणे जयप्रकाशांचा जन्मदिन व डॉ. लोहियांचा स्मृतिदिन. ते तारखेप्रमाणे साजरे होतात. आगरकरांच्या सुधारकाची आज वर्षपूर्ती. सायंकाळी डोंबरे, पोरवरधर, धनकवडे कंपनी येऊन गेली. मजा आली. केवळ वय मोठे म्हणून मुलांना पाय धरायला लावू नका किंवा तुम्हीही म्हणू नका असे मी सांगत असतानाच मीच गरुड आजीचे पाय धरले. स्वतः इतका साल मी स्वखुशीने केले आजींना Seniority मान्य आहे मला नाही खरं म्हणजे आत्तापर्यंतची जाणीव कोणी करून देऊ नये असे वाटते.

शारीरमास जाणीव करून देते पायात. पिटल्या गोष्टी येत शारीरिक हालचालीत नकोशी वाटणे, कटकटीच्या कामाचा कंटाळा येणे वगैरे.

आज टिके-शरमार्के गव्हाणे यांच्याबरोबर छान गप्पा मारल्या. सरकारी कचेऱ्या बंद असल्याने Routine बंद होते. परिवर्तनाच्या चळवळींचा वेध घेण्यासाठी २८ ऑक्टोबर ते ६ डिसेंबर व्याख्यानमाला घेण्याचा विचार झाला.

October 1994 **15** Saturday

R.T.A. १०८९९॥

नगर १ दवाखाना उद्घाटन शरद पवार

नगरच्या हमाल पंचायतीने मार्केट यार्डात दवाखाना सुरू केलाय. शरद पवारांच्या हस्ते उद्घाटन झाले. इमारतीसाठी ३० लाख व दवाखान्याच्या उभारणीसाठी ५० लाख रुपये लागतील. ३२ खाटांची सोय असेल इ. शरद पवारांनी विचारले मेन्टेनन्स चा खर्च कसा भागवणार? मीठ तर दिले 'माथाडी मंडळातून' पवारांनी २५ ल. जाहीर केले! वास्तविक फक्त Building Plan तयार होता. Estimate नव्हते आम्ही लोकांनी तयार केले. हा समारंभ शंकरराव घुले पहिलवानांच्या विधानसभा तिकिटासाठी असावा. काँग्रेसवाल्यांची कार्यवाही जोरात होती. अहिरराव-चंगराजेनगी ठुकरू मारण्यासाठी पुढे जावे लागले. या निमित्ताने हमाल मापाडी महामंडळाने Mini अधिवेशनच झाले. रत्नागिरी, जळगाव, धुळे, परभणी, पढळी, सोलापूर इ. ठिकाणाहून कार्यकर्ते आले होते.

'सामुदायिक विमा व घर' या दोन मागण्या पुढे केल्या. मुख्यमंत्र्यांनी उद्याच्या खास बैठकीची फर्मायीश केली आहे.

रात्री - रिक्षापंचायतीची जाहीर सभा झाली. कामाद्यपना फंगा(गोळा) करणाऱ्या रिक्षांचे पथनाट्य रंगले!

SUN 16

ह. पं.

हमाल पंचायतीची सर्वसाधारण वार्षिक सभा + निवडणूक. हे एक मोठे दिव्य असते. चिटणीस मंडळाच्या १२ जागांपैकी अध्यक्ष - सरचिटणीस बिनविरोध. उपाध्यक्ष, संघटक, सहचिटणीस, खजिनदार पदासाठी चुरस. लोकांना बदल हवाय. महाराष्ट्रातली किंवा पुणे. सत्ता सहज सोडायला तयार नसतात. ६ जणांना बदलले ५० ‰ मतमोजणी सायं - हमाल पंचायतीचे कार्ड आणल्याची अट जाहीरपणे कठोर. एकूण सर्व सभा - खेळीमेळीत - अटीतटीच्या सामन्यात पार पडली. शिक्का!

(क)

17

1994

Monday

सायं ७ / सुभाष वारे

'भूकंपानंतरचे जोखड वर्ष'.


स १०.११ ते १२.३०

'रिक्षा पंचायत निदर्शने'

रिक्षा पंचायतीने 'दरवाढ झालीच पाहिजे, जोपर्यंत मंजुरी मिळत ६६२०९ परवानगी देऊ नका' या मागण्यासाठी सकाळी ११ ते १२।। जोरदार निदर्शने केली. शासन यंत्रणा दबावाखाली काम करते. RTA ने २० जुलैला ठराव केला १ ऑगस्टपासून अंमलात आणला. आम्ही गेले दहा महिने आंदोलन करतोय. निदर्शनासाठी फलक, मागण्या पत्रके, तयार करून नवीन आहे. ह्यांच्याबद्दल सर्व माहिती :

CM - शरद पवारांनी सामुदायिक विमा योजना जाहीर केली आहे. कामगार सचिव, कामगार आयुक्त व विमा कंपनीचे अधिकारी यांच्याशी चर्चा झाली. राज्यातील २ कोटी ६६ हजार - कामगारांना संरक्षण मिळेल. शेतमजुरांना [illegible] योजना सुरू आहे. [illegible] बैठकीत [illegible] [illegible] कामगारांना [illegible] मागण्या [illegible]

५) पुरोगामी सत्यशोधक १९७८ च्या अंकाचे मुखपृष्ठ


महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचे मुखपत्र

पृष्ठ 55 ज्योतिबा

# पुरोगामी सत्यशोधक

एप्रिल, मे, जून १९७८, वर्ष ४, अंक २, किंमत दोन रुपये



आळंदी सत्याग्रहातील वारकरी स्त्रिया

फोटो : सरोजा परुळकर

## ६) पुरोगामी सत्यशोधक १९७८ च्या अंकाचे मलपृष्ठ



आळंदीतील सत्याग्रहींचा जमाव. डॉ. बाबा आढाव भाषण करताना.

Registered with the Registrar of Newspapers for India under No. 27884/75

## ७) महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाची सुरूवात 'अखंड' गायनाने होते तो अखंड.

।। अखंड ।।

।। सत्य सर्वांचे आदी घर ।। सर्व धर्माचे माहेर ।।धृ।।

।। जगांमाजी सुख सारे।। खास सत्याची ती पोरे ।।१।।

।। सत्य सुखाला आधार।। बाकी सर्व अंधकार ।।

।। आहे सत्याचा बा जोर ।। काढी भंडाचा तो नीर ।।२।।

।। सत्य आहे ज्याचे मूळ ।। करी धूर्ता ची बाराळ ।।

।। बळ सत्याचे पाहुनी ।। बहुरुपी जळे मनी ।।३।।

।। खरे सुख नटा नोव्हें ।। सत्य ईशा वर्ज्यू पाहे ।।

।। जोती प्रार्थी सर्व लोकां ।। व्यर्थ डंभा पेटूं नका ।।४।।

सत्य ।।

## ८) क्रांती गीत

**कष्टकऱ्यांच्या, दीन दलितांच्या हक्कासाठी लढणाऱ्या बाबा आढाव यांच्या संघटनेचे क्रांती गीत**

**क्रांती जिंदाबाद !**

क्रांती जिंदाबाद रहेगी, क्रांती जिंदाबाद
मरणाच्या दारात घातली तुम्ही आम्हाला साद ।।धृ।।

या नादाच्या लहरीवरती,
स्वप्न उद्याचे बघते धरती
हादरली परी याच निनादे,
मग्रुरी पिढीजात ।।१।।

वरवर अवघे धनिक हासती,
बेदरकार ही वरुनी दिसती,
भुंग्यापरी आतून पोखरे,
त्यांना हा पडसाद ।।२।।

काळाच्या लाटावर लाटा,
आल्या गेल्या बारा वाटा
मृत्युंजय परी मंत्र आमुचा
होईल का बरबाद ।।३।।

लढा आमुचा हा समतेचा
कष्टकऱ्यांचा अन् दलितांचा
सज्ज जाहलो समर जिंकण्या,
करण्या वज्राघात ।।४।।

क्रांती जिंदाबाद रहेगी, क्रांती जिंदाबाद !

## ९) क्षणचित्रे



डॉ. बाबा आढाव क्रांती लढ्यासाठी वज्रमुठ दाखविताना




गौरव निधी अर्पण कार्यक्रमात डॉ. बाबा आढाव आई समवेत



दिवाळी बोनसचे कामगारांना वाटप करताना




महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार मृणाल गोरे यांच्या हस्ते स्विकारताना



केंद्रीय मंत्री प्रकाशजी जावडेकर सोबत डॉ. बाबा आढाव




सामाजिक कृतज्ञता निधी – कार्यकर्ता प्रशिक्षणाच्या वेळी





रिक्षा पंचायतीच्या आंदोलन प्रसंगी



सत्यशोधक समाजाच्या वर्धापन दिनाच्या प्रसंगी




डॉ. बाबा आढावांचे बेमुदत उपोषण



कष्टाची भाकरचा आस्वाद घेताना रामकृष्ण मोरे, विलासराव देशमुख




कष्टाची भाकर केंद्राला पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांची भेट




आरोग्य शिबीरात मार्गदर्शन करताना

१०) महात्मा फुले यांचा पुरोगामी सत्यशोधकाच्या १९८५ च्या अंकावरील मुळ फोटो.




# ११) शासनाच्या चरित्रे साधने प्रकाशन समितीत सदस्य.

११) शासन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | मा. ना. श्री. राजेश टोपे<br>मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) |
| उपाध्यक्ष | - | मा. ना. श्री. डी. पी. सावंत<br>राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) |
| सदस्य | - | मा. ना. श्री. नितीन राऊत<br>मंत्री (रोजगार हमी योजना, जलसंधारण) |
| सदस्य | - | मा. ना. श्री. संजय कुमार<br>प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) |
| सदस्य | - | श्री. एन. जी. कांबळे |
| सदस्य | - | प्रा. जोगेंद्र कवाडे |
| सदस्य | - | ॲड. श्री. प्रकाश आंबेडकर |
| सदस्य | - | प्रा. जनार्दन चांदूरकर |
| सदस्य | - | श्री. लक्ष्मण माने |
| सदस्य | - | श्री. रामदास आठवले |
| सदस्य | - | डॉ. बाबा आढाव |
| सदस्य | - | डॉ. जनार्दन वाघमारे |
| सदस्य | - | डॉ. एम. एल. कासारे |
| सदस्य | - | श्री. टी. एम. कांबळे |
| सदस्य | - | डॉ. आ. ह. साळुंखे |
| सदस्य | - | डॉ. जयसिंग पवार |
| सदस्य | - | प्रा. रमेश जाधव |
| सदस्य | - | प्रा. डॉ. रावसाहेब कसबे |
| सदस्य | - | प्रा. दत्ता भगत |
| सदस्य | - | श्री. प. ज. गोसावी<br>संचालक, शासकीय मुद्रणालये लेखन सामग्री व प्रकाशने |
| सदस्य | - | डॉ. पी. आर. गायकवाड<br>संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे |
| सदस्य-सचिव | - | प्रा. अविनाश डोळस |

## १२) महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचे नोंदणी दाखल १९७१.



[Spl.—CC. BPT 50.

№ 6231

**CERTIFICATE OF REGISTRATION**

*The Societies Registration Act, 1860.*

*(ACT XXI OF 1860)*

**Registration No.** MAH/720/Poona

IT IS HEREBY CERTIFIED THAT Mahatma Jotirao Fule Samata Pratishthan, Khanwadi, Tal. Purandar, Dis. Poona.

has this day been duly registered under the Societies Registration Act, XXI of 1860

Given under my hand this


19th day of November 1971

19-11-71

Assistant Registrar of Societies,

Poona Region.

१३) महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचे नोंदणी दाखल १९७२.



१३)

[Spl.—CO.(BPT) 2(e)]

CERTIFICATE OF REGISTRATION

It is hereby certified that the Public Trust described below has this day been duly registered under the Bombay Public Trusts Act, 1950 (Bom. XXIX of 1950), at the Public Trusts Registration Office ........ Public Trusts Registration Office, Poona Region, Poona.

Name of Public Trust ........ महात्मा ज्योतीराव फुले समता प्रतिष्ठान, (सासवड)

Number in the Register of Public Trusts ........ ई/[illegible]/पुणे

Certificate issued to ........ श्री. रावसाहेब यशवंतराव पवार, रा. सासवड

Given under my hand, this ....9.... day of फेब्रुवारी ........ 1972

[illegible] ९-२-७२

Signature ... Asstt. Charity Commissioner,

Designation ... Poona Region, Poona.

१४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जीवनसाधना गौरव पुरस्कार मानपत्र.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

६८ वा वर्धापनदिन

जीवनसाधना गौरव पुरस्कार मानपत्र

आदरणीय बाबा आढाव

असंघटित कष्टकरी, दलित, भटके-विमुक्त, अपंग, बेरोजगार, बालकामगार, धरण-प्रकल्पग्रस्त आणि देवदासी ह्यांसारख्या शोषित समुहांच्या न्याय्य हक्कांची मांडणी व लढा उभारणारा महात्मा फुले यांच्या विचारधारेतील सत्यशोधकी संघटक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सांस्कृतिक पुनर्मांडणीच्या सिद्धान्ताची संघर्षशील रचिते रचणारा रचनाकार अशी आपली अतिशय समर्पक ओळख उभ्या महाराष्ट्रात आणि देशभरात आहे.


लहानपणापासूनच राष्ट्रसेवादलाच्या तालमीत संघटनकौशल्याचे धडे मिळाले. रात्रीच्या कामगार शाखांचे संघटन, अन्नधान्य भाववाढ विरोधी सत्याग्रह यावरोबरच गोवा मुक्ती आंदोलनातही हिरीरिने सहभाग घेतला. हमालांची संघटना बांधली. चौकातल्या फलकावर रोज स्वतः बातम्या लिहिल्या. लोकांचे प्रबोधन व्हावे म्हणून व्याख्यानमाला सुरू केली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात उडी घेतली. आपल्या वैद्यकीय व्यवसायाचे सामाजिकीकरण केले आणि खाजगी वैद्यकीय व्यवसाय बंद केला. पुण्यातील झोपडपट्ट्यांची पाहणी करून झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन परिषद घेतली. अनेकवेळा तुरुंगवासही भोगला. डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या तुरुंग, फावडे व मतपेटी ह्या त्रिसूत्रीवर आपला ठाम विश्वास. नागरी संघटनेच्या वतीने पुणे महानगरपालिकेत निवडून आलात. महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसन परिषदेची स्थापना करून लोकसेवकांनी जमिनी बळकावण्यापेक्षा धरणाच्या पाण्याखाली ज्यांचे संसार बुडाले त्यांनाच भिजक्षेत्रातील जमिनी मिळाव्यात अशी रास्त मागणी केली. कुकडी प्रकल्पाचा 'आधी पुनर्वसन मग धरण' सत्याग्रह देशभर गाजला. परिणामी महाराष्ट्रात पुनर्वसनाचा कायदा निर्माण झाला. माथाडी हमाल कामगार कायदा अस्तित्वात येण्यास आपल्या चळवळीचा मोठा वाटा आहे. महात्मा ज्योतिराव फुले व इ. व्ही. रामस्वामी यांच्या सुधारणावादाच्या प्रभावातून खानवडी या गावी महात्मा ज्योतिराव फुले समता प्रतिष्ठानची स्थापना केली. १९७२ मध्ये एक गाव एक पाणवठा या सामाजिक ऐक्याच्या अतिशय ठोस अशा मोहिमेची सुरुवात केली. सत्यशोधक चळवळीच्या इतिहासाची साधनभूत माहिती गोळा करण्यासाठी आपण गावोगावी हिंडलात आणि परिणामी महात्मा फुले समग्र वाङ्मयात ऐतिहासिक भर पडली. पंढरपूरच्या विठोबाची शासकीय खर्चाने होणारी पूजा बंद करण्याबरोबरच वैदिक पंडितांचा शासकीय सत्कारही बंद केला. वारकरी दिंड्यामध्येही पाळल्या जाणाऱ्या अस्पृश्यताविरोधात सत्याग्रह करून वारकरी शिक्षण संस्थेला सामाजिक भान आणून दिले. आणीबाणीच्या काळातही झोपडपट्टी परिषदेचे आयोजन केले. परिणामी दोन वर्षे तुरुंगवास आणि याच काळात हमाल बांधवांनी पुढे परिवर्तनाच्या चळवळीचे अत्यंत उर्जाशील केंद्र बनलेल्या हमाल भवनाची निर्मिती केली. आणीबाणीनंतरही जनता पक्षात न जाता त्याही काळात झोपडपट्ट्यांच्या प्रश्नांवर सतत सत्याग्रह करून आणि धर्मांध व जातीयवादी शक्तींच्या संघटनांचे पितळ उघडे पाडून उभ्या महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीची मोठी मुसंडी मारली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर सत्याग्रहातील सहभाग, मंडल आयोगाच्या समर्थनासाठी कृतीसमिती, भिवंडीमधील दंगलग्रस्तांना भरीव मदत, भटक्या विमुक्तांच्या चळवळीचे प्रवर्तन, परित्यक्ता स्त्रियांच्या हक्काची लढाई, यासोबतच हमाल, माथाडी, कामगारांचे संघटन अशा अनेक मोहिमांवर अग्रभागी राहून नेतृत्व केले. महाराष्ट्रातील एकूणएक बाजारपेठांची स्थितीगती जाणून घेतली. परिणामी आज जी हमाल माथाडी समुहाला प्रतिष्ठा लाभली आहे त्यात आपलाच मोठा वाटा आहे.

आपल्या या समाजप्रबोधक कृतिप्रवणतेचा आदर करण्यासाठी आणि आपल्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आपणास जीवनसाधना गौरव पुरस्कार सानंद प्रदान करीत आहे. आपण ह्या पुरस्काराचा स्वीकार करावा, ही नम्र विनंती.

डॉ. वासुदेव गाडे
कुलगुरू

दिनांक : १० फेब्रुवारी २०१७

## १५) पुणे पीपल्स को.ऑप. बँक लि. पुणे सन्मानपत्र.



पुणे पीपल्स को.ऑप बँक लि.,पुणे

(मल्टीस्टेट बँक )

मुख्य कार्यालय : ६०६, सदाशिव पेठ, कुंटे चौक, पुणे ४११०३०

आदरणीय डॉ. बाबा आढाव यांना पुणे पीपल्स पुरस्कार सन्मानपत्र

अंधश्रध्देचा पगडा असलेल्या, मुकाटपणे अन्याय सहन करणाऱ्या, अशिक्षित, पददलित समाज बांधवांना जागृत करुन विज्ञानाची कास धरायला लावण्यासाठी, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी, समाजातील त्यांचे सुयोग्य स्थान हक्काने मिळवून देण्यासाठी प्रतिक्षा होती एका द्रष्ट्या, समर्पित नेतृत्वाची. डॉ. बाबा आढाव या समाजाला आपल्या रुपाने ते नेतृत्व लाभले आणि या सोशितांना त्यांच्या हक्काची, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची आणि क्षमतेची जाणीव झाली. या असंघटित समाज बांधवांना अन्यायाविरुध्द संघटित करण्याचे आणि समानतेचा अधिकार मिळवून देण्याचे महान कार्य आपण केलेले आहे.

रंजल्या गांजल्यांना आपले म्हणणाराचे ठायी देव समजणाऱ्या वारकरी सांप्रदायातले आपले वडील आणि आपले आजोबा ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीतले अग्रणी . असा वैचारिक आणि दीन-दुबळ्यांसाठी काम करण्याचा वारसा असलेले आपण त्याच दिशेने गेला नसतात तरच नवल. आपण आपल्या सामाजिक कार्याचा पाया आपल्या वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीच सेवादलात घातला गेला. वर्ष १९४३ ते १९५० या काळात [illegible] दलात सक्रीय होतात आणि त्यातली काही वर्षे आपण शाखानायकही होतात. फर्ग्युसन महाविद्यालय आणि वाडिया महाविद्यालयातून [illegible] आपण मिश्र वैद्यकाची पदविका घेतली आणि पुणे शहराच्या पूर्व भागात, जिथे गरीब कुटुंबांची संख्या मोठी आहे [illegible]. नंतर आपण हडपसर येथेही दुसरा दवाखाना सुरु केला. आपण वैद्यकीय व्यवसायात पैसे मिळविण्यासाठी गेलेला [illegible] त्यामुळे आपण आपल्या व्यवसायाचेही अल्पावधीत सामाजिकीकरण केले आणि साने गुरुजी रुग्णालयाचे नावाने ट्रस्ट करुन व्यक्तिगत व्यवसायातून अलगद बाहेर पडलात.

[illegible] म्हणजे सगळीकडेच आवश्यक [illegible] परंतु दुर्लक्षित घटक. यांच्या कामाचे ना दर नक्की होते ना वेळा. या असंघटिक हमाल [illegible] करण्याचं, त्यांना त्यांच्या [illegible] करुन देवून न्यायासाठी आवाज उठविण्यास उद्युक्त करण्याचं भगिरथ काम आपणच [illegible] आज हमालांना जो काही न्याय आणि [illegible] मिळते आहे ती केवळ आपल्यामुळेच असं म्हणायला हवं. असंच मोठं काम आपण [illegible] केलं आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय, [illegible], त्यांना होणारा जाच यावर दाद मागण्यासाठी आपण रिक्षाचालकांना संघटित [illegible] आणि न्याय मिळवून दिला आहे. पुणे पीपल्स बँक रिक्षावाल्यांची बँक म्हणून ओळखली जात होती त्यामुळे रिक्षावाल्यांचे नेत्याला पुणे पीपल्स पुरस्काराने गौरवान्वित करण्यात आम्हाला अभिमान वाटतो.

आपला दृष्टीकोन वैज्ञानिक आहे. अंधश्रध्दा, वेद पुराणांचा अतिरेक हे आपल्या विचारात न बसणारे आहे. माणसातला माणूस सर्वात बहुमोल, मग तो कोणत्याही जातीचा, कोणत्याही धर्माचा असो ही आपली धारणा. अंधश्रध्दांमुळे देवदासी एक निकृष्ट जीवन जगत होत्या आणि समाज त्यांच्या अगतिकतेचा लाभ उठवत होता. आपण देवदासी परिषद भरवून त्यांना संघटित करुन त्यांच्या जीवनाला एक सन्मानाची दिशा दिलेली आहे. धरणे बांधताना अनेक गरीब शेतकरी बांधवांना जमीन गेल्यामुळे आयुष्यातून उठावे लागते. आपण या प्रश्नाकडे शांतपणे पाहू शकणारे नव्हताच. अगोदर पुनर्वसन आणि मग धरण ही रास्त आणि आवश्यक भूमिका घेवून आपण सरकारला विचार आणि कायदा करण्यास भाग पाडले आहे. अनेक मूलभूत सामाजिक प्रश्नांना भिडण्याचं धाडस करणारे आपण. म्हणून तर एक गाव एक पाणवठा ही चळवळ आपण सुरु केली आणि त्याचे सुपरिणाम समाज भोगतो आहे. ज्या संतांनी जाती धुडकावल्या त्याच संतांच्या नावे असलेल्या आळंदीतील दिंडीत अस्पृश्यता सांभाळली जात होती. आपण या अशा दिंड्यांचे बिंग बाहेर काढले आणि दिंड्यांना एक विशाल जातरहित दृष्टीकोन स्वीकारायला भाग पाडले आहे.

साधना साप्ताहिकातील आपले संपादकीय काम, सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी आपण केलेली वणवण, केलेले विचारप्रवर्तक लिखाण, हमाल, देवदासी, भटके, विमुक्त, धरणग्रस्त यांच्यासाठी केलेले काम अतुलनीय आहे. आपल्याच आंदोलनामुळे सरकारला अनेक कायदे करणे भाग पडले आहे. आणिबाणीत दोन वर्षांचा आणि अनेक आंदोलनात अनेक वेळा झालेला तुरुंगवास भोगलेले आपण म्हणजे एक आगळे वेगळे रसायन आहात. स्वत:वरचा विश्वास, आपल्या कामावर विश्वास, समाजातल्या गोरगरीब आणि दलितांविषयीचा कळवळा, अन्यायविरुध्द सर्वस्व पणाला लावून काम करण्याची मानसिकता, विज्ञानाधिष्टीत विचारधारा, अवास्तव धार्मिक रुढी आणि परंपरांना टोकाचा विरोध हे सगळं तीव्रतेने एकाच व्यक्तिमत्वात असणारे आपण एकमेव आहात.

आपल्या या प्रदीर्घ काळात आपल्या कामामुळे अनेक सन्मान, अनेक पदे आपल्याकडे चालून आलेली आहेत. यांची यादी करायची म्हणलं तर ते एक स्वतंत्र लिखाण होईल. आपणास या पदव्या, सन्मान आणि पदे यांच्यापेक्षा नेहमीच सन्मानित झाल्यासारखे वाटत आले आहे ते दलित, गरीब, देवदासी, हमाल, धरणग्रस्त यांच्या चेहेऱ्यावरील समाधान पाहून. या दीन दुबळ्यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद पाहणे, त्यांच्या क्षमता जागृत करणे, त्यांना न्याय मिळवून देणे हेच आपल्या जगण्याचे उद्दिष्ट आहे आणि ते आपण प्राप्त केले आहे असं म्हणावंच लागेल. ज्या निष्ठेने, ज्या सातत्याने आणि ज्या शक्तिनिशी आपण हे कार्य करत आहात त्याला केवळ नतमस्तक होवून मानवंदनाच द्यावी इतकं ते मोठं आणि मोलाचं आहे.

आपल्या या दैदिप्यमान, प्रेरणादायी कार्यासाठी पुणे पीपल्स बँक परिवाराचा मानाचा मुजरा. आपणास पुणे पीपल्स पुरस्काराने गौरवान्वित करण्यात आमचाच सन्मान होत आहे. आपणास गोर गरीब, दीन दुबळे, हमाल यांचेसाठी तितक्याच धडाडीने काम करत राहण्यासाठी सळसळत्या उत्साहाचे आरोग्यदायी उदंड आयुष्य लाभो ही प्रार्थना.

बबनराव भेगडे
उपाध्यक्ष

ॲड.सुभाष मोहिते
अध्यक्ष

सोमवार दिनांक १३ मार्च २०१७

१६) 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' या महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकात संपादक य.दि. फडके यांचे निवेदन (आवृत्ती पाचवी)

## पाचव्या आवृत्तीच्या संपादकांचे निवेदन

'महात्मा फुले : समग्र वाङ्मय' या ग्रंथाची सुधारित चौथी आवृत्ती एप्रिल १९९१ मध्ये जोतीरावांच्या स्मृति-शताब्दीच्या निमित्ताने विशेष सवलत म्हणून महाराष्ट्र शासनाने अवघ्या दहा रुपये किंमतीस उपलब्ध करून दिली. चौथ्या आवृत्तीच्या दहा हजार प्रती दोन दिवसात संपल्या. वाचकांचा हा अभूतपूर्व प्रतिसाद लक्षात घेऊन पन्नास हजार प्रतींची ही नवी सुधारित पाचवी आवृत्ती शक्य तितक्या कमी किंमतीस वाचकांना उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी कोणतीही विशेष सवलत अगर खास अनुदान घेतलेले नाही. मुख्यत: मुद्रणाचा खर्च लक्षात घेऊन प्रत्येक प्रतीस पन्नास रुपये ही किंमत निश्चित केली आहे.

चौथ्या आवृत्तीत प्रथमच समाविष्ट करण्यात आलेला सर्व मजकूर विस्तृत संदर्भ टिपांसह या पाचव्या आवृत्तीतही छापलेला आढळेल. मात्र ही आवृत्ती म्हणजे केवळ पुनर्मुद्रण नाही. चौथ्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर दिसलेले मुद्रणदोष दूर करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे. तसेच चौथ्या आवृत्तीतील मजकुराच्या मांडणीतही आवश्यक वाटले तेथे काही बदल केलेले आहेत.

याखेरीज महात्मा फुल्यांच्या मृत्युपत्राच्या दस्तावेजाची छायाचित्रे आणि त्यांची आणखी तीन पत्रे यांचा या पाचव्या आवृत्तीत प्रथमच समावेश केलेला आहे. जोतीरावांच्या मृत्युपत्राची छायाचित्रे श्री. हरि नरके यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक आणि त्यांचे सहकारी यांच्या मदतीने प्रथम मिळवली. मराठी व इंग्रजी हस्ताक्षरातील फुल्यांच्या पत्रांच्या छायाप्रती श्री. विजय सुरवाडे आणि श्री. गौतम शिंदे यांनी उपलब्ध करून दिल्या. त्याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक आभार. जोतीरावांचे तिसरे पत्र डॉ. आर. एम. पाटील यांच्या संग्रहातील 'इशारा' पुस्तिकेत छापलेले मला आढळले होते. ते मी माझ्या 'व्यक्ती आणि विचार' या लेखसंग्रहात (श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७९, पृ. ५६) उद्धृत केले होते.

चौथ्या आवृत्तीत छापलेल्या जोतीरावांच्या रंगीत छायाचित्रांऐवजी या पाचव्या आवृत्तीत श्री. गोपीनाथराव पालकर या सत्यशोधक चळवळीतील नामवंत कार्यकर्त्याच्या खासगी संग्रहातून डॉ. बाबा आढाव यांनी मिळवलेले कृष्णधवल छायाचित्र छापले आहे. ते अस्सल असण्याची जास्त शक्यता वाटते.

पुणे येथील शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. अ. चाँ. सय्यद आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी संचालक श्री. प्रकाश मोरे आणि श्री. प्र. ल. पुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत परिश्रम घेऊन मुद्रणाचे काम पुरे केल्यामुळे ही पाचवी आवृत्ती २८ नोव्हेंबर या महात्मा फुल्यांच्या स्मृतिदिनापूर्वी प्रकाशित करणे शक्य झाले आहे.

ग्रंथाचे मुद्रण चालू असताना श्री. हरि नरके यांनी पुण्यात तळ देऊन मुद्रित शोधनाच्या कामात साहाय्य केले नसते तर ही आवृत्तीही वेळेवर प्रसिद्ध करता आली नसती. त्याबद्दल त्यांचे ऋण शब्दामध्ये व्यक्त करणे कठीण आहे.

'महात्मा फुले : समग्र वाङ्मय' या ग्रंथासारख्या ग्रंथाचे संपादन करण्याचे काम परिपूर्ण होत नसते. नवीन संशोधनामुळे यापुढेही या ग्रंथात जशी भर पडत जाईल त्याप्रमाणे सर्वसाधारण वाचकांची सोय, प्रतिक्रिया आणि त्यांच्या सूचना लक्षात घेऊन कालांतराने नव्या संदर्भ टिपांचीही भर घालावी लागेल. याखेरीज ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर आढळलेले मुद्रणदोष दूर करण्याचा प्रयत्नही सतत करावा लागतोच. तो यापुढेही केला जाईल.

नवीन प्रशासन भवन,<br>मंत्रालयासमोर,<br>मुंबई ४०० ०३२,<br>दि. २८ ऑक्टोबर १९९१

**य. दि. फडके**<br>अध्यक्ष,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

१७) 'महाराष्ट्रातील समाजसुधारक' या महाराष्ट्र शासनाच्या पुस्तकातील 'बाबा आढावांविषयीची माहिती'

**लढाऊ व नि:स्पृह समाजसेवक**

प्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते व लढाऊ वृत्तीचे नेते. जनआंदोलनातून साकारलेले प्रभावी नेतृत्व. महात्मा फुल्यांच्या विचारांशी असलेली बांधीलकी मानणारे आणि जपणारे मनस्वी पुरोगामी व्यक्तिमत्त्व. १ जून, १९३० हा बाबांचा जन्मदिनांक. विविध सामाजिक व राजकीय आंदोलनांमध्ये सहभाग; त्याकरिता अनेक वेळा तुरुंगवासाची शिक्षा.

बाबा आढाव यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा तसेच समाजवादी विचार-सरणीचा प्रभाव आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची समाजाला आजही गरज आहे, असे त्यांचे मत आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. त्याकरिता विधायक संघर्षाच्या मार्गाचा त्यांनी पुरस्कार केला आहे.

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रकारच्या जनआंदोलनांमध्ये त्यांनी वेळोवेळी भाग घेतला आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ; धरण-ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी झालेले आंदोलन; दलित, भटक्या व विमुक्त जातींच्या न्याय्य



हक्कांसाठी चाललेल्या चळवळी इत्यादी अनेक चळवळींत ते नेहमी अग्रभागी राहिले आहेत.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही बाबांनी भाग घेतला आहे. समाजातील जातिभेद व वर्णव्यवस्था यांस त्यांचा प्रखर विरोध आहे. स्त्रीजातीवर होणारा अन्याय व देवदासी प्रथा यांविरुद्धही त्यांनी संघर्ष केला आहे. ते विधवाविवाहाचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात.

सन २००५ मध्ये वयाची पंचाहत्तरी ओलांडणाऱ्या बाबांनी 'म्हातारपणाचं करायचं काय, पेन्शन घेतल्याबिगार राहायचं नाय' हा मंत्र येथील असंघटित कष्टकऱ्यांना देऊन एका जिवंत पण दुर्लक्षित समस्येस वाचा फोडत एक नवे आंदोलन छेडले आहे.

मे, २००७ पासून त्यांनी 'जातिविरहीत समाज रचना' ही नवी परिवर्तनवादी चळवळ हाती घेतली आहे.

**आदर्श नेतृत्व**

असते असेले आहे.

## आदर्श नेतृत्व

सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून त्यांनी 'एक गाव– एक पाणवठा' ही मोहीम चालविली होती. दलित व उपेक्षित वर्गांना त्यांचे न्याय्य हक्क मिळालेच पाहिजेत याविषयी ते विशेष आग्रही आहेत. या प्रश्नावर समाजात जागृती घडवून आणण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. हमालांचे व श्रमिक कामगारांचे संयमी पण कृतिशील नेते म्हणूनही बाबा कार्यरत आहेत. निर्भीड आणि नि:स्पृह कामगार नेते या नात्याने बाबांची एक आगळी प्रतिमा जनमानसावर उमटली आहे. त्यांनी पुण्यात हमालांसाठी 'हमाल भवन' ही वास्तू उभारली असून 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ठिकठिकाणी 'कष्टाची भाकर' केंद्रे उभी केली आहेत. आदर्श कामगार नेतृत्व कसे असावे याचे ते मूर्तिमंत उदाहरण होत.

महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीस दिशा दाखवून देणाऱ्या 'पुरोगामी सत्यशोधक' या त्रैमासिकाचे संपादकपद त्यांनी भूषविले आहे.

## मान-सन्मान

इ. स. १९८९ च्या पहिल्या छत्रपती शाहू पुरस्काराचे पहिले मानकरी. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने समता व सामाजिक एकात्मतेच्या विशेष कार्याबद्दल १९९१ चे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक; आदर्श कामगार कार्यकर्ते म्हणून वसंतराव नाईक कृषी प्रतिष्ठानचे १९९४ चे पारितोषिक. पहिल्या महात्मा फुले पुरस्काराचे मानकरी-१९९४. पुणेस्थित 'त्रिदल' या संस्थेच्यावतीने दिला जाणारा पुण्यभूषण पुरस्कार-२००६.

## लेखनसंपदा

एक गाव एक पाणवठा, हे तर शेटजी-भटजींचे आधुनिक दासच, सत्यशोधनाची वाटचाल.

१८) हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ निमंत्रण पत्रिका.



हमाल पंचायत, पुणे

हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाच्या नव्या इमारतीचा

**उद्घाटन समारंभ**

हस्ते : **ना. शरद पवार** कृषिमंत्री, भारत सरकार

अध्यक्ष : **डॉ. बाबा आढाव**

❖ सन्माननीय उपस्थिती ❖

**ना. अजित पवार** जलसंपदा व उर्जामंत्री, पालकमंत्री, पुणे

**ना. रमेश बागवे** गृहराज्यमंत्री

**मा. मोहनसिंग राजपाल** महापौर, पुणे महानगरपालिका

**मा. आ. माधुरी मिसाळ**

नगरसेविका **मा. वंदना भिमाले**

वेळ : शनिवार, ३ जुलै २०१० रोजी दुपारी ४.०० वाजता

स्थळ : हमालनगर, गुलटेकडी, पुणे ३७.


कृपया समारंभाला उपस्थित राहून आम्हास प्रोत्साहित करावे ही विनंती.

आपले विनीत,

**अनिल गिरमे** मुख्याध्यापक

**नवनाथ बिनवडे** सरचिटणीस

१९) सामाजिक कृतज्ञता निधी–पुरस्कार वितरण कार्यक्रम पत्रिका.



# सामाजिक कृतज्ञता निधी

८९, न्यु टिंबर मार्केट, भवानी पेठ, पुणे ४११०४२

नमस्ते,

सामाजिक परिवर्तनासाठी स्वतःला झोकून देणाऱ्या, ध्येयवादी कार्यकर्त्यांना सामाजिक कृतज्ञता निधीच्या वतीने दरवर्षी सन्मानीत केले जाते. यावर्षी

- **सामाजिक कृतज्ञता पुरस्कार**
  कॉ.गोविंद पानसरे, कोल्हापूर
- **एस.एम.जोशी कार्यकर्ता पुरस्कार**
  साथी मानव कांबळे, पिंपरी–चिंचवड
- **डॉ.राम आपटे प्रबोधन पुरस्कार**
  मा.रुबीना पटेल, नागपूर

यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ कष्टकऱ्यांचे नेते **डॉ.बाबा आढाव** यांच्या हस्ते आणि सामाजिक कृतज्ञता निधीच्या अध्यक्ष **प्रा.पुष्पा भावे** यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

**शुक्रवार, दि.२८ फेब्रुवारी २०१४ रोजी सायं. ६ वा.**

**महात्मा फुले वाडा, महात्मा फुले पेठ, पुणे २**

येथे होणाऱ्या या समारंभास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. कळावे,

आपले,

**कार्यवाह, कार्याध्यक्ष व सर्व विश्वस्त मंडळ–सामाजिक कृतज्ञता निधी**

२०) महात्मा फुले समता प्रतिष्ठानची प्रकाशने.

रजि. नं. २७८८४/७५

## म. फुले समता प्रतिष्ठानची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे | मनोहर कदम | रु. १००/- |
| संघाची ढोंगबाजी (आवृत्ती संपली) | बाबा आढाव | रु. ५/- |
| अंधेरनगरी निपाणी (दुसरी आवृत्ती) | अनिल अवचट | रु. ५/- |
| वेठबिगारी | वसंत देशपांडे | रु. ५/- |
| नव्या जाणिवा | वसंत देशपांडे | रु. ५/- |
| तृतीय रत्न | म. जोतीराव फुले | रु. ५/- |
| विटाळ विध्वंसन | गोपाळराव वलंगकर | रु. ५/- |
| संघापासून सावध | बाबा आढाव | रु. ५/- |
| राखीव जागा : वस्तुस्थिती | य. दि. फडके | रु. ३/- |
| कृष्णराव भालेकर : समग्र वाङ्मय | | रु. ६०/- |
| दिनकर जवळकर : समग्र वाङ्मय | | रु. ६०/- |
| डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह | य. दि. फडके | रु. १२/- |
| जागृतिकार पाळेकर | संपा. सदानंद मोरे | रु. ३००/- |

**• पुस्तके मिळण्याचे ठिकाण •**

★ डॉ. बाबा आढाव, ७३, नाना पेठ, पुणे ४११००२.

★ प्रतिष्ठान कार्यालय, ८९, न्यू टिंबर मार्केट, पुणे ४११०४२.

★ श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

## २१) डॉ. बाबा आढावांचा जीवनपट

१. १९३० – बाबा आढाव जन्म.

२. १९४३ – राष्ट्रसेवादलात सहभाग.

३. १९४५ – शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये शिक्षण.

४. १९४७ – मुंबई विद्यापीठाची मॅट्रीक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण.

५. १९५० – वाडीया कॉलेजमधून इंटरपरीक्षा उत्तीर्ण.

६. १९५२ – पुणे विद्यापीठाची बी.एस.सी. पदवी प्राप्त.

७. १९५२ – आयुर्वेद महाविद्यालयाची डी.ए.एस.एफ. पदविका प्राप्त.

८. १९५२ – महागाई विरोधी लढा पहिली अटक.

९. १९५३ – हमालांसाठी दवाखाना सुरू.

१०. १९५५ – हमाल पंचायतीची स्थापना.

११. १९५५ – गोवा मुक्ती आंदोलनात सहभाग.

१२. १९५६ – संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग.

१३. १९५६ – हमालांचा संप घडवून आणला.

१४. १९६२ – पुणे महानगरपालिकेच्या नगरसेवक पदी निवड.

१५. १९६३ – महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसन परिषदेची स्थापना.

१६. १९६६ – डॉ. बाबा आढाव व शीलाताई विवाहबद्ध.

१७. १९६६ – हमाल मजूर सहकारी संस्था स्थापन केली.

१८. १९६७ – खेड लोकसभा मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढविली.

१९. १९६८ – नगरसेवकपदी दुसऱ्यांदा निवड.

२०. १९६९ – हमाल माथाडी कायदा आणला.

२१. १९७० – शेतकरी शेतमजुर पंचायतीची स्थापना.

२२. १९७२ – एक गाव एक पाणवठा चळवळ सुरू केली.

२३. १९७२ – कष्टाची भाकर उपक्रमाला सुरूवात.

२४. १९७४ – भाऊबीज भेट उपक्रमाला सुरूवात.

२५. १९७५ – हमाल पंचायतीचा स्वस्त दवाखाना.

२६. १९७६ – पुस्तक पेढी उपक्रमाला सुरूवात.

२७. १९७७ – हमाल भवन इमारत बांधून पूर्ण केली.

२८. १९७७ – विषमता निर्मूलन समितीची स्थापना.

२९. १९७८ – देवदासी पुनर्वसन परिषद.

३०. १९७९ – हमाल नगराची स्थापना.

३१. १९७९ – मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यासाठी लाँग मार्च काढला.

३२. १९८२ – राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना.

३३. १९८६ – सामाजिक कृतज्ञता निधीची स्थापना.

३४. १९८८ – राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना.

३५. १९८९ – सत्यशोधनाची वाटचाल पुस्तक प्रसिद्ध झाले.

३६. १९९३ – कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतीची स्थापना.

३७. १९९३ – बांधकाम कामगार पंचायतीची स्थापना.

३८. १९९४ – रिक्षा पंचायतीची स्थापना.

३९. १९९७ – पथारी व्यावसायिक पंचायतीची स्थापना.

४०. १९९९ – टेम्पो पंचायतीची स्थापना.

४१. २००० – हमाल पंचायत कष्टकरी विद्यालयाची स्थापना.

४२. २००२ – रिक्षा पंचायत नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना.

४३. २००२ – मोलकरीण पंचायतीची स्थापना.

४४. २००८ – महागाई विरोधी आंदोलनात तुरूंगात (५३ वी वेळ)

# निवडक संदर्भ साहित्य सूची

## मूळ साधने


**अ) अप्रकाशित कागदपत्रे**

१) समता प्रतिष्ठान पुणे येथील साधने,

१. रोजनिशी सन १९६८, १९६९, १९७०, १९७१, १९७५, १९८०, १९८२.

२. शासकीय पत्रव्यवहाराचे कागद.

३. चळवळीतील नेत्यांशी केलेल्या पत्रव्यवहाराचे कागद.

४. संशोधनासाठी निवडलेले कागद.

५. समता प्रतिष्ठानचे दप्तर.

**२) खाजगी संग्रह**

१. बाबा आढाव यांच्या खाजगी संग्रहातील कागदपत्रे.

**आ) प्रकाशित मराठी साधने**

१. महात्मा फुले समग्र वाङ्मय – म.रा.सा.म.मं. मुंबई

**इ) प्रकाशित इंग्रजी साधने**

१. The Week, December 23, 2007.

२. Struggle and Strength narratives form streets of an Indian metroplis.


## दुय्यम साधने


**अ) ग्रंथ (मराठी)**

१) वैद्य भाई, परिवर्तनाचे साथी आणि सारथी, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २०१४.

२) जोशी एस. एम., मी. अेस. अेम (आत्मकथा) तृतीयावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३.

३) तुपे रामभाऊ, राहिले ते आपुले, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४) आढाव बाबा, एक गाव एक पाणवठा, तृतीयावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, मे २००५.

५) देशपांडे वसंत, हमाल पंचायत, प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, जुलै १९८९.

६) खरीखुरी टीम इंडिया, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८.

७) प्रधान ग. प्र. महाराष्ट्राचे शिल्पकार, अेस. अेम. जोशी, पुनर्मुद्रण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – २५, २००४.

८) पळशीकर सुहास, सत्याग्रही समाजवाद, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, सप्टेंबर १९९४.

९) सुराणा पन्नालाल, बुलंद आवाज बाईचा, साधना प्रकाशन, पुणे ३०, २०१०.

१०) डॉ. शहा मु. ब. राष्ट्रसेवादल : इतिहास और कार्य, राष्ट्रसेवादल वाङ्‌मय विभाग, पुणे ३०, २००२.

११) प्रा.राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ.स. १८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००७.

१२) डांगळे अर्जुन, आंबेडकरी चळवळींचे अंतरंग, लोकवाङ्‌मय प्रकाशन, मुंबई, २००७.

१३) आंबेडकर प्रकाशन, समकालीन राजकारण आणि बहुजन चळवळ, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००४.

१४) खरात शंकरराव, तराळ–अंतराळ, पुनर्मुद्रण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, २००४.

१५) भागवत कमल, न संपणारी वाट, वरद प्रकाशन, पुणे १६, १९९६.

१६) तांबोळी शमशुद्दीन, हमीद दलवाई, क्रांतिकारी विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३०, २०१४.

१७) डॉ. दाभोळकर नरेंद्र, श्रद्धा–अंधश्रद्धा, राजहंस प्रकाशन, पुणे ३०, २००१.

१८) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

१९) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा) मराठी विश्वकोश, खंड १ ते १८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६२–१९८५.

२०) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ८, पुनर्मुद्रण, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०१६.

२१) डॉ. गाठाळ मु. ब. इतिहास लेखन शास्त्र.

२२) कुलकर्णी अ.रा., मराठे आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

२३)	जोशी शं. ना., मराठेकालीन समाज दर्शन, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९६०.

**आ)	मुलाखती**

१)	बाबा आढाव, पुणे, दि. ०४/११/२०१३.
२)	वैद्य भाई, पुणे, दि.८/७/२०१४.
३)	आढाव शीला, पुणे दि.४/१२/२०१३.
४)	घोटमुकले माधव, पुणे दि.१/१०/२०१४.
५)	विरूळे बापू, पुणे, दि.२५/९/२०१४.
६)	शिंदे हरीदास, पुणे, दि.२६/१/२०१४.
७)	बिनवडे नवनाथ, पुणे, दि.४/११/२०१४.
८)	ननावरे मोहन, पुणे, दि.८/२/२०१४.
९)	सोनवणे दादासाहेब, पुणे, दि.१/९/२०१३.

**इ)	वर्तमानपत्रे / मासिके / विशेषांक**

१)	दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि.१ जून २००९.
७)	दैनिक सकाळ, दि.३ जुलै २०११.
३)	दैनिक लोकमत  दि.२८ डिसेंबर, २०१३.
४)	दैनिक बहुजन महाराष्ट्र, दि.१ जून २०११.
५)	दैनिक पुढारी, दि.१६ मार्च २०१४.
६)	दैनिक सकाळ, दि. १५ डिसेंबर १९९१.
७)	दैनिक सकाळ, दि.०२ ऑगस्ट २०१०.
८)	दैनिक सकाळ, दि.१७ ऑगस्ट २०१०.

**ई)	त्रैमासिक**

१)	पुरोगामी सत्यशोधक, त्रैमासिक, १९७७, १९८०, १९८१, १९८५, १९८७, १९८८.
२)	पुरोगामी सत्यशोधक, त्रैमासिक, १९८९, १९९३, १९९४, १९९८, १९९९, २००३.
३)	पुरोगामी सत्यशोधक, त्रैमासिक, २००६, २००७, २००८, २०१२, २०१३.
४)	साधना साप्ताहिक, १९७४.

## उ) विशेषांक

१) हमाल मापाडी वार्ता – माथाडी कायदा विशेषांक १९६९.

२) हमाल मापाडी वार्ता – जळगाव अधिवेशन विशेषांक.

३) स्मरणिका, अण्णाभाऊ साठे स्मारक संस्था, रौप्य महोत्सवी वर्ष विशेषांक.

४) महाराष्ट्र आरोग्य मंडळ, सुवर्ण महोत्सवी विशेषांक २०१२.

५) समाजवादी अध्यापक अंक, मे २०१०.

६) सामाजिक कृतज्ञता निधी, द्वैवार्षिक अहवाल, १९९६.

७) सामाजिक कृतज्ञता निधी, परिवर्तन कोश.

८) विषमता निर्मूलन शिबिर, विशेषांक, ऑगस्ट २०१४.

९) अण्णा भाऊ साठे स्मारक संस्था रौप्य महोत्सवी वर्षाची यशस्वी वाटचाल, पुणे ३०, २०११.

## ऊ) संशोधनपर लेख (मराठी)

१) दीक्षित राजा, '१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री–जीवन : तळाकडून इतिहास', पुणे विद्यापीठ वार्ता : महिला सबलीकरण विशेषांक, पुणे विद्यापीठ, पुणे, जून २०००.